# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–५ अभ्यासपत्रिका क्रमांक १० DSE-E4

सत्र–६ अभ्यासपत्रिका क्रमांक १५ DSE- E129

# मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी

बी. ए. भाग–३ : मराठी

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी) भाग– ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-92887-37-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : मराठी ■

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अतकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद

## प्रास्ताविक

जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात सार्वजनिक क्षेत्रात दिवसागणिक बदल होत आहेत. ज्ञानक्षेत्राच्या बाबतीत विचार करावयाचा झाल्यास नावीन्यपूर्णता ही या युगाची मागणी आहे. किंबहुना या नावीन्यपूर्णतेत उपयुक्ततेला महत्त्व आहे. याचा परिणाम जसा मानवी जीवनावर होत आहे; तद्वतच साहित्य आणि संस्कृती यावर होताना दिसतो आहे. परंगरागत रूढ ठरावीक चाकोरीतून चालण्यापेक्षा त्यातून नवी वाट शोधून प्राप्त ज्ञानाचे व्यवहारात नीट उपयोजन करता यावे ही या काळाची अपेक्षा आहे. म्हणजे नव्या काळातील आव्हानांना सामोरे जाताना लागणारा दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे. त्यासाठी आपण सकारात्मक असले पाहिजे. त्यातून आपले व्यक्तिमत्त्व ज्ञानाधिष्ठित होईल व प्राप्त ज्ञानाचे उपयोजन आपल्या विचारांची क्षमता आणि कक्षा रुंदावण्यासाठी जाणीवपूर्वक करता येईल. ही दृष्टी ठेऊन भाषा अभ्यासक्रमात भाषा उपयोजनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

नवं जग समजून घेणं, नव्या जगातील उद्योग व सेवाक्षेत्र आणि तंत्रज्ञानात भाषा उपयोजनाचं महत्त्व अधोरेखित करणं, त्या आधारे अर्थार्जनाच्या संधी शोधणं या गोष्टींची निकड भाषाभ्यासक्रमात निर्माण झाली आहे. पदवीपातळीवरील विशेषत: भाषा अभ्यासक्रमात कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि इतर ललित गद्य याबरोबर साहित्यविचार, समीक्षा आणि भाषाविज्ञान यांना परंपरेने महत्त्व आहेच; त्यामुळे साहित्यविषयक समज, अभिरुची निर्माण होऊन समाजभान वाढीस लागण्यासाठी ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत; तथापि, त्यातील विषय, आशयाचे नव्या काळातील तंत्राच्या आणि तंत्रज्ञानाच्या आधारे भाषिक पातळीवर सार्वजनिक क्षेत्रात उपयोजनही करता आले पाहिजे, तरच ह्या भाषा तरतील. त्या अधिक समृद्ध होतील. भाषा व साहित्याभ्यासाच्या विद्यार्थ्यांला काय शिकलो हे जसे महत्त्वाचे आहे; तद्वतच त्या शिकलेल्या ज्ञानाचं व्यवहारात कसं उपयोजन करावं हे आजच्या काळात जास्त महत्त्वाचे आहे. यासाठी भाषा अभ्यासक्रमाची रचना करताना भाषिक कौशल्ये विकसित करण्यावर आणि त्याच्या उपयोजनावर भर देणे गरजेचे आहे; हा हेतू समोर ठेवून सर्जनशील, वैचारिक, संशोधन लेखनकौशल्ये, आंतरजालावरील लेखनकौशल्ये, माध्यमांवरील लेखनकौशल्ये, उद्योग व सेवाक्षेत्रांतील भाषा उपयोजन कौशल्ये, मुद्रितशोधन कौशल्य आणि स्पर्धा परीक्षेत भाषा उपयोजन अशा निवडक अभिव्यक्ती कौशल्यांचा विकास पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांमध्ये व्हावा या हेतूने प्रस्तुत 'मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी' या ग्रंथाची रचना केली आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित महाविद्यालयातील बी.ए. भाग-३ मराठी या विषयाचा सी.बी.सी.एस. नुसार पुनर्रचित अभ्यासक्रमांतर्गत सत्र पाच व सहासाठी अभ्यासपत्रिका क्र. दहा व पंधरासाठी 'मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी' या प्रस्तुत स्वयंअध्ययन साहित्याचे संपादन केले आहे. पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांना पदवी प्राप्तीनंतर साहित्य व्यवहारात आणि सार्वजनिक क्षेत्रात बदलत्या काळानुरूप भाषा उपयोजन करून अर्थार्जनाच्या संधी प्राप्त व्हाव्यात हा यामागचा हेतू आहे.

■ **संपादक** ■

**डॉ. अरुण शिंदे**
नाइट कॉलेज ऑफ आर्टस
अ‍ॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर

**डॉ. दत्ता पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर

**मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी**

बी. ए. भाग-३ मराठी अभ्यासपत्रिका क्र. १० व १५

## अभ्यास घटकांचे लेखक

| घटक लेखन | घटकाचे नाव | सत्र-५ घटक क्रमांक | सत्र-६ घटक क्रमांक |
|---|---|---|---|
| **प्राचार्य डॉ. महेंद्र कदम**<br>विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभूर्णी, जि.सोलापूर | सर्जनशील लेखन | १ | – |
| **प्रा. डॉ. अरुण शिंदे**<br>नाइट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर | वैचारिक लेखन | २ | – |
| **प्रा. डॉ. सुधाकर शेलार**<br>अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर | शोधनिबंध व प्रकल्पलेखन | ३ | – |
| **डॉ. व्ही. एन. शिंदे** | आंतरजालावरील मराठी | ४ | – |
| | प्रसारमाध्यमांतील अर्थार्जनाच्या संधी व भाषिक कौशल्ये | | |
| **डॉ. अलोक जत्राटकर** | अ) मुद्रित माध्यमे | – | १ |
| **श्री. योगिराज बच्चे** प्रसार अधिकारी आकाशवाणी मुंबई | ब) आकाशवाणी | – | |
| **श्री. कैलास पुरी** | क) चित्रवाणी | – | |
| | उद्योग व सेवाक्षेत्रातील अर्थार्जनाच्या संधी व भाषिक कौशल्ये | | |
| **प्रा. डॉ. एम. एम. गुरव** | अ) उद्योग व सेवाक्षेत्रातील संधी व भाषिक कौशल्ये | – | २ |
| **प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण** | ब) अनुवाद | – | |
| **डॉ. व्ही. एन. शिंदे** | क) मराठी टंकलेखन, युनिकोड व पीपीटी | – | |
| **प्रा. नानासाहेब जामदार**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर | मुद्रितशोधन | – | ३ |
| **श्री. समाधान रघुनाथ महाजन**<br>सहा. आयुक्त, वस्तू व सेवा कर, जळगाव | स्पर्धा परीक्षांसाठी मराठी | | |

■ संपादक ■

**डॉ. अरुण शिंदे**
नाइट कॉलेज ऑफ आर्टस
अॅण्ड कॉमर्स, कोल्हापूर

**डॉ. दत्ता पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका

## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक १०

### सत्र पाचवे


| | | |
|---|---|---|
| घटक १ | सर्जनशील लेखन | १ |
| घटक २ | वैचारिक लेखन | २८ |
| घटक ३ | शोधनिबंध व प्रकल्पलेखन (स्थूल परिचय) | ५४ |
| घटक ४ | आंतरजालावरील मराठी | ६९ |


## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक १५

### सत्र सहावे


| | | |
|---|---|---|
| घटक १ | प्रसारमाध्यमांतील अर्थार्जनाच्या संधी व भाषिक कौशल्ये | ९७ |
| घटक २ | उद्योग व सेवाक्षेत्रांतील अर्थार्जनाच्या संधी व भाषिक कौशल्ये | १४५ |
| घटक ३ | मुद्रितशोधन | १७४ |
| घटक ४ | स्पर्धा परीक्षांसाठी मराठी | १९९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# सर्जनशील लेखन

**घटक संरचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

सर्जनशील लेखन : संकल्पना व स्वरूप

१.२.१ कथा : संकल्पना व स्वरूप

१.२.२ कथेचे घटक

१.२.३ कथालेखनाचे प्रात्यक्षिक

१.३ स्वाध्याय

१.४ अधिक वाचन

## १.० उद्दिष्टे

१. सर्जनशील लेखनाचे स्वरूप कळेल.

२. गोष्ट आणि कथा यातील फरक समजून घेता येईल.

३. कथा निर्मिती प्रक्रिया समजेल.

४. कथेचा उद्‌गम आणि विकास कसा झाला हे कळेल.

५. कथेची संकल्पना आणि स्वरूप समजून घेता येईल.

६. कथा निर्मितीसाठी आवश्यक घटक कोणते हे कळेल.

७. कथालेखनाच्या प्रात्यक्षिकांतून कथालेखनाचे कौशल्य आपल्या अंगी बानेल.

## १.१ प्रास्ताविक

प्रस्तुत घटकात आपण कथालेखनाच्या अनुषंगाने सर्जनशील लेखनाचा विचाार करणार आहोत. आपणास अभिनव, कल्पक आणि वैशिष्ट्यपूर्ण लेखनाची आवड असेल तर हा एक छंद जोपासून आणि

अर्थाजनाची संधी म्हणूनही सर्जनशील लेखनाचा विचार आपण कथालेखनाच्या अनुषंगाने येथे करणार आहोत. यासाठी सुरुवातीला सर्जनशील लेखन संकल्पना समजून घेऊया.

## १.२ विषय विवेचन

**सर्जनशील लेखन : संकल्पना व स्वरूप**

मानवी मनातील विचार, कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. अर्थात भाषा हे अभिव्यक्तीचे साधन म्हणून ओळखले जाते. त्यामुळेच मानवाच्या भौतिक व मनोमय विकासप्रक्रियेत भाषेला अनन्य साधारण महत्त्व आहे. भाषेमुळे मानवाला समायोजनासाठी आणि संप्रेषणासाठी कितीतरी मदत झाली आहे. भाषेद्वारा आपल्या सर्जक बुद्धीमत्तेतून त्याने भौतिक जीवन समृद्ध केले आहे. किंबहुना मानवी जीवनाला अर्थपूर्णता आणि समृद्धता प्राप्त करण्यासाठी त्याने विविध कलांची निर्मिती केली. यामध्ये चित्र, शिल्प, नृत्य, गायन, संगीत आणि महत्त्वाचे म्हणजे लेखन कला होय. अर्थात कोणतीही कला ही जन्मजात प्राप्त नसते; तर आपल्या सर्जकतेतून तिचा उदय होत असतो. लेखनकला ही यापैकी एक आहे.

कोणताही लेखक आपला प्रतिपाद्य विषय, विचार हा भाषेतूनच व्यक्त करीत असतो. त्याला कालातीतता प्राप्त होण्यासाठी तो विचार लेखनाद्वारे व्यक्त होणे गरजेचे असते. त्यातून लेखक नवे जीवनदर्शन घडवीत असतो. वास्तवाचे कल्पितात रूपांतर करतो. त्यातून प्रतिभानिर्मित कल्पनेला जीवनदर्शनाचा संदर्भ देत भाषेद्वारा अव्वल साहित्यकृतीस जन्म देत असतो. यालाच सर्जनशील लेखन असे म्हणता येईल. सर्जनशील लेखनात स्वचा शोध असतो. मानवी भावनात्मक अनुभूतीचा आविष्कार या सर्जनशील लेखनातून होत असतो.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या आणि माध्यमांच्या जगात सर्जनशील लेखनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे जर एखाद्याला अभिनव, कल्पक लेखनाची आवड असेल तर लोकांची कलात्मक अभिरूची ध्यानात घेऊन सर्जनशील लेखनाच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या संधीही प्राप्त करून घेता येतील. सर्जनशील लेखनाच्या माध्यमातून करिअरच्या संधीबरोबर एक छंद म्हणूनही सर्जनशील लेखनाची आवड जोपासत मानवी जीवन दर्शन घडविण्याचा त्यातून आनंद मिळतो. सर्जनशील लेखनासाठी बौद्धिक मेहनत, सभोवतालचे सूक्ष्म निरीक्षण, संवेदनशीलता आणि विशिष्ट भाषिक अवकाशाचा वापर या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

मानवाच्या उत्क्रांतीचा लाखो वर्षांचा प्रवास तितका सोपा आणि सरळ नाही. त्याच्या नवनवीन गरजेनुसार आणि शोधानुसार तो प्रगत होत आला आहे. या प्रगतीत त्याच्या जिज्ञासेचे महत्त्व वादातीत आहे. जिज्ञासेच्या पोटी तो नवनवीन शोध घेत राहिला. त्या शोधांच्या तो नोंदी करीत आला. प्रारंभी त्या नोंदी केवळ खाणाखुणांच्या होत्या. नंतर त्याने गुहेत चित्रे काढायला सुरुवात केली. दगडी हत्यारांच्या कलेतून तो शिल्पकला शिकला. या शिकण्यामागे जिज्ञासा ही जशी प्रेरणा होती, तशीच आपल्याला ज्ञात झालेले, कळलेले, आकळलेले कुणाला तरी सांगावे, शेअर करावे ही धारणा महत्त्वाची होती. या जिज्ञासा-ज्ञानाच्या

प्रवासातून माणसाने शेतीचा शोध लावला; तसा त्याचा भटकंतीचा प्रवास थांबला. तो स्थिर झाला. शेती करून उत्पन्न वाढवू लागला. अतिरिक्त उत्पन्नामुळे त्याच्या जीवनात जशी स्थिरता आली; तशीच त्याला फुरसतही मिळाली. या फुरसतीच्या उसंतीच्या वेळेत तो नवं काही, रंजनपर असं काही करत आला आहे. यातूनच त्याला उत्क्रांतीच्या टप्प्यांवर विविध कलांचा शोध लागला. त्या कलांचा तो विकास आणि विस्तार करत आला आहे.

अशाच या उत्क्रांतीच्या टप्प्यावर त्याला भाषेचा शोध लागला. त्यामुळे त्याच्या जीवनात आमूलाग्र क्रांती झाली. आपल्याला जाणवलेले, समजलेले इतरांना सांगून ते जतन करणे भाषेमुळे शक्य झाले. या जतन करण्याच्या भाषिक क्षमतेमुळे मानव वेगाने प्रगत झाला. आपल्या विचार, भावना जसा तो नोंदवून ठेवू लागला; तसाच तो ते विचार, त्या भावना पुढील पिढीकडे सुपूर्त करू लागला. सुपूर्त करण्याची ही प्रक्रिया जरी सहज नसली तरी त्यातून एक परंपरा निर्माण होत गेली. माहितीची साखळी तयार होत गेली. या साखळीतून ज्ञान पुढे सरकत आले. त्याचा विस्तार होत आला. विस्ताराच्या हातात हात घालून विकासही पुढे चालत आला.

भाषेचा शोध ही जशी महत्त्वाची क्रांतिकारक घटना ज्ञानाचे संवर्धन आणि संक्रमण करण्यासाठी उपयोगी ठरली; तशीच ती कलेसाठी उपयुक्त ठरली. प्रारंभी भाषेचे केवळ बोली आणि बालरूप होते. त्या रूपांत मानवाने आपल्या भावभावना, विकार-विचार व्यक्त करायला सुरुवात केली. ही व्यक्त होण्याची प्रक्रिया प्रारंभी कदाचित कला म्हणून पुढे आली नाही. परंतु यथावकाश त्या त्या अभिव्यक्तीला जशी स्थिरता आली तशी तिला सांकेतिकता आली. म्हणजे रडण्याचे विशिष्टच ध्वनी आहेत. राग व्यक्त करण्याचे वेगळेच आहेत. हसण्याच्या ध्वनीमध्ये पुन्हा अनोखेपण आहे. ही सांकेतिकता म्हणजे चिन्हांकित प्रणाली भाषेत विकसित होत आली. त्यातून कोणत्याही भावनेचे, विचाराचे वहन, जतन आणि पुढच्या पिढीकडे संक्रमण करणे सोपे आहे, हे मानवाच्या लक्षात येत गेले.

चिन्हांकन करण्याच्या मानवी वृत्तीने जसा बोलीभाषेचा विकास केला, तसाच घरांची रचना, शेतीची पेरणी, नवीन प्राण्यांच्या चित्राकृत्या, दगडी हत्यारे अशा विविध जीवनोपयोगी वस्तू तो बनवू लागला. अशातून त्याला केवळ चित्रकला अथवा शिल्पकलेचा शोध लागला असे नव्हे तर; या चित्रांमधूनच पुढे कधी तरी त्याला भाषेच्या लिपीची गरज वाटली. त्या गरजेतून त्याने प्रारंभी चित्रलिपी तयार केली. चित्रलिपी ही भाषेच्या लेखनाची पहिली प्रक्रिया होती. या चित्रलिपीचे अनेक संदर्भ आजही सिंधू संस्कृतीच्या उत्खननात सापडलेल्या मूर्तींवर दिसून येतात. बोलण्यातील ध्वनीला चिन्हरूप हा लिपीचा (म्हणजे चित्रलिपी) पहिला टप्पा आहे. या चित्रलिपीतून पुढे लिपीचा शोध लागला. या शोधातून पुढे लिपीचा आणि भाषेचा विकास झाला आहे. लिपीच्या आणि भाषेच्या विकास-विस्ताराच्या सगळ्या प्रक्रियेचा संबंध थेटपणे मानवाच्या गोष्टी रचण्याशी आला आहे. कारण चित्र, शिल्प या गोष्टी जशा कलेशी बांधल्या गेल्या तसेच गोष्ट रचणे हेही कलेशी जोडले गेलेले तत्त्व आहे. त्यामुळे गोष्ट रचणे ही प्रक्रिया मानवाच्या विकासातील महत्त्वाची प्रक्रिया आहे.

गोष्टीचा उगम या सगळ्या मानवाच्या वरील उत्क्रांतीच्या प्रवासात दडला आहे. मानवाच्या उत्क्रांतीबरोबर गोष्टही उत्क्रांत होत आली आहे. या गोष्टीचीच पुढे कथा झाली आहे. गोष्टीचा उगमही जिज्ञासेतच आहे. मला काही तरी समजले आहे. जिज्ञासेतून नवीन काही जे सापडले, कळले आहे ते कुणाला तरी सांगायला हवे, ह्या जाणिवेच्या पोटात गोष्ट दडली आहे. ही जाणीव जशी विकसित होत गेली त्यातून मानवाच्या आकलनाच्या कक्षा विस्तारत गेल्या आहेत. हा विस्तार म्हणजे माहितीचा, ज्ञानाचा साठा होय. हाच साठा पुढे संक्रमित करण्यासाठी मानव गोष्टी रचू लागला. त्या रचनेत हळूहळू उपदेशमूल्य, संस्कारमूल्य, नीतिमूल्य येत गेले. यातूनच प्राणिकथांचा जन्म झाला आहे. इसापनीती, पंचतंत्र, अरेबियन नाइट्स, परीकथा, लोककथा अशा अनेक प्रकारांचा उगम झाला. अर्थात यांना कथा म्हटले गेले असले तरी त्या मुळात कथा नाहीत. तर त्या गोष्टी आहेत. गोष्टीतून पुढे कथा जन्माला आली आहे.

गोष्टीच्या (Story) मुळाशी मानवाचे कुतूहल आहे. त्याच्या रचनेच्या जिज्ञासेचे तत्त्व आहे. एका अर्थाने गोष्ट ही रचण्याची प्रक्रिया आहे. रचना आली की तिला एक विशिष्ट आकार आला. तंत्र आले. गोष्टी सांगण्याचे अथवा रचण्याचे तंत्र गोष्टीनुसार, हेतूनुसार बदलत आले आहे. म्हणजे पुराणकथा आणि जातककथा यांच्या रचनेमधले हेतू पूर्णतः भिन्न आहेत. त्यामुळे या दोन्ही प्रकारच्या गोष्टी जरी समकालीन असल्या तरी त्यांच्या रचनेचे तंत्र मात्र वेगळे आहे. त्यामागचे हेतू, प्रयोजन वेगळे आहे. म्हणजे असे की, पुराणकथेत देवतांचे महत्त्व आणि वर्णव्यवस्थेचा पुरस्कार हा हेतू असल्याने त्या गोष्टींनी वेगळे स्वरूप धारण केले आहे. उलट जातककथा या गौतम बुद्धांचा विचार सांगणाऱ्या असल्याने समानतेचे आणि नीतीचे तत्त्व या गोष्टींमागे दडले असल्याने त्यांच्या कथा वेगळ्या ठरल्या आहेत. सांगण्याचा मुद्दा हा की, गोष्टी ही रचलेली कृती आहे. ती भाषिक आहे. ती पूर्वावस्थेतील असल्याने आकलनसुलभ आणि उपदेशपर आहे. मूल्यांचा (समता, विषमता) आग्रह त्यात आहे. त्यामुळे कथा म्हणजे काय ते समजून घेण्यापूर्वी गोष्ट म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे. गोष्टीचे तंत्र समजून घेतल्याशिवाय कथा समजणार नाही.

**गोष्ट म्हणजे काय?**

गोष्टीची निर्मिती का व कशी झाली याचा विचार केल्यानंतर आपण गोष्ट म्हणजे काय ते समजून घ्यायला हवे. गोष्टीला इंग्रजीत Tale असे म्हटले जाते (बऱ्याचदा story and tale असे दोन्ही शब्द ढोबळपणे वापरले जातात.) तर कथेला Plot असे म्हटले जाते. इंग्रजीतील कथा-कादंबरीकार ई. एम. फॉर्स्टरने गोष्ट (Story) आणि कथा (Plot) मधील फरक खूप नेमकेपणाने समजून सांगितला आहे. तो आपल्या 'Aspects of Novel' या ग्रंथात म्हणतो, 'The King died and then the queen died' is a story; 'The king died and then the queen died of grief' is a plot. याचा अर्थ 'राजा मेला आणि नंतर राणी मेली' ही झाली गोष्ट पण 'राजा मेला आणि त्याच्या दुःखाने राणी मेली' ही कथा झाली. गोष्ट आणि कथा यातला नेमका फरक वरील उदाहरणाद्वारे फॉर्स्टरने समजून सांगितला असला तरी त्यामागच्या घटितांची चर्चा करायला हवी. ती केल्याशिवाय गोष्ट म्हणजे काय ते स्पष्ट होणार नाही.

गोष्टीत केवळ घटना असतात. घटनांना घटना जोडून जी साखळीसारखी रचना तयार होते. त्यास गोष्ट असे म्हणतात. राजा मेला ही एक घटना आणि राणी मेली ही दुसरी घटना, या दोन घटना एकत्र जोडून ही गोष्ट तयार झाली आहे. आपण आपल्या आई-वडिलांकडून ऐकलेल्या गोष्टी सहज तपासून पाहिल्या तर गोष्ट म्हणजे काय, हे लक्षात येईल. मग 'कोल्ह्यास द्राक्षे आंबट' ही गोष्ट असो अथवा 'कावळा आणि लांडग्यांची गोष्ट' असो. या गोष्टीत केवळ घटनेस घटना जोडून येतात. त्या घटना जोडून गोष्ट तयार केली जाते आणि त्यातून काही एक मूल्यविचार सांगितला जातो. या गोष्टीत घटनांची साखळी असते. परंतु त्या घटनांच्या मागे असलेल्या मानवी भाव-भावनांचे आणि त्यातील गुंतागुंतीचे चित्रण गोष्टीत नसते. केवळ घटनांचा क्रम आणि त्यांची रचना असते. अशा रचनेच्याद्वारे मानवी संघर्ष, त्यांची वाटचाल, त्यांच्या चुकलेल्या वाटा, त्यातून त्याने काढलेला मार्ग आणि या सगळ्यातून पुढे आलेला मूल्यविचार अधोरेखित झालेला असतो. गोष्टीचा हेतू काय असतो हे पाहिले तर आपल्या लक्षात येते की, व्यवहारज्ञान, नीती, संस्कार सांगण्यासाठी गोष्ट रचलेली असते. त्यामुळे या रचनेत काळ, अवकाश, व्यक्तिरेखा, पर्यावरण आदींना वेगळे असे महत्त्व नसते. ते आनुषंगिक असते. आपण ऐकलेल्या गोष्टीत आटपाट नगर असते. त्यात एक राजा, राणी, भिकारी, राक्षस, परी असे कोणीही असते. ते नगर कुठले राजा-राणी, नेमक्या कोण? कुठल्या? त्यांचा काळ कोणता? या प्रश्नांची उत्तरे दिलेली नसतात. आणि या रचनाबंधात तशा उत्तरांची गरजही नसते. पुन्हा गोष्टीच्या शेवटी काही एक नैतिक संस्कार सांगितलेला असतो. तो संस्कार गोष्ट ऐकणाऱ्या श्रोत्याने/ऐकणाऱ्याने अंमलात आणणे गरजेचे असते. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट आवश्यक असते ती म्हणजे गोष्टीचा कर्ता म्हणजे लेखक म्हणजे गोष्ट रचणारा कोण आहे? हे आपण कधी विचारीत नाही. कारण त्याची गरज वाचक-श्रोत्यांना वाटत नाही. हे केवळ लेखकाच्या बाबतीतच होते असे नाही; तर भाषेच्या बाबतीतही हे धोरण दिसून येते. भाषेच्या विविध तऱ्हा गोष्टीत कधी दिसत नाहीत. गोष्टीतील पात्रे जरी मानवी असली तरी तीही ठोकळेबाजच असतात.

गोष्टीचा विचार सविस्तर करण्याचे कारण असे की, गोष्ट म्हणजे काय हे नीट लक्षात आले की, कथा म्हणजे काय आणि ती कशी लिहावी हे कळण्यास मदत होते. आपण केवळ कथा म्हणजे काय? असा तात्त्विक विचार करणार नाही आहोत; तर कथेच्या सृजनात्मक लेखनाची प्रक्रिया काय आहे, हे समजून घेण्यावर आपला भर राहणार आहे. गोष्टीत केवळ घटनांची जोडणी असते असे नाही; तर त्यातील व्यक्तिरेखांचे ठोकताळे म्हणजे साचे ठरलेले असतात. म्हणजे काही सुष्ट तर काही दुष्ट व्यक्तिरेखा असतात. आजच्या भाषेत नायक विरुद्ध खलनायक (हिरो आणि व्हिलन) अशी सरळ विभागणी करून गोष्ट रचलेली असते. गोष्टीत काही फसवणारी माणसे असतात. काही फसणारी असतात. नायकांच्या वाट्याला कायम संघर्ष असतो. ही संघर्षाची परिस्थिती खलनायक तयार करीत असतात. त्यात शेवटी खलनायकाचा पराभव आणि नायकाचा विजय ठरलेला असतो. त्यामुळे गोष्टीचा शेवट अत्यंत चिंचोळा, टोकदार आणि सुखद असतो.

गोष्टीत काळाचे, स्थळाचे, अवकाशाचे काहीही उपयोजन केलेले नसते. स्थलावकाश आणि काळही ठळक कधीच नसतो. तुम्ही सोमवार- गुरुवारच्या व्रतकहाण्या अथवा सुपरिचित अशी सत्यनारायणाची

कहाणी वाचून बघा म्हणजे तुमच्या लक्षात येईल. त्यात काळाचा, स्थळाचा काहीही वेगळा, स्वतंत्र विचार केलेला नसतो. म्हणजे एका अर्थाने गोष्टीत या घटकांना फारसे महत्त्व नसते. कोणी तरी व्यापारी असतो. तो कुठलाही असू शकतो. तो कोणती तरी व्यवसाय करीत असतो. त्याची बोट कोणत्याही समुद्रात अचानक बुडत असते. मग त्याची बायको सत्यनारायणाचे व्रत करते. बोट समुद्रातून वर येते. या गोष्टीत काळ, स्थळ, अवकाश यांचा काहीही संबंध नसतो. व्यक्तिरेखासुद्धा केवळ ठोकळेबाज असतात. बोट बुडाली म्हणजे काय झाले, याचा तीळमात्र उल्लेख कहाणीत नसतो. अधिक नेमके बोलायचे तर त्यामध्ये कोणतेही सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संदर्भ नसतात. केवळ व्रताचे, धर्माचे, देवाचे महत्त्व सांगून मनात भीती निर्माण केली जाते. तुम्हाला काहीएक वागण्याचे आकलनवजा उपदेश देणे असे गोष्टींचे स्वरूप असते. या कहाण्या केवळ 'आदेशात्मक' आणि 'वर्णनात्मक' असतात. त्यामागचे हेतू स्पष्ट असतात. अशा कहाण्या उर्फ गोष्टीचा कोणीही एक कर्ता म्हणजे निर्माता नसतो. म्हणजे गोष्टीला लेखक नसतो. तो अज्ञात असतो. अशा व्रतकहाण्यांचा लेखक समाजातल्या सत्ताधीश गटाचे नेतृत्त्व करणारा, शहाणपणा प्राप्त झालेला अदृश्य शोषणकर्ता असतो. तर बाकी पंचतंत्र, इसापनीती अशा गोष्टीतला लेखक तुमचा वाटाड्या, मार्गदर्शक, बुजुर्ग, अधिक काही कळालेला असतो. तो केवळ तुम्हाला नीतीचा उपदेश करण्यासाठी गोष्ट रचियता झालेला असतो. याचा अर्थ अशा कोणत्याही गोष्टीत एकच लेखक कधी डोकावत नाही. तो एक समाजाचा मक्तेदार घटक असतो. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा लेखक कोण असतो, याचे वाचक म्हणून आपणांस उत्तर मिळत नाही. म्हणजे कोल्ह्याला द्राक्षे आंबट, मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवारची व्रतकथा/ कहाणी कोणी लिहिली आहे? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर मिळत नाही. अर्थात या प्रश्नांच्या दिशेने वाचकाने प्रवास करावा, अशी गोष्टीची रचना नसल्याने तो प्रश्नच कधी निर्माण होत नाही. तो निर्माण न होण्याची कारणे तिच्या सांकेतिक रचनेत दडली आहेत. गोष्टीत/ कहाणीत 'विशिष्टता' नावाची गोष्टच नसते. त्यामुळे गोष्ट ही सगळीकडे सारखी असते. त्यामुळे एकच गोष्ट जगभर प्रवास करताना दिसते. ती कुठेही गेली तरी तिला आकलनाच्या मर्यादा पडत नाहीत. नैतिक आचरणाचा संस्कार देणारी वैशिकता तिला प्राप्त झालेली असते.

राहिला शेवटचा प्रश्न, या गोष्टींचा वाचक/ श्रोता कोण असतो? तर जो अडाणी, शोषित, नाडलेला, पिचलेला, दैववादी, भोळा आहे, सरळमार्गी आहे असा वाचक असतो. या वाचकांसाठी ही गोष्ट असते. म्हणजे वाचक गोष्टीत नसतोच तसा, पण गोष्टीत आपण आहोत, असा वाचकांचा भास निर्माण करण्यात गोष्ट यशस्वी झालेली असते. त्याला काहीएक सांगण्यासाठीच गोष्ट तयार झालेली असते. वरील प्रकारच्या सगळ्या वाचकांना ही आपल्यासाठीच रचलेली गोष्ट आहे, अशी पक्की धारणा निर्माण करण्यात ती यशस्वी झालेली असते. वाचकाने राजा-राणी पाहिलेली नसते. प्राण्यांचे वर्णन अनुभवलेले नसते. तहानलाडू, भूकलाडू, कपिलागाय, द्रौपदीची थाळी त्याला माहीत नसते. अतर्क्य, अशक्य कोटीतल्या गोष्टी (म्हणजे बुडालेले जहाज वर येणे, पुराणातल्या स्त्रीने मेलेला नवरा स्वर्गातून परत आणणे, प्रेत जिवंत होणे, प्राण्यांनी बोलणे, पऱ्यांनी उड्डाण करणे इत्यादी किती तरी) त्याच्या कधीही परिचयाच्या नसतात, अशा अपरिचित घटनांच्या आधारे गोष्ट तयार झालेली असते.

अर्थात एक गोष्ट कबूल करायला हवी की, या गोष्टी मानवानेच रचलेल्या आहेत. त्या काळाबरोबर चालत आल्याने त्याचे कर्ते, काळ, स्थळ अदृश्य झालेले असते. या गोष्टीत एक संदेश असला तरी समाजाच्या वर्तनाचे काही पडसाद तिच्यात असतात. तिच्यात श्रवणाची आणि श्रोत्याला बांधून ठेवण्याची ताकद असते. एकच गोष्ट कित्येक महिने सांगितली जाऊ शकते. तिच्यात एक सामूहिक शहाणपण उपजतपणे दडलेले असते. भोगलेल्याचा, वडिलकीचा एक संदर्भ तिने सतत सोबत जागवलेला असतो. जगण्याचे बळ देणारी आणि जगण्याला काही अंशी तरी दिशा देणारी मूल्यव्यवस्था तिच्यात दडलेली असते, हे आपणांला नाकारता येणार नाही. या मूल्यव्यवस्थेमुळे तर मानवाला गोष्टीचे आकर्षण कायम राहिले आहे. तिच्यातील वैश्किता कायम आवाहक ठरत आलेली आहे. तसेच गोष्टीत प्रादेशिकता नसल्याने तिचा विशसंचार सहज शक्य असतो. या काही शक्यतांमुळे गोष्ट ही कालातीत बनून राहिली आहे. गोष्टींचे हे रूप कळले की, आपणांस कथेकडे वळणे आवश्यक आहे.

**कथा म्हणजे काय?**

कथेचा विचार आपण अधिक विस्ताराने आणि सविस्तर करणार आहोत. हा विस्तार अधिक तांत्रिक अथवा संकल्पनात्मक न करता कथा कशी लिहावी, ती कशी लिहिली जाऊ शकते; या अनुषंगाने ही मांडणी अधिक विस्तारत जाईल. बऱ्याचदा आपण संकल्पना मांडतो. तिची सविस्तर चर्चा करतो. इतिहास सांगतो. वेगवेगळ्या मतांची चर्चाही करतो. पण ती सगळी समजून घेऊनही कथा लिहिण्याची प्रक्रिया कशी असते अथवा कशी असावी, याविषयी फारसे कोणी बोलत नाहीत. किंवा संकल्पनात्मक तपशिलातून त्याचा उलगडा होत नाही. त्यामुळे कथानिर्मितीच्या अंगाने येथे संकल्पनात्मक विचार मांडला जाणार आहे. तेव्हा 'कथेची संकल्पना' असे म्हणताना केवळ व्याख्या आणि अभ्यासकांच्या तांत्रिक चर्चेत न पडता निर्मितीच्या अंगाने चर्चा करणे अधिक श्रेयस्कर ठरणारे आहे.

वरील उदाहरणातील 'राजा मेला आणि राजाच्या विरहाने/ दुःखाने राणी मेली' ही कथा आहे, असे ई. एम. फॉर्स्टर जेव्हा म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ आपण नीट समजून घेतला पाहिजे. येथेही राजा मेला आणि राणी मेली या दोन घटना आहेत. पण त्या 'विरहाने/ दुःखाने' या शब्दाने जोडल्या गेल्या आहेत. हे केवळ शब्द नाहीत तर दोन घटनांमधला 'कार्यकारणभाव' यातून व्यक्त झाला आहे. म्हणजे राजा आणि राणीच्या मृत्यूच्या दोन घटनांमधला कार्यकारण भाव हा विरह/दुःख या शब्दांनी जोडला गेला आहे. या जोडणीमध्ये काळाचे फारसे काही केलेले नसले अथवा काळाला गोठवून टाकलेले असले तरी विरह/ दुःख हे केवळ शब्द नाहीत. त्यामध्ये राजा आणि राणी यांच्या सहसंबंधांचे तपशील दडले आहेत. राजा जाण्याचे दुःख राणीला झाले आहे. आपला जोडीदार गमावल्याचा विरह त्यात आहे. तो गेल्यानंतर आपण तरी का जगायचे, असा विचार करून तीही मरून जाते. असा हा एक मोठा प्रवास 'विरह/ दुःख' यामध्ये दडला आहे. हा पुन्हा केवळ प्रवास नाही. त्यातला जो कार्यकारणभाव आहे तो तांत्रिक नाही. तर मानसिक आहे. जोडीदाराला हरवून बसण्याची, जगण्याची ऊर्मी संपल्याची एक तीव्र वेदनामय भावना त्यामागे दडली आहे. त्या दोघांच्यात नाजूकपणे बांधल्या गेलेल्या अदृश्य धाग्याची एक शक्ती आहे. म्हणजे अधिक तांत्रिक भाषेत बोलायचे झाल्यास त्याच्यात एक 'मानसिक अवकाश' दडला आहे. तो अवकाश गोष्टीला खेचून कथेकडे

घेऊन येतो आहे. हा जो मानसिक अवकाश दडला आहे, तो कथेला कथात्मक दर्जा देतो आहे. राजा-राणीमधील भावनिक नातेबंध, त्यातील गुंतागुंत आदी अनेक गोष्टी या विरह/दुःखाने व्यक्त होतात. त्यामुळे राजा मेला आणि राणी मेली या दोन स्वतंत्र घटना न राहता त्यांच्यात कार्यकारणभाव निर्माण होण्याने एका जिवंतपणाच्या प्रवासाचा अवकाश अधोरेखित होण्याने गोष्टीची कथा झाली आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

याचा अर्थ कथा ही गोष्टीपेक्षा वेगळी आहे, गोष्टीत जरी बऱ्याच गोष्टी, घटना-घटिते असली तरी जो एक 'जिवंतपणा आणि कार्यकारण' कथेत अवतरतो, तो गोष्टीत/ कहाणीत नसतो. त्यामुळे कथा गोष्टीहून वेगळी ठरते. हा जो फरक आहे तो पहिला आणि अत्यंत महत्त्वाचा फरक आहे. हा फरक लक्षात घेतल्याशिवाय कथेची संकल्पना आपणांस समजू शकत नाही.

**१.२.१ कथा संकल्पना व स्वरूप**

जिवंतपणा आणि कार्यकारणभाव यामुळे गोष्टीची जी कथा होते ती कथा, कशी असते. तिची संकल्पना नेमकी काय आहे. याचा विचार करण्यापूर्वी राजन खान यांचे मत समजून घेतले पाहिजे. राजन खान यांच्या 'कथा आणि कथेमागची कथा' या साधना प्रकाशनाने (२०१०) प्रकाशित केलेल्या ग्रंथाला त्यांनी जी अर्पणपत्रिका लिहिली आहे ती महत्त्वाची आहे. ते लिहितात, 'गोष्ट सांगणं न् गोष्ट ऐकणं या माणसाच्या मूलभूत मनोवृत्तीला हे पुस्तक अर्पण' यातला महत्त्वाचा मुद्दा आहे की, राजन खान गोष्टीबद्दल जे बोलताहेत ते महत्त्वाचे आहे. गोष्ट सांगण्याच्या मानवाच्या मूलभूत आणि निसर्गदत्त गुणांमुळेच गोष्ट जशी टिकली, तशीच ती गोष्ट सांगण्या- ऐकण्याच्या प्रक्रियेतूनच गोष्टीची कथा झालेली आहे. त्यामुळे जगभरातली कथा गोष्टीच्या पायावर उभी आहे हे नाकारून चालत नाही. गोष्टीचे महत्त्व आपणांस नाकारता येणार नाही.

कथेचा रचनाबंध अथवा रूपबंध समजून घेणे म्हणजेच कथेची संकल्पना समजून घेणे आहे. कथेची संकल्पना समजून घेताना मराठी कथेचा उगम, तिचा प्रवास आणि इतिहास समजून घेणे आवश्यक नाही. मराठीत कथा आली ती इंग्रजी संपर्कातून आली आहे. हे नाकबूल करता येत नाही. मराठी गोष्टीला जरी हजारो वर्षांची परंपरा असली तरी मराठी कथा ही इंग्रजीची देणगी आहे. रूपबंध म्हणून कथेचा विचार करू लागतो तेव्हा तो विचार इंग्रजी संपर्कापासून आणि त्यांच्या रूपबंधापासूनच करावा लागतो. स्फुट गोष्टी आणि हरिभाऊंच्या (ह. ना. आपटे) 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेपासून साधारणपणे मराठी कथेचा इतिहास सांगितला जातो. अर्थात त्यापूर्वी कथा लिहिलीच गेली नसावी. असे ठामपणे म्हणता येत नाही. महात्मा जोतिबा फुल्यांच्या अनेक रचनांमध्ये कथाबीजे दडली आहेत. परंतु तसा स्वतंत्र विचार कोणी करीत नाही. येथे इतिहास अथवा कथेची परंपरा तपासण्याचे प्रयोजन नसल्याने त्या तपशिलांत आपण जाणार नाही. परंतु साधारणपणे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यंतरानंतर मराठीत कधी तरी कथा लेखनास प्रारंभ झाल्याचे आपणांस सिद्ध करता येण्यासारखे आहे.

स्फुट गोष्टीपासून सुरू झालेली कथा लघुकथा, दीर्घकथा, कथा, लघुतम कथा, कथामालिका अशा वेगवेगळ्या रूपांत मराठीत आकाराला आली आहे. कथेच्या रूपाला अधिक तांत्रिक संकलनात्मक रूप देण्यात ना. सी. फडके यांचे योगदान महत्त्वाचे आहे. फडक्यांनी मांडलेले कथातंत्र अथवा कथेची संकल्पना आणि तंत्र वाचकांनी नीटपणे समजून घेतले पाहिजे. हे तंत्र रंजनप्रधान म्हणजे सिनेमॅटिक आहे. सिनेमाची कथा ज्या पद्धतीने विकसित होते ते तंत्र फडक्यांनी अधिक सविस्तरपणे सांगितले आहे. म्हणजे प्रारंभ- मध्य- अंत अशा स्वरूपाचे कथानक असावे. संघर्ष-निरगाठ- उकल या स्वरूपाची प्रसंगांची मांडणी असावी. कथेचा शेवट परिणामकारक असावा. कथेत सुष्ट विरुद्ध दुष्ट असा संघर्ष असावा. नायक- नायिका, खलनायक त्यांच्या संघर्ष आणि खलनायकाचा पराभव होऊन नायकाचा विजय व्हावा. अशा स्वरूपाचे तंत्र नोंदवून फडक्यांनी कथा अधिक तंत्रकुशल बनवली. त्या तंत्राचा प्रभाव तत्कालीन कथाकारांवर पडलेला दिसतो. जीवनवादी असणाऱ्या खांडेकरांनाही तो प्रभाव टाळता आला नाही. फडक्यांचे तंत्र अथवा त्यांची कथेची संकल्पना जरी कलावादी असली तरी संकल्पना म्हणून त्या तंत्राकडे दुर्लक्ष करता येणार नाही. कारण कथा कशी लिहू नये, कथा कुठे फसू शकते हे समजून घेण्यासाठी फडक्यांच्या कथातंत्राचा खूप नेमका वापर होऊ शकतो.

फडक्यांचे तंत्र नाकारत जी नवकथा गोखले- गाडगीळ- माडगूळकर यांनी लिहिली ती कथा आणि त्या कथेचे तंत्र आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. नवकथेतून पुढे दीर्घकथा, साखळीकथा, लघुतम कथा असे अनेक प्रकार जन्माला आले आहेत. कथेची संकल्पना मांडत असताना केवळ फडक्यांच्या तंत्राचा अथवा नवकथेच्या तंत्राचा उपयोग केला पाहिजे असे नाही, तर कथा संकल्पना समजून घेताना जगभर जे कथालेखन आणि त्या अनुषंगाने जे विचार सुरू आहेत. त्यांचा येथे विचार आहे. अर्थात मागे म्हटल्याप्रमाणे कथेच्या संकल्पनेला अधिक तांत्रिक न करता ती संकल्पना कथा निर्मितीसाठी कशी उपयोगी पडेल या अंगाने हा विचार येथे मांडला आहे.

गोष्ट सांगणे हा कथेचा मूळ पाया असल्याने 'कथानक' हा कथेच्या संकल्पनेचा गाभा असतो. हे कथानक वास्तवाच्या भूमीवर उभे असते. म्हणजे वास्तवातल्या घटनांना आधाराला घेऊन त्याचे काल्पनिकीकरण करून जे सांगितले जाते त्यास कथानक असे म्हटले जाते. लघुत्व, एककेंद्रित्व, संपृक्त संघटन हे कथानकाचे तत्त्व असते. म्हणजे कथेचा अवकाश (वेगळ्या शब्दांत कथेचा जीव) छोटा असतो. तिच्यातून दिला जाणारा संदेश एककेंद्री असतो. त्यामुळे कथेच्या मांडणीत सुसूत्रता, गोळीबंदपणा महत्त्वाचा असतो. त्यासाठी कथेत पात्रांची संख्या कमी असावी लागते. ती पात्रे केवळ सुष्ट आणि दुष्ट अशी नसतात. गोष्ट उपदेशपर असते. परंतु कथा स्वतःचा शोध घेणारी असल्याने तिच्यात आत्मप्रत्यय, चिकित्सा, स्वचिकित्सा आलेली असते. ती गोष्टीसारखी केवळ काल्पनिक नसते. तिच्यात लेखकाच्या 'स्व' चा शोध असतो. त्यामुळे कथाकार महत्त्वाचा असतो. कथेचा निर्माता कोण हे महत्त्वाचे असते. कथालेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला कथेत प्राधान्य असते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य असल्यामुळे पात्रांनाही 'विशिष्टत्त्व' प्राप्त होत जाते. ही पात्रे ज्या काळात आणि ज्या परिसरात वाढतात. तो काळ आणि परिसर कथेमध्ये अवतरणे महत्त्वाचे असते. तो कालावकाश आणि परिसर जितका वास्तव, तितकाच तो काल्पनिकही असला पाहिजे.

म्हणजे वास्तव आणि काल्पनिक यांच्या मिश्रणावरती कथा उभी असते. म्हणजे तुम्हाला एखाद्या गावाचे वर्णन करायचे आहे तर ते तुमच्या गावाचे चालू शकते. परंतु तुमच्या प्रत्यक्ष गावाच्या नावाचा वापर केला तर मात्र अभिरुचीमध्ये अडथळे येण्याची शक्यता अधिक असते. तीच गोष्ट पात्रांची आहे. तुम्ही तुमच्या भोवताली असणाऱ्या पात्रांचे स्वभाव व वर्णन करू शकता, परंतु तेच नाव दिले तर काही अडचणी होण्याची शक्यता असते. त्यामुळे सभोवतालच्या वास्तवाचे काल्पनिकीकरण करणे कथेमध्ये महत्त्वाचे असते. याचा अर्थ कथा केवळ गोष्टीसारखी काल्पनिक करून चालत नाही. तिला वास्तवाच्या पायावर उभी करावी लागत असते. कथा जशी एककेंद्री असते तशीच ती कमीत कमी पात्रांवर उभी असते. ही पात्रे उभी करताना कथा एकेरी संस्कार किंवा मर्यादित परिणाम देणारी असल्याने तिचा अवकाशही छोटा असतो. कथा ही मानवी जीवनातील एखादा प्रसंग, एखादी घटना, जीवनातील एखादी विसंगती यांवर उभी असते. अथवा कथेत मानवी स्वभावाच्या एखाद्याच पैलूवर नेमकेपणाने प्रकाश टाकलेला असतो. म्हणजे एखाद्या पात्राचा कंजुषपणा, आपमतलबीपणा, अतिरिक्त दानशूरपणा, विनोदबुद्धी, प्रेम, द्वेष, असूया आदी स्वभावांतल्या एखाद्या पैलूवर कथा प्रकाश टाकीत असते. त्यामुळे कथेचा जीव लहान असतो.

कथेचा आकार लहान असल्याने ती अधिकाधिक परिणामकारक होण्यासाठी विस्तारापेक्षा 'संक्षेप' हा तिचा मूळ स्वभाव असतो. या संक्षेपाच्या स्वभावामुळे निवेदन, वर्णनामध्ये नेमकेपणा महत्त्वाचा असतो. त्यासाठी कथेत चमत्कृती, चमकदारपणा, नेमके वर्णन, परिणामावर लक्ष आवश्यक असते. लेखक म्हणून तुम्हाला 'काय दाखवायचे आहे' आणि 'काय सांगायचे आहे' हे नेमकेपणाने कळाल्याशिवाय कथा लेखन करता येत नाही. तर हे दाखवणे व सांगणे अधिक संपृक्त होण्यासाठी कथाकाराकडे भाषा, निवेदन आणि संवाद हे तीन घटक म्हणजे तीन शस्त्रे हाताशी असतात. त्यांचा तो किती कौशल्याने वापर करतो यावर कथेची परिणामकारकता अथवा उंची कमी की अधिक हे ठरत असते. अर्थात निवेदन आणि संवाद हे भाषेमध्ये अंतर्भूत असले तरी भाषा, निवेदनाची भाषा आणि संवादाची भाषा यात खूप अंतर असते. म्हणजे कथाकाराला भाषेत तसा फरक करता आला पाहिजे. किती दाखवायचे हे ठरवताना तुम्हाला कथाकार म्हणून निवेदनाच्या भाषेवरती काम करावे लागते. हे समजून घेण्यासाठी तुम्ही उद्धव शेळकेंच्या 'शिळान आणि इतर कथा' अथवा व्यंकटेश माडगूळकरांच्या कथा वाचायला हरकत नाही. निवेदन किती लांबवायचे अथवा ते किती आखडायचे याचा निर्णय कथाकाराला करावा लागतो. तो निर्णय नाही करता आला की कथा बऱ्याचदा फसून जाते. हे निवेदनाच्या बाबतीत जसे अत्यावश्यक आहे तसेच संवादाच्या बाबतीतही आहे. प्रत्येक व्यक्ती एकच भाषा (मराठी) बोलत असली तरी प्रत्येकीचे बोलणे, तिची भाषेची लकब/ कौशल्य वेगळे असते. हे लक्षात नाही घेतले की, संवादात एकसुरीपणा यायला लागतो. तो आला की कथेची परिणामकारकता कमी होऊन जाते. ती हरवू द्यायची नसेल तर निवेदनाच्या भाषेवर जसे लक्ष केंद्रित करावे लागते, तसेच लक्ष संवादावरसुद्धा करावे लागते. कारण कथेचा अवकाश छोटा असतो. एकात्म परिणाम हे तिचे उद्दिष्ट असते. त्यामुळे कथानक, पात्र, वातावरण, निवेदक, संवाद या सगळ्यांची एकत्रित संघटनात्मक बांधणी करून एकात्म आशयावर लक्ष केंद्रित करून आपले म्हणणे अधिक परिणामकारकरीत्या सांगणे म्हणजेच 'कथेची संकल्पना' होय. हे सांगणे जितके नेमके होते तितकी कथा प्रभावी ठरते.

अर्थात कथेची संकल्पना स्पष्ट करताना कथेची एकच एक व्याख्या करता येत नाही. तिची व्याख्या करता न येण्याचे कारण तिच्या स्वरूपात दडले आहे. तरीही तिची काही वैशिष्ट्ये सांगता येतात. कथेच्या संकल्पनेच्या संदर्भात सुधा जोशी लिहितात, 'कथेचे स्फुट स्वरूप व तिच्या संस्काराची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत काही विशेष स्वभाविकपणे येतात. मितव्यय, संक्षेपशीलता, संपृक्तता, काटेकोर नेमकेपणा तसेच सूक्ष्मदर्शित्व ही कथेच्या कलावंताची खास वैशिष्ट्ये म्हणता येतील.' मात्र 'एकच एक संस्कार' किंवा 'परिणामांची एकता' ही संकल्पना बंदिस्त अर्थाने न घेता तिचे खुले, लवचीक स्वरूप ध्यानात घेतले पाहिजे. उदा. कथेत एकाच भाववृत्तीचा प्रभाव नेहमीच असतो वा असावा असे नाही. परस्परभिन्न, परस्परविरुद्ध भाववृत्तीतील संतुलनाचे किंवा त्यांच्या न्यायाचे समावेशनही कथा समर्थपणे व अर्थपूर्णतने करू शकते. तसेच संस्कारातील एकता कथेतील अनेकार्थतेला बाध आणीत नाही, तिलाही सामावून घेणारी अशी ती असू शकते. या गोष्टीचे भान राखणे आवश्यक आहे (कथा : संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन, मुंबई, २०००, पृष्ठ. १३).

एकच एक परिणाम अथवा संस्कार याचा अर्थ आपण नीट समजून घेतला पाहिजे. कथाकाराला काही तरी सांगण्यासाठी तो कथा लिहीत असतो. त्याचे हे सांगणे जर सरळ-सरळ उघड आणि आदर्शवादी असेल तर कथेची परिणामकारकता उणावते. असे झाल्यास कथा, कहाणी अथवा गोष्ट यातील फरक लक्षात येत नाही. अथवा कथेचा सिनेमा होण्याची शक्यता असते. ते टाळायचे असेल तर कथाकाराने आपल्या म्हणण्याचा/ सांगण्याचा आवाज खूप खालचा म्हणजे लक्षात न येण्यासारखा ठेवला पाहिजे. त्यासाठी कथेच्या समारोपाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे असते. परिणाम एकच साधावयाचा असला तरी तो चिंचोळा व आदेशात्मक, आदर्शात्मक नसावा. कथेत एका अर्थाने 'स्व' शोध असल्याने कथेच्या समारोपाने वाचकांच्या मनात प्रश्नचिन्ह उपस्थित केले पाहिजे. म्हणजे कथा वाचून संपल्यानंतर ती वाचकांच्या डोक्यात अनेक प्रश्न घेऊन नव्यानेच सुरू व्हायला हवी. म्हणजे कथेचा समारोप 'खुला' असायला हवा. त्याने समारोपाच्या विविध शक्यता निर्माण करायला हव्यात. त्या जितक्या अधिक तितके कथेचे परिणामकारकत्व वाढत जाते. एकूणच शक्यतांचा खुला संच समारोपाशी जोडलेला असेल तर; कथा जरी मर्यादित संदेश देणारी कला असली तरी त्या संदेशाच्या विविध शक्यतांमुळे तिचे परिणामकारकत्व वाढत जाते. कथेच्या निर्मितीच्या अंगाने बोलताना राजन खान म्हणतात, ''कोणतीही कथा लिहिताना लेखकांच्या मेंदूत कथा जिथे घडते, त्या परिसराचा एक नकाशा असतो. तो कथा लिहिण्याआधी तयार असू शकतो किंवा लिहिता लिहिता सुद्धा तयार होऊ शकतो. आधी असलेल्या नकाशात कथेच्या गरजेनुसार बदलही होत जाऊ शकतात. हा नकाशा एकाच गावातला, एकाच परिसराच्या एकाच वातावरणाचा, बऱ्याचदा खरा, बराचदा काल्पनिक आणि बऱ्याचदा खऱ्याची मिसळ असलेला किंवा बऱ्याचदा अनेक गावांच्या, अनेक परिसरांच्या, अनेक वातावरणाच्या सरमिसळीचाही असू शकतो'' (कथा आणि कथेमागची कथा, भाग एक, पृ. १७). वास्तव-कल्पित यांच्या सरमिसळीतून कथा तयार होत जाताना ती स्वतःचे एक वेगळे जग निर्माण करते. या स्वतंत्र जगाचा जितका परिणाम संपृक्त असेल तितकी कथेची उंची वाढत जाते.

**कथेतील वास्तव –कल्पिताचा खेळ**

कथा ही रचली जाणारी गोष्ट असते त्यामुळे ती काल्पनिक असते. असे असले तरी कथेतील काल्पनिकता अथवा कल्पित हे गोष्टीसारखे काल्पनिक नसते. गोष्टीतले कल्पित हे कालातीत आणि प्रदेशातीत असते. म्हणजे गोष्टीतले कल्पित हे पूर्णांशाने कल्पित असते. फार तर त्यामागच्या कथनकाराची भूमिका वास्तव जगातली असते. कथेतले कल्पित हे वास्तवाच्या भूमीवरती उभे असते. म्हणजे कथा ही कोणत्या तरी काळात आणि कोणत्या तरी स्थलावकाशात घडत असते. थोडे सुलभ करून सांगायचे ठरवले तर; कथा लिहिणारा कथाकार हा ज्या काळात जन्माला आलेला असतो, त्या काळाच्या पटावर तो कथेची निर्मिती करीत असतो. म्हणजे आजच्या तरुणाला आजची कथा लिहायची तर ती आजच्या कालपटाची उभारणी करून कथा लिहावी लागेल. त्या अर्थाने कथेतील काळ वास्तव असतो. परंतु तो काळ जेव्हा कथेत अवतरतो तेव्हा खरेच वास्तव उतरलेला असतो का, हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाचा शोध घेताना आपल्या लक्षात येते की, तो काळ वास्तवापेक्षा वेगळा बनलेला काळ असतो. म्हणजे समजा की, मी आज एक कथा लिहायला घेतली आणि त्या कथेत काळ उभा करू लागलो तर तो आताचा काळ नसतो. मी अनुभवलेला तो भूतकाळ असतो. तो केवळ भूतकाळही असत नाही. तर त्या भूतकाळाच्या अनुभवावर लिहितानाच्या वर्तमानाचे पडसाद पडण्याने त्याचे मूळ रूप बदलून जाते. हे बदललेले रूप माझ्या मूळ काळापेक्षा वेगळे बनत गेल्याने त्या काळाला काल्पनिक रूप लाभते. तो काळ केवळ तेथेच थांबत नाही; तर त्या काळाला कथेच्या अवकाशाचे रूप लाभताना पुन्हा मूळ काळाचा पट बदलत जातो. त्यामुळे कथेतला काळ जरी वाचकांना वर्तमानकाळ/ समकाळ वाटला तरी तो तसा कल्पित असतो. प्रत्यक्ष वास्तवातला काळ नसतो.

जे काळाचे तेच वास्तवाचे असते. मी जगल्या–भोगलेल्या, पाहिल्या–वाचलेल्या अनुभवावर जेव्हा कथा लिहायला लागतो; तेव्हा त्या अनुभवाचे काय होते, हे तपासणे आवश्यक आहे. ते तपासतांना ग्रहण, स्मरण, निवड आणि मांडणी या चार घटकांचा विचार करावा लागतो. म्हणजे आपण दैनंदिन जीवन जगत असताना आपल्या सभोवताली शेकडो गोष्टी घडत असतात. आपण शेकडो गोष्टी करीत असतो. त्या आपल्या मेंदूने आपोआप ग्रहण केलेल्या असतात. ग्रहण केलेल्या घटना दैनंदिन धबडग्यात मागे पडून जातात. त्यातल्या काही विस्मरणात जातात. जेव्हा केव्हा एखाद्या तत्कालीन कारणाने आपण काही लिहायचे ठरवतो तेव्हा ग्रहणातल्या गोष्टींचे स्मरण करावे लागते. कथाशयाशी संबंधित घटनांचे स्मरण करावे लागते. स्मरण केलेल्या सगळ्या गोष्टी आपण नोंदवू शकत नाहीत. त्यातून काहींची निवड करतो. निवडलेल्या घटना मांडताना तशाच राहतील अथवा सगळ्या घेतल्या जातील असे नसते. कथेचे पुनर्लेखन करताना म्हणजे प्रत्यक्ष कथा लिहिताना अथवा तिची मांडामांड करताना पुन्हा त्यात आपण हवा तसा बदल करीत जातो. या चार टप्प्यावंर प्रवास केलेला एखादा अनुभव कथेत येताना बदलत जातो. त्यामुळे त्याचे मूळ वास्तव रूप बदलून त्याला कथेचे रूप प्राप्त झालेले असते. त्यातही पुन्हा मूळ अनुभव घेतानाची तत्कालीन स्थिती, आपली मानसिकता आणि लिहितानाची स्थिती, मानसिकता, त्या अनुभवाकडे पाहण्याची

दृष्टी, आपली भूमिका अशा अनेक पातळ्यांवर मूळच्या अनुभवाची अनुभूती पूर्ण बदलून जाते. वास्तवाचे अन्वय बदलत गेलेले असतात. या अर्थाने कथेतले वास्तव हे कल्पित बनलेले असते.

मूळचा अनुभव कथेत अवतरताना अशी जी एक स्थित्यंतरांची मालिका बनत जाते, त्या मालिकेत तो अनुभव बदलून काल्पनिक म्हणजे कथेतील कलात्मक अनुभव झालेला असतो. हा सगळा मानसिक पातळीवरील प्रवास असतो. परंतु प्रत्यक्ष कथा लिहिताना त्या अनुभवाचे जे सादरीकरण आपण भाषेच्या द्वारे करीत असतो. त्यावेळी कल्पिताचे नेमके रूप काय असते, ते समजून घेतले पाहिजे. कथा लिहिताना आपल्या अनुभवाचे जरी कल्पितीकरण होत असले तरी प्रत्यक्ष परिसर, व्यक्तिरेखा, पात्रे यांचेही काल्पनिक रूप करावे लागत असते. गाव, गल्ली, घर आपले असले तरी कथेत ते तसे येता कामा नये. त्याला कथेच्या स्तरावर स्वतंत्र रूप देता यायला हवे. तसे ते रूप त्या-त्या कथेचे असले पाहिजे. म्हणजे समजा तुम्हाला एक तरुण आणि तरुणी यांची तुमच्या कथेतल्या गावात कोणत्या तरी स्थळी भेट घडवून आणायची आहे. तर ते स्थळ तुमच्याच गावातले असले तरी त्याचे सगळे संदर्भ बदलून टाकावे लागतील. त्याला काल्पनिक स्थळ करावे लागेल. तो तरुण-तरुणी जरी प्रत्यक्षातले तुमच्या भोवतालचे असले तरी त्यांना कथेत घेताना मूळ रूप बदलावे लागते. त्यांचे स्वभाव, शरीर वर्णने, बाकी सारा तपशील तुम्हाला सरमिसळ करून काल्पनिक करावा लागतो. ही सगळी प्रक्रिया तुम्ही जितकी नेमकेपणाने काल्पनिक करत जाल तितके ते काल्पनिक विश्व कथेत जिवंत आणि वास्तव असे 'कथागत वास्तव' बनून जाते. एकदा का ते कथागत वास्तव बनले की, बऱ्याचदा लेखक म्हणून मग आपल्या हातात फारशा गोष्टी राहात नाहीत. त्या 'कथागत वास्तवा'चा पाठलाग करताना लेखक म्हणून आपणच त्यांच्यामागे फरफटत जाण्याची शक्यता अधिक असते. ही शक्यता खरी 'कलात्मक अनुभूती' असते. वास्तव-कल्पिताचा हा खेळ जितका चांगला रमेल आणि लेखक म्हणून त्यात आपण जितके चांगले रंगून जाऊ, तितकी कलात्मक वास्तवाची प्रभावी उतरण कथेत होत जाऊ शकते. मुळात हा खेळ खेळता येणे हीच तर खरी लेखकाच्या कलानिर्मितीच्या आनंदाची आणि उच्च कोटीच्या अनुभूतीतली गोष्ट आहे. लेखक म्हणून ही अनुभूती घेता येणे ही खरा कथानिर्मितीतला आनंद असतो.

बहुतांशवेळा नव्याने लिहिणाऱ्यांना याचे भान येत नाही. वास्तव म्हणजे केवळ सभोवतालच्या घडामोडी असे काही एक चुकीचे समीकरण त्याच्या डोक्यात असते. परंतु त्या घडामोडींचे काही तरी करायचे असते. ते काहीतरी करणे आणि ते 'का करायचे? यात तुमच्या कथेचे बीज दडलेले असते. ते नीट पेरले गेले तर त्या कथेची उगवण नीट होते. म्हणजे आपल्या अनुभवाचे कथन आपण का करणार आहोत? त्या दु:खद, शोषित अनुभवाचे सादरीकरण आपण का करायचे आहे? आपण व्यक्तिगत राहिले नाही पाहिजे. त्याला सार्वजनिक करताना त्याचे कल्पितीकरण आणि कथांतर्गत रूप करून त्याला कलात्मक करता यायला हवे. त्यासाठी लेखकाकडे आपल्याच अनुभवाकडे पाहण्याची आत्मीयता आणि तटस्थता या दोन्ही गोष्टी असायला हव्यात. त्या नीटपणे हाताळता आल्या आणि आपण का लिहिणार आहोत, याचे नेमके उत्तर देता आले की, आपला कथेकडे पोचण्याचा मार्ग सोपा होतो. वास्तव कल्पिताच्या खेळाची विविध रूपे आपणाला कथा लिहिताना अनुभवायला मिळतील. या वास्तव कल्पिताचे खेळ समजून घेण्यासाठी आपण

भारत सासणे, राजन गवस, रंगनाथ पठारे, जयंत पवार, आसाराम लोमटे यांच्या कथा मुळातून नीट वाचायला हव्यात. लिहिणाऱ्या माणसाने खूप वाचायला शिकले पाहिजे. आपल्या भोवती कोण चांगले लेखक आहेत. त्यांचे वाचन केले पाहिजे. त्यांच्या निर्मितीची प्रक्रिया नीट समजून घ्यायला हवी.

प्रतिभा नावाच्या गोष्टीचाही विचार आपण करायला हवा. प्रतिभा नावाची गोष्ट कथेत एक टक्का असते, परिश्रम नव्याण्णव टक्के असतात. कोणत्याही लिहिणाऱ्याने ही परिश्रमाची तयारी ठेवायला हवी. मराठी तरुण लेखक या परिश्रमाच्या पातळीत होमवर्कमध्ये खूप कमी पडतो. लिहिणाऱ्याने होमवर्क करणे अत्यंत गरजेचे असते. कथेच्या संकल्पनेच्या सगळ्या शक्यतांचा शोध परिश्रमपूर्वक घ्यायला हवा. अभ्यास करायला हवा. केवळ अनुभवाच्या बळावर कथा उभारणी करता येत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

## १.२.२ कथेचे घटक

कथेच्या संकल्पनेचा विचार करताना जरी आपण कथेच्या घटकांची चर्चा केली असली तरी येथे प्रत्येक घटकांची सविस्तर चर्चा करायला हवी. ही चर्चा पुन्हा संकल्पनात्मक आणि निर्मितीच्या अंगाने करणार आहोत. कथानक, पात्रचित्रण, वातावरणनिर्मिती, निवेदन- संवाद, घटना- प्रसंग आणि भाषा या घटकांची आपण चर्चा येथे आपण करणार आहोत.

**कथानक**

कथानक हा कथेचा मुख्य घटक आहे. एखाद्या अस्तित्ववादी कथेला कथानक नसले तरी; कथानक नसणे हे सुद्धा कथानकच असते. कथानकाची मोडतोड करणे, याचा अर्थ त्या मोडतोडीच्या मुळाशी कथानक असतेच. म्हणजे कथेमध्ये कथानक महत्त्वाचे असते. हे कथानक विस्तार पावणारे नसते. बंदिस्त आणि एकसंध परिणाम साधणारे असते. मागे 'राजा मेला आणि राजाच्या मृत्यूच्या दुःखाने/विरहाने राणी मेली.' या अनुषंगाने कार्यकारणभावाची चर्चा केली होती. कथेमध्ये जेव्हा कथानक अवतरते तेव्हा त्यात एक कार्यकारणभावाची संगती असते. कथाकार म्हणून तुम्हाला जे काही सांगायचे आहे त्या सांगण्यास कथानक असे म्हणता येते. हे कथानक अनेकदा घटना प्रसंगानी आणि त्यांच्या जोडणीने आकाराला येत असते. ती जोडणी कशी करायची हे त्या कथेच्या आशयाच्या मांडणीवर अवलंबून असते. घटना- प्रसंग जोडताना ते सलग जोडायेचे, मागे-पुढे करायचे की आणखी काही करायचे हे त्या कथेच्या आशयावर आणि कथाकारावर अवलंबून असते. यासाठी रांगोळीचे उदाहरण आपण पाहू. आपण जेव्हा रांगोळी काढायला सुरुवात करतो तेव्हा सर्वप्रथम एका विशिष्ट अंतराने ठिपके देऊन ते ठिपके हवे तसे जोडून हवी तशी डिझाईन बनवतो. नंतर शिल्लक राहिलेले ठिपके पुसून टाकतो. रांगोळी अधिक चांगली येण्यासाठी ती शिकावी लागते, तिचे क्लास लावावे लागतात. त्यावर परिश्रम घ्यावे लागतात. कथेमध्ये कथानकातील घटना- प्रसंग हे असे प्रथम ठिपक्यांसारखे मांडावे लागतात. ते हवे तसे जोडून घेण्याचे कौशल्य विकसित करावे लागते. हे कौशल्य एकाच कथेत येते असे नाही. त्यासाठी रांगोळीसारख्या अनेक कथा लिहाव्या लागतात. मग केव्हा तरी आपणांला कथानकाची रचना नीट जमायला लागते. ती तशी जमण्यासाठी प्रयत्न आणि अवांतर वाचन हाच पर्याय असतो. अनेक मोठ्या कथाकारांनी आपल्या उमेदीच्या आणि

उमेदवारीच्या काळात खूप फसलेल्या कथा लिहिल्या आहेत. किंवा नंतरही उत्तरार्धात फसलेल्या अथवा मार्केट तंत्राच्या कथा लिहिल्या आहेत. यासाठी अत्यंत समृद्ध कथा लिहिणारे उद्धव शेळके यांचे उदाहरण बोलके आहे. त्यांनी प्रारंभी खूप चांगली म्हणजे उत्कृष्ट कथा लिहिली. परंतु नंतर मात्र ते जगण्यासाठी रंजनप्रधान कथा लिहू लागले. अर्थात रंजनप्रधान कथा कमी महत्त्वाची असली तरी तिचे म्हणून एक तंत्र आहे. तेही नव्याने कथा लिहिणाऱ्याने समजून घेतले पाहिजे. तसेच इतरांच्या कथा वाचताना कथाकाराने ही कथा अशीच का लिहिली असावी. असा विचार करायला हवा. कथानकात हेच प्रसंग का निवडले असावेत? दुसरे निवडले असते अथवा क्रम बदलला असता तर काय झाले असते? असा प्रश्न वाचक म्हणून स्वतःला विचारून ती कथा समजून घ्यायला हवी. अशा प्रयत्नामुळे आपले वाचन समृद्ध होत जाण्याची शक्यता अधिक असते. ज्या समृद्धीचा फायदा कथा लिहिण्यासाठी होऊ शकतो.

बऱ्याचदा कथेत कथानकाला फाटा दिलेला असतो. केवळ निवेदनावर भर असतो. मनोमय, अस्तित्ववादी विवेचन असते. ते तसे असले तरी त्याचेही एक सूत्र असते. ते कथानक समृद्ध करीत असते. कथानकाच्या अनुषंगाने रशियन रूपवाद्यांपासून ते बाख्तीनपर्यंत अनेकांनी अनेक विचार मांडले आहेत. ते समजून घेतल्यास कथा कळण्यास अधिक मदत होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर अलीकडे पारंपरिक मिथकांचे, रंजनप्रधान गोष्टीचे कथन अथवा कथानक वापरून नवी कथा लिहिली जाऊ लागली आहे. विशेषतः रहस्यकथेच्या तंत्राचा वापर करून जयंत पवार यांनी अलीकडेच 'तर्काच्या खुंटीवरून निसटलेले रहस्य' ही कथा लिहिली आहे. ती आवर्जून वाचायला हवी. तर मिथकांचा कथानकात किती खुबीने वापर करता येतो, हे समजून घेण्यासाठी विलास सारंग यांची कथा वाचायला हवी. संत तुकाराम, संत चोखामेळा यांच्या जीवनावर नवा प्रकाश टाकताना रंगनाथ पठारे कथानकाचे काय करतात हे पाहणे विलक्षण आहे. त्या कथा अनुक्रमे 'वैकुंठाची माती' आणि 'चोखोबाच्या पाठी' या आहेत. त्या आवर्जून वाचल्या पाहिजेत. किंवा भास्कर चंदनशिव यांच्या कथा आपण वाचल्या तर कथानकाच्या रचनेचे वेगळेपण लक्षात येऊ शकेल. कथाकार कथानकाचे काय- काय करतो हे नव्याने लिहिणाऱ्याने पुन्हा- पुन्हा वाचले पाहिजे. समजून घेतले पाहिजे. ते आपल्या आत मुरवले पाहिजे.

कथानकाची मोडतोड करून त्यात विसंगती निर्माण केली जात असली तरी त्या विसंगतीचेही एक सूत्र असते. कथाकार हा केवळ तुम्हाला गोष्ट सांगत नसतो. तर गोष्टीतील पात्रांच्या भाव-भावनांच्या आंदोलनाची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीची मांडणी करीत असतो. या संदर्भात सुधा जोशी लिहितात, ''कथेतील घटना प्रसंगाच्या गुंफणीतील कार्यकारणभावाचे, तर्कसंगतीचे तत्त्व संभवनीयतेच्या अंगाने अस्तित्वात येणारे वा क्रियाशील असलेले व प्रस्तुत करणारे असे असते. कथेतील घटनांच्या संघटनेमागे कार्यकारणवादाचे तत्त्व नेहमीच क्रियाशील असते, असे मात्र नाही. उदाहरणार्थ वास्तववादी प्रवृत्तीचा कथेत प्रवेश झाला तर तिच्या संघटनेतील कार्यकारणभावाचे सूत्र टळते. इतर वेगवेगळ्या कारणांमुळे व वेगवेगळ्या तऱ्हांनीही कार्यकारणभावाचे उल्लंघन होऊ शकते'' (कथा : संकल्पना आणि समीक्षा, १८). म्हणजे जरी अतिवास्तववादी, भावकाव्यात्म, अस्तित्ववादी अशा कथांमध्ये कार्यकारणभावाच्या संघटनेला छेद दिला जात असला, तरी मागे म्हटल्याप्रमाणे विसंगतीचेही एक सूत्र

कथाकार निर्माण करीत असतो. त्या विसंगतीचा मानवी समूहावर, भावविश्वावर अथवा व्यक्तिगत अस्तित्वाच्या पातळीवर काय परिणाम घडतो याचे एक दिशादर्शन कथानकातून घडत असते.

म्हणजे मोडतोड करून कार्यकारणभावाला नाकारून असंघटित आशयाची कथा जरी लिहायची असली तरी त्या सगळ्यामागे कथानकाचे सूत्र कार्यान्वित असते हे लक्षात घेतले पाहिजे. कारण कथानकाच्या कार्यकारणभावाचा जोपर्यंत आपणास नीट परिचय होत नाही, तोपर्यंत त्या कार्यकारणभावाला नाकारणारी असंघटित कथानक निर्मिती करता येत नाही, हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, तुम्हाला शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर कथा लिहायची आहे. तर ती कथा आधी तुमच्या मेंदूत तयार होईल. एक शेतकरी असेल, त्याचे कुटुंब असेल. दुष्काळ पडला असेल. अथवा अतिवृष्टीत त्याचे घर वाहून गेले असेल. घरात खाणारी तोंड जास्त असतील. त्यासाठी त्याने अगोदरच कर्ज काढलेले असेल. त्याचा बोजा असेल. पुन्हा न पिकण्याने किंवा घर वाहून जाण्याने तो गोत्यात आला असेल. खासगी सावकाराकडे गेला असेल. अशात घरात त्याच्या वृद्ध आई-बापाला कोरोनाची लागण झाली असेल. सरकारी दवाखान्यात व्हेंटिलेटर नसतील. खासगीचे पैसे परवडणारे नसतील. तो अस्वस्थ होऊन निव्वळ त्यांना घेऊन हॉस्पिटलच्या दारोदार फिरत असेल. अशात कुणीतरी एक दगावेल. दुसऱ्याच्या औषधपाण्याची सोय नसेल. घरात शिकणारी मुलं असतील. त्याला सुटकेचा मार्ग नसेल. आणि अचानक एके दिवशी तो आत्महत्या करून सुटकेचा मार्ग शोधेल.

तर समजा हा सगळा कथानकाचा आराखडा तुमच्या डोक्यात/ मेंदूत आला आहे. त्याची कथा लिहायची आहे. तर कथानक कसे रचाल? तर त्याच्या अनेक तऱ्हा असतील. कुणी आत्महत्येच्या घटनेने सुरुवात करील. कुणी घर वाहून जाण्याचा घटनेने करील. कुणी आई-बापाच्या कोरोनाच्या मृत्यूच्या घटनेने करेल. कोणी शेतात करपून गेलेल्या धान्याच्या/ पिकाच्या घटनेने सुरुवात करील. म्हणजे ज्याला जशी कथा उभी करायची आहे. तशी त्यात त्याला मुभा असेल किंवा कथानकाचे सगळे सूत्र नाकारून आत्महत्या केलेला शेतकरीच पुन्हा जिवंत होऊन बोलतोय असेही दाखवायचे असेल, तर ते वेगळे कथानक होईल. परंतु असे कथानक विरहित लिहिण्यासाठी आधी तुमच्या मेंदूत वरील कथानकाची रूपरेषा जन्मावी लागते. मग तिला नाकारता येते. तेव्हा अशा कथा वाचताना त्या कथेमागील कथेची संगती शोधता आली की, कथालेखन करणे जमू शकते.

**पात्रचित्रण**

पात्रांची उभारणी करणे हा कथेतला दुसरा महत्त्वाचा घटक असतो आपल्या भारतीय परंपरेत पात्रांची उभारणी करताना ती प्रारंभी प्राण्यांच्या रूपाने अथवा राक्षस- देव- परी अशा रूपाने केलेली दिसते. त्यांना मानवी वर्तन बहाल करून गोष्टी लिहिल्या गेल्या आहेत. यातही पुन्हा चांगली आणि वाईट म्हणजे (नायक आणि खलनायक) सुष्ट आणि दुष्ट अशा स्वरूपातील रचना दिसून येते. ती महत्त्वाची होतीच. कारण त्यातून आपणास काही एक नीतिबोध दिला जात होता. याच गोष्टीतून कथा पुढे येताना मात्र काही मूलभूत बदल झाले. त्यात पात्र रचनेत मुख्य बदल झाला आहे. कथा ही 'स्व' शोधाशी जोडली गेल्याने सुष्ट- दुष्ट अशी

विभागणी करणारी पात्ररचना मागे पडली; कारण कोणीही पूर्णतः सुष्ट आणि कोणीही पूर्णतः दुष्ट नसतो. केवळ स्वशोध हा कथेचा विषय नसतो, तर समाजशोधही त्यात असतो. त्यामुळे नीतिबोधाऐवजी स्वतःचा आणि समाजाचा शोध घेणे हे कथेचे तत्त्व असल्याने कथेतील पात्रचित्रांचे स्वरूप बदलून गेले आहे.

पात्रचित्रण म्हणजे साक्षात माणूस उभा करणे. त्याचे दिसणे, चालणे, बोलणे, वागणे, पेहराव, जीवनशैली आदी अनेक गोष्टी निर्माण कराव्या लागतात. म्हणजे कथेत पात्राची निर्मिती करताना, या पात्राला कथांतर्गत स्वयंपूर्णत्व लाभावे लागत असते. कथेतील पात्रांचा अवकाश छोटा असतो. पात्रांच्या एखाद्या खास स्वभाव वैशिष्ट्यांबद्दल अथवा त्यांच्या आयुष्यातील एखाद्या महत्त्वाच्या अथवा परिणामकारक घटनेवर कथाविश उभे असल्याने कथेत पात्रांना जरी अधिक वाव नसला, तरी ती कथांमध्ये पूर्णत्वाला गेलेली असावी लागतात. कथेत पात्रांचा अवकाश जसा कमी असतो. तसेच कथेचा जीव लहान असल्यामुळे कथेतील त्यांची संख्याही कमी असते. कमी असावी लागते.

कथेतील पात्रांना व्यक्तिरेखा असेही म्हटले जाते. या व्यक्तिरेखा आपापल्या स्वभावानिशी वावरत असतात. गोष्टीसारखे कथेतील पात्रांना ठोकळेवजा रूप नसते. सुष्ट आणि दुष्ट अशी विभागणी नसते. म्हणजे मुख्य पात्र आणि खलनायक असे कथेतील पात्रांचे वर्गीकरण नसते. तरीही कथेत मुख्य आणि गौण अशा प्रकारच्या व्यक्तिरेखा असतात. मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे कथा ज्याच्याभोवती फिरते त्यास मुख्य व्यक्तिरेखा अथवा पात्र असे म्हणता येते. हे मुख्य पात्र असते ते कथेत संपृक्तपणे वावरावे लागत असते. म्हणजे हे पात्र स्वयंपूर्ण, समृद्ध आणि व्यामिश्र असावे लागते. त्याचा विस्तार स्वतंत्रपणे झालेला असतो. स्वतंत्र याचा अर्थ हे पात्र जरी कथाकाराने निर्माण केलेले असले तरी ते कठपुतळीसारखे नसते. एकदा का त्याला त्याचे रूप दिले, स्वभाव दिला की पुन्हा लेखकाने त्याच्या उभारणीत हस्तक्षेप करायचा नसतो. त्याच्या पद्धतीनेच ते कथेत वावरत असते. म्हणजे समजा लेखकांनी एखादे पात्र समंजस, बुजरे असे उभे केले असेल; तर ते पात्र त्याच्या आयुष्यातील अटी-तटीच्या प्रसंगी कसे वागेल, हे त्या पात्राने ठरवायचे असते. कथेमध्ये तसे ठरवत असते. परंतु त्याच्या वर्तनात लेखकाने हस्तक्षेप केला की, पात्रांची उभारणी फसून जाते. म्हणजे बुजरे पात्र त्याच्यावर अन्याय व्हायला लागला म्हणून, जर ते अचानक उचल घेऊन बंडखोरी करू लागले तर ते कथेच्या आणि त्या पात्राच्या उभारणीला बाधा आणणारे ठरते. तसे करून चालत नाही. बुजरे असणारे पात्र कथेत त्याच्याच पद्धतीने मार्ग काढेल. कथेचा आशय या पात्राभोवती फिरता असल्याने, त्या पात्राला व्यामिश्र असे म्हणता येते. हे पात्र उभे करताना लेखकाला म्हणजे कथाकाराला अधिक काळजी घ्यावी लागते.

म्हणजे एखाद्या पुरुष कथाकाराने स्त्री पात्र मध्यवर्ती पात्र ठेवले तर पुरुष म्हणून त्या पात्राचा विचार करून चालत नाही. ते पात्र स्त्री म्हणून कसे वागेल? स्त्री म्हणून काही वेगळी स्वभाववैशिष्ट्ये आहेत का? तिच्या आकलन-अन्वयार्थाचा आवाका किती असू शकतो? तिच्या वयोमानानुसार तिचे आकलन कसे असेल? ह्या सगळ्यांचा विचार करावा लागतो. कथेत एखाद्या लहान मुलाला मुख्य पात्र केले असेल, तर त्याचे भावविश कसे असेल? ते कथेत कसे वावरेल? असा सगळा विचार त्याने केला पाहिजे. कथाकारच या पात्राच्या रूपाने कथेतील जग पाहू लागला तर पात्र नीटपणे उभे राहत नाही. त्याचे त्याला वाढू-जगू

द्यायचे असते. कथेच्या आशयाच्या मागणीनुसार ते वाढत जात असते. कधी-कधी कथाकार म्हणून कथाकाराला त्या पात्राच्या मागे- मागे फरफटत जावे लागते. अधिक सोप्या शब्दात सांगायचे तर आपण घरात आपल्या मुलांना लहानपणापासून संस्कार देत आपल्या देखरेखीखाली वाढवत असतो. परंतु एका विशिष्ट टप्प्यावर ती मुलं स्वतंत्र होतात. बऱ्याचदा आपल्यालाच आडवे प्रश्न विचारायला लागतात. एक वेळ अशी येते की, आपली इच्छा नसताना त्यांच्या मागे जावे लागते. ही जी मागे जावे लागण्याची अपरिहार्यता असते, तशीच अपरिहार्यता अनेकदा मुख्य पात्राच्या/ व्यक्तिरेखेच्या बाबतीत होते. कथाकार म्हणून त्याला फरपटत मुख्य पात्राच्या मागे जावे लागते. एका विशिष्ट टप्प्यावर ते पात्र लेखकाचा ताबा कधी घेईल काही सांगता येत नाही. हे ताबा घेणे कथेच्या उंचीसाठी अत्यंत आवश्यक असते.

मुख्य पात्रासोबत कथेत वावरणारी काही गौण पात्रे असतात. त्यांनाही त्यांचे- त्यांचे स्वभाव असतात. त्यांचे जगणे आणि त्यांचे भावविश असते. त्या सगळ्यांच्या भावविशाची मिळून कथा तयार होत असते. हे भावविश उभारताना आपोआप त्यात संवाद, संघर्ष उभा राहतो. तो टिपण्याचे काम कथाकाराने करावयाचे असते. म्हणजे एका अर्थाने जरी कथाकार कथा लिहीत असला अथवा तो कथेचा निर्माता असला, तरी पात्रांनी एकदा कथेचा ताबा घेतला की, निर्मात्याला त्याच्या मागे जावे लागते. त्यामुळे कथेत पात्रांना अधिक महत्त्व असते. गौण पात्रे कथेत असली तरीही त्यांना त्यांचे असे जगणे असते. त्यांचे असे एक म्हणणे असू शकते, अशा सगळ्यांचा विचार कथाकाराने करायचा असतो.

पुन्हा आणखी एका गोष्टीचा विचार करायला हवा आणि त्याची पुनरावृत्ती करायला हवी. तो म्हणजे पात्राचे रूप, त्यांचे कथेतील कार्य, त्यांचे आकारणे नीट समजल्याशिवाय त्यांच्या उभारणीमध्ये प्रयोगशीलता आणता येत नाही. म्हणजे समजा तुम्हाला एक वेडसर पात्र उभे करायचे आहे. तर ते कसे असेल? त्याचे विचित्र वर्तन नोंदवायचे असेल तर आधी साधारण, सामान्य जीवन जगणाऱ्या पात्राचे चित्रण कसे असते अथवा कसे करावे, हे कळायला हवे. कारण त्या-त्या पात्रांचा म्हणून जगण्याकडे बघण्याचा दृष्टिकोन असतो. त्याची-त्याची एक जीवनदृष्टी जशी असते तशी त्याची- त्याची एक जीवनशैली असते. ती कथाकारापेक्षा जशी वेगळी असते, तशी ती इतर पात्रांपेक्षा वेगळी असते. या सगळ्यांचा विचार पात्र उभारणी करताना करावा लागतो. प्रिया तेंडुलकर यांनी आपल्या अनेक कथेत पुरुष पात्रांना नावे दिलेली नाहीत. त्याचे कारण विचारले असता त्या म्हणतात, जी पुरुषी व्यवस्था स्त्रीला काडीची किंमत देत नाही, त्या स्त्रीने पुरुषांना तरी का किंमत द्यावी. ही कथाकार म्हणून तेंडुलकरांची भूमिका समजून घेतली पाहिजे. पण म्हणून त्यांच्या पुरुष पात्रांना काहीच किंमत नसते असे होत नाही. ती पात्रे त्यांच्या- त्यांच्या जीवनदृष्टीसह कथेत वावरत असतात. पात्रांच्या जीवनदृष्टीच्या विविधतेमुळे कथेला आणि तिच्यातल्या संघटित आशयाला आकार आलेला दिसतो. विभिन्न दृष्टी आकारण्यामुळे आणि त्यांचे एकमेकांशी टकराव होत असल्यामुळे कथेतील अर्थपूर्णता परिणामकारक बनत असते. लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे आपण ज्या काळाची कथा लिहीत असतो, त्या काळाच्या पटावरील आणि त्या काळाशी समांतर जाणारी पात्रे आपण उभी करणे आवश्यक असते. ही पात्रे जशी काळाशी बांधलेली असतात; तशीच ती स्थळांशी म्हणजेच प्रदेशाशी बांधलेली असतात. त्यांचे हे बांधलेपण उपजत असते. तेही कथा लिहिताना नीट समजून घेतलेले असते.

म्हणजे त्याचे बोलणे, त्याची वेशभूषा, त्याची जगण्याची पद्धती त्याचे परिसराशी आणि काळाशी बांधलेले असणे, हे सगळे कथा लिहिताना लक्षात घेतले पाहिजे. त्यातून कथाकाराचा दृष्टिकोन अधोरेखित होत असतो, त्यामुळे कथा कुणाची आहे, हा प्रश्न नेहमी उपस्थित होत असतो. पात्रे उभी करताना कथेतील मुख्य पात्रामागे कथाकाराचा दृष्टिकोन असतो, असे गृहीत धरलेले असते. तो गर्भित असला तरी महत्त्वाचा असतो. गर्भित म्हणजे प्रत्यक्षात गोष्टीसारखा प्रकट होणारा संदेश नसतो. तो अप्रत्यक्ष रूपांत कथेतील पात्रांच्या माध्यमातून दिलेला असतो. ही पात्रे काळाशी आणि स्थळांशी बांधली गेली असल्याने त्यांच्या अवतरण्यातून आणि कथेतील वावरण्यावरून स्थळ- काळाचे काहीएक आकलन होत असते. पात्रांचा पट जरी कमी अवकाशाचा असला तरी पात्रांचे कथेपुरते उभारणे परिपूर्ण असते. तसे ते असावे लागते. ज्या घटनेशी, स्वभावपैलूंशी, मूल्यांशी कथा बांधलेली असते, त्या घटना- स्वभाव- मूल्य यांच्याशी निगडित पात्रांची निर्मिती नेमकी म्हणजे कथानकाला आणि पात्रांना न्याय देणारी असावी लागते.

**वातावरणनिर्मिती**

कथानक ज्या पोर्शभूमीवर घडत असते ती पोर्शभूमी म्हणजे वातावरण होय. कथानक पोकळीत घडत नसते. ते कोणत्या तरी प्रदेशात, घरात, गावात, शेतात, सार्वजनिक ठिकाणी, नदीकिनारी, गल्लीत, स्टेशनवर, स्टँडवर, मनात अशा शेकडो ठिकाणी घडत असते. एखादी कथा जरी अस्तित्वाच्या अंगाने जाणारी असली तरी मानवी मनाचे संदर्भ त्यात असतात. मन हा सुद्धा एक वातावरणाचा भाग असतो. वातावरणनिर्मिती ही कथेतील महत्त्वाची घटना असते. त्यामुळे कथेत वातावरणाला अधिक महत्त्व असते. कथानकात वावरणारी पात्रे जर आपण पोकळीत उभी केली तर वातावरण तयार होत नाही. म्हणजे व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील वातावरण आणि अरविंद गोखले यांच्या कथेतील वातावरण पूर्णपणे वेगळे असते. गोखल्यांच्या कथेतील वातावरण मुंबईसारख्या महानगरातील असते. माडगूळकरांचे माणदेशातील म्हणजे ग्रामीण- प्रादेशिक असते. या वातावरणानुसार कथा आकारात असते. दुष्काळाचा परिणाम जो शेतकऱ्याला जाणवेल तो महानगरीय कामगाराला जाणवणार नाही. महानगरीय जीवनातले प्रश्न गावाकडे कळणार नाहीत. समुद्राचे उदाहरण घेतले तर फरक लक्षात येईल. मुंबईतला समुद्र वेगळा असेल. तोच समुद्र असला तरी कोकणात वेगळा असेल. तोच समुद्र गोव्यात वेगळा असेल. कारण मुंबईचा समुद्र विरंगुळ्याशी, कोकणातला समुद्र मासेमारीशी तर गोव्यातला समुद्र पर्यटनाशी संबंधित असेल. तेथील माणसाने समुद्राचे वर्णन करायचे ठरविले तर प्रत्येक ठिकाणचा संदर्भ वेगळा असतो. हेच महानगराचे आहे. हेच आपण कोणत्याही स्थळाबाबत म्हणू शकतो. माणदेश वेगळा, मराठवाडा वेगळा, त्यामुळे भास्कर चंदनशिव यांची कथा माडगूळकरांपेक्षा वेगळी असते. आजच्या पिढीतील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक-कथाकार आसाराम लोमटे आणि जयंत पवार हे महत्त्वाचे समकालीन लेखक आहेत. परंतु आसारामच्या कथेतील वातावरण मराठवाड्याकडील ग्रामीण भागाचे असते तर जयंत पवार यांच्या कथेतील वातावरण मुंबईतील कामगार चाळीतील असते. त्यांच्या या दोघांच्याही कथा वेगवेगळ्या वातावरणात घडतात. कामगारांचे प्रश्न कोणत्या वातावरणामुळे निर्माण होतात, हे लक्षात घेतले की वातावरणाचे प्रश्न आणि त्याचे परिणाम यांची अपरिहार्यता लक्षात येते.

महानगरात राहण्याच्या प्रश्नाला अनेकांनी छळले आहे. तो प्रश्न गावाकडे तितका भयंकर नसतो. त्यामुळे कथा उभी करताना कथाकार कोणत्या वातावरणात ती उभी करतो, यालाही तितकेच महत्त्व असते.

वातावरण हा घटक जरी पोर्शभूमी म्हणून येत असला तरी तो कथेत महत्त्वाचे कार्य करीत असतो. कथेची मागणी काय आहे, यावर वातावरणनिर्मिती ठरत असते. एखादा व्यक्ती अथवा समाज जर वातावरणाशी संघर्ष करीत असेल तर तेथील वातावरण वेगळे असेल. म्हणजे दुष्काळाशी झगडणारा माणूस उभा करताना शेती- माती, गुरे- ढोरे, पर्जन्यमान, पीक- पाणी, हमीभाव अशा गोष्टी केंद्रस्थानी येतील. बेकारीचा प्रश्न असेल तर तेथील वातावरण वेगळे असेल. कौटुंबिक संघर्ष असेल तर घरातले वातावरण येईल. मानसिक संघर्ष असेल तर मानसिक वातावरण उभे केले जाऊ शकते. वातावरणनिर्मिती करताना सगळ्या घटकांचा नीट विचार करावा लागतो. तो नाही नाही केला की, वातावरणाचे वर्णन आणि कथेतील पात्रांचे वर्तन अथवा प्रसंग यांच्यात एकमेळ होत नाही. म्हणजे तुम्हाला पात्रांच्या मनातील आनंद दर्शवायचा आहे, आणि तुम्ही प्रेतयात्रेचे वर्णन करायला निघालात, तर ते चुकीचे ठरेल. तेच उलट करता येईल. प्रेतयात्रेत कोणी नटूनथटून सहभागी होणार नाही. याचा विचार कथा उभी करताना करावा लागतो.

उदाहरणार्थ, एक प्रियकर पहिल्यांदा आपल्या प्रेयसीला भेटतो आहे. तर त्यांची भेट कोणत्या ठिकाणी होईल. हे पाहिले पाहिजे. बाग, नदीकिनारा, पाणवठा, स्टॅन्ड, वर्गातला निवांत कोपरा, मैदान, हॉटेल अशी स्थळे तुम्हाला शोधावी लागतील. त्या स्थळानुसार तुम्हाला पात्रांचे वर्तन बदलावे लागेल. म्हणजे वातावरणाशी पात्रांचे वर्तन बांधलेले असते. हे तुमच्या लक्षात येईल. एसटी थांब्यावर ते भेटत असतील तर ते गर्दीत कसा एकांत शोधतील? वर्गात तुम्हाला एकटेपणा कसा मिळणार? हे निर्माण करावे लागेल. हॉटेलमध्ये ते पहिल्याच भेटीत जातील का? गेली तरी त्यांचे तसे जाणे विशासार्ह वाटले पाहिजे. हॉटेलचा कोपरा, वेटरचे वर्तन, या दोघांच्या वर्तनातील बारकावे तुम्हाला वातावरणाच्या बांधलेपणातून उभे करावे लागतील.

आजच्या कथेने या सगळ्या सुसंगती नाकारल्या आहेत. जगण्यात सुसंगती नसेल तर लिहिण्यात तरी ती का असावी? असा प्रश्न उपस्थित करून कथेतील कार्यकारणभाव, संघटितपणा नाकारला आहे. या असंघटितपणाची, विसंगतीची, व्यस्ततेची पण एक वातावरणनिर्मिती असते. त्यात एक अंतर्गत सूत्र असते. याचा अर्थ वातावरणनिर्मिती सर्वस्व नव्हे. विनाकारण त्याला अधिक महत्त्व दिले की, कथेचा तोल बिघडून जातो. आवश्यक तेवढ्या पोर्शभूमीची गरज वातावरणाने पूर्ण करणे आवश्यक असते. कथांतर्गत पात्रे ज्या स्थळांशी, घटनांशी बांधली गेलेली असतात; ते स्थळ कथेतून जिवंत होणे अभिप्रेत असले; तरी त्याची किती गरज आहे, हे तपासले पाहिजे. वातावरणनिर्मितीसाठी आपण भास्कर चंदनशिव यांच्या कथा आवर्जून वाचायला हव्यात. शेती, शेतकरी, त्यांच्या समस्या या सगळ्यांचा विचार करता चंदनशिवांच्या कथेची परिणामकारकता लक्षात येते.

कथेत वातावरण निर्माण करताना पुन्हा ते वास्तव आणि कल्पित अशा दोन्ही ध्रुवावर नीटपणे आकारले पाहिजे. म्हणजे तुम्हाला स्थळाचे- परिसराचे चित्रीकरण करता यायला हवे. कथेतील नदी तुमच्या परिसरातील असली तरी तिचे सार्वत्रिकीकरण व्हायला हवे. तुम्ही समजा महाविद्यालयातील जीवनावर कथा

लिहीत आहात, तर तुम्ही जे महाविद्यालय उभे करत आहात, ते तुमचे जरी असले ते काल्पनिक वाटायला हवे. कथेतला गाव तुमचा असला तरी कल्पित वाटायला हवा. चहाची टपरी असो की एखादे झाड, ते जसेच्या तसे घेतले तरी त्याला कथेत एकजीव करता यायला हवे. कथेची मागणी काय यावरून त्याचे म्हणजे वातावरणाचे स्वरूप ठरत असते. वास्तवाचे कल्पितीकरण करताना ते केवळ काल्पनिक अथवा केवळ बटबटीत वास्तव पण उभारता कामा नये. मध्यंतरीच्या म्हणजे मागच्या दशकात मराठी साहित्यात वास्तवाच्या नावाखाली जे काही लेखन झाले ते फारच कृत्रिम आणि दुय्यम झाले आहे. आपल्या सभोवतालच्या वास्तवाचे कथेत काय करायचे? त्याचे कल्पित रूप कसे करायचे? आपल्या व्यक्तिगत जगण्याचे दुःख- शोषणाचे सार्वत्रिकीकरण कसे करायचे? हे एकदा नीट कळले की, वातावरणाचे कथेत काय करायचे हे ठरवता येते. केवळ घटना-प्रसंगाची साखळी निर्माण करण्यासाठी वातावरण निर्मिती करून चालत नाही. वातावरणातच घटना प्रसंग अंतर्भूत होत असतात.

एक अत्यंत छोटी कथा आहे. म्हणजे तशी ती शॉर्टफिल्म म्हणजे लघुचित्रफित आहे. एका वयोवृद्ध व्यक्तीची पंचाहत्तरी साजरी करण्यासाठी त्याच्या लेकी- बाळी, सुना-नातवंडं, मुलं सगळी एकत्र आलेली आहेत. कार्यक्रमाची तयारी जोरात सुरू आहे. बायका किचनमध्ये स्वयंपाकात मग्न आहेत. पुरुष मंडळी खरेदी करण्यात, काहीजण घराची सजावट करण्यात मग्न आहेत. मुलं खेळण्यात दंग आहेत. सत्कारमूर्ती वयोवृद्ध माणूस टीव्ही पाहतोय. सगळी तयारी होते. केक आणला जातो. सगळे जमतात. वयोवृद्ध माणसाला उठवू लागतात, तर तो बिचारा हातात रिमोट घेऊन टीव्ही पहात-पहात एकटाच कसालाही आवाज न करता तसाच मरून गेलेला. तो कधी मरण पावला कुणाला कळले नाही. कथा संपते. अत्यंत कमी वेळेत आणि कमी प्रसंगात ती दाखवली गेली आहे. म्हणजे तुम्हाला काय सांगायचे हे ठरले की, त्यावर वातावरणनिर्मितीचे काय करायचे, हे ठरवता येते. ते समजून घेण्यासाठी लिहिणाऱ्याने अथवा लिहू पाहणाऱ्याने अधिकाधिक वाचन करायला हवे. राजन खान यांच्या 'कथेमागची कथा' या पुस्तकाचा आवर्जून अभ्यास करायला हवा. तसेच लेखकांच्या निर्मितिप्रक्रिया समजून घ्यायला हव्यात.

**भाषा**

कथेत भाषा केवळ घटक म्हणून येत नसते. भाषा कथेचे मूलद्रव्य असते. ते कथेचे साधन जसे आहे, तसेच ते माध्यमही आहे. भाषेशिवाय कथा हे आपण गृहीतच धरू शकत नाही. त्यामुळे भाषेला कथेत अधिक महत्त्व असते. भाषेशिवाय जर कथा आकारत नसेल आणि आपल्या दैनंदिन जीवनातील भाषेतच कथा लिहायची असेल तर भाषेचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. कथेची म्हणून एक भाषा असते. कथा लिहिताना कवितेइतके भाषेवर काम करावे लागत नसले तरी कथेचा अवकाश छोटा असल्याने तिच्या भाषेवर खूप काम करावे लागते. (अर्थात कोणत्याही भाषिक कलाकृतीत भाषेवर काम करावे लागत असते.) कथेतील भाषा ही दोन पातळीवर वावरत असते. भाषेची एक पातळी असते ती निवेदकाची भाषा. दुसरी पातळी असते ती संवादाची भाषा. या दोन मुख्य पातळ्यांखेरीज काव्यात्म भाषा, स्वगताची भाषा असेही भाषेचे स्वरूप असते. निवेदनाच्या भाषेतून घटना-प्रसंग आणि वातावरण उभे केले जाते. वर्णनातून एखाद्या पात्राचे/ व्यक्तिरेखेचे व्यक्तिमत्त्व जिवंत केले जाते. अशा निवेदनाच्या वेळी कथेची गती, काळ

थांबलेला असतो किंवा वेग कमी आलेला असतो. संवाद, काव्यात्मकता, स्वगत या स्वरूपाच्या भाषेने कथेला गती येत असते. कथेच्या स्थिति-गतीसाठी भाषेचा वापर अत्यंत महत्त्वाचा असतो. भाषेच्या मागे दडलेल्या अर्थांच्या, सांस्कृतिक राजकारणाचा आणि शोषित- शोषकांच्या संदर्भात जो तपशील असतो, तो ध्यानात घ्यावा लागतो. म्हणजे भाषेच्या मागील राजकारण- संस्कृतीकारण समजून घ्यावे लागते. व्यवहारापेक्षा साहित्यातील भाषेला अधिकचे संदर्भ असतात. तिच्यात अर्थाचे अधिकत्व, संपृक्तता, व्यंजनात्मता, संदिग्धता, काव्यात्मकता, बहुआवाजीपणा, नाद- गति- लय असे विविध घटक कार्यरत असतात. या सर्व घटकांचा किमान अभ्यास, किमान आकलन कथाकाराकडे असते. असावे लागते. निवेदनात आणि संवादात या घटकांचा वापर होत असतो. भाषेचा मूळ स्वभाव नेमका अर्थ व्यक्त करण्याकडे असतो. तो अर्थ टाळून कथाकार तिला अधिकच्या वेगळ्या अर्थाकडे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करीत असतो. या प्रयत्नातून भाषेला कलात्मकतेचा दर्जा प्राप्त होत असतो. ती कलात्मकता अधोरेखित होण्यासाठी भाषेवर कथाकाराला काम करावे लागत असते.

भाषेवर काम करणे म्हणजे काय, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. या प्रश्नाच्या उत्तराकडे जाताना काही गोष्टी ध्यानात घ्याव्या लागतात. पुरुषांची भाषा आणि स्त्रीची भाषा वेगळी असते. वयोमानानुसार भाषा बदलत असते. संदर्भानुसार भाषेचा वापर बदलत असतो. स्थळ- कालपरत्वे ती बदलत असते. म्हणजे कार्यालयीन भाषा, मित्रांमधील भाषा, अनौपचारिक भाषा, हॉटेलमधील भाषा, स्त्री- पुरुषांमधील संवादाची भाषा, विद्यार्थी- शिक्षक- वडील- मुलगा यांच्यातील भाषा, वेगवेगळ्या भावनांच्या वेळी बदलणारी भाषा अशा भाषेच्या नानाविध तऱ्हा राहतात. त्या सगळ्यांचा वापर आपणाला करावा लागत असतो, आणि तो कथेच्या आशयानुसार करावा लागत असतो. त्यात पुन्हा संवादाची भाषा वेगळी आणि निवेदनाची भाषा वेगळी असते, इतकेच नव्हे तर आपण सगळेजण मराठी बोलत असलो तरीही प्रत्येकाची मराठी बोलण्याची तऱ्हा-लकब वेगळी असते, त्या तऱ्हा- लकबी कथाकाराने पकडलेल्या असतात. त्यामुळे कथेतील पात्रांना त्यांचे- त्यांचे असे एक व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. त्यामुळे भाषेचा अधिकात अधिक लवचीकपणे वापर करणे हे कथाकाराचे महत्त्वाचे धोरण असते.

केवळ एवढ्यावर भाषेचे कार्य थांबत नाही. तर भाषा दहा मैलांवर बदलते असे म्हटले जाते ते खरेही आहे. त्यामुळे भाषेला स्थानिक प्रवेशाचे संदर्भ असतात. तेही कथेत महत्त्वाचे असतात. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या लेखनात कोकणी भाषेचे संदर्भ येतील. जयंत पवार यांच्या भाषेत महानगरीय भाषेचे संदर्भ असतील. म्हणजे भाषा जितकी महत्त्वाची तितकीच भाषेची बोली देखील महत्त्वाची असते. आनंद यादव, भास्कर चंदनशिव यांनी संपूर्ण कथा (संवाद निवेदनासह) बोलीभाषेत लिहून कथेला वेगळ्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला आहे. अलीकडे असा प्रयत्न प्रसाद कुमठेकर, आसाराम लोमटे करताना दिसत आहेत. बोलीचा वापर करणे याचा अर्थ ती बोली जशीच्या तशी वापरणे जसे महत्त्वाचे आहे; तसेच त्या बोलीची मोडतोडही करता यायला हवी. सदानंद देशमुख यांच्या कथेत तसा प्रयत्न दिसून येतो. पुरुषोत्तम बोरकर यांनीही तसा प्रयत्न केला आहे. बोलीच्या उपयोजनामुळे जसा प्रदेश ठळक होतो; तसाच मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी तिचा फायदा होतो. परंतु जसे आपल्या अनुभवाचे कथेत काय करायचे हे ठरवावे लागते, तसेच कथेतील बोलीचे

काय करायचे हे ठरवता आले पाहिजे. तर तिचे उपयोजन प्रभावी ठरते. कवितेइतके नसले तरी कथा लिहितानाही भाषेवर काम करता यायला हवे.

कथा ही एक कलाकृती आहे, ती वास्तवाचे आकलन मांडत असली, तरी ती कला आहे. भाषिक अभिव्यक्ती आहे. त्यामुळे तिच्यात कलामूल्य येण्यासाठी भाषेचा प्रभावी आणि परिणामकारक वापर महत्त्वाचा असतो. यासाठी भाषेची ताकद समजून घ्यावी लागते. म्हणजे प्रतिमा, प्रतीके, रूपके, मिथके, लोकबंध, लोकमानस यांचा भाषेतील वापर समजून घ्यावा लागतो. भाषेत संदिग्धता, अनेकार्थता असते. भाषेच्या विविध प्रकारांशी खेळता यायला हवे. तिची मोडतोड करता यायला हवी. तिच्यातील संपृक्तता लक्षात घेता यायला हवी. अशा प्रकारे कथेवर खूप काम करणारा जयंत पवार हा मराठीतला महत्त्वाचा कथाकार आहे. युगवाणीच्या अंकात(जानेवारी– मार्च, २०२०) त्यांची मुलाखत प्रकाशित झाली आहे. ती रवींद्र लाखे यांनी घेतली आहे. या मुलाखतीत जयंत पवार एका ठिकाणी लिहितात, माझ्या 'तर्काच्या खुंटीवर निसटलेले रहस्य' या कथेतील एक प्रमुख पात्र जे सांगते, ते मी इथे पुन्हा उद्धृत करतो; कारण ते मला जाणवलेले सत्य आहे. या कथेतला रहस्यकथा लेखक काका आपल्या पुतण्याला सांगतो, आयुष्य जटिल आहे. सगळीकडेच उजेड नसतो. जिथे–तिथे भुयारं मात्र असतात. त्याच्या आत काळोख असतो. आपल्याला वाटतं आत काहीतरी आहे. पण काही सापडेल म्हणून हात घालून चापचत बसला तर झ्याट काही सापडत नाही. प्रत्येक रहस्यामागं एक सत्य उभं असतं. पण काळोखातून ते कधी आलंच समोर तर भाजून काढतं भोसडीचं. डोळे फुटतात, गांडीला बुडबुडे येतात. तेव्हा आपण त्याच्या नादाला लागू नये. पण सत्य शोधायची खाज असतेच आपल्याला तेव्हा रहस्यकथा लिहावी; तिथे आपलेच कूटप्रश्न आणि आपलीच चलाख उत्तरं. तू ह्याला पळवाट म्हणशील तर म्हण. पण कोण मायचा लाल पळत नसतो? प्रत्येकाचे पाय ढुंगणाला लागलेले असतात. पण पळता पळता खूप गुपिते सापडतात. तेही सत्याचे तुकडे असतात. पण त्यांनी हात भाजत नाहीत. म्हणून तू लिहित रहा बाबा, जसा मी लिहीत राहिलो (पान, १९). या उताऱ्यात कथाकार काय करीत असतो हे जसे दिसते; तसेच कलावंत भाषेशी किती चपखलपणे खेळत असतो. याचाही प्रत्यय येतो. ही पहिल्या भागातली मुलाखत जयंत पवारांच्या नाटकावर आधारित असली तरी एकूण निर्मितीच्या अंगाने महत्त्वाची आहे. युगवाणीच्या पुढील अंकात त्यांच्या कथेवर आधारित मुलाखत प्रकाशित होणार आहे. ती आवर्जून सर्वांनी वाचायला हवी.

### निवेदन

निवेदन ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कथेमध्ये कथा सांगणारा जो कथेकरी असतो; त्याला निवेदक असे म्हणतात. हा निवेदक जरी लेखक असला तरी तो लेखकापेक्षा वेगळा असतो. कारण निवेदकापुढे कथेच्या आशयाच्या अनुषंगाने आवश्यक असणारे जग महत्त्वाचे असते. त्या जगाचे चित्र वाचकापुढे उभे करणे हे निवेदकाचे कार्य असते. हा निवेदक कधी प्रत्यक्ष कथेचा नायक म्हणून कथेत वावरत असतो. त्याला प्रथमपुरुषी निवेदक म्हणतात. तर कधी तो प्रत्यक्षात नसतो त्याला तृतीयपुरुषी/सर्वसाक्षी निवेदक म्हणतात. या दोन पद्धतीने निवेदक कथेत वावरत असतो. कथेवर निवेदकाची सर्वंकष सत्ता असते. त्याच्या नियंत्रणकक्षात कथा फिरत असते. त्यामुळे त्याचे निवेदन महत्त्वाचे असते. हे निवेदन भाषेद्वारा होत असल्याने

निवेदनाची भाषा कथेत स्वतंत्रपणे आलेली असते. ती भाषा बहुतेक वेळा प्रमाणभाषा असते. परंतु त्यातही प्रयोगशीलता आलेली दिसते. अनेक कथाकार असे प्रयोग करीत असतात. जी. के. ऐनापुरे, श्याम मनोहर यांनी निवेदनाचे असे प्रयोग केले आहेत. निवेदनाची भाषा कथेला पूरक आणि परिणामकारक अशी असावी लागते. निवेदनामुळे कथेची गती कमी होते. तेव्हा वाचक तिथे अधिक रेंगाळला की कथेवरची पकड सुटते आणि वाचक कथा बाजूला सारतो. लेखक म्हणून कथेवर पकड ठेवण्यासाठी निवेदनाची भाषा कोणती वापरायची आणि निवेदन किती प्रमाणात लांबवायचे, किती प्रमाणात आखूड करायचे त्याचा योग्य निर्णय कथेतल्या निवेदकाला घ्यावा लागत असतो. त्यामुळे निवेदक आणि त्याची भाषा याचा विचार महत्त्वाचा असतो.

निवेदक जर विद्यार्थी असेल तर त्याच्या आकलनाचे जग किती आहे, याचा विचार करून त्याच्या भाषेला व्यक्त करणे गरजेचे असते. निवेदक लहान बालक असेल तर त्यावर प्रौढ लेखकाची भाषा लादून चालत नाही. लेखकाला त्या निवेदनाच्या पातळीवर यावे लागते. त्याचा भाषिक आकलनाचा आवाका लक्षात घेऊन निवेदनाच्या माध्यमातून त्याला कळू शकणारे जग उभे करावे लागत असते. कधीकधी निवेदक वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील असतो. त्या- त्या स्तरानुसार त्याचे आकलन वेगवेगळे असते. ते भान लेखकाने ठेवायला हवे.

कथेच्या या वरील घटकांचा परिणाम कथेच्या घाटावर होत असतो. कथेची निर्मितिप्रक्रिया ही गोष्ट जरी कला असली तरी रांगोळी काढताना जशी रांगोळीची एक आकृती मुलींच्या मेंदूत जन्म घेते आणि नंतर ती प्रत्यक्ष कृतीच्या रूपाने जमिनीवर आकारते. ती आकारणे म्हणजे परिश्रम असते. तसेच परिश्रम कथा लिहिताना घ्यावे लागते. कथा मेंदूत आकारण्यासाठी भरपूर वाचन करायला हवे. मुलगी रांगोळी शिकताना जसे अनेक प्रकारचे कष्ट घेते. प्रयोग करते, रांगोळी काढते. रोज नवीन शिकते. अगदी त्या पद्धतीने कथा लिहिणाऱ्याला कथा वाचता याव्या लागतात. कथा लिहिताना त्या खोडता यायला हव्यात. खोडताना आपल्या वाचनाचा फायदा होत असतो. जसे मुली रांगोळी/ मेहंदी शिकताना रांगोळी/ मेहंदीच्या वर्गांचा अधिक उपयोग होतो, तसाच उपयोग कथाकाराला त्याच्या वाचनाचा होत असतो. त्यामुळे प्रतिभेचा फार वाटा लेखनात नसतो तो कष्टसाध्य असतो. त्यासाठी वाचन, परिश्रम, जग समजून घेण्याची वृत्ती असावी लागते. ती असली की, कथा उत्तम होऊ शकते. त्याचा एक प्रयोग म्हणून आपण एका गोष्टीचा विचार करू या. खाली एक गोष्ट दिली आहे. त्या गोष्टीची आपण कथा लिहायची आहे. ती कथा लिहिताना आत्तापर्यंत जे विवेचन केले आहे ते विवेचन किती समजून घेतले आहे, यावर त्या कथेची उंची ठरणार आहे. ही कथा लोककथा आहे. म्हणजे ती लोक परंपरेतील गोष्ट आहे.

### १.२.३ कथालेखनाचे प्रात्यक्षिक

ती गोष्ट अशी आहे : एक होता राजा. एक होती राणी. राजाच्या प्रधानाचे राणीवर एकतर्फी प्रेम होते. त्यामुळे राजाचा संशय बळावत चालला होता. म्हणून त्याने राणीची परीक्षा घ्यायचे ठरवले. तो मोहिमेवर निघाला. निघताना वर्षभर तरी परत येणार नाही असे सांगून निघाला. निघताना राणीला बोलावून म्हणाला,

वर्षभराने जेव्हा मी परत येईन तेव्हा आपल्या राजधानीबाहेर पदरचा एक रुपया खर्च न करता सात मजली माडी बांधली पाहिजे. त्या माडीवरच्या पाळण्यात आपले मूल खेळताना दिसले पाहिजे. तर तू पतिव्रता. तो मोहिमेला निघून जातो. वर्षभराने परत येतो. तर माडी दिसते. पाळणा दिसतो. त्यात मूलही दिसते. तो संतापतो. दरबार भरवतो. दरबारात राणीला बोलावले जाते. तिला मृत्युदंड देण्याआधी, हे कसे उभे केले आणि ते मूल आपले कसे, हे सिद्ध करण्याची तिला एक संधी दिली जाते. ती सांगते, तुम्ही गेलात आणि प्रधानाला रान मोकळे झाले. तो माझा पिच्छा सोडेना. मग त्याला मी सांगितले, गावाबाहेर सात मजली माडी बांध. मी तिथेच तुला भेटून तुझ्या प्रेमाचा स्वीकार करीन. त्याने माडी बांधली. रात्रीच्या अंधाराच्या आधाराने त्याला भेटायला मी दासीला पाठवले. राजा चिडलेला होता. तो म्हणाला, हे मूल कोणाचे? राणी म्हणाली, तुम्ही मोहिमेवर गेले असताना प्रवासात एका कृषिकन्येच्या प्रेमात पडला होता. तुमच्या मिलनाची भेट म्हणून तुम्ही तिला हातातली अंगठी काढून दिली. ती कृषिकन्या म्हणजे दुसरे कोण नव्हते तर ती मीच होते. त्या प्रेमाची निशाणी ही अंगठी आणि तो मुलगा आहे. राणीचे पावित्र्य आणि पातिव्रत्य सिद्ध होते. दरबार संपतो. कथा संपते.

आता या गोष्टींची कथा करायची आहे. तर राजा- राणीला नाव द्यावे लागेल. राजा आला की राजधानी आली. तिचे वर्णन आले. प्रधान अचानक एकतर्फी प्रेमात पडणार नाही. त्यासाठी काही वातावरण निर्मिती करावी लागणार. राणीचा स्वभाव, तिने आव्हान कधी स्वीकारले? ती कशी दिसते? राजा तिच्यावर संशय का घेतो? संशय घेतो म्हणजे नेमके काय करतो? कसा बोलतो? राणी कशी बोलेल? कृषिकन्या कुठे भेटली? तो राजा कोणत्या मोहिमेला गेला? ती कशी प्रेमात पडली? त्यांचे मिलन कसे झाले? दरबार कसा भरला? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे कथा लिहिताना तुम्हाला द्यावी लागतील. त्यासाठी त्यातले तपशील तुम्हाला भरावे लागतील.

केवळ तपशील भरून कथा होणार नाही तर त्यातून तुमचा आणि निवेदकाचा दृष्टिकोन स्पष्ट व्हायला हवा. म्हणजे निवेदक राणी असेल आणि ती कथा जर स्त्रीवादी दृष्टीने लिहायची ठरवली तर कथेत राजा आरोपी होईल. कथा वेगळ्या अंगाने आकाराला येईल. निवेदक प्रधान असेल तर कथा वेगळी आकारास येईल. निवेदक राजा असेल तर कथा वेगळ्या दिशेने जाईल. निवेदक सर्वसाक्षी असेल तर ती पुन्हा वेगळ्या टप्प्यावर जाईल. त्यातही पुन्हा तुम्हाला काय संदेश द्यायचा आहे. यावर त्या कथेचे रूप बदलेल. प्रत्येकाचा राजा वेगळा असेल. राणी वेगळी असेल. प्रत्येकाचा विचार, नीतिमूल्य वेगळे असेल. त्यामुळे वरील गोष्ट जेव्हा तुम्ही प्रत्यक्ष लिहायला घ्याल तेव्हा तुम्हाला कथेची संकल्पना कळायला मदत होईल, आणि कथेची ताकद कळेल. स्वतः आपण कथा लिहिणारे म्हणून कसा विचार करू, याचाही विचार करता येईल. कथेच्या सृजनात्मक लेखनाची एक पायरी पूर्ण होईल.

## १.३ स्वाध्याय

प्रश्न-१ योग्य पर्याय निवडा.

१. बौद्धिक मेहनत, सभोवतालचे सूक्ष्म निरीक्षण, संवेदनशीलता व विशिष्ट भाषिक अवकाशांचा वापर या गोष्टी कोणत्या लेखनासाठी आवश्यक आहेत.

अ) ऐतिहासिक ब) वैज्ञानिक क) सर्जनशील ड) यापैकी नाही

२. जिवंतपणा आणि कार्यकारणभाव यामुळे गोष्टीची काय निर्माण होते.

अ) कथा ब) कादंबरी क) नाटक ड) कविता

३. कथेचा रचनाबंध अथवा रूपबंध समजून घेणे म्हणजे कथेची ........... समजून घेणे होय.

अ) पात्ररचना ब) संकल्पना क) अभिव्यक्ती ड) भाषिक रचना

४. कोणता घटक हा कथेच्या संकल्पनेचा गाभा असतो.

अ) पात्ररचना ब) संवाद क) संघर्ष ड) कथानक

५. कथा अधिकाधिक परिणामकारक होण्यासाठी तिचा मूळ स्वभाव कोणता?

अ) संक्षेप ब) विस्तार क) विस्कळितपणा ड) असंघटितपणा

६. कथानक ज्या पार्श्वभूमीवर घडते ती पार्श्वभूमी उठावदार होण्यासाठी कथेत काय महत्त्वाचे असते.

अ) वातावरणनिर्मिती ब) संवादरचना क) संघर्ष ड) पात्रे

७. कथानिर्मिती प्रक्रियेत भाषा हे कथेचे काय असते.

अ) बाह्यरूप ब) अंतरंग क) मूलद्रव्य ड) यापैकी नाही

उत्तरे : १) क, २) अ, ३) ब, ४) ड, ५) अ, ६) अ, ७) क

प्रश्न-२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. कथा निर्मितीप्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.

२. कथेचे घटक कोणते? याची सविस्तर चर्चा करा.

३. मराठी कथेच्या उद्‌गम व विकासाची सविस्तर चर्चा करा.

प्रश्न ३ लघुत्तरी प्रश्न

१. गोष्ट आणि कथा यातील फरक सांगा.

२. कथानिर्मितीत कथानकाचे स्थान सांगा.

प्रश्न ४ टिपा लिहा.

१. सर्जनशील लेखन

२. कथा म्हणजे काय?

३. कथारचनेत भाषेचे स्थान

## १.४ अधिक वाचन


१. जोशी, सुधा : कथा संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन, मुंबई, २००२.

२. सारंग, विलास : सर्जनशोध आणि लिहिता लेखक, मौज प्रकाशन, मुंबई.

३. शेवडे, इंदूमती : मराठी कथा उगम आणि विकास, मुंबई.

४. हातकणंगलेकर, म. द. : मराठी कथा : रूप आणि परिसर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

५. चंदनशिव, भास्कर : भूमी आणि भूमिका.


❑❑❑

# घटक – २
# वैचारिक लेखन

**घटक संरचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन :

- २.२.१ वैचारिक लेखनाची संकल्पना
- २.२.२ वैचारिक लेखनाची पद्धत
- २.२.३ वैचारिक लेखनाचे प्रकार
- २.२.४ वैचारिक लेखनाचे प्रात्यक्षिक

२.३ स्वाध्याय

२.४ अधिक वाचन

## २.० उद्दिष्टे

१. वैचारिक लेखन म्हणजे काय हे कळेल.

२. वैचारिक लेखन व ललित लेखन यातील मूलभूत फरक समजेल.

३. वैचारिक लेखनाची संकल्पना कळेल.

४. वैचारिक लेखनाच्या प्रेरणा व स्वरूप समजून घेता येईल.

५. वैचारिक लेखनाची पद्धत व प्रकार कळतील.

६. वैचारिक लेखनाच्या प्रात्यक्षिकांतून वैचारिक लेखनाची कौशल्ये अवगत होतील.

## २.१ प्रास्ताविक

साहित्याचे गद्य आणि पद्य हे दोन प्रकार आहेत. 'ज्या शब्दार्थयुक्त भाषेचा साधारण बोलण्यात उपयोग केला जातो,' त्याला गद्य म्हणतात. आणि 'जेथे क्रमबद्ध ताल आणि लयीसाठी वाक्यातील शब्दांच्या साधारण क्रमात बदल करावा लागतो' त्याला पद्य म्हणतात, अशी गद्य आणि पद्य यांच्यातील फरक दर्शविणारी व्याख्या ढोबळमानाने करता येईल. लोकव्यवहारात, वैचारिक, शास्त्रीय लेखनात गद्याचा वापर

केला जातो. तर कवितेसाठी पद्याचा अवलंब केला जातो. गद्य आणि पद्य ही मानवी वाणीची दोन आविष्कार रूपे प्राचीन काळापासून अगदी भाषेच्या उगमापासून प्रचलित असली तरी प्राचीन आणि मध्ययुगीन काळामध्ये साहित्यादी क्षेत्रांमध्ये गद्यापेक्षा पद्याचा वापर अधिक केला जात होता. संस्कृतमध्ये धर्म, तत्त्वज्ञान, काव्यशास्त्र, व्याकरण आदी विषयांची मीमांसा करणारे शास्त्रीय ग्रंथ आणि काही नीतिबोध करणाऱ्या कथा- कहाण्यांचा अपवाद केल्यास गद्यापेक्षा पद्य आणि काव्यामधून मोठ्या प्रमाणावर लेखन केलेले आढळते. प्राचीन काळात 'काव्य' ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरली जात होती व 'काव्या'ला मोठी प्रतिष्ठाही प्राप्त झाली होती.

मध्ययुगीन मराठीमध्ये गद्यलेखन मर्यादित स्वरूपात आढळते. शिलालेख, महानुभवांचे ग्रंथ, बखरी, पत्रव्यवहार अशा सीमित क्षेत्रांत गद्यलेखन केलेले सापडते.ब्रिटिशांच्या भारतातील आगमनानंतर गद्यलेखनामध्ये नवनवे, वैविध्यपूर्ण प्रकार अस्तित्वात आले. औद्योगिक क्रांती, विज्ञान- तंत्रज्ञानातील नवेनवे शोध, मुद्रणकलेचा उदय, भौतिकशास्त्रांचा विकास, लोकशाही, वृत्तपत्रे व ग्रंथव्यवहाराला प्राप्त झालेले महत्त्व, तर्क, बुद्धिवाद यांचा प्रभाव अशा विविध आणि परस्परसंबंधित घटनांमधून एकोणिसाव्या शतकामध्ये नवे मन्वंतर घडून आले. आधुनिकतेचे नवे वारे वाहू लागले. त्यातूनच 'गद्य' या लेखनप्रकाराला वैचारिक आणि ललित पातळ्यांवर अनेक धुमारे फुटले. ललित आणि ललितेतर साहित्यामध्ये गद्याचा वापर केला जाऊ लागला. आधुनिक काळात ललित साहित्याच्या कथा, कादंबरी, नाटक या प्रकारांसाठी गद्याचा वापर केला जातो. वैचारिक निबंध- प्रबंधांचे गद्य, शास्त्रीय लेखन आणि ललित साहित्यप्रकारातील गद्य यांच्यात फरक असतो.

या घटकामध्ये आपण वैचारिक लेखनाचे स्वरूप समजून घेणार आहोत. वैचारिक लेखन किंवा वैचारिक साहित्य ही एकच संकल्पना असल्याने हे दोन्हीही शब्दप्रयोग प्रस्तुत घटक लेखनामध्ये एकाच अर्थाने वापरले आहेत. वैचारिक साहित्याची निर्मिती विचारवंतांकडून, वैचारिक तत्त्वचिंतकांकडून, लेखकांकडून होत असते. विचारवंतांची भूमिका समाजामध्ये महत्त्वाची असते. विचार हा वैचारिक साहित्याचा केंद्रबिंदू आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ वैचारिक लेखनाची संकल्पना

'Thought' या इंग्रजी शब्दाला मराठीमध्ये 'विचार' असे म्हणतात. विचार ही मानवी मेंदूमध्ये, मानवी मनामध्ये चाललेली एक प्रक्रिया असते. जिला तर्काचा, वैज्ञानिकतेचा आधार असतो. विचार हे एक चिंतन असते ज्याच्या मुळाशी पद्धतशीरपणे केलेला अभ्यास, निरीक्षणे, निष्कर्ष असतात. विचार या घटकाला ज्यात प्राधान्य दिलेले असते, ते वैचारिक साहित्य/ वैचारिक लेखन होय. व्यक्ती व समाज यांच्या सांस्कृतिक अंगाचा विचार वैचारिक पातळीवरून ज्या साहित्यात केला असेल ते वैचारिक साहित्य, अशी व्याख्या ह. श्री. शेणोलीकर यांनी केली आहे. (शेणोलीकर, १९८८ : १०६, १०७)

'विचार' हा वैचारिक वाङ्मयाचा प्राण असतो. विशिष्ट विचार अथवा विषय तर्कशुद्ध, साधार प्रतिपादन करीत काही एका निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे म्हणजे 'वैचारिक लेखन' होय. किंवा वाचकांच्या बुद्धीला सतत आवाहन करणारे आणि तर्कशुद्ध, सप्रमाण, संदर्भासह विषय मांडणारे विचारप्रधान लेखन म्हणजे 'वैचारिक साहित्य' होय. मानवी जीवन व जीवसृष्टीशी निगडित कोणत्याही विषयावर माणूस विचार करतो. अशा विषयांच्या जिज्ञासेतून त्याचा मूलगामी शोध घेऊन आपले अनुभव, निरीक्षणे, चिंतन, विचार यांचे आविष्करण करता येते. मानवाचे वैचारिक चिंतन, मनन, वैचारिक देवाणघेवाण, वादसंवाद, अभिव्यक्ती यांमधून मानवी मूल्ये, मानवी संस्कृती यांचे वहन, विकसन होत जाते. मानवी जीवन व संस्कृतीविषयीची खोलवर आस्था, जिज्ञासा व सतत मूल्ययुक्त विकसनाची आस ही विचारप्रक्रियेला गती देत असते. मानवी संस्कृती व एकंदरीत जीवसृष्टी अधिकाधिक प्रगत, प्रगल्भ व सुंदर होण्यासाठी मानवाची विचारप्रक्रिया सतत सर्जनशील असावी लागते. मानवाची समाजशीलता हे मानवी वैचारिक प्रक्रियेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'संवाद' हे मानवी समाजातील एक मूलभूत तत्त्व आहे. विचार प्रकटीकरणाच्या, संवादाच्या प्रेरणेतून वैचारिक लेखनाचे विविध प्रकार संभवतात.

**वैचारिक लेखनाची प्रेरणा**

काही शाश्वतमूल्यांवर समाजाची बांधणी करणे, प्रत्येक समाजगटाच्या विकासाचा विचारव्यूह विकसित करणे हे वैचारिक साहित्याचे मुख्य प्रयोजन असते. विचारवंत, साहित्यिक हे समाजासमोरील प्रश्न, समस्या यांचे शास्त्रशुद्ध आकलन मांडीत असतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांवर आधारित समाज निर्माण करणे हा वैचारिक लेखनाचा एक महत्त्वाचा उद्देश असतो. माहिती देणे, बोध करणे, टीका करणे, शंकानिरसन करणे, आचारविचारांमध्ये परिवर्तन करणे, नवे बदल करणे, सुधारणा घडविणे अशा विविध उद्देशांनी वैचारिक साहित्य लिहिले जाते. वैचारिक साहित्यामध्ये आशयाला, विचारदर्शनाला महत्त्व असते.

मनुष्य हा विचारशील प्राणी असल्याने सर्व माणसे विचार करू शकतात, स्वतःची मते बनवू शकतात व इतरांच्या मतांवर परिणामही करू शकतात, या गृहीतावर वैचारिक साहित्याची निर्मिती होते. आपल्या विचारसरणीचे स्पष्टीकरण व समर्थन करीत ती इतरांना पटवून देत त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना आपल्याला अनुकूल करून घेणे ही वैचारिक लेखनाची मूलभूत प्रेरणा असते. वैचारिक साहित्यामध्ये स्वमत प्रतिपादनाइतकेच परमतपरिवर्तनालाही महत्त्व असते. त्यासाठी तर्क, युक्तिवाद यांच्याबरोबर प्रसंगी काही तर्कबाह्य क्लृप्त्यांचाही वापर करावा लागतो. व्यक्ती वा समाज परिवर्तनासाठी विचाराचे रूपांतर कृतीमध्ये होणे आवश्यक असते. नुसत्या विचाराने, ज्ञानाने वा तर्काने व्यक्ती कृतीस प्रवृत्त होत नाही. कृतीसाठी प्रसंगी व्यक्तीच्या भावनेस हात घालावा लागतो. त्यामुळे वैचारिक साहित्यामध्ये भावनात्मकतेचा प्रत्यय काही प्रमाणात का होईना येणे अपरिहार्य ठरते. व्यक्ती कृतिप्रवण होण्यासाठी भाषेचाही कौशल्याने, काळजीपूर्वक वापर करावा लागतो. थोडक्यात, विशिष्ट मूल्यांच्या, विचारांच्या अनुरोधाने दुसऱ्याचे मतपरिवर्तन करून त्यांना कृतिप्रवण करायचे, ही वैचारिक लेखनाची मुख्य प्रेरणा असते. अपेक्षित परिवर्तन व कृती किती प्रमाणात घडते यावर त्या साहित्याचे यशापयश अवलंबून असते.

**वैचारिक लेखनाचे स्वरूप**

वैचारिक लेखन विचारप्रधान असल्यामुळे ललित साहित्याहून भिन्न ठरते. विज्ञानसुद्धा भाषेत निर्माण होते. परंतु विज्ञानाला वैचारिक साहित्य म्हणता येत नाही. विज्ञानात एक प्रकारची तांत्रिकता असते. विज्ञानात व्यक्तिगत भावना-विचारांना स्थान नसते. विज्ञानातील भाषेचे मुख्य कार्य बाह्य वस्तुस्थितीचे यथार्थ वर्णन करीत तिचे स्पष्टीकरण करणे हे असते. न्यायालयीन लेखन, धार्मिक लेखन हे संबंधित व्यवस्थेच्या तत्त्वचौकटीने नियंत्रित व मर्यादित केलेले असते. त्यामुळे त्यांना वैचारिक साहित्य म्हणता येणे अवघड आहे. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांसारखी वस्तुज्ञान करून देणारी भौतिक- शास्त्रे व तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र यांसारखी सामाजिक शास्त्रे तसेच तांत्रिक ज्ञानाशी संबंधित शास्त्रे यांचा समावेश वैचारिक साहित्यामध्ये होत नाही.

वैचारिक साहित्याचे स्वरूप इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळे असते. वैचारिक साहित्य हा गद्य वाङ्मयप्रकार असला तरी शब्दांचा वस्तुनिष्ठपणे वापर केला जातो. वैचारिक साहित्यामध्ये एक विशिष्ट विषय असतो. विषय कोणता असावा यावर बंधन नसते. विचारवंताच्या विचारविश्वातून स्फुरलेल्या कोणत्याही विषयावरील चिंतन वैचारिक साहित्याचा भाग असू शकते. त्या विषयातून विचार व्यक्त होणे महत्त्वाचे असते. विचार हा वैचारिक वाङ्मयाचा गाभा असल्याने विचार प्रतिपादन करणे हे वैचारिक वाङ्मयाचे महत्त्वाचे प्रयोजन मानले जाते. धर्म, समाज, भाषा, साहित्य, कला, संस्कृती, शिक्षण, इतिहास, भूगोल, विज्ञान, न्याय, नीती, अर्थशास्त्र, वैद्यकशास्त्र, पर्यावरण अशा कोणत्याही विषयावर विचारवंत, लेखक सखोल, मुद्देसूद विवेचन-विश्लेषण करीत असतो. त्यातून संबंधित विषयाच्या विविध पैलूंचा परिचय होतो. एखाद्या विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची एक बौद्धिक विचारयात्रा म्हणजे वैचारिक लेखन. लेखकाचा अभ्यास, व्यासंग, संशोधन, अनुभव, चिंतन, निरीक्षणे, दृष्टिकोण यांमधून वैचारिक साहित्य आकारास येत असते.

वैचारिक लेखनात विचार प्रकटीकरण केंद्रवर्ती असते. लेखक आपल्या विचार प्रतिपादनार्थ वैचारिक लेखन करीत असतो. लोकशाही समाजव्यवस्थेत विचार प्रकटीकरण, खंडनमंडन, चिकित्सा, नवमतप्रतिपादन यांना खूप महत्त्व असते. विचारस्वातंत्र्य हे लोकशाहीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आपण जसे आपले विचार मौखिक वा लिखित स्वरूपात व्यक्त करीत असतो, तसे इतरांचे विचारही ऐकत असतो, वाचत असतो. इतरांच्या विचारांशी आपण कधी सहमत असतो, तर कधी असहमत असतो. आपली मतभिन्नता ही आपण नोंदवू शकतो. अशा प्रकारच्या वैचारिक देवाणघेवाणीमधून समाज वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ होत असतो. वैचारिक स्वातंत्र्याचे संवर्धन करण्याबरोबरच उच्च जीवनमूल्यांची अभिरुची समाजामध्ये रुजत जाते. म्हणून कोणत्याही आधुनिक समाजासाठी वैचारिक लेखनाचे महत्त्व जीवनसत्त्वांसारखे असते.

वैचारिक लेखनामध्ये स्वमतप्रतिपादनाबरोबरच परमतखंडनाचीही एक पद्धत असते. एखाद्या विषयावरील इतरांची मते मांडत जाऊन त्यांची चिकित्सा करणे, इतरांच्या मांडणीतील त्रुटी, मर्यादा, विसंगती दाखवून देणे व स्वतःची मते, विचार यांची तर्कशुद्ध पुराव्यांनिशी मांडणी करणे अशी पद्धत वैचारिक लेखनामध्ये असते. एखाद्या

विषयावरील इतरांची मते युक्तिवादपूर्वक नाकारत स्वतःची मते साधार प्रस्थापित करण्याची पद्धत म्हणजे 'खंडनमंडन' होय. अशा स्वरूपाच्या लेखनासाठी पूर्वतयारी, त्या विषयासंबंधीची मतमतांतरे, पूरक संदर्भ, विषयाचे समग्र आकलन, शास्त्रीय अन्वेषक दृष्टी, बहुश्रुतता, तर्कशुद्ध युक्तिवादकौशल्य इत्यादी बाबी लेखकाजवळ असाव्या लागतात. आपल्या विषयाच्या परिणामकारक मांडणीसाठी पूरक उदाहरणे, दृष्टांत, दाखले यांचा औचित्यपूर्ण वापर करता आला पाहिजे.

वैचारिक लेखन मुद्देसूद असते. आपले मुद्दे पटवून देण्यासाठी उदाहरणे दिली जातात. दृष्टांत सांगितले जातात. त्यामुळे वैचारिक लेखनात एक रंजकता व वाचनीयता येते. उदाहरण/ दृष्टांतांच्या मुळाशी विचारसूत्र असते. तात्त्विक चर्चेला वा चिकित्सेला उदाहरण - दृष्टांताची जोड मिळाली की, विचारसूत्र वाचकावर पक्केपणे ठसते.

वैचारिक साहित्याला जाणूनबुजून रूक्ष, बोजड, क्लिष्ट, कंटाळवाणे करण्याची गरज नसते. तसेच हेतुपुरस्सर सजवण्याचीही आवश्यकता नसते. विषयाच्या, आशयाच्या प्रकृतीनुसार शब्दशरीर धारण करून ते नैसर्गिकपणे आविष्कृत होत असते. वैचारिक साहित्यामध्ये आशय व त्याचे प्रभावी आविष्करण महत्त्वाचे असते. म्हणजे आशयाइतकीच लेखनशैलीही महत्त्वाची असते. लेखकाच्या शैलीचा वाचकांवर प्रभाव पडत असतो. मराठीतील काही शैलीदार लेखकांनी वाचकांवर गारूड केलेले आढळते ते यामुळेच!

वैचारिक वाङ्मयामध्ये निष्पक्षपातीपणा, तटस्थपणा अत्यंत महत्त्वाचा असतो. एखाद्या विषयाची एकांगी मांडणी करीत दुसऱ्या बाजूंकडे दुर्लक्ष करणे वैचारिक वाङ्मयात अपेक्षित नसते. पक्षपातीपणा, एकांगीपणा, पूर्वग्रह, आवेश- अभिनिवेश कटाक्षाने टाळून समतोल, विवेकी विवेचन- विश्लेषण करणे अपेक्षित असते. म्हणजे लेखकाने नीरक्षीरविवेकबुद्धीने, न्यायाधीशाच्या भूमिकेतून सदसद्‌विवेकबुद्धी व अभ्यास यांना प्रमाण मानून विचार प्रकटीकरण केले पाहिजे. विषयाच्या सर्व पैलूंचे तटस्थपणे आकलन करून चिकित्सक मांडणी केली पाहिजे. याचा अर्थ लेखकाने विषयापासून स्वतःला पूर्णपणे अलिप्त करणे असा नाही. लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन, भाषाशैली वगैरेंचा प्रभाव त्याच्या लेखनात पडणे स्वाभाविक असते. परंतु त्याने वैचारिक लेखन प्रभावित होणार नाही, याचे भान लेखकाने बाळगले पाहिजे. म्हणजेच विचार आणि भावना, मेंदू आणि मन, बुद्धी आणि अंतःकरण यांच्या उचित संयोगातून वैचारिक साहित्य निर्माण होत असते, असे म्हणता येते.

वैचारिक लेखनाची एक शिस्तबद्ध पद्धत असते. वैचारिक लेखनाचा प्रारंभ आकर्षक, वेधक असावा. विषयविवेचन मुद्देसूद असावे. मुद्यांच्या मांडणीचा एक विशिष्ट सुसंगतवार क्रम असावा. विचारविकासाचा चढता क्रम असावा. विचारांची वा मुद्द्यांची सर्वांगाने, साकल्याने मांडणी करावी. एखादा विचार अर्धवट सोडून दुसरा मांडण्याचा प्रयत्न केल्यास त्यात विस्कळीतपणा येतो. वैचारिक लेखन वर्णनात्मकतेपेक्षा विश्लेषणात्मक, संशोधनात्मक, मूल्यमापनात्मक असावे. तर्कशुद्ध युक्तिवाद, खंडनमंडन, संदर्भ, आधार, अवतरणे वगैरेंचा वापर करावा. परिणामकारक शेवट असावा. वैचारिक साहित्याची भाषा प्रौढ, समतोल, विश्लेषक स्वरूपाची असावी. आणि स्पष्ट अर्थ व्यक्त करणारी असावी. शब्दांमध्ये, विधानांमध्ये संदिग्धता नसावी. नेमकी दिशा स्पष्ट करणारे लेखन असावे.

वैचारिक साहित्यामध्ये प्रश्नांची उकल केलेली असते. लेखक विवक्षित विषयाच्या अनुरोधाने प्रश्न उपस्थित करतो. त्यांची उकल करण्याचा प्रयत्न करतो. त्यातून विशिष्ट निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो. वैचारिक लेखनाचा समारोप निष्कर्ष, उत्तर या स्वरूपात होणे अपेक्षित असते.

तार्किकता हे चांगल्या वैचारिक साहित्याचे महत्त्वाचे लक्षण आहे. मनुष्य हा स्वाभाविकपणे विचार करीत असतो. तर्कामुळे नैसर्गिक विचारप्रक्रियेला शास्त्रीय दृष्टी प्राप्त होते. विचारांमधील तर्कदोष हेरण्याची दृष्टी येते. कार्यकारणभावात्मक दृष्टिकोन प्राप्त होतो. वैचारिक साहित्याने विचारमंथनाला गती येते. विचारांमध्ये सुस्पष्टता येते. वैचारिक लेखनात विचारांची तर्कशुद्ध मांडणी केलेली असते. इतरांच्या वैचारिक भूमिकेची चिकित्सा करणे हा देखील वैचारिक लेखनाचा एक प्रकार असतो. वैचारिक मंथन करताना आपण सहिष्णुतेने इतरांचे विचार समजावून घेत असतो. मान्य असतील ते स्वीकारतो व अमान्य असल्यास वैचारिक पातळीवर नकार दर्शवितो. इतरांच्या विचारांचे आकलन, व्यवस्थापन व मूल्यनिर्णयन करणे ही वैचारिक लेखनाची ज्ञानप्रक्रियेला चालना देणारी एक बाब असते.

वैचारिक साहित्य तसे कालानुवर्ती असते. तत्कालीन वातावरणातून उत्पन्न झालेल्या समाजवास्तवाशी, प्रश्नांशी, स्थित्यंतरांशी ते निगडित असते. त्यामुळे त्या त्या वेळी ते महत्त्वाचे ठरते, प्रभावी ठरते. परिस्थिती बदलली की, ते अनेकदा इतिहासजमा होते. असे असले तरी ऐतिहासिक दस्तावेज म्हणून ते अभ्यासनीय ठरते. अनेकदा समकालीन वास्तवाची पाळेमुळे भूतकाळात असतात व त्यांचा भविष्यकाळाशीही अनुबंध असतो. त्या दृष्टीने प्रत्येक कालखंडातील वैचारिक साहित्याचा काही भाग स्थळकाळाच्या मर्यादा ओलांडून चिरंतन महत्त्वाचा ठरत असतो. समाजाला पचनी पडलेले विचार लोकमानसाला शक्य तितके विधायक वळण लावून प्रत्यक्ष जीवनव्यवहारात रुजले जातात आणि समाजगतीशी सुसंवादी राहून भविष्यकाळाचा वेध घेऊ पाहणाऱ्या विचारकंदांना नवे धुमारे फुटून ते समाजातील निद्रिस्त वा स्थितिशील घटकांना जागृत वा चैतन्यशाली करतात. विचाराची ही प्रक्रिया समाजात सतत चालू असते. म्हणून प्रत्येक काळातील नवे वर्ग, नव्या चळवळी, नव्या संस्था यांना वैचारिक साहित्य प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मार्गदर्शक ठरत असते. कोणतेही मूल्यगर्भ वैचारिक साहित्य हे कायम समकालीन असते.

आवाहकता हे वैचारिक साहित्याचे एक वैशिष्ट्य असते. लेखक आपल्या लेखनातून कोणत्या ना कोणत्या समाजगटांना, जनसमूहांना आवाहन करीत असतो. या आवाहकतेचे स्वरूप दोन पातळ्यांवर असते. एका वेळी तो विशिष्ट जनसमूहाला आवाहन करीत असतो. त्याच वेळी दुसऱ्या बाजूने त्याच्या विचारांना वैश्विक, कालातीत मूल्य प्राप्त होत असते. उदाहरणार्थ, म. जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विशिष्ट जनसमूहांना सुधारणेसाठी आवाहन केले, विचार प्रकटीकरण केले. त्याच वेळी त्यांच्या मांडणीतील व्यापकतेमुळे, मूल्यात्मकतेमुळे त्यांच्या विचारांना वैश्विकतेचे परिमाणही प्राप्त झाले. अशा प्रकारे वैचारिक साहित्य हे एकाच वेळी समाजाबरोबर समष्टीसही आवाहन करीत असते. श्रेष्ठ वैचारिक साहित्य स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून कोणत्याही काळात समकालीन ठरते. मानवजातीला शाश्वत, चिरंतन विचारप्रकाश देत राहते.

### २.२.२ वैचारिक लेखनाची पद्धत

ज्येष्ठ विचारवंत, प्राच्यविद्यापंडित व साहित्यिक डॉ. आ. ह. साळुंखे यांचे वैचारिक लेखन कसे करावे, या संदर्भातील एक महत्त्वपूर्ण टिपण पुढे देत आहोत –

**वैचारिक लेखनाविषयी...**

मी स्वतः गेली अनेक वर्षे लेखन करीत आलो आहे. माझ्या या लेखनाचं स्वरूप प्रामुख्यानं वैचारिक, चिकित्सक असं राहिलं आहे. त्यामुळंच अशा प्रकारचं लेखन करू इच्छिणाऱ्या तरुण मित्रांशी अशा लेखनाच्या संदर्भात काही हितगूज करावं, असं बऱ्याच दिवसांपासून मला वाटत आलं आहे. ज्यांना दूरगामी प्रभाव निर्माण करण्यासाठी गांभीर्यानं काही लिहायचं आहे, समाजापुढं मांडायचं आहे, त्यांच्याशी हे हितगूज आहे. ही मांडणी वैचारिक लेखनाच्या संदर्भात आहे, ललित लेखनाच्या संदर्भात नव्हे, हे पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो.

**लेखन साधार असावं**

आपलं लेखन साधार असावं. व्यासंग न करता, स्वैर कल्पनेतून निर्माण केलेलं आणि जाणीवपूर्वक वा अजाणता खोटेपणानं लिहिलेलं, अपुऱ्या माहितीवर आधारित लेखन व्यापक हिताचं असत नाही. पूर्वग्रह, क्रोध, मत्सर वगैरेंसारख्या मनोविकारानं वा अशाच एखाद्या कारणानं असंतुलित बनलेलं लेखन आपली गुणवत्ता डागाळून टाकतं. आधाराच्या बाबतीत आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे. दुसऱ्या कुणाच्या संशोधनाचा आधार घेतला असल्यास त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावा. ते संशोधन आपणच केलं असल्याचा आभास निर्माण करू नये. ज्याचं श्रेय त्याला दिल्यामुळं वाचकांचा आपल्याविषयीचा आदर कमी होत नाही, उलट वाढतोच.

**स्वतःच्या भूमिकेचं सुस्पष्ट आकलन**

वैचारिक लेखनामध्ये अनेकदा आपल्याला स्वतःच्या भूमिकेचं समर्थन करावं लागतं. या समर्थनाची मांडणी करण्यासाठी एक प्राथमिक तयारी करणं, काळजी घेणं आवश्यक असतं. आपल्या भूमिकेचं स्वरूप स्वतःच्या मनात सुस्पष्ट असणं, ही ती प्राथमिक गोष्ट होय. आपणच आपल्या भूमिकेचं, विचारसरणीचं, सिद्धांताचं स्वरूप नेमकेपणानं निश्चित केलेलं नसेल आणि अर्धवट, कच्च्या स्थितीत आपली भूमिका लोकांपुढं ठेवण्याचा प्रयत्न करीत असू, तर आपल्या मांडणीत यथोचित आत्मविश्वासही येत नाही आणि तिचा योग्य तो प्रभावही निर्माण होऊ शकत नाही. स्वतः आपणच ठाम नसू, दिशाहीन असू, तर इतरांना योग्य दिशा दाखवण्याचा प्रयत्न यशस्वी होऊ शकत नाही. स्वतः आपल्याच मनात गोंधळ असेल, तर आपल्या लेखनानं वाचकांच्या मनातही संभ्रम निर्माण होणार, हे अगदी उघड आहे. शिवाय, आपल्या मनात आपली भूमिका स्वच्छ आणि स्पष्ट असेल, तर आपली भूमिका आपोआपच सुसंगत राहते. अन्यथा आपल्या लेखनात आत्मविसंगती, विस्कळीतपणा असे दोष शिरू शकतात.

**इतरांच्या भूमिकांचंही नीट आकलन**

जे आपल्या स्वतःच्या भूमिकेला लागू पडतं, तेच ज्याचं खंडन करायचं आहे, त्याच्या भूमिकेलाही लागू पडतं. आपल्याला जी विचारसरणी खोडून काढायची आहे, नाकारायची आहे, ती देखील नीट समजून घेणं अगत्याचं असतं. ती पूर्णपणे समजावून न घेता तिच्यावर मोघमपणानं मोठ्या आवेशात कितीही जोरदार आघात केले, तरी ते फसण्याचा वा प्रसंगी आपल्यावरच उलटण्याचा धोका असतो. त्याबरोबरच, ज्यांच्या भूमिका आपल्या मांडणीला पोषक असतात, त्यांची मतंही नीट रीतीनं समजून घेणं आवश्यक असतं. असं केल्यामुळं आपल्या भूमिकेला पोषक ठरेल अशा रीतीनं आपण त्या मतांचा आधार घेऊन आपली भूमिका अधिक बळकट करू शकतो.

**इतरांची मतं विकृत करू नयेत**

आपण जेव्हा विरोधकांची मतं खंडनासाठी किंवा आपल्या भूमिकेला पोषक म्हणून उद्धृत करतो, तेव्हा त्यांची ती मतं विकृत न करता चर्चेला घ्यावीत. आपल्याला सोयीचं ठरावं म्हणून त्यांच्या मतांमध्ये बदल करायचे आणि आपली भूमिका मजबूत असल्याचा आभास निर्माण करायचा, ही वाचकांची दिशाभूल होय. असं करण्यामुळं दुहेरी दोष येतो. एक तर इतरांची भूमिका विकृत केल्यामुळं आपल्या पदरात खोटेपणा पडतो; दुसरी गोष्ट म्हणजे अशा खोटेपणामुळं आपली भूमिका बळकट झाल्याचा तात्पुरता आभास निर्माण झाला, तरी ज्या वेळी आपला हा खोटेपणा पुढच्या काळात कोणाकडून तरी स्पष्ट केला जातो, त्या वेळी आपल्यावरच तोंडघशी पडण्याची वेळ येते. याचा अर्थ इतरांची भूमिका विकृत केल्यामुळं तात्पुरतं यश मिळालं, तरी कायमचा डाग लागतो.

**लेखनाची विश्वसनीयता जपावी**

इतरांची मतंदेखील वस्तुनिष्ठ स्वरूपात मांडून त्यांचं खंडन वा समर्थन केलं असता, आपल्या लेखनाची विश्वसनीयता वाढते. ही विश्वसनीयता निर्माण करणं, वाढवणं, जपणं, टिकवणं यामुळंच आपल्या लेखनाचं उद्दिष्ट सफल होऊ शकतं, आपल्या लेखनाचा प्रभाव दूरगामी आणि चिरस्थायी होऊ शकतो.

**मुद्दे मांडताना विषयाचे जास्तीत जास्त पैलू ध्यानात घ्यावेत**

आपल्या विषयाची मुद्देसूद मांडणी करताना प्रस्तुत विषयाचा अभ्यास कोणकोणत्या अंगांनी करणं शक्य आहे, त्याचा सर्वांगीण विचार करावा. तसं केलं असता त्या विषयाला खराखुरा न्याय दिल्यासारखं होतं. अर्थात, प्रत्येक विषयाचं स्वरूप वेगळं असतं आणि त्यानुसार त्याचे पैलूही वेगवेगळे असतात. आपण हाती घेतलेल्या विषयाचे योग्य ते पैलू निवडून त्यांचं क्रमशः विवेचन करावं. दिशा दाखविण्यासाठी इथं काही पैलूंची नोंद करतो. विषयाची व्याख्या, त्याचं अधिक विस्तृत स्वरूप, नावाची व्युत्पत्ती वगैरे दाखवणारी भाषाशास्त्रीय ओळख, स्थळ, काळ, इतिहास, प्रभाव, जमेच्या बाजू वा फायदे, उण्या बाजू वा दोष, मानसशास्त्र-समाजशास्त्र-अर्थशास्त्र इत्यादी शास्त्रांच्या आधारे मूल्यमापन, वैज्ञानिक सत्य, लोककथा-दंतकथा पुराणकथा इ.मधून घडणारं दर्शन, इतर वस्तूंबरोबरचे वा व्यक्तींबरोबरचे संबंध, गौरव, स्वागत,

विरोध, आक्षेप, एकूण योगदान, भविष्यकाळात होणारे परिणाम असे असंख्य पैलू असतात. अशा पैलूंमधून योग्य ते पैलू निवडून त्यांची योग्य क्रमानं मांडणी करावी.

**मुद्दे जिन्याच्या पायऱ्या चढल्याप्रमाणं यावेत**

वैचारिक लेखनामध्ये विशिष्ट प्रकारची शिस्त असणं, हे आपली भूमिका लोकांपर्यंत नीट पोचविण्यासाठी अत्यंत आवश्यक असतं. आपण जेव्हा एखादा जिना चढतो वा उतरतो, तेव्हा जिन्याच्या पायऱ्यांवर आपली पावलं योग्य क्रमानंच टाकतो. पहिलं पाऊल पहिल्या पायरीवर, दुसरं पाऊल सातव्या पायरीवर आणि तिसरं पाऊल दुसऱ्या पायरीवर, असं आपण करीत नाही. तसं करण्याचा प्रयत्न केला, तर आपलं चढणं वा उतरणं नीट होण्याऐवजी आपण घसरून पडण्याचा धोका असतो. लेखनाच्या बाबतीतही नेमकं असंच असतं, हे विसरू नये. जिना चढताना ज्याप्रमाणं आपण पहिल्या पायरीनंतर दुसरी, दुसरीनंतर तिसरी हा क्रम सांभाळतो, तसाच क्रम आपल्या मांडणीच्या मुद्द्यांचाही असावा. त्यासाठी प्रारंभापासून शेवटपर्यंत मुद्द्यांची क्रमशः व्यवस्थित मांडणी करावी. मुद्दे कोणत्या क्रमानं मांडायचे, त्याचं एक नेटकं नियोजन मनामध्ये आधीच करावं. आवश्यक वाटल्यास मांडणीनंतरही क्रम बदलावा. अशी क्रमशः मुद्देसूद मांडणी केली असता वाचक न अडखळता आपल्या विचारांच्या प्रवाहाबरोबर पुढं पुढं जातो आणि आपला वैचारिक सहप्रवासी बनू शकतो. जे मुद्द्यांच्या बाबतीत, तेच एका पाठोपाठ येणाऱ्या वाक्यांच्या बाबतीतही, हे उघडच आहे. या मुद्द्यांची मांडणी करताना क्रमाबरोबरच आणखी एक काळजी घ्यावी. एका मुद्द्याचे सर्व पैलू मांडून झाल्यावरच दुसऱ्या मुद्द्याकडं वळावं. एकदा दुसऱ्या मुद्द्याकडं वळलं, की मग मात्र त्याच्या पैलूवरच लक्ष केंद्रित करावं. पहिल्या मुद्द्याचा एखादा पैलू मधेच आठवला, म्हणून तो दुसऱ्या मुद्द्यात घुसडू नये. तसेच, पहिल्या मुद्द्यात मांडून झालेल्या पैलूंची दुसऱ्या मुद्द्याच्या चर्चेत अत्यावश्यक असल्याशिवाय पुनरुक्तीही करू नये.

**लेखनास सुरुवात करताना क्रमाची भीती बाळगू नये**

आपण वाचकांपुढं जे लेखन ठेवतो, त्यामध्ये मुद्दे क्रमानं आलेले असावेत, हे केवळ योग्यच नव्हे, तर आवश्यकही असतं. पण याचा अर्थ आपण ते लेखन करतो, तेव्हा ते मुद्दे त्या क्रमानंच लिहिले पाहिजेत, असं मात्र मुळीच नाही. काही जणांना, काही वेळेला पुढचे मुद्दे आधी सुचलेले असतात. ते नीट मांडण्याइतकी त्यांची तयारीही झालेली असते. पण लेखनाचा प्रारंभ कसा करावा, हे सुचत नसल्यामुळे त्यांचं सगळं लेखन खोळंबून राहतं, त्यांचा आत्मविश्वास ढासळतो, किंबहुना तो निर्माणच होत नाही आणि सारं लेखनच बाजूला सारण्याच्या मनःस्थितीमुळं ते निष्क्रिय होतात. खूप जणांचं लेखन अशा रीतीनं मनातल्या मनात विरून जातं. खरं म्हणजे या प्रकारच्या सापळ्यात आपण अजिबात अडकू नये. जो मुद्दा व्यवस्थित मांडता येत असेल, तो आधी लिहून काढावा. कदाचित तो सगळ्यांत शेवटचा मुद्दाही असू शकेल. एवढंच नव्हे, तर आपल्या संपूर्ण लेखनातील शेवटचं वाक्य सगळ्यांत आधी सुचलं, तर तेही आधी लिहून ठेवताना बिचकण्याचं कारण नाही. तसेच, शब्द– शब्द वेचून घ्यावा. गरज पडल्यास पुनर्विचार करून बदलावा. लिहून झाल्यानंतही पुनर्वाचन करताना शब्द वा वाक्य यांची गरजेनुसार भर घालावी वा त्यांना

गाळावं. हळूहळू त्यांचा क्रमही सुचत जाईल. अखेरीस क्रम निश्चित करावा. आवश्यकतेनुसार मुद्द्यांच्या जागा बदलाव्या. ते मुद्दे एकमेकांशी जोडून घेताना त्यांच्या मांडणीत तुटकपणा न राहता सलगपणा यावा म्हणून एका मुद्द्याचा शेवट व दुसऱ्या मुद्द्याचा प्रारंभ यांच्यात योग्य ते बदल करावेत, म्हणजे मुद्दे एका सूत्रात छान गुंफले जातील. अशा रीतीनं लेखनाला अंतिम रूप द्यावं.

**विषयांतर टाळावं**

आपली मांडणी करीत असताना आपण जी विधानं करतो, जी वर्णनं करतो, त्यांचा आपल्या मूळ विषयाशी संबंध आहे की नाही, याकडं बारकाईनं लक्ष द्यावं. शैलीसाठी आणि प्रभाव निर्माण करण्यासाठी क्वचित प्रसंगी थोडंबहुत इकडं-तिकडं सरकणं वेगळं आणि मूळ विषयाशी काहीही देणंघेणं नसलेल्या असंबद्ध गोष्टी मांडत जाणं वेगळं. तसं करणं म्हणजे स्वतःहून आपल्या मांडणीला विस्कळीत करून तिचा प्रभाव नाहीसा करणं होय. विशेषतः, पाल्हाळीक विषयांतर हे तर आपल्या मांडणीच्या दृष्टीनं अत्यंत हानिकारक होय. चालू असलेला मुद्दा सोडून विनाकारण भलत्याच विषयात घुसणं हे रेल्वेच्या इंजिनानं रूळ सोडून घसरण्यासारखं असतं. वैचारिक अपघात घडवणारं असतं, असं म्हटलं तरी चालेल. विषयाचं चिंतन केलं नसलं, तो नीट समजून घेण्याचा प्रयत्न केला नसला आणि विषयाशी संबंधित मुद्द्यांवर मन एकाग्र केलेलं नसलं, की आपली मांडणी वाटेल तशी भरकटत जाऊन भोंगळ बनते. थोडासा प्रयत्न केला, की हा प्रकार सहजपणे टाळता येतो.

**निष्कर्ष वाजवी असावेत**

आपल्या लेखनात आपण वेगवेगळ्या घटनांचं, सिद्धांतांचं, वक्तव्यांचं, भूमिकांचं मूल्यमापन करीत असतो. हे मूल्यमापन करीत असताना आपण आपल्याला उपलब्ध असलेल्या तपशिलांवरून जे निष्कर्ष काढतो, ते माफक, प्रमाणशीर आणि संतुलित असावेत. ते गैरवाजवी असू नयेत. एखाद्या व्यक्तीचं अपघातात एक हाड मोडलं असलं, तर त्याचं एक हाड मोडलं आहे, असंच तज्ज्ञ आणि सत्यवक्ता डॉक्टर सांगतो. त्याचं एकही हाड मोडलेलं नाही, असंही तो सांगत नाही आणि त्याच्या सगळ्या हाडांचा चुराडा झाला आहे, असंही सांगत नाही. निष्कर्ष काढण्याची आपली पद्धत या डॉक्टरच्या पद्धतीसारखी असावी. प्रत्यक्षात आपण अनेकदा आपल्या बाजूचं महत्त्व वाढविण्यासाठी आणि दुसऱ्या कुणाचं योग्य श्रेय नाकारण्यासाठी भलते-सलते निष्कर्ष काढतो. अशा सवयीपासून आपण कटाक्षानं दूर राहावं. ज्याचे जेवढे दोष असतील, तेवढे त्याच्या पदरात जरूर टाकावेत. पण त्याला त्यापेक्षा जास्त दोष चिकटवू नयेत. काकडी चोरणाऱ्याला फाशी देत नाहीत, असं म्हणतात. याचा अर्थ विशिष्ट भूमिकेमध्ये ज्या प्रमाणात त्रुटी वा उणिवा असतील, त्या प्रमाणातच तिला दोष दिला जावा, अधिक दिला जाऊ नये. त्याबरोबरच तिच्यातील दोषांकडं डोळेझाक करण्याचा प्रयत्नही करू नये. दुसऱ्या बाजूनं विशिष्ट भूमिकेत ज्या प्रमाणात गुण दिसत असतील, त्या प्रमाणात त्या भूमिकेला श्रेय देण्याचा बाबतीत खळखळ, टाळाटाळ वा हयगयही करू नये.

**टोकाची विधानं टाळावीत**

ललित साहित्यामध्ये अतिशयोक्ती हा एक वाङ्मयीन अलंकार मानला जातो. परंतु वैचारिक लेखनामध्ये मात्र तो मोठा दोष ठरण्याची शक्यता असते. त्यामुळंच, कोणताही विचार मांडताना टोकाची विधानं टाळावीत. अनेक वक्ते बोलताना लोकांची मनं झपाटून टाकण्यासाठी अशी टोकाची विधानं करतात. बोलण्याच्या ओघात केली जाणारी अशा प्रकारची विधानं काही वेळा क्षम्य मानली, तरी लेखनामध्ये अशा प्रकारची टोकाची विधानं शक्यतो टाळावीत. कोणत्याही गटातील, स्तरातील, जातिधर्मातील व्यक्तींविषयी सरसकट विधानं करण्याचं टाळलं असता आपण त्या संदर्भातील अपवादांचं भान ठेवत आहोत, दुसरी बाजू ध्यानात घेत आहोत, हे स्पष्ट होतं. अर्थात, आपण ज्यांच्याविषयी विधान करीत आहोत त्या सर्वांना ते निःसंशय लागू पडतं, असा खात्रीलायक तपशील आपल्याकडं उपलब्ध असेल, तर 'सर्व' या अर्थाची शब्दयोजना जरूर करावी. पण सामान्यतः असे प्रसंग कमी असतात, हेही विसरू नये. आपल्याला जेव्हा एखाद्या गोष्टीविषयी खात्रीलायक माहिती मिळालेली नसते, परंतु तसं असण्याची शक्यता मात्र वाटत असते, तेव्हा त्या बाबतीत एखादं ठाम विधान करण्याऐवजी 'असं असण्याचा संभव आहे' अशा अर्थाचं विधान करणं, हे अधिक वास्तववादी ठरतं.

**संभाव्य आक्षेपांची आधीच दखल घ्यावी**

आपण आपलं एखादं मत मांडत असतो. आपण त्या मतावर कितीही ठाम असलो, तरी इतर लोकांना ते पटेलच अशी स्थिती नसते. आपलं मत वाचणारांच्या मनात काही शंका निर्माण होऊ शकतात. प्रश्न उपस्थित होऊ शकतात. त्याच्यावर आक्षेप घेतले जाऊ शकतात. त्याच्यामधले कच्चे दुवे दाखवले जाऊ शकतात. असं झालं असता, आपलं मत नाकारलं जाण्याची वा अडगळीत फेकलं जाण्याची शक्यता असते. असं होऊ नये म्हणून, आपलं मत पहिल्यांदा मांडत असतानाच खुंटा हलवून बळकट करण्याची पद्धत स्वीकारली, तर आपली मांडणी आधीपासूनच मजबूत बनते. आपलं लेखन समाजापुढं ठेवण्यापूर्वी थोडं थांबून, त्याच्यापासून काहीसं अलिप्त होऊन, एक प्रकारच्या तटस्थपणानं त्याच्याकडं निरखून पाहावं. आपल्या मांडणीत कुठं कच्चे दुवे आढळत असतील, तर ते आधीच दूर करावेत. कोणत्या विधानावर शंका घेतल्या जातील, भूमिकेच्या कोणत्या पैलूवर आक्षेप घेतले जातील, त्याचा अगोदरच अंदाज घेऊन त्या संभाव्य शंका वा आक्षेप स्वतःच उपस्थित करून त्यांची उत्तरं आधीच देऊन ठेवली, तर आपल्या लेखनाचा पक्केपणा वाढतो. तात्पर्य, आपण आपल्या लेखनात वैचारिक छिद्रं राहू नयेत म्हणून जास्तीत जास्त काळजी घ्यावी. आपण एवढं सगळं केल्यानंतरही कोणी आपल्या भूमिका विकृत करण्याचा वा तिच्याविषयी अपप्रचार करण्याचा प्रयत्न केला, तरी त्या सर्व प्रकारांतून आपलं लेखन उजळूनच निघतं. त्याच्यावर कोणतेही बरेवाईट आघात झाले, तरी ते कोलमडून पडत नाही.

**मुद्द्यांवर ठाम राहावं– मग आक्रस्ताळेपणाची गरज पडत नाही**

आपली मांडणी करीत असताना अशा रीतीनं आपण योग्य काळजी घेत गेलो, तर आपल्या मांडणीच्या बाबतीत आपला आत्मविश्वास अगदी शिगेला पोचू शकतो. मग आपण आपल्या मुद्द्यांवर अगदी ठाम राहू

शकतो. आपले विचार लोकांपर्यंत प्रभावी रीतीनं पोचवायचे असतील, तर ते विचार कसदार असणं, साधार असणं, हे खूप महत्त्वाचं असतं. विचार तसे असल्यास आपली मांडणी शब्दबंबाळ, वाचाळ, आक्रस्ताळी वा शिवराळ करण्याची गरज पडत नाही. तशा प्रकारची मांडणी हा काही कसदार मांडणीचा पर्याय होऊ शकत नाही.

**जे सांगायचं, तेच शब्दबद्ध झाल्याची खातरजमा करावी**

कोणत्याही लेखनाचे दोन प्रमुख घटक असतात. आपल्या मनातील विचार हा एक घटक आणि ते विचार शब्दबद्ध करणं हा दुसरा घटक. विचार सुस्पष्ट असायला हवेत, हे तर खरंच. पण ते शब्दबद्ध करण्याची कृती त्या विचारांशी जास्तीत जास्त सुसंगत असणं, हेही अत्यंत महत्त्वाचं असतं. मनात वेगळंच होतं आणि शब्दांतून भलतंच व्यक्त झालं, तर लेखन निष्फळच म्हणायला हवं. किंबहुना, त्यामुळं आपल्या भूमिकेविषयी गैरसमज निर्माण होण्याचा धोका असतो. या बाबतीत मनातील विचार पूर्णांशानं प्रकट न होणं, असा प्रकारही घडू शकतो, वा आपल्याला अभिप्रेत नसलेले विपर्यस्त विचार आपल्या मांडणीतून सूचित होणं, असा प्रकारही होऊ शकतो. त्यामुळं कित्येकदा 'मला असं म्हणायचं नव्हतं', असं म्हणण्याची पाळी येते. हे टाळण्यासाठी, आपल्याला जे सांगायचं आहे तेच नेमकेपणानं आपल्या शब्दांतून व्यक्त होत असल्याची खातरजमा करावी.

**प्रत्येक प्रतिभावंताची शैली स्वतंत्र असते**

आतापर्यंतच्या सूचना ढोबळमानानं दिलेल्या आहेत. या सूचना प्रतिभावंतांच्या शैलीला बंदिस्त करणारी चाकोरी ठरता कामा नयेत. वैचारिक लेखन रूक्ष असावं, असाही या विवेचनाचा अर्थ नाही. आपल्या लेखनात औचित्यपूर्ण लालित्य जरूर असावं. त्याबरोबरच, प्रसंगानुसार वक्रोक्ती, उपरोध, उपमा, दृष्टांत, विनोद, नाट्यमयता इत्यादींचा वापरही जरूर करावा. त्यामुळं मूळ विषयाला, सत्याला, अभिरुचीला आणि मांडणीच्या बांधेसूदपणाला बाधा येणार नाही, याची दक्षता मात्र घ्यावी.

वस्तुतः खरे प्रतिभावंत कोणत्याही तंत्रात न अडकता स्वतःची स्वतंत्र शैली विकसित करतात. किंबहुना, बहुतेक वेळा आधीची चाकोरी मोडल्यानंतरच काहीतरी देखणी नवनिर्मिती होत असते. चाकोरी निर्माण करणाऱ्या तंत्रापेक्षा प्रतिभा फार फार महान असते. अर्थात, अशा प्रतिभावंतालाही काही शिस्त, निदान स्वयंशिस्त पाळण्याची आवश्यकता असतेच. तात्पर्य, प्रतिभेचं ताजेपण आणि स्वातंत्र्य जपताना तिला विधायक नियमबद्धतेचं एक कोंदणही असावं! प्रतिभावंत कोणतीच शिस्त पाळत नसेल, तर त्याची महान प्रतिभादेखील वाया जाण्याचा आणि त्याच्या असाधारण अंतःशक्तीदेखील अत्युच्च शिखरापर्यंत पोचण्याऐवजी खुज्या-खुरट्या राहण्याचा धोका असतो. महान प्रतिभावंताचीही गत जर अशी होऊ शकते, तर मोठी प्रतिभा नसलेली सर्वसामान्य व्यक्ती जेव्हा स्वतःला प्रकट करू पाहते, तेव्हा तिनं स्वतःच्या आविष्काराला काही शिस्त लावून घेतली पाहिजे, हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. शिस्तीच्या करडेपणानं प्रतिभेची उत्स्फूर्तता आणि उत्कटता यांना बाधा येऊ नये, तिचा जोश आणि जिवंतपणा क्षीण होऊ नये, इतकंच!

**(साळुंखे आ. ह. : मित्रांना शत्रू करू नका!, लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमआवृत्ती, सप्टेंबर २००८)**

डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या वरील विवेचनामध्ये वैचारिक लेखनाचे स्वरूप, वैचारिक लेखनाची पद्धती, मांडणी, भाषा, शैली, लेखन करताना घ्यावयाची दक्षता वगैरेंसंदर्भात मौलिक माहिती मिळते. वैचारिक लेखनाची एक शिस्तबद्ध पद्धत अवगत होते. या पद्धतीने लेखनाचा सराव केल्यास आपणही चांगले लेखन करू शकतो.

### २.२.३ वैचारिक लेखनाचे प्रकार

ग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालिके, शास्त्रीय चिकित्सा, वाङ्मयीन व कलाविषयक समीक्षा, संशोधन, पाहणी अहवाल इत्यादी क्षेत्रांमध्ये वैचारिक लेखन केले जाते. तसे पाहिले तर कोणत्याही विषयावर वैचारिक लेखन केले जाते. समाज, संस्था, तत्त्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, वाङ्मय, काव्य, संपर्कमाध्यमे, अध्यात्म आदी क्षेत्रांमध्ये वैचारिक लेखन होत असते. सामान्यतः वृत्तपत्रे, नियतकालिके, तात्त्विक ग्रंथ, समीक्षा, कला, मूल्यमापन, इतिहाससमीमांसा, संशोधन, सौंदर्यशास्त्र, न्यायव्यवस्था आदी क्षेत्रांत वैचारिक लेखन मोठ्या प्रमाणावर होते. वैचारिक लेखनाचे स्थूलमानाने पुढील ठळक प्रकार पडतात– १. वैचारिक निबंध/ लेख २. वर्तमानपत्रातील अग्रलेख ३. स्तंभलेखन ४. स्फुट लेख ५. संशोधनपर लेख ६. तत्त्वचर्चात्मक लेख इत्यादी.

#### वैचारिक निबंध/ वैचारिक लेख

इंग्रजीतील 'एसे' या शब्दावरून मराठीत 'निबंध' हा शब्द आला. फ्रेंच लेखक माँतेन याने १५८० साली आपले काही स्फुटात्मक आत्मपर लेखन 'Essais' या नावाने प्रसिद्ध केले. आणि या लेखनाच्या प्रभावानेच इंग्लंडमध्ये 'एसे'चा जन्म झाला. इंग्रजी 'एसे' या शब्दाचा कोशातील अर्थ 'प्रासंगिक', 'एक तात्पुरता प्रारंभिक प्रयत्न' असा आहे. यावरून त्याच्या मूळ रूपाची जाणीव होते. परंतु या शब्दावरून मराठीत आलेल्या 'निबंध' शब्दाला मात्र त्याउलट म्हणजे तर्क, अनुमान, प्रमाणादींनी ज्याचे निबंधन झाले आहे, असे औपचारिक लेखन, असा अर्थ प्राप्त झाला आहे.

वैचारिक गद्यलेखन हा प्रकार आधुनिक इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने मराठीमध्ये अव्वल आंग्लकाळात हळूहळू रुजत गेला. वैचारिक गद्याला 'वैचारिक साहित्य', 'निबंध' या नावानेही संबोधले जाते. मराठी वैचारिक साहित्याचा जन्म मराठी निबंधामधून झाला आहे. 'निबंध' हा संस्कृत शब्द आहे. 'बंध' धातूस 'नि' हा उपसर्ग लागून (नि+बंध) निबंध हा शब्द तयार झाला आहे. या शब्दाचा अर्थ 'एकत्र मांडणे', 'कुठल्या तरी नियमांनी बद्ध असे विचार' असा होतो. विचार, अनुभूती किंवा कल्पनांची, मुद्द्यांची सुसूत्र बांधणी येथे अभिप्रेत आहे. निबंध या संस्कृत शब्दाचा धात्वर्थ 'गोवलेला विषय' किंवा 'जीत विषय गोवला आहे अशी रचना' असा आहे. 'कोणताही विषय न्याय्य रीतीने उद्घाटणे आणि त्याची यथाशक्ति जुळणी करून जे वर्णन करणे तो निबंध होय.'अशी निबंधाची व्याख्या 'मराठी ज्ञान प्रसारक' या नियतकालिकामध्ये १८६३ साली केलेली आहे. 'मराठी भाषेचा नवा कोश' (१८७०) मध्ये 'काही एका गोष्टीवर बांधल्याप्रमाणे लिहिलेले जे व्याख्यान तो' असे निबंध वाङ्मयप्रकाराचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

मराठी शब्दकोशात 'निबंध म्हणजे प्रबंध, नियमबद्ध असणारा लेख, मोठा लेख, नीटपणे पक्का जोडलेला लेख' असा अर्थ दिलेला आहे. एखाद्या विषयाच्या विविध अंगोपांगांचे मुद्देसूद विश्लेषण करीत, त्यावरील भिन्न भिन्न मतांचे खंडनमंडन करीत त्यातून काही एक निष्कर्ष काढणे याला निबंध असे म्हणतात. तर्कशुद्ध रीतीने केलेले, बुद्धीला आवाहन करणारे, सर्व सिद्धांत साधार व सप्रमाण मांडणारे, व्यासंग, अनुभव व अवलोकन यांच्या पायावर उभारलेले विचारप्रधान लेखन म्हणजे निबंध.

निबंध हा एक प्रमाणशीर, विषयविस्ताराने मर्यादित असा एक गद्यलेखनप्रकार आहे. जेव्हा 'निबंध' हा प्रमाणाबाहेर मोठा होतो, तेव्हा त्यास 'प्रबंध' (Thesis) म्हणतात. निबंधाचेही स्वरूपानुसार दोन प्रकार पडतात. पहिल्या प्रकारातील लेखन औपचारिक स्वरूपाचे, वस्तुनिष्ठ व बौद्धिकतेकडे झुकलेले असते. विद्वत्सभेत वाचले जाणारे शोधनिबंध, अभ्यासलेख तसेच ऐतिहासिक, वैज्ञानिक, चरित्रात्मक, निरुपणात्मक अशा स्वरूपाचे लेख, वृत्तपत्रीय अग्रलेख, ग्रंथपरीक्षणे, वाङ्मयीन चर्चा व अन्य विषयांतील लेख आदींचा यामध्ये समावेश होतो. हे सर्व लेखन तर्क, अनुमान आणि प्रमाण यांनी बांधलेले असते. त्यात वैचारिक शिस्त असते. काळाच्या ओघामध्ये निबंधलेखनामध्येही सतत बदल होत गेले. दुसऱ्या प्रकारामध्ये आत्मनिष्ठ, कल्पनाप्रधान, अनौपचारिक स्वरूपाचे निबंध मोडतात. काही निबंधकारांचे लेखन या दोन्ही वर्गांच्या सीमारेषेवर असते. निबंधलेखकाच्या प्रकृतीवर व त्याच्या शैलीवर निबंधाचे स्वरूप ठरते.

वैचारिक निबंध हा गांभीर्यपूर्वक लिहिलेला असतो. निबंधामध्ये भावनेपेक्षा विचार प्रकटीकरणाला महत्त्व असते. स्वतःचे विचार, दृष्टिकोन, अनुभव, निरीक्षणे, मते यांना निबंधामध्ये महत्त्व असते. विचारांची तर्कशुद्ध मांडणी, चिकित्सा, विश्लेषण, उदाहरणे, दाखले, अवतरणे यांमुळे निबंधामध्ये भारदस्तपणा येतो.

**संपादकीय/ अग्रलेख**

जगातील माणसांनी काय केले (आचार), काय म्हटले (उच्चार) आणि काय ठरविले (विचार) यांच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये येत असतात. त्यांचे विश्लेषण करणारे, त्यांची पार्श्वभूमी सांगणारे, त्यासंबंधी अधिक तपशील पुरवून वाचकांच्या विचारविश्वात भर टाकणारे लेखन संपादकीय पृष्ठांवर येत असते. प्रत्येक वर्तमानपत्रांमध्ये संपादकीय पृष्ठावर (Editorial Page) संपादकाने स्वत:साठी खास जागा राखून ठेवलेली असते. या जागेतून लिहिल्या जाणाऱ्या स्तंभाला संपादकीय लेख किंवा अग्रलेख म्हणतात. या स्तंभातून संपादक वाचकाशी हितगूज करतात. विशिष्ट विषयावरचे वृत्तपत्राचे मत वाचकांसमोर ठेवतात. संपादकीय पृष्ठावर वृत्तलेख, स्तंभलेख, स्फुटे, लेख, वाचकांचा पत्रव्यवहार असे इतरही लेखन असते. बातमीत काय घडले ते येते तर अग्रलेख, वृत्तलेखांमध्ये ते का, कसे घडले याचे विश्लेषण व परिणाम यावर भाष्य येते. 'वृत्त' आणि 'विचार' असे दोन भाग वृत्तपत्रांमध्ये असतात. त्यापैकी वृत्तविभाग बातमीदार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक सांभाळत असतात तर विचारभागाची जबाबदारी संपादक, सहसंपादक किंवा अग्रलेख लेखक, स्तंभलेखक यांचेकडे असते.

अग्रलेख हा वृत्तपत्राचा चेहरा असतो. तो वाचल्याबरोबर वृत्तपत्राचा दर्जा कळतो. समाजमनाची जडणघडण करण्याचे काम अग्रलेख करीत असतात. विषयाप्रमाणे अग्रलेखाचे स्वरूपही बदलत असते.

त्यामुळे अग्रलेखाची नेमकी व्याख्या करणे अवघड आहे. डॉ. एम. लायन स्पेन्सर यांनी अग्रलेखाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, ''एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण घटनेचे किंवा घडामोडीचे महत्त्व सामान्य वाचकालाही स्पष्ट होईल अशाप्रकारे त्या घटनेचे मोजक्या शब्दात, तर्कशुद्ध रीतीने व सहजतेने आनंद देईल व त्या घटनेचे महत्त्व सामान्य वाचकांच्या लक्षात येईल, अशा प्रभावी रीतीने केलेले विश्लेषण किंवा सादर केलेला मजकूर म्हणजे अग्रलेख.'' या व्याख्येतून अग्रलेखाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते.

अग्रलेख लेखनाची एक विशिष्ट पद्धती आहे. अग्रलेखामध्ये तीन भाग असतात. वृत्त, विचार आणि समारोप, पहिल्या भागात ज्या विषयावर अग्रलेख लिहिला जातो ती घटना, बातमी, वृत्त, विषय दिला जातो. त्यामुळे वाचकांना विषयाचा परिचय होतो, सर्वसाधारण स्वरूप समजते. दुसऱ्या भागात त्या विषयाची चिकित्सा, विश्लेषण केलेले असते. आपल्या मताच्या पुष्टिकरणार्थ युक्तिवाद, उदाहरणे, दाखले दिले जातात. आवश्यक तपशील, माहिती दिली जाते. तिसऱ्या भागात संपादक स्वत:चे मत मांडतात. निरीक्षणे नोंदवितात, निष्कर्ष देतात, इशारा देतात. वाचकांपुढे विचारार्थ प्रश्न ठेवतात. आवाहन करतात, आव्हान देतात. कधी कधी निर्णय वाचकांवर सोपवतात वगैरे. अशा पद्धतीने प्रत्येक अग्रलेख असेल असे नाही. प्रत्येक संपादकाचे व्यक्तिमत्त्व स्वयंभू व शैली स्वतंत्र असते. व्यक्तीनुसार लेखनपद्धती बदलू शकते.

शैलीदार अग्रलेखांना वाङ्मयीन मूल्य प्राप्त झालेले आहे. अग्रलेखाची भाषा सोपी, सरळ, सर्वजनसुलभ असते. निश्चित स्वरूपाचा विचार ठोसपणे मांडणारी असते. प्रसंगी वाचकाशी हितगुज करणारी, त्यांच्याशी भावनिक संवाद साधणारी असते. जणू संपादक आपल्याशी बोलत आहेत असा आभास निर्माण करणारी शब्दयोजना व लेखनतंत्र अवलंबलेले असते. जोरकसता, भारदस्तपणा, आवाहनात्मकता, तार्किकता, निर्भीडता, प्रौढता, निष्पक्षता, तटस्थता, विश्लेषणात्मकता, ओघवतेपणा ही अग्रलेखाच्या भाषेची काही वैशिष्ट्ये सांगता येतील. अग्रलेखातील 'आम्ही' हा संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करीत असतो. 'आम्ही' च्या रूपाने समाज बोलत असतो. म्हणजे समाजाचा आवाज समाजाच्या भाषेतून अग्रलेखांमधून व्यक्त होत असतो.

**स्तंभलेखन**

वर्तमानपत्रामध्ये विशिष्ट जागी विशिष्ट मजकूर येतो त्यास 'सदर' म्हणतात. वृत्तपत्रात अनेक सदरे असतात. उदा. वाचकांचा पत्रव्यवहार, महिलाविश्व, बालविश्व, आरोग्य, वृत्तवेध, दैनंदिनी, क्रीडाविश्व वगैरे. या सदरांमध्ये ठरावीक विषयावर वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेले असते.

जेव्हा एकच व्यक्ती वेगवेगळ्या विषयांवर सातत्याने लिहिते तेव्हा त्यास स्तंभलेखन (Column writting) म्हटले जाते. स्तंभलेखन व सदरलेखनामध्ये थोडा फरक आहे. एकाच व्यक्तीने लिहिलेले असते ते स्तंभलेखन. तर एक किंवा अनेक व्यक्तींनी लिहिलेले व विशिष्ट विषयावरील मजकूर ज्यात येतो त्यास स्थूलमानाने सदर असे म्हणता येते.

स्तंभलेखकाची शैली व व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनामुळे स्तंभलेखन रोचक, वाचनीय होते. स्तंभलेखनामधून लेखकाचे व्यक्तिमत्त्व, निरीक्षणशक्ती, जीवनानुभव, जीवनदृष्टी, चिंतन, वैचारिकता प्रकटत असते.

स्तंभलेखक समाजजीवनाशी निगडित विविध विषयावर गुजगोष्टी करतो. टीका- टिप्पणी करतो. स्तंभ लेखकाचा जीवनानुभव समृद्ध असेल तर साध्या विषयातूनही तो जीवनातील एखाद्या शाश्वत सत्याचे दर्शन घडवू शकतो.

स्तंभलेखनाच्या स्वरूपावरून त्याचे काही प्रकार पडतात. बातम्यांवर टीका-टिप्पणी करून स्तंभलेखन करणाऱ्या लेखकास वृत्त- टीकाकार (News Commentator) असे म्हणतात. काहीजण फक्त राजकीय वृत्ताचे विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावतात. त्याच्या मागच्या- पुढच्या संभाव्य घटनांबद्दल लिहितात. त्यांना राजकीय विश्लेषण (Political Analysis) असे संबोधतात. न्यूयॉर्क विद्यापीठातील प्राध्यापक एफ फ्रेझर बाँड यांनी स्तंभलेखनाचे आठ प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे.

१) **नावाने लिहिलेलेले संपादकीय स्तंभ** (Signed Editorial Column)- या प्रकारचे स्तंभलेखन संपादकीयासारखे असते. संपादक सामान्यत: जो विषय अग्रलेखासाठी निवडतो त्या विषयावर स्तंभ लिहिला जातो. फरक इतकाच की स्तंभलेखात लेखकाचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते व तो लेखकाच्या नावाने लिहिला जातो. वृत्तटीकाकार व राजकीय विश्लेषण स्वरूपाचे लेखन या प्रकारात मोडते.

२) **स्फुट विषयांवरील संपादकीय स्तंभ** (Standard Column)- अग्रलेखापेक्षा कमी महत्त्वाच्या विषयावर असे स्तंभ लिहिले जातात. स्फुटाप्रमाणेच ते एका परिच्छेदाचे असतात.

३) **कुजबुज स्तंभ** (Gossip Column)- यामध्ये बड्या लोकांच्या खासगी जीवनाची, भानगडींची चर्चा चविष्टपणे केलेली असते. मोठ्या प्रसिद्ध व्यक्तींच्या खासगी गोष्टी ऐकण्याची जिज्ञासा सामान्य लोकांना असते. त्यामधून एक वेगळीच मजा वाचक अनुभवत असतात. समूहाचे हे मानसशास्त्र जाणून वृत्तपत्रांनी कुजबुज स्तंभाची पद्धत प्रचारात आणली. पाश्चात्त्य देशामध्ये हा प्रकार फार लोकप्रिय आहे. आपल्याकडेही चित्रपट- नाट्यक्षेत्रातील नटनट्या, खेळाडू वगैरेंच्या संबंधी बरेच लिहिले जाते. त्याचा खास वाचक वर्गही आहे.

४) **सदर स्तंभ** (Contributor's Column)- विविध विषयांवरील सदरांमधून वेगवेगळ्या लेखकांचे लेखन प्रसिद्ध केले जाते. एखाद्याचे लेखन वाचकाला आवडले तर ते पुन्हा पुन्हा दिले जाते. अशा स्तंभलेखनातून चांगले लेखक उदयास येऊ शकतात.

५) **निबंध स्तंभ** (Essay Column)- निबंधाच्या पद्धतीने परंतु आत्मनिष्ठ शैलीमधून एकेकाळी इंग्रजीमध्ये स्तंभलेखन केले जाई. मराठीमध्ये लघुनिबंध किंवा गुजगोष्टी या नावाने असे लेखन केले गेले.

६) **विदूषकी स्तंभ** (Hodge – Podge Column)- या स्तंभामध्ये काय असावे याला काही मर्यादा नाही. कोणत्याही विषयावरील, गद्य-पद्य प्रकारातील, कोट्या-विनोदी शैलीतील, मुद्राक्षर रचनेच्या वैविध्यपूर्ण प्रयोगामधील लेखन यात असते. सर्कशीतील विदूषक जसा कोणत्याही विषयावर काहीही बोलतो आणि इतरांप्रमाणे खेळही करतो तसा या स्तंभाचा प्रकार असतो. यास ह्युमर कॉलम (विनोदी स्तंभ) असेही म्हणतात.

७) **काव्य स्तंभ** (Jingle Column)- यात वाचकांना सहजपणे कळेल अशा विषयावर एकेक छोटी कविता लिहिलेली असते.

८) **रहस्य स्तंभ**- या स्तंभामध्ये मोठ्या माणसांच्या गुप्त राजकीय गोष्टींवर लिहिले जाते.

मराठीमध्ये स्तंभलेखनाची परंपरा जुनी व समृद्ध आहे. लोकहितवादी गोपाळ हरि देशमुखांची 'शतपत्रे', विष्णुशास्त्री चिपळूणकरांची 'निबंधमाला', हे स्तंभलेखनच होते. हरिभाऊ आपटे, अ. ब. कोल्हटकर, प्रभाकर पाध्ये, विजय तेंडुलकर, ग. वा. बेहरे, माधव गडकरी, व्यंकटेश माडगूळकर, शं. ना. नवरे, मुकुंद टाकसाळे, अरुण साधू आदी लेखकांचे स्तंभ वाचकप्रिय ठरले आहेत. भारतीय पत्रकारितेत विविध विषयावर स्तंभलेखन करणाऱ्या पत्रकारांची गौरवशाली परंपरा आहे. खुशवंतसिंग, कुलदीप नय्यर, एस. सहाय अशा पत्रकारांनी स्तंभलेखनाला एक दर्जा प्राप्त करून दिला आहे. काही नामवंत पत्रकार पूर्णवेळ स्तंभलेखन करतात तसेच नामवंत खेळाडू, कलावंत, लेखक तसेच सामाजिक कार्यकर्ते, नेते स्वत:च्या नावाने दर आठवड्यास किंवा रोज स्तंभलेखन करताना दिसतात. अशाप्रकारे स्तंभलेखन हा वृत्तपत्रसृष्टीतील एक महत्त्वाचा व लोकप्रिय लेखनप्रकार आहे.

### स्फुटलेख

विशिष्ट विषयावरील समकालीन संदर्भ देत लिहिलेला वर्तमानपत्रातील लेख म्हणजे 'स्फुटलेख' होय. स्फुट लेख हा एखाद्या विषयाच्या विविध पैलूंचे अंशदर्शन घडविणारा असतो किंवा एखाद्या पैलूचे सूक्ष्म दर्शन घडविणारा असतो. स्फुट लेखनाला शब्दमर्यादेचे बंधन असते. त्यामुळे विशिष्ट शब्दमर्यादेमध्ये अभिव्यक्त होण्याचे कौशल्य स्फुटलेखन करणाऱ्या लेखकाजवळ असावे लागते. काही महत्त्वाचे तसेच फारसे महत्त्वाचे नसलेले विषयही स्फुटलेखनाचे विषय होऊ शकतात. समकालीन घटना वा प्रसंगांच्या निमित्ताने असे विषय समाजापुढे आणले जातात. त्यावर सूत्ररूपाने व संक्षेपाने लेखन केले जाते. लोकांना उपयुक्त ठरतील अशा प्रासंगिक विषयांवर स्फुटलेखन केलेले आढळते. उदा. जूनमध्ये शिक्षण क्षेत्राशी निगडित लेखन अधिक प्रमाणावर आढळते. स्फुटलेखनामध्ये एखाद्या विषयावर मनमोकळेपणे, नेमक्या शब्दांत विवेचन केलेले असते. स्फूटलेखन रंजकतेबरोबर उद्बोधनही करते. त्यामध्ये वेगळेपणा, ताजेपणाबरोबरच नवे चिंतन, नवे दर्शनही असते.

अनेक वर्तमानपत्रांमध्ये विविध विषयांवर ठरावीक दिवशी 'सदरलेखन' प्रकाशित होत असते. अशी सदरे 'स्फुट' लेखनाचाच एक प्रकार मानली जातात. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचाही प्रभाव अशा लेखनातून जाणवत असतो. स्फुट लेखकाला शब्दांचा फुलोरा टाळून, मोजक्या आणि सोप्या शब्दात लिहिण्याची कसरत करावी लागते. वृत्तपत्रीय लेखन हे मूलतः तत्कालीन व अल्पजीवी स्वरूपाचे असते. वृत्तपत्रीय लेखनाच्या या अंगभूत मर्यादांवर मात करून एखादा स्फुटलेखक आपल्या सदरातील विषयांच्या वेगळेपणामुळे व भाषाशैलीमुळे वाचकांचे लक्ष वेधून घेतो. स्फुटलेखक हा बहुश्रुत असून भागत नाही, तो व्यासंगीही असावा लागतो. त्याचे वाचन चौफेर असावे लागते. भोवतालच्या जगाचे सूक्ष्म निरीक्षण करणारी मर्मग्राही डोळसदृष्टी त्याच्याकडे असावी लागते. एखाद्या चुरचुरीत स्फुटलेखाने लेखक वाचकांचे मनोरंजन

करू शकेल, पण वाचकांच्या ज्ञानात भर घालू शकणार नाही. त्यामुळे आपण निवडलेल्या विषयाशी निगडित सर्व पैलूंचा अर्थ जो वाचकांना उलगडून सांगू शकेल, तोच चांगला स्फुटलेखक होऊ शकतो. मराठीमध्ये अनेक लेखकांचे सदरलेखन पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले आहे.

**प्रबोधनपर लेख**

समाजप्रबोधनपर लेखनाची आवश्यकता सर्व काळात असते. समाजजीवनातील प्रश्नांचे सम्यक आकलन करावे, समाजपरिवर्तनाच्या आड येणाऱ्या प्रवृत्तींचा शोध घ्यावा, समाजातील प्रश्नांच्या गुंतागुंतीचे स्वरूप सर्व बाजूंनी व वस्तुनिष्ठ पद्धतीने पहावे, सामाजिक वास्तवाचा अन्वयार्थ लावण्याची नवी दृष्टी लोकांना द्यावी, समाज परिवर्तनाचा आशय व दिशा सूचित करावी, समाजाच्या पुनर्बांधणीसाठी कालोचित असे विचार मांडावेत, यासाठी प्रबोधनपर वैचारिक लेखनाची आवश्यकता असते.

समाजप्रबोधनपर लेखन करणाऱ्या लेखकाला समाजाविषयी, लोकांविषयी एक जिवंत आस्था असली पाहिजे. समाजातील अंतःप्रवाहांचे, विविध सामाजिक प्रश्नांचे, त्यांच्या व्यामिश्रतेचे एक सजग भान त्याच्याजवळ असले पाहिजे. या प्रश्नांच्या वस्तुनिष्ठ आकलनासाठीचा अभ्यास व शास्त्रीय विश्लेषक दृष्टी त्याच्या ठायी असली पाहिजे. कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह वा एकांगीपणा यांच्या पुढे जाऊन आपल्या विचारांची शास्त्रशुद्ध पायावर मांडणी करण्याची वैचारिक सचोटी व निष्ठा त्याच्या ठायी असली पाहिजे. अशास्त्रीय संकेतांची आणि पारंपरिक रूढी समजुतींची तर्कनिष्ठ व वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सा केली पाहिजे. स्वतंत्र, निर्भीड, निष्पक्षपाती विचारांची निष्ठा रुजविण्यासाठी त्याने प्रयत्नशील असले पाहिजे. भारतीय सांविधानिक मूल्यांवर आधारित नवसमाज निर्माण करण्यासाठी प्रबोधनपर लेखनाची आज नितांत आवश्यकता आहे.

**मृत्युलेख**

विविधक्षेत्रांत कर्तृत्व गाजविलेल्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा संस्मरणात्मक लेख लिहिला जातो. या लेखात त्या व्यक्तीच्या कार्याचा पट उलगडून त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. व्यक्तिजीवनातील महत्त्वाच्या घटनांच्या जोडीने त्यांच्या कार्याचे मूल्यमापनही केले जाते. अशा व्यक्तींनी समाजाच्या विविध क्षेत्रांत बहुमूल्य योगदान दिलेले असते. त्या विशिष्ट क्षेत्राच्या पर्यायाने समाजाच्या विकासामध्ये मोठा हातभार लावलेला असतो. त्यामुळे समाजजीवनाचीही उंची वाढलेली असते. अशा व्यक्तींच्या विचारकार्याचे, गुणविशेषांचे दर्शन समाजाला घडवून त्यांचा वारसा चालविण्याची प्रेरणा समाजात निर्माण व्हावी असाही एक उद्देश असतो. एक प्रकारे त्या व्यक्तीच्या कार्याला केलेला तो मुजरा असतो. मृत्युलेखात व्यक्तीचा जीवनपट व त्याच्या कार्याचे मूल्यांकन यांचा समावेश असतो. तसेच त्यांच्या कार्याविषयी समाजमनातील कृतज्ञताभाव व्यक्त केलेला असतो. त्यामुळे मृत्युलेख हा एकीकडे माहितीपर आणि दुसरीकडे व्यक्तिवर्णनपर असतो. तो भावपर असतो. समाजाच्या मनातील आदरभाव व्यक्त करण्याचे ते एक माध्यम असते. म्हणून मृत्युलेख हा समाजमनातील कृतज्ञतेचा प्रातिनिधिक आविष्कार असतो.

**मराठी वैचारिक लेखनाची परंपरा**

अव्वल इंग्रजी काळात इंग्रजी शिक्षण व इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाने मराठीमध्ये वैचारिक लेखन हा गद्यलेखन प्रकार अस्तित्वात आला. मराठी गद्यवाङ्मयाच्या प्रारंभिक वाटचालीमध्ये ब्रिटिश सनदी अधिकारी, ख्रिश्चन मिशनरी व श्रीरामपूर छापखाना यांचे मोठे योगदान आहे. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रसारक', 'विविधज्ञानविस्तार', 'इंदुप्रकाश' आदी नियतकालिकांनी मराठी वैचारिक साहित्याच्या विकासामध्ये हातभार लावला आहे. समाजजीवनाशी निगडित विविध विषय व त्यांचे आधुनिक मूल्यदृष्टीने विश्लेषण करणारे लेख या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले. ज्ञानवितरण व समाजप्रबोधन करण्याबरोबरच विचारप्रवर्तन व गद्यलेखनशैलीचे विकसन करण्याचे काम नियतकालिकांनी केले.

एकोणिसाव्या शतकामध्ये प्रामुख्याने पुढील विषयांवर अधिक प्रमाणावर वैचारिक लेखन झाले आहे. १. हिंदुधर्म व समाजव्यवस्था २. पारतंत्र्य व त्याचे फायदे- तोटे. या काळात जे वैचारिक लेखन झाले, त्यांच्यामध्ये पुढील प्रवृत्ती व प्रेरणा आढळतात. १. वर्णजातिप्रधान सामाजिक विषमता २. स्त्रीदास्य व स्त्रीगुलामगिरीस विरोध. स्त्रीपुरुष समानतेची आणि स्त्रियांच्या मानवाधिकारांची प्रस्थापना. ३. धार्मिक गुलामगिरी, कालबाह्य अनिष्ट रूढिपरंपरा, अंधश्रद्धा, जातिभेद यांना नकार, धर्मचिकित्सा, समाजजागृती व समाजसुधारणा. ४. अस्पृश्यतानिर्मूलन ५. ब्रिटिश राजवटीचे मूल्यमापन. ब्रिटिशांच्या उदार लोकशाही शासनप्रणालीचे कौतुक व त्याचबरोबर ब्रिटिशांकडून होणारे शोषण, दमन, अन्याय यांना विरोध ६. स्वातंत्र्यलालसा व आत्मविश्वास निर्माण करणे. अव्वल इंग्रजी काळातील वैचारिक साहित्य वरील प्रेरणांमधून निर्माण झालेले आहे.

बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री पंडित, लोकहितवादी, दादोबा पांडुरंग तर्खडकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, मिस फेरार, न्या. म. गो. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर वगैरे या कालखंडातील महत्त्वाचे वैचारिक लेखक व निबंधकार होत.

१८७३-७४ ते १९४७ हा पाउणशे वर्षांचा कालखंड देशाच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या कालखंडातील एकूणच व्यवहार राजकीय स्वातंत्र्य व समाजसुधारणा या विषयांभोवती केंद्रित झालेला दिसतो. सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणाऱ्या परंपरेमधून म. फुले व सत्यशोधकीय वैचारिक साहित्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित वैचारिक साहित्य, राजारामशास्त्री भागवत, गो. ग. आगरकर, वि. रा. शिंदे, श्री. म. माटे आदींचे सुधारणावादी वैचारिक साहित्य निर्माण झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळकांच्या प्रभावातून राष्ट्रवादी वैचारिक लेखन करणारी परंपरा उदयास आली. शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, कृ. प्र. खाडिलकर, अ. ब. कोल्हटकर, वि. का. राजवाडे, वि. दा. सावरकर आदींचे लेखन या परंपरेत मोडते. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याचा जहाल पुरस्कार केला. परंतु धार्मिक, सामाजिक स्वातंत्र्याबाबत प्रतिगामी भूमिका घेतली. यामुळे वरील दोन्ही परंपरांमध्ये सातत्याने वैचारिक वादविवाद, विचारसंगर होत राहिले. यामधून मराठी वैचारिक साहित्य समृद्धच होत गेले. म. गांधींच्या विचारकार्याचा प्रभावही या कालखंडावर मोठ्या प्रमाणात पडलेला आहे. गांधीवादी प्रेरणेतून

विनोबा भावे, साने गुरुजी, दादा धर्माधिकारी, काका कालेलकर, शं. द. जावडेकर, आचार्य भागवत आदींनी चिंतनशील लेखन करून मराठी विचारविश्व समृद्ध केले. मोजकेच परंतु महत्त्वपूर्ण असे ऐतिहासिक संशोधनपर लेखन केले गेले. स्त्रियांचे वैचारिक लेखन मात्र अल्पप्रमाणात आढळते. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे, तानुबाई बिर्जे, सावित्रीबाई रोडे, जनाबाई रोकडे, जानक्का शिंदे आदी सत्यशोधक परंपरेतील स्त्रियांनी लेखन व काही अंशी भाषणांमधून समाजवास्तवाची चिकित्सा करणारे विचार व्यक्त केले आहेत. नागर मध्यमवर्गीय स्त्रियांचे विचारविश्व कुटुंबकेंद्रित असल्याचे दिसते.

स्वातंत्र्यप्राप्ती, संविधाननिर्मिती, महाराष्ट्र राज्याची स्थापना, सार्वत्रिक निवडणुका, राष्ट्रीय आणीबाणी तसेच गेल्या सत्तर-पंचाहत्तर वर्षांमध्ये घडलेल्या महत्त्वपूर्ण घटनांच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर वैचारिक साहित्य निर्माण झालेले आहे. भारतीय संविधानानुसार नवसमाजनिर्मिती व राष्ट्रउभारणीच्या प्रमुख प्रेरणेतून या कालखंडातील बहुतांश वैचारिक लेखन झालेले आढळते. या कालखंडातील वैचारिक साहित्यामध्ये काही प्रवृत्ती व प्रेरणा दिसून येतात. लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ग. सहस्रबुद्धे, गं. बा. सरदार, नरहर कुरुंदकर, दि. के. बेडेकर, मे. पुं. रेगे वगैरे विचारवंतांनी मराठी वैचारिक साहित्यास सर्वस्पर्शी व्यासंगाचे, समग्रतेचे व मूल्यात्मकतेचे भान दिले. या कालखंडात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लीम, जैन, ख्रिस्ती, जैन आदी प्रवाहांतील वैचारिक लेखनास धुमारे फुटत गेले. महात्मा फुलेप्रणीत विचारव्यूह अधिक विकसित होत गेला. आंबेडकरी विचारप्रेरणेतून रावसाहेब कसबे, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर, वसंत मून, आनंद तेलतुंबडे आदी अभ्यासकांनी दलित समाजवास्तवाचे विश्लेषण करणारे व आंबेडकरांच्या विचारकार्याचे परिशीलन करणारे अभ्यासपूर्ण वैचारिक लेखन केले. तुलनात्मकदृष्ट्या मुस्लीम, जैन, ख्रिश्चन वैचारिक साहित्य मात्र कमी प्रमाणात लिहिले गेले आहे.

मराठी वैचारिक साहित्याची गेल्या दीडशे- पावणे दोनशे वर्षांची अत्यंत सकस व विचारसंपृक्त परंपरा गत पंचवीस-तीस वर्षांपासून क्षीण होत चालली आहे. ही विचारपरंपरा खंडित होते की काय, अशी साधार भीती निर्माण झाली आहे. सध्या मराठी वैचारिक साहित्य काही अपवाद वगळता वृत्तपत्रीय स्वरूपाचे, चर्चात्मक, वर्णनपर झाले आहे. त्यामध्ये विषयांपासून व्यासंग, विश्लेषण व नवविचारदर्शनापर्यंत उणेपणा आढळतो. वैचारिक साहित्यातील या कुंठितावस्थेची कारणमीमांसाही केली गेली आहे. सर्वसमावेशक देशी वैचारिक तत्त्वज्ञानाची निर्मिती करण्यामध्ये विचारवंतांना आलेले अपयश, स्वतंत्र नवविचारांना, नवकल्पनांना जन्म देणाऱ्या शिक्षणव्यवस्थेचा अभाव, जागतिकीकरण व नवभांडवलशाहीतील बदलत्या समाजधारणा, मध्यमवर्गीयांची आत्मकेंद्रितता, सार्वत्रिक मूल्यऱ्हास, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट, चंगळवाद, बाजारवाद, सामाजिक जाणिवांचा अभाव, असहिष्णुता, झुंडशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच, विसंवाद, बुद्धिजीवींचे बदलते अग्रक्रम, वाचकांच्या अभिरुचीतील बदल यांसारख्या अनेक कारणांनी समकालीन वैचारिक साहित्य आवर्तात सापडले आहे. सध्या नित्य नवे प्रश्न, नवी आव्हाने निर्माण होत आहेत. वर्तमान वास्तवाची समग्र चिकित्सा करीत भविष्यवेधी वैचारिक साहित्य निर्माण होण्याची आज गरज आहे. वैचारिक साहित्य मेंदू व विचारप्रक्रिया घडवीत असते. कोणत्याही समाजाचे भवितव्य त्या समाजात निर्माण होणाऱ्या वैचारिक साहित्यावर अवलंबून असते.

### २.२.४ वैचारिक लेखनाचे प्रात्यक्षिक

## अमृताचे कुंभ

**यशवंतराव चव्हाण**

आज स्नातकांशी बोलत असताना, आपल्या अवतीभोवती असणाऱ्या प्रश्नांसंबंधी माझ्या मनात येणारे विचार जर मी सांगितले नाहीत तर मी एक मोठी चूक केल्यासारखे होईल, म्हणून मी त्यांच्याशी आज मनमोकळेपणाने चार गोष्टी बोलणार आहे. पदवी समारंभानंतर लवकरच आपण जीवनामध्ये प्रवेश करणार आहात. जीवनाच्या संघर्षात प्रवेश करणार आहात. या जीवनसंघर्षाचे स्वरूप आणि त्याच्या पाठीमागे असलेले सामर्थ्य आपण समजून घेतले पाहिजे. विद्यापीठातून आजपर्यंत आपण जे शिक्षण घेतले आहे त्या शिक्षणाचे, जीवनसंघर्षाच्या पाठीमागे असणाऱ्या सामर्थ्याचे स्वरूप समजून घेण्यास आपल्याला मदत झाली पाहिजे. सामान्यतः शिक्षणाचा उद्देश आपण हाच मानतो. शिक्षणाने एक प्रकारचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर या बौद्धिक व मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग आपण शोधून काढीत असताना, ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या त्या समाजाचेही थोडेफार ऋण फेडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे.

विद्यापीठ हे पदवी मिळविण्याचा एक कारखाना किंवा यंत्रणा आहे या भावनेने विद्यापीठाकडे पाहण्याची प्रवृत्ती अलीकडे वाढू लागली आहे. त्याचबरोबर विद्यापीठांच्या संख्येतही वाढ होत आहे. हे सर्व पाहून जुनी विद्वान माणसे कपाळाला आठ्या आणून विचारीत असतात की, आपण विद्यापीठे वाढवीत आहात पण त्याबरोबर ज्ञान वाढविण्याचाही प्रयत्न होणार आहे ना? तुमच्या कुलपतींचा आताच जो संदेश वाचण्यात आला त्यात कुलपतींनी मोठ्या मार्मिकपणाने दोन वेगवेगळे शब्द वापरले आहेत. आपण ज्ञानीही व्हा व शहाणेही व्हा. ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे असे त्यांनी या संदेशात सुचविले आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वाच्या दृष्टीने करून घेणे अत्यंत आवश्यक असते. परंतु त्या ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याचे जे शास्त्र आहे त्याचे नाव शहाणपण असे मी समजतो. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर ज्ञानाबरोबरच हे शहाणपण तुम्हाला मिळवावे लागणार आहे. कारण या शहाणपणाची देशाला आज फार गरज आहे.

विज्ञानाची आज इतक्या झपाट्याने प्रगती होत आहे की, त्याच्या गतीचे मोजमाप करणे कठीण होऊन बसले आहे. गेल्या वर्षी असणारे शास्त्र आज निश्चित तेच आहे अशी खात्री देता येणार नाही. ज्ञानाने केलेली ही प्रगती खरोखरच प्रशंसनीय आहे. परंतु त्याचबरोबर माणसाच्या मनात असा विचार येतो की, या वाढत्या ज्ञानाबरोबर माणसाचे सुख व मनःसामर्थ्य वाढले आहे का? आज जी अत्यंत पुरोगामी व अतिप्रगत अशी राष्ट्रे आहेत त्या राष्ट्रांच्या मनात हा प्रश्न अत्यंत गंभीरपणे घोळत आहे, आणि म्हणून आपण आज आपल्या देशाची एका नवीन तऱ्हेने बांधणी करण्याचा प्रयत्न करीत असताना दुनियेत इतरत्र झालेल्या

चुकांची पुनरावृत्ती न करता, प्रगतीचा पल्ला आपण गाठला पाहिजे, हा जो विचार या देशातील अनेक विचारवंतांनी मांडला आहे, तो या शिक्षणकेंद्रांतून बाहेर पडणाऱ्या सर्व स्नातकांच्या मनापुढे असला पाहिजे.

आज तुम्ही तुमच्या क्षेत्रात कर्तेसवर्ते होऊन बाहेर पडत आहात ही आनंदाची गोष्ट आहे. तुम्ही येथे मिळविलेले सामर्थ्य तुमच्या जीवनात तुम्हाला उपयोगी पडेलच, परंतु त्याचबरोबर ते समाजाच्या जीवनालाही उपयोगी पडण्यास साहाय्यभूत होईल असा आपला सदैवी प्रयत्न राहू द्या. कारण अशा समाजनिष्ठ प्रवृत्तीची आज अत्यंत गरज आहे.

जगातील प्रगत देशांमध्ये आज जे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत त्याचे मुख्य कारण, त्या देशांना विज्ञानाच्या प्रगतीतून जसे अनेक फायदे मिळत आहेत, तसेच विज्ञानाच्या प्रगतीतून निर्माण झालेल्या अनेक संकटांच्या सावलीतही हे देश आज वावरत आहेत, हे आहे. आमच्या देशातही आम्हाला विज्ञानाची प्रगती करावयाची आहे. परंतु ही प्रगती करीत असताना, ज्या ध्येयसिद्धीसाठी आपण ही प्रगती करणार आहोत त्या ध्येयाचा आपणांस कधीही विसर पडता कामा नये. या देशामध्ये आम्हांला एक प्रगत लोकशाही बांधावयाची आहे. प्रगत लोकशाहीचा घटक आहे माणूस, प्रत्येक स्त्री व पुरुष. मग तो शहरात राहणारा असो अथवा खेड्यात राहणारा असो, विद्यापीठाचा पदवीधर असो अगर पदवीधर नसो. त्याचे सामर्थ्य म्हणजे त्याच्या मनाचे सामर्थ्य, त्याच्या विचाराचे सामर्थ्य, त्याच्या अनुभवाचे सामर्थ्य आणि त्याच्या शीलाचे सामर्थ्य. हे सामर्थ्य जेणे करून वाढीस लागेल अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करून आपली लोकशाही दृढमूल करावयाची आहे. ही आपली आजची मौलिक गरज आहे. हे सामर्थ्य देण्याची शक्ती शिक्षणात असते म्हणून तर आपण शिक्षणाच्या पाठीमागे आहोत. अमुक एक पदवी व्यापारी दृष्टिकोणातून केवळ आपण शिक्षणाकडे पाहता कामा नये. माणूस मनाने, विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल, ही शिक्षणाची महत्त्वाची कसोटी व साध्य आपण मानले पाहिजे. आजच्या शिक्षणाने ही गोष्ट आपण कितपत साध्य करू शकलो याचे परीक्षण करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे.

ज्ञानविज्ञानाच्या व्यासंगाने व प्रसाराने, आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामर्थ्याने देशातील वातावरण बदलू शकते, समाजाचे संपूर्ण स्वरूप बदलू शकते याचा अनुभव आज अनेक प्रगत देशांत येत आहे. वैचारिक स्वातंत्र्यावर आधारलेला समाज बांधला जावा अशी आपली विचारधारा आहे. पण प्रत्यक्षात मात्र आपणांस आज निराळेच चित्र दिसू लागले आहे. ज्या ठिकाणी ही वैज्ञानिक व्यासंगाची लाट समाजातील घराघरांपर्यंत जाऊन पोहोचली आहे त्या समाजात एक प्रकारची नवी शक्ती निर्माण झाल्याचा आगळा अनुभव आज येतो आहे. त्या समाजाच्या वैचारिक स्वातंत्र्यावर शासनाकडून किंवा दुसऱ्या कोणत्याही शासकीय वा अशासकीय शक्तींकडून पडणारी बंधने, हे जे ज्ञानाचे स्वातंत्र्य निर्माण झाले आहे त्यामुळे आपोआप ढिली होऊ लागली आहेत. इतके विलक्षण सामर्थ्य या ज्ञानविज्ञानाच्या प्रसारात आहे. आपल्याही देशात विद्यापीठांच्याद्वारे आपणांस हे सामर्थ्य आता वाढवावयाचे आहे.

गेल्या शे-पाउणशे वर्षांच्या काळात, शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून भारतामध्ये व विशेषतः महाराष्ट्रामध्ये ज्यांनी ज्यांनी प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला, त्या सर्वांच्या मनात एक विचार प्रमुख होता. तो हा की, शिक्षणामुळे सामान्य माणूस पारंपरिक विचारांच्या बंधनातून मुक्त होणार आहे; कुठल्याही तऱ्हेच्या दबावाने न दबणारा,

आपली मान उंच करून स्वाभिमानाने चालणारा, स्वतःचे भाग्य स्वतःच्या हाताने घडविण्याचे सामर्थ्य असणारा असा माणूस शिक्षणामुळे तयार होणार आहे. आज या विचारांची फार गरज आहे. पूर्वी कधीही नव्हती इतकी गरज या देशाला आज या विचारांची आहे. माणसाला घडविण्याचे हे काम, समाजाच्या सामर्थ्यातून ज्यांनी शिक्षणाची संधी घेतली आहे त्या सर्व स्नातकांनी पार पाडावयाचे आहे. आपण असे समजता कामा नये की, आपण स्नातक झाल्याचे पूर्ण श्रेय केवळ आपल्यालाच आहे. या श्रेयात समाजाचाही पुष्कळच मोठा भाग आहे. या विद्यापीठाच्या रूपाने आपणापर्यंत ज्ञानगंगा आणून सोडण्याची समाजाने व्यवस्था केली नसती तर आज जे स्नातक पदवीविभूषित झाले आहेत, त्यांपैकी पुष्कळांना पदवी प्राप्त करून घेण्याची संधीच मिळाली नसती आणि म्हणून आपल्या मनात या सामाजिक ऋणाची प्रेरणा सतत असली पाहिजे.

यापुढे आपले क्षेत्र पूर्वीप्रमाणे मर्यादित राहणार नाही. कर्तृत्वाच्या साऱ्या दिशा आपणाला आता मोकळ्या होणार आहेत. आपण कोठेही असा. परंतु आपली जबाबदारी पार पाडीत असताना आपणाला जे सामर्थ्य प्राप्त होईल ते शेवटी अनुभवाचेच सामर्थ्य असेल. कारण ज्ञान केवळ पुस्तकातूनच मिळते असे नाही. सामान्यपणे मी असे मानतो की, ज्यामुळे ज्ञानाचा पाठलाग करण्याची, ज्ञानाची सफर पुरी करण्याची शक्ती आणि दृष्टी माणसात निर्माण होते ते शिक्षण होय. पदवी परीक्षेपर्यंत मनुष्य शिकतो आणि पदवी परीक्षेनंतर सर्वांच्या संगतीने कुलगुरू त्याच्यावर अनुग्रह करतात. त्या अनुग्रहाचा अर्थ असा असतो की, स्वतःच्या परिश्रमाने अधिक ज्ञान मिळविण्यास तुम्ही आता पात्र झाला आहात. शिक्षणाचा हा खरा अर्थ आहे. स्नातकाला पदवी देण्यात आली म्हणजे तो ज्ञानी झाला असे मी मानीत नाही. पदवीपरीक्षेचा तो अर्थही नाही. स्वतःच्या परिश्रमाने ज्ञान मिळविण्यास स्नातक समर्थ बनला एवढाच पदवीदानाचा अर्थ आहे. कारण स्नातकाला मिळालेले शिक्षण इतके अपुरे असते की, प्रत्येक क्षणाक्षणाला त्याला शिकावे लागते. मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग करून त्याने समर्थ बनावयाचे असते, पुढे जावयाचे असते. आपल्या भावी जीवनात आपणाला हे सामर्थ्य लाभावे आणि आपली सतत प्रगती व्हावी अशी मी या प्रसंगी प्रार्थना करतो.

स्नातकांपुढे आज मी उभा राहिलो असताना मला आपल्या जुन्या उपनिषदांतील प्रार्थनेची आठवण होते.

असतो मा सद्गमय

तमसो मा ज्योतिर्गमय

मृत्योर्मा अमृतं गमय

असत्यापासून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे मला ने. आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनावयाचे आहे, समाजजीवन समर्थ बनवावयाचे आहे.

अशी किती तरी नवीन नवीन शास्त्रे आहेत की, त्या शास्त्रांचा आपण उपयोग करू शकलो तर या हिंदुस्थानचे जीवन आपणास एका पराकोटीला पोहोचविता येईल. मी परदेशात फारसा गेलेलो नाही, परंतु गेल्या वर्षी जाण्याचा योग आला. पण मी आपणास सांगू इच्छितो की, मी फारसा प्रभावित होऊन परत आलो नाही. उलट काहीसा कष्टीच होऊन परत आलो. कष्टी होऊन आलो तो अशाकरिता की, आमच्यामध्ये जे सामर्थ्य

आहे त्याचा आम्ही उपयोग केलेला नाही. या देशाने भगवान श्रीकृष्ण निर्माण केले आहेत, ज्ञानेश्वर निर्माण केले आहेत, सी. व्ही. रमण निर्माण केले आहेत आणि नारळीकर निर्माण केले आहेत. फार प्राचीन काळापासून ते अगदी आजपर्यंत आमच्यामध्ये हे सामर्थ्य आहे. याचा पडताळा आम्हांस अनेक वेळा आलेला आहे. परंतु या सामर्थ्याचा आम्ही उपयोग केलेला नाही. माझ्या परदेशच्या दौऱ्यात प्रचंड पराक्रम करणारी, प्रगती करणारी राष्ट्रे मी पाहिली, या राष्ट्रांनी माणसाचे सर्वांत मोठे सामर्थ्य जी त्याची बुद्धी, तिचा तेजस्वीपणाने उपयोग करून प्रचंड सामर्थ्ये निर्माण केली आणि या सामर्थ्यांतूनच ही राष्ट्रे आज मोठी बनली आहेत. कुठलाही देश आमच्यापेक्षा भूगोलाने मोठा किंवा लोकसंख्येने मोठा म्हणून मोठा झालेला नाही. काही देश भूगोलाने आमच्यापेक्षा लहान आहेत तर काही लोकसंख्येने लहान आहेत. पण ते आपल्या कर्तृत्वाने मोठे झाले आहेत. कारण इतिहासाने दिलेली आव्हाने त्या देशातील कर्तबगार माणसांनी स्वीकारली आणि आपली सर्व शक्ती पणाला लावून ज्ञानाच्या व विज्ञानाच्या क्षेत्रातील प्रचंड सामर्थ्य त्यांनी हस्तगत केले. आम्हालाही आमचे सामर्थ्य वाढविण्याचे काम आता करावयाचे आहे. परंतु हे सामर्थ्य आपण कसे निर्माण करणार आहोत? हे सामर्थ्य दहा-पाच पुढारी निर्माण करू शकतील अशी आपली समजूत असेल तर ती चुकीची आहे. दहा-पाच मोठी माणसे महापुरुष होऊ शकतात. त्यांच्या कर्तृत्वाने आपल्या मनात एक विश्वास, आत्मविश्वास निर्माण होतो, की मलाही हे करता येणे शक्य आहे. परंतु खरे सामर्थ्य निर्माण होते, खरी शक्ती वाढते आणि राष्ट्रे पहिल्या प्रतीची बनतात ती शेवटी बुद्धीच्या क्षेत्रात, ज्ञानाच्या क्षेत्रात. या क्षेत्रात निरलसपणे अखंड सेवा करणारी जी माणसे असतात त्यांच्या कार्यामुळेच राष्ट्रे मोठी होतात हे मी आपणांस सांगू इच्छितो. ज्ञानाच्या अखंड सेवेमधून निर्माण होणारे जे सामर्थ्य आहे तेच खरे सामर्थ्य आहे. म्हणून मी म्हणतो की, ज्या अमृताच्या शोधात तुम्ही-आम्ही आहोत ते अमृत खरे आहे. त्या अमृतानेच खरे सामर्थ्य येणार आहे. मित्रहो, ज्याच्यासाठी विद्यापीठाचा जन्म झाला आणि ज्याच्या प्राशनाने आमचा समाज समर्थ बनणार आहे त्या अमृताचे कुंभ आज तुमच्यापुढे तुमच्या कुलगुरूंनी भरून ठेवले आहेत, ते तुम्ही प्राशन करा. जे कुंभ आज तुमच्यापुढे नसतील ते शोधून काढा, आणि जे शोधून सापडणार नाहीत, ते निर्माण करा. शेवटी याच एका अमृताने लोकजीवनाची गंगा समृद्ध होणार आहे, दुथडी भरून वाहणार आहे. ते अमृत शोधण्याची, जनतेपुढे सादर करण्याची जबाबदारी स्नातक म्हणून तुम्ही आज स्वीकारली आहे. म्हणून मला तुमच्या आणि तुम्हाला माझ्या शुभेच्छा.

**(शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभ भाषण, दि. ६ ऑक्टोबर १९६४)**

## १.३ स्वाध्याय

प्रश्न-१ योग्य पर्याय निवडा.

१. कोणता घटक हा वैचारिक वाङ्मयाचा प्राण आहे.

अ) विचार ब) रंजन क) काल्पनिकता ड) अद्‌भूतता

२. तर्कशुद्ध साधार प्रतिपादन करीत एका निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे लेखन कोणते?

अ) कादंबरी ब) कथा क) कविता ड) वैचारिक

३. विषयाचे समग्र आकलन, शास्त्रीय अन्वेषक दृष्टी, बहुश्रुतता, तर्कशुद्ध युक्तिवादकौशल्य यामुळे वैचारिक साहित्यास काय प्राप्त होते.

अ) रंजनपरता ब) वस्तुनिष्ठता क) कलात्मकता ड) रूक्षता

४. विषयाची उकल, तार्किकता आणि आवाहकता ही कोणत्या साहित्याची वैशिष्ट्ये आहेत.

अ) वैचारिक ब) वैज्ञानिक क) ललित क) बालसाहित्य

५. खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य वैचारिक साहित्याच्या बाबतीत महत्त्वाचे आहे.

अ) अलंकारविरहितता ब) काल्पनिकता क) तत्त्वज्ञानप्रणित ड) पौराणिकता

उत्तरे : १) अ, २) ड, ३) ब, ४) अ, ५) अ

प्रश्न–२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. वैचारिक साहित्याची संकल्पना स्पष्ट करून वैचारिक साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. वैचारिक लेखनाच्या पद्धतीचे सविस्तर विवेचन करा.

प्रश्न–३ लघुत्तरी प्रश्न

१. वैचारिक लेखन म्हणजे काय?

२. वैचारिक लेखनाच्या प्रेरणा सांगा.

३. वैचारिक लेखनाची सुरुवात कशी करावी.

प्रश्न–४ टिपा लिहा.

१. वैचारिक लेखनात वस्तुनिष्ठतेचे महत्त्व

२. अग्रलेख

३. स्तंभलेखन

४. स्फुटलेखन

## २.४ अधिक वाचन

१. खोले विलास, (संपा.) : स्त्री–पुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९९७

२. चपळगावकर नरेंद्र : मराठीतील वैचारिक साहित्यःलेखक आणि समाज, नवभारत, जून २०१६ (वर्ष ६९, अंक ९)

३. चौसाळकर अशोक (संपा.) : विचारवंत आणि समाज, युनिक ॲकॅडमी, पुणे, २०१५

४. देऊळगावकर वि. पा. व देऊळगावकर चंद्रकांत : मराठी निबंध – लघुनिबंध : स्वरूप व विवेचन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८१

५. पानतावणे गंगाधर : दलित वैचारिक साहित्य, मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९९५

६. भेलके सुभाषचंद्र, बेलसरे वैजयंती, धोंडगे दिलीप : प्रबोधनपर साहित्य : स्वरूप आणि संकल्पना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२

७. भोळे भा.ल.(संपा.) : एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य,खंड पहिला, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २००६

८. भोळे भा. ल. (संपा.) : एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य, खंड २, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, २००६

९. भोळे भा. ल. (संपा.) : विसाव्या शतकातील मराठी गद्य, खंड १, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, २०१०

१०. भोळे भा. ल. (संपा.) : विसाव्या शतकातील मराठी गद्य, खंड २, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१०

११. मून वसंत व इतर (संपा.) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १, २, व ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, २००२

१२. मोरे गिरीश : मराठी निबंध : उद्‌गम आणि विकास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००९

१३. मोरे सदानंद, लिंबाळे शरणकुमार : प्रबोधनपर वैचारिक वाङ्‌मय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००३

१४. रेगे मे. पुं. व इतर : मराठी विचारवंत आणि आपण, मौज प्रकाशन गृह मुंबई, १९६९.

१५. सरदार गं. बा : अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, (१८००-१८७४), मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे १९७१

१६. सातोस्कर बा. द. : पत्रविद्या, पणजी, १९७०

१७. साळुंखे आ. ह. : मित्रांना शत्रू करू नका!, लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २००८.

❑❑❑

# घटक – ३
# शोधनिबंध व प्रकल्पलेखन
(स्थूल परिचय)

**घटक संरचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ संशोधनाची संकल्पना

३.३ संशोधनपर लेखनप्रकार

३.३.१ शोधनिबंध लेखन

३.३.२ संशोधन प्रकल्पाचे लेखन

३.३.३ प्रबंधिका लेखन

३.३.४ प्रबंध लेखन

३.४ संशोधनाची लेखनपद्धती

३.५ संशोधनातील पथ्ये

३.६ संशोधनपर लेखनाची भाषा

३.७ स्वाध्याय

३.८ अधिक वाचन

## ३.० उद्दिष्टे

१. भाषा व साहित्य संशोधन कसे करावे हे कळेल.

२. भाषा व साहित्य संशोधन म्हणजे काय? याचे आकलन होईल.

३. संशोधनाची संकल्पना व स्वरूप समजेल.

४. संशोधनासाठी संशोधकाकडे कोणती गुणकौशल्ये आवश्यक असतात हे ध्यानात येईल.

५. भाषा व साहित्य संशोधनातील लेखनप्रकार, लेखनपद्धती समजेल.

६. शोधनिबंध, प्रकल्पलेखन, प्रबंधिका व प्रबंधलेखनाची पद्धत कळेल.

## ३.१ प्रास्ताविक

संशोधन ही मानवाची एक उपजत वृत्ती आहे. उपलब्ध साधनसुविधांमध्ये कमतरता जाणवली वा त्या अपुऱ्या वाटू लागल्या की माणूस नवीन साधनसुविधांचा शोध घेऊ लागतो. उपलब्ध ज्ञानव्यवस्थेत वा साधन व्यवस्थेत अपुरेपणा जाणवू लागला; वा त्यातील विसंगती लक्षात येऊ लागल्या की त्या दूर करण्यासाठी माणूस वेगवेगळे प्रयोग करू लागतो. उपलब्ध ज्ञानसामग्रीची पुनर्रचना करू लागतो. वा त्या सामग्रीतील बंध नव्याने जुळवू पाहतो व त्यातून नवनवे अर्थान्वेषण शोधण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे उणिवा जाणवण्यातून, वाढत्या गरजांची पूर्ती करण्यातून आणि प्रश्न पडण्यातून व त्या प्रश्नांच्या सोडवणुकीच्या प्रयत्नांतून ज्ञानक्षेत्राचे पाऊल पुढे पडत असते. ज्ञानक्षेत्राचे पाऊल असे पुढे पडणे हेच संशोधनाचे प्रयोजन व फलित असते. प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वा समस्येचे निराकरण करण्यासाठी संशोधनाकडे वळणे आणि शोधप्रकल्प हाती घेणे वा शोधनिबंध लिहिणे खऱ्या संशोधनात अभिप्रेत असते. आपल्या या संशोधनामुळे ज्ञानक्षेत्रात मौलिक भर पडावी अशी अपेक्षा असते.

संशोधनाच्या या प्रक्रियेला प्रारंभ होतो तो विषयाच्या निवडीपासून. आपल्या रोजच्या जगण्यात आपली जिज्ञासा जागी असेल, आपली संवेदनशीलता जागी असेल तर आपल्याला अनेक प्रश्न पडत असतात. माणूस आपल्या अवतीभवतीची भौगोलिक, नैसर्गिक, भौतिक, सामाजिक, धार्मिक परिस्थिती शक्यतो आहे तशी स्वीकारत असतो. मात्र समाजामध्ये काही प्रतिभावंत व्यक्ती असतात. त्यांना आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीचे इतरांपेक्षा वेगळे आकलन जाणवते. ह्या परिस्थितीतील वेगळ्याच कार्यकारणसंबंधाचे त्यांना आकलन होते. या आकलनासंदर्भात ह्या व्यक्ती काही प्रयोग करून आपले आकलन पडताळून बघतात. प्रयोगांती हाती आलेले हे आकलन वा तथ्य म्हणजे नवीन शोधच असतात. हे नवीन शोध मानवी ज्ञानकक्षांना व साधनव्यवस्थांना अधिक व्यापकता मिळवून देतात. इथे उदाहरण म्हणून आपल्याला अनेक शास्त्रज्ञांनी लावलेल्या शोधांचा विचार करता येईल. कधी कधी आपल्या भोवतीची ही सामाजिक, धार्मिक परिस्थिती काही घटकांसाठी सोईस्कर असते; तर काही घटकांसाठी गैरसोईची असते. ही गैरसोय काही व्यक्तींना प्रकर्षाने जाणवते. ती ते बोलून दाखवतात. त्या परिस्थितीचा अभ्यास करतात. हे असेच का आहे? असा प्रश्न उपस्थित करतात व त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करतात. त्या वस्तुस्थितीचे, रचनेचे पुनर्मूल्यांकन करून नव्या उपायांचा, नव्या रचनांचा, नव्या व्यवस्थांचा शोध घेतात. समाज त्यांना अनुसरतो तेव्हा परिस्थिती बदलाला प्रारंभ होतो. थोडक्यात म्हणजे संशोधनासाठीचा विषय असा आपल्या रोजच्या जगण्यातील उणिवेतून, गरजेतून वा समस्येतून सुचायला हवा. आपण ज्या कार्यक्षेत्रात कार्यरत असू त्या कार्यक्षेत्रातही अनेक समस्या असतात; जाणवायला हव्यात व त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याची इच्छाशक्ती असायला हवी. ती प्रतिभा थोड्याफार फरकाने सगळ्यांकडे असते. तिच्या संवर्धनाकडे मात्र आपण म्हणावे तितके लक्ष दिलेले नसते. वैज्ञानिक, साहित्यिक, समाजसुधारक यांनी त्यांच्या जिज्ञासेचे संगोपन केलेले असते. जे वेगळं जाणवलं त्याला दडपून न टाकता ते व्यक्त करून त्याचा शास्त्रशुद्ध मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला असतो. सामान्य माणूस मात्र आहे त्याबद्दल फारसा विचार न करता जैसे थे राहणे

पसंत करतो. रोजच्या व्यवहारवादी जगण्यात तो आपल्या प्रतिभेकडे दुर्लक्ष करतो. आपल्या या प्रतिभेकडे जरा जरी लक्ष दिले तरी आपल्याला संशोधनानुकूल असे कितीतरी विषय सहज सुचू शकतात.

## विषय विवेचन

## ३.२ संशोधनाची संकल्पना

संशोधन संकल्पना स्पष्ट करण्यासाठी वेगवेगळ्या अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा पहिल्यांदा विचार करू. त्यामुळे संशोधनाची संकल्पना स्पष्ट होईल.

१. **सदा कऱ्हाडे** – जिज्ञासावृत्तीने एखाद्या प्रश्नांची सत्यान्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्यनिर्णय करण्याची जी प्रक्रिया तिला संशोधन म्हणता येईल.

२ **उषा देशमुख** – संशोधन म्हणजे शोध घेणे, चौकशी करणे, काळजीपूर्वक तपास करून सत्य शोधण्याचा शास्त्रीय प्रयत्न करणे होय.

३ **दु. का. संत** – रिसर्च ही संज्ञा जुन्या फ्रेंच शब्दावरून आलेली आहे. तो शब्द Cerchire (सर्चिअर) असा आहे. त्याचा अर्थ शोध घेणे (सर्च) शोधणे, असा आहे. त्याला 'Re' पुन: या अर्थाचे उपपद लावून हा शब्द झाला आहे. आधुनिक संदर्भात शास्त्रीय प्रयोगशालेय क्षेत्रात विविध मार्ग व साधने, हत्यारे यांनी चाललेले शोधकार्य, असा अर्थ रूढ झाला.

४. **श. रा. राणे**

४.१. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास.

४.२ संशोधन म्हणजे अभ्यासपूर्ण रीतीने केलेली एक चौकशी असते. चिकित्सकपणे सर्वंकष पद्धतीने केलेली ती एक पाहणी असते. त्यात प्रयोगशीलता असते. नव्याने प्रकाशात आलेल्या घटनांच्या प्रकाशात लोकमान्य घटनांचा पुनर्विचार करण्याचे उद्दिष्ट पाहणीच्या मुळाशी असते.

४.३ एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी विशिष्ट उद्देश मनात धरून आवश्यक ती माहिती मिळविण्याचा साक्षेपी व पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन.

५ **सु. रा. चुनेकर** – संशोधन म्हणजे नुसती माहिती शोधणे, संकलित करणे नव्हे. त्यामागे निरीक्षण हवे. सिद्धान्तप्रतिपादन हवे. सिद्धान्तांची मूलभूत नवीनता हवी, आणि तो सिद्धान्त प्रमाण प्रत्यंतरांनी सिद्ध केलेला असायला हवा.

६. **वसंत स. जोशी** – शोधन आणि संशोधन हे Search आणि Research. या शब्दांचे पर्यायी शब्द आहेत. अज्ञाताचा शोध (Search) आणि ज्ञानाचे पुनर्मूल्यांकन (Research) हे अर्थ त्यात अपेक्षित आहेत. संशोधनवाचक अनेक शब्द उपयोगात आहेत. शोध हा व्यापक आणि गंभीर अर्थदर्शक शब्द 'शुध्' या धातूपासून व्युत्पादिला जातो. तर 'धा' या धातूस 'सम' हा उपसर्ग लावून संधान ह्या शब्दाचा प्रयोग केला जातो. त्यात संशोधन आणि निरीक्षण या कल्पनाही अंतर्भूत आहेत. एक विशिष्ट

लक्ष्य निश्चित करून त्याचा पाठपुरावा अनुसंधानात केला जातो. शोध किवा संधान ह्या शब्दप्रयोगात विखुरलेली सामग्री निवडून तिला शुद्ध व व्यवस्थित स्वरूप प्राप्त करून देणे ही कल्पना अनुस्यूत आहे.

७.१ **व. दि. कुलकर्णी** – संशोधन या शब्दाचा धात्वर्थ पाहिला तर तो आजच्या रूढार्थातून वेगळा आहे.

सं+शुध म्हणजे संपूर्णपणे सर्वांगांनी शुद्ध करणे, दोष काढून टाकून, चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध निर्मळ करणे असा हा मूलार्थ. एकनाथांनी ज्ञानेश्वरीचे संशोधन केले. या विधानातील संशोधन क्रिया याच अर्थाने घेतली जाते, घेतली पाहिजे.

७.२ **व. दि. कुलकर्णी** – साहित्य संशोधनात जे अनुपलब्ध ते उपलब्ध करून देणे, त्यावर संस्कार करून संपादित रूपात, टीका-टिप्पणी करून ते प्रकाशित करणे, हा एक भाग आहे. तो अपरिहार्य आहे, महत्त्वाचा आहे. पण त्यापेक्षाही विदग्ध साहित्यकृतींचे नवे अर्थ सौंदर्य पाहणे, त्याचे साहित्यकलादृष्ट्या पुनर्मूल्यमापन करणे हा अधिक महत्त्वाचा भाग आहे.

८. **New English Dictionary -** Research "Especially investigation or nailed at the discovery and interpretation of facts, revision of accepted theories or laws in the light of new facts, or practical application of such new or revised theories or laws."

९. **संशोधन विकिपीडिया –** संशोधन म्हणजे ज्ञानाची पातळी वाढविण्यासाठी एखाद्या विषयाचा पद्धतशीरपणे केलेला अभ्यास होय. यामध्ये सत्याची तपासणी, आधी सापडलेल्या तत्त्वांची पुष्टी, नवीन विषयाचा अभ्यास आदी प्रकार असतात.

थोडक्यात, संशोधनाचे स्वरूप हे मिश्र आहे. त्यामध्ये साहित्यातील अंतरंगाचा, आशयाचा, अभिव्यक्तीचा व रचनाविशेषाचा अणि भाषाशैलीविशेषाचा शोध अनेकांगांनी घेतला जातो. अर्थात भाषा व साहित्य संशोधन हा न संपणारा शोध आहे. त्यामुळेच संशोधनाच्या कक्षा ह्या एका विशिष्ट व्याखेत बसणाऱ्या नाहीत. थोडक्यात, संशोधनात संशोधकाचा नेहमी नवीन क्षितिजे शोधण्याचा प्रयत्न सुरू असतो.

**संशोधनाचे स्वरूप**

Search आणि Research या इंग्लिश शब्दांसाठी अनुक्रमे 'शोधन' आणि 'संशोधन' हे मराठी प्रतिशब्द आता रूढ झाले आहेत. शोधनाची आणि संशोधनाची ही बौद्धिक प्रक्रिया खूप जुनी आहे. याच प्रक्रियेच्या जोरावर माणासने आजवरची सारी प्रगती साधली आहे. माणसाला त्याच्या हाताच्या पंजामुळे हातात काठी पकडता आली आणि त्याच्या प्रगतीला सुरुवात झाली. पुढे त्याला अग्नीचा शोध लागला. चाकाचा शोध लागला, शेतीचा शोध लागला. त्यासाठी त्याने अनेक अवजारे शोधली. इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवी मेंदू वेगळा असल्याने त्याने भाषेचा शोध लावला. त्याद्वारे ज्ञानसंचय केला आणि आपल्या भवतालाचा वारंवार पुनर्शोध घेत अधिकाधिक साधनसुविधांची निर्मिती केली. अश्मयुग, लोहयुग, ताम्रयुग

असा प्रवास करत मानवी संस्कृतीची पायाभरणी केली. उषा मा. देशमुख म्हणतात, ''अज्ञाताचा रहस्यभेद, पंचमहाभूतांचा मूलभूत शोध आणि मानवी देहमनाचा शोध घेतल्यावर माणूस थांबला नाही. तर त्याने आपले जीवन अधिकाधिक परिपूर्ण आणि सुखपूर्ण तसेच निरामय आणि आनंदपूर्ण व्हावे म्हणून आपल्या बौद्धिक कसबाने आणि विलक्षण प्रज्ञेने विविध ज्ञानक्षेत्रांना जन्म दिला आणि त्यात सातत्यशील अशी नवीनवी भर घातली. जे अज्ञात आहे ते ज्ञानाच्या पातळीवर आणल्यावरही माणूस थांबला नाही तर त्या हाती आलेल्या ज्ञानाचा त्याने आपल्या समृद्धीसाठी आणि अभिवृद्धीसाठी उपयोग करून घेतला. हाती आलेल्या ज्ञानाची व्यवस्था लावली. विज्ञान तंत्रज्ञान सामाजिक शास्त्र आणि कलाव्यवहार या चार क्षेत्रात त्याने हाती आलेल्या ज्ञानाची व्यवस्था लावली. काही निष्कर्ष काढले आणि त्यातून सिद्धांतने बांधली. याचा अर्थ मानवाच्या संशोधनवृत्तीतूनच हे सगळे सांस्कृतिक विश्व उभे राहिले आहे'.

'संशोधन' या संज्ञेचा विविध कोशांमध्ये नोंदवलेला अर्थ उषा मा. देशमुख यांनी साकल्याने नोंदवला आहे, १. सूक्ष्म विचार, मीमांसा, परीक्षा. २. अन्वेषण, पर्यवेक्षण, अनुसंधान, सर्वेक्षण ३. अन्वीक्षा, तत्त्वानुसंधान, मीमांसा ४. शुद्धिकरण, नेटकेपणा, दुरुस्ती, शोध ५ चौकशी, काळजीपूर्वक तपास. ६. तथ्य शोधून काढण्याचा शास्त्रीय प्रयत्न ७. पुरान्वेषण, विचारांची सुसंस्कारित मांडणी. ८. सर्वार्थाने शुद्ध करणे, शोध घेणे, निर्मळ करणे. ९. निर्णय, निष्कर्ष आणि संकेत यांची पुनर्बांधणी १०. प्रशोधन पाहणी, प्रयोग, परिशोधन. ११ वस्तुस्थिती किंवा तथ्य शोधून काढण्याचा केलेला प्रयत्न. १३. सम्यक ज्ञानवृद्धी, परीक्षण, तपासणी व शुद्ध करून सिद्ध करणे. १४. परिशीलन, परीक्षण, संश्लेषण. १५ पुनः पुन्हा घेतलेला शोध. १६. सर्वार्थांने घेतलेला शोध. १७. अर्थपूर्ण, अन्वर्थक, बुद्धिपुरस्पर अभिक्रिया. १८. सर्वांगीण तपास १९. सत्यशोधनाचा शास्रीय प्रयत्न. २० ही वृत्ती आहे. जिज्ञासा आणि सत्यनिष्ठा हे गुणधर्म. २१. सत्यासत्याची ग्वाही. २२. ज्ञान-जिज्ञासा आणि ज्ञानशुद्धता. २३ ज्ञानाचे संवाहन, संदेशन, संवर्धन. २४. शोधचिंतन. शोध अभिकल्यन आणि शोध अभिलेखन २५. ज्ञानाचे पुनर्मूल्यमापन, अज्ञाताचा शोध. संशोधनाचा असा सर्वव्यापी अर्थ लक्षात घेऊनच अनेक संशोधकांनी संशोधन संकल्पनेच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधकासाठी आवश्यक गुणकौशल्ये**

संशोधन करण्यासाठी व त्यात यशस्वी होण्यासाठी संशोधकाच्या अंगी पुढील गुणवैशिष्ट्ये असणे आवश्यक आहे. जिज्ञासा, चिकाटी, श्रमनिष्ठा, चिकित्सक वृत्ती, प्रामाणिकपणा, निर्लेपवृत्ती, गुणग्राहकता, शिस्तप्रियता, संयम, व्यासंगीवृत्ती, धडाडी, कणखर मानसिकता, वाचनाची आवड, अभ्यासूवृत्ती, संशोधन विषयावर अव्यभिचारी निष्ठा इत्यादी गुण संशोधकाच्या अंगी असावेत. वरील गुण संशोधकाने जाणीवपूर्वक अर्जित करायला हवेत. त्याचप्रमाणे संशोधकाच्या अंगी काही कौशल्येही असायला हवेत. उदा. लेखनकौशल्य, संवादकौशल्य, प्रमाणभाषाविषयक लेखननियमांची जाण, संगणक विषयक ज्ञान इत्यादी. ही कौशल्ये हळूहळू विकसित करता येतात. एकदा ही कौशल्ये आत्मसात झाली की आपल्या लेखनाचा आणि संशोधनाचा दर्जा सुधारतो.

## ३.३ संशोधनपर लेखनप्रकार

संशोधनपर लेखनप्रकार हे संशोधनाच्या प्रयोजनाशी, व्याप्तीशी व संशोधनाकडून अपेक्षित असलेल्या अपेक्षेशी निगडित असतात. हे. वि. इनामदार यासंदर्भात म्हणतात. ''लेख (आर्टिकल), निबंध (एस्से), शोध-निबंध (पेपर/रिसर्च पेपर), दीर्घ निबंध (डेझर्टेशन), ग्रंथ (ट्रीटाइज) व प्रबंध (थिसिस) इत्यादी संज्ञा गद्य लेखनातील सुसूत्रता, सुसंगतता, शिस्तबद्धता, अभिजातता व भाष्यपरता या गुणविशेषाच्या चढत्या वाढत्या अपेक्षा व्यक्त करणाऱ्या संज्ञा आहेत.'' याचा अर्थ विद्यार्थिदशेत संशोधनपर लेखनाच्या या एकेक पायऱ्या ओलांडत संशोधनमार्गावर वाटचाल करायची असते. बऱ्याच वेळा विद्यार्थी आधीच्या पायऱ्यांना स्पर्शही न करता एकदम पीएच. डी. साठीच्या प्रबंधलेखनाला हात घालतात; आणि मग संशोधनपद्धती आणि मांडणीबाबत प्रत्येक गोष्टीसाठी मार्गदर्शकांवर अवलंबून राहतात. ही स्थिती चांगली नाही.

संशोधनपर लेखनाचे प्रकार पुढीलप्रमाणे :

### ३.३.१ शोधनिबंधलेखन

महाविद्यालयीन पातळीवर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांची जिज्ञासूवृत्ती प्रचंड प्रमाणात जागी असते. तो सतत काही काही वाचत असतो, ऐकत असतो, जाणकारीने सभोवती बघत असतो. त्यातून त्याला सतत काही प्रश्न पडत असतात. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आता त्याने स्वतः सिद्ध होणे अपेक्षित असते. शालेय स्तरावर अनेक विषयांच्या अनुभवावर आधारलेले वा अनेक विषयांवर स्वप्रतिक्रिया देणारे असे निबंधलेखन त्याने केलेले असते.

महाविद्यालयीन स्तरावर आता त्याच विषयासंदर्भात अधिक चौकशी करत, आपल्या आधी या संदर्भात कोणी कोणी काय काय म्हटले आहे, याचा मागोवा घेत अधिक जबाबदारीने शोधनिबंध लिहायचा असतो. निबंधात मनोगताच्या स्वरूपात लेखन मांडले जात होते. ते आता आधार आणि पुराव्यानिशी मांडणे अपेक्षित असते. आपल्याला जे म्हणावयाचे आहे ते इथे नुसते म्हणून चालत नाही. त्याला ज्ञानक्षेत्रातला आधार द्यावा लागतो. पुरावा द्यावा लागतो. यालाच संदर्भ देणे म्हणतात. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ म्हणून घेतलेल्या संदर्भाची सूची शोधनिबंधाच्या शेवटी नोंदविणे आवश्यक ठरते. या शोधनिबंधाचा आवाका छोटा असला तरी त्यातून काहीएक नवजुळणी वा नव तथ्यप्रकटन व्हायला हवे. केवळ माहितीची जमवाजमव व संकलन म्हणजे शोधनिबंध नव्हे.

मराठी साहित्याच्या संशोधनासंदर्भात विचार करताना असे अनेक विषय वाङ्मयेतिहासाने वा समीक्षेने उपेक्षित ठेवलेले आहेत. त्यांचे मूल्यनिर्धारण नीटपणे झालेले नाही. जागतिक पातळीवर मांडल्या गेलेल्या भाषासिद्धांतांचा आणि आपल्या प्रादेशिक बोलींचा अनुबंध कशा प्रकारे लावता येईल? लोकसाहित्याच्या आजवर झालेल्या अभ्यासातून मानवी जीवनाचे जे आकलन समोर आले आहे, त्यापेक्षा आणखी वेगळे आकलन गवसू शकते. आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या परिप्रेक्ष्यातून मध्ययुगीन साहित्याचे पुनरावलोकन करत नवी तथ्ये शोधता येऊ शकतात. एकाच काळातील दोन भिन्न भाषिक साहित्यिकांची तुलना करत मानवी जीवन आकलनावर काही प्रकाश टाकता येऊ शकतो. साहित्य सिद्धांतांना अनुषंगून साहित्याच्या वाटचालीचा

मागोवा घेत काही तथ्यांची निश्चिती करता येऊ शकतो. विचारविश्वातील सिद्धांत आणि साहित्य यांच्यातील परस्परप्रभाव, परिणाम अभ्यासता येऊ शकतो. सामाजिक चळवळी आणि साहित्य यांचा अनुबंध तपासता येऊ शकतो. समाजाच्या अभ्युदयासाठी लिहिल्या गेलेल्या व परंपरा रक्षणासाठी लिहिल्या गेलेल्या वैचारिक साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येऊ शकतो. वैचारिक साहित्याचा आणि ललितसाहित्याचा अनुबंधात्मक अभ्यासही करता येऊ शकतो. एखादा विशिष्ट कालखंड निवडून वाङ्मयीन प्रेरणा, प्रवृत्ती व जाणिवांचा आणि त्या काळातील साहित्याचा अभ्यास करत काही निष्कर्ष हाती येऊ शकतात. एखाद्या विषयासंदर्भात उपलब्ध ग्रांथिक माहिती अपुरी वाटत असेल तर क्षेत्रीय सर्वेक्षणाने त्या माहितीत भर टाकता येऊ शकते. भाषेचे व्याकरण, अलंकार व लेखकाची भाषानिवड यांचाही स्वतंत्र अभ्यास होऊ शकतो. अनेक लोककलाप्रकारांची स्वरूपनिश्चिती व वैशिष्ट्यनोंद करण्यासाठीही शोधनिबंध लेखन केले जाऊ शकते. शोधनिबंधाच्या लेखनातून, वाचनातून, सादरीकरणातून त्या त्या ज्ञानक्षेत्राचे पाऊल पुढे पडत असते.

शोधनिबंधांतून नवीन विचार, नवीन आकलन समोर येत असते. अशा अनेकानेक शोधनिबंधांचे वाचन व अवलोकन केल्यानंतर आपल्यालाही शोधनिबंधांचे तंत्र अवगत होऊ शकते. मात्र यासाठी विद्यार्थ्यांनी सतत लेखनरत राहायला हवे. निव्वळ थेअरी आत्मसात करून उपयोगाचे नाही. प्रत्यक्ष लेखनसराव करायला हवा. पोहावे कसे या संदर्भात खूप वाचन केले आहे. आणि प्रत्यक्ष पाण्यात मात्र कधीच उतरला नाही अशा विद्यार्थ्याला पोहता येणे शक्य नाही. कोणत्याही लेखनप्रकाराचे तसेच असते. शोधनिबंध लेखनाचा सराव करायला हवा. मार्गदर्शकांकडून त्यातील अधिक उणे नेमकेपणाने जाणून घेत त्यात सुधारणा करायला हवी. सातत्यशील प्रयत्नातून असे कौशल्य अंगी येत असते.

**३.३.२ संशोधन प्रकल्पाचे लेखन**

शोधनिबंधलेखनाप्रमाणेच संशोधनपरलेखनातील आणखी एक लेखनप्रकार म्हणजे शोधप्रकल्प. आज अगदी प्राथमिक, माध्यमिक शिक्षणातही हा शब्द रुळला आहे. आणि कदाचित त्यामुळेच तो इतका अंगवळणी पडला आहे की, एक उरकून टाकण्याची गोष्ट अशी याबद्दलची भावना निर्माण झाली आहे. पण खरे तर ती अशी उरकून टाकण्याची गोष्ट मुळीच नाही. शोधनिबंधामध्ये संदर्भाच्या, पुराव्यांच्या आधारे स्वतःला जे जाणवलं आहे, त्याची मांडणी केलेली असते.हे आकलन व ही मांडणी सरळ सरळ लेखरूपाने केलेली असते. शोधप्रकल्पात मात्र अशी मांडणी करून चालत नाही.

शोधप्रकल्पात आपल्या संशोधनाचा विषय कोणता होता. त्या विषयासंदर्भात कोणती माहिती वा कोणते पूर्वसंशोधन उपलब्ध होते. आपल्या संशोधनाचे नेमके उद्दिष्ट काय होते, गृहीतक काय होते. कोणती साधने त्यासाठी आपण वापरली, माहिती कशी गोळा केली. तिचे विश्लेषण, वर्गीकरण कसे केले, त्यासाठी कोणते निकष वापरले आणि मग शेवटी निरीक्षणांती कोणत्या निष्कर्षाप्रत आपण येऊन पोहोचलो. या सर्व बाबींची तपशिलवार मांडणी इथे अपेक्षित असते. थोडक्यात आपण केलेल्या वा पार पाडलेल्या शोधक्रियेचा साद्यंत अहवाल या लेखनात मांडायचा असतो. एखाद्या विशिष्ट घटक क्षेत्रातील माहिती संकलित करून तिचे यथायोग्य संपादन करीत मांडणी करणे; व या मांडणीतून आपल्या शोध उद्दिष्टाप्रत पोहोचणे हा

प्रकल्पलेखनाचा हेतू असतो. प्रकल्पलेखनामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण, संकलन, चिकित्सा, निवेदन, सादरीकरण आदी क्षमतांचा विकास व्हावा अशी अपेक्षा असते. विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या कल्पकता, सर्जनशीलता या गुणांना प्रकट होण्याची संधी मिळावी, त्यांच्यातील संवादकौशल्यांना, भाषिक कौशल्यांना वाव मिळावा. ज्ञाननिर्मितीतील वाटांची त्यांना ओळख व्हावी. त्यांच्यात श्रमप्रतिष्ठेचे मूल्य रुजावे, संघभावना वाढीस लागावी या हेतूने हे प्रकल्पलेखन अभ्यासक्रमात समाविष्ट केलेले असते.

आपल्याला कोणत्या विषयावर प्रकल्प करावयाचा आहे. त्यातील कोणत्या समस्येसंदर्भात आपण उपाय शोधणार आहोत. आपले नेमके उद्दिष्ट काय आहे. त्या उद्दिष्टप्राप्तीसाठी कोणत्या प्रकाराची माहिती आपल्याला हवी आहे, ती माहिती कोठे व कशी उपलब्ध होऊ शकेल. माहितीचे स्त्रोत कोणते आहेत. माहिती उपलब्ध नसेल तर माहिती उपलब्ध करण्याचे पर्याय कोणते असू शकतील. जमविलेल्या माहितीचे विश्लेषण कोणत्या प्रकारे केले जाणार आहे, संभाव्य निष्कर्ष काय असू शकतात, या सर्वांची मांडणी करणे याचाच अर्थ प्रकल्प आराखडा तयार करणे होय, असा आराखडा एकदा तयार झाल्यानंतर माहितीचे संकलन आणि विश्लेषण करीत निष्कर्षात्मक मांडणी करणे प्रकल्पलेखनात अभिप्रेत असते. हे लेखन संशोधनात्मक असल्याने वस्तुनिष्ठ पद्धतीने व्हायला हवे. या लेखनात व्यक्तिनिष्ठेला स्थान नसते. वैयक्तिक अभिप्राय निष्कर्ष म्हणून स्वीकारले जात नाहीत; तर वस्तुस्थितीचे विश्लेषण करीत नोंदविलेली निरीक्षणे मात्र निष्कर्षांत ग्राह्य धरली जाऊ शकतात.

संशोधन प्रकल्पांना विषयाचे कोणतेही बंधन नसते. विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला, साहित्य अशा कोणत्याही क्षेत्रातील घटकांबाबत प्रकल्पलेखन संभवू शकते. विद्यार्थ्यांनी स्वतःचा कल, स्वतःची आवड व क्षमता जोखून प्रकल्पविषयाची निवड करायची असते. आवडीचा विषय असला तर प्रकल्पलेखनात कंटाळा जाणवत नाही व विशिष्ट कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होतो. प्रकल्पलेखनातून विद्यार्थ्यांना संशोधनात्मक लेखनाचा परिचय व्हावा व संशोधन शिस्त अंगी बाणावी अशी अपेक्षा असते. मराठी साहित्याच्या प्रांतात कितीतरी उपशाखा आज निर्माण झालेल्या आहेत. कितीतरी ज्ञानसंदर्भ उदयाला आलेले आहेत. अनेक प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे उदयाला आली आहेत.

साहित्याच्या वृद्धीसाठी कार्यरत असणाऱ्या शासनपुरस्कृत साहित्यसंस्था, लोकसहभागातून निर्माण झालेल्या संस्था आणि त्यांनी साहित्याच्या अभिवृद्धीसाठी केलेले कार्य, साहित्यसंमेलने, कविसंमेलने, व्याख्यानमाला, विविध नियतकालिकांनी साहित्यप्रसाराला लावलेला हातभार, विविध प्रकाशनसंस्थांनी जोपासलेले साहित्यविश्व, आकाशवाणी व दूरचित्रवाणीवरील विविध प्रकारचे कार्यक्रम, वर्तमानपत्रांच्या साहित्यिक पुरवण्या, वाङ्मयीन नियतकालिके, वाचनालय व त्यांना मिळणारा प्रतिसाद अशा कितीतरी विषयांवर शोधप्रकल्प केले जाऊ शकतात. यासाठी सखोल वाचन मात्र हवे. वाचनाच्या ओघात कितीतरी विषय सापडू शकतात. फक्त त्यासाठी चिंतनात्मक संवेदनशीलता असायला हवी.

आपल्या आवडीच्या प्रांतातला विषय घेऊन संशोधनाला प्रारंभ करायचा असतो. अभ्यासकाला पडलेला प्रश्न जर प्रामाणिक असेल तर संशोधन विषयाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता अगदीच धुसर असते. विषयाची निवड निश्चित झाल्यानंतर त्या विषयाचे शीर्षक निश्चित करणे आवश्यक असते. या शीर्षकनिश्चितीत

अल्पाक्षररमणीयतेची कसोटी लागत असते. विषयाचे स्वरूप नेमके काय आहे आणि त्याचा अभ्यास कोणत्या दृष्टीने होऊ शकतो याच्या शक्यता इथे पडताळून पाहावयाच्या असतात. निवडलेल्या विषयाच्या शीर्षकांची रचना चारपाच प्रकारे करून बघायची असते. प्रत्येक रचनेतील प्रत्येक शब्दाला सहा 'क' कारांनी प्रश्न विचारून विषयाचे कोणते अंतरंग उलगडते, त्याचा अदमास घ्यायचा असतो. विषयाचा अंदाज बांधल्यानंतर मग त्या संदर्भातील अभ्यासपद्धती व मांडणी निश्चित करावयाची असते. त्या विषयाची चिकित्सा करायची, विवेचनात्मक अभ्यास करायचा, की प्रस्तुत विषयाची कशाशी तुलना करायची याचा निर्णय घेत शीर्षकनिश्चिती करायची असते. संशोधनात अनेक वेळा शीर्षकात चिकित्सक अभ्यास, विवेचनात्मक अभ्यास, निवडक असे शब्दप्रयोग केले जातात. हे शब्द समानार्थी गृहीत धरले जातात. प्रत्यक्षात ते तसे नाहीत. या शब्दांच्या उपाय योजनामागील भूमिका नीट समजून घ्यायला हव्यात. असा डोळसपणे केलेला प्रकल्प स्वतःला तर समाधान देतोच देतो, पण ज्ञानक्षेत्रालाही काही योगदान देतो.

### ३.३.३ प्रबंधिका लेखन

एम. फिल्., पदवीसाठी लिहिलेल्या संशोधनप्रकल्पाला प्रबंधिका असे संबोधले जाते. तर पीएच.डी. पदवी साठी लिहिल्या जाणाऱ्या शोधप्रकल्पाला प्रबंध असे संबोधले जाते. या प्रबंधिकेत आणि प्रबंधात नेमका काय फरक असतो. हे नीटपणे समजून घ्यायला हवे. प्रबंधिका आणि प्रबंध यात फक्त आकाराचा आणि पृष्ठांचा फरक असतो की अन्यही काही भेद असतो याचा विचार इथे प्रस्तुत ठरतो. शोधनिबंध, शोध-प्रकल्प यांच्या लेखनाचा सराव झाल्यानंतर संशोधनक्षेत्रातील पदवी प्राप्त करण्याची क्षमता प्रश्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रबंधिका लेखनाला प्रथमतः सामोरे जावे लागते. या प्रबंधिकेचे स्वरूप नेमके कसे असते ते इथे समजून घ्यायचे आहे. शोधप्रकल्प पूर्ण करताना संशोधनाचा परिचय झालेला असतो. प्रबंधिकेचे लेखन करताना विद्यार्थी प्रत्यक्ष संशोधनक्षेत्रात प्रवेश करत असतो. प्रबंधिका आणि प्रबंधलेखन यातील संशोधन प्रक्रिया आणि लेखनप्रक्रिया यात फारसा फरक नसतो. फरक असतो तो संशोधन विषयाची व संशोधनक्षेत्राची व्याप्ती, संशोधनाचे आयाम आणि संशोधनाची खोली यामध्ये प्रबंधिका लेखनासाठी फार अतिव्याप्त नसलेला असा छोटा विषय निवडून संशोधनाच्या कक्षा ठरवून घ्यायच्या असतात. संशोधन प्रकल्पाप्रमाणेच इथे संशोधनाचे उद्दिष्ट निश्चित करून घ्यायचे असते. त्याचप्रमाणे अभ्यासाचा दृष्टिकोन निश्चित करून घ्यायचा असतो. एखाद्या साहित्यकृतीचा, भाषिक समस्येचा, प्रादेशिक लोकसाहित्यप्रकाराचा अभ्यास असा विषय प्रबंधिका लेखनासाठी निवडला जातो. त्यांनतर संशोधन आराखडा तयार करून संशोधन विषयाची प्रकरणनिहाय विभागणी करून संशोधनात्मक लेखन केले जाते. ही विभागणी संशोधनविषय सापेक्ष असते. विषयानुरूप तिचा आकृतिबंध बदलत जातो. साधारण शंभर ते दोनशे पृष्ठांपर्यंतचे लेखन इथे अपेक्षित असते. संशोधनान्ती जाणवलेल्या निरीक्षणांची व निष्कर्षाची नोंद शेवटच्या उपसंहार या पातळीवर व विश्लेषणात्मक पद्धतीने आपल्या उद्दिष्टाप्रत जात असते. थोडक्यात सांगायचे म्हणजे प्रबंधिका हे सर्वार्थाने प्रबंधाचे लघुरूप असते, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

### ३.३.४ प्रबंधलेखन

संशोधनातील पीएच. डी. या सर्वोच्च पदवीसाठी प्रबंधलेखन केले जाते. इथे संशोधन विषयाची व्याप्ती मोठी असते व संशोधन विषयाचे आयाम विस्तृत स्वरूपाचे असतात. प्रबंधात सखोल संशोधन अपेक्षित असते. संशोधन विषयाची निश्चिती झाल्यानंतर त्या शीर्षकांतर्गत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होऊ शकेल व त्या गोष्टींचा परस्परसंबंध कसा असू शकेल याची निश्चिती करत विषयाचे आयाम स्पष्ट करून घ्यायचे असतात. हे आयाम निश्चित झाल्यानंतर संशोधन आराखडा तयार करावयाचा असतो. हा आराखडा तयार करण्यापूर्वी आराखड्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे नीटपणे समजून घ्यायची असतात. व त्याप्रमाणे प्रबंधाची रूपरेषा तयार करावयाची असते. उद्दिष्टे, गृहीतके, उद्दिष्ट सिद्धीसाठीचे मार्ग, पूर्वसंशोधन, माहिती संश्लेषणाचे, विश्लेषणाचे मार्ग वा उपयोजिली जाणारी संशोधनपद्धती या सर्वांचा समावेश करीत संशोधन आराखडा (Synopsis) तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष संशोधनाला प्रारंभ होत असतो. प्रत्यक्ष संशोधनात विषयाला अनुरूप अशा संशोधनपद्धतीचे व साधनांचे अवलंबन करीत, यथायोग्य संदर्भाचा शोध घेत माहितीचे संकलन व विश्लेषण करून संशोधनाच्या प्राप्तव्यापर्यंत जायचे असते. आपल्या शोधप्रकल्पाची नेमकी उद्दिष्टे काय? आपल्याला काय सिद्ध करावयाचे आहे? या विषयीची भूमिका स्वतःशी स्पष्ट करून घेणे आवश्यक असते.

आपल्या संशोधन प्रकल्पाची उद्दिष्ट निश्चिती झाल्यानंतर जो प्रश्न आपल्याला पडला आहे व त्यातून आपल्याला जे जाणवलं आहे, वा आपण जे सिद्ध करू पाहतोय, त्याची गृहीतकाच्या रूपात मांडणी करायची असते. हे गृहीतक (Hypothesis) मग परिस्थितीच्या कसोटीवरती, पुराव्यांनिशी सिद्ध करून दाखवण्याची जबाबदारी संशोधकाची असते. ही सिद्धता समर्पक ठरण्यासाठी मग संशोधनपद्धतींची निश्चिती करत शोधप्रकल्पाची मांडणी करायची असते. आपला शोधप्रकल्प ज्या विषयासंदर्भात असेल त्या विषयासंदर्भातील पूर्वसुरींच्या संशोधनाचा मागोवा संशोधनाचा आरंभ करण्यापूर्वीच घ्यायचा असतो. अन्यथा जे आधीच कोणीतरी संशोधित करून ठेवलं आहे. त्याचीच पुनरावृत्ती होण्याची व वेळ वाया जाण्याची शक्यता असते. आपल्या गृहीतकाची सिद्धता व त्या सिद्धतेची सविस्तर मांडणी असेच आपल्या शोधप्रकल्पाचे स्वरूप असते. येनकेनप्रकारे आपले गृहीतक सिद्ध झालेच पाहिजे असा आग्रह इथे धरण्याचे कारण नाही. असा आग्रह म्हणजे खरे तर दुराग्रह ठरण्याचीच शक्यता असते. या आग्रहापोटीच मग बऱ्याच वेळा निवडलेल्या विषयाची महती गाईली जाते. आपण निवडलेला लेखक कसा श्रेष्ठ आहे, हे सांगितले जाते. लेखकासंदर्भात आपण निश्चित केलेले गृहीतक फसले आहे. गृहीत धरल्यापेक्षा संशोधनान्ती वेगळेच वास्तव समोर आले असेल तर ते वास्तव मांडत गृहीतकाच्या विरोधी जाणारे निष्कर्ष मांडण्याचे धाडस संशोधकाने दाखवायला हवे, आणि संबंधित मूल्यमापनयंत्रणेनेही ते स्वीकारायला हवे. तटस्थपणे वस्तुनिष्ठ वास्तव मांडण्यातच संशोधनाची इतिकर्तव्यता सामावलेली असते. हे संशोधकाने नेहमीच लक्षात ठेवायला हवे. विगमनात्मक, निगमनात्मक अशा दोन्ही पद्धतींनी इथे संशोधनप्रक्रिया पार पाडली जात असते. इतर संशोधनपद्धतीचे व संशोधनतंत्राचे साह्य इथे आवर्जून घेतले जाते. अशा प्रकारे संशोधन शिस्तीला धरून

लिहिलेल्या प्रबंधातील निष्कर्ष विशिष्ट सर्वमान्य पद्धतीने काढलेले असल्याने स्वीकारार्ह ठरवले जात असतात. त्यामुळेच प्रत्येक प्रबंधाने त्या त्या ज्ञानक्षेत्रात मोलाची भर घालावी अशी अपेक्षा असते.

## ३.४ संशोधनाची लेखनपद्धती

संशोधनाची मौलिकता नवीन तथ्यांचे प्रकटन करण्यावर जशी अवलंबून असते तशी ती या तथ्यांची मांडणी कशा प्रकारे केली जाते त्यावरही अवलंबून असते.

आपले लेखन (हस्ताक्षर वा मुद्रित स्वरूपातील) आपली निर्मिती असते. लेखन निर्दोष असावे. त्यात विरामचिन्हांचा यथायोग्य वापर केलेला असावा. कारण विरामचिन्हे ही अर्थान्वेषक असतात. विरामचिन्हांवर आपल्या लेखनाची अर्थाभिव्यक्ती अवलंबून असते. लिखित मजकूर अधिकाधिक निर्दोषरीत्या मुद्रित होणे आवश्यक असते. त्यासाठी मुद्रितशोधन करण्याची आवश्यकता असते. मूळ लिखित मजकूर व मुद्रित मजकूर यात साम्य आहे की नाही? आणि मुद्रित मजकूर विषयक लेखन प्रमाण नियमांना अनुषंगून मुद्रित झाला आहे की नाही? याची बारकाईने पाहणी करणे म्हणजेच मुद्रितशोधन. विशिष्ट खुणांच्या साहाय्याने मुद्रित मजकुरातील दोष वा चुका निर्देशित करायच्या असतात, जेणे-करून टंकलेखकाला वा डी. टी. पी. करणाऱ्यांना त्या दुरुस्त करता येतील. निर्दोष मुद्रणाचा आग्रह हा ज्ञानव्यवहाराच्या दर्जासाठी अतिशय आवश्यक घटक मानला जातो. संशोधनपरलेखनात मुद्राराक्षसाचा विनोद हा विनोद न राहता बराच अनर्थकारी ठरू शकतो.

आपले आकलन मांडत असताना शब्दबंध, उपवाक्य, वाक्य यांचा क्रम व मांडणी नीट अर्थबोध होणारी असावी. या सगळ्या वाक्यांमधून जो परिच्छेद तयार होईल तो एक विशिष्ट असा आशयबंध व्यक्त करणारा असावा. या आशयबंधामध्ये असणारा कालक्रम लक्षात घ्यावा की हे जेणेकरून त्यात पुनरावृत्ती होणार नाही. आपली विधाने ठाम असावीत. एकमेकांना छेद देणारी नसावीत. आपले लेखन पूर्ण झाल्यांनतर आपण ते एकदा तरी वाचावे. म्हणजे त्यातील वैगुण्ये लक्षात येतात. ही वैगुण्ये वजा करीत प्रबंधलेखन पूर्णत्वास न्यावयाचे असते.

वाक्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक शब्दात वाक्यांच्या एकूण प्रकृतीला अनुसरून काही विकार होत असतात. ह्या विकारयुक्त शब्दांतूनच वाक्यातील इतर शब्दांची विकारयुक्त रूपे निश्चित होत असतात. हे शब्दच परस्परांची रूपनिश्चिती करत असतात. वाक्यात घडणाऱ्या शब्दांच्या या अभिक्रियांतून विशिष्ट व्याकरणिक रचना निर्माण होत असतात. या व्याकरणिक रचनांना प्रमाण मानत भाषेची वाटचाल असते. यासाठी वाक्यात व्याकरणिक संगती असावी तरच आशयाची संगती लागू शकते. कर्तरी-कर्मणी प्रयोगाचे भान बाळगणे आवश्यक असते. वाक्याचा व परिच्छेदाचा काळ एकच असावा. वाक्यरचनेतील काळाची संलग्नता सांभाळली जाते की नाही या संदर्भात दक्षता बाळगायला हवी. एका वाक्यात साधा वर्तमान काळ, दुसऱ्या वाक्यात चालू वर्तमान काळ, तर तिसऱ्या वाक्यात पूर्ण वर्तमानकाळ अशी रचना विवेचनाला मारक ठरणे. लेखनाच्या पुनर्वाचनात अशी विसंगती लक्षात येऊ शकते व दुरुस्त करता येऊ शकते. कर्ता-कर्म-क्रियापद यांचा योग्य तो अपेक्षित क्रमच वापरावा उदा. मुले उन्हात उभे होते. अशी रचना अव्यावहारिक ठरते.

त्याऐवजी मुले उन्हात उभी होती. मुले शाळेत गेली आहे, इथे मुले हा कर्ता अनेकवचनी असल्याने अशी रचना अव्याकरणिक ठरते. त्याऐवजी मुले शाळेत गेली आहेत. अशी वाक्यरचना असायला हवी. थोडक्यात सांगायचे म्हणजे वाक्यातील उद्देश्यविस्तार आणि विधेयविस्तार सुसंगत असायला हवेत. ज्या ज्या शब्दांच्या लेखनाविषयी साशंकता असेल असे शब्द निवडून ते शब्दकोशातून पाहून घ्यावेत. उदा. शारीरिक, अध्यात्म-आध्यात्मिक, लौकिक, महत्त्व, तत्त्व, अस्तित्व इत्यादी. यासाठी छोटासा शब्दकोश नेहमी जवळ बाळगावा. शब्दांमधील जोडाजोड व तोडातोड नीट लक्षात घ्यायची हवी. कल्पनारम्यता हा शब्द कल्पना रम्यता असा लिहिल्यास त्याचा अर्थ बदलतो. उदा. संचारी भाव-संचारीभाव, त्यानेही (ही संलग्नता दर्शक) त्याने ही (ही सर्वनाम) वाचतानाच शब्दरूपांचे निरीक्षण करून लक्षात ठेवायचे असते. साध्या शब्दांच्या चुका आपल्या ज्ञानाविषयी साशंकता निर्माण करू शकतात.

## ३.५ संशोधनातील पथ्ये

आपल्या दररोजच्या जगण्या वागण्यात ज्याप्रमाणे वर्तनाची अपेक्षा असते त्याप्रमाणे संशोधनाच्या क्षेत्रातही असते. संशोधक, विद्यार्थी आणि मार्गदर्शक दोघांनीही ती पाळायची असते. संशोधनाचा हेतू, मार्गदर्शनाचा हेतू आणि संशोधनातील नैतिकता यांचा फार जवळचा संबंध असतो. ज्ञानमार्गावर चालताना काही प्रश्न पडले, ते सोडवावे वाटले, त्या निमित्ताने संशोधन करून ज्ञानक्षेत्रात काही भर टाकावी यासाठी संशोधन सुरू असेल, व याच प्रेरणेने मार्गक्रमण करत असतील तर नैतिकता आपोआपच सांभाळली जाते. मात्र संशोधनामागे अशा निखळ हेतूऐवजी अन्य हेतू कार्यरत असतील तर नैतिकेसंदर्भात समस्या निर्माण व्हायला वेळ लागत नाही. फक्त पदवी मिळवायची आहे, पदवीने नोकरी मिळणार आहे. पदोन्नती हवी आहे. समाजात प्रतिष्ठा हवी आहे.

संशोधनात आपले लेखन आपणच करायचे असते. दुसऱ्याकडून लिहून घ्यायचे नसते. दुसऱ्याचे लेखन, संशोधन स्वतःच्या नावावर छापायचे नसते. ज्यांच्या ज्यांच्या पुस्तकातून संदर्भ घेतले असतील त्यांचा यथायोग्य निर्देश करायला हवा. बऱ्याच वेळा एखाद्या परिच्छेदात संदर्भाची नोंद करून अन्य परिच्छेद स्वतःचे लेखन म्हणून नोंदविण्याचा प्रकार दिसून येतो. वाङ्मयचौर्य वा संशोधनचौर्य गुन्हा आहे. दंडनीय अपराध आहे. त्यामुळे ज्ञानक्षेत्राचे पाऊल पुढे तर पडत नाहीच उलट त्यांची हानी मात्र होते. ही हानी टाळायची असेल तर संशोधन क्षेत्राशी संबंधित सर्वच घटकांनी नैतिकता सांभाळत प्रामाणिकपणे संशोधनरत राहायला हवे.

## ३.६ संशोधनपर लेखनाची भाषा

संशोधनपर लेखनाची भाषा प्रौढ प्रगल्भ असते. वस्तुनिष्ठा झाकोळली जाईल अशी आलंकारिक भाषा इथे वर्ज्य असते. आलंकारिक भाषेमुळे विवेचनातील वस्तुनिष्ठता शबल होते. संशोधनलेखनात व्यक्तिनिष्ठेपेक्षा वस्तुनिष्ठेला प्राधान्य असल्याने केवळ व्यक्तिगत प्रतिक्रिया देऊन चालत नाही. आपल्या व्यक्तिगत प्रतिक्रिया वा निष्कर्ष यांना सार्वत्रिकता वा किमान स्वीकारार्हता लाभावी अशी संशोधकाची अपेक्षा असेल तर त्यासाठी तर्काच्या कसोटीवर या प्रतिक्रिया वा निष्कर्ष खरे उतरण्यासाठी पुराव्यांची आवश्यकता असते. हे पुरावेही

विश्वासार्ह हवेत. लेखनात पुराव्यांची यथोचित मांडणी अपेक्षित असते. विरोधी बाजूचे पुरावे दडवून ठेवत, सोईचे पुरावे मांडत केलेले प्रतिपादन स्वीकारार्ह ठरत नाही. असे लेखन संशोधकाच्या तटस्थतेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरू शकते.

समीक्षेची एक विशिष्ट परिभाषा असते. त्या परिभाषेतच लेखन होणे अपेक्षित असते. लेखकाच्या आशयाविषयी व अभिव्यक्ती वैशिष्ट्यांविषयी वापरावयाच्या विशेषणांमध्ये वैविध्यता असायला हवी. त्याच त्या विशेषणांची पुनरावृत्ती करू नये. संशोधनात्मक लेखन करताना समीक्षेतील काही संज्ञा संकल्पनांचे उपयोजन बऱ्याच वेळा अपरिहार्य असते. अशा वेळी नवसंशोधकाने या संकल्पनांचे विविध कोशवाङ्मयामध्ये स्पष्ट केले गेलेले स्वरूप व नमूद केलेल्या अर्थच्छटा एकदा नीटपणे आकलन करून घेणे अत्यंत गरजेचे असते. नवसंशोधकाने या कोशसाहित्यातून आपल्या नित्य गरजेच्या संकल्पनांचे स्पष्टीकरण जाणून घ्यावे म्हणजे लेखनात अधिक नेमकेपणा येऊ शकतो. संकल्पनांच्या अर्थच्छटा स्पष्ट नसतील तर लेखनाची दिशा चुकू शकते. विवेचनातील वस्तुनिष्ठेला आणि नेमकेपणाला बाधा येऊ शकते. संशोधक आणि मार्गदर्शक दोघांनाही या संदर्भात दक्षता घेणे आवश्यक आहे.

संशोधनपर लेखनात वारंवार येणारे काही शब्दांचे वा संकल्पनांचे अर्थ जाणीवपूर्वक समजून घेणे गरजेचे असते. उदा. संकलन, आकलन, संपादन, वर्गीकरण, विश्लेषण, संश्लेषण, पृथक्करण, परिचय, परीक्षण, समीक्षण, स्वरूपविवेचन, मीमांसा, प्रतिपादन, व्याख्या, भाष्य, विवरण, अभिप्राय, प्रतिक्रिया, युक्तिवाद, प्रतिवाद, संक्षेप-विस्तार, निरीक्षण-निष्कर्ष, टीप-टिपा, उद्देश, उद्दिष्ट-उद्दिष्टे, वैशिष्ट्य-वैशिष्ट्ये, विषय, आशय, संहिता, पाठ, भाषांतर, अनुवाद, रूपांतर, माध्यमांतर, कलांतर अशा अनेक शब्दांचे, संकल्पनांचे अर्थ आधी निश्चित करणे व ते नीट आत्मसात करणे आवश्यक असते. संशोधनपर लेखनाला प्रांरभ करण्यापूर्वी काही पूर्वतयारी करावयाची असते. या पूर्वतयारीचा भाग म्हणून स्वतःशीच या संज्ञा संकल्पनाची अर्थनिश्चिती आवश्यक असते.

संशोधनपर लेखनात कालौघात काही लेखनसंकेत निर्माण झालेले आहेत. हे संकेत नीट समजून घ्यावे लागतात. लेखनरीती व परिभाषा समजून घ्यावी लागते. प्रत्यक्ष लेखनाअगोदर संदर्भसूची, संदर्भटिपा, तळटिपा, निर्देशसूची, ग्रंथवर्णन, संदर्भग्रंथ सूची, परिशिष्टे, प्रस्तावना, समारोप, उपसंहार, निष्कर्ष आदी संकल्पना स्पष्ट करून घ्यावात. ग्रंथनोंद, संदर्भसूचीतील नोंदी, 'तत्रैव', 'उनि' या संकल्पनांचे उपयोजन नीट समजून घ्यावे. यासाठी संशोधन या विषयावर अनेक संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. 'अकारविल्हे' ही एकदा नीट समजून घेऊन तिचे उपयोजन कोठे प्रस्तुत व कोठे अप्रस्तुत हे निश्चित करून घ्यावे. शब्दांची, नामांची (नाव आधी की आडनाव आधी यातील क्रम) अकारविल्हे रचना करताना त्यांच्या क्रमवारीत वा मांडणीत कराव्या लागणाऱ्या बदलांमध्ये एकवाक्यता असावी.

मुद्दा व उपमुद्दा यांच्या अंतर्गत येणारे विवेचन त्या त्या मुद्द्यांशी समर्पक असावे. मुद्दा व उपमुद्दा यांना क्रमांक देताना. १, १.१, १.२, १.३, २, २.१, २.१.२ अशी पद्धती अधिक सोईस्कर ठरते. अ, ब, क, ड वा अ, आ, इ, ई असे क्रमाने उपमुद्दे वाढत गेल्यानंतर पुढे पुढे गैरसोईचे ठरतात. विषयविवेचन नेमक्या शब्दात व्हायला हवे. कथा- कादंबरीच्या कथानकाला शब्दबद्ध करणे असो, आशयविवेचन असो वा

अभिव्यक्तीविषयीचे भाष्य असो....अत्यंत मोजक्या व यथोचित शब्दांत ही मांडामांड व्हायला हवी. संशोधनपरलेखन हे साधे सरळ प्रतिपाद्य असते. त्यामुळे त्यामध्ये उपरोध उपहासाच्या लपेटी असून चालत नाहीत. अतिशयोक्ती तर अशा लेखनात पूर्णतः वर्ज्य असते. वक्रोक्तीलाही येथे स्थान असू शकत नाही. आपल्या भाषेतून कोणाचे सांस्कृतिक स्थान दाखवले जाणार नाही याची काळजी घ्यायला हवी. भाषेच्या समाजिक वाटचालीत काही शब्दांना विशेषणांना हेटाळणीवजा दूषित अर्थ लाभलेले असतात. उदा. मारवाडी, सरदारजी, बामण, हजाम इ. असे शब्द वापरू नयेत.

## ३.७ स्वाध्याय

प्रश्न-१ योग्य पर्याय निवडा

१. संशोधनाच्या प्रक्रियेला प्रारंभ कोठून होतो?

अ) विषय निवड ब) संशोधन पद्धती निवड

क) संशोधनाची भाषा ड) यापैकी नाही

२. ''संशोधन म्हणजे शोध घेणे, चौकशी करणे, काळजीपूर्वक तपास करून सत्यशोधण्याचा शास्त्रीय प्रयत्न करणे'' अशी व्याख्या कोणी केली आहे.

अ) दु. का. संत ब) उषा देशमुख क) सु. रा. चुणेकर ड) वसंत जोशी

३. शोधनिबंधाच्या सर्वात शेवटी आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ काय जोडावी लागते?

अ) परिशिष्टे ब) निष्कर्षसूची क) संदर्भग्रंथसूची ड) नकाशे/आकृत्या

४. कोणत्या लेखनामुळे विद्यार्थ्यांमधील निरीक्षण, संकलन, चिकित्सा, निवेदन, सादरीकरण, संवादकौशल्य आणि भाषिक कौशल्य या क्षमतांचा विकास होतो?

अ) प्रबंधिकालेखन ब) प्रबंधलेखन क) शोधनिबंधलेखन ड) प्रकल्पलेखन

५. संशोधनातील कोणत्या सर्वोच्च पदवीसाठी प्रबंधलेखन केले जाते?

अ) एम. फिल. ब) पीएच.डी. क) डी.लिट. ड) यापैकी नाही

उत्तरे : १) अ, २) ब, ३) क, ४) ड, ५) ब

प्रश्न-२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. संशोधनाच्या वेगवेगळ्या व्याख्यांधारे संशोधन संकल्पना स्पष्ट करा.

२. संशोधनाचे वेगवेगळे लेखनप्रकार सविस्तर सांगा.

प्रश्न-३ लघुत्तरी प्रश्न

१. संशोधनाच्या लेखनपद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

२. संशोधनासाठी आवश्यक गुणकौशल्ये कोणती.

३. संशोधनाच्या स्वरूपाविषयी थोडक्यात चर्चा करा.

प्रश्न-४ टिपा लिहा.

१. संशोधनातील पथ्ये

२. संशोधनपर लेखनाची भाषा

३. प्रबंधलेखन पद्धती.

## ३.८ अधिक वाचन


१. देशमुख, उषा : मराठी संशोधन विद्या, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.

२. कऱ्हाडे, सदा : संशोधन सिद्धांत आणि पद्धती, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, १९९७.

३. चुनेकर, सु. रा. : भाषा व साहित्यसंशोधन, खंड-३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८९.

४. राणे, श. रा. : मराठी साहित्यसंशोधन : स्वरूप व दिशा, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, १९९४.

५. कुलकर्णी, व. दि. : भाषा व साहित्यसंशोधन - खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९९१.

६. देशमुख, उषा : साहित्यशोधनी, निहारा प्रकाशन, १९८९.


❑❑❑

# घटक – ४
# आंतरजालावरील (Internet) मराठी

**घटक संरचना**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ आंतरजालावरील मराठीविषयक लेखनाचे स्वरूप
४.३ नोंदीलेखन
    ४.३.१ मराठी विश्वकोश नोंदीलेखन
    ४.३.२ विकिपीडियावर नोंदीलेखन
४.४ आंतरजालावरील मराठी संकेतस्थळांचा परिचय
    ४.४.१ राज्य मराठी विकास संस्था
    ४.४.२ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
    ४.४.३ भाषा संचालनालय
    ४.४.४ मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन
    ४.४.५ मराठी साहित्य परिषद, पुणे
    ४.४.६ विश्वकोश मंडळ
    ४.४.७ इतर संकेतस्थळे
४.५ प्रात्यक्षिकासह आंतरजालावर मराठीविषयक लेखन
४.६ स्वाध्याय

## ४.० उद्दिष्टे

१. माहिती तंत्रज्ञान आणि आंतरजालाचे स्वरूप कळेल.

२. आंतरजालावरील लेखनपद्धती समजतील.

३. आंतरजालावरील मराठीविषयक लेखनाचे स्वरूप समजेल.

४. मराठी टंकलेखनाच्या पद्धती कळतील.

५. मराठी विश्वकोश, विकिपीडियावर नोंदीलेखन कसे करावे हे कळेल.

६. आंतरजालावरील मराठी संकेतस्थळांचा परिचय होईल.

७. आंतरजालावर मराठीविषयक लेखनाचे प्रात्यक्षिक कळेल.

## ४.१ प्रास्ताविक

मराठी ही भारतातील अधिकृत बावीस भाषापैकी एक प्रमुख भाषा आहे.ती जगातील दहाव्या क्रमांकाची तर भारतात बोलल्या जाणाऱ्या भाषांतील तिसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. मराठी भाषा ही इंडो-युरोपीय कुळातील आहे. महाराष्ट्र राज्याची अधिकृत, तर गोवा या राज्याची सहअधिकृत भाषा आहे. भारतात नऊ कोटींपेक्षा जास्त लोक मराठी भाषा बोलतात. त्यामुळे मराठी महत्त्वाची भाषा बनली आहे. मध्यप्रदेश सरकारनेही सुरुवातीला मराठीला अधिकृत भाषेचा दर्जा दिला होता. महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक या राज्यांत मराठी भाषा बोलणारांची संख्या मोठी आहे.

राज्यकारभाराची भाषा म्हणून मराठीचा वापर यादवकालापासून होत होता, असे दिसून येते. यादवकाळातील मराठीतील शिलालेख आणि ताम्रपट याची साक्ष देतात. याच काळात संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या अभंग रचनांनी मराठी भाषेला समृद्ध केले. पुढे मुस्लीम सत्ताधीशांच्या काळात ही परंपरा खंडित झाली. या कालखंडात फारसी भाषेतील शब्दांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक झाल्यानंतर शिवशक सुरू केले. त्यांनी अष्टप्रधान मंडळ स्थापन केल्यानंतर त्यांच्यासाठी संस्कृत पदनामे वापरली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी राज्यव्यवहारकोश तयार करून घेतला. त्यामध्ये दीड हजार फारसी शब्दांना पर्यायी संस्कृत शब्द आणले. त्याचप्रमाणे लेखनपद्धती सांगणारी 'मेस्तके' आणि अधिकाऱ्यांच्या कामासंबंधातील 'कानुजावते' बनवण्यात आली. यावर आधारित कार्यालयीन पत्रव्यवहार पद्धती सांगणारा 'लेखनकल्पतरू' हा ग्रंथ तयार झाला. पेशवे काळात राज्यकारभाराची भाषा म्हणून संस्कृत-फारसी मिश्र संकरित मराठी भाषेचे स्वरूप चालू राहिले. संस्थानिक काळात राज्यकारभारात इंग्रजी शब्दांचा समावेश होऊ लागला. जत संस्थानात 'राजपत्र' हा गॅझेटसाठीचा प्रतिशब्द १९३५ पासून वापरण्यात येत होता. शिवकालीन राज्यव्यवहार कोशामध्ये यासाठी 'राजपत्रक' शब्द वापरण्यात आला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात, भारताच्या संविधान निर्मितीनंतर मध्यप्रदेश सरकारने हिंदी आणि मराठी भाषांना राजभाषा म्हणून मान्यता दिली. तसेच हिंदी आणि मराठी तज्ज्ञांची एक समिती नेमली. स्वतंत्र भाषाविभाग स्थापन केला. १९५६ पर्यंत मराठी ही मध्यप्रदेशची राजभाषा होती. बडोदे संस्थानात 'श्रीसयाजीशासन शब्दकल्पतरू' हा बहुभाषिक प्रशासन कोश तयार करण्यात आला. त्यामध्ये इंग्रजी शब्दांना संस्कृत, हिंदी, मराठी आणि गुजराती पर्याय देण्यात आले. हीच पार्श्वभूमी महाराष्ट्रातील मराठी भाषेच्या विकासासाठी उपयुक्त ठरली.

मराठी भाषेचा प्रसार करणे आणि जतन करणे यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याची गरज आहे. भाषेला टिकवून ठेवायचे असेल तर तंत्रज्ञान जसे बदलेल, तसे भाषेला त्या तंत्रज्ञानात बसवणे आणि वापरणे हा सर्वात महत्त्वाचा भाग ठरतो. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकाचा विकास झाला. संगणक मोठ्या प्रमाणात वापरले जाऊ लागले.त्यानंतर 'सी-डॅक'सारख्या संस्थांनी भारतीय भाषांना संगणकानुकूल बनवण्यासाठी मोठे कष्ट घेतले आणि आज आपण संगणकावर मराठी भाषेचा सहज आणि चांगला वापर करू शकतो.संगणक क्रांतीच्या पाठोपाठ आंतरजाल प्रक्रियेने वेग घेतला आणि दळणवळणाचे, पत्रलेखनाचे

सारे संदर्भ बदलले. टेलिग्राफ यंत्रणा, आंतरजाल तंत्रज्ञानाने मोडीत काढली आहेच; पण आता दूरध्वनीही इतिहासजमा होण्याच्या वाटेवर आहे.आंतरजालाच्या माध्यमातून संपूर्ण समाजासाठी जसे संदेश प्रसृत करता येतात, तसेच वैयक्तिक संदेशही पाठविता येणे शक्य झाले. खरेतर वैयक्तिक संदेशांची सुरुवात प्रथम झाली आणि नंतर समाजमाध्यमांचा विकास झाला. मात्र संवादाच्या तंत्रज्ञानातील बदलामुळे कोणत्याही भाषेला त्या तंत्रज्ञानास अनुकूल बनवणे किंवा ते तंत्रज्ञान आपल्या भाषेतून वापरण्याची सोय किंवा सुविधा निर्माण होणे हे अत्यंत आवश्यक बनले. केवळ आपल्या भाषेचा वापर करता येत नाही म्हणून अनेक लोक कामचलाऊ का होईना, इतर भाषा शिकण्याचा पर्याय निवडतात.

विसाव्या शतकाच्या अखेरीस संगणकाचा वापर अपरिहार्य बनू लागला.छपाई तंत्रज्ञान बदलले. ऑफसेट तंत्रज्ञान आल्यानंतर तर संगणकाचा वापर फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. पूर्वीचे खिळ्या–ठोकळ्याचे तंत्रज्ञान इतिहासजमा झाले आणि संगणकावर पान लावण्याचे तंत्रज्ञान स्वीकारणे काळाची गरज बनले.काळाची पावले ओळखत वर्तमानपत्रांनी हे तंत्रज्ञान सर्वात अगोदर स्वीकारले.सुरुवातीला संगणकाला घाबरणारे हातही सहजपणे संगणक हाताळू लागले. की–बोर्ड, माऊस, सीपीयू, हार्डडिस्क, फ्लॉपी, सीडी हे शब्द मराठीतही वापरले जाऊ लागले. मराठी पुस्तक आणि नियतकालिके प्रकाशन व्यवसायासाठी संगणकावर मराठी भाषा वापरणे गरजेचे झाले आणि १९८० ते ९० च्या दशकात त्याचा वापर अगदी तालुका पातळीपर्यंत पोहोचला. मात्र हे तंत्र क्लिष्ट होते. त्यासाठी विशेष प्रशिक्षण घेतलेली मंडळी काम करू लागली.

त्यानंतर आंतरजालाचे तंत्रज्ञान आले. यानंतर मराठी भाषा संगणकावर सहजपणे हाताळणे अनेक लोकांसाठी आवश्यक बनले. अँड्रॉइड भ्रमणध्वनी आल्यानंतर तर मराठी भाषा सहज टंकलिखित करणे ही प्रत्येक मराठी भाषकाची गरज बनली. त्यानुसार फाँटचा विकास करण्यात तंत्रज्ञ गुंतले. त्यांच्या प्रयत्नातून आज विविध युनिकोड टंक (फाँट) उपलब्ध आहेत. त्यामुळे संगणकावर मराठी लेखन हे आज सहजशक्य झाले आहे. संगणकावर किंवा भ्रमणध्वनीवर मराठी लेखनासाठी विविध पद्धती उपलब्ध आहेत. संगणक किंवा भ्रमणध्वनीवर मराठी भाषेत टंकलेखन करता आले की त्याचा आंतरजालावर वापर करणे शक्य होते. आपल्या मनातील भावभावना जेवढ्या सहजपणे मातृभाषेतून व्यक्त होऊ शकतात, तेवढ्या अन्य भाषांतून नाही.त्यामुळे आंतरजालावर, संगणकावर आणि भ्रमणध्वनीवर मराठी भाषेचा वापर करता येणे ही आजच्या काळाची गरज आहे. मराठी भाषेचा वापर करता आल्यास अनेक संधी आज खुल्या होऊ शकतात.

वर्तमानपत्राच्या क्षेत्रातील बदल फार लवकर आणि मोठ्या प्रमाणात झाले आहेत. ते सहज लक्षात येतात. वर्तमानपत्र छपाईच्या क्षेत्रात काही वर्षापूर्वी बातमी पाठवणारे बातमीदार, त्यावर संस्करण करणारे संपादकीय विभागातील कर्मचारी, त्यांनी अंतिम केलेल्या बातमीची अक्षर जुळणी करणारे, त्या अक्षर जुळणीनंतर मुद्रितशोधन करणारे, पानाची रचना करणारे असे अनेक कर्मचारी मिळून वर्तमानपत्राची पाने तयार करत. आज बातमीदार संगणकावर बातमी तयार करून थेट पाठवत असल्याने ज्यांच्याकडे ही सर्व कौशल्ये असतील, तो सहज नोकरी प्राप्त करतो. मुद्रितशोधनाची सुविधा संगणक प्रणालीमध्ये करण्यात येते.त्यामुळे संगणकावर जो मराठी लेखन करू शकतो, तो महत्त्वाचा कर्मचारी बनू लागला. अक्षरजुळणी करणारा जो

संगणकावर मराठीचा वापर करण्याचे तंत्रज्ञान आत्मसात करू शकला, त्यांची नोकरी टिकू शकली. आजतर संगणकाचा वापर करू न शकणारा निरक्षर मानला जातो.

## ४.२ आंतरजालावरील मराठीविषयक लेखनाचे स्वरूप

एकदा संगणकावर काम करण्याची सवय झाली की आंतरजालावर मनमुराद काम करण्याचा आनंद आपणास लुटता येतो. ई- मेलद्वारे आपल्या मित्रमैत्रिणींशी संपर्क साधता येतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आता शिक्षण घेत असतानाच आपले ई-मेल खाते असणे आवश्यक आहे. विविध परीक्षांसाठी अर्ज भरत असताना पुढील सूचना ई-मेल संदेशातून देण्यात येतील, असे कळवण्यात आलेले असते. त्यामुळे ई-मेल खाते काढणे आणि ते वारंवार तपासणे हे स्पर्धेच्या युगात अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे भावी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी संगणकावर आणि आंतरजालावर मराठी भाषेचा वापर हा एक महत्त्वाचा टप्पा बनला आहे.

संगणकाने आज वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही क्षेत्रांत शिरकाव केला आहे. अद्ययावत माहिती मिळवणे, मित्र, आप्तेष्टांच्या संपर्कात राहाणे, आवश्यक माहिती आंतरजालावर शोधणे, वाचणे आणि लिहिणे हे सर्वच महत्त्वाचे ठरत आहे.मराठीतून नेमकी माहिती मिळवायची असल्यास आणि आपल्या भाषेतील नेमके साहित्य शोधायचे, वाचायचे असेल तर मराठी टंकलेखन हे अत्यावश्यक बनते. महाराष्ट्र शासनाने आपले सर्व कामकाज मराठीतून सुरू केल्यानंतर आणि त्यासाठी संगणक प्रणाली विकसित केल्यानंतर तर संगणकावर मराठी भाषेचा वापर आपल्यासाठी आवश्यक झाला आहे. शासकीय कार्यालये, वीजमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्थाकडे अर्ज करतानाही मराठी भाषेचा वापर अनिवार्य बनत आहे. आजही अनेक लोक संगणक साक्षर नसल्याने अशी कामे करून देणाऱ्या केंद्रात जातात. लोकांना संगणकाचा वापर करून लोकांना साहाय्य करणारे लोक चांगले अर्थार्जन करत आहेत. संगणक निरक्षर लोकांची ही कामे जे चांगल्या प्रकारे करू शकतात, त्यांना मोठे काम मिळते. आज अनेक नियतकालिके आणि प्रकाशने ही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रकाशित होत आहेत. त्यांच्या संपादक मंडळाकडूनही त्यांच्या गरजेच्या स्वरूपात संगणकावर तयार केलेले साहित्य मागणी केले जाते. हे साहित्य ई-मेल संदेशस्वरूपात पाठवावे, अशा सूचना असतात. आपण जर तशा स्वरूपात लेखन पाठवले तरच त्याला वेळेत प्रसिद्धी मिळू शकते.

आंतरजाल हा ज्ञानाचा महासागर आहे. त्यातील नेमके मोती वेचावयाचे असतील तर आपल्याला ज्या विषयाची माहिती हवी ती नेमक्या शब्दांत शोधयंत्राला (सर्च इंजिन) सांगावी लागते. ती जर मराठीतून शोधायची असेल तर शोधयंत्रालाही ती मराठीतून विचारावी लागते. गुगल हे आजचे सर्वात लोकप्रिय शोधयंत्र आहे. इतरही शोधयंत्रे आहेत; मात्र सर्वाधिक गुगलच वापरले जाते.आज युनिकोड पद्धतीशी अनुकूल असणारे टंकच (font) जागतिक पातळीवर प्रमाण मानले जातात. युनिकोड टंक हे जागतिक पातळीवर विविध कार्यकारी प्रणाली (operating system), न्याहाळक (browsers), ई-मेल सेवा प्रदाते (email service providers), शोधयंत्रे (search engines) यांच्याबरोबर कोणत्याही अडथळ्याविना जुळवून घेतात. भारत सरकारच्या निर्देशानुसार सर्व शासकीय संकेतस्थळे आणि इतर सॉफ्टवेअर प्रणाली युनिकोडशी अनुकूल असणे आवश्यक आहेत. दिवसेंदिवस संगणकाचा वापर वाढत जाणार आहे. त्यामुळेच

आपणास युनिकोडमधून संगणक आणि आंतरजालावर मराठी लेखन करण्याचे कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे.

**मराठी टंकलेखनाच्या पद्धती**

मराठीमध्ये लिहिण्यासाठी विविध पद्धती आहेत. सुरुवातीला वेगवेगळे टंक तयार झाले. मात्र हे टंक आपल्या संगणकावर स्थापित करून घेणे आवश्यक असायचे. अर्जुन, शिवाजी, सुरेख, योगेश, कृतिदेव, गणेश, कृतिका, गार्गी, कृष्णा, लोहित देवनागरी, श्रीलिपी हे टंक वापरले जात. शासन पत्रव्यवहारासाठी मात्र सी–डॅकच्या आय.एस.एम.लिपीतील योगेश किंवा सुरेख टंकातील माहिती मागणी केली जात असे. आंतरजालाच्या माध्यमातून मराठी टंकलेखनाची सुविधा उपलब्ध झाल्यानंतर मायक्रोसॉफ्टनिर्मित मंगल हा सर्वाधिक पसंती असणारा युनिकोड टंक बनला आहे. टंक कोणताही असो, संगणकावर मराठी भाषेतून लेखन करताना युनिकोडचा वापर अनिवार्य आहे आणि युनिकोडला अनुकूल असणाऱ्या लेखनाच्या प्रामुख्याने दोन पद्धती आहेत. इनस्क्रिप्ट कळपाट (Inscript Keyboard) आणि ध्वन्याधारित (phonetic) या दोन पद्धती प्रामुख्याने वापरल्या जातात. या दोन्ही पद्धतींसाठी वेगवेगळ्या संगणक प्रणाली उपलब्ध आहेत.

**इनस्क्रिप्ट कळपाट**

आपण मराठीमध्ये अक्षरे लिहितो. काना, मात्रा, वेलांटी, रफार इत्यादी वापरतो. त्याचप्रमाणे कळपाट वापरून अक्षरे, काना, मात्रा, वेलांटी, रफार इत्यादी टंकलेखन करता येते. कळपाटाची माहिती घेऊन सराव करावा लागतो. काही तासाच्या सरावाने अक्षरे आणि काही दिवसांच्या सरावाने अन्य बाबी आपण सहज वापरू लागतो. सुरुवातीला हा वेग कमी असतो. मात्र सरावाने हा वेग वाढत जातो आणि आपण लिहिल्यासारखे टंकलेखन करू शकतो. पुढे हा वेग आपल्या मनातील विचारांच्या वेगाने सुरू होतो आणि आपण आंतरजालावर सहज मराठी लिहू शकतो. इनस्क्रिप्ट ही पद्धत नेहमी मराठी लेखन करणाऱ्यासाठी आदर्श, योग्य आणि चांगली आहे. मराठी लेखनाचा तो राजमार्ग आहे. त्यासाठीची 'आय.एस.एम.' किंवा 'इझम' संगणक प्रणाली आपल्या संगणकात स्थापित (install) करावी लागते किंवा आता संगणकात भाषा वापरण्यासाठी तयार प्रणाली उपलब्ध असतात. आय.एस.एम.मध्ये दोन कळपट पर्याय उपलब्ध होतात. इनस्क्रिप्ट पद्धतीत रेमिंग्टन कळपद्धत आणि मराठी कळपाट उपलब्ध होतात. त्यातील मराठी कळपाट पूर्वी उपलब्ध असलेल्या 'कृतिदेव'च्या कळपाटाप्रमाणे आहे. कृतिदेव टंकात लेखन करणाऱ्यांना युनिकोड फाँटमध्ये लेखन करता येते. मराठी भाषेतील अ ते अ: आणि क ते ज्ञ पर्यंतच्या सर्व अक्षरासाठी कळा निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच सर्व अंकासाठी त्याच कळा दाबाव्या लागतात. मराठी लेखनासारखेच हे आंतरजालावर किंवा संगणकावर लेखन करता येते. उदाहरणार्थ भारत असे लिहावयाचे झाल्यास प्रथम भ् + आ + र + त अशा अक्षरांच्या कळा दाबल्यास भारत अक्षर पडद्यावर दिसू लागते. इनस्क्रिप्ट कळपट मायक्रोसॉफ्ट विंडोजच्या संगणकात उपलब्ध असतो.त्यामुळे तो वापरल्यास अत्यंत सुलभ आणि वैश्विक बनला आहे. त्याबद्दलची माहिती शासनाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**ध्वन्याधारित लेखन**

ज्यांना संगणकावर मराठी कमी प्रमाणात लिहावे लागते, त्यांच्यासाठी ही पद्धत अतिशय चांगली आहे. या पद्धतीचा वापर तात्पुरती सोय म्हणून ठीक आहे.यासाठी आपल्या संगणकाला आंतरजाल जोडणी असेल, तर मराठीतून लिहिणे सहज शक्य होते. ही पद्धत मायक्रोसॉफ्ट विंडोजमध्येही उपलब्ध करून देण्यात येते. आंतरजाल उपलब्ध असणाऱ्या संगणकावर गुगलमध्ये जाणे आवश्यक आहे. त्यामध्ये 'गुगल इनपुट टूल्स मराठी' (Google Input Tools Marathi) हे निवडावे. आंतरजालावर एक चौकट उपलब्ध होते. याठिकाणी लेखन करण्यासाठी इंग्रजी कळपाटच वापरावा लागतो. त्यामध्ये आपण आपणास हवे ते लेखन करावे आणि नंतर ते लेखन निवडावे. त्यानंतर वर्डमध्ये ते चिकटवावे.त्यामध्ये जे आपण मराठीमध्ये केलेले लेखन तसेच उपलब्ध होते.यामध्ये आपण जसे शब्द बोलतो, तेव्हा आवाज येतो तसेच इंग्रजीमध्ये टंकलेखन करत जावे. उदाहरणार्थ भारत हा शब्द लिहिण्यासाठी Bh+aa+ra+t या अक्षरांच्या कळा दाबाव्या लागतात. या कळा दाबत असताना सूचक शब्दांचे पर्याय येतात.

## ४.३ नोंदी लेखन

मराठी भाषेतील लेखकांना या दोन माध्यमातून खूपच चांगली संधी निर्माण झाल्या आहेत. मराठी भाषेमध्ये विश्वकोशलेखनाचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे आंतरजालावरील सर्वात मोठा माहितीचा स्रोत असणाऱ्या विकीपीडिया या संकेतस्थळावर मराठी भाषेतून नोंदी लेखनाचे काम हाती घेण्यात आले आहे.त्यामुळे विविध विषयांची योग्य व उत्तम माहिती असणाऱ्या आणि मराठी भाषेत लेखन करणाऱ्यांसाठी हा चांगला काळ आहे.

### ४.३.१ मराठी विश्वकोश नोंदी लेखन

महाराष्ट्र शासनाने मराठी विश्वकोश हा मुळात ग्रंथरूपात तयार करवून घेतला. त्याचे आजवर वीस खंड प्रकाशित झाले आहेत. कुमार विश्वकोश निर्मितीही करण्यात येत आहे. हे विश्वकोश आता डिजिटल करण्यात आले आहेत. १९६० साली महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळांतर्गत विश्वकोश मंडळाची स्थापना झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे त्याचे पहिले अध्यक्ष होते. हा ज्ञानकोश आंतरजालावर ऑनलाईन मोफत वाचता येतो. मूळ वीस छापील खंड तयार करण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे क्रमाक्रमाने डिजिटायझेशन करण्यात आले. सी-डॅकच्या सहकार्याने ते आंतरजालावर उपलब्ध करून देण्यात आले. आता विविध विषयांच्या विश्वकोशांचे लेखनाचे कार्य हाती घेण्यात आले आहे. मानव्यविद्या, विज्ञान आणि तंत्रज्ञान या शाखांतील सर्व विषयांचे ज्ञान संकलित व संग्रहित महाप्रकल्प सुरू करण्यात आला आहे. मानव्यविद्या शाखेत अर्थशास्त्र, अलंकरण, इतिहास, कनिष्ठ कला व कारागिरी, कला, खेळ व मनोरंजन, ग्रंथालयशास्त्र, चलच्चित्रविद्या, जागतिक भाषा व साहित्य, तत्त्वज्ञान, धर्म, नृत्य, पुरातत्त्वविद्या, भाषाशास्त्र, भूगोल, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, मूर्तिकला (शिल्पकला), युद्धशास्त्र, रंगभूमी, राज्यशास्त्र, लिपिप्रकार, वास्तुकला, विधी, वृत्तपत्रविद्या, शिक्षणशास्त्र, संगीत, समाजशास्त्र, साहित्यप्रकार, साहित्यविषयक इतर विषय, साहित्यसमीक्षा आदी विषयांच्या नोंदी लिहिण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

त्याचबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञानशाखेतील अभियांत्रिकी अंतर्गत अणुकेंद्रीय, नाविक, रासायनिक, विद्युत, वैमानिकी, संदेशवहन, स्थापत्य, स्वयंचल या विषयांच्या विश्वकोश नोंदी घेण्याचे कार्य सुरू आहे. अवकाशविज्ञान, उद्योग व व्यापार, कीटकविज्ञान, कृषिविज्ञान, गणितशास्त्र, जीवरसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र, धातुविज्ञान, पशुविकारविज्ञान, प्राणिविज्ञान, भूविज्ञान, भौतिकी, मत्स्योद्योग, रसायनशास्त्र, वनस्पतिरोगविज्ञान, वनस्पतिविज्ञान, वातावरणविज्ञान या विषयांचे स्वतंत्र विश्वकोश लेखनाचे कार्य सुरू झाले आहे. वैद्यकशास्त्रात दोन महत्त्वाच्या गटात मानव आणि पशू असे गट तयार करण्यात आले आहेत. त्याअंतर्गत औषधविज्ञान, चिकित्सा आणि रोगविज्ञान अशी विभागणी करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे भारत स्वतंत्र होण्यापूर्वी काही विज्ञान संस्था स्थापन झाल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर रासायनिक, भौतिक प्रयोगशाळेप्रमाणे अनेक संस्था स्थापन झाल्या आहेत. त्याव्यतिरिक्तही इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी, सी-मेट, सी-डॅक अशा अनेक विज्ञान संस्था स्थापन झाल्या आहेत. या सर्व नोंदी वैज्ञानिक संस्था या विश्वकोशामध्ये घेतल्या जात आहेत. त्याचबरोबर शरीरक्रियाविज्ञान, शारीर, संग्रहालये, सांख्यिकी आणि सूक्ष्मजीवविज्ञान या विश्वकोशांचे लेखन कार्य सुरू झाले आहे.

विश्वकोशामध्ये नोंदी कशा कराव्यात, याबाबतच्या सविस्तर सूचना या https://marathivishwakosh.org/ नोंद-लेखनाच्या-सूचना' या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत. विश्वकोशाचा वाचक सामान्य व्यक्ती आहेत. तसेच पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक, अध्यापक यांच्यासाठी विश्वकोश संदर्भ साधन म्हणून आहे. विश्वकोशातील माहिती नेमक्या स्वरूपात असणे आवश्यक आहे. विश्वकोशातील मागील नोंदी वाचल्यानंतर लेखनाचा साचा काय असावा, हे लक्षात येते. यापूर्वीचे सर्व एक ते वीस खंड https://vishwakosh.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. मराठी विश्वकोशातील नोंदीमध्ये अद्ययावत माहिती असणे आवश्यक आहे. ती वस्तुनिष्ठ, समतोल असायला हवी. धर्म, जात, पंथ, लिंग, प्रदेश, पक्ष याविषयी पूर्वग्रहदूषितपणा नसावा. गणितातील मांडणी, कोष्टके आणि आकडेवारी ही अचूक असावी.शक्य तेथे प्राथमिक स्रोताचा आधार द्यावा. लेखन हे इतरांच्या लेखनाचे पुनर्मुद्रण नसावे, म्हणजेच ते वाङ्मयचौर्यापासून दूर असावे. मराठी विश्वकोश लेखनामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या परिभाषा कोशातील शब्द वापरावेत. मात्र नव्या परिभाषिक संज्ञा तयार करण्यास मज्जाव करण्यात आलेला नाही. त्या संज्ञा व्याकरणशुद्ध असाव्यात. या शब्दांची लिंक विश्वकोश संकेतस्थळावर देण्यात आली आहे. विश्वकोशातील नोंदीचे स्वरूप हे लघु, मध्यम आणि दीर्घ असे निश्चित करण्यात आले आहे. लेखनावेळी निश्चित केल्याप्रमाणे शब्दमर्यादा पाळणे आवश्यक आहे. शब्दमर्यादा सांभाळून प्रस्तावना, सारांश, स्पष्टीकरण उदाहरणे आवश्यकतेनुसार देणे आवश्यक असते. अन्य नोंदीशी संबंधित नोंद असेल, तर मूळ नोंदीचा संदर्भ देऊन शब्दमर्यादा मर्यादित ठेवणे आवश्यक बनते. लेखन, समीक्षण आणि भाषांतराचे मानधन दर निश्चित करण्यात आले आहेत. नोंद अंतिम केल्यानंतर मानधन देण्यात येते. नोंदीमध्ये आकृत्या, तक्ते, आलेख, चित्र, रंगीत चित्रपत्र, दृक्‌श्राव्य माध्यमांचाही वापर करता येतो. त्यात जेथून हे साधन घेण्यात आले आहे, त्याचा संदर्भ देणे आवश्यक आहे. मात्र क्रमिक पुस्तकातील संदर्भ अपेक्षित नाहीत. संदर्भ हे

नैमित्तिक नसावेत. इंग्रजीतील विशेषनामे उच्चारानुसार लिहिणे आवश्यक आहे. त्यात मंडळाकडून दुरुस्त्या केल्या जातात. नोंदीमध्ये वैयक्तिक संदर्भ नसावेत. नोंदीचे काम सोपवल्यानंतर ते विहित कालमर्यादेत पूर्ण करून देणे आवश्यक आहे. या नोंदी मराठी युनिकोडमध्ये टंकलिखित करून ज्ञानमंडळाकडे पाठवाव्या लागतात. नोंदीतील व्यक्तींचे नाव, स्थळांचे नाव, संकीर्ण शब्दांचे उच्चार, कंसात इंग्लिश उच्चाराचे देवनागरी रूप, नोंदीमध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे. नोंद लेखनतज्ज्ञाकडून तपासली जाते. नोंदींचे अंतिम संपादन केले जाते. त्यानंतर ती प्रकाशित केली जाते.

या सर्व नोंदी संपादित करण्यासाठी संपादन मंडळे नियुक्त करण्यात आली आहेत. या सर्व नोंदी लेखन करण्यासाठी चांगल्या लेखकांचा शोध घेण्यात येत आहे. लक्षावधी पृष्ठांचे लेखन, संपादन करण्याचे कार्य सुरू झाले आहे. हे कार्य पूर्ण झाल्याने ज्ञानाचा मोठा साठा आपल्या मराठी भाषेत येणार आहे. त्यामुळे या लेखनामध्ये अनेक लोकांचे सहकार्य आणि सहभाग आवश्यक आहे.ही फार मोठी संधी मराठी भाषेतून लेखन करणाऱ्यांसाठी उपलब्ध झाली आहे. या लेखन आणि संपादन कार्यासाठी आकर्षक मानधनही देण्यात येत असल्याने या कार्यातून चांगले अर्थार्जन करता येणे शक्य आहे.

### ४.३.२ विकिपीडियावर नोंदी लेखन

आंतरजालावरील विकिपीडिया हा एक मुक्त ज्ञानकोश आहे. इंग्रजी भाषेतील हा सर्वात मोठा माहितीसाठा आहे. जिमी वेल्स आणि लॅरी सँगर यांनी १५ जानेवारी २००१ रोजी विकिपीडियाची सुरुवात केली. यामध्ये अनेक भाषांतील एखाद्या विषयाची माहिती शोधण्याची सुविधा देण्यात आली आहे. मात्र या आंतरजालावर मराठी भाषेतील नोंदी अत्यल्प आहेत. विकिपीडियावर मराठी भाषेतून नोंदी घेण्यासाठी विकिपीडियाने स्वत:च मोठा पुढाकार घेतला आहे. या नोंदी व्हाव्यात, या हेतूने वेगवेगळ्या संस्थांमध्ये, विविध शिक्षण संस्थांमध्ये कार्यशाळाही घेतल्या जात आहेत. या महाजालामध्ये कोणालाही लेखन करता येते.तसेच लिहिलेल्या लेखांचे संपादनही करता येते. विकिमीडिया फाउंडेशन ना नफा, ना तोटा' तत्त्वावर चालणारी संस्था हे काम करत आहे. विकिपीडियाचा आज सर्वांनाच मोठा फायदा होत आहे. विकिपीडिया आज संकेतस्थळावरील सर्वात जास्त वापरला जाणारा ज्ञानकोश आहे. मराठीमध्ये अधिकाधिक नोंदी करून त्याला समृद्ध करणे आवश्यक आहे.

विकिपीडियावर कोणीही नोंद करू शकते. विकिपीडियावर योग्य विषयाची विहित पद्धतीने योग्य विषयांची नोंद करणे आवश्यक असते. विकिपीडियावर नोंद करण्यासाठी प्रथम विकिपीडियाचे सदस्यत्व घ्यावे लागते. सदस्यत्व घेतल्यानंतर आपण आपला युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉग-इन करावे लागते.त्यानंतर आपण नोंदी लिहू शकता.तसेच पूर्वीच्या नोंदी सुधारित करता येतात. विकिपीडियावर नोंदी करताना शीर्षक मराठी भाषेतून व निःसंदिग्ध देणे आवश्यक आहे. येथे करावयाच्या नोंदी एकांगी नसाव्यात. त्यामध्ये वारंवार बदल करणे आणि अद्ययावत करणे आवश्यक असते. याठिकाणी नवीन विचार मांडू नयेत. आवश्यक असतील तेथे संदर्भ देण्यात यावेत. तसेच एखाद्या संस्थेचे, व्यक्तीचे उदात्तीकरण करण्यासाठी नसावे. अशा नोंदी व्यवस्थित असल्यास त्या नोंदी विकिपीडियाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात

येतात. विकिपीडिया हा सर्वात चांगला आणि परिपूर्ण माहितीचा कोश बनावा, यासाठी मराठी भाषिक लेखक, वाचकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## ४.४ आंतरजालावरील मराठी संकेतस्थळांचा परिचय

आंतरजालावर आज अनेक मराठी संकेतस्थळे तयार झाली आहेत. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठांना आणि शैक्षणिक संस्थांना आपली संकेतस्थळे मराठी भाषेमध्ये तयार करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे मराठी संकेतस्थळांची संख्या वाढत आहे. मराठी भाषेतील महत्त्वाच्या काही संकेतस्थळांचा परिचय करून घेणे आवश्यक आहे.

### ४.४.१ राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषेचा वापर प्रामुख्याने महाराष्ट्र आणि गोवा राज्यांमध्ये होतो. या दोन राज्यांव्यतिरिक्त मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि तमिळनाडू प्रांतात मराठी भाषा मोठ्या प्रमाणात बोलली जाते. विविध क्षेत्रांत होणारा मराठी भाषेचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण व्हावा, तसेच मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी, यासाठी राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. भाषा आणि संस्कृतीच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांमध्ये समन्वय राखणे आणि विविध उपक्रमांचे आयोजन या संस्थेमार्फत करण्यात येते. मराठी विकिपीडियातील नोंदी वाढवणे, त्या नोंदी अद्ययावत करणे यासाठी राज्य मराठी विकास संस्था प्रयत्नशील आहे. जानेवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात अनेक महाविद्यालये आणि संस्थांमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

महाराष्ट्र राज्यातील 'शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान' याविषयावर २५ जून १९७९ रोजी मुंबई येथे एक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेतील शिफारशीनुसार पुढील अभ्यासगट स्थापन करण्यात आला. या अभ्यासगटाचे निमंत्रक म्हणून प्रा.वसंत बापट यांनी काम पाहिले. प्रा. मे. पुं. रेगे, डॉ. वसंत दावतर, डॉ. अशोक केळकर आणि प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांनी सदस्य म्हणून काम केले. या समितीने अन्य राज्यांत अशा संस्था असल्याचे निरीक्षण नोंदवले. या समितीनेच संस्थेचे नाव सुचविले. या संस्थेचे स्वरूप स्वायत्त असावे आणि संस्थेचे कामकाज शैक्षणिक स्वरूपात चालावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेमध्ये ग्रंथालय, लोककलांचे नमुने, ध्वनिफिती दृश्य स्वरूपात जतन करण्यात यावे आणि ते अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात यावेत. भाषेचा विकास हा अखेर भाषिकांचा विकास असतो. परिभाषा, साक्षरता प्रसार, शुद्धलेखन सुधारणा या किंवा अशा मोजक्या व अतिपरिचित विषयांमध्येच भाषेचा विचार अडकून पडणे हिताचे नाही, असे मत नोंदवले होते. या समितीच्या शिफारशीनुसार 'मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास' या बोधवाक्यासह राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना एक मे १९९२ रोजी महाराष्ट्र शासनाने केली. संस्था धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे नोंदणीकृत आहे. त्यावेळेपासून ही संस्था आपल्या उद्दिष्टानुरूप कार्यरत आहे.

या संस्थेमार्फत मराठीचा व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा या सर्व स्तरावर वापर वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. कृषी, वैद्यक, उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे इत्यादी क्षेत्रात

आवश्यक साधन सामग्री विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. भाषिक पाहणी करण्यात येते. या पाहणीचे अहवाल शासनास सादर करण्यात येतात. शासन व्यवहारामध्ये मराठी भाषेचा वापर प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा ठिकाणी अधिक लोकाभिमुख आणि सुलभ व्हावा, यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात. विविध साधनांचा विकास करण्यात येतो. शिष्टाचार, औपचारिक भाषाव्यवहार व भावाभिव्यक्ती समृद्ध करण्यासाठी विविध ठिकाणच्या भाषांचे नमुने गोळा करण्यात येतात. ते अभ्यासकांना उपलब्धही करण्यात येतात. मराठी भाषेतून नव्या ज्ञानाची निर्मिती होण्यासाठी परिभाषेची घडण, विविध ज्ञानस्रोतांची उपलब्धता, भाषेचा सर्जनशील वापर वाढवणारे कृती कार्यक्रम यांना प्रोत्साहन दिले जाते.

बहुजनांच्या बोलीभाषा आणि प्रमाण मराठी यांच्यातील देवाणघेवाण वाढवून यांच्या समवर्ती संबंधातून मराठी भाषा अधिकाधिक लोकाभिमुख व समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. लेखनविषयक नियम, वर्णमाला, भाषिक वापराची यांत्रिक उपकरणे, संगणकीय आज्ञावली यांच्या वापरात सुसूत्रता आणि सुबोधता आणण्यासाठी शासनाला मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देण्यात येतात. माहिती तंत्रज्ञानविषयक गरजा लक्षात घेऊन मराठी अनुरूप आज्ञावली विकसित करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. मराठी भाषेतील माहिती व निधीचा पाया विस्तृत करण्याचा संस्थेमार्फत प्रयत्न करण्यात येतो. बिगर मराठी भाषिक समाजगटांना मराठी भाषा व संस्कृती यांच्याबद्दल आस्था आणि रुची निर्माण व्हावी, यासाठी या संस्थेने काम करणे आणि यासाठी विविध संसाधनांचा विकास करणे अपेक्षित आहे.

ही संस्था मराठी भाषेची मूळ वैशिष्ट्ये कायम ठेवत, भाषा समृद्धीसाठी भाषांतरे करणे, नवीन शब्दांचा स्वीकार करणे, प्रतिशब्द तयार करणे, अभिजात आणि समकालीन साहित्य चर्चा व ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रातील पायाभूत आणि मौलिक प्रवाह मराठी भाषेत आणण्यासाठी कार्य करते. समाजातील शेतकरी, कामगार, मुले, स्त्रिया, आदिवासी इत्यादी वंचित गटांच्या हितासाठी आणि विकासासाठी मराठी भाषेचा सर्जनशील वापर वाढवण्याकरता विविध उपक्रम हाती घेतले जातात. समाजाच्या सक्षमीकरणासाठी भाषेला सक्षम करणे आवश्यक असते. ही बाब लक्षात घेऊन मराठी भाषा सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात. अन्य राज्यातील व परदेशातील मराठी भाषिक लोकांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश निर्मिती मंडळ, भाषा संचालनालय, लोकसाहित्य समिती, साहित्य अकादमी, साहित्य परिषदा, पाठ्यपुस्तक मंडळ, नॅशनल बुक ट्रस्ट, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ इत्यादी संस्था तसेच महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील सर्व विद्यापीठांचे मानवविद्या, सामाजिक शास्त्रे आणि मराठी भाषा विभाग यांच्या संपर्कात राहून त्यांच्या उपक्रमांची नोंद ठेवली जाते. तसेच उपक्रमांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. संस्था आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावी, यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. तसेच संस्थेने मराठी भाषेचा विकास व्हावा, यासाठी पूरक विस्तार सेवा देणे अपेक्षित आहे. त्यासाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम आखले जातात. संस्थेने परस्पर सहकार्याने पाठ्यक्रम, पुस्तक निर्मिती आणि इलेक्ट्रॉनिक साहित्याची निर्मिती करणेसाठी आपले प्रयत्न चालू केले आहेत. स्वामित्वधन, देणग्या, शुल्क, विक्रीमूल्य इत्यादी मार्गांनी संस्थेचा राखीव निधी वाढवला जात आहे. ही संस्था

विधिमंडळाला उत्तरदायी आहे. संस्थेचा अहवाल दरवर्षी विधिमंडळाला सादर केला जातो. मराठी भाषा आणि महाराष्ट्र संस्कृतीच्या विकासाचे साधन म्हणून समांतर लोकशिक्षणाची भूमिका पार पाडते.

संस्थेचे स्वत:चे नियामक मंडळ आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली हे नियामक मंडळ काम करते. या मंडळाचे मराठी भाषा विभागाचे मंत्री, मुख्य सचिव, मराठी भाषा मंत्रालयाचे सचिव आणि या विषयातील महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील तज्ज्ञ नियामक मंडळाचे सदस्य असतात. संस्थेने आजवर सहाशेपेक्षा जास्त पुस्तके इलेक्ट्रॉनिक स्वरूपात विकसित केली आहेत. संस्थेने सातारा जिल्ह्यातील भिलार गावाला 'पुस्तकांचे गाव' म्हणून रूपांतरित केले. मराठी विकिपीडिया संवर्धन, ऑलिम्पिक माहितीकोश, विविध संदर्भ कोशांची निर्मिती, मराठी भाषेतील दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण, प्रकाशनांचे ई-स्वरूपात रूपांतरण, मोडी हस्तलिखितांचे मराठीकरण, विज्ञानाधारित पुस्तकांचे मराठीमध्ये भाषांतर इत्यादी उपक्रम राबवले जातात. युनिकोड वापर जास्तीत जास्त व्हावा, यासाठी संसाधन निर्मिती आणि प्रोत्साहन देण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. विधी व न्याय विभागामध्ये मराठी भाषेचा वापर वाढावा, यासाठीदेखील संस्था कार्य करते. संस्थेने फिरत्या वाचनालयाची संकल्पनाही राबवली आहे. संस्थेबाबतची सर्व अद्ययावत माहिती https://rmvs.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संस्थेमार्फत विज्ञानविषयक साहित्याचे मराठीमध्ये अनुवाद करण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात चालते. इंग्रजी, रशियन किंवा अन्य विदेशी भाषातील उत्तम पुस्तकांचे अनुवाद करण्याचे कार्य आपणास करता येऊ शकते. दुर्मिळ ग्रंथांच्या संगणकीकरणाचे कार्यही या संस्थेमार्फत सुरू आहे. या क्षेत्रातही आपण योगदान देऊ शकतो. संस्थेमध्ये कर्मचारी आणि अधिकारी नियुक्त्यासाठीदेखील आपण प्रयत्न करू शकतो.

### ४.४.२ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराष्ट्र राज्य स्थापनेवेळीच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी, अशा मंडळाची स्थापना करण्याचे सूतोवाच केले होते आणि दिनांक १९ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. सुरुवातीला हे मंडळ पाच वर्षांकरिता गठित करण्यात आले होते. त्यानंतर वेळोवेळी या मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. महाराष्ट्रातील साहित्य, संस्कृती आणि इतिहास या क्षेत्रातील संशोधन प्रकल्प आणि योजनांच्या पूर्ततेसाठी चालना देणे, मदत करणे, विविध योजना हाती घेणे, अशा संशोधनाचे फलित प्रसिद्ध करणे, विविध विद्याशाखांतील ज्ञान आणि विज्ञानातील लेखन मराठी भाषेतून व्हावे यासाठी प्रोत्साहन देणे किंवा मंडळामार्फत प्रकाशित करणे, अन्य भाषांतील उत्कृष्ट ग्रंथाचे मराठीमध्ये भाषांतर करणे आणि असे ग्रंथ प्रकाशित करणे, महाराष्ट्राच्या इतिहास आणि संस्कृतीशी संबंधित प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आधारभूत अशी महत्त्वाची कागदपत्रे संपादित करणे, मराठी भाषेत भाषांतरित करणे व प्रसिद्ध करणे किंवा अशा योजनांना प्रोत्साहन देणे, महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन इतिहासाचे संपादन आणि प्रकाशन करण्याबाबत योजनास चालना देणे, अशा योजना कार्यान्वित करणे, साहित्यविषयक संशोधन आणि साहित्य अभिवृद्धी याबाबत शासकीय धोरण आखण्यासाठी शासनास सहकार्य करणे, आदी उद्दिष्टांनी या संस्थेची स्थापना करण्यात आली.

या मंडळामार्फत अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहेत. शास्त्रीय विज्ञान ग्रंथमाला, उत्कृष्ट पुस्तकांच्या भाषांतराची योजना, इतिहास आणि संस्कृतीशी निगडित पुस्तकांच्या प्रकाशनांची योजना, वैचारिक, समीक्षात्मक आणि चरित्रात्मक पुस्तक प्रकाशनाचे कार्य संस्थेमार्फत करण्यात येते. ललित आणि ललितेतर साहित्य प्रकाशनासाठी अनुदान देण्यात येते. नवलेखकांना उत्तेजनार्थ अनुदान देण्यात येते. नवलेखकांच्या चर्चा, कार्यशाळांना अनुदान देण्यात येते. साहित्य संस्था, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, नियतकालिके इत्यादींना अनुदान दिले जाते. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेतंर्गत दरवर्षी त्या वर्षात प्रकाशित झालेल्या उत्कृष्ट ग्रंथांना पुरस्कार देण्यात येतात. याखेरीजही काही उपक्रम राबवण्यात येतात. या संस्थेची सविस्तर माहिती https://sahitya.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, या संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना आणि पुरस्कारांचे अर्ज, माहितीपुस्तक संकेतस्थळावर उपलब्ध असते.

या मंडळामार्फत स्वतंत्रपणे काही प्रकाशने प्रकाशित होत असतात. त्यामध्ये आपण योगदान देऊ शकतो. या संस्थेसाठी असणारा कर्मचारी वर्ग मर्यादित आहे. वर्ग एक श्रेणीतील एक सचिव हे सर्वोच्च प्रशासकीय पद आहे. अधीक्षक, प्रपाठक, सहा. लेखा अधिकारी, लिपिक, लघुलेखक ही पदे असतात. या पदांची भरती लक्षात घेऊन मराठी भाषेच्या अभ्यासकांनी त्या पदांवर नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. वर्ग तीनचे कर्मचारी देखील कुशल असणे त्या संस्थेच्या विकासाच्यादृष्टीने महत्त्वाचे असते.

### ४.४.३ भाषा संचालनालय

महाराष्ट्र राज्याची स्थापना एक मे १९६० रोजी झाली. राज्याच्या स्थापनेवेळी या नव्या राज्याची राज्य कारभाराची भाषा ही मराठी राहील, असे जाहीर करण्यात आले. त्यानंतर सहा जुलै १९६० रोजी भाषा संचालनालयाची स्थापना करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. संस्थेचे मुख्य कार्यालय वांद्रा (पूर्व) मुंबई येथे असून या संचालनालयाच्या अंतर्गत नवी मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथे विभागीय कार्यालये आहेत. भाषा संचालनालय हे धोरणात्मक बाबीसंदर्भात प्रयत्नशील असते. शासनाचे मराठी भाषेबाबत धोरण राबवण्यात संस्थेची प्रमुख भूमिका असते. प्रशासनिक परिभाषा आणि मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे, अमराठी भाषिक अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी मराठी भाषा परीक्षा आयोजित करणे, केंद्र आणि राज्यांच्या अधिनियमांचा अनुवाद करणे, महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या कार्यालयात त्रिभाषा सूत्राचा वापर होतो किंवा नाही हे पाहणे, शासकीय कार्यालये, मंडळ, महामंडळे, जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने तपासणी करणे आणि मार्गदर्शन करणे, अल्पसंख्याक भाषांमधून भाषांतर करणे या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कार्यरत आहे. भाषा संचालनालयाचे https://directorate.marathi.gov.in/ हे अधिकृत संकेतस्थळ आहे. भाषा संचालनालय हे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत असणारे एक महत्त्वाचे कार्यालय आहे. सन २०१० मध्ये मराठी भाषा विभागाची स्थापना झाली.त्यानंतर या संचालनालयाचे नियंत्रण मराठी भाषा विभागाकडे देण्यात आले.

या संचालनालयामार्फत सर्व पदनामांचे मराठी नामकरण असणारा कोश प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर 'प्रशासनिक लेखन' हे पुस्तक शासकीय पत्रव्यवहार सुटसुटीत व्हावा, या हेतूने प्रकाशित करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम मराठी करण्याकरिता मराठी परिभाषा कोश तयार करण्यात आला. तिसऱ्या टप्प्यात न्यायालयीन कामकाज मराठी भाषेतून व्हावे, याकरिता 'न्याय व्यवहार कोश' तयार करण्यात आला आहे. तरीही आजवर विज्ञानशाखेतील सर्व विषयांचे आणि वाणिज्य शाखेतील अकौंटन्सीसारख्या विषयाचे अध्यापन अद्यापही इंग्रजी माध्यमातून होते. परिभाषा कोश निर्मितीसाठी सर्व विद्यापीठांचे प्रतिनिधी आणि मराठी विज्ञान परिषदेचे प्रतिनिधी यांची समिती गठित होते. सदस्यांनी सुचविलेल्या शब्दांवर सर्व प्रकारे चर्चा होऊन शब्द अंतिम करण्यात येतात. नवीन शब्द हे भाषिक कसोटीवर तपासून पाहण्याचे काम भाषा किंवा संस्कृत तज्ज्ञ करतात. आजवर या कार्यालयामार्फत रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, संख्याशास्त्र, औषधशास्त्र, लोकप्रशासन, अर्थशास्त्र, वाणिज्यशास्त्र, वृत्तपत्रविद्या, भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, न्यायव्यवहार, शासनव्यवस्था अशा विषयांचे परिभाषाकोश प्रकाशित झाले आहेत. त्याचप्रमाणे लघुलेखन मार्गदर्शिका प्रकाशित करण्यात आली आहे.

विविध परिभाषा कोश हे बोजड आहेत, सामान्य लोकांना समजण्यास कठीण आहेत, अशी या परिभाषा कोशावर टीकाही होते. हे परिभाषा कोश तयार करताना संस्कृत भाषेची मदत घेण्यात येते. मात्र या शब्दांचा वापर कमी प्रमाणात होत असल्याने असे वाटते. इंजिनियर या शब्दासाठी अभियंता हा शब्द आता सर्वपरिचित झाला आहे, कारण या शब्दाचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.त्याचप्रमाणे इंजिनिअरिंग कॉलेजसाठी अभियांत्रिकी असे आनुषंगिक शब्दांना उचित शब्दही प्रचलित झाले आहेत. त्याप्रमाणात इतर अनेक शब्द वापरले जात नाहीत. हा वापर जसा वाढेल, तसे हे शब्द दुर्बोध, क्लिष्ट वाटणे कमी होईल. मराठी भाषा समृद्ध करावयाची असेल तर हा वापर वाढवणे अपरिहार्य आहे. इंग्रजीतील अनेक शब्द हे ग्रीक आणि लॅटिन भाषेतून आले आहेत. त्यांचे मराठीकरण करताना खूप काळजी घ्यावी लागते. त्यातून येणाऱ्या शब्दांपेक्षा इंग्रजी शब्दांचा वापर करणे सोपे जाते. उदाहरणार्थ भ्रमणध्वनी या शब्दापेक्षा मोबाईल हा शब्द वापरणे सोपे वाटते. तसेच भ्रमणध्वनी पुनःप्रभारण ऐवजी मोबाईल चार्जिंग हा शब्द सोपा वाटतो. मात्र आयसोटोप या शब्दाला समस्थानक असा शब्द वापरला जातो. मात्र त्याचे अनेकवचन करताना समस्थानके या शब्दाऐवजी समस्थानिके असा शब्द निश्चित करण्यात आला आहे. स्टेशन या शब्दाला स्थानक असा शब्द आहे. त्याचे अनेकवचन स्थानके असे करण्यात येते. मात्र समस्थानकाचे अनेकवचन करताना निष्कारण क्लिष्ट करण्यात आले आहे.

इंग्रजी शब्दांना अधिकृत पर्यायी शब्द देणारे भ्रमणध्वनी उपयोजक (Mobile application) २०१८ च्या राजभाषा दिनाच्या निमित्ताने गुगल प्लेवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रशासकीय अधिकारी टिपण्या, कार्यालयीन नोंदीमध्ये शेरे इंग्रजीमधून लिहितात. त्यांचे शेरे मराठी भाषेतून लिहिले जावेत, यास्तव इंग्रजी शेऱ्यांना पर्यायी शेरे असणारी लघुपुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. मूळ इंग्रजी नमुन्यासह शासकीय पत्रव्यवहार, टिपण्या, शासन निर्णय, परिपत्रके इत्यादींचे निवडक मराठी नमुने संकलित केले आहेत. त्यांचे अवलोकन केल्यानंतर कर्मचारी अधिकाऱ्यांना मराठी लेखन व्यवहाराचे आकलन करणे सोपे होते.

इतर संस्थांच्या तुलनेत या कार्यालयाचा विस्तार आणि व्याप मोठा आहे. संचालनालयाची विभागवार कार्यालये आहेत. भाषा संचालक, उपसंचालक आणि साहाय्यक संचालकांची अ' वर्गातील पदे तसेच अधीक्षक, लिपिक, लघुलेखक अशी पदे सर्व कार्यालयात आहेत. यामध्ये नोकरीच्या माध्यमातून आपण योगदान देऊ शकता. तसेच हिंदी भाषेतील साहित्याचा मराठी भाषेत अनुवाद आणि उत्तम मराठी साहित्यकृतींचा हिंदीमध्ये अनुवाद करण्याचे कार्य या संचालनालयामार्फत चालते. यातून आपण प्रकल्प मंजूर करून घेऊन योगदान देऊ शकता.

### ४.४.४ मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात २४ जून २०१० रोजी 'मराठी भाषा विभाग' असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभाग, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग यांच्याशी निगडित मराठी भाषेशी संबंधित विषय या विभागाकडे सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ इत्यादी सर्व कार्यालये, मंडळे आणि संस्था या विभागाच्या अंतर्गत वर्ग करण्यात आली. त्यानंतर दिनांक २९ नोव्हेंबर २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये हा विभाग स्थापन करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

या विभागाशी संबंधित मराठी भाषा विकाससंबंधी शासन पातळीवरील कामे करणे, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्याशी संबंधित शासनस्तरावरील कामकाजाचे संनियंत्रण आणि समन्वय राखण्याचे कार्य करणे, उत्तम पुस्तकांची निवड करणे ही उद्दिष्टे संस्थेसाठी निश्चित करण्यात आली आहेत. दरवर्षी १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा पंधरवडा' साजरा करण्यात येतो. वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'वाचन कट्टा' आयोजित करण्यात येतो. तसेच २००१ सालापासून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास शासनामार्फत रूपये पंचवीस लाखांचे अनुदान देण्यात येते.

या विभागामार्फत मराठीच्या बोलींचा अभ्यास, त्याबाबतचे संशोधन आणि साहित्य संग्रह करण्यात येतो. तसेच भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी विषय अध्यापनाची सोय करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. प्राचीन ग्रंथांचा अनुवाद करणे, ग्रंथालयांना सशक्त करण्याचे कार्य सुरू करण्यात आले. मराठीच्या उत्कर्षासाठी कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी सर्वांना भरीव मदत करण्याचे कार्य या समितीमार्फत होते.या विभागाची सविस्तर माहिती https://marathi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ज्या भाषेतील साहित्य प्राचीन आहे, ज्या भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षे जुने आहे, ज्या भाषेला स्वयंभूपण आहे आणि प्राचीन भाषा आणि सध्याची भाषा यांचा गाभा कायम आहे, अशा भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकार देते. अशा भाषांच्या संवर्धनासाठी विशेष सहकार्य आणि अनुदान देण्यात येते.केंद्र

शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करण्यात यावा, यासाठी अभिजात 'मराठी भाषा समिती'चे गठण करण्यात आले आहे.तसेच यासंदर्भात विशेष अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समितीने सखोल अभ्यास आणि संशोधनान्ती सविस्तर अहवाल तयार केला आहे. तो शासनाला २०१३ साली सादर झाला. या अहवालामध्ये मराठी भाषा अभिजात आहे, यासंदर्भात विविध पुरावे सादर करण्यात आले आहेत. या अहवालाच्या साहाय्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. या अहवालाची सविस्तर माहिती https://marathi.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

प्रत्यक्ष कामकाज हे मुंबई स्थित कार्यालयातून चालते. या कार्यालयामार्फत धोरणात्मक बाबी निश्चित केल्या जातात. विभागाला आवश्यक असणारी पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. मात्र विविध उपक्रमांच्या अमंलबजावणीसाठी आणि विशेष अभ्यास कालावधीकरिता हंगामी रोजगार संधी उपलब्ध होतात. मात्र याची वारंवारिता अत्यल्प आहे.

### ४.४.५ मराठी साहित्य परिषद, पुणे

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ही मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि समीक्षा यांचे जतन आणि संवर्धन करण्याचे कार्य करणारी सर्वात जुनी संस्था आहे. या संस्थेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात ११० वर्षांपूर्वी झाली.पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, सोलापूर, जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. आज आदिवासी भागासह संपूर्ण महाराष्ट्रात सत्तर शाखा आहेत. या संस्थेचे सत्तर हजारपेक्षा जास्त आजीव सभासद आहेत. मराठी भाषेच्या विकासामध्ये या संस्थेचे योगदान मोठे आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी १८६५ मध्ये मराठीमध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा आढावा घेतला होता. त्यांना त्यावेळी ४३१ गद्य आणि २३० पद्य पुस्तकांची निर्मिती झाल्याचे आढळून आले होते. रानडे व्यवसायाने न्यायाधीश होते.मात्र त्यांची थोर समाजसुधारक, धर्मसुधारक आणि साहित्यिक ओळख आहे.मराठी भाषेतील ग्रंथप्रसाराला चालना मिळावी, या हेतूने त्यांनी १८७८ च्या मे महिन्यात मराठी भाषेतील सर्व ग्रंथकर्त्यांना एकत्र आणण्याचे ठरवले. या कार्यात त्यांना लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी मोठे सहकार्य केले. ७ फेब्रुवारी १८७८ च्या 'ज्ञानप्रकाश' या नियतकालिकामध्ये यासंदर्भातील जाहीर आवाहन प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार ११ मे १८७८ रोजी पुण्याच्या हिरा बागेत सर्व ग्रंथकार एकत्र जमा झाले. हेच पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मानले जाते. या प्रथम संमेलनाचे अध्यक्षपद अर्थातच न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी भूषविले. १८८५ साली दुसरे संमेलनही पुण्यात झाले आणि या संमेलनाला सव्वाशे साहित्यिक उपस्थित राहिले. नंतर तिसरे संमेलन १९०५ च्या मे महिन्यात सातारा येथे भरले. त्यानंतर अधूनमधून काही अडचणीमुळे पडलेले खंड वगळता दरवर्षी संमेलन भरत राहिले. पुण्यात भरलेल्या चौथ्या साहित्य संमेलनाच्यावेळी संस्थेला स्थायी स्वरूप देण्याचा विचार सुरू झाला. या संमेलनाच्या अखेरच्या दिवशी महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना केल्याची घोषणा करण्यात आली. १९३५ नंतर संस्थेची टिळक रोडवर इमारत उभारण्यात आली.

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यापर्यंत संस्थेचे कार्य पोहोचले आहे. संस्थेमार्फत चर्चा, परिसंवाद, कविसंमेलने, मुलाखती, परिसंवाद अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.संस्थेचे कै. वा. गो. आपटे ग्रंथालय अभ्यासकांना उपयुक्त ठरत आहे. विज्ञान साहित्य वगळता कथा, कादंबरी, ललित, कविता, आत्मकथा, आत्मचरित्र इत्यादी सर्व साहित्यप्रकारातील उत्कृष्ट ग्रंथांना मराठी साहित्य परिषद नियमित पुरस्कार देते. परिषदेमार्फत मराठी भाषा आणि साहित्य प्रसारासाठी परीक्षांचे आयोजन करण्यात येते. परिषदेमार्फत 'साहित्यिक साह्यनिधी'मधून अपंग, वृद्ध निराधार साहित्यिकांना दरमहा मानधन देण्यात येते.लोकमान्य टिळक, न. चिं. केळकर, कृ. प्र. खाडिलकर, न. र. फाटक, रा. शं. वाळिंबे, ग. दि. माडगूळकर, शंकरराव खरात, भीमराव कुलकर्णी इत्यादी थोर साहित्यिकांनी संस्थेला नावारूपाला आणण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. संस्थेची सर्व माहिती https://www.masapapune.org/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संस्थेमार्फत नवलेखकांसाठी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. पूर्ण वेळ लेखक बनून अर्थार्जन कसे करता येईल याबाबतचे तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन केले जाते. विविध प्रकारामध्ये लेखन करणारे लेखक अशा कार्यशाळांसाठी मार्गदर्शक म्हणून बोलावले जातात. या संस्थेमध्ये फारशा नोकरीविषयक संधी नसल्या तरी लेखक म्हणून ज्यांना आपले भविष्य घडवायचे आहे त्यांना निश्चितच साहित्य परिषदेचे सहकार्य महत्त्वाचे आहे.

### ४.४.६ विश्वकोश मंडळ

महाराष्ट्र शासनामार्फत 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा'ची स्थापना १ डिसेंबर १९८० रोजी झाली. १९६० साली स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे विभाजन करून हे स्वतंत्र मंडळ अस्तित्वात आले. विश्वकोश मंडळाचे प्रथम अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी काम पाहात होते. मंडळाचे अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक तीन वर्षांकरिता राज्य शासनामार्फत करण्यात येते. विश्वकोश मंडळाचे मुख्य कार्यालय वाई येथे आहे. या कार्यालयात विज्ञान आणि तंत्रविद्या, मानव्य, कला आणि प्रशासन या चार शाखा आहेत. विश्वकोश मंडळाच्या ग्रंथालयात छत्तीस हजार ग्रंथ आहेत. विश्वकोशाच्या छपाईसाठी वाई येथे स्वतंत्र मुद्रणालय सुरू करण्यात आले आहे. ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानविस्तार या तीन घटकांना विचारात घेऊन मराठी विश्वकोश मंडळाचे कार्य सुरू करण्यात आले आहे. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर या विश्वकोशाच्या निर्मितीचे कार्य सुरू आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची स्थापना १९८० रोजी झाली असली तरी प्रत्यक्षात विश्वकोश निर्मितीचे कार्य १९५९ साली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पुढाकारातून सुरू झाले होते. या विश्वकोश मंडळामार्फत 'सतरा खंड संहिता खंड' म्हणून प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यानंतर अठरावा खंड हा 'परिभाषा खंड' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. एकोणिसावा खंड हा 'नकाशाखंड' आणि विसावा खंड हा 'सूची खंड' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. पहिल्या सतरा खंडामध्ये प्रत्येकी बाराशे पाने आहेत. विश्वकोश हा सर्व विषय संग्राहक आहे. त्यामध्ये शंभरपेक्षा जास्त विषय आणि उपविषयांच्या

लहानमोठ्या नोंदी उपलब्ध करून दिल्या आहेत. नोंदीची रचना मराठी वर्णक्रमानुसार अकारविल्हे केल्या आहेत. सुरुवातीला या विश्वकोशाचा 'परिचय ग्रंथ' प्रकाशित केला आहे. त्यामध्ये विश्वकोशाच्या स्वरूपाची आंतर्बाह्य ओळख करून देण्यात आली आहे. विश्वकोशासाठी अनेक तज्ज्ञ लेखनाचे कार्य करत आहेत. मानवविद्या शाखेसाठी जेवढी पाने निश्चित करण्यात आली आहेत. तेवढीच पाने विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेसाठी निश्चित केली आहेत. ही पृष्ठसंख्या प्रत्येक विद्याशाखेसाठी १०,००० इतकी आहे. सर्व विषयांचे ज्ञान मराठीमध्ये नोंदी स्वरूपात आणण्याचे कार्य या मंडळामार्फत करण्यात येत आहे. या कार्यामुळे मराठीला ज्ञानभाषा बनवण्याच्या दृष्टीने निश्चितच एक पाऊल पुढे पडले आहे. उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी, अभ्यासक, कुमारवयीन विद्यार्थी यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. विश्वकोश निर्मिती करताना केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या परिभाषा कोशांचा वापर करण्यात आला आहे.

सतराव्या आणि अठराव्या खंडाच्या प्रकाशनावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी विश्वकोश हा कोशात न राहता विश्वदूर पसरावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्याचा भाग म्हणून विश्वकोशाचे सुरुवातीचे सतरा खंड हे सीडीरूपात वाचकांना आणि अभ्यासकांना उपलब्ध करण्यात आले होते. त्यानंतर हे सर्व खंड आंतरजालावर सी–डॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आज हे खंड संगणकावरील आंतरजालावर आणि भ्रमणध्वनीवरही पाहता येतात. मागील काही वर्षांत विद्यापीठातील आणि शिक्षण संस्थातील तज्ज्ञांना या प्रकल्पात सहभागी करून घेतले आहे.

विश्वकोशातील नोंदी लेखनाचे कार्य आजही मोठ्या प्रमाणात सुरू आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयांतील आणखी मोठ्या प्रमाणात नोंदी करण्याचे कार्य बाकी आहे. जगातील सर्व प्रकारची माहिती घेण्यासाठी वाचक विश्वकोश संदर्भासाठी घेतात. एखादा अपरिचित शब्द, संज्ञा आढळल्यास त्याबाबतची माहिती प्राप्त करण्याच्या उद्देशाने विश्वकोशाचा आधार घेणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. एखाद्या गोष्टीची जुजबी स्वरूपात समजलेली माहिती विस्तृत प्रमाणात मिळवण्यासाठीही लोक विश्वकोशांचा आधार घेतात. उपलब्ध माहितीची सत्यता पडताळण्याच्या हेतूनेही विश्वकोश वापरले जातात. त्यामुळे विश्वकोशातील माहिती ही काळजीपूर्वक नोंदवणे आवश्यक असते. या नोंदी संक्षिप्त आणि साररूपातील असतात. तरीही या नोंदी पुरेसा परिचय करून देणाऱ्या असणे आवश्यक असते. नोंदीतील माहिती ही परिपूर्ण असणे आवश्यक आहे. नोंदीसाठी शब्दसंख्येची मर्यादा असते.

नोंदीची सर्वंकष माहिती विश्वकोशातील छोट्या नोंदीतून देता येत नाही. मात्र ती नोंद विषयाचा आवाकादर्शक असते.एखाद्या विषयाचे विविध पैलू, आयाम आणि कंगोरे या नोंदीत असतात. ते सर्व पैलू उलगडून मांडता येणे शक्य नाही. यास्तव पूरक वाचनासाठीच्या नोंदी दिल्या जातात. एखाद्या विषयात अन्य मुद्द्यांचा, विषयाचा उल्लेख येतो, त्यांच्याबाबत या नोंदीत सर्व माहिती देता येत नाही. मात्र त्याविषयाची नोंद कोणत्या नावाने आहे, हे तेथे संदर्भासाठी नमूद केले जाते. मुख्य प्रतिपादित विषयाच्या गाभ्याला धरून हे लेखन करणे आवश्यक असते.

लेखकाने केलेल्या नोंदींचे संपादन करणे आवश्यक असते.लेखक हा त्या विषयातील तज्ज्ञ असतो. त्यामुळे तो त्याच्यादृष्टीने महत्त्वाच्या बाबींचे लेखन करत असतो. त्या लेखनाचे तटस्थ भूमिकेतून पुनर्लेखन

करणे आवश्यक असते.हेच कार्य संपादन मंडळ करत असते. या नोंदी कशा असाव्यात, याची सोदाहरण माहिती https://marathivishwakosh.org/ नोंद या लिंकवर उपलब्ध आहे. तसेच, संपादनासंदर्भातील https://marathivishwakosh.org/ आशय संपादन या लिंकवर उपलब्ध आहे. त्यानंतर महत्त्वाचा भाग आहे, तो म्हणजे भाषा संपादन. विश्वकोश नोंदीतील भाषा ही व्याकरणाच्यादृष्टीने अचूक असणे आवश्यक असते. भाषा वापरताना स्वल्पविराम, अल्पविराम यांचा वापर काळजीपूर्वक करावा लागतो. त्यासाठी संस्कृत तज्ज्ञ, भाषा तज्ज्ञांचे मत महत्त्वाचे असते. विश्वकोशाची रचना ही विशिष्ट पद्धतीने करावयाची असल्याने आणि लेखन विविध लेखक करत असल्याने त्यामध्ये एकसूत्रता आणणे आवश्यक असते.त्यामुळे या नोंदी संपादित करण्याची गरज असते. भाषा संपादकासाठी विश्वकोश मंडळामार्फत निवडक लोकांसाठी कार्यशाळा आयोजित केली जाते.

विश्वकोश मंडळ हे मराठीला ज्ञानभाषा बनवण्यासाठी मोठे कार्य करत आहे. विश्वकोश हे महत्त्वाचे साधन बनत आहे. या मंडळामार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या खंडामुळे वाचकांची, अभ्यासकांची भूक मोठ्या प्रमाणात पूर्ण होत असल्याचे दिसून येते. तथापि, अजूनही हे कार्य मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे.या कार्यात सहभागी होऊन आपण यात योगदान देऊ शकतो. यातील नोंद लेखन, संपादन आणि भाषेचे विशेष ज्ञान असणाऱ्या लोकांना भाषा संपादक म्हणून कार्य करण्याची संधी आहे. तसेच या प्रकल्पात कार्य केल्याबद्दल मानधन निश्चित केले असल्याने अर्थार्जनाची संधी आहे. ज्यांना शक्य आहे त्या सर्वांनी या प्रकल्पात योगदान देण्याची गरज आहे.

### ४.४.७ इतर संकेतस्थळे

मराठी भाषेतील संकेतस्थळांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मराठी भाषेमध्ये सर्व विद्यापीठांना आपले संकेतस्थळ सुरू करण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाने दिल्यानंतर महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठांची संकेतस्थळे मराठीमध्ये सुरू झाली आहेत. त्याखेरीज साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, पब्लिशर्स असोसिएशन यांची स्वतंत्र प्रकाशनस्थळे आहेत. अनेक प्रकाशन संस्थांनी स्वत:ची संकेतस्थळे सुरू केली आहेत. वैयक्तिक स्वरूपात काही साहित्यिकांनी संकेतस्थळे आणि बऱ्याच लेखकांनी स्वत:चे ब्लॉग सुरू केले आहेत. मात्र भारतातील साहित्य प्रकाशनासंदर्भामध्ये साहित्य अकादमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट यांचे कार्य वाखाणण्यासारखे आहे. लेखकांना आपली पुस्तके प्रकाशित करण्यासाठी या दोन्ही संस्था महत्त्वाच्या आहेत.

**१. साहित्य अकादमी**

भारतात अशा प्रकारची संस्था स्थापन करावी, याबाबत वसाहतकाळामध्ये चर्चा सुरू होती. प्रत्यक्षात हा प्रस्ताव १९४४ साली ब्रिटीश सरकारमार्फत स्वीकारण्यात आला. त्यावेळी रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेमार्फत सादर केलेला 'नॅशनल कल्चरल ट्रस्ट' स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने या प्रस्तावाचा स्वतंत्र विचार केला. यासाठी देशातील विविध भागांमध्ये चर्चासत्रे आयोजित करून लोकांचे मत जाणून घेतले. त्यानंतर नॅशनल अकादमी ऑफ व्हिज्युअल आर्ट्स,

नॅशनल अकादमी ऑफ डान्स, ड्रामा अँड म्युजिक आणि ॲकॅडमी ऑफ लेटर्स या तीन संस्था स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. यातील अकॅडमी ऑफ लेटर्स म्हणजेच साहित्य अकादमी ही अखिल भारतीय पातळीवरील साहित्य सेवा करणारी महत्त्वाची संस्था आहे. भारत सरकारने या संस्थेची स्थापना १९५४ साली केली.

भारतीय साहित्याचा दर्जा उंचावणे, विविध साहित्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन, साहित्य संस्कृतीची देवघेव या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्था शासनाने स्थापन केली असली तरी ही आपले कार्य स्वायत्तपणे करते. भारतातील प्रमुख चोवीस भाषांतील साहित्य जतन आणि संवर्धनाचे कार्य या संस्थेमार्फत सुरू आहे. या संस्थेमार्फत विविध भाषातील साहित्यासाठी पुरस्कार, अधिछात्रवृत्ती (फेलोशिप), अनुदान, प्रकाशने, साहित्यविषयक विविध कार्यक्रम, कार्यशाळा, प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येते. साहित्यविषयक वैश्विक पातळीवर देवाणघेवाण व्हावी या उद्देशाने अकादमी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते. वाचकांना दर्जेदार साहित्याची ओळख करून देते. विविध नियतकालिके, दर्जेदार साहित्य, विश्वकोश, शब्दकोश (डिक्शनरी), चरित्रे, आत्मचरित्रे यांचे प्रकाशन करते. अकादमीमार्फत आजवर सहा हजार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. दरवर्षी अकादमी पन्नास चर्चासत्रे आयोजित करते. याखेरीज तीनशेपेक्षा जास्त लेखकांशी भेट, संवाद, कवीसंधी, कथासंधी, लोक : विविध आवाज, लोक आणि पुस्तके, मुलाखत, अस्मिता, अंतराल, आविष्कार, नारी चेतना, युवा साहित्यिक, बाल साहित्य असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. अकादमीतर्फे चोवीस भाषांतील साहित्यकृतींना पुरस्कार देण्यात येतात. त्याचप्रमाणे चोवीस भाषांव्यतिरिक्त घटनेमध्ये समाविष्ट नसलेल्या अन्य भाषांच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या एका मान्यवरास सन्मानित करण्यात येते. अभिजात साहित्य कृतींनाही पुरस्कार देण्यात येतात. साहित्य अकादमीने अनुवादासाठी बंगलोर, अहमदाबाद, कोलकता आणि दिल्ली येथे केंद्रेही स्थापन केली आहेत. अर्वाचीन साहित्यासाठी दिल्ली येथे केंद्र स्थापन केले आहे. आदिवासी आणि बोलीभाषा संवर्धनासाठी नॉर्थ इस्टर्न हिल युनिव्हर्सिटी, शिलाँग येथे केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

साहित्य अकादमीचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. साहित्य अकादमीचे ग्रंथालय दोन लाखांपेक्षा जास्त पुस्तकांनी सुसज्ज आहे. हे ग्रंथालय संगणकीकृत करण्यात आले आहे. विशेष मासिकांचे अंक या ग्रंथालयात जतन करण्यात आले आहेत. पुस्तक परीक्षण, बातम्यांचा संग्रहही करण्यात आला आहे. याखेरीज विभागीय केंद्रातही ग्रंथालये निर्माण करण्यात आली आहेत. साहित्य अकादमी, अध्ययनवृत्ती, मानद अध्ययनवृत्ती, प्रेमचंद अध्ययनवृत्ती, आनंद कुमारस्वामी अध्ययनवृत्ती प्रदान करण्यात येतात. साहित्य अकादमी पुरस्कार, भाषा सम्मान पुरस्कार, अनुवाद पुरस्कार, बाल साहित्य पुरस्कार आणि कुमार साहित्य पुरस्कार देण्यात येतात. संस्थेची सविस्तर माहिती http://sahitya-akademi.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**२. नॅशनल बुक ट्रस्ट**

मानव संसाधन मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागामार्फत माफक किंमतीमध्ये इंग्रजी, हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये चांगल्या पुस्तकांची निर्मिती व्हावी, या हेतूने नॅशनल बुक ट्रस्ट (NBT) ही अत्यंत

महत्त्वाची संस्था १९५७ मध्ये स्थापन करण्यात आली. तसेच पुस्तकांचे प्रदर्शन, पुस्तकांवर चर्चासत्रे, कार्यशाळा यांचे आयोजन करून पुस्तके लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्यही या संस्थेमार्फत करण्यात येते.

नॅशनल बुक ट्रस्टमार्फत भारतातील दर्जेदार साहित्याची निर्मिती, भारतातील एका भाषेतील दर्जेदार साहित्याचे अन्य भारतीय किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करणे, विदेशी भाषांतील उत्कृष्ट पुस्तकांचे भारतीय भाषांमध्ये भाषांतर करणे, आधुनिक ज्ञान असणाऱ्या चांगल्या पुस्तकांना प्रकाशित करून लोकांपर्यंत ज्ञान पोहोचविणे अशा स्वरूपाचे कार्य सुरू आहे. अभ्यासक्रमबाह्य पुस्तकांच्या प्रकाशनासोबत पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, मुलांसाठी कार्यक्रम, प्रकाशनासंदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, जागतिक पुस्तक प्रदर्शनामध्ये सहभागी होणे, स्वयंसेवी संस्थांना अर्थसाहाय्य देणे ही कार्येही संस्था करते. नॅशनल बुक ट्रस्टमार्फत कथा, सामाजिक शास्त्रे, वैद्यकशास्त्र, तंत्रज्ञान, पर्यावरण, भारत देश आणि समाज आदी विषयांवरील भिन्न वयोगटातील वाचकांसाठी पुस्तके प्रकाशित केली जातात. नवसाक्षरांसाठी खास पुस्तकेही संस्था प्रकाशित करते. लोकांना परवडतील अशा किंमतीमध्ये इंग्रजी, हिंदी, असामी, बंगाली, गुजराती, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मल्याळम, मणीपुरी, मराठी, नेपाली, ओडिशी, पंजाबी, राजस्थानी, भोजपुरी, सिंधी, तमिळ, तेलगू आणि उर्दू भाषामध्ये पुस्तके प्रकाशित केली जातात. त्याचबरोबर बाल साहित्यातील काही दर्जेदार पुस्तके नागा, भुतिया, बोरो, गारो, खाशी, कॉकबोरोक, लेप्चा, लिर्नबू, मिझो, नेवारी या भाषांतून प्रसिद्ध करण्याचे कार्य सुरू आहे. अन्य प्रकाशकांकडून प्रकाशित न केले जाणारे दर्जेदार साहित्य आणि विषयांना नॅशनल बुक ट्रस्ट प्राधान्य देते. अलीकडच्या काळात ब्रेल भाषेतून मोठ्या प्रमाणात पुस्तके प्रकाशित केली जात आहेत.

आजवर नॅशनल बुक ट्रस्टमार्फत जागतिक पातळीवरील वीसपेक्षा जास्त पुस्तक प्रदर्शने भरवली आहेत. देशभरामध्ये चारशेपक्षा जास्त पुस्तक प्रदर्शने भरवली आहेत. भारतातील सर्वात महत्त्वाची संस्था या नात्याने भारतीय पुस्तके जागतिक पातळीवरील पुस्तक प्रदर्शनात प्रदर्शित केली आहेत. १९७० पासून फ्रँकफुर्ट, बोलोंगा, जेरूसलेम, सेऊल, शारजा, बिजिंग, कोलंबो, टोकियो, बँकॉक, मिन्स्क, कौलालंपूर, सिंगापूर, वॉर्सा, नायजेरिया, काठमांडू, मनिला, लंडन, कराची, ढाका, लाहोर येथील प्रदर्शनात भारतीय पुस्तके प्रदर्शित केली आहेत. पुस्तकांची मोबाईल व्हॅन्समधून दूरवरच्या ठिकाणी फिरती प्रदर्शने भरवून पुस्तके लोकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचे कार्य नॅशनल बुक ट्रस्ट करत आहे. १९९२ पासून अशी दहा हजारपेक्षा जास्त प्रदर्शने भरवली आहेत. नॅशनल बुक ट्रस्टमार्फत ऐंशी हजारपेक्षा जास्त सदस्यांना बुक क्लब मेंबर बनवण्यात आले आहेत. लेखकांना आणि प्रकाशकांना अर्थसाहाय्य पुरवण्यात येते. अशा प्रकाशकांना नॅशनल बुक ट्रस्टच्या मानकानुसार पुस्तकांची किंमत निर्धारित करावी लागते. नॅशनल बुक ट्रस्ट - फायनान्शियल असिस्टन्स प्रोग्राम अंतर्गत भारतीय पुस्तकांच्या भाषांतरासाठी अर्थसाहाय्य दिले जाते.भारतीय पुस्तकांना विदेशी भाषांमध्ये प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांनाही अर्थसाहाय्य केले जाते.स्वयंसेवी, साहित्यविषयक कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान दिले जाते.विविध संस्थांना ग्रंथ प्रसारासाठीची चर्चासत्रे, कार्यशाळांसाठी ७५ टक्के अनुदान दिले जाते.प्रकाशकांनाही या व्यवसायाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे, या हेतूने कार्यशाळा आयोजित केल्या जातात. भारतातील काही विद्यापीठांशी नॅशनल बुक ट्रस्टने सहकार्य करार

केले आहेत. कलकत्ता विद्यापीठ आणि आंबेडकर विद्यापीठ, दिल्ली येथील काही विद्यार्थ्यांना प्रकाशन व्यवसायासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाते. लेखनविषयक कार्यशाळा, प्रकाशक, लेखक, वितरकांची वार्षिक संमेलने यांनाही संस्था अर्थसाहाय्य देते. ईशान्य भारतामध्ये साहित्य निर्मितीकडे विशेष लक्ष देते. आफ्रो-अशिया भागातील सर्वात मोठे नवी दिल्ली 'जागतिक पुस्तक प्रदर्शन' हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प चालवला जातो.या प्रदर्शनाचे आज मोठे नाव झाले आहे.

नॅशनल सेंटर फॉर चिल्ड्रेन्स लिटरेचर ही संस्था नॅशनल बुक ट्रस्टमार्फत १९९३ मध्ये स्थापन करण्यात आली. या संस्थेमार्फत विविध भारतीय भाषांतील बालकांसाठीचे साहित्य प्रकाशित केले जाते. या संस्थेमार्फत बाल साहित्यांचे प्रदर्शन, कार्यशाळांचे आयोजन केले जाते. या संस्थेमार्फत ३५,००० क्लब मेंबर्स नोंदवण्यात आले आहेत. ही संस्था द्वैमासिक 'रिडर्स क्लब बुलेटीन' प्रकाशित करते. संस्थेमार्फत ऑनलाईन ग्रंथालय चालवले जाते. देशभरातील सदस्य या सुविधेचा लाभ घेत आहेत.

लेखक आणि प्रकाशकांना प्रोत्साहनपर स्वतंत्र अर्थसाहाय्य योजना राबवली जाते. संदर्भग्रंथ आणि अभ्यासक्रमाची पुस्तके प्रकाशनासाठीही अर्थसाहाय्य दिले जाते. एखाद्या पुस्तकाची विद्यार्थ्यांना अभ्यासकांना मोठी मदत होणार आहे, अशा पुस्तकांच्या प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते. आजवर एक हजारपेक्षा जास्त पुस्तकांना अशाप्रकारे अनुदान देण्यात आले आहे. यातील बहुतांश पुस्तके ही इंग्रजी भाषेतील आहेत. मागील काही वर्षात इतर भारतीय भाषांतील पुस्तकांचे प्रकाशनही या योजनेंतर्गत करण्यात येत आहे. दरवर्षी एक ऑगस्ट रोजी नॅशनल बुक ट्रस्ट स्थापनादिन व्याख्यानमालेचे आयोजन करते.यानिमित्त मोठ्या साहित्यिकाचे, प्रकाशकाचे किंवा विषय तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित केले जाते.जागतिक पातळीवर या क्षेत्रात चालू असणाऱ्या घडामोडींची माहिती व्हावी, या उद्देशाने ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

नॅशनल बुक ट्रस्टमार्फत 'नॅशनल ॲक्शन प्लॅन फॉर रिडरशिप डेव्हलपमेंट अमंग द युथ' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश पंधरा ते पंचवीस वयोगटातील युवकांमध्ये २०२५ पर्यंत वाचनाची आवड निर्माण व्हावी, हा होता. या प्रकल्पातंर्गत प्रथम देशभरातील युवा वाचकांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाध्ये वाचकांचा आर्थिक स्तर आणि वाचन आवड याचा अभ्यास करण्यात आला. हे सर्वेक्षण पुस्तक रूपात नॅशनल बुक ट्रस्टमार्फत प्रकाशित करण्यात आले. दुसरे सर्वेक्षण ईशान्य भारताचे करण्यात आले. हा अहवालही पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्यात आला आहे.

नॅशनल बुक ट्रस्टमार्फत १९८२ पासून पुस्तकांना लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने राष्ट्रीय पुस्तक सप्ताह साजरा करण्यात येतो. १४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत दरवर्षी हा आठवडा साजरा करण्यात येतो. या काळात देशाच्या विविध भागांत चर्चासत्रे, कार्यशाळा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. २०१३ मध्ये असे एकूण दोनशे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.प्रामुख्याने विज्ञानकथालेखन कार्यशाळा, कथालेखन कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

### ३. भारतीय भाषा संस्थान, म्हैसूर

भारत सरकारच्या मानव संसाधन आणि विकास मंत्रालयाच्या वतीने भारतीय भाषा संस्थान (Central Institute of Indian Languages) ही संस्था १९६९ साली म्हैसूर येथे स्थापन करण्यात आली. सर्व भारतीय भाषांमध्ये समन्वय साधणे, सर्व भारतीय भाषांचा शास्त्रीय अभ्यास करणे, त्यातील निष्कर्षास अनुसरून केंद्र आणि राज्य सरकारांना भाषाविषयक धोरण ठरवण्यासाठी सल्ला देणे, आंतरविद्याशाखीय अभ्यासाना प्रोत्साहन देणे, भाषा समृद्धीसाठी योजना राबवणे, भाषातील समन्वयातून लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे या उद्देशाने स्थापनेपासून ही संस्था कार्यरत आहे. यासाठी आवश्यक साहित्य प्रकाशित करण्यासाठी आणि संस्थेस स्वत:चा निधी निर्माण करण्याची स्वायत्तता देण्यात आली. भारतातील नामशेष होत जाणाऱ्या भाषा, अल्पसंख्य समुदायाच्या भाषा, आदिवासींच्या बोलीभाषांचा अभ्यास, संरक्षण आणि संवर्धन करण्याचे महत्त्वाचे कार्य संस्था करते.

भारतीय भाषा संस्थानामध्ये भाषाविषयक काम करणारे अनेक विभाग आहेत. राष्ट्रीय अनुवाद अभियान (National Translation Mission) हा त्यांपैकी एक अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. संविधानाच्या आठव्या परिशिष्टात नोंदविलेल्या सर्व भारतीय भाषांमध्ये भाषांतराच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार करणे, हा मिशनचा मुख्य हेतू आहे. साहित्येतर महत्त्वाच्या ग्रंथांचे भाषांतर व प्रकाशन करणे, भाषांतरकारांना प्रशिक्षण देणे, भाषांतरविषयक कोर्सेस आयोजित करणे, शब्दकोशांची निर्मिती व विकास करणे, इंग्रजी व भारतीय भाषांमधील यंत्राधारित भाषांतरास प्रोत्साहन देणे, भाषांतरविषयक प्रकल्पांना अर्थसहाय्य देणे, भाषांतरांशी निगडीत नियतकालिके तसेच भाषांतरित ग्रंथांच्या प्रकाशनास पाठबळ देणे, क्षेत्रीय भाषांतर उत्सव, चर्चासत्र, कार्यशाळा, पुस्तक प्रदर्शन इ. चे आयोजन करणे, भाषांतर अभ्यासाचा एक ज्ञानसंचय उभारणे इ. मिशनची उद्दिष्ट्ये आहेत. मिशनच्या वतीने पाच डाटाबेसची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामध्ये भारतीय विद्यापीठांचा डाटाबेस, नॅशनल रजिस्टर ऑफ ट्रान्सलेटर्स, प्रकाशकांचा डाटाबेस, भाषांतराची बिब्लिओग्राफी, तज्ज्ञांचा डाटाबेस यांचा समावेश आहे. मिशनच्या वतीने, 'ट्रान्सलेशन टुडे' या नियतकालिकाचे प्रकाशन केले जाते.

नॅशनल रजिस्टर ऑफ ट्रान्सलेटर्स (NRT) मध्ये भाषांतरकार ऑनलाईन नावनोंदणी करून मिशनच्या कामामध्ये सहभागी होऊ शकतात. मिशनकडून भाषांतरांचे प्रकल्प घेऊन आपण अर्थप्राप्ती करू शकतो. भाषांतरकार म्हणून करिअर करण्यासाठी मिशन साहाय्यभूत आहे.

भारतीय भाषा संस्थानच्या वतीने पुढील बाबींसाठी सहायता अनुदान दिले जाते. (१) भारतीय भाषांमधील पुस्तकांचे प्रकाशन (२) नियतकालिकांचे प्रकाशन (३) पुस्तकांची खरेदी (४) कार्यशाळा, भाषाशिक्षण, लघु कालावधीचे अभ्यास प्रकल्प, यांच्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अर्थसाहाय्य. संस्थानच्या संकेतस्थळावर या योजनांची तपशीलवार माहिती उपलब्ध आहे. विद्यार्थी, शिक्षक या योजनांचा लाभ घेऊ शकतात.

संस्थानच्या वतीने कन्नड, बंगाली व तमिळ भाषा शिक्षणाचे ऑनलाईन कोर्सेस सुरू आहेत. तसेच विविध योजना, प्रकल्प संस्थानने हाती घेतले आहेत.

आपली मातृभाषा सोडून इतर भारतीय भाषा शिकण्यासाठी दहा महिन्यांचा भाषा प्रशिक्षण पदविका कार्यक्रम संस्थानच्यावतीने दरवर्षी घेतला जातो. संस्थाच्या पाच क्षेत्रीय केंद्रावर या कोर्सचे आयोजन केले जाते. सहभागींना विद्यावेतन दिले जाते. विद्यार्थी व शिक्षकांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आहे.

संस्थेने आपल्या विविध कार्यासाठी काही केंद्रांची स्थापना केली आहे. अध्यापनपूरक साहित्य निर्मिती आणि त्यांचा अध्यापन, अध्ययनामध्ये होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी सेंटर फॉर मटेरियल प्रॉडक्शन टेस्टिंग अँड इव्हॅल्यएशनची स्थापना केली आहे. या केंद्राच्या वतीने प्रौढांसाठी आणि मुलांकरिता साहित्य निर्मिती करण्यात येते. मातृभाषा, दुय्यम भाषा शिकणाऱ्यांसाठी हे साहित्य महत्त्वाचे मानले जाते. शिक्षक आणि संशोधक परस्पर समन्वयाने ही जबाबदारी पार पाडत असतात. हे साहित्य मुख्यत: पुस्तकरूपात प्रसिद्ध केले जाते. अन्य पूरक साहित्यासोबत आजवर अडीचशेपेक्षा जास्त पुस्तकांची निर्मिती या केंद्रामार्फत करण्यात आली आहे. या केंद्रामार्फत शिक्षकांसाठी उजळणी वर्गांचे आयोजनही करण्यात येते. तसेच या साहित्याची उपयुक्तता तपासली जाते.

या संस्थेने दुसरे केंद्र भाषा उपयोजनाबाबत स्थापन केले आहे. सेंटर फॉर अप्लाईड लँग्वेज सायन्सेस हे उच्चारविज्ञान (स्पिच सायन्स) किंवा फोनेटिक्सवर काम करते. विविध शब्दांचा उच्चार करताना निर्माण होणारा ध्वनी, त्यावेळी होणाऱ्या हालचाली, कंपने यांचा अभ्यास करून निष्कर्ष नोंदवले जातात. हा अभ्यास सर्व भारतीय भाषांसाठी होत असल्याने या क्षेत्रात भाषेच्या विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध असतात. यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आली असून देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे संशोधक येथे आपले योगदान देत आहेत. मानसशास्त्रीय भाषा परिणाम (सायकोलिंग्विस्टिक) अभ्यासण्यासाठी या केंद्रातील दुसरा गट कार्यरत आहे. या केंद्रामार्फत भाषा विषय शिकवणाऱ्या प्राथमिक शिक्षकांपासून सर्व शिक्षकांसाठी उजळणी वर्गांचे आयोजन केले जाते.

भूगोलानुरूप भाषा कशी बदलते, याचा अभ्यास करणारा एक गट या संस्थेत कार्यरत आहे. भारताच्या वेगवेगळ्या भागात भाषा कशी बदलते याचा अभ्यास हा जिओलिंग्विस्टिक गट करतो. भाषानिहाय नकाशे बनवण्याचे आणि कालानुरूप त्यामध्ये बदल करण्याचे कार्य या गटामार्फत सुरू असते. भाषा, साक्षरता, बोली भाषा, आदिवासी भाषा, अल्पसंख्य भाषा अशा विविध परिमाणावर आधारित नकाशे बनवले जातात. काढलेल्या निष्कर्षांची माहिती इतर अभ्यासकांपर्यंत पोहोचावी, या हेतूने विविध कार्यशाळा, चर्चासत्रे आयोजित केली जातात. या संख्यात्मक अभ्यासातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी करण्यास सहाय्य होते.

संस्थेचे स्वत:चे मुद्रणालय आहे. त्याचप्रमाणे विविध पुस्तक प्रदर्शनातून आणि कार्यक्रमातून संस्थेची प्रकाशने जनसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी संस्था प्रयत्नशील असते. संस्थेचे स्वत:चे प्रशस्त ग्रंथालय आहे. ग्रंथालयात भाषाविज्ञानाविषयी ६३,५०० पेक्षा जास्त पुस्तके आहेत. २५० पेक्षा जास्त मासिके या ग्रंथालयात

नियमित येतात. मायक्रोफिल्म, डिजिटल साहित्य अशा पारंपरिक आणि आधुनिक भाषाविज्ञानविषयक साहित्याने भरलेले ग्रंथालय अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

संस्थानने विभागीय केंद्रामार्फत आपले कार्य देशाच्या विविध भागात सुरू केले आहे. संस्थानचे पूर्वविभागीय केंद्र भुवनेश्वर येथे आहे. या केंद्रात आसामी, बंगाली आणि ओडिसी भाषेचे अध्यापन होते. पश्चिम विभागीय केंद्र हे पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये आहे. येथे गुजराती, मराठी आणि सिंधी भाषेचे अध्यापन होते. दक्षिण विभागीय केंद्र म्हैसूर येथे असून तेथे कन्नड, मल्याळम, तमिळ, तेलुगु भाषांचे अध्यापन होते. उत्तर विभागीय केंद्र हे पंजाब विद्यापीठ, पतियाळा येथे असून तेथे कश्मिरी, पंजाबी आणि उर्दू भाषांचे अध्यापन होते. पूर्वोत्तर क्षेत्रीय भाषा केंद्र गुवाहाटी (आसाम) येथे असून येथे मणिपुरी, नेपाळी भाषा शिकविल्या जातात. याखेरीज उर्दू भाषेसाठी हिमाचल प्रदेशातील सोलन आणि उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे दोन स्वतंत्र केंद्रे कार्यरत आहेत. वरील केंद्रामध्ये भाषाविषयक शिक्षण दिले जाते.

भारतीय भाषा संस्थानमार्फत नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी आणि इतर अनेक संस्थांच्या सहयोगाने 'भाषा भारती' दालन उभारण्यात येत आहे. यामध्ये विविध पुस्तके, मुद्रित साहित्य आणि डिजिटल साहित्यासोबत विविध भाषाविषयक रचनांची निर्मिती करण्यात येत आहे. संस्थेमार्फत वेगवान संकेतस्थळ सुरू करण्यात येत आहे. देशातीलच नव्हे; तर जगभरातील अभ्यासकांना यामुळे घरबसल्या अनेक संदर्भ ग्रंथ आणि संदर्भ साधने उपलब्ध होतील. वेळ आणि पैशांची बचत होईल.

संस्थेची संपूर्ण माहिती https://www.ciil.org/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. भाषाविषयक ज्ञानासोबत संगणकाचे ज्ञान, इतर भाषांची जाण असणाऱ्या भाषा अभ्यासकांना या संस्थेमध्ये विविध संधी उपलब्ध असतात. संस्थेच्या संकेतस्थळावर संधी पडताळून मराठी भाषक युवकांनी या संधीचे सोने करायला हवे.

## ४.५ प्रात्यक्षिकासह आंतरजालावर मराठीविषयक लेखन

आंतरजालावर मराठी भाषेतून लेखन करण्यासाठी आपले स्वत:चे संकेतस्थळ असणे आवश्यक आहे किंवा इतर आंतरजालावर आपणास लेखन संधी मिळणे आवश्यक आहे. विश्वकोश, विकिपीडिया, स्वत:चा ब्लॉग, फेसबुक अकाउंट अशा अनेक ठिकाणी आपणास मराठी भाषेतून लेखन करणे शक्य होते. गुगल अकाउंटवर मराठी लेखनासाठीची सेटिंग करता येते किंवा गुगल इनपुट टूलच्या माध्यमातून मराठी लेखन करता येते. यासाठी सर्वात प्रथम आंतरजाल सुरू करणे आवश्यक आहे. नंतर गुगल सर्च इंजिनवर 'गुगल इनपुट टूल' मराठी शोधावे. Google Input Tools Marathi शोधताना अनेक विकल्प समोर येतात. या पर्यायामध्ये आंतरजाल चांगली साथ देत असेल तर "Google इनपुट साधने ऑनलाईन वापरून पहा' हा पर्याय उत्तम राहतो. याठिकाणी १३० भाषांमध्ये लेखन करण्याची सुविधा उपलब्ध आहे. दुसरा विकल्प 'ट्राय गुगल इनपुट टुल्स ऑनलाईन'. या विकल्पातही १३० भाषांचा पर्याय उपलब्ध आहे. मराठीसह गुजराती, हिंदी, कन्नड, मल्याळम, मणीपुरी, ओडिशी, पंजाबी, सिंधी, तमीळ, तेलगू, उर्दू या इतर भाषांचीही सुविधा उपलब्ध आहे.या पद्धतीने टंकलेखन करण्यासाठी इंग्रजीमध्ये मराठी शब्दांचे स्पेलिंग करता येणे आवश्यक आहे. याखेरीज तिसऱ्या विकल्पामध्ये आंतरजाल उपलब्ध नसताना मराठी भाषेतून लेखन करता यावे

याकरिता Google Input Marathi Download उपलब्ध आहे. विंडोजमध्ये हे साधन वापरता येते. त्याचप्रमाणे गुगल इनपुट टूल स्थापित करण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. मराठी शब्दांचे इंग्रजी भाषेतील स्पेलिंग काय होते, याचा अंदाज येणे आवश्यक आहे. आपल्याला इंग्रजी भाषेतील स्पेलिंग लिहिता येत असेल तर मराठी भाषेतील लेखनाकरिता आपण तयार आहोत. हे लेखन करताना सुरुवातीला नमूद केल्यानुसार गुगल इनपुट टूल प्लस मराठी मध्ये टंकलेखन करू शकतो. यास 'फोनेटिक' तंत्राचा वापर करून टंकलेखन करणे असे म्हणतात.

एमएस वर्डमध्ये सुरुवातीला एक फाईल ओपन करणे आवश्यक आहे.त्यानंतर टंकलेखनास सुरुवात करणे आवश्यक आहे. 'Bharat Maza Desh Ahe' हे टंकलेखन करताच 'भारत माझा देश आहे' हे शब्द पडद्यावर दिसू लागतात. यातील स्पेलिंग टाईप करताना इंग्रजी अक्षरांचे टंकलेखन करत असताना वेगवेगळे पर्याय असणारे शब्द दिसून येतात. त्यातील काही शब्द अशुद्ध रूपात येतात. उदाहरणार्थ कळावीत शब्दांचे स्पेलिंग Kalavit असे स्पेलिंग लिहितो. मात्र त्यानंतर काळवीट, काळविट, कळवीत, कळावीत, कलावित आणि kalavit असे पर्याय दिसू लागतात. त्यातील आपण योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे. पुरेसा मजकूर टंकलिखित झाल्यानंतर तो कॉपी करून घ्यावयाचा आणि तो एमएस वर्डमधील फाईलमध्ये चिकटवायचा. त्यानंतर ती कोणत्याही प्लॅटफॉर्मवर जशीच्या तशी दिसते.

याखेरीज इनस्क्रिप्ट टंकलेखन करता येते. यासाठी ISM प्रणाली आपल्या संगणकावर स्थापित करता येते. या साधनाचा वापर करून थेट टंकलेखन करता येते. मराठी भाषेतील दोन प्रकारच्या कळपट्टिका यावर उपलब्ध होतात. टंकलेखनाचा अभ्यासक्रम झाला आहे, त्यांना लगेचच मराठी टंकलेखन करणे शक्य होते.मात्र तसा आपल्याला सराव नसेल, तर कळफलक समोर ठेवून काही दिवस सराव केल्यास टंकलेखन करणे शक्य होते.त्यामुळे मराठी टंकलेखन करणे अत्यंत सोपे आहे. युनिकोडचा वापर करणे आणि त्यातून आपले साहित्य प्रसिद्ध करण्यामुळे मराठी भाषेला आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी मदत करत आहोत, हे लक्षात घ्या.

आपण टंकलिखित केलेला मजकूर आकर्षक दिसावा, यासाठी त्यामध्ये काही सुधारणा आणि बदल करण्याची सुविधा वापरता येते. शीर्षक हे देवनागरी अक्षरामध्ये लेखन केल्यानंतर इंग्रजी टंकलेखनाप्रमाणेच बोल्ड सुविधेचा वापर करून ठळक करता येते. परिच्छेद कोठे आणि कसा घ्यावयाचा, हे निश्चित करता येते.काही शब्दांकडे लक्ष वेधून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी तिरक्या अक्षरांचा (Italic) किंवा ते शब्द अधोरेखित करण्याचा पर्याय वापरता येतो. अक्षरांचा आकार, त्यांचा नमुना हे आपल्या आवडीनुसार किंवा ज्यांच्यासाठी हा मजकूर लिहिला आहे, त्यांच्या सोयीच्या टंकामध्ये रूपांतरित करता येतो. त्यासाठी ऑनलाईन अनेक बदलकर्ते (Converter) उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करून आपले आंतरजालावरील लेखन अधिक आकर्षक आणि सोयीचे करता येते.

आपण आपले लेखन जास्तीत जास्त प्रमाणात मराठी भाषेचा वापर करून करणे आणि त्यासाठी युनिकोडचा वापर करणे योग्य राहते. अन्य टंकामध्ये केलेले लेखन आंतरजालावर ठेवल्यास किंवा ई-मेल संदेशाद्वारे पाठवल्यास ते योग्य पद्धतीने तेथे दिसेलच, असे नाही. जागतिक पातळीवर मराठी लेखनांसाठी

उपलब्ध सुविधांचा लाभ घेणे आणि मराठी भाषा समृद्ध आणि जागतिक पातळीवर नेण्यासाठी आपणही खारीचा वाटा उचलणे आवश्यक आहे.

## ४.६ स्वाध्याय

प्रश्न-१ योग्य पर्याय निवडा.

१. आंतरजाल हा कशाचा महासागर आहे?

अ) ज्ञानाचा ब) पाण्याचा क) अज्ञानाचा ड) शून्य तंत्रज्ञान

२. शासकीय प्रशासन व्यवहारात मराठी भाषेत टंकलेखन करण्यासाठी कोणता टंकलेखन कोड अनिवार्य मानला आहे?

अ) कृतिदेव ब) देवनागरी क) योगेश ड) युनिकोड

३. खालीलपैकी कोणत्या प्रकारामध्ये नोंदीलेखन करताना नोंदीचे स्वरूप हे लघु, मध्यम आणि दीर्घ असे निश्चित केले आहे?

अ) विकिपीडिया ब) विश्वकोश क) योगेश ड) युनिकोड

४. आंतरजालावरील विकिपीडिया हा कोणता ज्ञानकोश म्हणून ओळखला जातो?

अ) मुक्त ब) बंदिस्त क) रचनाबद्ध ड) यापैकी नाही

५. भाषा संचालनालयामार्फत शासकीय पत्रव्यवहार सुटसुटीत व्हावा या हेतूने कोणता ग्रंथ प्रकाशित केला आहे?

अ) वस्तुनिष्ठ मराठी ब) प्रशासनातील मराठी

क) प्रशासनिक लेखन ड) प्रशासन

उत्तरे :- १) अ २) ड ३) ब ४) अ ५) क

प्रश्न-२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. आंतरजालावरील मराठीविषयक लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. विकिपीडिया या संकेतस्थळावर मराठी भाषेतून नोंदी लेखन करावयाचे वेगवेगळे प्रकार स्पष्ट करा.

प्रश्न-३ लघुत्तरी प्रश्न

१. आंतरजालावरील मराठी विश्वकोशातील नोंदीलेखनाचे स्वरूप थोडक्यात सांगा.

२. राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट करा.

३. भाषा संचालनालयाच्या कार्यपद्धतीचा थोडक्यात आढावा घ्या.

प्रश्न-४ टिपा लिहा.

१. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन

२. मराठी साहित्य परिषद, पुणे

३. विश्वकोश मंडळ

४. साहित्य अकादमी

५. भाषा संस्थान, म्हैसूर

❑❑❑

# घटक – १
# प्रसारमाध्यमांतील अर्थार्जनाच्या संधी व भाषिक कौशल्ये

## १.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस,

१. प्रसारमाध्यमांचे विविध प्रकार, त्यांचे स्वरूप, त्यांमधील अर्थार्जनाच्या संधी व त्यासाठी आवश्यक भाषिक कौशल्ये यांचे आकलन होईल.

२. सर्जनशील जाहिरातनिर्मितीचे कौशल्य अवगत होईल.

३. शब्दांकन व मानपत्रलेखन करण्याचे कौशल्य विकसित होईल.

४. आकाशवाणी व चित्रवाणी (टी.व्ही.) वरील कार्यक्रमांचे स्वरूप व त्यासाठीची भाषिक कौशल्ये यांचे ज्ञान होईल.

५. प्रसारमाध्यमांसाठी आवश्यक भाषिक कौशल्यांचे व्यवहारात उपयोजन करण्याच्या क्षमता निर्माण होतील.

**अ) मुद्रित माध्यमे (Print Media)**

## १.२ प्रास्ताविक

प्रसारमाध्यमे हा आपल्या दैनंदिन जीवनावर सर्वाधिक प्रभाव टाकणारा महत्त्वाचा घटक आहे. माध्यमांशिवाय आयुष्याची कल्पना ही आजच्या पिढीसाठी अयोग्य ठरेल, इतके सर्वव्यापक स्वरूप माध्यमांचे आहे. माध्यमे आता आपली सामाजिक व सांस्कृतिक अंगे बनलेली आहेत. एकमेकांपासून सर्वार्थाने दुरावत चाललेल्या माणसांना आणि समूहांना जोडण्याचे, त्यांना माहिती देण्याचे साधन ही माध्यमेच बनली आहेत. आपण या माध्यमांना वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन), नभोवाणी (रेडिओ) आदी नावांनी ओळखतो. संवादशास्त्राच्या भाषेत त्यांना मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे म्हणून ओळखले जाते. या सर्व माध्यमांची भाषा मराठीच असली तरी या प्रत्येक माध्यमाची स्वतःची अशी एक भाषा असते व आहे. वर्तमानपत्रांची वेगळी मराठी, दूरचित्रवाणीची वेगळी आणि नभोवाणीची सुद्धा वेगळी असते. विशेषतः दूरचित्रवाणी आणि नभोवाणी यांची भाषा ही शारीर स्वरूपाची आहे, म्हणजे ती कानांनी ऐकता, अनुभवता येते. वृत्तपत्रांची भाषा मात्र त्या तुलनेत अशारीर वा निर्जीव स्वरूपाची आहे.

आजघडीला या तिन्ही माध्यमांतील भाषा एका प्रचंड सांस्कृतिक उद्योगातील उत्पादन म्हणूनही मानल्या पाहिजेत. म्हणजे जनजीवनातील मराठी भाषा उचलून तिचा पैसा, प्रसिद्धी व ग्राहक मिळविण्यासाठी आपल्या गरजेनुसार वापर करण्याचा हा उद्योग आहे. म्हणून आजच्या प्रसारमाध्यमांतील भाषा एक सांस्कृतिक जिन्नस सुद्धा बनली आहे. तिचे उत्पादन अन्य वस्तूंच्या उत्पादनाप्रमाणेच सुरू झाले आहे. नव्या आर्थिक

वातावरणात मराठी भाषेचे उत्पादन सुरू असल्याने या भाषेवर बाजारपेठेचा भरपूर असा दबाव आहे. बाजारपेठेतील स्पर्धा, चढाओढ, घाई, दर्जाबद्दलची जाणीव, ग्राहकांची संख्या आदी गोष्टीसुद्धा प्रसारमाध्यमांतील मराठीवर परिणाम करीत आहेत, असे ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ जयदेव डोळे एके ठिकाणी म्हणतात. माध्यमांतील गतिमान स्पर्धेचे परिणाम माध्यमांच्या भाषेवर होणे स्वाभाविक आहे. तरी सुद्धा माध्यमांना माध्यमकर्मींकडून अभिप्रेत असलेल्या भाषिक कौशल्यांच्या गरजेमध्ये मात्र तडजोड होऊ शकत नाही. माध्यमांची भाषा गतीने बदलत असली तरी, त्या भाषेची मूलभूत तत्त्वे कायम असणार आहेत. या भाषिक कौशल्यांची आणि त्या द्वारे अर्थार्जनाच्या संधींची माहिती घेण्यापूर्वी माध्यमे म्हणजे काय, हे नेमकेपणाने समजून घेणे आवश्यक आहे.

## १.३ विषय विवेचन

सध्याचे युग हे संवादाचे युग म्हणून ओळखले जाते. अधिक सखोल म्हणावयाचे तर माहिती- संवाद तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात सुद्धा संवाद हा कळीचा मुद्दा आहे. किंबहुना, संपूर्ण माहिती तंत्रज्ञानाचा पाया हाच मुळात संवादाचे बळकटीकरण करणे, हा आहे. संवाद ही मानवाची मूलभूत गरज आहे. आधुनिक मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा यांजबरोबर शिक्षण व आरोग्य या जशा पाच मूलभूत गरजा मानल्या गेल्या आहेत, त्यांच्या बरोबरीने किंबहुना त्याहून अधिक गरज ही संवादाची असते. या संवादाला 'संज्ञापन' असेही म्हटले जाते आणि त्याचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला संज्ञापनशास्त्र.

संवाद ही मानवाची मूलभूत गरज आहे, असे सुरुवातीलाच म्हटले आहे. ही संवादाची भूक मानवाच्या अगदी उत्क्रांतीइतकीच जुनी आहे. किंबहुना, प्रत्येक प्राणिमात्र आपली भूक भागविण्यासाठी, संरक्षणासाठी, प्रजोत्पादनासाठी अशाब्दिक संवादाचा आधार घेताना दिसतात. एखाद्या प्राण्यातील हे संवादाचे केंद्र जर अकार्यक्षम झाले, तर तो कदाचित त्याचे भक्ष्यही व्यवस्थितरीत्या पकडू शकणार नाही. दुसऱ्या अर्थाने त्याचे जीवितच धोक्यात येऊ शकते.

आपण एखाद्या व्यक्तीला शिक्षा म्हणून तुरुंगात- समाजापासून दूर ठेवतो. खरे तर, तुरुंग ही शिक्षा नसून त्याचा सामाजिक संवाद तोडणे, ही त्याला दिलेली शिक्षा असते. पूर्वीच्या काळी समाजाच्या, धर्माच्या आज्ञा न पाळणाऱ्या व्यक्तींना वाळीत टाकले जात असे. संबंधित कुटुंबातील व्यक्तींशी गावातील, समाजातील कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करीत नसे. सामाजिक संवाद खंडित करून त्यांना देण्यात आलेली ही शिक्षा. या दोन्ही प्रकारांत संबंधिताने एकांतात आपल्या कृत्याचा सर्वंकष विचार करावा, त्याला खऱ्या अर्थाने त्या कृत्याबद्दल पश्चात्ताप व्हावा, त्यांनी प्रायश्चित्त घ्यावे, असा संकेत असे. त्यानंतर पुन्हा त्यांना समाजात सामील होण्याची संधी देण्यात येते. असा सामाजिक बहिष्कार हा अत्यंत जीवघेणा असतो. लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत प्रत्येकाला लोकांच्या सहवासात, त्यांच्याशी संवाद साधत राहण्यात आनंद वाटत असतो. हा संवाद खंडित झाला की, मोठे दुःख होते. लहान मुलांमध्ये खेळताना मित्रांनी कोणाशी कट्टी केली, तरी त्या मुलाच्या डोळ्यांत पाणी येते. मोठ्यांमध्ये भ्रम होणे, स्वतःशीच बडबडणे, भास होणे वगैरे प्रकार या संवादाच्या अभावीच निर्माण झालेले दिसतात. इतकी संवादाची आपल्याला आयुष्यात तीव्रतेने गरज असते.

## जनसंवाद (Mass Communication)

संज्ञापनाचे साधारणतः चार प्रकार आहेत. त्यामध्ये आत्मसंवाद (Intrapersonal Communication), आंतरव्यक्ती संवाद (Interpersonal Communication), समूह अथवा गट संवाद (Group Communication) आणि जनसंवाद (Mass Communication) यांचा समावेश आहे. आत्मसंवाद म्हणजे व्यक्तीने स्वतःशीच साधलेला संवाद. ध्यानधारणा किंवा समाधी ही आत्मसंवादाची परमोच्च पायरी मानली जाते. आंतरव्यक्ती संवाद म्हणजे दोन व्यक्तींमधील प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संवाद. आणि समूह संवाद म्हणजे दोनपेक्षा अधिक लोकांनी विशिष्ट कारणासाठी एकत्र येऊन ठरावीक विषयावर एकमेकांशी साधलेला संवाद. हे प्रकार माध्यमविरहित असतात. जनसंज्ञापनामध्ये मात्र एखादा संदेश एकाच वेळी अतिव्यापक प्रदेशात पसरलेल्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध माध्यमांचा आधार घेतला जातो.

समूह संज्ञापनाला पुस्तके, मुद्रित माध्यमे, चित्रपट, रेडिओ, दूरचित्रवाणी, व्हिडिओ, इंटरनेट आदी विविध माध्यमांची जोड मिळाल्याने त्याचा विस्तार जन संज्ञापनामध्ये झालेला आहे. एखाद्या संज्ञापकाचा संदेश एकाच वेळी प्रचंड अशा मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर विस्तारलेल्या ग्रहणकर्त्यांपर्यंत पोहोचविण्याची अचाट कामगिरी या माध्यमांद्वारे साधली जाते. वृत्तपत्रे, रेडिओ आणि दूरचित्रवाणी ही तर जनसंवादाची प्रमुख अंगे खरीच; पण, आज संगणक, इंटरनेट आणि मोबाईल यांच्यामुळे माहिती संवाद तंत्रज्ञानाचे पंख लाभलेल्या साधनांच्या साहाय्याने सदर संवादाची व्याप्ती अधिकच वाढविण्यात यश आले आहे.

## जनमाध्यमे (Mass Media)

जनसंवादासाठी वापरण्यात येणाऱ्या वृत्तपत्रे, पुस्तके, रेडिओ, दूरचित्रवाणी आदी माध्यमांना जनमाध्यमे असे म्हणतात. त्यांनाच आपण सर्वसाधारणरीत्या 'माध्यमे' म्हणून ओळखतो. या माध्यमांनी आज आपला भोवताल व्यापून टाकला आहे. व्यापक लोकसंख्येपर्यंत एखादा संदेश पोहोचविण्याची किमया यांच्याद्वारे साधली जात असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांपासून ते अतिमहत्त्वाच्या वरिष्ठ व्यक्तींपर्यंत साऱ्याच लोकांना या माध्यमांबद्दल कुतूहल, आकर्षण असते. या माध्यमांद्वारे आपलाही संदेश, आपलेही छायाचित्र लोकांपर्यंत पोहोचावे, अशी एक सुप्त इच्छा प्रत्येकाच्या मनात दडलेली असते. प्रसिद्धी प्रत्येकाला हवी असते. ती प्रसिद्धी देण्यासाठी माध्यमकर्मींची भली मोठी फळी विविध स्तरांवर कार्यरत असते. त्यामुळेच या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या माध्यमकर्मींबद्दल मोठी असूया, हेवा आणि आदरही लोकांना वाटत असतो. विविध माध्यमांत झळकावून प्रसिद्धी मिळवून देणारे हे लोक असल्यामुळे त्यांना मोठी सामाजिक प्रतिष्ठाही लाभलेली असते. या माध्यमांमध्ये काम करणाऱ्या लोकांची नावे, छबी सातत्याने झळकत असल्यामुळे त्यांना एक वेगळेच ग्लॅमरही लाभलेले असते. त्या ग्लॅमरच्या आकर्षणापोटी अनेक तरुण, तरुणी माध्यम क्षेत्राकडे आकर्षित होताना दिसतात. प्रत्यक्षात या ग्लॅमरच्या पाठी प्रचंड मेहनत, सातत्यपूर्ण संघर्ष आणि काबाडकष्ट असतात. कोणीही माध्यमकर्मी एका रात्रीत मोठा झालेला नसतो. अनेक वर्षांचे सातत्यपूर्ण परिश्रम आणि काम यांच्या फलित स्वरूप त्याने स्वतःची ओळख माध्यम क्षेत्रात आणि समाजामध्ये निर्माण केलेली असते. हे बरेचदा या क्षेत्रात काम करण्यास उत्सुक असलेल्या तरुणांच्या लक्षात येत नाही. आणि नेमकी ही बाब लक्षात न घेता जो माध्यमाच्या क्षेत्रात उतरला, त्याच्या पदरी भ्रमनिरास आणि मोठी निराशा आल्याखेरीज राहात नाही. म्हणूनच माध्यमाच्या क्षेत्रात जर कारकीर्द घडवायची असेल, तर प्रचंड परिश्रम आणि अखंड मेहनत करण्याची तयारी ठेवूनच युवकांनी यायला हवे. आजघडीला सेवा क्षेत्राच्या बरोबरीने किंबहुना

त्याहूनही कणभर अधिकच वेगाने माध्यमांचे क्षेत्र विस्तारत आहे. अनेकविध संधी येथे निर्माण होत आहेत. रीतसर शिक्षण घेऊन या क्षेत्रात येणाऱ्या युवा वर्गाचे प्रमाणही मोठे आहे. पण, वर म्हटल्याप्रमाणे संख्यात्मक मनुष्यबळ जरी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात येत असले, तरी गुणात्मक मनुष्यबळाची मात्र अजूनही मोठी गरज येथे आहे. नेमकी हीच उणीव भरून काढण्यासाठी अभ्यासू आणि मेहनती युवक युवतींना या क्षेत्रात अर्थार्जनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

**मुद्रित माध्यमे**

पुस्तके, वृत्तपत्रे ही मुद्रित माध्यमे होत. पुस्तक हे वेगळ्या पठडीचे माध्यम आहे. विषयनिहाय अभ्यास करून, चिंतन, संशोधन करून विशिष्ट विषयाला वाहिलेले पुस्तक निर्माण करणे ही सृजनशीलता वेगळी आहे. पुस्तकनिर्मिती ही कालबद्ध असू शकत नाही. एखादा लेखक हयातभर एखाद्या विषयावर प्रचंड व्यापक स्वरूपाचे चिंतन, संशोधन करून अंतिमतः एकच असे पुस्तक निर्माण करून जातो, की जे संबंधित विषय क्षेत्रात मैलाचा दगड ठरून जाते. डार्विनचा उत्क्रांतिवादावरील ग्रंथ हे असे एक उदाहरण म्हणून सांगता येईल. अशी असंख्य उदाहरणे सांगता येतील. बायबलसारखी धार्मिक पुस्तके नेहमीच लोकप्रियतेच्या आणि छपाईच्या अत्युच्च शिखरावर असतात. कादंबरीकार त्याच्या सृजनाच्या बळावर अनेक उत्तमोत्तम साहित्यकृती निर्माण करीत असतो. कवी आपल्या कल्पनांबरोबरच वास्तवालाही शब्दबद्ध करून लोकांच्या मनाचा ठाव घेत असतात. मात्र पुस्तकनिर्मिती ही एकाची सृजनशीलता आणि अन्य लोकांची व्यावसायिकता अशा स्वरूपाची असते. लेखकाने पुस्तक लिहिल्यानंतर ते एकदा प्रकाशकाच्या ताब्यात छपाईसाठी म्हणून गेले की, तेथील संपादकांची, मुद्रितशोधकांची फौज त्यावर काम करते. टाइपसेटिंगवाली मंडळी मजकूर कम्पोझ करतात. डिझाईनर, कलाकार मंडळी त्या पुस्तकाच्या विषयाला साजेसे मुखपृष्ठ, मांडणी करतात. त्यानंतर छपाई, बांधणी होऊन पुस्तक बाजारात विक्रीसाठी दाखल होते. पुस्तकलेखन आणि प्रकाशन हा एक महत्त्वाच्या व्यवसाय आहे. त्यामध्ये उत्तम लिहिणाऱ्याला संधीही पुष्कळ आहेत. मात्र, आपल्याकडे त्याचे स्वरूप म्हणावे तितके व्यावसायिक नाही. काही मोजके मान्यवर प्रकाशक आंतरराष्ट्रीय धर्तीवर अत्यंत व्यावसायिक पद्धतीने काम करतात. एरव्ही, लेखकाने पदरमोड करून पुस्तक प्रकाशित करण्याची प्रथा आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर आहे. किंवा लेखकाने पदरमोड केली नाही आणि प्रकाशकाने खर्च उचलला, तर लेखकाला मानधन द्यावयाचे की नाही, हा सर्वस्वी प्रकाशकांच्या मर्जीवर अवलंबून असणारा मामला आहे. पुस्तकांची ऑनलाइन उपलब्धता, कमी होत चाललेली मागणी यामुळे पुस्तक प्रकाशन क्षेत्रामध्ये एक प्रकारे मरगळ आलेली दिसते. मात्र, चांगले पुस्तक असेल तर आजही विकत घेऊन वाचले जाते, संग्रही ठेवले जाते. अनुवादित साहित्य, चरित्र-आत्मचरित्र ग्रंथ यांची मागणी कायम असते. त्यामुळे सकस साहित्य निर्मिती झाली, तर अशी पुस्तके उतम चालतात, असा अनुभव आहे. त्यामुळे अत्युच्च दर्जाची अभिव्यक्ती आणि सृजनशीलता असणाऱ्या संशोधक, कवी, लेखक तरुणांना या क्षेत्रात संधी आहेत.

माध्यम क्षेत्रात काम करण्यास उत्सुक असणाऱ्या उमेदवारांसाठी वृत्तपत्राचे क्षेत्र हे नेहमीच प्रथम पसंतीचे असते. वृत्तपत्रीय शिक्षण घेत असतानाच अंतर्गत विद्यार्थी काम करण्यासाठी विशेषत्वाने वृत्तपत्र माध्यमाची निवड केली जाते. कारण वृत्तपत्रासाठी करावयाचे लेखन, वृत्तपत्र छापून येईपर्यंत त्यावर होणारी संपूर्ण प्रक्रिया आदींचा अभ्यास करण्याची ही एक महत्त्वाची संधी असते. वृत्तपत्र क्षेत्रात अर्थार्जनाच्या अशा अनेक

संधी आहेत. त्या संधींची माहिती घेण्यापूर्वी केवळ वृत्तपत्रासाठीच नव्हे, तर प्रत्येक माध्यमासाठी अत्यंत महत्त्वाच्या आणि आवश्यक असलेल्या लेखन कौशल्यांची माहिती घेणे सयुक्तिक ठरेल.

**बातमीदाराने घ्यावयाच्या महत्त्वाच्या दक्षता**

**एकाच स्रोतावर अवलंबून राहू नका.** मिळालेल्या माहितीवर आधारित बातमी लिहीत असताना विविध स्रोतांकडून त्या माहितीची खातरजमा करणे.

एखाद्या निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी संबंधित विषयासंदर्भात आपले स्रोत, सर्वंकष वाचन, चिंतन आणि अनुभव या सर्वांचा आधार घ्यावा. कारण वार्ताहराच्या निष्कर्षावर बरेचसे जनमत प्रभावित होणार असते, हे लक्षात ठेवावे.

**तीन जबाबदाऱ्यांचे भान आवश्यक :** बातमीदारावर वार्तांकन, वार्तालेखन आणि डेडलाइनचे पालन या तीन प्रमुख जबाबदाऱ्या असतात. त्यांचे भान सदोदित राखले गेले पाहिजे. डेडलाइनची शिस्त पाळण्याची सवय लावून घ्यावी. त्या दृष्टीने माहितीचे संकलन आणि लेखन करायला शिका. हळूहळू तुमची स्वतःची लेखनशैली विकसित होईल.

**बातमी आणि जाहिरात यांचे तारतम्य :** बातमी आणि जाहिरात या दोन स्वतंत्र गोष्टी असून बातमी लिहिताना वार्ताहराने जाहिरातदाराच्या प्रभावाखाली असता कामा नये, अशी अपेक्षा आहे. वस्तुनिष्ठ, पारदर्शी आणि साधार बातमीचे वाचक आणि सुजाण जाहिरातदार दोघेही स्वागत करतात.

**कथाकथन (स्टोरीटेलिंग) पण अनुभवाधारित :** बातमीलेखन हे एक प्रकारचे कथनच आहे. बातमीदाराने वाचकाला पूर्वानुभव जरूर सांगावेत, पण ते पाल्हाळीक किंवा असंबद्ध असू नयेत.

**शुद्धलेखन आणि व्याकरण यांचे भान आवश्यक :** प्रत्येक माध्यमकर्मीने आपली भाषाशैली सुधारण्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. त्या दृष्टीने शुद्धलेखन आणि व्याकरण यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या दोन गोष्टींचा आग्रह माध्यमकर्मीने स्वतःसाठी- स्वतःकडे धरायला हवा, तरच ते घडू शकते. बातमी आणि बातमीची कॉपी आदर्श होण्याच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. आजकाल मुद्रितशोधक (प्रूफरीडर) ही संकल्पना वृत्तपत्रांच्या कार्यालयांतून हद्दपार होत आहे. उपसंपादकही कामाच्या तणावामध्ये अगदी काळजीपूर्वक मुद्रितशोधन करेल, ही अपेक्षा करणे चुकीचे आहे. या पार्श्वभूमीवर, बातमीदारांनीच आपल्या कॉपीमध्ये शुद्धलेखन व नीटनेटकेपणा या गोष्टी सांभाळल्या, तर संपादकीय टेबलवर (आणि पुढे पानात) त्यांच्या बातमीला सन्मानाचे स्थान मिळेल. वाचक अत्यंत चिकित्सकपणे बातमी वाचत असतात. बातमीतील शुद्धलेखन, व्याकरण या चुकांसाठी अन्य कोणाला नव्हे, तर संबंधित बातमीदारालाच ते दोष देतात. त्यामुळे वृत्तलेखन केले जात असतानाच आपल्या हातून जास्तीत जास्त निर्दोष लेखन केले जाईल, याची दक्षता आपल्या स्तरावरच घेतली जाणे अधिक श्रेयस्कर असते.

**आधुनिक माहिती तंत्रज्ञान साधनांचा अंगीकार :** बातमीदारांनी आज सहजगत्या उपलब्ध असलेल्या माहिती तंत्रज्ञानाधारित साधनांचा (संगणक, स्मार्टफोन, इंटरनेट इ.) व त्यासाठी आवश्यक कौशल्यांचा अंगीकार केला पाहिजे. त्यामुळे आपले काम अधिक गतीने व अधिक दर्जेदार होऊ शकेल आणि

उर्वरित वेळ पुन्हा आणखी काही चांगल्या बातम्या शोधण्यासाठी, वाचनासाठी, व्यक्तिमत्त्व विकासासाठी वापरता येऊ शकेल.

**प्रसारमाध्यमातील विविध क्षेत्रे, त्यांसाठीची भाषिक कौशल्ये व त्यामुळे प्राप्त होणाऱ्या करिअरच्या संधी यांचा परिचय आपण करून घेऊ.**

### १. संपादन (Editing)

सर्वसामान्य लोक असोत किंवा पत्रकारितेमधील नवखे असोत, संपादन या शब्दाचा अर्थ ते मजकुराची काटछाट करणे, असा घेतात. तथापि, वृत्तपत्रातील जागेत बसेल, या पद्धतीने केवळ मजकूर कापणे म्हणजे खचितच संपादन नव्हे. Edit या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ मांडणी करणे; इतरांच्या लेखनात स्पष्टीकरणार्थ टिपा देऊन सुधारणा करणे व ते चांगल्या प्रकारे सादर करणे असा आहे. म्हणजेच वृत्तपत्राच्या दृष्टीने संपादन या शब्दामध्ये मजकूर तपासणे, शीर्षक देणे आणि उत्तम सजावट व मांडणी करणे या बाबींचा समावेश होतो. संपादनामध्ये मजकुरात कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त चांगला आशय वाचकाला सादर करण्यासाठी योग्य ठिकाणी योग्य शब्दप्रयोग, शुद्धलेखन, व्याकरणाचे भान आणि प्रसंगी प्राप्त झालेल्या अर्धवट मजकुरामध्ये वस्तुस्थितिनिदर्शक आशयात्मक भर घालणे अशा प्रकारे काम करावे लागत असते.

संपादन हे मोठ्या कौशल्याचे काम असते. वृत्तपत्राचे धोरण, जाहिराती वगळता संपादकीय मजकुरासाठी उपलब्ध जागा, बातमीचे महत्त्व, वाचकांची आवड आदी बाबी लक्षात घेऊन वृत्तपत्राची डेडलाइन सांभाळण्याची कसरत करीत उत्तम उत्पादन निर्माण करून वाचकांना सादर करण्याची कष्टसाध्य कला म्हणजे संपादन होय.

संपादक हा वृत्तपत्रातल्या सर्व संपादकीय मजकुराला जबाबदार असतो. वृत्तपत्राच्या संपादकीय मजकुराला विशेषतः अग्रलेख, त्यातून व्यक्त होणारी मते आणि त्याचे होणारे परिणाम या साऱ्यांना संपादकच जबाबदार असतो. वैयक्तिक मालकीच्या विशेषतः जिल्हा वृत्तपत्रांचा मालक, मुद्रक व प्रकाशक एकच व्यक्ती असते. मोठ्या साखळी वृत्तपत्रांमध्ये संचालक ही एखादी व्यक्ती, संस्था अगर खाजगी ट्रस्ट वा कंपनी असते. यामध्ये संचालक व संपादक वेगवेगळे असतात. मात्र, हे दोन्ही प्रकारचे संपादक हे वाचकाला म्हणजेच समाजाला जबाबदार असतात. दुसऱ्या प्रकारातला संपादक मालकालाही जबाबदार असतो. अग्रलेख, स्फुट लिहिणे एवढीच संपादकाची जबाबदारी नसते, तर वृत्तपत्रातील मजकुराची विश्वासार्हता, प्रतिष्ठा, लोकप्रियता यांचीही जबाबदारी त्याच्यावरच असते.

जास्तीत जास्त निर्दोष, परिपूर्ण व आकर्षक वृत्तपत्र वाचकांना सादर करणे हे संपादकाचे प्रमुख कर्तव्य असते. लेखनाबरोबरच वृत्तपत्राच्या सर्व विभागांमध्ये समन्वय राखून वृत्तपत्र अधिकाधिक उत्तम प्रकारे सादर करण्याचा संपादकाचा प्रयत्न असतो. वाचकाला सहज समजेल, अशा प्रकारे वृत्तपत्राची रचना, मांडणी व सजावट करणे, मजकुरात सातत्य व एकसंधपणा राखणे ही जबाबदारी संपादकाची असते. आजच्या कालखंडात उपरोक्त गुणवैशिष्ट्यांबरोबरच संपादकामध्ये व्यवस्थापन आणि संघटन कौशल्यही असणे अत्यावश्यक आहे. अंतर्गत संपादकीय आणि सामाजिक जबाबदारीच्या बरोबरीनेच संपादकाने वृत्तपत्र वितरण वृद्धी, जाहिरात संकलन व व्यवसाय वृद्धी या दृष्टीने समाजातील विविध व्यावसायिक व औद्योगिक घटकांशीही उत्तम सहसंबंध निर्माण करावेत, अशी अपेक्षा वृत्तपत्र व्यवस्थापनाची असते. वृत्तपत्र क्षेत्रामध्ये सद्यःस्थितीत खूपच

मोठी व्यावसायिक स्पर्धा निर्माण झाली आहे. आवृत्यांची संख्या वाढली आहे. साखळी वृत्तपत्रांकडून जिल्हा, तालुकानिहाय आवृत्त्या प्रसिद्ध केल्या जात आहेत. अशा परिस्थितीत एकीकडे तटस्थ आणि त्रयस्थ भूमिका घेऊन लिहिणे, सामाजिक भोवतालावर कठोर भाष्य करणे ही जबाबदारी आणि दुसरीकडे संस्थेचे, कंपनीचे व्यावसायिक हितसंबंध जोपासणे अशी तारेवरची कसरत सध्याच्या संपादकांना मोठ्या प्रमाणात करावी लागत असल्याचे दिसते.

उपरोक्त तारेवरची कसरत यशस्वीरीत्या सांभाळूनही अनेक संपादक सामाजिक दायित्वाच्या भावनेतून आपली लेखणी चालवीत आहेत. पत्रकारितेचे आदर्श जोपासण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना वाचकांकडूनही भरभरून दाद मिळत असते. त्यामुळे सारेच काही निराशाजनक वातावरण नाही. व्यवसायीकरणामुळे या क्षेत्रातील उमेदवारांना आता पगारही चांगले मिळू लागले आहेत. व्यवस्थापनाच्या आर्थिक दृष्टिकोनाचा लाभ संपादकीय सहकाऱ्यांना चांगल्या वेतनाच्या स्वरूपामध्ये मिळतो आहे. त्यामुळे या क्षेत्रात अर्थार्जनाच्या खरोखरीच चांगल्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. चांगला संपादक होण्यासाठी प्रखर सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेबरोबरच व्यासंगी, चौफेर वाचन, राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय घडामोडींची जाण, बहुश्रुतता, अथक परिश्रम करण्याची तयारी आणि इंग्रजीवर उत्तम प्रभुत्व या मूलभूत गोष्टी आवश्यक असतात. अलीकडे यातील एकेक गुणवैशिष्ट्याचा लोप होत चाललेला दिसत असला, तरी उत्तम व्हायचे असेल, तर या वैशिष्ट्यांना पर्याय नाही, हे ध्यानात ठेवावेच लागेल.

मोठ्या वृत्तपत्रांमध्ये मुख्य संपादकाबरोबरच कार्यकारी संपादक, सहसंपादक, निवासी संपादक, वृत्तलेख (फीचर) संपादक, वृत्तसंपादक अशी संपादकांची फळी असते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय घडामोडी, महानगर, कला- नाट्य-साहित्य, क्रीडा, उद्योग- व्यवसाय आदी विविध पाने निश्चित केलेली असतात. त्यासाठी स्वतंत्र संपादक/ उपसंपादक असतात. आवृत्तिनिहाय काम पाहणारे उपसंपादकही असतात. वृत्तपत्रे वेगवेगळ्या साप्ताहिक पुरवण्या प्रसिद्ध करीत असतात. त्या पुरवण्यांच्या मजकूर संकलन व संपादनाची जबाबदारीही विविध उपसंपादकांकडे देण्यात आलेली असते. वृत्तसंपादक अगर वरिष्ठ उपसंपादक यांच्याकडे संपादकीय पानाची जबाबदारी असते. उपसंपादकांच्या फळीला वृत्तपत्रांच्या कार्यालयात विशेष महत्त्व असते. वार्ताहरांकडून प्राप्त झालेल्या बातम्यांचे संपादन, शीर्षक, त्यांची पानातील स्थाननिश्चिती, मांडणी व डिझाईन या साऱ्या बाबी उपसंपादकाच्या अखत्यारीत असतात. संपादक, सहसंपादक आदी वरिष्ठांशी झालेल्या चर्चा व बैठका, त्यांनी दिलेले निर्देश आदींच्या अधीन राहून संपादकीय संस्करणाची जबाबदारी पार पाडणारा हा महत्त्वाचा घटक असल्याने येथेही अर्थार्जनाची संधी मोठी आहे. तसेच मुद्रितशोधन ही वृत्तपत्रांच्या क्षेत्रातील आणखी एक अत्यंत महत्त्वाची अर्थार्जनाची संधी आहे.

वार्ताहरांच्या वरती सुद्धा वरिष्ठ वार्ताहर, मुख्य वार्ताहर अशी साखळी असते. दैनंदिन वार्तासंकलनाचे नियोजन मुख्य वार्ताहराच्या निगराणीखाली होत असते. वार्ताहर हे कोणत्याही वृत्तपत्राचे कान, नाक, डोळे आदी पंचेंद्रिये असतात. वार्ताहरांची फळी जितकी संवेदनशील आणि त्यांचे लेखन जितके प्रभावी, तितकी संबंधित वृत्तपत्राची लोकप्रियता अधिक, असे सरळ समीकरण असते. लोकांना आपल्या जवळचे वाटणारे विषय, हृदयाला भिडणारे लेखन आवडते. साहजिकच असे वृत्तपत्र लोकांना आपले वाटते. वार्ताहरापासून संपादक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून साकारणारे एकजिनसी उत्पादन म्हणजे वृत्तपत्र असते. त्या उत्पादनाचे, त्यासाठी घेतलेल्या परिश्रमाचे हे आपलेपण फलित असते.

वार्ताहरांपासून ते संपादकांपर्यंत एक मोठी फळी वृत्तपत्राच्या कार्यालयात कार्यरत असते. यामध्ये उपरोल्लेखित संपादकीय व वार्ताहर फळीखेरीज विशिष्ट विषयामध्ये तज्ज्ञ असणारे वार्ताहर/ उपसंपादक (उदा. विज्ञान, शेअर बाजार, अर्थसंकल्प, शेती-सहकार, उद्योग-व्यवसाय, क्रीडा, साहित्य, शिक्षण आदी.) यांची मोठी गरज असते. संबंधित विषयांशी आनुषंगिक बातम्यांचे तत्काळ विश्लेषण करून वाचकांना सादर करण्याची जबाबदारी या तज्ज्ञांवर असते. त्यामुळे "Master of all, but jack of One' असणाऱ्या व्यक्तींना वृत्तपत्राच्या क्षेत्रात चांगली मागणी आहे. उत्तम छायाचित्रकार, छायाचित्र- संपादक यांचीही गरज वृत्तपत्रांना सदैव असते. आजकाल छायाचित्रे प्रत्येकजण काढत असले, तरी वृत्तपत्रीय नजरेतून एखाद्या घटनेकडे, प्रसंगाकडे पाहण्याचे कसब असलेल्या छायाचित्रकाराला, छायाचित्र- संपादकाला या क्षेत्रात सदैव मागणी असते. पेजिनेशन, लेआऊट, ग्राफिक- डिझाईनिंग या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान असणाऱ्या जाणकार व उत्साही कलाकाराला वृत्तपत्रामध्ये मोठी मागणी असते. अगदी अल्पावधीत डिझाईन व मांडणीचे वेगवेगळे प्रयोग करून वाचकांना खिळवून ठेवणारी मांडणी करणारा आर्टिस्ट वृत्तपत्राच्या कचेरीत संपादकांसह सर्वांचा लाडका असतो. कारण वृत्तपत्राकडे वाचकाला सर्वप्रथम आकर्षित करण्याचे काम त्याची कलाकारी करीत असते. छपाई तंत्रज्ञ, आधुनिक छपाई तंत्राचे जाणकार तसेच मुद्रण क्षेत्रातील आधुनिक सॉफ्टवेअर व हार्डवेअरचे जाणकार असणाऱ्या अभियंत्यांना सुद्धा वृत्तपत्राच्या कचेरीत महत्त्वाचे स्थान असते. अलीकडे वृत्तपत्रांच्या ऑनलाइन आवृत्त्याही प्रकाशित होत आहेत. त्यामुळे ऑनलाइन संपादकांपासून ते इनपुट एडिटरपर्यंत अनेक जाणकार तरुणांची येथे गरज असते. मल्टिमीडिया फॉर्ममध्ये काम करू शकणाऱ्या युवा वर्गाला येथे मोठी संधी मिळते आहे.

याखेरीज वृत्तपत्रामध्ये मनुष्यबळ विकास विभाग, आस्थापना विभाग, व्यवस्थापन विभाग, जाहिरात विभाग, अकाउंट्स विभाग, विपणन व वितरण विभाग, इव्हेंट मॅनेजमेंट, कस्टमर रिलेशनशीप असे अनेक विभाग कार्यरत असतात. त्यामध्येही संबंधित क्षेत्रातील पदवी अनुभव असणाऱ्या होतकरू तरुणांना काम करण्याची संधी असते.

### २. स्तंभलेखन (Column Writing)

वृत्तपत्रांमध्ये केवळ बातम्याच असत नाहीत, तर त्यांच्या बरोबरीने अनेकविध प्रकारची माहिती प्रसिद्ध केली जात असते. वृत्तपत्रांत काही ठरावीक मजकूर ठरावीक दिवशी ठरावीक जागेवर प्रसिद्ध होत असल्याचे आपण पाहतो. त्या मजकुरास 'सदर' असे म्हणतात. 'वाचकांचा पत्रव्यवहार' हे असेच दैनंदिन सदर आहे. त्याशिवाय, साप्ताहिक बाजारभाव, शेअरबाजार, आरोग्य, विज्ञान, महिला, शिक्षण, व्यापार- उद्योग, चित्रपट- नाटक इत्यादी अनेक स्वरूपाची सदरे असतात. थोडक्यात, एखाद्या विशिष्ट विषयाला वाहिलेल्या ठरावीक काळानंतर प्रसिद्ध होणाऱ्या मजकुराला सदर असे म्हणतात.

**स्तंभ :** वर्तमानपत्रातील काही सदरे अशी असतात की, ती काही ठरावीक व्यक्ती लिहीत असतात. यामध्ये वृत्तपत्राच्या संपादक, सहसंपादक, वृत्तसंपादक यांचेखेरीज विविध विषयांतील तज्ज्ञ व्यक्ती यांचा सुद्धा समावेश असतो. अशा व्यक्तींच्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या सदराला 'स्तंभ' (कॉलम) असे म्हणतात. मराठी वृत्तपत्रसृष्टीमध्ये अशा स्तंभलेखनाला मोठी परंपरा आहे. अनेक संपादकांनी आपल्या स्तंभलेखनातून विविध विषयांना वाचा फोडून स्तंभलेखनाला मोठी प्रतिष्ठा व दर्जा प्राप्त करून दिला. अनेक साहित्यिकांनी सुद्धा विविध वृत्तपत्रांतून महत्त्वाचे स्तंभ लिहिले. त्यातून अनेक सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, वैज्ञानिक

विषयांची मांडणी केली. मनोरंजन, क्रीडा, सामाजिक, राजकीय अशा क्षेत्रांतील मान्यवरही आपल्याशी संबंधित विषयांना वाहिलेले स्तंभ लिहितात. यातील अनेकांच्या स्तंभलेखांचे संग्रह सुद्धा प्रसिद्ध झाले. अशा सदरांना वाचक वर्गाचे प्रेमही लाभताना दिसते.

स्तंभलेख वृत्तपत्रांना खऱ्या अर्थाने मानवी चेहरा प्रदान करतात. स्तंभलेखनाचे एक विशिष्ट तंत्र असते. साधारणतः त्यामागे एक सूत्र असते. विशिष्ट शब्दमर्यादेमध्ये लेखन करीत असताना स्तंभाची वारंवारिता सांभाळणे महत्त्वाचे असते. वाचकाला एकाच वेळी सुटा आणि एकात्म असा अनुभव द्यावा लागतो. पुन्हा वृत्तपत्रांच्या समकालीनत्वाचे भान राखत आणि वाचकांशी संवादी होत आपला विषय कसा खुलेल, याचे तंत्र अवगत असणेही गरजेचे असते.

माध्यमे ही मानवाचा विस्तार आहेत, असे म्हणतात. तसे, स्तंभलेखन हे एका टप्प्यापर्यंत, लोकशाहीकरणासोबत संपादकाचा विस्तार आहे. स्तंभलेखक हे समाजाच्या विविध स्तरांमधील लोक असतात. समाजाच्या अनेक स्तरांमधून पुढे आलेले, लिहिणारे हे लोक म्हणजे त्या त्या समाजघटकांचे, विषयांचे, आंदोलनांचे, भूमिकांचे प्रतिनिधी आणि 'ओपिनियन मेकर' असतील, तर स्तंभलेखन म्हणजे या वृत्तपत्रांच्या वाचकांची संसदच म्हणायला हवी. विभिन्न जातीपाती, आर्थिक स्तर, लिंग, धर्म, भूगोल यांचे वैविध्य, विचारप्रक्रियेतील वेगळेपण स्तंभलेखनाला समृद्ध करते, ही बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

स्तंभलेखनामध्ये प्रासंगिक, समकालीन विषयांबरोबरच अनेकविध विषयांच्या शक्यता दडलेल्या असतात. खरे तर स्तंभाला कोणताही विषय वर्ज्य नाही. एखादा अभिनेता-अभिनेत्री आत्मचरित्रपर अनुभवांचे लेखन करील, पुढे त्याचे संकलन व संपादन करून त्यांचे आत्मचरित्र पुस्तक रूपानेही प्रसिद्ध करता येईल. एखादा नेता अगर कामगार नेता त्याच्या समकालीन चळवळींची, कार्याची माहिती मांडेल, ज्याला पुढे कामगार चळवळीच्या इतिहासाच्या दस्तऐवजाचे स्वरूप येईल. एखादा साहित्यिक, कवी त्याच्या साहित्यिक भाषेत समकाळावर काही भाष्य करील, त्याला उत्तम ललितलेखनाचा दर्जा प्राप्त होईल. एखादा विज्ञानाचा जाणकार विज्ञानातील वेगवेगळे आविष्कार, चमत्कार उलगडून दाखविणारे सदर लिहील. एखादा गणिताचा जाणकार विद्यार्थ्यांना गणित किती सोपे आहे, ते उलगडून दाखविणारे, त्यांच्यात आवड निर्माण करणारे काही लेखन करील, अशा अनेक शक्यता स्तंभलेखनामध्ये दडलेल्या असतात. फक्त वृत्तपत्रामध्ये स्तंभलेखनाला जागेच्या, शब्दांच्या मर्यादा असतात. या मर्यादा सांभाळून आपल्याला मोजक्या शब्दांमध्ये नेमकेपणाने आपले म्हणणे वाचकांपर्यंत पोहोचवावयाचे असते. स्तंभलेखनाचे खरे कौशल्य इथे असते. अन्य एखाद्या लेखामध्ये कमीजास्त मजकूर चालू शकतो, स्तंभलेखनाचे मात्र तसे नसते. त्याची वृत्तपत्रातील जागा निश्चित असते, शब्दमर्यादा निश्चित असते. त्याचे भान स्तंभलेखकाला सदोदित ठेवावे लागते. त्याचप्रमाणे स्तंभलेखनाची वारंवारिता सांभाळणे हे सुद्धा वाटते तितके सोपे नाही. समजा, साप्ताहिक सदर सुरू असेल. तर, या आठवड्याचे लेखन वृत्तपत्राच्या हवाली केल्यानंतर दुसऱ्या क्षणापासून पुढील आठवड्यात कोणत्या विषयावर किंवा काय लिहावयाचे, याचा भुंगा डोक्यात गुणगुणू लागतो. हा मजकूर किमान एक ते दोन दिवस आधी वृत्तपत्राच्या संबंधित उपसंपादकाच्या हाती पोहोचणे आवश्यक असते, त्यामुळे पुढच्या लेखासाठी आपल्या हातात अवघे तीन ते चारच दिवस असतात. त्या कालावधीत विषय निश्चित करून त्याची मांडणी कशा प्रकारे करावयाची, त्याचा पंच काय असावा, हे सारे स्तंभलेखकाला ठरवून विहित वेळेत लिहून तो वृत्तपत्राकडे पाठवावाच लागतो. त्यामुळे स्तंभलेखन हे खऱ्या अर्थाने

आव्हानात्मक काम आहे. प्रसंगी हातातील अन्य सारी कामे बाजूला ठेवून स्तंभलेखनाची जबाबदारी वेळेत पार पाडावी लागते. हे सोपे नाही. वाचकाभिरुची जपणारा आणि वेळेत मजकूर देणारा स्तंभलेखक म्हणूनच संपादकांचा आवडता आणि लाडका असतो.

**स्तंभलेखनाचा नमुना**

गोविंद तळवळकर हे मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रातील एक नावाजलेले व्यक्तिमत्त्व. ऐतिहासिक संदर्भांसह राजकीय लेखनाची तळवळकरांची हातोटी ही वाचकांमध्ये अत्यंत प्रिय होती. पण, तळवळकरांनी ललित लेखनही आत्मीयतेने केले. त्यांच्या अशाच एका स्तंभामधील 'स्वप्नभूमी' या लेखातील काही संपादित अंश पुढे देत आहे.

प्रत्येकाची एक स्वप्नभूमी असते. थंड हवा, चोहोकडे गर्द झाडी, लांबवर पसरलेली हिरवीगार शेते. सरोवर वा नदी आणि नीरव शांतता याची ओढ मला वाटत आली आहे. हिमाचल प्रदेशात कुलू- मनालीला मला ही ओढ पुरी करता आली. याचमुळे इंग्लंडमधील सरोवरांच्या प्रदेशात- लेक डिस्ट्रिक्ट- थोडे दिवस तरी राहावे, असे वाटत असे. चार पाच वेळा त्या देशाला भेट देऊनही हे जमले नाही. पण तीन वर्षांपूर्वी ही इच्छा पुरी झाली. माझी मुलगी ग्लासगो येथे होती आणि आम्ही सरोवरांच्या प्रदेशात जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही भल्या पहाटे ग्लासगोच्या स्टेशनवर आलो. तेथून ऑक्झनहोम येथे जाऊन गाडी बदलावी लागते आणि मग तुम्ही विन्डरमिअरला पोहोचता. ऑक्झनहोम येथे जी गाडी बदलावी लागते, ती आपल्याकडे माथेरानची गाडी आहे, तशी छोटी आहे. रेल्वेचा एकच मार्ग आहे...... विंडरमिअरला उतरून अर्ध्या तासाच्या प्रवासाने आम्ही 'स्वान' या हॉटेलात पोहोचलो. संध्याकाळी व सकाळी बराच काळ धुक्यात वेढलेले हे हॉटेल एखाद्या कादंबरीत शोभणारी वास्तू आहे, असे वाटू लागते. दोन बाजूला असलेल्या लीव्हन नदीत राजहंस दिमाखात वावरत असतात. अशा ठिकाणी प्रियजनांशी सुखसंवाद करावा, मन मानेल त्याप्रमाणे फिरावे, आवडीचे पुस्तक वाचावे, रुचकर खानपानाने आनंद द्विगुणित करावा, यासारखे सुख नाही. या हॉटेलात 'मेलकोच इन' हे नाव भोजनालयास असून डिकन्सच्या पिकविक पेपर्सवरून ते दिले आहे. तसे भित्तिचित्रही आहे. आम्ही ट्राऊट या माशाचा आस्वाद घेत असताना शूबर्टची ट्राऊट ही सिंफनी वाजविली जात होती, हा योगायोग. कॉन्स्टेबल, टर्नर या चित्रकारांनी रंगविलेला निसर्ग कोठे आहे, हे पाहावयाचे झाल्यास सरोवरांच्या प्रदेशात यावे. रस्किनसारखा कलारसिक व तत्त्वचिंतक, त्याचप्रमाणे वर्डस्वर्थ, सदे, कोलरीज यांच्यासारखे कवी, दि क्विन्सी व हॅझलीट यांच्यासारखे लेखक यांना सरोवरांच्या प्रदेशाने मोहिनी घातली असली, तरी स्कॉट यांच्या जोडीचा कोणी प्रादेशिक कादंबरीकार या प्रदेशात मिळाला नाही...

उपरोक्त स्तंभलेखनाकडे केवळ प्रवासवर्णन म्हणूनही पाहता येऊ शकेल. पण, विविध प्रकारच्या वाचकांना खिळवून ठेवण्याच्या अनेक शक्यता या लेखनात आहेत. केवळ सरोवरांच्या प्रदेशातील निसर्गसौंदर्याचेच वर्णन येथे आहे, असे म्हणता येणार नाही. मराठी वाचकांना अत्यंत अनोळखी अशा प्रदेशाची ओळख करून देताना त्यांना माहिती असलेल्या कुलू-मनाली अगर माथेरानच्या गाडीचा संदर्भ देऊन त्यांना जोडून घेतले जाते. खाद्यसंस्कृतीच्या चाहत्यांसाठी तेथील रुचकर ट्राऊट माशाचा संदर्भ आहे. संगीताच्या चाहत्यांसाठी सिंफनीचा संदर्भ आहे. कला, साहित्याच्या प्रेमींसाठी त्यांचीही माहिती आहे. सर्व प्रकारच्या वाचकांना हे लेखन आपलेसे वाटण्याच्या सर्व शक्यतांची निर्मिती या लेखाद्वारे झालेली आहे. त्याचप्रमाणे ज्यांना यातील काहीही अगर

कोणीही माहिती नाही, त्यांच्यासाठी जिज्ञासेच्या, ज्ञानाच्या कक्षा रुंदावणाराही हा लेख आहे. यात उल्लेखलेल्या नावांचा अगदी एकदाच उल्लेख झालेला असला तरी, ती व्यक्ती कोण, अगर त्या कलाकाराच्या कलाकृती कोणत्या, संबंधित लेखकाच्या अन्य साहित्यकृती कोणत्या, हे वाचकांना जाणून घ्यावेसे वाटेल, इतकी प्रत्ययकारिता या लेखनामध्ये आहे. म्हणून या स्तंभलेखनाकडे केवळ एकाच दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी अनेक शक्यतांच्या कोनातून पाहणे अधिक उपयुक्त ठरते. म्हणून असे लेखनही वाचकांना सार्वकालिकरीत्या कशा ना कशासाठी प्रेरित करणारे ठरते.

## ३. जाहिरातलेखन (Writing an Advertisement)

वस्तू, उत्पादन आणि सेवा यांच्या विक्रीसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी मुद्रित, दृक्-श्राव्य, श्राव्य अगर अन्य प्रकाश, धूर आदी माध्यमांद्वारे निर्मित साहित्याला जाहिरात असे म्हणतात. विसाव्या शतकामध्येच जाहिरात ही पासष्टावी कला म्हणून उदयास आली. एका कलेचा दर्जा प्राप्त करण्यापर्यंत ज्या क्षेत्राची मजल गेली, त्याचे प्रभावक्षेत्र, प्रभावक्षमता किती व्यापक असेल, याचा अंदाज करता येईल. जाहिरातीच्या क्षेत्रात काम करण्यासाठी केवळ लेखन कौशल्य असून भागत नाही, तर ते कौशल्य अधिक टोकदार असावे लागते. अगदी मोजक्या शब्दांत नेमकेपणाने संबंधित वस्तू आणि सेवा यांची माहिती श्रोते, दर्शक, वाचक यांच्यापर्यंत म्हणजेच ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शब्दप्रभुत्व फार महत्त्वाची भूमिका बजावते. त्यासाठी इतिहासाबरोबरच समकालीन विषयांसंदर्भातले चौफेर वाचन, चिकित्सक दृष्टिकोन आवश्यक आहेच. पण, त्याला उत्तम कल्पकतेची जोड देण्याचा हजरजबाबीपणाही आवश्यक असतो.

मुद्रित असो अगर अन्य कोणतेही माध्यम, जाहिरात देण्यामागे काही मूलभूत हेतू निश्चितपणे असतात. आपले उत्पादन, सेवा अथवा कार्य याविषयी माहिती देणे, एखादी व्यक्ती, सेवा, संस्था अगर उद्योग-व्यवसाय यांची अनुकूल प्रतिमा उभी करणे, आपल्या गरजांची मागणी नोंदविणे, एखादी व्यक्ती, संस्था अगर विषय यांविषयी निर्माण झालेला अपसमज अगर चुकीची कल्पना दूर करणे, जनतेच्या सदिच्छा संपादन करणे, जनतेचा प्रतिसाद किंवा त्यांची सेवा यांची अपेक्षा करणे, एखाद्या उत्पादनाच्या विक्रीला उठाव, बळ देणे, लोकमत अगर लोकाभिरुचीला वळण देणे इत्यादी प्रमुख हेतू जाहिरातीमागे असतात. जाहिरातीमध्ये सर्वसाधारणपणे शीर्षक, उपशीर्षक, आशय, संस्थेचे नाव व लोगो, पत्ता यांचा प्रामुख्याने समावेश असतो. जाहिरात ही शीर्षकापासून सर्वच बाबतीत आकर्षक, लक्षवेधी, सुटसुटीत व वाचकांचे कुतूहल चाळविणारी असायला हवी. ग्राहकांना परिचित शब्दांचा वापर शक्यतो केलेला असावा. जिथे वेगळे शब्द योजावयाचे असतील, तेथे ती जाहिरात दुर्बोध होऊ नये, यासाठी संबंधित शब्दाचे योग्य स्पष्टीकरण जाहिरातीत असावे कारण ग्राहक कदाचित त्या शब्दाचा अर्थ जाणून घेण्यासाठी सुद्धा जाहिरात वाचत असू शकतो. अशा प्रकारे कल्पकता आणि भाषाप्रभुत्वाबरोबरच विषयाचे योग्य ज्ञान, मांडणीचे व डिझाईनचे ज्ञान, ग्राहकांच्या मानसशास्त्राची जाणीव असणे अत्यंत महत्त्वाचे असते.

सर्जनशीलतेला कल्पकेची जोड देत मेहनत करायची तयारी असणाऱ्यांसाठी जाहिरातीच्या क्षेत्रात अमाप संधी आहेत. उत्तम वेतन आणि प्रसिद्धी देणाऱ्या अशा जाहिरात क्षेत्रात कामाच्या अनेक संधी आहेत. या क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी तुमच्याकडे वैविध्यपूर्ण कल्पनांचे भांडार निर्माण करण्याची विचारक्षमता, सर्जनशीलता, कल्पकता, नावीन्याचा ध्यास, बाजाराचे ज्ञान, विविध कंपन्यांची, त्यांच्या उत्पादनांची अद्ययावत

माहिती आदी कौशल्यांची आवश्यकता असते. दर्शक, श्रोते, वाचक यांच्यावर प्रभाव पाडणारी, त्यांना आकर्षित करणारी जाहिरात संबंधित उत्पादनापर्यंत ग्राहकाला खेचून आणण्यात यशस्वी ठरते. ज्या जाहिराती ग्राहकांना खिळवून ठेवण्यात यशस्वी होतात, त्या उत्पादनाला बाजारात चांगली मागणी येण्याची शक्यताही अधिक निर्माण करतात.

मनोरंजनाच्या स्वरूपात माहिती देत आपले उत्पादन आणि सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे हा जाहिरातीचा उद्देश असतो आणि तो उद्देश अधिकाधिक यशस्वी करण्यासाठी अधिकाधिक नावीन्यपूर्ण पद्धती शोधल्या जात असतात. प्रयोगशील, सर्जनशील आणि विविध कल्पना लढविणाऱ्यांसाठी जाहिरातीचे क्षेत्र म्हणजे विविधांगी अभिव्यक्तीची उत्तम संधीच असते. जाहिरात उद्योगात काम करताना सातत्याने नावीन्याचा ध्यास आवश्यक असतो. या क्षेत्रातही प्रचंड स्पर्धा आहे. त्यामुळे या क्षेत्रात टिकून राहण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करावे लागतात. आणि त्यातून आपल्या कंपनीची जाहिरात इतर संस्थांपेक्षा कशी वेगळी आणि सर्वोत्तम आहे, हे वेळोवेळी सिद्ध करावे लागत असते. हेच या क्षेत्रातील खरे कसब आणि कौशल्य आहे.

**वृत्तपत्र आणि जाहिरात**

केवळ वृत्तपत्र हा व्यवसाय आणि जाहिरात यांच्या सहसंबंधांच्या अनुषंगाने बोलावयाचे झाल्यास वृत्तपत्र हे अन्य उद्योगांच्या उत्पादनापेक्षा वेगळे उत्पादन आहे, हे आपल्याला लक्षात घ्यावे लागेल. अलीकडे व्यावसायिक स्पर्धेपोटी नफा पाहिला जात असला तरी, हा एक प्रकारे सेवा-व्यवसाय आहे. त्यामुळे वृत्तपत्राचे अर्थशास्त्रही अन्य उद्योगांपेक्षा वेगळ्या स्वरूपाचे आहे. वृद्धीच्या दृष्टीने वृत्तपत्राला दोन प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत असतो- एक म्हणजे खप आणि दुसरे म्हणजे अंतर. जाहिरातीच्या उत्पन्नामुळेच वृत्तपत्र उत्पादन मूल्यापेक्षा खूप कमी दरात ग्राहकांना-वाचकांना उपलब्ध करून देता येणे शक्य असते. त्यामुळे साहजिकच ज्या वृत्तपत्राचा खप जास्त, ज्याचा वाचकवर्ग मोठा, त्याच्याकडे जाहिरातींचा ओघ अधिक, असे हे समीकरण असते. त्या उत्पन्नावर आधारित वृत्तपत्राची कमी किंमत आणि पुन्हा त्या कमी किंमतीच्या आधारावर ग्राहकांचा प्रतिसाद अधिक म्हणजे खप अधिक, असे हे वृत्तपत्राच्या जाहिरात, किंमत आणि खपाचे वर्तुळ पूर्ण होते. पुढे खप वाढला की उत्पादन खर्चही वाढतो, उत्पन्न व खर्च यांची तफावत वाढते आणि पुन्हा ती भरून काढण्यासाठी जाहिरातीचे दरही वाढतात, असे हे गणित आहे. वृत्तपत्रांची आपापसात स्पर्धा आहेच, पण त्यांना आता दूरचित्रवाणी, रेडिओ, ऑनलाइन माध्यमे इत्यादी नवनव्या माध्यमांशीही स्पर्धा करावी लागत आहे. त्यामध्ये आपला खप वाढता राखून वेगवेगळ्या क्षेत्रांतील जाहिरातदारांना आकर्षित करण्यासाठी विविध विषयांना वाहिलेल्या पुरवण्यांची निर्मिती करणे, त्यासाठी विविध क्षेत्रांतील जाहिराती मिळविणे आणि उत्पन्नाचा स्रोत कायम राखणे अशा क्लृप्त्या योजल्या जातात. अलीकडे कोविड-१९ साथीच्या कालखंडात वृत्तपत्रांकडील जाहिरातीचा ओघ मोठ्या प्रमाणात आटल्याने पृष्ठसंख्या कमी करण्यापासून ते काटकसरीचे अनेक उपाय वृत्तपत्रांना योजावे लागले. जाहिरातीअभावी वृत्तपत्रांचे अर्थकारण कसे कोलमडून पडू शकते, याचे अलीकडच्या कालखंडातील हे एक महत्त्वाचे उदाहरण आहे.

**जाहिरात क्षेत्रातील संधी**

जाहिरातीच्या संकल्पनेस कॉपी, तर जाहिरात संकल्पना लिहिणाऱ्यास कॉपीरायटर असे म्हटले जाते. मोजक्या, नेमक्या शब्दांत जाहिरातीची मांडणी करणे, हे याचे काम असते. मुद्रित, दृक्-श्राव्य, डिजिटल,

बाह्य-फलक (होर्डिंग्ज), साईनबोर्ड, भित्तिपत्रके, जिंगल्स अशा अनेक प्रकारांनी जाहिरातीची अभिव्यक्ती होत असते. प्रत्येक माध्यमाची मांडणीची पद्धत वेगवेगळी असली तरी संकल्पनात्मक पातळीवर तिच्या मूळ कॉपीचे महत्त्व अजिबात कमी होत नाही. प्रत्येक माध्यमाची शक्तिस्थाने वेगळी आणि काम करण्याची पद्धतही वेगळी असली, तरी त्या विविध पद्धतींचा समन्वय साधत एकच संकल्पना घेऊन सर्व माध्यमांसाठी जाहिरातीची निर्मिती करणे ही एक अभूतपूर्व कला आहे. कंपनीचे मालक, ब्रँड मॅनेजर, मार्केटिंग मॅनेजर, सेल्स मॅनेजर आदी अनेकांसमवेत बैठका, चर्चा, उत्पादकाच्या अपेक्षा अशा अनेकविध मंथनांनंतर जाहिरात अंतिम होते आणि त्यानंतर बाजारात येते.

जाहिरातीच्या क्षेत्रात अर्थार्जनाच्या संधी प्रचंड आहेत. एखाद्याला स्वत:ची जाहिरात एजन्सी सुरू करता येऊ शकतेच, पण स्थानिक पातळीपासून प्रादेशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत कार्य़रत असणाऱ्या अनेक नामांकित जाहिरात संस्थांमध्ये अर्थार्जनाच्या संधी आहेत. केवळ खासगीच नव्हे, तर शासकीय नोकरीच्या संधीही या क्षेत्रात आहेत. राज्य पातळीवर कार्यरत असणारा शासनाचा प्रसिद्धी विभाग (माहिती व जनसंपर्क महासंचालनालय) येथे स्वतंत्र जाहिरात विभाग कार्यरत आहे. त्याचप्रमाणे केंद्रीय पातळीवर डी.ए.व्ही.पी. (डिरेक्टोरेट ऑफ ऑडिओ-व्हिज्युअल पब्लिसिटी) या विभागामध्येही नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. मुद्रित माध्यमांसह आऊटडोअर पब्लिसिटी, दूरचित्रवाणी, रेडिओ, चित्रपट, समाजमाध्यमांचे प्लॅटफॉर्म, विविध वेबसाईट्स, न्यूज साईट्स, युट्यूब, विविध फोन ॲप्लिकेशन्स असे हे जाहिरातींचे क्षेत्र प्रचंड विस्तारले आहे. त्यामुळे या क्षेत्रातील संधींचे अवकाशही विस्तीर्ण झाले आहे, आणि त्याचमुळे अत्यंत स्पर्धाही!

मुद्रित माध्यमांतील जाहिरातींची काही उदाहरणे या ठिकाणी आपण पाहू या.

**जाहिरात क्र. १**



उपरोक्त जाहिरात ही एका डिटर्जंट साबणाची आहे, हे स्पष्ट आहे. जाहिरातीमधील ब्रँड हा लोकांना आता पूर्णतः माहिती झाला असल्याची जाहिरातदाराची खात्री झालेली आहे, त्यामुळे त्यांनी या उत्पादनाच्या ताज्या घडामोडीची जाहिरात करण्यावरच संपूर्ण भर दिलेला आहे. '१० रुपयांच्या साबणाच्या वडीमध्ये आता ४० टक्के अधिक वजनाचा साबण आहे,' ही शुभ्रतेच्या बरोबरीने मिळणारी वजनदार ऑफर असल्याचे जाहिरातीत म्हटले आहे. जाहिरातीमध्ये शाळेचा गणवेशधारी विद्यार्थी दाखविला आहे. मुलांच्या गणवेशाची स्वच्छता ही प्रत्येक आईसाठी जिव्हाळ्याचा विषय असतो. शाळेच्या शिस्तीमध्येही गणवेशालाच अग्रक्रम असतो. त्यामुळे अन्य कपड्यांपेक्षा गणवेशाची शुभ्रता म्हणजे आईसाठी, कुटुंबासाठी आणि शाळेसाठी सुद्धा एक महत्त्वाचे समाधान, असा संदेश ही जाहिरात देऊन जाते. ग्राहकांमध्ये प्रचलित असलेल्या ब्रँडची नवी ऑफर परिणामकारीत्या दर्शविणारी अशी ही जाहिरात ठरते.

**जाहिरात क्र. २**




उपरोक्त दोन्ही जाहिरातींपेक्षा ही जाहिरात वेगळी आहे. वरील दोन्ही जाहिराती व्यावसायिक उत्पादनांच्या असून त्या व्यावसायिक नफ्याकडे लक्ष ठेवून निर्माण केल्याचे पाहताक्षणी लक्षात येते. ही जाहिरात मात्र त्याला अपवाद आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वतीने प्रसारित करण्यात आलेल्या या जाहिरातीमध्ये प्रत्येक ग्राहक अथवा नागरिकाला त्याच्या बँक खात्यावरील आर्थिक व्यवहाराबाबत जागृत करण्याचे आणि सतर्क राहण्याचे भान ही जाहिरात देते. सध्या ऑनलाईन व्यवहारांमुळे फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. अशा वेळी तातडीने काय करावे, याचे मार्गदर्शन ही जाहिरात करते. त्या संदर्भातील कायदेशीर बाबींचीही थोडक्यात माहिती देते. ग्राहकांच्या मनात विश्वास निर्माण करते. अशा फसव्या व्यवहारांनी 'क्लीन बोल्ड होऊ नका,' असा क्रिकेटच्या भाषेतील सर्वांना समजणारा संदेश देण्यासाठी उमेश

यादव या क्रिकेटपटूची तसेच आरबीआयच्या कर्मचाऱ्याचीच निवड केली आहे. यातून आरबीआय ही केवळ आर्थिक आघाडीची बँकच नसून इथले कर्मचारीही विविध क्षेत्रांशी निगडित आहेत, हा संदेशही यातून उत्तम प्रकारे ध्वनित होतो. प्रत्येक भारतीय नागरिकाला सतर्क करण्याचे काम ही जाहिरात करते.

## ● शब्दांकन

शब्दांकन ही एक महत्त्वाची कला आहे. ढोबळ मानाने एखाद्या व्यक्तीने दिलेली माहिती संकलित, संपादित स्वरूपामध्ये लिहिणे, याला शब्दांकन असे आपण म्हणू शकतो. वर्गामध्ये शिक्षक एखादा पाठ शिकवित असताना विद्यार्थी त्यातील महत्त्वाचे मुद्दे नोंदवून घेतात आणि घरी गेल्यानंतर त्या मुद्द्यांवरुन आपल्या नोट्स तयार करतात. या प्रक्रियेला आपण थेटपणे शब्दांकन असे म्हणत नसलो, तरी हा शब्दांकनाचाच प्रकार असल्याचे विचार केल्यानंतर आपल्या लक्षात येईल. एखाद्या व्यक्तीचे अनुभव संकलन, नवीन माहिती, वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण बाब इत्यादींविषयी लोकांना अवगत करण्यासाठी विविध संबंधित व्यक्तींशी बोलून त्यांच्याच शब्दांत सदरची माहिती देणे, हे मोठ्या कौशल्याचे काम आहे.

**नावीन्यपूर्ण उपक्रम**

एखाद्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची माहिती घेऊन वाचकांना सादर करावयाची असल्यास संबंधित उपक्रमकर्त्याशी संपर्क साधून त्या उपक्रमाची प्राथमिक माहिती घेऊन त्यावर आधारित प्रश्नावलीची निर्मिती हा यातला महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये संबंधित उपक्रमकर्त्या व्यक्तीबरोबरच त्याच्या उपक्रमाचे महत्त्व, त्याचे फलित, त्याचे दूरगामी सामाजिक उपयोजन आदी बाबींची माहिती संबंधित मुलाखतीतून मिळविण्याच्या दृष्टीने प्रश्नावलीची रचना हवी. मुलाखत घेऊन झाल्यानंतर शब्दांकन करीत असताना आपल्या लेखनाचा केंद्रबिंदू निश्चित करून त्या दिशेने लिहायला हवे. उपक्रमकर्त्याची माहिती महत्त्वाची असतेच; मात्र, आपला रोख हा त्याच्यापेक्षा त्याने राबविलेल्या उपक्रमाच्या फलिताकडे आणि उपयोजनाकडे असायला हवा. हो, कदाचित संबंधित उपक्रमकर्त्याने अत्यंत विपरीत परिस्थितीतून अगर शोषित, वंचित सामाजिक पार्श्वभूमीशी दोन हात करीत त्याने उपक्रम साकारला असेल, तर या शब्दांकनामध्ये त्यालाही महत्त्वाचे स्थान देणे, ही शब्दांकनकर्त्याची जबाबदारी असते.

अभिनेता अतुल कुलकर्णी हे मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीतील एक महत्त्वाचे नाव आहे. अभिनयाच्या पलीकडे सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून त्यांनी पर्यावरण व शिक्षण या क्षेत्रात काम चालविले आहे. या उपक्रमांची माहिती त्यांनी एका मुलाखतीदरम्यान दिली. ती पुढीलप्रमाणे-

अभिनय हा व्यवसाय म्हणून करायचा, असं जरी ठरवलेलं असलं, तरीदेखील तेच काही आयुष्याचं अंतिम उद्दिष्ट नव्हतं आणि नाहीए, यावर मी आधीपासूनच ठाम आहे. त्या बरोबरीनेच अनेक गोष्टीही महत्त्वाच्या आहेत, ज्या एक माणूस म्हणून करणं, मला अत्यंत आवश्यक वाटतं. अभिनय करता करताच वनकुसवडे येथे साधारण २४ एकरांची जमीन घेऊन तिथे आम्ही जंगल प्रकल्प राबवितो आहोत. पर्यावरणाची अपरिमित हानी झाल्याने होत असलेले दुष्परिणाम आपण सारेच पाहतो आहोत. निसर्गाचा हा समतोल आपल्याकडून सांभाळला जावा, या हेतूने मानसी आणि केतकी या मैत्रिणींच्या साहाय्याने हा प्रकल्प हिरवा होतो आहे. त्याच बरोबरीने सध्याच्या शिक्षण पद्धतीबाबतही मी अजिबात समाधानी नाही. केवळ परिस्थिती, व्यवस्थेला नावं ठेवण्यापेक्षा आपण पुढाकार घेऊन काही करू शकतो का, या विचाराला

शिक्षणतज्ज्ञ नीलेश निमकर यांची साथ मिळाली आणि 'क्वेस्ट' ही आमची संस्था वाडा येथील सोनाळा या गावी आकाराला आली. तिथे आमचं घरही आहे. शिक्षण माणसाला विचारप्रवृत्त करणारं असावं, या मताचा मी आहे, परंतु आजच्या विद्यार्थ्यांमध्ये ही विचारप्रक्रिया निर्माण होण्याऐवजी केवळ स्पर्धाच होताना दिसते आहे. अशी प्रवृत्ती निर्माण होण्याला खरं तर पालक जबाबदार आहेत. शिक्षणाचा एक शास्त्र म्हणून विचार आणि संशोधन करून त्याप्रमाणे त्याची आखणी करणं, त्याची अंमलबजावणी होणं, निकडीचं आहे. आपल्या इथे रुजलेला स्वार्थीपणा, विविध समस्यांचं मूळ हे चुकीच्या शिक्षणपद्धतीमध्ये आहे, त्यामुळे तिच्यातच आमूलाग्र बदल होणं आणि ते अधिकाधिक आधुनिक तंत्राशी जोडत विचारप्रवण करणारं व्हावं, याकरिता आमची 'क्वेस्ट' (QUEST-quest.org.in) काम करते. तसं दर्जात्मक शिक्षक प्रशिक्षणही या संस्थेमध्ये दिलं जातं. आज एकूण ५ जिल्ह्यांमध्ये १० हजारांहून अधिक मुलं आणि ३०० शिक्षकांबरोबर काम सुरू आहे. सोनाळे इथे काम करत असताना मला व्यक्तिश: तेथील आदिवासी संस्कृतीचा जवळून परिचय झाला. एक वेगळा सामाजिक स्तर अनुभवत असताना आपल्यापेक्षाही त्यांची संस्कृती किती तरी प्रगल्भ नि आधुनिक असल्याचा प्रत्यय आला. त्यामुळे व्यक्ती म्हणूनही क्वेस्ट संस्थेची उभारणी होणं, त्यानिमित्ताने समाजात एकरूप होत माणूस म्हणून अधिक समृद्ध होताना ते वळणही माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं ठरतं.

अतुल कुलकर्णी यांच्याकडून त्यांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती जाणून घेऊन वाचकांना देताना त्यांच्यातील माणुसकीही उलगडवून दाखविण्यात हे शब्दांकन यशस्वी होते. त्याचप्रमाणे जिज्ञासू वाचकांसाठी त्यांच्या क्वेस्ट या संस्थेची वेबसाईटही दिली आहे. एक दर्जेदार अभिनेता असलेल्या व्यक्तीचे माणूस म्हणूनही असणारे मोठेपण अधोरेखित करण्यात हे शब्दांकन यशस्वी झाले आहे.

**व्यक्तींचे अनुभव**

व्यक्तींचे अनुभव शब्दांकित करणे याला दस्तऐवजीकरणामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या क्षेत्रात महत्त्वाची, उत्तुंग, प्रभावी कामगिरी बजावलेल्या व्यक्तींच्या कामगिरीचे शब्दांकन हे दूरगामी महत्त्वाचे दस्तऐवज असते. अनेक लोक त्यासाठी चरित्र वा आत्मचरित्राचा मार्ग निवडतात. सदरच्या व्यक्ती चांगल्या बोलणाऱ्या असल्या तरी चांगल्या लिहिणाऱ्याही असतील, असे नसते. किंवा लिहिण्याची हातोटी असली तरी सदरच्या लेखनासाठी कितपत वेळ देऊ शकतील, अशी शक्यता असते. अशा वेळी त्या व्यक्तींच्या आठवणींचे शब्दांकन करण्यासाठी व्यावसायिक व्यक्तीला पाचारण केले जाते. किंवा, काही वेळा अशा व्यावसायिक व्यक्ती अगर लेखक सुद्धा या मान्यवरांकडे त्यांच्या चरित्रलेखनाचा प्रस्ताव घेऊन गेलेले असतात. या दोन्ही प्रकारांतून वाचकांना एक उत्तम प्रकारची साहित्यकृती निश्चितपणे वाचावयास मिळणार, हे निश्चित असते. चरित्र आणि आत्मचरित्रांकडे लोक प्रेरणेचा स्रोत म्हणून पाहतात. त्यामुळे या साहित्याला वाचकांकडून विशेषतः बाल-कुमार, युवा वर्गाकडून सार्वकालिक मागणी असते. म्हणूनच हे अनुभव शब्दांकित करताना त्यामध्ये विश्वासार्हता, वस्तुनिष्ठता, यशासाठीचा संघर्ष, अपयशावर केलेली मात आणि त्यातून झालेली जीवनाची वाटचाल अधोरेखित होणे अपेक्षित असते. त्यामध्ये मग संबंधित चरित्र-नायकाच्या अनुभवाचे संचित, त्याची विचारधारा, त्याला प्रभावित करणारी व्यक्तिमत्त्वे, त्यांचे विचार, त्याची नीतितत्त्वे, जीवनमूल्ये आदींची पखरणही अगदी सुव्यवस्थितरीत्या असणे अभिप्रेत असते. मात्र, ते करीत असताना अतिशयोक्ती मात्र आवर्जून टाळली पाहिजे. कित्येकदा चरित्रनायकाला महान ठरवीत

असताना अन्य व्यक्तिरेखा खुज्या दाखवून मग त्याचे मोठेपण अधोरेखित करण्याचा कित्येक चरित्रकार प्रयत्न करतात. मात्र, असे करणे चुकीचे आहे. प्रत्येक व्यक्तीचे, व्यक्तिमत्त्वाचे स्वतःचे असे एक स्वतंत्र स्थान आणि अस्तित्व असते. ते मान्य करून मगच आपण आपल्या चरित्र नायकाला शब्दांकित करायला हवे. त्या परिस्थितीतही त्याचे वेगळेपण अधोरेखित करायला हवे. तरच, तो अधिक ठळकपणाने उठून दिसेल. अन्यथा, एक चांगली कलाकृती निर्माण होता होता राहून जाते.

या ठिकाणी आपण 'सुपर- ३०' या चित्रपटामुळे ज्यांचे नाव सर्वतोमुखी अशा आनंद कुमार यांचे उदाहरण घेऊ. त्यांच्या एका मुलाखतीच्या शब्दांकनाचा संपादित अंश पुढीलप्रमाणे-

मला केंब्रिज विद्यापीठात उच्चशिक्षणासाठी येण्याचे निमंत्रण मिळाले. हा खरं तर माझा बहुमानच होता. वडिलांना त्याचा खूप आनंद झाला. त्यांना दरवर्षी युनिफॉर्मसाठी कपडा मिळायचा. दोन वर्षे त्यांनी स्वतःसाठी कपडे न शिवता त्यातून माझ्यासाठी सूट कोट शिवला. नवे बूटही घेतले. पण, लंडनला जाण्यासाठी आवश्यक असलेल्या पैशाचा प्रश्न खूप मोठा होता. लाखभर रुपये तरी लागणार होते. अनेकांनी अनेक सल्ले दिले. आपल्याकडच्या जातिव्यवस्थेच्या भक्कमपणाची त्यावेळी प्रथम जाणीव झाली. काही जणांनी तुमच्या जातीच्या अमूक नेत्याकडं जा, नक्की मदत करील, असं सांगितलं. त्यानुसार आम्ही त्या नेत्यांकडं गेलो. त्यांनी वडिलांना, 'एक काय, दीड लाख देतो,' असं तोंडभरून सांगितलं. पण, एक पैसाही दिला नाही. आणखी एक मंत्री एका कार्यक्रमात भेटले. त्यांना माझी व्यथा सांगितली. उद्या बंगल्यावर येऊन भेट, म्हणाले. गेलो दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडं. मिटींग चालली होती कसली तरी. मी तिथं जाऊन बसलो बराच वेळ. शेवटी धीर करून विचारलं, 'मंत्रीजी, आपण मला आज अमुक कारणासाठी बोलावलं होतं. शिक्षणासाठी पैसे लागणार आहेत.' म्हणाले, 'बच्चे, सिखो जरूर, लेकिन पैसे के पिछे मत भागो। सिखने के लिए कहीं भी जाओ, लेकिन देश के लिए काम करना मत छोडो।' असा फुकटचा सल्लाही त्यांनी देऊन टाकला. पैसे मात्र दिले नाहीतच. बंगल्याबाहेरच्या चहावाल्याकडं चहा घ्यायला गेलो, तिथं मंत्रीजींची असलियत सामोरी आली. तीन महिन्यांपासून चहावाल्याचंच बिल थकवलं होतं त्यांनी.

या अशा धकाधकीत, एक दिवस अचानकच, काही ध्यानीमनी नसताना वडिलांचं निधन झालं. खूप मोठा धक्का होता तो माझ्यासाठी. उनसे मेरा बहोत लगाव था। आमची परिस्थिती एकदम पालटूनच गेली. वडिलांच्या जागी अनुकंपा तत्त्वावर नोकरीला लागू शकलो असतो, पण आईनं माझ्या ध्येयासाठी कंबर कसली. पापड करून, विकून तिनं चरितार्थ चालवला. मी आयआयटीमधून शिक्षण पूर्ण केलं. ऑफर्स होत्या पुढ्यात बऱ्याच. पण, चांगला शिक्षक होण्याचं ठरवलं. रामानुजन इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्सची स्थापना केली. पहिली बॅच फुकट शिकवली. पुढच्या वर्षापासून केवळ पाचशे रुपये शुल्क आकारून शिकवू लागलो. याच वेळेस एक चुणचुणीत मुलगा माझ्याकडं आला. त्याला शिकायचं होतं, पण द्यायला पैसे नव्हते. एका बंगल्याचा सुरक्षा रक्षक म्हणून काम करत असे तो. बंगल्यात कोणीच नसल्यानं जिन्याखालच्या खबदाडात बसून अभ्यास करायचा. खात्री करायची म्हणून मी आणि माझा भाऊ त्यानं दिलेल्या पत्त्यावर गेलो, तर त्यानं सांगितलेलं खरंच असल्याचं दिसलं. त्या क्षणी त्याच्यासारख्या गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिकवायचं ठरवलं. त्यातून सुपर थर्टीचा विचार सामोरा आला. या झोपडपट्टीतल्या गरीब मुलांसमोर रोजच्या खाण्याचा- राहण्याचा प्रश्न मोठा होता. त्यामुळं त्यांच्या वर्षभराची राहण्याची, जेवणाची व्यवस्थाही करण्याचं ठरवलं. मागचे कटु अनुभव असल्यामुळं, आपल्याला कितीही कष्ट करावे लागले तरी चालतील,

पण कोणाकडून एक पैचीही मदत किंवा अनुदान न घेता, या सर्व गोष्टी करण्याचं ठरवलं. या आमच्या निश्चयाला माझी आई, आणि नंतर माझ्या पत्नीनंही खूप तळमळीनं साथ दिली. ती सुद्धा सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. बेंगलोरमधली चांगली नोकरी सोडून ती आता आईला मदत करते आहे. अशा तऱ्हेनं 'सुपर थर्टी' सुरू झाली. ज्या गरीब मुलाकडं शिकण्याची तळमळ आहे, शिक्षणासाठी काहीही करण्याची ज्याची तयारी आहे, त्याचं 'सुपर थर्टी'मध्ये स्वागत केलं जातं. जज्बा हो तो नामुमकिन कुछ भी नहीं, याची साक्ष माझे विद्यार्थी जगाला देत आहेत. सलग तीन वर्षे माझी तीसच्या तीस मुलं आयआयटीमध्ये निवडली गेली. माझ्यासारख्या शिक्षकाला आणखी काय हवं?

आनंद कुमार यांचा आयुष्यभराचा संघर्ष मोजक्या शब्दांमध्ये मांडण्याचे कौशल्य शब्दांकनकर्त्याला साधले आहे. त्याचप्रमाणे हिंदी भाषिक असलेल्या आनंद कुमार यांची मोजकी वाक्ये जशीच्या तशी हिंदीत ठेवून एक वेगळा परिणामही येथे साधला गेला आहे. अवघ्या दोन परिच्छेदांमधून आनंद कुमारांचा जीवन संघर्ष, अनुभव शब्दांकित झाला आहे, जो चित्रपटामध्ये दोन तासांहूनही अधिक काळ दाखविला आहे. ही शब्दांची किमया असते.

## ● मानपत्र

मानपत्र हा अधिक वस्तुनिष्ठ स्वरूपाचा दस्तऐवज आहे. चरित्र, आत्मचरित्र अगर मुलाखत या प्रकारांमध्ये लेखकाला लालित्यपूर्ण विस्ताराची मोठी संधी असते. मानपत्रामध्ये लालित्यपूर्णता असावीच; मात्र, तिच्यापेक्षा वस्तुनिष्ठ माहितीला येथे अधिक महत्त्व असते. एखाद्या व्यक्तीने आयुष्यभर समर्पित भावनेने केलेल्या कार्याच्या गौरवादाखल तिला कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून मानपत्र प्रदान करण्यात येते. या मानपत्राद्वारे त्या व्यक्तीने केलेल्या कार्याचे महत्त्व, स्मरण आणि मोजक्या व नेमक्या शब्दांत दस्तऐवजीकरण करण्यात येत असते. त्याचप्रमाणे मानपत्र म्हणजे केवळ त्या व्यक्तीचा बायोडाटा असतो, असेही नव्हे. त्यामुळे मानपत्राचे शब्दांकन हे त्या अर्थाने अत्यंत जबाबदारीचे काम आहे. संबंधित व्यक्तीच्या कार्याची खुद्द तिच्याकडून तसेच तिचे नातेवाईक, कुटुंबीय, कार्यालयीन सहकारी यांच्यासह ती कार्यरत असलेल्या क्षेत्रांतील तसेच त्याच्या प्रभाव क्षेत्रांतील व्यक्तींकडून मिळेल, तितक्या माहितीचे संकलन करणे ही शब्दांकनकर्त्याची प्राथमिक जबाबदारी असते. या व्यक्तीचा अद्ययावत बायोडाटाही हाताशी असणे आवश्यक असते. त्याच्या आधारे माहिती संकलन केल्यास अधिक उपयुक्त ठरते.

माहिती संकलन केल्यानंतर तिचे लेखन ही आणखी जबाबदारीची बाब असते. कारण इथे अगदी थोडक्या शब्दांमध्ये संबंधित व्यक्तीच्या कार्याचा गौरव करावयाचा असतो. संबंधित व्यक्ती 'मानपत्र' प्रदान करण्याइतक्या पात्रतेला पोहोचली कशी, हे त्या मानपत्रातूनच स्पष्ट व्हायला हवे. ठरावीक जागेमध्ये लिहावयाचे असल्याचे शब्दांची, विशेषणांची निवड महत्त्वाची ठरते. चरित्र लिहिताना जागेची मर्यादा असत नाही. ते शंभरऐवजी दोनशे पानांचे झाले, तरी चालते; मानपत्राचे मात्र तसे नसते. अवघ्या काही शब्दांमध्ये संबंधित व्यक्तीचे उत्तुंग कार्य आपल्याला अधोरेखित करण्याचे शिवधनुष्य पेलावयाचे असते. त्यासाठी चौफेर वाचन, शब्दप्रभुत्व, भाषेचे चोख ज्ञान या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. विविध क्षेत्रांतील व्यक्तींना दिलेल्या मानपत्रांचा अभ्यास सुद्धा करणे त्या दृष्टीने उपयुक्त ठरते.

ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांना दि. २१ नोव्हेंबर १९७८ रोजी शिवाजी विद्यापीठातर्फे डी. लिट. ही सन्मानदर्शक पदवी प्रदान करण्यात आली. त्या सोहळ्यातील मानपत्राचे उदाहरण येथे देता येईल. लता

मंगेशकर यांचे भारतीय संगीत क्षेत्राला अपूर्व योगदान सर्वांनाच माहिती आहे. पण, त्याउपरही एखाद्या व्यक्तीच्या योगदानाचा किती उत्तम प्रकारे गौरव करता येतो, याचा वस्तुपाठ म्हणजे हे मानपत्र आहे. पाहा-

भारतातच काय, पण जगभर जिच्या सुरांचे साम्राज्य पसरले आहे, त्या ह्या अलौकिक गायिकेला - लता मंगेशकर यांना शिवाजी विद्यापीठाच्या विधिसभेने व कार्यकारिणीने एकमुखाने ठराव करून 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही सन्मानदर्शक पदवी प्रदान करावी, अशी इच्छा व्यक्त केली आहे.

'संगीतसूर्य' कै. मास्टर दीनानाथ यांच्या लताबाई मंगेशकर या ज्येष्ठ कन्या. त्यांचा जन्म २८ सप्टेंबर, १९२९ रोजी इंदूर येथे झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर लताबाईंना अवघड परिस्थितीशी झगडावे लागले. ह्या झगड्यातूनही त्यांनी अलौकिक यश मिळविले आहे. मा.दीनानाथांचे गाणे पहिल्याने ऐकल्यावर बालगंधर्व म्हणाले होते, हा मुलगा जर माझ्या हाती लागला असता तर मंगेशी ते मुंबई असा रुपयांचा गालिचा अंथरून, त्यावरून वाजत गाजत मी याला माझ्या मंडळीत आणला असता. जे त्यांच्याबाबतीत घडू शकले नाही, ते त्यांच्या या कन्येच्या बाबतीत खरे ठरले आहे. या कन्येसाठी हे गालिचे भारतातच नव्हे तर जगभर पसरले जात आहेत.

कथा अशी आहे की, मा. दीनानाथ मृत्युशय्येवर असताना त्यांनी लहानग्या लताला जवळ बोलावून सांगितले, माझा तंबोरा, चीजांची वही आणि मंगेशाची कृपा मी तुला देत आहे. दुसरं तुला देण्यासारखं आता माझ्याजवळ काही उरलं नाही. गळ्यातला पंचम सांभाळा, तोच तुला सर्व काही देईल. आपल्या कन्येसाठी स्वरांचा जो कल्पवृक्ष मा. दीनानाथांनी लावला, त्यातून सुवर्णाचे फलभार अखंड ओथंबू लागले आणि त्यांची भविष्यवाणी खरी ठरली. कुमार गंधर्वांनी लताबाईंच्या संबंधी म्हटले आहे, भारतीय गायिकांत लताच्या तोडीच्या गायिका दुसरी झालीच नाही. तीन साडेतीन मिनिटाचं तिचं ध्वनिमुद्रित गीत व शास्त्रीय गायकांची साडेतीन तासांची मैफल या दोहोचं कलात्मक मूल्य एकच आहे. असा कलाकार शतकाशतकांतून एखादाच निर्माण होतो. तो आपल्या डोळ्यांसमोर वावरताना दिसतो, हे आपले केवढे भाग्य!

वडिलांची अडचण तात्पुरती दूर करण्यासाठी लताबाई प्रथम नारदाच्या भूमिकेत रंगभूमीवर आल्या व राधाधर मधुमिलिंद या मधुर रचनेला त्यांनी टाळ्या घेतल्या. तेव्हापासून म्हणजे जवळ जवळ १९४२ पासून अखंड त्यांच्या पार्श्वगायनाच्या अतुलनीय कालखंडाला सुरुवात झाली...... कोट्यवधी अंत:करणाच्या सुरांची भूक त्यांनी भागवता भागवता ती वाढवली आहे. संगीताच्या प्रसाराचे व वाढत्या लोकप्रियतेचे श्रेय नि:संशय त्यांचेच आहे.

भालजी पेंढारकर म्हणतात, त्याप्रमाणे, लताबाई या खरोखरीच, 'भगवंताची बासरी' आहेत. या जादूगार गळ्याने किती एकाकी जीवांना आधार व आसरा दिला आहे. दूर, वैराण प्रदेशात देशाची रखवाली करणाऱ्या सैनिकांनी व सेनानींनी कबूल केले आहे की, लताबाईंच्या सुरात त्यांना आपली घरदारं दिसतात आणि ते आपले एकाकीपण विसरू शकतात.

त्यांच्या गायनकलेचे वर्णन अनेकांनी अनेक परीने केले आहे. कै. भाऊसाहेब खांडेकर अचूक बोलले, कोशात दुसरा सुलभ व अर्थवाहक शब्द नाही म्हणून लतेच्या गायनाला 'गोड' हा शब्द वापरायचा. त्यांच्या निर्मळ, निरागस, कोवळ्या सुरांची वाखाणणी करण्यात तर स्पर्धा लागलेली असते. कुणी म्हणते की, त्यांचा 'गळा देवटाक्याच्या पाण्यासारखा आहे.' कुणी म्हणते की, 'बदकाच्या पिलाने पाण्यात पोहावे, तसा त्यांचा

स्वर सराईतपणे गाण्यात फिरतो.' कुणी म्हणते की, 'मोरपीस अमृतात बुडवून त्यांच्या गळ्यावर अलगद फिरविले आहे.' कुणी म्हणते की, 'त्यांच्या सादाला एक वाणासारखे टोक आहे व ते मधाने माखलेले आहे.' कुणी त्यांच्या अचूक, निर्दोष, अर्थपूर्ण शब्दोच्चाराने प्रभावित होतात व संगीत ही देवभाषा आहे असे म्हणतात. शेवटी सारेच शब्द थकतात व सूरच उरतात. या सुराचे गूढ उकलण्याचा प्रयत्न झालेला आहे. 'हा एक अपराजित व प्रतिभाशाली सूर आहे'. 'लता हे एक स्वरांच्या अलौकिक अनुभूतीचे लौकिक नाव आहे.'

लता मंगेशकरांच्या सार्वकालिक प्रतिभेला शब्दांचे योग्य कोंदण योजून त्यांच्या जीवनकार्याचा इतका अप्रतिम गौरव अन्यत्र पाहण्यात नाही. त्यांनी गायिलेली गाणी, त्यांचे चित्रपट वगैरे बाबी रसिकांना माहिती आहेत, त्यांचा संदर्भ यामध्ये असणे गैर नाही. पण, त्यांच्या कार्याचा गौरव यथोचित शब्दांत करणारे हे मानपत्र निःसंशय वेगळे व चिरस्मरणीय ठरते.

## ब) आकाशवाणी

प्राचीन काळापासून भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये श्राव्य माध्यमाचा वापर होत होता. ज्यावेळी मनुष्यास लेखनकौशल्य प्राप्त नव्हते, त्यावेळी ऐकून, पाठांतर करून ज्ञानप्राप्ती केली जात असे. प्राचीन काळापासून २१ व्या शतकापर्यंत श्राव्यकला ही शिक्षण, कला, साहित्य, मनोरंजन, विज्ञान यांच्या प्रसाराचे महत्त्वाचे माध्यम ठरली आहे. आधुनिक काळात रेडिओ या माध्यमाचा सिंहाचा वाटा आहे. आज घडीस मनोरंजन हे क्षेत्र सर्वोच्च स्थानावर आहे. या क्षेत्रात दररोज नवनवीन माध्यमांची भर पडत आहे. मनोरंजन क्षेत्राची सुरुवात झाली ती कथाकथनापासून ते आजमितीस उपलब्ध असणाऱ्या साहित्य, नाट्य, रेडिओ, टी. व्ही.चे कार्यक्रम, चित्रपट, संगणक, मोबाईल, ओटीटी ओव्हर द टॉप मीडिया सर्व्हिसेस उदा. नेटफिल्क्स, ॲमेझॉन प्राईम ई पर्यंत विकास होत गेला. परंतु या सर्व माध्यमांच्या गर्दीत रेडिओ या माध्यमाने आपले स्थान अढळपणे टिकवून ठेवले आहे. टी. व्ही.च्या प्रसारानंतर रेडिओ हे माध्यम काहीसे मागे पडले; परंतु एफ. एम. वाहिन्यांच्या उदयानंतर रेडिओने पुन्हा ते स्थान परत मिळवले आहे .

आकाशवाणी एक प्रभावी माध्यम आहे की जे कोणत्याही दृश्याशिवाय तुमच्याशी मोजक्या भाषेत संवाद साधते. दृश्याशिवाय फक्त भाषेची योग्य शब्दरचना तसेच प्रभावी संवादफेकीवर श्रोत्यांच्या मनामध्ये उल्लेखनीय प्रसंगाचे चित्रण उभे केले जाते. परंतु यामध्ये भाषा कौशल्य वापरणे हेच या माध्यमासमोरील सर्वात मोठे आव्हानात्मक काम आहे. निवेदकाने कौशल्यपूर्ण केलेले संवाद वाचन हे या माध्यमातील सर्वात मोठी जमेची बाजू असते. त्यामध्ये श्रोत्यांसमोर एखाद्या घटनेचे किंवा कथेचे किंवा प्रसंगाचे जसेच्या तसे चित्र मनात निर्माण होते. त्यामुळे श्रोत्यांचे एखाद्या कार्यक्रमातील निवेदक, एखादे पात्र, वस्तू, प्रसंग, घटना यांच्याशी अदृश्य नाते जोडले जाते. उदा- आकाशवाणीवर प्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकातील सादर केलेले 'अंतु बर्वा' हे पात्र, तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या 'स्मशानातील सोनं' या कथेतील सोनं गोळा करणारा भिमा हे पात्र आपल्या नजरेसमोर लगेच उभे राहते. या माध्यमामध्ये भाषेच्या संवादफेकीचा, संगीताचा योग्य वापर केला असता कल्पकतेचे अनेक मनोरे उभे केले जाऊ शकतात. यात काळ, वेळ, व्यक्ती, कृती याचे कोणतेही बंधन असू शकत नाही.

आकाशवाणी या माध्यमाचे कार्यक्रम एकाचवेळी बहुसख्येने लोक ऐकू शकतात. भारतासारख्या खंडप्राय देशात अगदी तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोहचण्याचे प्रभावी माध्यम हे आकाशवाणी आहे.

आकाशवाणी हे माध्यम सर्वसामान्य भारतीयांना त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांचे जीवन सुकर करण्यास मदत करते. अगदी तळागाळातील अशिक्षित, गरीब, मजूर लोकांनाही प्रबोधित करण्याचे कार्य आकाशवाणी प्रभावीपणे करते.

आजही भारतातील मोठी लोकसंख्या ही रेडिओचा वापर करते. तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर झाल्याने आज आपण रेडिओ हा कोणत्याही ठिकाणी वापरू शकतो. त्यामुळे हे माध्यम सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी ठरले आहे. राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक विभिन्नता, बंधुता, समता याचे संर्वधन करण्याचे काम आकाशवाणी करते. तसेच मानवी हक्क व अधिकार यांची जागरूकता वाढवण्यासाठी योग्य व निरपेक्ष माहिती प्रसारित करते. तसचे शिक्षण, साक्षरता, शेती, ग्रामीण विकास, पर्यावरण, आरोग्य, कुटुंबकल्याण, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या शाश्वत विकासासाठी लोकप्रबोधन करण्याचे काम आकाशवाणी करते. महिला व बालकल्याण, समाजातील शोषित वर्गासाठी, ज्येष्ठांसाठी प्रबोधनपर कार्यक्रम प्रसारित करून सुधारणा करण्याचे काम करते. याशिवाय समाजातील विविध संस्कृतीचे, त्यांची पद्धती तसेच लोकोपयोगी परंपरा जपण्याचे कार्य आकाशवाणी करते.

याशिवाय युवापिढीशी संलग्न असणारे कार्यक्रम जसे की, खेळाचे सामने, वेगवेगळ्या स्तरावर होणारी संमेलने, युवामहोत्सव, नृत्य, नाट्य कवी संमेलने इत्यादींची प्रसारणे युवा पिढीची आवड समोर ठेवून केली जातात. समाजातील वेगवेगळ्या घटकांसाठी ज्ञानवर्धन, विकासाभिमुख राहणीमान, सुयोग्य माहिती, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, दर्जात्मक शिक्षण, मानवता विकास याविषयी असणारी उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम तसेच सदर विषयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर कार्यक्रम प्रसारित करून समाज प्रबोधन करण्याचे काम आकाशवाणी करते. ''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' या घोषवाक्याला आकाशवाणी खऱ्या अर्थाने जपत आहे.

**आकाशवाणीवरील कार्यक्रमांचे स्वरूप**

**१. संवादात्मक कार्यक्रम**

संवादात्मक कार्यक्रम हा रेडिओ वरील कार्यक्रमाचा पाया आहे. यामध्ये निवेदक व त्याचे निवेदन हे मुख्य भाग असतात. या कार्यक्रमाचे स्वरूप हे निवेदक हा विशिष्ट कालावधीमध्ये आपले म्हणणे सादर करतो. मुख्यत: एखाद्या विशिष्ट विषयावरील तज्ज्ञाद्वारे ते दिले जाते. जगातील नामांकित देशांतील नेत्यांनी दिलेल्या रेडिओ चर्चेने /निवेदनाने जगाच्या इतिहासाची दिशा निश्चित करण्यास मोठी भूमिका बजावली आहे. याचे मुख्य उदाहरण म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष फँकलिन रुझवेल्ट यांनी १९३३ ते १९४५ दरम्यान रेडिओवर नियमितपणे चालणाऱ्या फायरसाईट चॅट या अनौपचारिक चर्चेच्या कार्यक्रमामध्ये भाग घेतला त्यामुळे रुझवेल्ट यांच्या धोरणांना जनतेचा पाठिंबा मिळू शकला.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्येही रेडिओचा खूप मोठा सहभाग आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्र बोस, उषा मेहता, म. गांधी आदींनीही या माध्यमाचा वापर करून जनसामान्यांशी संवाद साधला.

**२. रेडिओवरील बातम्या**

बातम्या या रेडिओच्या सर्वात महत्त्वाच्या कार्यक्रमापैकी एक आहेत. जगभरातील रेडिओच्या वेळापत्रकामध्ये बातम्यांनी आपले विशेष स्थान पटकावले आहे. जनमानसामध्ये रेडिओवरील बातम्या म्हणजे

विश्वसनीय बातम्या मानल्या जातात. आजही रेडिओवरील बातम्या, त्यांचे स्थान कायम ठेवून आहेत. कोणत्याही आणीबाणीच्या आणि आपत्तीच्या काळात रेडिओवरील बातम्याच विश्वासार्ह मानल्या जातात.

**३. रेडिओवरील मुलाखती**

रेडिओवरील मुलाखती ह्या सुद्धा रेडिओच्या महत्त्वाच्या प्रसारणांपैकी एक आहेत. यामध्ये त्या त्या काळानुसार त्यावेळच्या परिस्थितीस अनुसरून प्रसिद्ध व्यक्ती, एखाद्या विषयातील तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, खेळाडू यांच्या मुलाखती प्रसिद्ध केल्या जातात. उदा- कोल्हापूर २०१९ महापुराच्या वेळी मा. जिल्हाधिकारीसो यांची आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत घेतलेली मुलाखत.

**४. रेडिओवरील व्हॉक्सपॉप (जनतेची मते)**

व्हॉक्सपॉप हा शब्द व्हॉक्सपोपोली या शब्दापासून तयार झाला असून याचा अर्थ 'लोकांचा आवाज' असा आहे. सर्व प्रकारच्या माध्यमांमध्ये व्हॉक्सपोपोली याचा वापर केला जातो. रेडिओ व्हॉक्सपोपोलीच्या बाबतीत पत्रकार हे सहजरीतीने सर्वसामान्य लोकांना भेटण्यासाठी रस्त्यावर उतरून त्यांची मते आणि प्रतिक्रिया जाणून घेतात. एखाद्या विषयाबद्दल लोकांची मते किंवा प्रतिक्रिया जाणून घेतात तसेच जनतेच्या चिंतेच्या, आनंदाच्या अशा अनेक विषयावर त्यांना प्रश्न विचारतात उदा. संसदेत अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर लोकांच्या अर्थसंकल्पाबद्दल असणाऱ्या प्रतिक्रिया विचारतात, यामधील काही व्हॉक्सपॉक्स हे लोकांची मते जाणण्यासाठी तर काही एखाद्या घटनेचे घटनापूर्व अंदाज तसेच त्याचे परिणाम जाणून घेण्यासाठी असतात. उदा. क्रिकेटच्या विश्वचषकाच्या सामान्याआधी तसेच सार्वत्रिक निवडणुकाआधी घेण्यात आलेले व्हॉक्सपॉप.

**५. रेडिओ समालोचन**

काय घडतंय आणि कसं घडतंय या गोष्टी माणसाच्या औत्सुक्याच्या असतात आणि हाच दुवा धरत रेडिओवर जगभरात घडणाऱ्या विविध घटनांचे समालोचन केले जाते. वेगवेगळ्या खेळांचे सामने, धार्मिक कार्यक्रम, राजकीय कार्यक्रम, राष्ट्रीय सणांचे प्रत्यक्ष आणि धावते वर्णन इत्यादींचा या स्वरूपात समावेश होतो. या सर्व घडणाऱ्या घटनांवर भाष्य करणारे त्या त्या क्षेत्रात तज्ज्ञ असतात. ते आपल्या समालोचनातून श्रोत्यांमध्ये एखाद्या कार्यक्रमांविषयी उत्सुकता निर्माण करून त्यांच्यासाठी सदरचा कार्यक्रम अधिक आवडीचा करतात.

**६. रेडिओ संगीत**

संगीत पारंपरिकरीत्या वेगवेगळ्या स्वरूपात श्रोत्यांना ऐकण्यासाठी आकाशवाणीवर विविध कार्यक्रम असतात. शास्त्रीय संगीत, चित्रपट संगीत, वेस्टर्न शास्त्रीय संगीत, पॉप संगीत इत्यादी संगीत हे जगभरातील रेडिओ स्टेशनचा भाग आहेत. भारतात कर्नाटक संगीत व हिंदुस्थानी संगीताचा प्रसार हा रेडिओद्वारे होत आहे. सध्याच्या काळात रेडिओचे व्यवसायीकरण झाल्यानंतर चित्रपट संगीताला खाजगी रेडिओ चॅनेल्सनी महत्त्व दिले आहे.

### ७. नभोनाट्य

रेडिओवरील नाटक म्हणजे नभोनाट्य. यामध्ये सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय यांसारख्या वेगवेगळ्या विषयावर आधारित काल्पनिक अथवा सत्यघटनांवर आधारित नाटिका सादर केल्या जातात. यांचा कालावधी कमीतकमी अर्धातास व जास्तीत जास्त दोन तास इतका असतो. नभोनाट्यामध्ये समाजात घडणाऱ्या घटनांवर प्रकाश टाकला जातो. संगीताबरोबर नभोनाट्यही प्रेक्षकांचे चांगले मनोरंजन करू शकते.

### ८. रेडिओ डॉक्युमेंटरी/माहितीपट

विशिष्ट विषयावर वास्तव आणि सत्य, स्पष्ट स्वरूपाची रेडिओवर माहिती देणारा कार्यक्रम म्हणजे रेडिओ डॉक्युमेंटरी. या माहितीपटांमध्ये एखाद्या विशिष्ट विषयाची सत्य माहिती त्याच्या पुराव्यांसहित दिली जाते. तसेच सदर माहितीपटांमध्ये देण्यात येणारी माहिती ही मोजक्या शब्दांत पण व्यापक स्वरूपाची असते. त्याच्यामध्ये काल्पनिक घटकांना थारा नसतो. उदा. आकाशवाणीवर प्रसारित झालेली 'सफर विजयदुर्गाची', 'राजर्षींचे वास्तुवैभव' इत्यादी माहितीपट.

### ९. रेडिओवरील रूपक

रेडिओरूपक हा वास्तवाशी निगडित, नाटिका स्वरूपातील सृजनशीलतेवर आधारित कार्यक्रम असतो. त्यामध्ये साधे निवेदन, मुलाखत, नाट्यमय संवाद, संगीत, पार्श्वसंगीत, ध्वनी, काव्य यांचा वापर करता येतो. उदा-कर्णबधिर दिनानिमित्त निर्मित 'ऐका हो ऐका' हे रूपक, शिवजयंतीनिमित्त आयोजित 'शेतकऱ्यांचा कैवारी शिवत्रपती'.

### १०. डॉक्युड्रामा

नभोनाट्य आणि माहितीपट यांचे एकत्रित रूपांतर म्हणजे डॉक्युड्रामा होय. यामध्ये आकर्षकरीत्या एखादी माहिती लोकांसमोर मांडली जाते आणि माहिती सादर करण्यासाठी नाटिकेचा आधार घेतला जातो. उदा. प्राणिमात्रावरील प्रेम दाखवण्यासाठी 'सुरुवातीस प्राणी नसतेच तर काय होईल' या स्वरूपातील नाटिका व त्यानंतर आकडेवारीची मदत घेत योग्य मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जाते.

### ११. फोन इन कार्यक्रम

श्रोत्यांच्या सोबत एखाद्या विषयावर फोनद्वारे केलेली चर्चा, श्रोत्यांद्वारे विचारण्यात आलेले प्रश्न आणि त्या त्या विषयातील तज्ज्ञांनी त्यांचे फोनवर केलेले मार्गदर्शन; तसेच एखाद्या घटनेबद्दल विचारण्यात आलेले मत, श्रोत्यांच्या आवडीची गाणी इत्यादींचा फोन इन कार्यक्रमामध्ये समावेश होतो.

### १२. चर्चा

आकाशवाणीवरील चर्चात्मक कार्यक्रम हे विशिष्ट विषयाशी निगडित तसेच चालू घडमोडींवर आधारित असतात. लोकांच्यामध्ये औत्सुक्याचे असणाऱ्या विषयांवर चर्चा केली जाते. उदा. लोकप्रतिनिधींशी वेगवेगळ्या विषयांवर केलेली चर्चा, साथीचे रोग, नैसर्गिक आपत्तीविषयी केलेली तज्ज्ञांशी चर्चा.

रेडिओवरील वर नमूद कार्यक्रमांच्या संहिता या भाषिक कौशल्याचा वापर करून लिहिण्याच्या माध्यमातून विद्यार्थी अर्थाजन व करिअर करू शकतात.

आता आपण रेडिओवरील काही महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे संहितालेखन कसे केले जाते ते पाहू या.

## १. निवेदन

निवेदन ही रेडिओवरील सर्वात मूलभूत गोष्ट आहे. ''हे आकाशवाणीचे कोल्हापूर केंद्र आहे, आपण ऐकत आहात आकाशवाणी कोल्हापूर केंद्राचे कार्यक्रम,'' "This is all India Radio", ''यह है आकाशवाणी, आप लव्हली निगमसे समाचार सुन रहे है,'' अशा अनेक प्रकारच्या उद्घोषणा आपण दैनंदिन जीवनात ऐकत असतो. टी .व्ही. च्या तुलनेत रेडिओची उद्घोषणा खूप महत्त्वाचे काम करते. कारण कोणतीही माहिती योग्य प्रकारे सादर करून श्रोत्यांचे लक्ष वेधून घेऊन व त्यांना ती माहिती दृश्य माध्यमाशिवाय देण्याचे काम निवेदन अथवा उद्घोषणेद्वारे केले जाते.

आपण एखादी उद्घोषणा ऐकत असतो तेव्हा त्यामध्ये निवेदक श्रोत्यांना वेळोवेळी सांगत राहतो की, 'ऐकत रहा आकाशवाणीचे अमुक केंद्र, निवेदक ----याच्याकडून. तसेच स्वत:चे नाव सांगून श्रोत्यांना गुंतवून ठेवण्यासाठी प्रयत्न करत असतो. उदा- 'आपली आवड' या कार्यक्रमात ईशा सादर करत आहे श्रोत्यांसाठी सुमधुर गाणी,---------- याचबरोबर या कार्यक्रमात आपण ऐका ----------- या श्रोत्यांच्या आवडीचे गाणे. बोल आहेत-----------------गीतकार-----------गाणे चालू.

यावेळी निवेदक आकाशवाणी केंद्राचे नाव व त्याची फ्रिक्वेन्सी कार्यक्रमादरम्यान वारंवार सांगत असतो. उदा. 'आपण ऐकत आहात १०१.३ मेगा हार्टझ् वर आकाशवाणीचे सांगली केंद्र'. निवेदक आपल्या निवेदनाद्वारे श्रोत्यांना कार्यक्रमाशी जोडून ठेवण्याचे काम करत असतो. त्यामुळेच निवेदन/ उद्घोषणा हे आकाशवाणीचे मूलभूत साधन आहे. कारण निवेदक श्रोत्यांशी कोणत्याही दृश्याशिवाय गप्पा मारत असतो.

निवेदन म्हणजे उद्घोषणा. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार केलेल्या उद्घोषणा म्हणजेच निवेदन. निवेदन ही संहितेला निर्माण करणारी क्रिया आहे. एकामागून एक शब्दांना गुंफून केलेले शब्दसंयोजन म्हणजे निवेदन होय. वर्णन, निवेदन, संवाद, भाष्य ही निवेदनाची प्रमुख तंत्रे आहेत. Statement made formally and publicaly for mass . Announcement can be made in response to something such as rumors, or can be made for positive reasons.

### निवेदनाच्या पद्धती

निवेदनाच्या रूढ असलेल्या पुढील पद्धती आहेत.

१. **प्रथमपुरुषी निवेदन** : प्रथमपुरुषी निवेदनाला पात्रमुखी निवेदन असे म्हणतात. अशा निवेदनात मी, आम्ही असा आत्मगत निवेदक असतो. यामध्ये आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या एकांकिका, भाषणे, आत्मकथन, ललितबंध इत्यादी प्रकारच्या कार्यक्रमातील निवेदन हे प्रथमपुरुषी असते.

२. **द्वितीयपुरुषी निवेदन** : या निवेदन प्रकारात संवाद किंवा मुलाखत येते. यामध्ये दोन पात्रे एकमेकांशी संवाद साधतात किंवा मुलाखतकार आलेल्या पाहुण्यांशी संवाद साधतो. 'फोन इन' कार्यक्रमात याप्रकारचे निवेदन वापरले जाते.

३. **तृतीयपुरुषी निवेदन** : या निवेदन प्रकारात तो, ती, ते, त्या अशी निवेदकाची रूपे असतात. तृतीयपुरुषी निवेदक हा सर्वकाळात कोठे काय चालू आहे याबाबत माहिती देत असतो. उदा. रेडिओ वरील बातम्या .

**निवेदनाचे स्वरूप**

१. **लोकोपयोगी निवेदने**

यामध्ये आकाशवाणीच्या माध्यमातून शिक्षण, मनोरंजन, आपत्तिव्यवस्थापन, आरोग्य, हरवलेल्या व्यक्तीसंदर्भात दिलेली निवेदने वगैरेचा समावेश होतो. याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे -

आता आपण निवेदनाच्या काही प्रकारचे प्रत्यक्ष नमुने पाहू या-

**अ. शैक्षणिक निवेदन**

श्रोतेहो, थोडे इकडे लक्ष द्या. जुलै /ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा १७ जुलै २०१९ पासून सुरू होत आहेत. याबाबत विद्यार्थी तसेच पालक यांना काही शंका असतील तर त्यांच्या शंका निरसनासाठी जिल्ह्यानुसार समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ही सुविधा १७ जुलै ते ३ ऑगस्ट पर्यंत चालू राहील. यासाठी हेल्पलाईन नं. ०२३१२६९६९०३ /०४/०५/०६ यावर आपण सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०७.०० पर्यंत संपर्क साधू शकता. धन्यवाद.

**ब. आपत्ती व्यवस्थापनपर निवेदन**

श्रोतेहो, जिल्हा माहिती कार्यालय कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त जिल्ह्यातील पाऊस तसेच पूर परिस्थितीविषयी माहिती ऐकूयात. राधानगरी धरणाचे स्वयंचलित दरवाजे खुले झाले असून धरणातून ८२९० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग चालू आहे. यामुळे जिल्ह्यातील बंधाऱ्याच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून काही बंधारे पाण्याखाली गेले आहेत. धरण परिसरात अद्यापही पाऊस चालू असून नदीकाठच्या रहिवाशांनी सतर्क राहून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन मा. जिल्हाधिकारी यांनी केले आहे. तसेच अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज असून जिल्ह्यातील जनतेने घाबरून जाऊ नये तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. पूरग्रस्तांच्या आणि नागरिकांच्या मदतीस जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष चोवीस तास कार्यरत असून त्याचा टोल फ्री नं १०७७ असा आहे. जनतेने टोल फ्री क्रमांकावर पूर परिस्थितीबाबत अथवा मदतीची आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. धन्यवाद.

२. **जाहिरातविषयक निवेदने**

आकाशवाणी हे प्रसारमाध्यम असून त्याचा उपयोग हा काही वस्तू, पदार्थ, औद्योगिक उत्पादने, तसेच प्रायोजित आणि आयोजित कार्यक्रम इ. जाहिरातीसाठीही केला जातो. जाहिरात प्रसारणामध्ये ठरावीक वेळेनुसार आणि ठरावीक शब्द संख्येसाठी दर आकारणी केली जाते. यामध्ये विहित सेकंद अथवा मिनिटांचे निवेदन प्रसारित करून श्रोत्यांना एखाद्या कार्यक्रमाची माहिती दिली जाते.

उदा. १- 'भारताचं बदलतं स्वरूप -२०२० स्वातंत्र्यदिन' याविषयावर पोस्टर बनवण्याची स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा १० ऑगस्ट पर्यंत खुली आहे. स्पर्धेची प्रवेश फी लहान गटसाठी रु. १००/- आणि मोठ्या गटासाठी रु. २००/- अशी असून स्पर्धेबद्दल अधिक माहिती www.davp.nic.com आणि www.mygov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२- श्रोतेहो दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ ते १५ नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत खासबाग मैदान कोल्हापूर येथे भगिनी महोत्सव आयोजित केला असून त्याचा नागरिकांनी अवश्य लाभ घ्यावा. वेळ सकाळी १०.०० ते रात्री ०९.०० पर्यंतची आहे.

**निवेदन शैली**

रेडिओ वरील सादरीकरण ही एक प्रयोगशील कलाकृती आहे. यामध्ये निवेदक श्रोत्यांशी संवाद साधत असतो. त्यांच्याशी बोलत असतो.

मुद्रित माध्यमातील भाषा वाचन करण्याची भाषा असते. तर आकाशवाणीची भाषा ही फक्त श्रवणाची भाषा असते.त्यासाठी संहिता लेखन आवश्यक असते. संहिता वाचून श्रोत्यांना ऐकवावी लागते. तरीही तो अनुभव देण्यासाठी, चित्र उभे करण्यासाठी निवेदन शैली आवश्यक असते. निवेदन शैली प्रभावी असली तरच श्रोत्यांसमोर कार्यक्रम सादर करणे शक्य होते.

आकाशवाणीतील निवेदन शैली ही तुमचा श्रोता कोण आहे, तुम्ही कोणासाठी कार्यक्रम सादर करत आहात, तुमची भाषा काय असावी, तुमची सादर करण्याची पद्धत काय असावी यावर अवलंबून असते/खरं म्हणजे रेडिओचा श्रोता हा सिनेमासारखा तिकीट काढून कार्यक्रम ऐकण्यास बांधील नसतो. त्यास रेडिओचे बटन बदलून दुसरा कार्यक्रम ऐकण्याचे स्वातंत्र्य असते. तुमचा श्रोता एक सामान्य माणूस असतो. त्या सर्वसामान्य माणसाला समजेल, रुचेल, पचेल अशी सोपी, सुटसुटीत, सरळ भाषा असावी लागते. त्यात कृत्रिम अवजड, अवघड शब्द तसेच आलंकारिक भाषा नसावी. तुमच्या निवेदन शैलीवर तुमचा श्रोतावर्ग जसे शेतकरी, कामगार, महिला, युवक, बालक, ज्येष्ठ नागरिक इ. यांच्या आवडीनिवडीनुसार बदल व संवादफेक होण्याची गरज असते. कारण तुमचा टार्गेट ऑडियन्स म्हणजे विशिष्ट कार्यक्रम ऐकणारा श्रोतावर्ग कोण आहे त्यानुसार निवेदन शैलीत बदल करतात. त्याठिकाणी एकसुरीपणा असेल तर श्रोत्याचा कार्यक्रम ऐकण्यातील रस कमी होईल.

रेडिओची खासियत ही Any time any where असल्याकारणामुळे एकावेळी हजारो श्रोते ऐकू शकतात. त्यामुळे निवेदन शैली ही कार्यक्रमानुरूप बदलत राहते. जसे की, शेतीविषयक कार्यक्रमामध्ये त्या स्थानिक भागातील बोली भाषेचा वापर केला जातो.

उदा-१. कृषिवाणी या कार्यक्रमात निवेदक हा संवाद साधत असताना आपल्या सहकारी निवेदकाशी बोली भाषेचा वापर करून संवाद साधतो,

पहिला निवेदक - काय आप्पा, आज एरवाळी एरवाळी रानात आलास व्हय!

दुसरा निवेदक - घात आलीया, अवषीध मारुन घ्यावं म्हणतुया तात्या!

पहिला निवेदक - व्हय बाबा, पण मारताना जरा काळजी घे!

अशा प्रकारच्या निवेदन शैलीचा वापर करून निवेदक आपल्याकडील माहिती शेतकरीवर्गास पटवून देऊ शकतो.

२. महिलांविषयक कार्यक्रमांमध्ये दोन निवेदिका अन्न पदार्थांचे महिलांसाठी व बालकांसाठीचे महत्त्वाचे उपयोग त्यांच्या शब्दात विशद करतात. उदा.

पहिली निवेदिका– 'अन्न हे पूर्णब्रह्म' या कार्यक्रमात आपले सहर्ष स्वागत. भगिनींनो आज आपल्या भारतात ॲनेमिया या रोगाने महिला त्रस्त आहेत.

दुसरी निवेदिका– म्हणूनच मैत्रिणींनो, आज आपण आपल्या कार्यक्रमात ॲनेमिया या रोगाची कारणे काय आहेत आणि रोग होऊ नये म्हणून आपण काय काळजी घ्यावी, कोणत्या प्रकारचा पोषक आहार घ्यावा याबाबत तज्ज्ञांकडून जाणून घेणार आहोत.

३. संगीत कार्यक्रमामध्ये निवेदक वेगवेगळ्या भावभावना गीतांच्या तसेच आपल्या ओघवत्या आणि भावनिक निवेदन शैलीच्या माध्यमातून करतो. उदा. श्रोतेहो 'गीतबहर' या कार्यक्रमात आपण आज मैत्री या नात्यापलीकडील नात्याविषयी गाणी ऐकणार आहोत. मित्रहो, श्रीकृष्ण– सुदामा, छत्रपती संभाजीराजे आणि कवी कलश इथंपासून शोले चित्रपटातील जय आणि वीरू यांचेपर्यंत मैत्री काय असते ते आपणास माहिती आहे. एका मैत्रीमध्ये कोणत्याही श्रीमंतीचा अविर्भाव न आणता मित्राचे दुःख दूर केले गेले तर दुसऱ्या मैत्रीमध्ये शेवटपर्यंत साथ दिली गेली. तर याच मैत्रीचे आपल्या जीवनात अविभाज्य स्थान आहे. चला, तर ऐकूया, ------ या चित्रपटातील एक छानसं गीत-------

अशा प्रकारे कार्यक्रमानुसार आणि श्रोत्यांनुसार कार्यक्रमाची निवेदन शैली निवेदकास बदलावी लागते. कृषिविषयक कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांवर उकल करताना बोली भाषेचा वापर केला जातो तर महिलाविषयक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय गाण्यांच्या सुरात गुंफले जातात.

**निवेदन लिहिताना घ्यावयाची काळजी**

लोकोपयोगी निवेदन हे कमीतकमी शब्दांत, जास्त परिणामकारक, लोकाभिमुख, लोकहित जपणारे व त्यांच्यात जागृती करणारे असावे.

१. आपण कोणत्या उद्देशाने निवेदन देत आहोत हे सर्वप्रथम निश्चित करावे व त्याप्रमाणे लेखन करावे.

२. निवेदन खात्रीपूर्ण असावे.

३. निवेदक साधे, सरळ, सोप्या, अचूक आणि स्पष्ट भाषेत असावे.

४. आपण आपले निवेदन कोणत्या प्रकारात देणार आहोत हे निश्चित करून त्याप्रमाणे लिखाण करावे.

५. निवेदन ज्या लोकांसाठी देण्यात आले आहे त्यांच्यापर्यंत ते पोहचते का याबाबत खात्री करावी.

६. निवेदन तयार करताना त्यामधील माहिती ही संशोधनपर व अभ्यासपूर्ण असावी.

७. समाजातील कोणत्या वर्गासाठी आपल्याला निवेदन करावयाचे आहे तो वर्ग व त्याप्रमाणे भाषा निवडावी. जसे – महिला, बालक, शेतकरी, पालक, ज्येष्ठ इ.

८. आकर्षक पद्धतीने मांडलेले निवेदन हे लोकांना पटकन समजते केलेले.त्यामुळे निवेदनाची मांडणी ही आकर्षक असावी.

९. निवेदन कमी खर्चीक, कमी वेळेत जास्त परिणामकारक असावे.

**निवेदनासाठीची संहिता लेखन**

निवेदकास स्वत:च्या निवेदनासाठी पूर्वतयारी करावी लागते. यामध्ये कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार तसेच प्रसारणाच्या वेळेनुसार संहितालेखन करावे लागते. या संहितालेखनामध्ये वेळेचे भान ठेवावे लागते. तसेच साधी आणि परिणामकारक वाक्ये तयार करावी लागतात. एखाद्या प्रसंगानुरूप त्यामध्ये अचानक योग्य तो बदलही करता यावा. निवेदनाची संहिता ही मनोरंजक आणि आकर्षक असावी.

उदा- **निवेदनाची संहिता**

सुप्रभात श्रोतेहो, हे आकाशवाणीचे सोलापूर केंद्र आहे. आज शनिवार भारतीय सौर दिनांक २६ फाल्गुन शके, १९३९. १७ मार्च, २०१८. आता आपली पहिली प्रसारण सभा सुरू होत आहे. सकाळचे सहा वाजले आहेत. दिल्ली केंद्रावरून आपण हिंदीतून बातमीपत्र सहक्षेपित करत आहोत. ----------

श्रोतेहो, आत्ताच आपण हिंदीतून बातम्या ऐकल्या. सकाळचे सहा वाजून दहा मिनिटे झाली आहेत. आता प्रसारित करत आहोत 'चिंतन' हा कार्यक्रम, यामध्ये आपण ऐकणार आहोत, संत नामदेव यांचे विचार----------------

मंडळी, आता वेळ झाली आहे भक्तिसंगीताचा आस्वाद घेण्याची.सुरुवातीला आनंद भाटे यांच्या आवाजातील भूपाळी-----------

आता आपण ऐकू या ----- यांच्या आवाजातील भजन --------. या भजनाबरोबरच भक्तिसंगीताचा कार्यक्रम समाप्त होत आहे.

श्रोतेहो, सकाळचे सहा वाजून पस्तीस मिनिटे झाली आहेत. जाणून घेऊ या आज दिवसाभरातील कार्यक्रमाची रूपरेषा ---

रूपरेषेनंतर लगेचच कृषिविषयक कार्यक्रम --- यानंतर सहा वाजून चाळीस मिनिटांनी आरोग्यविषयक कार्यक्रम. यामध्ये डॉ. राहूल पाटील यांनी दिलेला आरोग्य सल्ला.

श्रोतेहो, सहा वाजून पंचेचाळीस मिनिटे झाली आहेत. आता ऐकू या साहित्यविषयक कार्यक्रम -------------

याप्रमाणे संपूर्ण दिवसभरातील कार्यक्रमांचे संहिता लेखन होणे आवश्यक असते.

**निवेदकाची गुणवैशिष्ट्ये**

१. **आवाज** : आवाज ही निवेदकाची सर्वात मोठी संपत्ती आहे. निवेदकाचा आवाज रेडिओस योग्य असावा. त्याच्या आवाजात श्रोत्यांना कार्यक्रम ऐकताना गोडवा, भाषेतील माधुर्य जाणवावे.

२. **आवाजातील चढउतार** : निवेदकाने कार्यक्रमाच्या संहितेनुसार व कार्यक्रमाच्या प्रकारानुसार आवाजात चढउतार केले पाहिजेत.

३. **भाषेवर प्रभुत्व** : निवेदक ज्या भाषेत निवेदन करणार आहे. त्या भाषेवर त्याचे प्रभुत्व असावे. भाषेवर हुकमत असल्याशिवाय निवेदकास निवेदन योग्य प्रकारे करता येणार नाही. निवेदकास त्याच्या मातृभाषेशिवाय इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांचे ज्ञान आवश्यक आहे. तसेच आपलं भाषिक कौशल्य त्याने सादरीकरणातून प्रकट करावयास हवे.

४. **उच्चार** : निवेदकाचे उच्चार हे स्पष्ट असावेत.

५. **स्पष्टता** : निवेदकाच्या शब्दांत, उच्चारांत, विचारांत आणि निवेदनाच्या मांडणीत स्पष्टता असावी.

६. **चालू घडामोडींची जाण** : निवेदकास आजूबाजूस, शहरात, ज्यात, देशात, आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घटनांची जाण चांगली असावी. तसेच त्यास वेगवेगळ्या विषयांतील सामान्यज्ञान असावे.

७. **संवाद विकसित करून टिकवून ठेवण्याची क्षमता असावी** : निवेदकाने मनोरंजक पद्धतीने श्रोत्यांशी संवाद साधावा. त्याने श्रोत्यांचा तसेच अतिथींचा कार्यक्रमातील सहभाग अणि त्यातील रस टिकवून ठेवा.

८. **नावीन्यता आणि सृजनशीलता** : निवेदकाने त्याच्या कार्यक्रमात अथवा निवेदनात नवनवीन कल्पना, विचार तसेच निवेदनाची मांडणी यांचे प्रयोग करून श्रोत्यांना खिळवून ठेवण्याची कला विकसित करावी.

९. **बहुकार्य करण्याची क्षमता** : एकाचवेळी निवेदकाने त्याच्या कार्यक्रमात संभाषण, निवेदन व श्रोत्यांशी बांधिलकी जोडून ठेवण्याची तसेच प्रसंगानुरूप संगीताचा वापर करण्याची क्षमता विकसित करावी.

१०. **समयसूचकता** : निवेदकाने कार्यक्रमांमध्ये घडणाऱ्या घटनांच्या अनुषंगाने समयसूचकता दाखवणे गरजेचे आहे.

११. **सर्वसमावेशकता** : निवेदकाने त्याच्या निवेदनामध्ये अथवा कार्यक्रमामध्ये त्याच्या आसपास असणारे व कार्यक्रमाचा घटक असणारे श्रोतृवर्ग, अतिथी, तांत्रिक साहाय्यक, इतर निवेदक या सर्वांशी जुळवून घेऊन कार्यक्रमाची लोकप्रियता व मनोरंजकता टिकवून ठेवणे गरजेचे असते.

वरील सर्व कौशल्यांचा विकास करून विदयार्थी हा आवाजाच्या माध्यमामध्ये निवेदक, रेडिओ जॉकी, वृत्त निवेदक, सूत्रसंचालक म्हणून अर्थाजनाच्या अनेक संधी प्राप्त करू शकतो.

**२) आकाशवाणीसाठी संहितालेखन**

आकाशवाणी हे श्राव्य माध्यम असल्याने त्यामध्ये श्रोता हा फक्त ऐकू शकतो. ज्यावेळी आपण आकाशवाणीवरील कार्यक्रमांचा विचार करतो त्यावेळी आपले लक्ष फक्त आवाजावर जाते. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आवाजाचे महत्त्व फार मोठे आहे. आकाशवाणीसाठी कार्यक्रम तयार करण्यासाठी आवाजाबरोबरच संगीत, ध्वनी प्रभावी असावे लागते. पण तत्पूर्वी त्या कार्यक्रमाची संहिता महत्त्वाची असते. म्हणून आकाशवाणीसाठी संहितालेखन- कौशल्य लिहिताना पुढील गोष्टी प्रामुख्याने लक्षात ठेवाव्यात.

**१. आकाशवाणी एक जनमाध्यम**

आकाशवाणी हे एक जनमाध्यम असल्यामुळे आपण एकाचवेळी खूप मोठ्या जनसमुदायापर्यंत पोहचू शकतो. आपण मुलाखती दरम्यान अथवा अन्य कार्यक्रमादरम्यान एकाच व्यक्तीशी बोलत असलो तरी आपण हजारो लोकांना माहिती देत असतो. त्यामुळे दिला जाणारा संदेश हा व्यावसायिक, स्पष्ट आणि

परिणामकारक असावा. आकाशवाणीसाठी केले जाणारे लेखन हे कौशल्यपूर्ण असावे. त्यातून समाजाचे प्रबोधन आणि विकास व्हावा. उगीच शब्द वाढवण्यासाठी पाल्हाळ लावू नये.

**२. संहितेतून चित्र तयार करणे**

आकाशवाणी हे फक्त श्राव्य माध्यम आहे. आकाशवाणीवरील कार्यक्रम कानांनी ऐकून त्याचे एक चित्र मनात उभे करावे लागते. त्यामुळे संहितालेखकाने आपल्या प्रतिभाशक्तीच्या व कल्पनाशक्तीच्या जोरावर शब्दांच्या योग्य मांडणीतून श्रोत्यांसामोर जिवंत चित्र उभे करावे. त्यासाठी संहितालेखकाने शब्दांचा उचित वापर करावा. योग्य ठिकाणी अलंकार वापरा. संहिता ही भावनांचे संगोपन करणारी असावी. त्यातून श्रोत्यांसमोर योग्य चित्र उभारता आले पाहिजे.

**३. स्वसंहिता ऐकणे**

संहितालेखकाने संहितेमधून श्रोतृवर्गास जो संदेश द्यावयाचा आहे तो स्वत: लेखन पूर्ण झाल्यावर वाचून पहावा. असे वाचन केल्या आपण काय लिहिले आहे याबाबत नेमकी जाणीव होते.

४. लेखकास संहितेमधून नेमके काय सांगायचे आहे, हे स्पष्ट करावे.

५. लेखकाने त्याचे लिहावयाचे मुद्दे योग्य क्रमाने मांडावेत व त्यानंतर लेखन करावे.

६. कोणत्याही संहितेची सुरुवात ही मनोरंजक आणि माहितीपूर्वक असावी.

७. लेखकाने श्रोतृवर्गास डोळ्यांसमोर ठेवून लेखन करावे.

८. लेखकाने त्याच्या लेखनात सामान्य जनांची भाषा वापरावी. संहितालेखनात छोट्या छोट्या वाक्यांचा वापर करावा.

९. संहितालेखन हे प्रभावित करण्यासाठी नसून ते श्रोत्यांना समजण्यासाठी असते, याचे भान ठेवावे.

१०. संहितालेखनामध्ये भाषा, व्याकरण आणि विरामचिन्हे यांचा सयुक्तिक वापर करावा.

११. जसे आपण बोलतो त्याप्रमाणे लिहावे.

१२. जर एखाद्या संहितालेखनामध्ये अंकांची मोजणी करावयाची असेल किंवा आकड्यांच्या स्वरूपात माहिती द्यावयाची असेल तर ती क्लिष्ट न देता सोप्या रूपात द्यावी. उदा. १५ कोटी ८७ लाख ९८ हजार २२२ ऐवजी सुमारे १६ कोटी असे म्हणावे.

१३. सर्वनामांचा वापर शक्यतो टाळावा .

१४. नावांच्या अगोदर त्यांच्या उपाध्या लावाव्यात. उदा. शरद पवार मुख्यमंत्री असे न म्हणता मुख्यमंत्री शरद पवार असे म्हणावे.

**आकाशवाणीवरील वेगवेगळ्या स्तरातील लोकांसाठीचे कार्यक्रम**

संवादात्मक कार्यक्रम हा रेडिओवरील कार्यक्रमाचा पाया आहे. यामध्ये निवेदक व त्याचे निवेदन हे मुख्य भाग असतात. या कार्यक्रमामध्ये निवेदक हा विशिष्ट कालावधीमध्ये आपले म्हणणे सादर करतो. मुख्यत: एखाद्या विशिष्ट विषयावरील तज्ज्ञांद्वारे ते दिले जाते.

## १. कृषिविषयक कार्यक्रम

आकाशवाणी जनसामान्यांचे माध्यम आहे. समाजातील वेगवेगळ्या वर्गातील लोकांसाठी कार्यक्रम करणे हे आकाशवाणीचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. यामध्ये शेतकरी वर्गासाठी कार्यक्रम करणे ही अत्यावश्यक गोष्ट आहे. हवामानाचा अंदाज, हंगामानुसार पीक, रोग आणि किडीचे व्यवस्थापन, पशुपालन, सरकारी योजना या आणि अशा अनेक विषयांवर आधारित कार्यक्रम केले जातात. यांची संहिता ही त्या त्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने लिहिली जाते. समजा 'औषध फवारताना घ्यावयाची काळजी' या गंभीर विषयाची माहिती सर्वसामान्य शेतकऱ्यांना बोली भाषेतून समजेल अशी संहितेची मांडणी करण्याची गरज असते.

उदा. आपण रूपकाचा वापर करून पुढीलप्रमाणे कार्यक्रमाची संहितालेखन करू शकतो.

**औषध फवारणी करताना घ्यावयाची काळजी**

**आबा** – आक्का, हायसाका घरात.

**आक्का** – हाय की वो. काय झालं? काय म्हणताय?

**आबा** – काय नाय वो, तुम्हासनी माहिती हाय का, वरच्या आळीचा सर्जा वावरात फवारणी करीत हुता तवा त्याला विषबाधा झाली ते

**आक्का** – कवा वो ते आणि ते कसं बर झालंवो.

**आबा** – आज सकाळी सकाळी झालं.

**आक्का** – कसं काय वो आबा झालंय हे.

**आबा** – अग आक्के, औषिद मारताना काळजी नसंल घेतली त्यानं.

**आक्का** – त्यात आणि कसली काळजी घ्यायची हाय.

**आबा** – अग आक्के, ते कुठल्यातरी जाणकाराला इचारून घेतलं पाहिजे बघ.

**आक्का** – आता ह्यो जाणकार आणि कोण भेटायचा आबा.

**रमेश** – काय आबा? काय चाललंय कसला विषय चालू आहे. कोण जाणकार हवा आहे तुम्हाला?

**आबा** – टायमात आलास बघ रमेश. तुला माहिती हाय नव्हं! वरच्या आळीच्या सर्जाला वावरात फवारणी करताना विषबाधा झालीते.कशी काय झाली असल रं ती? काळजीच घेतली नसंल बघ त्यानं फवारणी करताना? आरं पन काय आणि कशी काळजी घ्यायची ते कसं कळणार रं आपल्याला ते?

**रमेश** – आबा, फार काही अवघड नसतं पन काळजी घेणं गरजेचं असतं बघ.

**आक्का** – आरं, पण काय काळजी घ्यायची ते तरी सांग.

**रमेश** – आक्का, पहिली गोष्ट म्हणजे औषध किती प्रभावी आहे याची माहिती असणं गरजेचं आहे.

**आबा** – व्हय बरोबर आहे बघ.

**आक्का** – आणि फवारणी करताना काय काळजी घ्यायची रं.

**रमेश** – आक्का, लक्षात ठेव. पहिलं औषधाचं मिश्रण किती प्रमाणात करायचं आहे हे माहिती पाहिजे. त्यानंतर औषध मारताना शरीर व्यवस्थित झाकलं जाईल याकडेही लक्ष द्यावं. शक्यतो नाक, तोंड पूर्ण झाकले जाईल याची काळजी घ्यावी.

**आबा** – आक्शी बरोबर बोललास बघ बाबा.

**रमेश** – एवढंच नाही आबा तर औषध मारताना काहीही खायचं प्याचं नाही.

**आक्का** – म्हणजे तोंडावाटे विष पोटात जाणार नाही.

**रमेश** – औषध मारून झाल्यावर बी काळजी घ्यावी लागते. हात पाय बी स्वच्छ धुऊन घ्यावे लागतात .

**आबा आणि आक्का** – व्हय रं लेकरा, चांगली माहिती सांगितलीस बघ. यापुढं आपलं शेतकरी बांधव काळजी घेतील बघ .

**२. महिलांविषयक कार्यक्रम**

महिलाविषयक कार्यक्रम करताना महिलांविषयक कायदे, हक्क, अधिकार, त्यांना मिळणाऱ्या सुविधा, त्यांच्याशी संबंधित असणारे विषय जसे की, वेगवेगळ्या पदार्थांच्या पाककृती, बालसंगोपन, आरोग्यविषयक, कलाकुसर, बालसंस्कार कार्यक्रम, पर्यटन, कर्तबगार महिलांच्या मुलाखती इत्यादींचा यामध्ये विचार होतो व त्यांना मार्गदर्शनपर कार्यक्रम केले जातात. त्यासाठीच्या संहिता विषयानुरूप तसेच कार्यक्रमानुरूप ठरविल्या जातात.

मैत्रिणींनो, महिलाजगत या कार्यक्रमात आपले सहर्ष स्वागत. आज गुरुवार, आपल्या कार्यक्रमामध्ये महिलांच्या आरोग्यविषयक तक्रारींचे निवारण करतो आपण. तर आज आपल्याला तक्रार आली आहे ठाण्याहून. आपली मैत्रीण सुवर्णा दांडेल हिने आपल्या पत्रामध्ये म्हटलं की, हिच्या भागात ॲनेमिया या रोगामुळे मातामृत्यूचे प्रमाण वाढलं आहे. तर नेमकं काय करावं.

मैत्रिणींनो २०१८ च्या आकडेवारीनुसार ॲनेमिया या रोगापासून ५० टक्क्यांहून अधिक स्त्रिया या बाधित आहेत. हा रोग नेमका काय आहे हे जाणून घेण्यासाठी आणि सुवर्णा दांडेल यांच्या समस्येचे उत्तर देण्यासाठी आपल्या सोबत आहेत. डॉ. प्रेमला पाटील.

**निवेदिका** – नमस्कार मॅडम, आपले कार्यक्रमात स्वागत आहे.

**डॉक्टर** – नमस्कार.

**निवेदिका** – मॅडम, आपण पाहतो आहे. सध्या ॲनेमियामुळे मातामृत्यूचे प्रमाण वाढले आहे. तर नेमकं हे ॲनिमिया आहे काय?

**डॉक्टर** – ॲनेमिया म्हणजे थोडक्यात सांगायचे झालं तर रक्तक्षय किंवा पंडुरोग. हा रोग होण्याचे मुख्य कारण म्हणजे लाल रक्तपेशींची संख्या कमी होणे किंवा हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे हे आहे. यामुळे रक्तामध्ये लोहाची कमतरता होते .

**निवेदिका** – मॅडम याची लक्षणे कोणती ?

**डॉक्टर** – याची प्रमुख लक्षणे अशक्तपणा, अस्वस्थपणा, चक्कर येणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास त्रास होणे.

**निवेदिका** – याच्यावर उपचार कोणते ?

**डॉक्टर** – याच्यावरील उपचारासाठी जीवनसत्त्व बी १२, फॉलिक ॲसिड, जीवनसतत्व सी असणारी फळे जसे लिंबू, संत्री, आंबे इ. राजगिरा, गूळ, शेंगदाणे, बदाम, हिरव्या पालेभाज्या, खजूर, अंडी, मांस, मासे इ.

**निवेदिका** – हा रोग होऊ नये म्हणून आपली जीवनशैली कशी असावी ?

**डॉक्टर** – दररोज व्यायाम हा अनिवार्य आहे. वेळच्या वेळी नाष्टा व जेवण घेतलेच पाहिजे. व्यसन टाळावे. लोहसमृद्ध आहार घ्यावा. पुरेशी झोप घेणंही महत्त्वाचं आहे.

**निवेदिका** – डॉक्टर मॅडम, आपण इथे आलात व आपल्या मैत्रिणींना ॲनेमिया विषयी मार्गदर्शन केलंत याबद्दल धन्यवाद.

**डॉक्टर** – धन्यवाद.

**निवेदिका** – मैत्रिणींनो, तुम्हीही तुमची काळजी घ्या व ॲनिमिया या रोगापासून डॉक्टर मॅडमनी सांगितल्याप्रमाणे काळजी घेऊन स्वत:चा बचाव करा. आता जाता जाता तुमच्यासाठी हे गाणं -------

आजचा कार्यक्रम आपण इथेच थांबवूया तर निवेदिका -----हिला निरोप द्या. धन्यवाद.

या प्रकारे महिलाविषयक कार्यक्रमात कार्यक्रमाचे संहितालेखन केले जाते.

### ३. शैक्षणिक कार्यक्रम

विद्यार्थी व तरुणाई ही भारताची सर्वात मोठी ताकद आहे. या शक्ती विधायकरीतीने वापरण्यासाठी आणि तरुण विद्यार्थी वर्गाचे भविष्य उज्ज्वल करून एक सक्षम भारत निर्मितीसाठी आकाशवाणीचा प्रभावी माध्यम म्हणून वापर केला जातो. या प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये तरुण आणि विद्यार्थी वर्गाच्या समस्या, त्यांच्या शिक्षण पद्धती, अर्थार्जनाच्या आणि करिअरच्या संधी, महागाई, बेरोजगारी इत्यादी विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करू शकतो.

आज भारतात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणारे माध्यम म्हणजे आकाशवाणी. आकाशवाणीची ४५० केंद्रे, २३ भाषा, १४६ बोली भाषा, ९९% क्षेत्रफळ, ९९.१९% लोकांपर्यंत पोहोचण्याची क्षमता आहे. पण आपल्या देशातील विद्यापीठांची संख्या मर्यादित आहे. यामुळे आकाशवाणी हे एक

लोकशिक्षणाचे माध्यम बनले आहे. आकाशवाणीवरून शालेय व उच्चशिक्षणातील अभ्यासक्रमांवर आधारित कार्यक्रम प्रसारित केले जातात.

**शैक्षणिक कार्यक्रम लिहीत असताना घ्यावयाची काळजी**

१. ज्या विद्यार्थांसांठी कार्यक्रम तयार करावयाचा आहे, त्यांचा वयोगट, आकलनक्षमता, वर्ग, बौद्धिक स्तर वगैरे लक्षात घेऊन त्याप्रमाणे कार्यक्रमाचे संहितालेखन करावे.

२. आपण कोणत्या कौशल्यावर आधारित शिक्षण देणार आहेत ते निश्चित करून त्यावर आधारित संहितेचे लिखाण करावे.

३. कार्यक्रमाचे स्वरूप काय असावे ते कार्यक्रमाच्या संहितेतच स्पष्ट करावे.उदा-मुलाखत, रूपक, नभोनाट्य इ.

४. संहितेची वेळ निश्चित करून विहित वेळेत ती पूर्ण करावी. विनाकारण लांबवू नये.

५. विद्यार्थ्यांची आवड आणि संपादन क्षमता ध्यानात घेऊन संहिता लिहावी.

**उदा. संहितेचा नमुना**

श्रोतेहो नमस्कार, हे आकाशवाणीचे कोल्हापूर केंद्र आहे. सकाळचे ठीक नऊ वाजले आहेत. आता वेळ झाली आहे ज्ञानवाणी या कार्यक्रमाची. मित्रहो, गेल्या आठवड्यात महाराष्ट्राच्या प्राकृतिक भूभागांची माहिती आपण संवादातून घेतली. आज सुमित आणि अमित काय जाणून घेतात ते आपण ऐकू या. -

**सुमित** - ए अमित, आपली वारणा नदी आहे ना ती दक्षिणेकडे वाहते .

**अमित** - नाय रे! ती पूर्वेकडे वाहत जाऊन पहिली कृष्णा नदीला मिळून नंतर बंगालच्या उपसागराला मिळते.

**सुमित** - तू तर लयं हुशार झालास की.

**अमित** - नाय रं बाबा, आमचा दादा स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतोय, त्यानं मला समजून सांगितलं तेव्हा मला कळलं.

**सुमित** - भारी हाय की, आपल्या भूगोलाच्या पुस्तकातील माझ्या डोक्यात काहीच शिरत नाही बघ. चल तुझ्या दादालाच जरा विचारूया.

**अमित** - व्हय, चल जाऊया.

**दादा** - (दरडावून काय रे पोरांनो) आज माझ्याकडे काय काम काढलंत?

**अमित** - काय नाय रे दादा, तुझ्याकडे सहजच आलो होतो.

**सुमित** - नाय रे दादा, ह्योच मला तुझ्याकडे घेऊन आला होता.

**अमित** - मी नाय रे, दादा ह्योच मला म्हणला, दादाकडून महाराष्ट्राची नदीप्रणाली समजून घेऊया.

**दादा** - (हसत हसत) एवढंच होय, सांगतो की मग.

**अमित** - वारणा नदी कृष्णेची उपपदी हाय का नाय दादा?

**सुमित** – दादा, आरं ह्यो मगापासून वारणा कृष्णेतच अडकून पडलाय, मला महाराष्ट्रातील सगळी नदीप्रणाली समजून घ्यायची आहे.

**दादा** – हे बघा पोरांनो, आपल्या महाराष्ट्रात पूर्ववाहिनी आणि पश्चिमवाहिनी अशा दोन प्रकारच्या नद्या आहेत.

**सुमित** – म्हणजे?

**दादा** – हे बघ सुमित, आपल्या महाराष्ट्रातील पश्चिमघाट हा नद्यांचा दुभाजक आहे. यामध्ये पश्चिमेस वाहत जाऊन अरबी समुद्रास मिळणाऱ्या पश्चिमवाहिनी नद्या, त्यात तापी, नर्मदा आणि कोकणातील उल्हास, वैतरणा, दमणगंगा, तेरेखोल इत्यादीचा समावेश होतो. तर पूर्वेस वाहत जाऊन बंगालच्या उपसागरास मिळणाऱ्या पूर्ववाहिनी नद्या त्यात गोदावरी, कृष्णा, प्राणहिता, पैनगंगा इत्यादी आहेत.

**अमित** – समजलं का सुमित?

**सुमित** – व्हय समजलं की, दादा महाराष्ट्रातील सगळ्यात मोठी नदी कोणती रे

**दादा** – अरे गोदावरी नदी सर्वात मोठी नदी आहे. तिची लांबी १४५० किमी असून महाराष्ट्रात ६६८ किमी वाहते आणि पुढे जाऊन ती आंध्रप्रदेशातील राजमहेंद्री या ठिकाणी बंगालच्या उपसागरास मिळते.

**अमित** – बघ सुमित, दादा कसली भारी माहिती देतोय.

**सुमित** – व्हय आईनं मला दुकानला जायला सांगितलं आहे. आता मी निघतो.नाहीतर मला आईचा मार खावा लागेल.

**अमित** – दादा थँक यू.

**दादा** – ए अभ्यास करा रे पोरांनो आणि काही शंका असल्यास मला विचारत जा. तेवढीच माझी उजळणी.

यांप्रमाणे सदरच्या कार्यक्रमांच्या सरळ, साध्या, सोप्या अर्थपूर्ण, भाषेत संहिता लिहाव्यात.

**३. आकाशवाणीवरील बातमीलेखन**

बातम्या या आकाशवाणीच्या सर्वात महत्त्वाच्या कार्यक्रमापैकी एक आहेत. बऱ्याच वर्षापासून जगभरातील रेडिओच्या वेळापत्रकामध्ये बातम्यांनी आपले विशेष स्थान पटकावले आहे. जनमानसांमध्ये रेडिओवरील बातम्या म्हणजे खात्रीशीर बातम्या असे मानले जाते. आजही रेडिओवरील बातम्या त्यांचे स्थान कायम टिकवून आहेत. कोणत्याही आपत्तीच्या काळात रेडिओवरील बातम्याच विश्वासार्ह मानल्या जातात. आकाशवाणी हे एक श्राव्य माध्यम आहे. आकाशवाणीवरील कार्यक्रमांमध्ये बातम्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. विश्वासार्ह व निष्पक्ष बातम्यांसाठी आजही जनमानसात आकाशवाणी प्रसिद्ध आहे. आपण आकाशवाणीसाठी बातमी लेखन करीत असताना श्राव्य माध्यमासाठी बातमी लेखन करत आहोत याचे नेहमी भान ठेवावे लागते. वृत्तपत्रातील बातम्या लिहिताना त्या ग्रांथिक स्वरूपात अधिक विस्ताराने लिहिल्या जातात. आकाशवाणीवरील बातम्या मोजक्या पण परिणामकारक शब्दात लिहिल्या जातात.

आकाशवाणीवरील बातम्यांचे लेखन करताना बोलीभाषेत व शब्द स्वरूपातील लेखनात फरक असतो. तो लोकांना जाणीवपूर्वक ध्यानात घ्यावा लागतो. यामुळे शब्दोच्चार करताना निर्माण होणारे गैरसमज टाळता येतात. याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे नभोवाणीसाठी बातमी लिहिताना ती छोट्या छोट्या वाक्यांमध्ये आणि थेट भिडणारी, एकदा ऐकून पटकन समजणारी, सुटसुटीत हवी. पसरट, पाल्हाळीक, खूप मोठी वाक्यरचना केल्यास त्याच्यामध्ये मुख्य विषय शोधावा लागतो आणि ते श्राव्य माध्यमात शक्य नसते. तसेच आकाशवाणीसाठी बातमीलेखन करताना एखाद्या व्यक्तीचा वारंवार उल्लेख टाळावा लागतो. कारण ते ऐकणाऱ्याला खटकणारे होऊ शकते. तसेच जर तसा उल्लेख करणे बातमीची गरज असेल तर तो वेगवेगळ्या तऱ्हेने करावा लागतो.

**बातमीपत्राची संहिता लिहिण्यासाठी मार्गदर्शिका**

१. सामर्थ्यवान शब्द व चांगले उच्चारण, आवाजातील चढउतार यांच्या साहाय्याने आकाशवाणीवरील बातम्या लोकांपर्यंत यशस्वीपणे पोहचवल्या जाऊ शकतात.

२. थोडक्यात आणि मोजक्या शब्दात बातमी असावी, कारण आकाशवाणीवरील बातम्यांना वेळेचे बंधन असते.

३. बातम्यांची संहिता लिहीत असताना कर्तरी प्रयोगाचा वापर केला जातो.कारण निवेदकाला त्र्ययस्थ व्यक्ती म्हणून बातमीचे वाचन करावे लागते.

४. साधी, सोपी, सुटसुटीत वाक्ये असावीत. संयुक्तवाक्ये, आलंकारिक शब्द, म्हणी व वाक्यप्रचार टाळावेत

५. व्यक्तीच्या नावाच्या अगोदर पदाचा उल्लेख करावा.

६. बातमी लेखनामध्ये अवघड भारदस्त शब्दांचा वापर टाळावा .

७. वाक्य हे व्याकरणदृष्ट्या बरोबर असावेच असे नाही. त्याऐवजी ते अर्थपूर्ण असावे.

८. वाचण्यास क्लिष्ट अंकाचा उल्लेख टाळावा. जोडाक्षरयुक्त शब्द टाळावेत. त्या ऐवजी सुमारे हा शब्द वापरून अंकाचा उल्लेख करावा.

९. बातमीच्या सुरुवातीच्या ओळीतच बातमी नेमकी कशाची आहे, हे श्रोत्यांना समजले पाहिजे.

१०. मुख्य बातमी ही स्पष्टीकरणयुक्त आणि मुद्देसूद असावी.

११. बातम्यांची शैली ही ओघवती असावी.

१२. बातम्यांची भाषा ही सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकच असावी. म्हणजे बोलीभाषेचा वापर असेल तर बोलीभाषेतच शेवटपर्यंत बातम्या द्याव्यात. प्रमाणभाषेचा वापर केला असेल तर शेवटपर्यंत प्रमाणभाषेतच असावे.

**बातमी देणाऱ्या निवेदकाची गुणवैशिष्ट्ये**

१. निवेदकाचा आवाज चांगला व स्पष्ट असावा.

२. बातमी वाचताना आवाजातील चढउतार कसे असावेत याची माहिती असावी.

३. निवेदकास भाषेचे ज्ञान चांगले असावे .

४. निवेदकास प्रसंगावधान असावे. कारण जर एखादे वेळेस बातमीलेखनामध्ये काही चुका असतील किंवा प्रसारणात काही तांत्रिक दोष निर्माण झाले तर प्रसंगावधान राखून बातमीपत्राचे योग्य वाचन करता आले पाहिजे.

५. पूर्ण बातमीपत्रात निवेदनचा वेग एकसारखा असावा.

६. तांत्रिक गोष्टींचे मूलभूत ज्ञान असावे.

**बातमीपत्राची संहिता – नमुना**

**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्तविभाग**

**प्रादेशिक बातम्या**

**वेळ : सकाळी ०७ वा. १० मि.**

**दि. २५ जून, २०२०** **वार – गुरुवार**

**ठळक बातम्या**

पशुसंवर्धनासाठी ५ हजार कोटींचा निधी

१ हजार ५४० सहकारी बँकांवर रिझर्व बँकेची नजर

सामाजिक – आर्थिक उद्देशांसाठी अंतरिक्ष खुले होणार

राज्यात मका खरेदीला मुदतवाढ

पेरणीची तयारी करून बसलेल्या बळीराजाला पावसाची प्रतीक्षा

-------------------------------------------

**मंत्रिमंडळाची बैठक –**

पशुसंवर्धन, दुग्धउत्पादन तसेच पशुधनासंबंधी उपक्रमांच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी ५ हजार कोटी रुपयांचा निधी स्थापन करण्याचा निर्णय काल झालेल्या राज्यमंत्रिमंडळांच्या बैठकीत घेण्यात आला. या योजनेअंतर्गत पशुसंवर्धन क्षेत्रात उद्योग उभारणीसाठी ९० टक्के कर्ज बँकांकडून देण्यात येईल यातून राज्यात दोन लाख युवकांना रोजगार मिळेल असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

१ हजार ५४० शहरी आणि बहुराज्यीय बँकांना रिझर्व बँकेच्या निगराणीखाली आणण्यासाठीचा अध्यादेश जारी करण्यात येईल, असे माहिती आणि प्रसारण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी सांगितले. यामुळे बॅकांच्या खातेदारांना वित्तीय सुरक्षिततेची हमी मिळेल, असेही ते म्हणाले.

सामाजिक आर्थिक उद्देशांसाठी अवकाश आणि अणुऊर्जा संशोधनाचा वापर कसा करता येईल याबाबत अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन आणि प्राधिकरण केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती जावडेकर यांनी दिली.

**मका खरेदी**

किमान आधारभूत किंमत भरडधान्य योजनेअंतर्गत मका खरेदीला केंद्र शासनाने १५ जुलै पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्याचबरोबर नऊ लाख क्विंटल मका खरेदीला परवानगी दिली आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी ही माहिती दिली.

**भारत – चीन सीमा**

भारत –चीन सीमाप्रश्नाच्या पार्श्वभूमीवर पूर्व लडाख भागातील परिस्थितीचा दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी काल झालेल्या १५ व्या बैठकीत आढावा घेतला. हा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवला जाईल अशी ग्वाही दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी दिली.दोन्ही देशांनी प्रत्यक्ष ताबारेषेचा आदर करावा. पूर्व लडाख भागात चीन करत असलेली घुसखोरी आणि गलवान खोऱ्यात गेल्या १५ तारखेला झालेल्या चकमकीबाबत भारतीय प्रतिनिधींनी चिंता व्यक्त केली.

**आय.सी.एस.ई.**

कोरानाच्या वाढत्या संसर्गामुळे आयसीएसई अर्थात भारतीय शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या प्रलंबित परीक्षा घेऊ शकत नाही, असे राज्य सरकारने काल मुंबई उच्च न्यायालयात सांगितलं. या संदर्भात उच्च न्यायालयात दाखल एका याचिकेच्या सुनावणी दरम्यान राज्य सरकारच्या वतीने महाभिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

**पुरस्कार**

राज्य सरकारचा सन २०१९–२० या वर्षीचा संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ गायिका आणि अभिनेत्री मधुवंती दांडेकर यांना जाहीर झाला आहे. ५ लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**हवामान**

मान्सून काल अपेक्षेप्रमाणे उत्तरेत आणखी पुढे सरकला. पण अजून तो पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि राजस्थानात पोहचायचा आहे. सध्या उत्तरेत सक्रिय असलेला मान्सून राज्यात मात्र काहीसा दुबळा झाला आहे. काल कोकणात अनेक, विदर्भात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस झाला. आज कोकणात तर विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचे प्रादेशिक बातमीपत्र संपलं. यानंतर १० वाजून १० मिनिटांनी ऐका, कोरोना संकटाशी सुरू असलेल्या युद्धाच्या राज्यभरातील बातम्या 'कोरोना महाराष्ट्र' या विशेष बातमीपत्रात, 'तुम्ही मात्र घरीच रहा.सुरक्षित रहा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत रहा आकाशवाणी.

आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमांसाठी वरीलप्रमाणे संहितालेखन केले जाते. आकाशवाणीवर करिअरच्या अनेक संधी आहेत. त्या आपण आपल्या कौशल्यावर त्या संधी प्राप्त करू शकतो.

## क) चित्रवाणी

समाजमाध्यमांच्या उदयानंतर सर्वाधिक वेगाने माहिती पुरवणारे माध्यम म्हणून ते पुढे आले. परंतु असे असले तरी दूरचित्रवाणीचे आजही महत्त्व आहे. जागतिक घडामोडी तुमच्या दिवाणखान्यात पोहचवण्याचे काम चित्रवाणीच्या माध्यमातून होते. विविध मराठी हिंदी वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून केवळ रिमोटचे एक बटन दाबत तुम्ही जगभरातील घडामोडी जाणून घेऊ शकता. या क्षेत्राची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. अनेकांना या क्षेत्रात आपले करिअर करण्याची इच्छा आहे. वाढत चाललेली वृत्तपत्रविद्या विभागाची संख्या त्याचेच प्रतीक आहे. सर्वसाधारणपणे चित्रवाणी म्हटले की निवेदक, वार्ताहर आणि कॅमेरामन अर्थात छायाचित्रकार हे तीनच घटक समोर येतात. पण चित्रवाणीच्या माध्यमातून तुमच्यापुढे बातमी सादर करण्यामागे अनेक हात असतात आणि त्यातच अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. चित्रवाणीचा विचार केला तर निवेदक/ सूत्रधार, ॲनिमेटर, ऑडिओ इंजिनिअर, कॅमेरामन, क्रिएटिव्ह डायरेक्टर, व्हिडिओ एडिटर्स, पॅनल प्रोड्युसर, इलेक्ट्रिशिअन, जर्नालिस्ट, लाइटमेन, मार्केटिंग पीपल, म्युझिशिअन, न्यूजकास्टर्स, ऑनलाइन एडिटर, ऑनएअर प्रमोटर, प्रोडयुसर प्रोग्राम डेव्हलपर, साऊंड मेन, स्पेशल इफेक्ट एडिटर, टी. व्ही. न्यूज रिपोर्टर, टेक्निकल वर्कर इत्यादींची आवश्यकता असते. त्यासाठी त्या त्या क्षेत्रातले ज्ञान आवश्यक असते. चित्रवाणीमध्ये काम करणे आज ग्लॅमरस मानले जाते. सर्वात आधी आणि अचूक माहिती देण्याची स्पर्धा सध्या चित्रवाणीमध्ये वाढली आहे. वाढत्या वृत्तवाहिन्यांची संख्या आणि त्यात टिकून राहण्याच्या स्पर्धेमुळे ते आवश्यकही झालेले आहे. साहजिकच चित्रवाणीमध्ये करिअर करायचे असेल तर टिकून राहण्याचा तणाव सहन करत अचूक माहिती देत सर्वोत्कृष्ट सादरीकरण जमणे आवश्यक आहे.

चित्रवाणीकडे आजही सर्वाधिक परिणामकारक माध्यम म्हणून पाहिले जाते. त्यामुळे दूरचित्रवाणीमध्ये दर्जेदार सादरीकरणाला खूप महत्त्व आहे. या सादरीकरणात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मुद्रित माध्यमामध्ये वापरली जाणारी भाषा ही प्रमाणलेखनाला अनुसरण असते. दूरचित्रवाणीमध्ये मात्र ती प्रमाणभाषेपेक्षा बोलीभाषेकडे झुकणारी म्हणजेच ऐकण्याच्या क्षमतेचा विचार करून वापरलेली असते. मुद्रित माध्यमांमध्ये आलंकारिक भाषा वापरायला मुभा असते. चित्रवाणीमध्ये अशी भाषा वापरली तर निवेदकाला संवाद साधताना अडचण येऊ शकतेच परंतु ती प्रेक्षकाला समजणे अवघड होते. मुद्रित माध्यमामध्ये वाचकाला ते परत वाचण्याची संधी मिळत असते आणि त्यामुळे एखादा शब्द समजला नाही तर वाचक तो परत वाचू शकतो. परंतु  चित्रवाणी मध्ये प्रेक्षकांना परत ऐकण्याची संधी नसते. त्यामुळे निवेदकाला जे सांगायचे आहे ते अगदी स्पष्ट असावे लागते. त्यात शब्दांची गुंतागुंत, आलंकारिक शब्दप्रयोग कटाक्षाने टाळत घटना वाचण्यापेक्षा ती सांगतोय याकडे लक्ष द्यावे लागते. मुद्रित माध्यमामध्ये वाक्य खूप मोठे असले तरी वाचकाला ते समजू शकते.

उदाहरणार्थ : – मुद्रित माध्यमांमध्ये परीक्षेबाबत बातमी खालील पद्धतीने लिहिली जाते.

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) सूचनेनंतर अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची भूमिका राज्य सरकारने कायम ठेवली असताना देशभरातील जवळपास ७० टक्के विद्यापीठे परीक्षांबाबत सकारात्मक असल्याचे स्पष्ट झाले असून अनेक विद्यापीठे परीक्षेचे नियोजन करत आहेत.**

पण हीच बातमी चित्रवाणीसाठी लिहायची असेल तर एवढे मोठे वाक्य वाचताना निवेदकाला दम तर लागेलच पण प्रेक्षकांना ते समजणे अवघड होईल. हीच बातमी चित्रवाणीमध्ये लिहायची झाल्यास त्यात वाक्ये छोटी असावी लागतात.

**युजीसीच्या सूचनेनंतरही अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्यावर राज्य सरकार ठाम आहे. पण असं असलं तरी देशभरातलं चित्र मात्र वेगळं आहे. देशातल्या ७० टक्के विद्यापीठांनी परीक्षा घेण्याची तयारी दाखवलीय. त्या साठी नियोजन ही सुरू आहे.**

चित्रवाणी म्हणजेच इलेक्ट्रॉनिक मीडियासाठी स्वतःची अशी ठोकताळे असलेली भाषा नाही, परंतु त्याची एक वेगळी शैली मात्र आहे. चित्रवाणी मध्ये लेखन करीत असताना अनेक गोष्टींचा विचार करणे गरजेचे असते. मुळात चित्रवाणी हे दृक्-श्राव्य माध्यम आहे. त्यामुळे इथे भाषेपेक्षा दृश्यांना अधिक महत्त्व असते. दृश्ये ही शब्दांपेक्षा हजारो पटीने संवाद साधतात. त्यामुळे चित्रवाणीच्या भाषेचा विचार करताना दृश्य आणि आवाज प्रेक्षकांशी एकत्रित संवाद साधत असतात हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर एखाद्या शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाची बातमी द्यायची असेल तर त्यामध्ये निवेदकाने खूप न बोलता केवळ **पंडित भीमसेन जोशी यांच्या स्वर्गीय स्वराने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले** अशा पद्धतीची संवादीय भाषा निवेदकाला वापरावी लागत असते. पंडित भीमसेन जोशी यांचे गायन दृश्याच्या स्वरूपात पाहताना त्याला खूप सांगण्याची गरज पडत नाही. दूरचित्रवाणीला भाषा कशी असावी हा प्रश्न खरे तर अत्यंत जटिल आहे. परंतु जी भाषा वापरली जाते ती प्रेक्षकांना समजणारी असावी हे एकच तत्त्व लक्षात ठेवणे गरजेचे आहे. जी भाषा दूरचित्रवाणीमध्ये वापरली जाते, त्यातले शब्द जर प्रेक्षकांना कळणारे नसतील तर ती भाषा संवाद साधण्यासाठी अयोग्य आहे, असा साधा सरळ अर्थ आहे. दूरचित्रवाणीमध्ये संवाद साधताना इंग्रजी शब्द असावेत का, कोणते शब्द वापरावेत याबाबत वेगवेगळ्या पातळ्यांवर वादविवाद होत आहेत, होत राहतील. परंतु ज्या भाषेचा वापर करून तुम्ही प्रेक्षकांशी संवाद साधताय, ती भाषा प्रेक्षकांना समजली तर संवाद साधणाऱ्यातले आणि पाहणाऱ्यातले अंतर मिटते. दूरचित्रवाणीला साचेबद्ध भाषा नसली तरी ती बोलीभाषेकडे झुकणारी भाषा असते. ती साधी, प्रवाही आणि पाहणाऱ्यांशी थेट संवाद साधणारी भाषा असते. प्रेक्षकांशी संवाद साधणारी हीच भाषा बातम्यांचे निवेदन करताना किंवा इतर कोणत्याही कार्यक्रमाचे निवेदन करताना गरजेची असते.

**दूरचित्रवाणीसाठी लिहीत असताना ...**

१. तुम्ही घटना सांगताय.

२. तुम्ही मोठ्या प्रेक्षकवर्गासाठी लिहिताय.

३. परत सांगण्याची संधी नाही.

४. गुंतागुंतीची वाक्य टाळणे.

५. शुद्ध परंतु साधी भाषा.

या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे...!

दूरचित्रवाणीमध्ये बातम्यांबरोबरच विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले जाते. त्यामुळे प्रत्येक वेळी संवादाची भाषा बदलत असते; परंतु शैली मात्र साधी, प्रवाही अशीच असते. पडदा आणि प्रेक्षक यांच्यात संवाद साधण्याचे काम निवेदक करत असतो. त्यामुळे निवेदकाला जेवढे भाषेकडे लक्ष द्यावे लागते तेवढेच त्याला इतरही गोष्टींची माहिती असावी लागते. चित्रवाणीमध्ये निवेदन करताना निवेदकाला अधिक सतर्क आणि अभ्यासू रहावे लागते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे हे सादरीकरण पत्रकारितेच्या पार्श्वभूमीवर असल्याने त्या अनुषंगाने त्याची तयारी आणि अभ्यास असावा लागतो.

**निवेदन**

चित्रवाणीमध्ये वार्ताहर, व्हिडिओ एडिटर आणि बातमीवर कष्ट केलेल्या प्रत्येकाचे काम यशस्वी किंवा अयशस्वी होण्याची संपूर्ण जबाबदारी निवेदकावर असते. निवेदक सांगतोय हे जर प्रेक्षकांना खरे वाटत नसेल तर संपूर्ण कष्ट वाया जातात. अर्थात चांगले निवेदक होण्यासाठी चांगले दिसणे, चांगले सादरीकरण करण्याची क्षमता या बरोबरच अधिकार, विश्वासार्हता, स्पष्टता, चांगले व्यक्तिमत्त्व आणि चांगला आवाज असे एकत्रित गुणांचे व्यक्तिमत्त्व गरजेचे असते. एक चांगला निवेदक व्हायचे असेल तर निवेदकाची विश्वासार्हता खूप महत्त्वाची असते. तुम्ही जी बातमी किंवा माहिती सांगताय त्यावर प्रेक्षकांचा विश्वास बसणे आवश्यक असते. त्यासाठी निवेदकाला निवेदनाबरोबरच पत्रकारितेचे ज्ञान असणे गरजेचे असते. निवेदन करताना काही चुका झाल्या की विश्वासार्हता कमी व्हायला वेळ लागत नाही. बातमी सांगत असताना निवेदकाला सादरीकरणावर विशेष लक्ष द्यावे लागते. त्याचबरोबर पडद्यावर तुम्ही कसे दिसणार याकडे लक्ष द्यावे लागते. चुकीची केशरचना, विचित्र कपडे निवेदकाने घातले तर प्रेक्षक बातम्या ऐकण्याऐवजी निवेदकाकडे अधिक लक्ष देऊ शकतात आणि बातमी हा मुख्य घटक बाजूला पडू शकतो. चांगल्या सादरीकरणासाठी बातमी किंवा माहिती व्यवस्थित लिहिलेली असणे गरजेचे असते आणि ती बातमी निवेदकाने योग्य पद्धतीने वाचलेली असावी लागते. निवेदकाने एकप्रकारे प्रेक्षकांशी नाते बनवावे लागते. निवेदक आणि प्रेक्षक हे दोन्ही सामान पातळीवर समाधानी व्हावे लागतात. निवेदकाला बातमी जिवंत करावी लागते, शब्द जिवंत करता यावे लागतात. कोणत्या शब्दावर भर द्यायचा, भावनेवर नियंत्रण ठेवत पण शब्दांवर जोर देत प्रेक्षकाला जखडून ठेवण्याची कला निवेदकाला साधता यावी लागते. अर्थात त्यासाठी बातमी किंवा माहिती ही त्या पद्धतीने लिहली गेलेली असावी लागते.

**निवेदकाचे गुण**

**१. विषयाची समज :** निवेदकाला निवेदन करताना ज्या विषयावर कार्यक्रम सादर केला जातोय त्या विषयाचे सखोल ज्ञान असणे गरजेचे असते. त्या विषयाला अनुसरून इतिहास, त्या घटनेशी संबंधित प्रत्येक बारकावे, त्या संबंधी असलेली नावे या सर्व गोष्टींची माहिती त्याला असणे गरजेचे असते. हा सर्व अभ्यास सुसूत्र पद्धतीने प्रेक्षकांच्या आकलन क्षमतेला लक्षात घेऊन सादर करण्याचे कसब निवेदकाकडे असावे लागते.

**२. अचूकता :** बातमी सांगणे असो किंवा एखादा माहितीपर कार्यक्रम. निवेदकाने अचूक माहिती पुरवणे अत्यंत गरजेचे असते. अर्थात निवेदकाला बऱ्याच वेळी ही माहिती किंवा बातमी त्या त्या

कार्यक्रमाच्या किंवा बातमीपत्राच्या निर्मात्यांकडून दिली जाते. मात्र जर निवेदकाचा स्वतःचा अभ्यास असेल तर दिली जाणारी माहिती किती सत्य आणि किती अचूक आहे हे तो त्याच्या पातळीवर ठरवून त्याचे सादरीकरण करू शकतो.

**३. संवाद आणि भाषाकौशल्य :** चित्रवाणीमध्ये प्रेक्षक दृश्य आणि ध्वनी या दोन्ही गोष्टी एकाच वेळी पाहत असतो, त्यामुळे त्यांला निवेदक हा त्यांच्याशी संवाद साधतोय असे वाटत असते. म्हणूनच निवेदकाचे संवादकौशल्य उत्तम असावे लागते. निवेदकाचा आत्मविश्वास, त्याला अचूक शब्दांची जोड या सर्वांचा एकत्रित परिणाम प्रेक्षकांवर होत असतो. चुकीच्या शब्दांची, क्लिष्ट वाक्यांची निवेदकाने निवड केली तर प्रेक्षकाला ते समजतही नाही आणि त्यांना निवेदक त्यांच्याशी संवाद साधतोय याची जाणीवही होत नाही. म्हणून चित्रवाणीवर निवेदन करताना संवाद खूप महत्त्वाचा असतो.

**बातमीलेखन**

चित्रवाणी हे दृक्श्राव्य माध्यम असल्याने इथे शब्दांना खूप मर्यादा असतात. अपवादात्मक परिस्थिती सोडली तर कोणतीही बातमी एक ते दीड मिनिटांच्या वर नसते. बातमीसाठी आवश्यक फाईव्ह डब्लू आणि १ एच म्हणजेच who, what, when, where, why आणि how हे सर्व या मिनिट दीड मिनिटात सांगणे गरजेचे असते. त्यामुळे चित्रवाणीमध्ये बातमीतील प्रत्येक शब्द निवडताना त्याची किती गरज आहे, का आहे याचा विचार करावा लागतो. चित्रवाणीमध्ये तुम्हाला दृश्ये दाखवता येत असतात. त्याचा आधार घेत लेखन करावे लागते. विविध रंगांच्या गुलाबांच्या प्रदर्शनाची बातमी चित्रवाणीवर दाखवायची असेल तर हा पिवळा, हा पांढरा किंवा इतर कोणत्या रंगाचा गुलाब हे सांगण्याची गरज नाही. परंतु ही बातमी दूरचित्रवाणीसाठी लिहिताना, **हे रंगबेरंगी गुलाब पाहताना नागरिकांना त्यांची छबी मोबाईलमध्ये टिपण्याचा मोह आवरला नाही** असे लिहिले आणि निवेदकाने तेवढ्याच कलात्मक पद्धतीने सांगितले तर त्याचा परिणाम अधिक होतो. दूरचित्रवाणीसाठी लेखन करताना तुमच्याकडे दृश्यं कोणती आहेत याचा विचार प्रथम करावा लागतो. उदाहरणच द्यायचे झाले तर एखादी महापालिका दृश्यात दिसत असेल तर त्यावर शब्द वाया न घालवता तिथे काय काय होणार याची माहिती देणे आवश्यक असते. दूरचित्रवाणीमध्ये तीन प्रकारच्या बातम्यांचे सादरीकरण होते.

अँकर व्हिज्युअल (av), अँकर व्हिज्युअल बाईट (avb) आणि पॅकेज स्टोरी. अँकर व्हिज्युअल बातमीमध्ये निवेदक बातमी सांगत असताना दृश्यं दिसत असतात.

उदाहरणार्थ

**Anchor : आता एक दिलासादायक बातमी... मुंबईमध्ये कोरोनाबाधित दीड महिन्याच्या बाळाला आणि त्याच्या चार वर्षाच्या मोठ्या भावास उपचारानंतर सुखरूप घरी सोडण्यात आलंय. बाळाला ताप आल्यामुळं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांची चाचणी घेतली असता त्यांना कोरोनाची लागण झाल्याचं स्पष्ट झालं. मात्र उपचारानंतर त्यांनी कोरोनावर मात केली.**

ही बातमी निवेदक वाचत असताना मुले घरी जात असतानाची दृश्यं दिसतात.

अँकर व्हिज्युअल बाईट (avb) बातमीमध्ये निवेदक बातमी सांगत असताना स्क्रीनवर दृश्य दिसत असते तर त्याचवेळी त्या घटनेशी संबंधित व्यक्ती काही बोलली असेल तर तिचे बोलणे (बाईट) दाखवले जाते.

उदाहरणार्थ

**Anchor : …. आषाढी वारी संदर्भात दुपारी बैठक आहे, वारीची खूप मोठी परंपरा आहे, त्या मागे लोकभावना आहेत, या सगळ्यांचा विचार करूनच याबाबत निर्णय घेतला जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. पुण्यामध्ये पिंपळे सौदागर इथल्या उड्डाणपुलाचे अजित पवार यांच्या हस्ते उदघाटन झाले. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. मजुरांना रेल्वे पाठवण्याच्या मुद्द्यावरून केंद्र आणि राज्य सरकारमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू असल्याबाबत विचारले असता, केंद्र सरकार काय करतंय, राज्य सरकार काय करतंय, महापालिका काय करते यात मला पडायचे नसल्याचे सांगत, कोरोना संकट मोठे आहे, तो महत्त्वाचा प्रश्न असल्याचे म्हणत टीका करण्याचे टाळले. राज्यात विरोधक सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याच्या प्रश्नावरही त्यांनी थेट टीका करण्याचे टाळले. त्याची फिकीर नाही, लोकांना संकटातून बाहेर काढणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले… (बाईट) – अजित पवार, उपमुख्यमंत्री**

पॅकेज स्टोरीमध्ये सुरुवातीला तुमच्या बातमीची ओळख स्वरूपात माहिती निवेदक देतो. त्यानंतर साधारणतः दीड मिनिट कथा कथन केल्याप्रमाणे बातमीचे सादरीकरण केले जाते. त्यात व्हाईस ओव्हर + बाईट + व्हॉइस ओव्हर +बाईट + व्हॉइस ओव्हर + रिपोर्टर कॅन्क्लुजन अशा स्वरूपात बातमीचे सादरीकरण केले जाते.

उदाहरणार्थ

**Anchor :- …. पिंपरी चिंचवडमधीय लघुउद्योग सुरू करण्यासाठी अखेर परवानगी मिळालीय. त्यामुळे गेले दीड महिन्याहून अधिक काळ औद्योगिक नगरीचे थांबलेले उद्योग चक्र पुन्हा सुरू होणार आहे… पण त्यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियम पाळावे लागणार आहेत…**

**वि ओ –** (Voice over).... **कोरोना संकटादरम्यान सुरुवातीपासूनच पिंपरी चिंचवड रेडझोनमध्ये असल्याने औद्योगिक नगरीतले सर्वच उद्योग बंद करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातल्या उद्योगांना परवानगी मिळाली होती. पण रेडझोन असल्याने पिंपरी चिंचवड मधले उद्योग बंद होते. ज्या कंपन्यांवर शहरातील लघु उद्योग टिकला होता त्या मोठ्या कंपन्या सुरू झाल्याने शहरातील कंपन्या सुरू करण्याची मागणी सातत्याने होत होती. लघु उद्योग सुरू झाले नाही तर ते बंद पडण्याचा धोका होता. पण अखेर राज्य सरकारने रेडझोनमध्ये येत असलेल्या पिंपरी चिंचवड मधल्या उद्योगांना सुरू करण्याची परवानगी दिलीय. अर्थात त्याला अनेक नियम लागू करण्यात आले आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे केवळ ३३ टक्के कर्मचारी ठेवणे, रेडझोनमधला कर्मचारी किंवा मालक ही कंपनी सुरू करू शकणार नाही. अशा विविध अटी ठेवण्यात आल्या आहेत. अर्थात या निर्णयाचे लघु उद्योग संघटनेकडून स्वागत करण्यात आले आहे.**

**बाईट – संदीप बेलसरे, अध्यक्ष, लघु उद्योग संघटना**

**वि ओ : तर पालिका प्रशासनाने कंपन्यांनी सर्व नियमांचे पालन करावे अशा सूचना दिल्या आहेत..**

**बाईट : श्रावण हर्डीकर, आयुक्त**

**वि ओ : – ....ज्या लघु उद्योगांमुळे पिंपरी चिंचवडची ओळख कामगारनगरी झालीय, त्याच शहरात उद्योग बंद झाल्याने मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते. पण आता कंपन्या सुरू होत असल्याने व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केलंय. पण जरी उद्योग सुरू होत असले तरी कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक कंपनी प्रशासनाने नियमांची आणि कामगारांची काळजी घ्यावी हीच अपेक्षा.. (वार्ताहर)**

अर्थात प्रत्येक वेळी बातमी याच पद्धतीने लिहिली जाईल असे नाही. पालखी सोहळा किंवा दीपावली, होळीसारख्या उत्सवात शब्दांपेक्षा दृश्यांवर भर दिला जातो आणि त्याआधारे बातमी लिहिली जाते.

दिवाळीमध्ये दीपोत्सवाची बातमी असेल तर त्यात दृश्यंच इतकी बोलकी असतात की त्यात जास्त वर्णन करण्याची गरजच पडत नाही. अगदी थोडक्या शब्दात त्याचे वर्णन करता येऊ शकते.

**दिवाळीला 'लख लख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' असं का म्हणतात याचा अनुभव पुणेकरांनी घेतला..! शहरात आज दिवाळी पाडव्याच्या निमित्तानं विविध ठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात आलं. शनिवारवाड्यावरही हजारो दिवे लावत दीपोत्सव साजरा करण्यात आला..! हजारो दिव्यांनी शनिवारवाडा प्रकाशमय झाला....!**

पालखी प्रस्थानाची बातमी असेल तर त्यात ही दृश्यं अधिक बोलकी असतात.

**आज दुपारच्या सुमाराला विठू नामाच्या गजरात जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान केलं. प्रस्थान सोहळ्यासाठी राज्यातल्या कानाकोपऱ्यातून लाखो वैष्णव देहू नगरीत दाखल झाले. यावेळी टाळमृदंग आणि विठू नामाच्या गजराने वातावरण भारून गेले.**

चित्रवाणीमध्ये या तीन पद्धतीने बातमी सादर केली जात असली तरी अलीकडच्या काळात **वॉल्कथ्रू** आणि **चौपाल** या दोन पद्धतीत ही बातम्या सादर केल्या जातात.

**वॉल्क थ्रू म्हणजे एखाद्या घटनेचे वार्ताहराने केलेले वर्णन.**

उदाहरणार्थ : – पुण्याच्या मानाच्या कसबा गणपतीची विसर्जन मिरवणूक असेल तर निवेदक केवळ जुजबी माहिती देतो आणि संपूर्ण घटनाक्रम वार्ताहराच्या तोंडून वर्णन करायला लावला जातो. जसे : **पुण्यात मानाच्या पहिला कसबा गणपतीच्या मिरवणुकीला सुरुवात झालेली आहे. या मिरवणुकीत नेमका कसा** उत्साह आहे हे सांगत आहेत आमचे प्रतिनिधी अबक

या नंतर वार्ताहर मिरवणुकीचे वर्णन करत असताना कॅमेरामन वर्णनानुसार दृश्य दाखवतो.

**चौपाल म्हणजे एखाद्या घटनेनंतर सर्वसाधारणपणे त्या क्षेत्राशी निगडित व्यक्तींच्या समूहाशी वार्ताहर चर्चा करतो.**

उदाहरणार्थ : कोरोना पार्श्वभूमीवर एमपीएससी च्या परीक्षा रद्द करायचा निर्णय घेतला असेल तर निवेदक त्यावर स्वतः जास्त चर्चा न करता त्या क्षेत्राशी निगडित व्यक्तींना म्हणजेच शिक्षक, विद्यार्थी यांच्या नेमक्या प्रतिक्रिया काय आहेत हे वार्ताहराकडून जाणून प्रेक्षकांना सादर केल्या जातात जसे. **आज राज्य सरकारने एमपीएससीच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतलाय, हा निर्णय योग्य की अयोग्य याबाबत शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या भावना जाणून घेतल्या आहेत आमचे प्रतिनिधी अ ब क यांनी ..या नंतर वार्ताहर थेट प्रतिक्रिया घेतो.**

चित्रवाणीमध्ये बातमीबरोबरच अनेक कार्यक्रम सादर केले जातात. अर्थात ते बातम्यांच्या स्वरूपात नसले तरी कार्यक्रमाची आखणी करताना दृश्य माध्यमाची गरज लक्षात घेऊन त्यांचे लिखाण करावे लागते. बहुतांश वेळा चित्रवाणीवर कार्यक्रम त्या त्या कालावधीत घडणाऱ्या घटनांवर आधारित असतात. परंतु मनोरंजन, आरोग्य, क्रीडा कार्यक्रम दररोज असतात. साहित्य संमेलन, वारी, फुटबॉल/ क्रिकेट वर्ल्डकप, ऑलिंम्पिक या दरम्यान त्या संबंधीचे विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. भूकंप, युद्ध किंवा नैसर्गिक आपत्ती दरम्यानही विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. अर्थात त्यात बहुतांश वेळा हे कार्यक्रम चर्चात्मक स्वरूपाचे असतात. या सर्व कार्यक्रमांची आखणी अर्थातच प्रेक्षक समोर ठेवून केली जाते.

चित्रवाणीमध्ये बातम्यांबरोबर सर्वाधिक कार्यक्रम हे चर्चात्मक असतात. प्रत्येक वाहिनीवर प्राईम टाइममध्ये या कार्यक्रमांचे सादरीकरण होते. 'झी २४, तासवरील 'रोखठोक', 'एबीपी माझा' वरील 'माझा विशेष', 'न्यूज १८ लोकमत' वरील 'बेधडक' हे चर्चात्मक कार्यक्रम असतात. साधारणपणे त्या त्या दिवशीची जी महत्त्वाची घटना असेल त्या विषयावर या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. उदाहरण द्यायचे झाले तर कोरोना काळात परीक्षा घ्यायच्या की नाही याबाबत वाद सुरू असताना त्या विषयीचा चर्चेचा कार्यक्रम घेतला जातो. हा कार्यक्रम सादर करताना सुरुवातीला नेमका वाद काय आहे, समर्थक आणि विरोधक यांच्या भूमिका सादर केल्या जातात. हे विवेचन बातमीच्या स्वरूपात न देता माहितीच्या स्वरूपात दिले जाते. त्यानंतर निवेदक या विषयातील तज्ज्ञ, विरोधक, समर्थक, तटस्थ विचारवंत आणि सरकारी प्रतिनिधी यांच्या सोबत प्रश्नोत्तर, आरोप प्रत्यारोप. या माध्यमातून चर्चा करतो. याच पद्धतीने राजकीय, सामाजिक, आपत्ती, नैसर्गिक संकट यांसारख्या विषयांवर हे चर्चात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात.

हे चर्चात्मक कार्यक्रम बहुतांश वाहिन्यांवर दररोज असतात. पण दूरचित्रवाणी मध्ये विविध कालखंडात येणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण घटनांच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रम आखले जातात. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जडणघडणीत वारीचे विशेष महत्त्व असते. त्यामुळे जवळपास सर्वच वाहिन्यांवर वारीमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. बहुतांश कार्यक्रमाची आखणी ही वारीचे नेमके महत्त्व आणि त्या त्या दिवशीच्या दिनक्रमावर अवलंबून असतात. त्यासाठी निवेदकाबरोबर वारी अभ्यासक, भजन, कीर्तन गायक यांनाही या कार्यक्रमात सहभागी करून घेतले जाते. अभ्यासक वारीचे महत्त्व पटवून देतो, गायक त्या त्या प्रसंगाला अनुरूप गीत सादर करतो. असे सर्वसाधारण स्वरूप या कार्यक्रमाचे असते. अर्थात हा कार्यक्रम सादर करत असताना निवेदकाला वारी परंपरा काय, महत्त्व काय याची माहिती असणे आवश्यक असते. तरच तो योग्य पद्धतीने उलगडा करू शकतो. साहित्य संमेलन काळातही जवळपास सर्वच वाहिन्यांवर विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यातही साहित्य अभ्यासक, साहित्यिक यांचा समावेश असतो. अध्यक्ष निवडीचा वाद झाला असेल तर पूर्वी कसे वाद झाले होते, काय घटना घडल्या होत्या याची डॉक्युमेंट्री पद्धतीने माहिती या कार्यक्रमामध्ये सादर केली जाते. त्यानंतर त्या क्षेत्राशी निगडित व्यक्तींशी चर्चा करत प्रेक्षकांपुढे तो विषय उलगडत सादर केला जातो. साहित्य संमेलनातील विविध कार्यक्रम, कविता वाचन, चर्चासत्र, त्यातील गाजलेले मुद्दे यावर तज्ज्ञ लोकांशी चर्चा करत प्रेक्षकांना तो समजवण्याचा प्रयत्न केला जातो. सर्वसाधारणपणे अशा कार्यक्रमामध्ये साहित्याची जाण असलेला निवेदक असतो किंवा कधी कधी एखादा साहित्यिकच निवेदक म्हणून कार्यक्रमाचे सादरीकरण करतो. फुटबॉल/ क्रिकेट वर्ल्डकप, ऑलिम्पिक किंवा महत्त्वपूर्ण क्रीडा स्पर्धा, त्या दरम्यान ही बहुतांश वाहिन्यांवर विशेष कार्यक्रम सादर केले जातात. त्यातही

डॉक्युमेंट्री पद्धतीनेच सादरीकरण केले जाते. त्यानंतर तज्ज्ञांशी चर्चा करत प्रेक्षकांना ते सादर केले जाते. युवकांसाठी चित्रवाणीवर विशेष कार्यक्रम तसे अभावानेच पाहायला मिळतात. परंतु, दहावी बारावी परीक्षा किंवा करिअरविषयक कार्यक्रम वाहिन्यांवर सादर केले जातात. त्यात ही तज्ज्ञांकडून करिअरच्या संधी काय याचे मार्गदर्शन केले जाते. चित्रवाणीवर असे विविध कार्यक्रम सादर केले जात असले तरी बातम्या हाच इथला मुख्य घटक असतो. त्यामुळे साहजिकच त्यावर अधिक भर दिला जातो. आणि त्याच्या सादरीकरणासाठी निवेदन आणि भाषा याच सर्वाधिक महत्त्वपूर्ण असतात.

दूरचित्रवाणीमध्ये साहित्य, युवा आणि मनोरंजनविषयक कार्यक्रमांचा समावेश असतो. या कार्यक्रमांसाठी संहिता लेखन करताना ते दृकश्राव्य माध्यम आहे, याचा विचार करावा लागतो. दूरचित्रवाणी माध्यमामध्ये कोणतेही लेखन असो, ते बोलीभाषेत व प्रेक्षकांशी संवाद साधणारे असावे लागते. म्हणजेच ज्या पद्धतीने तुम्ही दृक्श्राव्य माध्यमात बातमी लिहीत असता, त्याचपद्धतीने साहित्यविषयक, युवा, मनोरंजन- या संबंधी लेखन करताना तेच ठोकताळे गृहीत धरावे लागतात.

## १.४ समारोप

प्रसारमाध्यमांचे मुद्रित माध्यमे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे असे प्रकार पडतात. मुद्रित माध्यमांमध्ये वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके वगैरे छापील माध्यमांचा समावेश होतो. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये आकाशवाणी व चित्रवाणी यांचा अंतर्भाव होतो. जनसंवादासाठी वापरण्यात येणाऱ्या या सर्व माध्यमांना जनमाध्यमे म्हणतात. वृत्तपत्रासारख्या मुद्रितमाध्यमामध्ये बातमीलेखन, संपादन, स्तंभलेखन, जाहिरातलेखन अशा रोजगाराच्या विपुल संधी आहेत. त्यासाठीची भाषिक कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक आहे. शब्दांकन व मानपत्रलेखन हेही एक भाषिक कौशल्याचे क्षेत्र आहे. आकाशवाणी व चित्रवाणीवरील कार्यक्रमांचे स्वरूप वैविध्यपूर्ण असते. आकाशवाणी हे श्राव्य व चित्रवाणी हे दृकश्राव्य माध्यम असल्याने त्यांच्या कार्यक्रमांचे स्वरूप व त्यासाठीचे लेखन हे त्या माध्यमावरून निर्धारित होते. कार्यक्रमांचे निवेदन, कार्यक्रमासाठी संहितालेखन, बातमीलेखन, जाहिरातलेखन वगैरेंसाठी भाषिक कौशल्यांची नितांत आवश्यकता असते. माध्यमांमध्ये सातत्याने बदल होत असून त्यांचे पारंपरिक स्वरूप मागे पडत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा माध्यमांवर मोठा प्रभाव पडत आहे. त्यांचा आशय व अभिव्यक्तीचा चेहरा आमूलाग्र बदलत आहे. बदलत्या काळाचा वेध घेत माध्यमांमधील अर्थार्जनाच्या विविध संधींचा शोध घेत आवश्यक कौशल्ये संपादन करून करिअर करण्याचे एक मोठे क्षेत्र आपल्यासमोर खुले आहे. आपण आपल्या क्षमता व कौशल्यांमध्ये सकारात्मक बदल करून येणाऱ्या संधीचे सोने केले पाहिजे.

## १.५ प्रश्नोत्तरे

### अ) बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

१. जनसंवादासाठी वापरण्यात येणाऱ्या माध्यमांना काय म्हणतात?

अ) समाजमाध्यमे   ब) जनमाध्यमे   क)लोकमाध्यमे   ड) नवमाध्यमे

२. वृत्तपत्राकडे येणारा मजकूर तपासून तो निर्दोष, नेमका व प्रभावी करण्याच्या प्रक्रियेस काय म्हणतात?

अ) संपादन ब) स्तंभलेखन क) अग्रलेख ड) बातमीलेखन

३. एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे नेमक्या शब्दांत गौरव करण्याच्या लेखनप्रकारास काय म्हणतात?

अ) शब्दांकन ब) मुलाखत क) मानपत्र ड) चरित्रलेखन

४. एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून त्यांचे विचार, मनोगत शब्दबद्ध करण्याच्या लेखनप्रकारास काय म्हणतात?

अ) वृत्तांकन ब) शब्दांकन क) ब्लॉगलेखन ड) मानपत्र लेखन

५. विशिष्ट विषयावरील वास्तव, सत्य माहिती चित्रित करणाऱ्या कलाकृतीस काय म्हणतात?

अ) लघुपट ब) चरित्रपट क) रूपक ड) माहितीपट (डॉक्युमेंटरी)

**उत्तरे** –१. जनमाध्यमे २. संपादन ३. मानपत्र ४. शब्दांकन ५. माहितीपट (डॉक्युमेंटरी)

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. वृत्तपत्रासाठी बातमीलेखन करताना कोणती दक्षता घ्यावी?

२. तुमच्या महाविद्यालयातील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाची वृत्तपत्रासाठी बातमी तयार करा

३. तुमच्या आवडत्या कोणत्याही वस्तूची वृत्तपत्रासाठी जाहिरात तयार करा

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. कोणत्याही एका प्रसिद्ध व्यक्तीला समारंभपूर्वक देण्यासाठी मानपत्र तयार करा.

२. साहित्यिक/खेळाडू/शिक्षणतज्ज्ञ/सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी विशिष्ट विषयावर संवाद साधून त्याचे शब्दांकन करा.

३. आकाशवाणीच्या शैक्षणिक/ कृषिविषयक/ महिलाविषयक कार्यक्रमासाठी संहिता लिहा.

## १.६ सरावासाठी प्रश्न

**अ) लघुत्तरी प्रश्न**

१. स्तंभलेखनाचे स्वरूप सांगा

२. तुमच्या परिसरात घडलेल्या महत्त्वपूर्ण घटनेची आकाशवाणीसाठी बातमी तयार करा.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. आकाशवाणीवरील निवेदनाचे स्वरूप व पद्धती सांगा

२. चित्रवाणीच्या साहित्य/युवा/मनोरंजनविषयक कार्यक्रमाची संहिता तयार करा.

## १.७ उपक्रम

तुमच्या परिसरातील आकाशवाणी/चित्रवाणी/वृत्तपत्र यांच्या कार्यालयास भेट देऊन तेथील कार्यपद्धती जाणून घ्या.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. गजभिये जॉन, देशपांडे प्रकाश, धारुरकर वि.ल., पवार सुधाकर, येवलेकर अनंत: वृत्तपत्रविद्या व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (१९९३)

२. तळवळकर, गोविंद : बहर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई (१९९०)

३. डोळे, जयदेव : समाचार अर्थात प्रसारमाध्यमांची झाडाझडती, लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी, मुंबई (२००६)

४. डोंगरे अनिल, जोशी अरविंद, फटाले नागनाथ: वृत्तपत्रविद्या बातमी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (१९९३)

५. समानधर्मी: कॉलमकट्टा, माइंड अँड मीडिया, पुणे (२०१४),

६. आवटी गोपाळ : सृजन संवाद – भाग १ व २, भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

७. गवस राजन, शिंदे अरुण, पाटील गोमटेश्वर : भाषिक सर्जन आणि उपयोजन, दर्या प्रकाशन, पुणे, २०१२

८. Kumar, Keval J. : Mass Communication in India, Jaico Publishing House, Delhi (2012)

९. McQuail, Denis : Mass Communication Theory, Sage Pubication, New Delhi (2009)

१०. VANI- Culture your voice (2015) 11 edition published by staff training institute Prasar Bharati All India Radio, Kingsway camp, Delhi.

११. Handbook of Programme Personel (2015) published by National Academy of Broadcasting And Multimedia, Prasar Bharati, All India Radio, Kingsway camp, Delhi.

१२. M. Neelamlar– Radio Programme Production (2018) PHI Learning Private Limited, Delhi.


❑❑❑

# घटक – २
# उद्योग व सेवाक्षेत्रांतील अर्थार्जनाच्या संधी व भाषिक कौशल्ये

## २.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस

१. विद्यार्थ्यांना उद्योग व सेवा क्षेत्राचे बदलते स्वरूप, त्यामधील रोजगाराच्या संधी, त्यासाठी आवश्यक कौशल्ये व क्षमता यांची माहिती होईल.

२. अनुवादाची संकल्पना, स्वरूप, प्रकार व अनुवादाच्या क्षेत्रातील अर्थार्जनाच्या संधी यांची माहिती होईल.

३. मराठी टंकलेखन, युनिकोड व पीपीटी सादरीकरण यांचे उपयोजन करण्याचे कौशल्य प्राप्त होईल.

### अ) उद्योग व सेवाक्षेत्रातील संधी व भाषिक कौशल्ये

## २.२ प्रास्ताविक

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवनवीन शोधामुळे उद्योगक्षेत्र विस्तारत आहे. या उद्योग व सेवाक्षेत्रांत काम करताना भाषिक कौशल्ये हवीतच. भाषेशिवाय उद्योग व सेवाक्षेत्रांमध्ये काम करता येत नाही. प्रभावी संभाषण किंवा संप्रेषण आवश्यक असेल तरच उद्योजकाला यशस्वी होता येते. एखादी वस्तू किंवा सेवा विकली जाते तेव्हा 'संकल्पना' विकली जाते आणि संकल्पना विकण्यासाठी भाषिक कौशल्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. नजीकच्या पाच ते दहा वर्षामध्ये भाषिक कौशल्यांना अनन्यसाधारण महत्त्व येणार आहे. सर्व समाजमाध्यमे व समाजातील सर्व लाभार्थ्यांना वस्तू व सेवा पुरविण्यासाठी तसेच विक्री करण्यासाठी भाषिक कौशल्ये महत्त्वाची आहेत. प्रभावी भाषिक कौशल्ये ही उद्योग जगतातील मंत्र बनू लागली आहेत. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संभाषण साधण्यासाठी परिणामकारक भाषिक कौशल्ये असावी लागतात. प्रभावी भाषिक कौशल्यांमुळे रोजगार मिळतो. तसेच रोजगार निर्माण करता येतो. प्रादेशिक भाषेपासून आंतरराष्ट्रीय भाषेपर्यंत सर्वच भाषांद्वारे अर्थार्जन करता येते.

## २.३ विषय विवेचन

उद्योग व सेवाक्षेत्रांमध्ये भाषिक कौशल्यांचा वापर करून मोठ्या प्रमाणामध्ये अर्थार्जन करता येते. अर्थार्जन करणे व विपणन यांचा घनिष्ठ संबंध आहे. आणि यांमध्ये भाषिक कौशल्याला महत्त्वाचे स्थान असते. मानवाच्या विविध गरजा भागविण्यासाठी उद्योग व सेवाक्षेत्रांची आवश्यकता असते आणि यामध्ये 'भाषा' महत्त्वाची भूमिका बजावत असते. कोणत्याही उद्योगाचा व सेवेचा प्रधान हेतू हा उपभोग असतो. वस्तू व सेवांच्या विक्रीसाठी व वापरासाठी प्रभावी संप्रेषण/ संभाषण आवश्यक असते. ग्राहकांच्या गरजा भागविण्यासाठी, व्यवहार करण्यासाठी, आनुषंगिक कार्यासाठी भाषाविषयक कौशल्ये उपयोगी पडत असतात.

प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कामकाजासाठी भाषिक कौशल्ये मदत करत असतात. उत्पादन खरेदी व विक्री करण्यासाठी परिणामकारक भाषिक कौशल्यांचा वापर करावा लागतो. उत्पादन व सेवा निर्मितीसाठी विविध संसाधने वापरली जातात. उदा. कच्चा माल, भांडवल, कर्मचारी, श्रम, उत्पादन पद्धती, यंत्रसामुग्री, बाजापेठा, चलन-वलन इत्यादीं संसाधनांना प्रभावीपणे कार्यरत करण्यासाठी किंवा वापरण्यासाठी उत्तम भाषिक कौशल्यांची आवश्यकता असते. या भाषिक कौशल्यांचा वापर करून अर्थार्जन करता येतो. असे म्हटले जाते की, ''बोलणाऱ्याचे दगड विकले जातात पण न बोलणाऱ्याचे सोने विकले जात नाही.'' तात्पर्य असे की उद्योग व सेवाक्षेत्रांत प्रभावी बोलणे आणि भाषेचा प्रभावी वापर करणे अर्थात लेखन, भाषण, व संभाषणे ही भाषिक कौशल्ये अर्थार्जनासाठी उपयुक्त आहेत. थोडक्यात; आपले दैनंदिन जीवन भाषेने व्यापून टाकलेले आहे. बाजारातील भाजी विक्री असो वा सिनेमातील डायलॉग असो, विमा सेवा विक्री करून जीवन व मालमत्तेचे संरक्षण करणे असेल, सिनेमासाठी गाणे लिहून हिट सिनेमा देणे असेल, बँकेमध्ये पैसे जमा करणे किंवा काढणे असेल, वस्तू उत्पादनापासून त्यांच्या वापरापर्यंतचा प्रवास असेल अशा सर्वच ठिकाणी भाषिक कौशल्ये उपयोगी पडतात. भाषा कोणतीही असेल पण त्याचा प्रभावी वापर करता आला पाहिजे. प्रत्येक राज्यामध्ये मोबाईलचे ॲप तयार करण्यासाठी स्थानिक भाषा वापरल्या जातात. म्हणजेच आधुनिक सर्व गॅझेटस्/ उपकरणे स्थानिक भाषेचा वापर करू लागली आहेत. यावरून असे म्हणता येईल की, उत्पादन व सेवा क्षेत्रामध्ये भाषिक कौशल्यांचा वापर करून अर्थार्जन करता येते. महामार्गावरील हॉटेल्स व ढाबे यांचे बोर्ड्स पाहिलेत तर असे दिसून येते की 'गुजराती ढाबा' यांचे नाव मराठी, हिंदी बरोबरच गुजरातीमध्येही लिहिलेले असते. एवढेच नव्हे तर गुजराती ग्राहकाचे स्वागत गुजराती भाषेमधून केले जाते. परिणामतः गुजराती ग्राहकाला त्या ढाब्याविषयी आपलेपणा निर्माण होतो. तो ग्राहक निःसंकोच जेवण करतो व पुनः-पुन्हा त्याच ढाब्यावर येण्याचा प्रयत्न करतो. हे भाषिक कौशल्यामुळे शक्य होते. म्हणून असे म्हणता येईल की भाषिक कौशल्ये ही उद्योग व सेवाक्षेत्रांच्या विकासासातील अविभाज्य भाग बनली आहेत. आपण जगामध्ये कोठेही जा, त्या भागातील भाषेमध्ये एक-दोन वाक्ये जरी बोललात तरी तुमचा कार्यभाग साधलाच म्हणून समजा.

**काय लक्षात ठेवाल......!**

- उद्योग व सेवाक्षेत्र आणि भाषिक कौशल्ये यांचा सहसबंध आहे.
- संभाषण - संप्रेषण प्रभावी असायला हवे.
- रोजगार निर्मितीत भाषिक कौशल्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.
- दैनंदिन जीवनात भाषिक कौशल्यांद्वारे अर्थार्जन करता येते.
- विविध सेवाक्षेत्रांत भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी आहेत.

**उद्योग व सेवाक्षेत्र आणि मराठी भाषा**

जगामध्ये १७६० ते १८३० हा औद्योगिक क्रांतीचा कालखंड समजला जातो. या पहिल्या पिढीपासून (First Generation) आजच्या चौथ्या पिढीपर्यंत (4th Generation) म्हणजेच ''४.०'' पर्यंत अनेक प्रकारच्या संधी भाषिक कौशल्य धारकांना निर्माण होत आलेल्या आहेत. जगामध्ये प्रत्येक उत्पादनाच्या क्रांतीबरोबरच सेवाक्षेत्राची उत्पत्ती, बदल व विकास होत आलेला आहे. मानवाचे श्रम कमी करण्यासाठी विविध शोध लावण्यात येत आहेत आणि या शोधांचे आउटपुट (Output) म्हणून उद्योग व सेवाक्षेत्रांचा विकास होत असल्याचे दिसून येते. मानवाला विविध सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू झालेला बैलगाडीपासूनचा प्रवास अत्याधुनिक अवकाशयानापर्यंत येऊन पोहोचलेला आहे. यामध्ये विविध उत्पादने व सेवांचा जन्म व उगम झालेला दिसून येतो. अविकसित, विकसनशील व विकसित अर्थव्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणावर उद्योग-सेवांची आवश्यकता असते; या सर्वच क्षेत्रामध्ये भाषिक कौशल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पानपट्टीच्या दुकानापासून ते विमानाचे स्पेअर्स-पार्ट तयार करणाऱ्या कंपन्यांपर्यंत उत्पादनासाठी व सेवा पुरविण्यासाठी भाषिक कौशल्ये गरजेची असतात. उद्योग व सेवाक्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. ग्राहकाला प्रत्येक वस्तू व सेवा आपल्यासाठीच निर्माण केली आहे असे वाटण्यासाठी स्थानिक भाषेचा वापर, बोली- भाषेचा वापर होत असतो.

यावरून असे म्हणता येईल की भाषिक कौशल्ये दिवसेंदिवस महत्त्वाची बनू लागलेली आहेत. औद्योगिक क्रांती, सेवांचा महापूर, मागणी-पुरवठ्यात वाढ, ग्राहकांच्या आवडी-निवडीत बदल, चौथ्या औद्योगिक क्रांतीची नांदी व संधी, दरडोई उत्पन्नातील वाढ, राहणीमानात सुधारणा, भाषांचा विकास, जागतिकीकरण, विविध संस्कृतींतील कर्मचाऱ्यांचा एकाच संस्थेतील कार्यभार (Cross Culture), आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास इत्यादींमुळे उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये काम करणे व भाषिक कौशल्याचा वापर करून अर्थार्जन करणे शक्य झालेले आहे.



**जागतिकीकरण**

जागतिकीकरण, उदारीकरण व खुलेकरण यांमुळे संपूर्ण जग हे एक उत्पादन व विपणन केंद्र बनलेले आहे. भौगोलिक प्रदेशानुसार उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचा पुरेपूर वापर करून उत्पादन व सेवाक्षेत्रांचा विकास होऊ लागलेला आहे. जगातील जवळ-जवळ १९१ पेक्षा अधिक देश खुलेकरण- उदारीकरण- जागतिकीकरण या करारावर सह्या करून सहभागी झालेले आहेत. या करारामुळे फार मोठ्या प्रमाणात भाषिक कौशल्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. उदा. एखादी वस्तू रशियात तयार झाल्यानंतर त्याची जाहिरात, प्रसिद्धी, ब्रॅडिंग, वस्तूच्या वापराविषयीचे माहितीपत्रक, वस्तूवरील लेबल्स इत्यादी फक्त रशियन भाषेतच असून चालणार नाही. तर त्या वस्तूविषयी सर्व माहिती ज्या देशामध्ये सदर वस्तू वापरली जाणार आहे, त्या भाषेमधून असणे आवश्यक आहे. त्यामुळे जागतिकीकरणामुळे फार मोठ्या प्रमाणात भाषिक कौशल्यांना महत्त्व मिळाले आहे. जगामधील सर्व देशामध्ये वस्तू- सेवा, उत्पादन- विक्री याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यावर उत्पादित वस्तू व सेवा विपणनासाठी, सदर वस्तू- सेवा ग्राहकांपर्यंत नेऊन पोहचविण्यासाठी आणि ग्राहकांना सदर वस्तू- सेवा खरेदी करण्यास भाग पाडण्यासाठी किंमत- दर्जा- जाहिरात- सेवा- प्रात्यक्षिक इ. साठी भाषिक कौशल्यांची आवश्यकता आहे.

एकंदरीत, प्रत्येक भाषेला व त्यातील भाषिक कौशल्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भाषिक कौशल्याद्वारे ग्राहकाची मानसिकता सकारात्मक करता येते. तसेच वस्तू- सेवा उत्पादकाला/ ग्राहकाला आकर्षित करता येते. जागतिकीकरणातील मिश्र संस्कृतीमध्ये अर्थार्जनासाठी भाषिक कौशल्ये महत्त्वाची आहेत.

**जागतिकीकरणामध्ये अर्थार्जनासाठी भाषिक कौशल्यांचे महत्त्व**

जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जग एक बाजारपेठ होय. डब्ल्यू.टी.ओ. (World Trade Organization) करारानुसार जे देश सहभागी झालेले आहेत त्या देशांमध्ये मुक्त व्यापार केला जातो. आज जगामध्ये जवळ- जवळ १९१ देशामध्ये मुक्त व्यापार केला जातो. अशा प्रकारच्या व्यापारामध्ये अर्थार्जनासाठी भाषिक कौशल्ये महत्त्वाची आहेत. उत्पादन-विक्री-सेवा या सर्वच क्षेत्रांमध्ये 'भाषा' महत्त्वाची असते. प्रभावी भाषा असेल तर कोणत्याही देशामध्ये आपल्याला आपल्या वस्तू व सेवा विकणे सुलभ जाते. लोकशाही, भांडवली, समाजवादी, साम्यवादी अशा सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थेमध्ये वस्तू व सेवाक्षेत्रांमध्ये भाषिक कौशल्यांद्वारे अर्थार्जन करता येते. साधारणपणे भाषिक कौशल्ये ही वैश्विक गरज बनलेली असल्यामुळे या माध्यमाद्वारे अर्थार्जन करणे शक्य आहे.

१. भाषिक कौशल्यामुळे वस्तू व सेवांची माहिती प्रभावीपणे विशद करता येते.

२. वस्तू व सेवा पुरविण्याची गरज पूर्ण करता येते.

३. व्यावसायिकांना बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी सतत विविध प्रकारची माहिती प्रसिद्ध करता येते.

४. ग्राहकांना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती देता येते.

५. प्रभावी भाषिक कौशल्यांमुळे वस्तू व सेवांची विविध प्रकारची उपयोजिता स्पष्ट करता येते.

६. स्थळ, समय, उपयोगिता, गरज, मागणी, पुरवठा इत्यादी सापेक्ष उपयोगिता भाषिक कौशल्याद्वारे निर्माण करता येते व वाढविता येते.

७. मागणीमध्ये वाढ करण्यासाठी भाषिक कौशल्य महत्त्वाचे आहे.

८. भाषिक कौशल्यांमुळे उत्पादक- विक्रेता व ग्राहक यांच्यामध्ये समन्वय प्रस्थापित करता येतो.

९. भाषिक कौशल्यांमुळे विक्रेता व ग्राहक यांच्यामध्ये घासाघीस (Negotation) चांगल्या प्रकारे पार पाडता येते.

१०. सेवांची विक्री करणे कठीण असल्यामुळे भाषिक कौशल्यांचा वापर करून प्रभावी पद्धतीने सेवा विकता येतात.

११. पेशानुसार सेवा विक्रीसाठी उदा. डॉक्टर, वकील, करसल्लागार इ. चांगला परिणाम भाषिक कौशल्यांमुळे साधता येतो.

१२. ग्राहकांना खरेदी करण्याकडे वळविता येते किंवा प्रवृत्त करता येते.

१३ वस्तू व सेवा विक्रीच्या विक्रय संकल्पना प्रभावीपणे मांडता येतात.

१४. भाषिक कौशल्ये प्राप्त करून घेतल्यामुळे भौगोलिक प्रदेशानुसार संबंधित ग्राहकांच्या भाषेमध्ये वस्तू-सेवा विषयी माहिती देता येते.

१५. ग्राहकांचा वस्तू व सेवाविषयक दृष्टिकोन सकारात्मक करता येतो.




**उद्योग व सेवाक्षेत्रांतील अर्थार्जनाच्या संधी**

अर्थार्जन हा मानवाच्या जीवनातील अविभाज्य भाग बनलेला आहे. मानवाच्या उत्क्रांतीच्या टप्प्यात वस्तू विनिमयाचा कालखंड संपल्यानंतर पैशाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले.

वस्तू व सेवा विकण्यासाठी व खरेदी करण्यासाठी अर्थार्जन करणे आवश्यक ठरले. यासाठी लेखन, वाचन, भाषण आणि संभाषण या भाषिक कौशल्यांची गरज उद्योग व सेवाक्षेत्रांत निर्माण झाली; कारण ही भाषिक कौशल्ये संप्रेषणाची प्रभावी साधने आहेत. या भाषिक कौशल्यांमुळे आपल्याला काय सांगावयाचे आहे ते आपण थोडक्यात सांगू शकतो. अर्थार्जनासाठी बोलले जाणारे शब्द, लिहिले जाणारे शब्द, देहबोली व दृश्य परिणाम या सर्व घटकांबाबत प्रभावी भाषिक कौशल्यांची गरज महत्त्वाची ठरते. विविध प्रकारचे उद्योग करून, सेवा देऊन, सल्लाकेंद्र स्थापन करून आपल्याला अर्थार्जन करता येते. दोन देशातील शिष्टमंडळाच्या संभाषणासाठी दुभाष्याची जबाबदारी स्वीकारता येते व अर्थार्जन करता येते. विविध मोबाईल कंपन्यांचे विविध भाषेमधील ॲप विकसित करून अर्थार्जन करता येते.

यासाठी लेखन, वाचन, भाषण आणि संभाषण ही भाषिक कौशल्ये ज्यांने चांगल्या पद्धतीने आत्मसात केली आहेत. त्यांना विपणन आणि ग्राहक सेवा केंद्रात अर्थार्जनाच्या खूप संधी आहेत.

**१) विपणन** (Marketing) **साठी संवादकौशल्य**

विपणन म्हणजे ग्राहकांच्या दृष्टीने वस्तूंची खरेदी करणे तर कारखानदार व विक्रेते यांच्यादृष्टीने वस्तूंची विक्री करणे होय. थोडक्यात वस्तू व सेवा यांच्या उत्पादनापासून ते त्यांच्या उपभोगापर्यंत त्यांना प्रवाहित करण्याच्या उद्देशाने केल्या जाणाऱ्या भिन्न भिन्न परंतु एकीकृत व्यावसायिक क्रिया म्हणजे विपणन होय.

विपणन व संवादकौशल्ये यांचा फार जवळचा संबंध आहे. कारण विपणनचा बाजारपेठेतील सर्व घटकांशी घनिष्ट संबंध असतो. मानवाच्या अन्न-वस्त्र-निवारा या गरजा भागविण्यासाठी विपणनाची आवश्यकता असते. या विपणनामध्ये भाषा कौशल्य महत्त्वाचे असते. मानवाच्या गरजा अमर्यादित व सतत निर्माण होणाऱ्या असतात. यासाठी विपणन क्षेत्रात प्रभावी संभाषणकौशल्य असणे आवश्यक असते. परिणामतः चांगल्या प्रकारे अर्थार्जन करता येते. मानव हा विविध भूमिकांतून कार्य करीत असतो. उदा. कुटुंबातील सदस्य, कुटुंब प्रमुख, कर्मचारी, ग्राहक, उपभोक्ता, उत्पादक, विक्रेता इ. या सर्व भूमिकांमध्ये मानवाला वस्तू व सेवा खरेदी कराव्या लागतात किंवा विक्री कराव्या लागतात. थोडक्यात, आपले दैनंदिन जीवन पूर्णपणे विपणनाने व्यापून टाकलेले आहे. अशा वेळी भाषिक कौशल्य महत्त्वाचे ठरते.

विपणनासाठी संवादकौशल्य आवश्यक असते. यासाठी खालील घटक विचारात घ्यावे लागतात.

**ग्राहक** – विपणनामध्ये ग्राहक हा केंद्रबिंदू असतो. ग्राहकांच्या गरजांची पूर्तता व समाधान करण्यासाठी प्रभावी संवादकौशल्य आवश्यक असते. जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी प्रभावी पद्धतीने या भाषिक कौशल्यांचा उपयोग करून वस्तू व सेवा ग्राहकांना विकाव्या लागतात.

**वस्तू –** जगामध्ये फार मोठ्या प्रमाणात वस्तू विपणन केले जाते. या वस्तू विपणनासाठी भाषिक कौशल्य हवे असते. वस्तूची उपयुक्तता, वापर, टिकाऊपणा इ. माहिती देण्यासाठी संभाषण आवश्यक असते. विक्रेता कशा पद्धतीने संभाषण करतो त्यावर अवलंबून वस्तू विपणन असते.

**सेवा –** वस्तू विपणनासोबत सेवा विपणन करावे लागते. स्वतंत्रपणे किंवा वस्तू सोबतची सेवा म्हणून विपणन करावे लागते. सेवा या नाशवंत असल्यामुळे आणि ग्राहकपरत्वे सेवांची गरज, उपयुक्तता व त्यांची तीव्रता बदलत असल्यामुळे येथे संवादकौशल्य महत्त्वाचे असते. बहुतेक सेवा दाखविता येत नसल्यामुळे प्रभावीपणे संवाद साधावा लागतो. विपणनामध्ये सेवा विपणनासाठी संवादकौशल्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.


**स्थळ/ ठिकाण –** विपणनात स्थळ किंवा ठिकाण महत्त्वाचे असते. कोणत्या वस्तू व सेवांची विक्री कोणत्या ठिकाणी करणार आहेत आणि त्यासाठी भाषा कोणती असावी हे महत्त्वाचे असते. ग्रामीण, शहरी, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ठिकाण, पर्यटन ठिकाण, कार्यालय, रहिवाशी ठिकाण, विशेष ठिकाण इ. प्रकारच्या वर्गीकरणातून वस्तू व सेवांचे विपणन होत असते. यासाठी भाषिक कौशल्ये तारतम्याने विचारात घ्यावी लागतात. उदा. गोव्यामध्ये कपडे विकण्यासाठीचे भाषिक कौशल्य आणि महाबळेश्वरमध्ये कपडे विकण्यासाठीचे भाषिक कौशल्य वेगळे असावे लागते.

**संघटना –** विपणनासाठी प्रभावी संभाषणकौशल्य आवश्यक असते. यासाठी कोणती संघटना कार्यरत आहे, हे महत्त्वाचे असते. एकत्र व्यापार, संयुक्त, विभक्त कुटुंब पद्धती, भागीदारी, खाजगी कंपनी, सरकारी कंपनी, सहकारी संस्था, सामाजिक संस्था, संघटित संस्था, असंघटित संस्था इ. संघटना प्रकारामध्ये वस्तू-सेवा विनिमय करण्यासाठी पर्याप्त, प्रबळ व परिणामकारक संभाषण कला आवश्यक असते. विविध भाषांमधून संवाद केल्यास पर्याप्त विपणन करता येते.

**व्यक्ती –** विपणनामध्ये व्यक्ती कोण आहे याच्यावर संवादकौशल्याचा वापर करावा लागतो. ग्राहकांचे विविध प्रकार आहेत. ग्राहकांकडून विविध कारणासाठी वस्तू व सेवांची खरेदी केली जाते. अशा वेळी प्रभावी संवाद कौशल्य उपयुक्त ठरते. जसे ग्राहक ही एक व्यक्ती आहे तसेच विक्रेता देखील एक व्यक्ती आहे. यामध्ये विक्रेता कोण आहे? ख्यातनाम व्यक्तीमार्फत विक्री केली जाते का? विक्रेत्याचे भाषिक कौशल्य किती प्रभावी आहे. या घटकांचा परिणाम अर्थार्जनावरती होत असतो.

**माहिती –** प्रभावीपणे विक्री करण्यासाठी विविध प्रकारची माहिती आवश्यक असते. अशी माहिती गोळा करणे, माहितीची मांडणी करणे, माहितीचे पृथक्करण करणे, माहितीच्या आधारे कार्यकारण संबंध प्रस्थापित करणे इत्यादींसाठी व त्यानंतर विक्री करण्यासाठी संवादकौशल्य असावे लागते. एकविसाव्या शतकामध्ये माहितीला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. माहितीच्या आधारे प्रभावी मांडणी करता येते. प्रभावी मांडणीसाठी प्रभावी संवादकौशल्य असावे लागते. माहितीद्वारे विक्री करणे, माहितीची विक्री करणे, माहितीवरून संदर्भ प्रस्थापित करून विक्री करणे यासाठी भाषिक कौशल्य महत्त्वाचे असते. आज माहितीचा योग्य वापर करून अनेक लोक कोट्यधीश बनलेले आपल्याला पहावयास मिळतात.

**कल्पना/ संकल्पना** (Ideas) – विपणनामध्ये विविध संकल्पनांना महत्त्वाचे स्थान आहे. संकल्पना व भाषिक कौशल्य यांच्यामध्ये अत्यंत जवळचा संबंध आहे. थोडक्यात, संकल्पना आणि अर्थार्जन यांच्यामध्ये सकारात्मक बेरजेचा सहसमन्वय असतो. म्हणूनच भाषिक कौशल्यांचा वापर करून प्रभावीपणे संकल्पनांची विक्री करता येते व अर्थार्जन करता येते.




भाषिक कौशल्ये

### २) ग्राहक सेवाकेंद्र (Call Centers)

भाषिक कौशल्यधारकांना ग्राहक सेवाकेंद्राची स्थापना करून अर्थार्जन करता येते. ग्राहकाला सेवा देण्यासाठी विविध सेवाकेंद्रे स्थापन करता येतात. उदा. बी.पी.ओ. वैयक्तिक सेवा, सामूहिक सेवा, चिन्हांकन सेवा, जाहिरात - प्रसिद्धी सेवा, बोधचिन्ह तयार करावयाचे सेवाकेंद्र, व्यापारी चिन्ह तयार करावयाचे सेवाकेंद्र, डिझाईन सेवाकेंद्र, विक्रीत्तोर सेवा, सल्लागार सेवाकेंद्र, माहिती संकलन केंद्र, माहितीचे विश्लेषण केंद्र, वाहतूक सेवाकेंद्र, मध्यस्थी सेवा, वाहतूक सेवा, चढ-उतार सेवा, विक्रयवृद्धी मार्गदर्शनसेवा, घोषवाक्य पूर्तता सेवाकेंद्र, प्रतिमा निर्मिती सेवा, जाहिरात सेवा, सांस्कृतिक सेवा कार्यक्रम व्यवस्थापन सेवा इ.

ग्राहकाच्या गरजा ओळखून या सेवा केंद्रामार्फत भाषिक कौशल्यांच्या द्वारे अर्थार्जन करता येते. विविध सेवा केंद्राद्वारे विविध सेवांची विक्री करून अर्थार्जन करता येते. अभ्यासाअंती असे सिद्ध झाले आहे की आपण प्रभावी संभाषण कौशल्याचा वापर करून फार मोठ्या प्रमाणामध्ये विविध सेवा विकता येतात व अर्थाजन करता येते. भाषिक कौशल्यांचा वापर करून सृजनात्मक पद्धतीने स्वतःला सिद्ध करता येते; म्हणजेच अर्थार्जन करता येते. कोणत्याही प्रकारचे ग्राहक सेवा केंद्र चालविण्यासाठी शारीरिक कौशल्य, भाषिक कौशल्य, समन्वय कौशल्य, मानसिक कौशल्य, सामाजिक कौशल्य, संभाषण कला, देहबोली कौशल्य, निरीक्षण कौशल्य, शिष्टाचार कौशल्य, सामाजिक संबंध कौशल्य, चातुर्य, संयम व सहनशीलता कौशल्य, उद्योगीवृत्ती, सचोटी, प्रामाणिकपणा इ. प्रकारची कौशल्ये असावी लागतात. त्या माध्यमातून अर्थार्जन करता येते. ग्राहक सेवा केंद्राद्वारे वैयक्तिक व सामूहिक कौशल्याचा वापर करून अर्थार्जन करता येते. काही उदाहरणे घेतल्यास आपणास अर्थार्जनाचे मार्ग सहज समजून येतील. उदा. कॉल सेंटर, यामध्ये इतर देशांमधून किंवा आपल्या देशामधून ज्यांना माहितीची आवश्यकता आहे अशांकडून फोनद्वारे विचारणा केली जाते. सदर माहिती सौजन्याने, स्पष्टपणे, नम्रपणे, संयमाने, हजरजबाबीपणे व बिनचूकरीत्या पुरवायची असते. त्याद्वारे मोठ्या प्रमाणात ग्राहक वर्ग मिळविता येतो. मिळालेला ग्राहक वर्ग टिकविता येतो व त्यामध्ये वृद्धी करता येते. म्हणजेच ग्राहक सेवा केंद्राद्वारे अर्थाजन करता येते. यासाठी प्रभावी भाषिक कौशल्य आवश्यक असते. भाषेवरचे प्रभुत्व, स्पष्टता, मार्दवता, आपलेपणा, विश्वासार्हता, बिनचूकपणा इ. शिकणे म्हणजेच उद्योग व सेवाक्षेत्रासाठी भाषिक कौशल्ये आत्मसात करणे होय.

## ब) अनुवाद

**प्रास्ताविक**

मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी देणाऱ्या अनेक साधनांपैकी अनुवाद हे एक महत्त्वाचे साधन होय. विशेषतः माहिती तंत्रज्ञानाच्या या काळात सर्वच भाषा अभ्यासकांना अर्थार्जनाच्या संधी दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसते. मराठी भाषा देखील यास अपवाद नाही. वाढती लोकसंख्या, मागणी आणि पुरवठा यातील असमतोल, कौशल्यविरहित पदवी, केंद्रित शिक्षण आणि वाढत चाललेली बेकारी यावर उपाय म्हणून कौशल्यकेंद्रित अनेक अभ्यासक्रम अस्तित्वात आले. 'जो करेल कौशल्य आत्मसात,

तोच करेल बेकारीवर मात', हे नवे तत्त्व सूत्ररूपाने आज उदयास आले. कौशल्य आधारित अभ्यासक्रमाचे आज जणू पेव फुटल्याचे दिसते. कथालेखन, पटकथालेखन, संवादलेखन, गीतलेखन, डबिंग, डॉक्युमेंट्री, लघुपट निर्मिती, उद्घोषणालेखन, समाचारलेखन, वृत्तलेखन, समाचार वाचन, निवेदन, विविध उपक्रम आयोजन - नियोजन, संयोजन, व्यवस्थापन, संपादन, स्तंभलेखन, मुद्रितशोधन, साहित्य समालोचन, क्रीडा समालोचन, पर्यटन मार्गदर्शन, मुलाखतलेखन, शब्दांकन, पाठलेखन, पाठ हस्तलिखित संपादन, संवाद कौशल्यअर्जन आणि समाज माध्यमांसाठी लेखन यांसारखे कित्येक अभ्यासक्रम काळाची गरज म्हणून आकारास आले. तंत्र आणि कौशल्य म्हणून, रोजगाराच्या नव्या संधी म्हणून.

अनुवाद हे क्षेत्र आज भाषेच्या अभ्यासकांना अर्थार्जनाची संजीवनी म्हणून मान्य करावे लागेल. आज मराठीच्या पदवीधर तरुण-तरुणींना मराठी भाषेच्या ज्ञानाचे उपयोजन अनुवाद कला आत्मसात करण्यासाठी उपयोगात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी अनुवाद संकल्पना, स्वरूप, सिद्धांत, प्रकार, समस्या आणि उपाय इत्यादी समजून घेणे आवश्यक आहे. यासाठी अनुवाद विज्ञान, अनुवाद कला आणि अनुवाद कौशल्य याचे सामान्यज्ञान मिळविणे महत्त्वाचे ठरते. तसेच अनुवाद कार्याची सततची सवय (Practice) ही अनुवादामध्ये निपुणता/ पारंगतता आणण्यास उपयुक्त होते. यासाठीच इथे या सर्व बाबींचे विवेचन संक्षिप्त रूपाने केले आहे.

**अनुवाद : शब्दार्थ आणि संकल्पना**

अनुवादाची संकल्पना आणि परिभाषा पाहण्याअगोदर इथे 'अनुवाद' शब्द कसा निर्माण झाला हे पाहणे गरजेचे आहे. 'वद' हा धातु आणि 'अनु' हा उपसर्ग- या दोन्हींच्या संयोगातून 'अनुवाद' हा शब्द तयार झाला. याच्या निर्मिती प्रमाणे पाहिल्यास 'वद' म्हणजे सांगणे, कथन करणे आणि 'अनु' म्हणजे पुन्हा, परत, समान किंवा अनुरूप. यावरून अनुवाद या शब्दाचा मूळ व निर्मितिमूलक अर्थ आहे 'पुन्हा सांगणे, कथन करणे, अर्थात कुणी सांगितलेले, कथन केलेले नंतर, पुन्हा सांगणे, कथन करणे, समान किंवा अनुरूप कथन करणे'. अर्थात एका भाषेत सांगितलेली, कथन केलेली बाब दुसऱ्या भाषेत पुन्हा समान रूपाने सांगणे म्हणजे अनुवाद. यावरून हेही स्पष्ट होते की अनुवादाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी अनुवाद या शब्दाचा मूळ अर्थ कामी येतो. यातून अनुवादाची नेमकी संकल्पना साकार होते. ती म्हणजे एका भाषेत पूर्वी सांगितलेली कोणतीही माहिती पुन्हा समानरूपाने दुसऱ्या भाषेत नेणे म्हणजे अनुवाद.

मराठी, हिन्दी आणि इंग्रजी मध्ये अनुवाद या संकल्पनेसाठी वेगवेगळे शब्द प्रयोग प्रचलित दिसतात. ते खालील प्रमाणे -

**मराठी :**

भाषांतरण, अनुवाद (काही ठिकाणी 'रूपांतर'ही)

**हिंदी :**

अनुवाद, भाषांतरण (काही ठिकाणी रूपांतरण ही) उलथा, तर्जुमा, समर्थन, दुहरांना इत्यादी

**इंग्रजी :** ट्रान्सलेशन (Translation)

इथे इंग्रजी 'Translation' या शब्दाचा मूळ अर्थ पाहणे रोचक आणि समर्पक होईल. हा शब्द लॅटिन भाषेतून इंग्रजीत आलेला आहे जो "Trans" आणि "Lation" या दोन्हीच्या संयोगातून निर्माण झालेला आहे. यातील "Trans" चा अर्थ आहे 'पलीकडे' आणि "Lation" चा अर्थ आहे 'नेण्याची अथवा घेऊन जाण्याची क्रिया. 'अर्थात "Translation" या संकल्पनेचा मूळ अर्थ आहे 'एका भाषेतील सामग्री दुसऱ्या भाषेत घेऊन जाण्याची क्रिया'. यावरून सहज, सोप्या पद्धतीने अनुवाद संकल्पना हेच स्पष्ट करते की, एका भाषेतील सामग्री दुसऱ्या भाषेत नेण्याची प्रक्रिया म्हणजेच अनुवाद. अनुवादाच्या संकल्पनेत मूळ भाषेतील सामग्रीची दुसऱ्या भाषेत भावार्थाच्या स्तरावर केलेली प्रतिस्थापना (Replacement) अभिप्रेत असते. अर्थात अनुवाद ही संकल्पना मुळातच भावकेंद्रित आहे. म्हणूनच अनुवादामध्ये एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जात असताना भाषा बदलत असते पण भाव तोच असावा लागतो. म्हणूनच अनुवादाला 'परकाया प्रवेश' म्हटले जाते. एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश करण्याच्या या प्रक्रियेत शरीर (भाषा) बदलते परंतु आत्मा (भावार्थ) तोच असतो. सारांशतः अनुवादाच्या संकल्पनेत भाषेला शरीरासमान तर भावार्थाला आत्म्यासमान महत्त्व असते हे विसरता कामा नये.

**अनुवाद : व्याख्या आणि प्रकार**

वस्तुतः अनुवादाचे क्षेत्र अर्थार्जनाच्या दृष्टीने जेवढे महत्त्वाचे तेवेढच व्यापक आहे. यात जशी अर्थार्जनासाठी मोक्याची ठिकाणे आहेत तसी मतमतांतरे देखील आहेत. परंतु अनुवाद कार्यात प्रावीण्य प्राप्तीसाठी जसे अनुवाद संकल्पनेस समजून घ्यावे लागते तसे अनुवादाची परिभाषा ध्यानात घेणे क्रमप्राप्त ठरते. इथे आपण प्रातिनिधिक स्वरूपात परंतु अनुवाद क्षेत्रातील अधिकारी विद्वानांच्या काही महत्त्वपूर्ण परिभाषा जाणून घेऊ.

**इंग्रजी व्याख्या**

**नायडा :** पाश्चात्त्य विद्वान यूजिन ए. नायडा यांनी अनुवादाची परिभाषा या शब्दात प्रस्तुत केली आहे– 'अनुवाद म्हणजे स्रोत भाषेच्या संदेशाची लक्ष्य भाषेत प्रथमतः अर्थाच्या दृष्टीने आणि द्वितीयतः शैलीच्या दृष्टीने निकटतम, सहज आणि समतुल्य निर्मिती करणे होय.' (Translating consists is producing in the receptor language the closet natural equivalent on the massage of source language, firstly in meaning Secondly in style.)

**जे सी केटफोर्ड :** यांच्या मते 'एका भाषेतील पाठ सामग्रीची दुसऱ्या भाषेतील पाठ सामग्रीमध्ये समतुल्य प्रतिस्थापना करणे म्हणजेच अनुवाद होय.' (Taxuas material in one language by equivalent textual material in another language)

**हिंदी परिभाषा**

**भोलानाथ तिवारी :** भाषाविज्ञान व अनुवाद क्षेत्रातील हिंदी विद्वान डॉ. भोलानाथ तिवारी यांच्या मते, 'एक भाषा में व्यक्त विचारों को यथा संभाव समान और सहज अभिव्यक्ति द्वारा दूसरी भाषा में व्यक्त करने का प्रयास अनुवाद है।'

**डॉ. गार्गी गुप्त :** यांच्या मते, 'अनुवाद का मूल अर्थ एक भाषा में निहित विचारों को दूसरी भाषा में यथा संभव ज्यों का त्यों व्यक्त करना है।'

**मराठी व्याख्या**

**भालचंद्र नेमाडे :** सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक आणि ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित डॉ. भालचंद्र नेमाडे यांची अनुवाद संबंधी व्याख्या अशी आहे की, 'भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक सांस्कृतिक आवरणात स्थानांतरण करणारी द्वैभाषिक प्रक्रिया आहे.'

**सूर्यनारायण रणसुभे :** अनेक मराठी- हिंदी ग्रंथांचे अनुवादक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांच्या मते, 'अनुवाद मूळ रचनेप्रमाणे व्हायला हवा. त्यात बदल करण्याचा अधिकार अनुवादकाला असता कामा नये.'

अनुवाद व भाषा क्षेत्रातील मान्यवरांच्या वरील सर्व परिभाषांचा सारासार विचार केल्यास हे सहज लक्षात येते की, अनुवाद क्षेत्र किमान दोन भाषांशी संबंधित आहे. अनुवादकास कमीत कमी दोन भाषांचे ज्ञान असणे आणि ज्या समाजात त्या बोलल्या जातात त्या समाजरचनेचे, त्याच्या संस्कृतीचे ज्ञान, भान असणे गरजेचे आहे. अनुवादाच्या पारिभाषिक शब्दावलीमध्येच सांगायचे झाले तर स्रोत भाषा आणि लक्ष्य भाषा या दोन्हींचे ज्ञान आणि त्या बोलल्या जाणाऱ्या समाजाचा, त्याच्या संस्कृतीचा परिचय असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या मूळ भाषेतून अनुवाद केला जातो तिला स्रोत भाषा आणि ज्या भाषेत तो केला जातो तिला लक्ष्य भाषा म्हणून संबोधित करतात. सर्वात महत्त्वाची बाब अशी की, अनुवादामध्ये मुळातील भाव सुरक्षित असावा लागतो. अनुवादकास भाषा बदलण्याचा अधिकार असतो, भाव नव्हे. सारांश असा की, स्रोत भाषेतील सामग्री भावार्थ सहित लक्ष्य भाषेत नेण्याची प्रक्रिया म्हणजेच अनुवाद होय.

**अनुवादाचे प्रकार**

अनुवादाचे क्षेत्र अत्यंत व्यापक आणि विशाल आहे. व्यवसाय, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कक्षेत येणारे सर्व विषय अनुवादाचे विषय होऊ शकतात. खरेतर जितके विषय तितकेच अनुवादाचे प्रकार होऊ/ असू शकतात. वस्तुतः ज्या प्रकारची अनुवाद सामग्री असते, अनुवादकास त्या स्वरूपाचा अनुवाद करावा लागतो. उदाहरणार्थ वैज्ञानिक सामग्रीचा अनुवाद साहित्यिक सामग्रीच्या अनुवादापेक्षा वेगळा असतो, तसेच कायद्याच्या सामग्रीचा अनुवाद कवितेच्या अनुवादापेक्षा वेगळा असतो. विज्ञान आणि विधी साहित्याचा अनुवाद हा अभिधात्मक भाषेत असतो. अपेक्षित असतो, तर कथा आणि कवितांचा अर्थात साहित्यिक सामग्रीचा अनुवाद हा अभिधात्मक भाषेबरोबरच लक्षणा आणि व्यंजनात्मक भाषेत. यासाठी अनुवादकास अनुवादाच्या प्रकारांचा परिचय असणे आवश्यक असते. खरेतर अनुवादाचे प्रकार खूप आहेत.

हे प्रकार  निश्चित करण्याचे आधार अनेक आहेत. प्रामुख्याने खालील आधारांच्या अनुषंगाने अनुवादाचे प्रकार निर्धारित केले जातात -

१. विषयाच्या आधारे अनुवादाचे प्रकार

२. अनुवादाच्या स्वरूपाच्या आधारे अनुवादाचे प्रकार

३. अनुवादकाच्या श्रेणीच्या आधारे अनुवादाचे प्रकार

४. अनुवाद कर्त्याच्या आधारे अनुवादाचे प्रकार

**१. विषयाच्या आधारे अनुवादाचे प्रकार**

प्रामुख्याने या आधारावर अनुवादाचे दोन प्रकार दिसतात. (१) साहित्यिक अनुवाद आणि (२) साहित्येतर अनुवाद. साहित्यिक विषयाच्या अनुवादामध्ये पहिला गद्यानुवाद ज्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, निबंध, समीक्षा, व्यक्तिचित्र, आत्मचरित्र, चरित्र, दैनंदिनी, पत्र, प्रवास वर्णन, आठवणी, वैचारिक लेखन आणि इतर ललित साहित्य इत्यादींचा समावेश होतो. साहित्येतर विषयाच्या अनुवादामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, विधी, प्रशासन, वाणिज्य, मानव्यविद्या शाखा, समाज माध्यमे, अभियांत्रिकी आणि वैद्यकशास्त्र इत्यादी विषयांचा समावेश होतो.

**२. अनुवादाच्या स्वरूपाच्या आधारे अनुवादाचे प्रकार**

अनुवादाचा हा प्रकार अनुवादाच्या स्वरूपावर आधारित आहे. मूळ सामग्रीचा अनुवाद ज्या स्वरूपात आकारास आला त्याच्या आधारे अनुवादाचे अनेक प्रकार दिसतात, जसे-मूळनिष्ठ अनुवाद, मूळमुक्त अथवा स्वैर अनुवाद, अंशतः मूळनिष्ठ-मूळमुक्त अनुवाद, शब्दानुवाद, भावानुवाद, व्याख्यानुवाद, सारानुवाद, छायानुवाद, आदर्शानुवाद, न्यूनानुवाद आणि रूपांतर इत्यादी.

**३. अनुवादकाच्या श्रेणीच्या आधारे अनुवादाचे प्रकार**

खरेतर अनुवादक अनेक प्रकारात मोडतात. त्यांची कोणतीही एक श्रेणी नसून अनेक श्रेणी दिसतात, उदाहरणार्थ नोकरी करणारा अनुवादक, व्यावसायिक अनुवादक, स्वेच्छेने बांधिलकीने अनुवाद करणारा अनुवादक, परइच्छेने नाइलाजाने अनुवाद करणारा अनुवादक आणि केवळ अर्थार्जनासाठी अनुवाद करणारा अनुवादक इत्यादी.

**४. अनुवादकर्त्याच्या आधारे अनुवादाचे प्रकार**

अनुवाद करणारा कोण आहे यावरून देखील अनुवादाचे प्रकार निर्धारित केले जातात, उदाहरणार्थ, मानवाने केलेला अनुवाद, याचे उपप्रकारही दिसतात जसे - एका व्यक्तीने केलेला अनुवाद, अनेक व्यक्तींनी केलेला अनुवाद, एका समूहाने किंवा संघाने (टीमने) केलेला अनुवाद आणि यंत्राद्वारे (मशीनने) केलेला अनुवाद यामध्ये संगणक, लॅपटॉप, मोबाईल इत्यादींचा समावेश होतो.

वरील सर्व अनुवाद प्रकारांचा परिचय असणारा अनुवादक आदर्श आणि मूळनिष्ठ  अनुवाद करण्यात यशस्वी होऊ शकतो. इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, सर्वच प्रकारच्या अनुवाद सामग्रींचा अनुवाद

एकसारख्या स्वरूपात करायचा नसतो आणि तो करू नये. ज्या प्रकारची मूळ, पाठ्यसामग्री आहे त्यानुसार अनुवादाची भाषाशैली असायला हवी. उदाहरणार्थ– विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सामग्रीचा अनुवाद ललित साहित्यकृतीप्रमाणे लक्षणा व्यंजना, शैलीत न करता तो भावकेंद्रित, वस्तुनिष्ठ व अभिधात्मक भाषेमध्येच करावा लागतो. तर दुसरीकडे साहित्यिक रचनांचा लाक्षणिक व अभिव्यंजन भाषाशैलीऐवजी सरधोपट, अभिधात्मक भाषाशैलीमध्ये अनुवाद करणे प्रभावी आणि औचित्यपूर्ण होत नाही. इथे फक्त भाव महत्त्वाचा असत नाही तर भाषाशैली, अभिव्यक्ती शैलीही महत्त्वाची असते; तरच अनुवाद यशस्वी होऊ शकतो.

**अनुवादाच्या अनुषंगाने अर्थार्जनाच्या संधी**

मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना आज ज्या विविध क्षेत्रांत अर्थार्जनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, त्या पैकी अनुवाद हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. याची आज कित्येक कारणे सांगता येतील. यामध्ये प्रामुख्याने वाढते जागतिकीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारताकडील ओघ, नुकतेच भारत सरकारने जाहीर केलेले नवीन शैक्षणिक धोरण आणि त्यामध्ये मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षणावर दिलेला भर, मराठी भाषेबाबत महाराष्ट्र शासनाचे नवे धोरण व दिलेले प्राधान्य, महाराष्ट्र राज्यात प्रत्येक शाळेत मराठी विषय अनिवार्य करणे, प्राथमिक शिक्षण मातृभाषा मराठीतून देणे, शासकीय कामकाजामध्ये मराठीचा वापर करण्यावर भर देणे आणि त्याअनुषंगाने मराठीचे महत्त्व वाढत जाणे हे आशादायी चित्र म्हणावे लागेल. या शिवाय मराठीचे महत्त्व वाढत जाण्याची काही मूलभूत कारणेही आहेत. त्यातील ठळक अशी; भारत हा बहुभाषी देश असणे, भारतीय राज्यघटनेत हिंदीबरोबरच देशाच्या प्रमुख राजभाषांमध्ये मराठीचा समावेश असणे, मराठीस साहित्यिक समृद्धीचा वारसा असणे आणि आत्ता राज्यशासनाकडून राज्याची राजभाषा म्हणून तिचा वापर करण्यावर कायदा करून भर देणे. यामुळे देखील मराठीचे शिक्षण घेणाऱ्या नव्या पिढीस अर्थार्जनाच्या अनेक संधी चालून येऊ घातल्या आहेत यात शंका नाही. त्या अनेक रूपात व अनेक क्षेत्रांत उपलब्ध आहेत.

शिक्षण, शासन आणि प्रशासन प्रामुख्याने या तिन्ही स्तरावर मराठीचा वापर वाढल्याने तसेच ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान मराठीतून आत्मसात करण्याची संधी उपलब्ध झाल्याने आणि राज्याची कार्यालयीन भाषा म्हणून तिचा सन्मानपूर्वक वापर वाढल्याने रोजगाराची भाषा म्हणून मराठीचा होत असलेला उदय निश्चितच सुखद म्हणावा लागेल. तसेच भारत सरकारने स्वीकारलेले 'त्रिभाषा सूत्र' (Three Language Formula) हेही प्रत्येक प्रादेशिक भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. त्रिभाषा सूत्रानुसार भारतासारख्या संघराज्यात प्रथम भाषा ही प्रादेशिक अर्थात महाराष्ट्राच्या संदर्भात मराठी, द्वितीय भाषा ही देशाची राजभाषा म्हणून हिंदी आणि तृतीय भाषा म्हणून आंतरराष्ट्रीय संपर्काची भाषा इंग्रजीचा वापर निर्देशित आहे. खरेतर 'त्रिभाषा सूत्र' हे सर्व भाषांना समान संधी देण्याच्या भूमिकेतून महत्त्वाचे ठरते. यामुळे देखील मराठीचे महत्त्व निश्चितच सिद्ध होते.

वरील सर्व विवेचनाचा मथितार्थ हा की, मराठी भाषेच्या अभ्यासकांना अर्थार्जनाच्या संधी निश्चितच वाढत असलेल्या दिसतात. त्या प्रामुख्याने ज्या– ज्या क्षेत्रात दिसतात त्यातील अनुवाद हे महत्त्वाचे क्षेत्र म्हणावे लागेल. आज मानवी जीवनाशी संबंधित असे कोणतेही क्षेत्र दिसणार नाही जे निरुपयोगी असेल. तात्पर्य हे की,

देशी आणि विदेशी, सर्वच भाषांमध्ये कमीअधिक प्रमाणात विविध क्षेत्रांतीत सामग्री व्यक्ती, समाज आणि राष्ट्र उपयोगी असते. अशी सर्वच क्षेत्रे अर्थार्जनाची संधी म्हणून आज मराठी अनुवादकांना खुणावत आहेत. त्यातील काही महत्त्वाची म्हणजे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार/ व्यवसाय, प्रकाशन संस्था, साहित्य आणि संस्कृती मंडळ, वाङ्मय मंडळ, राज्य व राष्ट्रीय साहित्य अकादमी संस्था, शैक्षणिक संस्था, जाहिरात, चित्रपट (डबिंग), शीर्षक (टायटलिंग), उपशीर्षक (सब टायटलिंग), खाद्य पदार्थ यादी (मेनू कार्ड), माहितीपत्रक (prospectus) या सर्व क्षेत्रांमध्ये मराठी अनुवादकांना अर्थार्जन करून सन्मानाने यशस्वी जीवनाची वाटचाल करण्याचे स्रोत उपलब्ध आहेत.

**ज्ञान**

ज्ञान हे जगात सर्वात व्यापक आहे. ते असीम, अगाध, अवर्णनीय आणि अद्भुत आहे. ज्याचा अंत कुणाला लागलेला नाही त्याचे खरे नाव ज्ञान आहे. खरी गोष्ट अशी की, ज्ञान अमर्याद आणि मानवी जीवन मर्यादित आहे. तेव्हा या अल्पशा आयुष्यात अमर्यादित ज्ञान मिळवणे कठीणच. दुसरे असे की, ज्ञान हे कोणाची मक्तेदारी नाही. ते कोणत्याही एका भाषेची संपत्ती नाही. जगातल्या सर्वच भाषांमध्ये ते सामावलेले आहे. फरक इतकाच की, त्याचे प्रमाण कमी-जास्त आहे एवढंच. एका जन्मात, मर्यादित आयुष्यात मानवाला ज्ञान प्राप्तीसाठी सगळ्या भाषा शिकणे शक्य नाही. परंतु अनुवादाच्या माध्यमातून ही उणीव नक्कीच भरून काढता येते. म्हणूनच आज ग्रीक, लॅटिनपासून ते फ्रेंच, जर्मनी, रशियन, जपानी व इंग्रजीपर्यंतचे आणि संस्कृतपासून ते उर्दू, पंजाबी, गुजराती, बंगाली, कन्नड, तेलुगु, तमिळ, मल्याळम् व मराठी पर्यंतच असलेले ज्ञान अनुवादाच्या रूपाने सर्वत्र पोहचत असल्याचे दिसते. आधुनिककाळात समाज ज्ञानार्जनाचा भुकेला आहे. मराठी भाषिक समाजही त्यास अपवाद नाही. आज तो महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, मध्यप्रदेश, दिल्ली इत्यादी प्रदेशात आणि इंग्लंड, अमेरिका, मॉरिशससारख्या देशात देखील पसरलेला आहे. तेव्हा ज्ञानात्मक सामग्रीचा अनुवाद समाजाच्या विकासाचे प्रमुख साधन सिद्ध झाले आहे हे नाकारता येत नाही.

विज्ञानविषयक सामग्रीच्या अनुवादाला आता चांगली मागणी वाढणे स्वाभाविक आहे. विज्ञानाबद्दल जनजागृती होणे, त्याचे महत्त्व पटणे, महाराष्ट्र राज्यात मराठी विज्ञान परिषदेची स्थापना होणे, विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या पातळीवर स्पर्धांचे आयोजन करणे, तरुण वैज्ञानिकांना संशोधनास प्रेरित करणे, हजारो, लाखो, करोडो रुपयांचे संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनुदान देणे आणि त्यातून समाज उपयोगी भरीव कार्य होणे या सर्वांच्या प्रभाव आणि परिणामातून हे सर्व मराठीत उपलब्ध करण्यासाठी चांगले वातावरण उदयास आले. यातून अनुवादकार्य वाढीस तर लागलेच परंतु चांगल्या अनुवादास पारितोषिके/बक्षिसे देऊन अनुवादकार्यास चालना देण्याचा प्रघातही सुरू झाला. याचाच परिपाक म्हणून आज वेगवेगळी विज्ञानविषयक सामग्री विपुल प्रमाणात मराठीत उपलब्ध असल्याचे दिसते. यामुळे जगभरातील विज्ञानाच्या क्षेत्राशी संबंधित सर्व प्रकारच्या सामग्रीचा अनुवाद करण्यासाठी मराठी अभ्यासकांना उत्तम संधी उपलब्ध आहेत. गरज आहे ती स्वतःला सिद्ध करण्यासाठी झोकून देण्याची, मिळत असलेल्या संधीस आव्हान म्हणून स्वीकारण्याचे धाडस करण्याची.

**तंत्रज्ञान**

आज तंत्रज्ञान हे सर्वांना हवे आहे. जगाचा शोध घेतल्यास ते देश अधिक पुढारलेले, सुधारलेले व बहरलेले दिसतात जे तंत्रज्ञानात पुढे आहेत. आज इस्राइलसारखा लहानसा देश कृषिक्षेत्रात पुढे आहे तो तंत्रज्ञानामुळे. हिब्रू भाषेतील हे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी जगातील मोठे मोठे देश आपले तज्ज्ञ इस्राइलला अभ्यास दौऱ्यावर पाठवितात व अनुवादाच्या माध्यमातून ते प्राप्त करतात. आज जगातील जे काही प्रगत देश आहेत ते सर्व तंत्रज्ञानाची भाषा म्हणून आपआपल्या देशाची भाषा वापरून प्रगती साधत आहेत. यामध्ये इंग्रजी, जपानी, चीनी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादि भाषा तंत्रज्ञानाच्या भाषा म्हणून स्थापित आहेत. भारतात हिंदीची वाटचाल त्या दिशेने आहे. त्यामुळे हिंदी बरोबरच भारतीय राज्यघटनेमध्ये ज्या इतर प्रमुख प्रादेशिक भाषांना राजभाषा म्हणून मान्यता दिलेली आहे त्या सर्वांना अनुवादाच्या क्षेत्रात संदर्भात चांगले दिवस आलेले आहेत. मराठी ही त्यापैकी प्रमुख आहे.

आपल्या भाषेत नसलेले तंत्रज्ञान अनुवादाच्या माध्यमातून उपलब्ध करून घेण्याच्या प्रयत्नातूनच आज अनेक ग्रंथ अनुवादाच्या रूपाने मराठीत दिसतात. विविध क्षेत्रांतील तंत्रज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कठीण काम केवळ मराठी अनुवादाच्या माध्यमातून शक्य होत असल्याचे दिसत आहे.

आज मानव जीवनाच्या सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञान फक्त आलेलेच नाही तर एकरूप झालेले आहे, संपृक्त झालेले आहे. या सर्व विवेचनाचा परिपाक म्हणजे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी अनुवादाची मागणी वाढत चालली आहे.

आज वैयक्तिक पातळीवर आणि सामूहिक रूपाने देखील वेगवेगळ्या भाषेतील तंत्रज्ञानाचे अनुवादकार्य प्रचंड प्रमाणात सुरू आहे. यातून काही कंपन्या अनुवादाचे टेंडर्स मिळवू लागल्या आहेत. यातून अनुवादकास अर्थार्जनाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**उद्योग – व्यवसाय – व्यापार**

काळाची गरज म्हणून आज विविध उद्योग व्यवसाय क्षेत्रांमध्ये अनुवादकांची मागणी वाढते आहे. उत्पादन तंत्र, निर्मितिप्रक्रिया, प्रचार–प्रसार, माहितीपत्रक, वैशिष्ट्ये, गुणधर्म, उपयोग आणि विक्री व्यवस्था या सर्व प्रक्रियेतून व अनुवादाच्या माध्यमातून सर्व घटकांपर्यंत संवाद साधण्याचे कार्य यशस्वीपणे होते. तेव्हा उद्योग - व्यवसाय- व्यापार यांमध्ये प्रगती करून विकासाची घोडदौड चालू ठेवायची असेल तर अनुवादाला नक्कीच पर्याय नाही. विशेषतः उद्योगाच्या क्षेत्रातील वाढती स्पर्धा पाहता चांगले यश मिळवायचे असेल तर अनुवाद हे एक महत्त्वाचे साधन सिद्ध झाले आहे यात शंका नाही.

**प्रकाशन संस्था**

राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा अनेक प्रकाशन संस्था आहेत ज्या चांगल्या अनुवादकाच्या शोधत असतात. चांगल्या साहित्यकारांच्या चांगल्या साहित्यकृती–उदा. आत्मकथन, कादंबऱ्या, नाटक, समीक्षा, बाल साहित्य, विज्ञान, पत्रकारिता, ग्रंथावली, रचनावली, संगणक, गीत,

गजल, शायरी, वैचारिक, माध्यमे, मनोरंजन आणि प्रबोधन इत्यादी प्रकारातील दर्जेदार पुस्तके अनुवादाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहचविण्याच्या प्रयत्नात असतात. चांगली दर्जेदार पुस्तके विशेषतः पुरस्कार प्राप्त पुस्तके छापण्यासाठी अनेक प्रकाशन संस्था उत्सुक असतात. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी दिल्ली, केंद्रीय हिंदी निदेशालय, मूर्तिदेवी ज्ञानपीठ, बुकर आणि नोबेल या सारख्या पुरस्कारांनी सन्मानित लेखकांच्या पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित करण्यासाठी अनेक प्रकाशन संस्था तत्पर असतात.

मराठी, हिंदी, इंग्रजी तसेच इतर भारतीय भाषा आणि विदेशी भाषांमधील श्रेष्ठ साहित्यकृतींच्या अनुवादास वाचकांची चांगली मागणी असल्यामुळे प्रकाशन संस्था अनुवादकास मानधन देऊन अनुवाद करून घेतात, प्रकाशित करतात आणि वाचकांपर्यंत पोहचवितात. देशातील व जगातील अनेक श्रेष्ठ साहित्यिकांच्या पुस्तकांचे अनुवाद मराठी भाषेत उपलब्ध आहेत. याच कारणास्तव बंगालीतील रवींद्रनाथ टागोरांपासून ते शरदचंद्र चटोपाध्यायांपर्यंत, अरुंधती राय पासून ते तसलीमा नसरीनपर्यंत, हिंदीतील प्रेमचंद, यशपाल, हरिवंशराय बच्चन पासून ते भीष्म साहनी, गोविंद मिश्र यांच्यापर्यंत अनेकांच्या साहित्यकृती मराठीत अनुवादाच्या माध्यमातून वाचायला मिळतात. इतकेच नाही तर इंग्रजीतील हेमिंग्वे, शेक्सपीअर, रशियन भाषेतील लिओ टॉल्सटॉय, मैक्सीम गॉर्की आणि चेकॉव्ह यांच्यासारखे अनेक जगप्रसिद्ध साहित्यकार मराठी हिंदी आणि इतर भारतीय, भाषांमध्ये उपलब्ध आहेत ते अनुवादाच्या रूपानेच. दिल्लीपासून ते मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूरपर्यंत लहान मोठ्या असंख्य प्रकाशन संस्था आहेत, ज्या प्रकाशन व्यवसाय म्हणून कार्यरत असून अनुवादाच्या प्रकाशनावर सर्वांचाच भर आहे. जवळपास दर शब्दाला एक रुपयाचे मानधन देऊन अनुवाद करून घेतले जातात. तेव्हा प्रकाशन संस्थांच्या वतीनेही अनुवादकांना रोजगाराची संधी मिळते, ही बाब नक्कीच महत्त्वाची म्हणावी लागेल.

**साहित्य अकादमी व तत्सम संस्था**

साहित्य अकादमी ही एक राष्ट्रीय अकादमी असून २४ भारतीय भाषांचे साहित्य व त्यांच्या अनुवादाच्या विकासास चालना देण्याच्या मुख्य हेतूने १९५४ पासून कार्यरत आहे. मुख्य कार्यालय दिल्ली येथे असून तिची क्षेत्रीय कार्यालये मुंबई, बेंगळूर, कलकत्ता आणि चेन्नई येथे आहेत. सर्व भारतीय भाषांचा मिळून जवळपास दीडलाखांहून अधिक पुस्तकांचा संग्रह आहे. यामध्ये मराठी भाषेचीही अनेक पुस्तके आहेत. तसेच इतर भाषांचे अनुवादही मराठीत आहेत. अकादमीचे बहुभाषी ग्रंथालय हे एक अद्भुत ग्रंथालय म्हणावे लागेल. विशेषतः अनुवादाच्या संदर्भात सांगायचे झाले तर अनुवाद मराठीत व मराठीतून इतर भाषेत करण्याची क्षमता असलेल्यांना अर्थार्जनाची चांगली संधी मिळत आहे. साहित्य अकादमीच्या वतीने अनुवादकाची यादीही केली जाते. यासाठी अनुवाद केंद्रेही स्थापित केलेली आहेत. अनुवादकाला उचित मानधन दिले जात आहे.

या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, ज्ञानपीठ पुरस्कार व प्रकाशन संस्था दिल्ली यांसारख्या महत्त्वाच्या संस्थांही अनुवाद कार्य, अनुवाद संपादन,

अनुवाद प्रकाशन, अनुवाद पुरस्कार इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून अनुवादकास अर्थार्जनाचे स्रोत उपलब्ध करून देत असतात. देशातील सर्वोच्च मान्यताप्राप्त ज्ञानपीठसारख्या पुरस्काराची प्रक्रिया देखील अनुवादाच्या माध्यमातून पूर्ण होते. वेगवेगळ्या भारतीय भाषेतील साहित्यकारास पुरस्कार घोषित होताच प्रकाशन संस्था, साहित्य अकादमी व नामांकित प्रकाशने पुरस्कार प्राप्त साहित्यकृतीचा अनुवाद करण्यासाठी अनुवादकाच्या शोधात असतात. तेव्हा अनुवादकास अर्थार्जनाची संधी मिळत असते. अनुवादाच्या प्रकाशनासाठी आता प्रादेशिकच नाही, तर राष्ट्रीय व जागतिक प्रकाशन संस्थाही प्रयत्नशील असल्याने अनुवाद क्षेत्रास चांगले दिवस आलेले आहेत. तेव्हा या संधीचा पूरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न अनुवादकाने केला पाहिजे. भाषेच्या अभ्यासकांनी भाषा अभ्यासाचे उपयोजन समजून घेऊन अनुवादाच्या माध्यमातून आर्थिक उन्नतीची संधी सत्कारणी लावली पाहिजे.

**चित्रपट**

मनोरंजन आणि प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून चित्रपटाकडे पाहिले जाते. लोकरंजनातून लोकशिक्षणाचे परिणामकारक काम करणारे साधन म्हणून देखील याची ओळख असल्याचे दिसते. म्हणूनच आपल्या देशात चित्रपटाचा फार मोठा रसिक वर्ग असल्याचे पहायला मिळते. यामुळे मराठी आणि हिंदीबरोबरच आपल्या देशातील वेगवेगळ्या भाषांतून चित्रपटाचे क्षेत्र हा मोठा उद्योग झालेला आहे. काही प्रमुख उद्योगामध्ये हा गणला, जाऊ लागला आहे. खरेतर चित्रपट हा रंगारंग आणि प्रतिष्ठित व्यवसाय म्हणून देखील प्रसिद्धीस आला आहे.

परिणामतः अनुवादासाठी चित्रपट सृष्टीतही अर्थार्जनाच्या संधी वाढू लागल्या आहेत. चित्रपटाचे जसे अनेक प्रकार पुढे आले तसे त्यात अनेक प्रकारे अनुवादाची कामं मिळू लागली आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे चित्रपट, उदाहरणार्थ लघुपट, बोलपट, माहितीपट, प्रसिद्धीपट, प्रबोधनपट, आरोग्य, शिक्षण, लोकशिक्षण, लोकप्रबोधन, पर्यावरण आणि लोकजागरण इत्यादी प्रकारचे लघुपट देखील आज मराठी, हिंदी, इंग्रजीबरोबर वेगवेगळ्या भाषांमध्ये निर्माण होत आहेत.

चित्रपट क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारचे अनुवादकार्य करण्याची संधी असते, उदाहरणार्थ संपूर्ण कथेचा अनुवाद तसेच पटकथा, संवाद, शीर्षक आणि उपशीर्षक यांचा प्रामुख्याने समावेश होतो. डबिंग हे देखील एक महत्वाचे क्षेत्र आहे. यामध्ये भाषा प्रभुत्व, उच्चारांमधील शुद्धता, स्पष्टता व चांगला आवाज असणाऱ्यांना अर्थार्जनाची संधी अधिक असते. विशेषतः दक्षिण भारतीय भाषा आणि हिंदीतूनही मराठीत कित्येक चित्रपट डबिंग केल्याचे दिसते. तसेच दक्षिणेतील अनेक भाषांचे चित्रपट मराठी आणि हिंदीत डबिंग होऊन येतात. तेव्हा चित्रपट सृष्टीत देखील अनुवादकास अर्थप्राप्तीची चांगली संधी आहे हे ध्यानात घेणे गरजेचे आहे.

**जाहिरात**

जाहिरात ही संकल्पना तशी खूप जुनीच परंतु जागतिकीकरणाच्या काळात तिला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवी जीवनात जगण्याच्या सर्वच क्षेत्रात जाहिरातीला असाधारण महत्त्व मिळाले आहे. आज

व्यावसायिक मनोवृत्ती आणि स्पर्धेमुळे तिला पर्याय उरला नाही. तिचे महत्त्व, औचित्य, आवश्यकता, उपयुक्तता वाढण्याची काही प्रमुख कारणे अशी- आपले उत्पादन वस्तू किंवा व्यवसायाची माहिती देणे, गुणधर्म, वैशिष्ट्य सांगणे, ग्राहकांना आकर्षित करणे, खप वाढविणे. व्यावसायिक स्पर्धेत टिकून राहणे, यशस्वी होणे, जाहिरात वाचक/ दर्शकांचे ग्राहकात रूपांतर करणे, गरज असो वा नसो खरेदी करण्यास प्रवृत करणे, विक्रीचे प्रमाण वाढविणे, अधिक धनार्जन करणे आणि आपल्या उद्योग- व्यवसायात चांगले यश संपादन करणे इत्यादी. हे सर्व करण्याची जिच्यात क्षमता, ताकद असते ती जाहिरात होय. आजच्या संदर्भात बोलायचे झाले तर गरज नसताना खरेदी करण्यास प्रवृत्त करते ती खरी यशस्वी जाहिरात होय.

जाहिरातीची रूपं आणि प्रकार देखील अनंत आहेत. प्रामुख्याने जेवढी माध्यमं तेवढ्या प्रकारच्या जाहिराती. परंतु ढोबळमानाने मुद्रित माध्यमे (प्रिंट मीडिया) आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया ही जाहिरातीची वेगवेगळी रूपे/ प्रकार दर्शवीत असतात. वृत्तपत्र, दूरदर्शन, विविध वाहिन्या, चित्रपट, विविध सार्वजनिक दर्शनीय स्थळं यातून जाहिराती अनेक रूपात झळकत असतात. स्टीकर, पोस्टर, बॅनर, पाम्पलेट, होर्डिंग इत्यादी जाहिरातीची आधुनिक रूपं दर्शवितात. एकूण हेतू हा की, प्रसिद्धी व खप वाढवण्यासाठी ग्राहकांना/आकर्षित करणे आणि व्यावसायिक भरभराट करणे.

आज जाहिरातीचे क्षेत्र देखील अनुवादाच्या माध्यमातून रोजगार मिळवून देण्यास उपयुक्त ठरत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी व विविध भारतीय भाषांमध्ये जाहिरातीचे प्राबल्य वाढत असल्याचे दिसते. मौलिक, कल्पक, कलात्मक, आकर्षक, प्रभावकारी आणि लोभस जाहिराती वाचक/ दर्शक यांना नेहमीच भुरळ पाडत असतात. गरज नसताना क्रयशक्तीस प्रेरणा देत असतात. पण यासाठी प्रभावशाली भाषा, रंग, रूप, आकार प्रकार आणि समर्पक अनुवादाची गरज असते. तेव्हा स्थानिक पातळीपासून ते बहुराष्ट्रीय कंपन्यांपर्यंत- सर्वांनाच आपले उत्पादन देशाच्या व जगाच्या कानाकोपऱ्यात पोचवण्यासाठी त्या त्या ठिकाणच्या भाषांमध्ये उत्कृष्ट अनुवादकांची गरज असते. तेव्हा वाढत्या बाजार क्षेत्रात आणि जागतिकीकरणाच्या आजच्या काळात अनुवादाच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या संधी अधिकाधिक उपलब्ध आहेत हे मात्र नक्की.

**भारतीय अनुवाद संघ**

महाराष्ट्रातील 'महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ वर्धा' या विद्यापीठाने 'भारतीय अनुवाद संघ' या नावाने अनुवादकांचा समूह तयार करण्याचे महत्त्वाचे काम हाती घेतले आहे. यामध्ये देशी व परदेशी मिळून तेवीस भाषांच्या अनुवादकांचा समावेश आहे. या तेवीसमध्ये देखील 'मराठी- हिंदी' हाही एक अनुवादकांचा समूह तयार केलेला आहे. हा संघ स्थापित करण्याचा उद्देश हा आहे की, ज्ञान, विज्ञान, समाजविज्ञान, तंत्रज्ञान आणि इतर कोणत्याही प्रकारची समाज उपयोगी सामग्री/ माहिती ही अनुवादाच्या माध्यमातून त्या-त्या समाजापर्यंत त्या- त्या भाषेत उपलब्ध करून द्यावी. यातून सामाजिक विकासाच्या कार्यास गती मिळावी. एकूणच जागतिक पातळीवर मानवसमाज प्रगत, प्रगल्भ व समद्ध व्हावा.

तेव्हा 'भारतीय अनुवाद संघ' या नावाने स्थापित संघात देखील मराठी भाषेचा समावेश असल्याने मराठी भाषेच्या अभ्यासकांना अनुवादाचे काम करण्याची व त्यातून अर्थार्जनाची संधी चालून आलेली आहे. यामध्ये अभिरुचीनुसार ज्ञान आधारित सामग्री, साहित्येतर, वैज्ञानिक, तांत्रिक आणि इतर सामग्री अशा एकूण प्रमुख पाच क्षेत्रांमध्ये अनुवादाचे काम करणाऱ्या अनुवादकांची वर्गवारी केलेली आहे. अनुवादकास आपल्या आवडीप्रमाणे निवडीस देखील वाव आहे. अर्थात इथे देखील अनुवादकास अर्थार्जनाची चांगली संधी असल्याचे दिसते.

**समारोप**

मानवी जीवनात स्वाभिमानी, यशस्वी, अर्थपूर्ण व समृद्ध जीवन जगण्याचे आज कित्येक स्रोत, कित्येक मार्ग, कित्येक क्षेत्रं आणि साधनं उपलब्ध आहेत. अनुवाद हे त्यापैकी एक आहे. त्यासाठी आपली इच्छाशक्ती असणे, आपल्यातील क्षमता विकसित करणे आणि प्रयत्न, परिश्रम व कष्ट करण्याची तयारी ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी आवड, निवड आणि सवड या बाबी सुद्धा निर्णायक ठरतात. आपल्या कार्यक्षेत्राचे आयोजन, नियोजन, अर्पण व समर्पण हे तितकेच यशापयशाचे वाटेकरी असतात. भाषेच्या अभ्यासकांना भाषेच्या ज्ञानाचे उपयोजन आज रोजगाराच्या सर्वाधिक संधी देऊ शकते. मराठी भाषा ही त्यास अपवाद नाही. यासाठी मराठीस ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाची भाषा म्हणून विकसित करण्याचे काम जाणीवपूर्वक होणे महत्त्वाचे आहे. शासन, अध्यापक व प्राध्यापक यांच्या इच्छा व क्रिया शक्तीवर हे साध्य होऊ शकते. आज अनुवादाच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या अनंत संधी उंबरठ्यावर उभ्या आहेत. महत्त्वाचे इतकेच की, त्यांचे स्वागत करणे आपल्यावर अवलंबून आहे.

## क) मराठी टंकलेखन, युनिकोड व पीपीटी (Power Point Presentation)

**प्रास्ताविक**

औद्योगिकीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील अग्रेसर राज्य आहे. ग्रामीण भागात यशस्वी उद्योगांची निर्मिती करून किर्लोस्कर उद्योग समूहाने यशोगाथा रचली. त्याचसोबत महाराष्ट्रात अनेक मोठ्या उद्योगसमूहांनी आपला व्यवसाय विस्तारला. मुंबई बरोबर पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, जेजुरी, बारामती अशा शहरांतही मोठ्या प्रमाणात उद्योग सुरू झाले. कोल्हापूरलाही उद्योग व्यवसायाचा मोठा वारसा आहे. टाटा, बजाज, रिलायन्स, व्हिडीओकॉन, जैन असे अनेक उद्योगसमूह विविध शहरांमध्ये सुरू झाले. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तथा एमआयडीसीच्या माध्यमातून या उद्योगांना जमिनीसह अन्य पायाभूत सुविधा कशा उपलब्ध होतील, याची काळजी घेतली. यामुळे तालुका आणि जिल्हा पातळीवर उद्योगांचे जाळे निर्माण होत गेले. काही स्थानिक गरजा ओळखून व्यवसाय निर्माण झाले. महाराष्ट्राचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सहकार चळवळ. भारतातील अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रात सहकार चळवळ चांगलीच रुजली. या चळवळीतून सहकारी साखर कारखाने आणि सूतगिरण्या मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या. यातील अनेक कंपन्यांमधून महाराष्ट्रातील लोक कर्मचारी म्हणून सेवा बजावत आहेत.

उद्योगातील व्यावसायिकपणा जपत असताना यातील अनेक उद्योगांनी येथील समाजाचे, मातीचे आपण काही तरी देणे लागतो, या भावनेतून अनेक उपक्रम सुरू केले. मराठी नियतकालिके हा यातील एक उपक्रम. या नियतकालिकांबाबत दोन महत्त्वाचे भाग होते. यातील किर्लोस्कर, मनोहर, स्त्री अशी नियतकालिके त्या-त्या विषयातील साहित्याला वाहिलेली होती. यातून आपोआप व्यवसायाची जाहिरातही होत असे. वाचकांना चांगले साहित्य उपलब्ध होत असे. महाराष्ट्रात आजही अशा स्वरूपाची नियतकालिके प्रसिद्ध होत आहेत. त्याचबरोबर अनेक उद्योगांनी आपल्या उद्योगवाढीसाठी काही नियतकालिके सुरू केली आहेत. त्यामधून संबंधित विषयाला वाहिलेला मजकूर प्रसिद्ध करण्यात येतो. उदाहरणार्थ जैन उद्योग समूह 'जलसिंचन' विषयाला वाहिलेले मासिक प्रसिद्ध करते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना या क्षेत्रातील नव्या संशोधनाबद्दल अद्ययावत ठेवण्याचे कार्य यातून आपोआप होत असते.

आणखी महत्त्वाचा घटक आहे तो उद्योगातील सामान्य कर्मचारी, अधिकारी यांना उद्योगाची ध्येयधोरणे, निर्णय याबाबत अवगत करणे. त्यासाठी चालणारा पत्रव्यवहार तसेच महाराष्ट्रातील उद्योग आणि व्यावसायिकांसोबत होत असणारा पत्रव्यवहार हा होय. यासाठी उद्योगांना मराठी भाषेचा वापर करावा लागतो. महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालयांशी चालणारा पत्रव्यवहार मराठी भाषेतून करणे आवश्यक बनते. यासाठी कार्यालयीन कामकाजाचा भाग म्हणून मराठी टंकलेखन ही गरज आहे. यापूर्वी डिक्टेशन दिले जात असे. ते लघुलेखक लघुलेखन करून घेत आणि नंतर टंकलिखित मसुदा मान्यतेसाठी सादर केला जात असे. आजच्या युगात टंकलेखनासाठी लघुलेखनाची गरज भासत नाही. तसेच संगणक प्रणालीचा थेट वापर होत असल्याने मसुद्यामध्ये दुरुस्त्या करणे, हे त्रासाचे राहिलेले नाही.

**टंकलेखन**

कार्यालयीन कामकाजात सुबकता आणणारे हे यंत्र अनेक वर्षे आपली सेवा देत होते. आज हे यंत्र इतिहासजमा झाले असून त्याऐवजी संगणकाचा वापर होऊ लागला आहे. मात्र मागील अनेक दशके साधारण सव्वा घनफूट आकाराची यंत्रे कार्यालय जागे असल्याची जाणीव करून देत असायची. कुशल टंकलेखकाचा एका विशिष्ट लयीमध्ये आवाज येत असे आणि कोण टंकलेखन करत असेल, याचा अंदाज कुशाग्र बुद्धीच्या साहेबास येत असे. या टंकलेखन यंत्रावर चार ते सहा प्रती एका वेळी काढता येत असत.

हेन्री मिल यांनी टंकलेखनाचे पहिले एकस्व पेटंट १७१४ साली घेतले होते. मात्र क्रिस्टोफर लेथम शोल्झ यांच्या चमूने तयार केलेले यंत्र रेमिंग्टन कंपनीमार्फत १८७४ मध्ये बाजारात विक्रीस उपलब्ध झाले. त्या वेळेपासून गेल्या दशकापर्यंत रेमिंग्टन हे टंकलेखन क्षेत्रातील मोठे नाव होते. या यंत्रामध्ये दोन ओळीतील अंतर निश्चित करणे, कागद वाहक पुन्हा मूळ जागी नेण्याची व्यवस्था, अक्षर छापल्यानंतर आवश्यक तेवढा रूळ पुढे-मागे करण्याची सुविधा, प्रत्येक टंक एकाच जागेवर आदळेल, अशा सुविधा करण्यात आल्या होत्या. टंकांचे तुकडे हे तरफा आणि तारा वापरून कार्यान्वित करण्यात येत. या यंत्रामुळे छापील मजकुराप्रमाणे अक्षरे असणारा पत्रव्यवहार करता येणे शक्य झाले. अक्षरांच्या जागा निश्चित केल्या असल्याने

कोणती कळ दाबून कोणते अक्षर छापले जाते, हे निश्चित झाले होते. यातून टंकलेखनाची गती वाढली. तसेच कौशल्यधारक टंकलेखकांना महत्त्व प्राप्त झाले.

जलद आणि सुवाच्य टंकलेखनासाठी कोणत्या बोटाने कळफलकातील कोणत्या अक्षराची कळ दाबावी, याचा अभ्यास करून विशिष्ट पद्धती विकसित करण्यात आली. या यंत्रावर टंकलेखन शिकवणाऱ्या प्रशिक्षकांचे वर्ग तालुका पातळीवरही सुरू झाले. अशा प्रकारे आपली बोटे आणि कळफलक यांच्यात समन्वय साधण्यात यशस्वी झालेल्यांना कळफलकाकडे न पाहता केवळ मजकूर वाचत टंकलेखन करण्याची कला साध्य झाली. अशा प्रकारे टंकलेखन पद्धतीला 'स्पर्श पद्धत' असे म्हणत. पुढे प्रादेशिक भाषातील टंकलेखनासाठीची यंत्रेही विकसित झाली आणि त्यासाठीही टंकलेखन शिकण्यासाठी अशाच प्रकारचे मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण वर्ग सुरू झाले. अर्थात मराठी टंकलेखन अधिक कौशल्याचे होते. मराठीमध्ये असणारी जास्त अक्षरांची संख्या, स्वर, व्यंजने आणि इतर जोडशब्द निर्मिती यातून मराठी टंकलेखन इंग्रजीपेक्षा निश्चित कठीण होते. मात्र वेळ जास्त लागला तरीही मराठी टंकलेखन सर्वत्र वापरण्यात येऊ लागले.

भारतात १९३० पर्यंत परदेशातून सुटे भाग आणून टंकलेखन यंत्रे बनवली जात असत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गोदरेज कंपनीने भारतातच सुटे भाग बनवून टंकलेखन यंत्रे बनवण्यास सुरुवात केली. भारतासाठी गोदरेज टंकलेखन क्षेत्रातील मोठे नाव राहिले. २०१६ पासून टंकलेखन यंत्रांचे उत्पादन पूर्णत: बंद झाले. त्याच वर्षीपासून टंकलेखन यंत्रावर घेतली जाणारी परीक्षाही बंद झाली. दरम्यानच्या कालखंडात इलेक्ट्रॉनिक टंकलेखन यंत्रे आली. त्यांच्यावरही साध्या टंकलेखन यंत्राप्रमाणे तशाच कळफलकाचा वापर करून टंकलेखन करणे शक्य होत असे. मात्र ही यंत्रे म्हणावी तशी प्रसिद्ध झाली नाहीत. त्याऐवजी संगणकावरील मजकूर छापण्यासाठीची यंत्रे अधिकाधिक सुबक आणि सुंदर छपाई करतील, यासाठी संशोधक आणि तंत्रज्ञांनी प्रयत्न केले आणि मागील तीस वर्षांमध्ये या क्षेत्रात मोठी क्रांती झाली. आज पडद्यावर जसे दिसते, तशीच छपाई करणारी यंत्रे उपलब्ध आहेत.

त्यामुळे आज संगणकावरील टंकलेखनाची सुविधा सर्वत्र वापरली जाते.संशोधन, गणितीय कार्य यासाठी मूलत: संगणक प्रणाली विकसित झाली. मात्र त्याच प्रणालीचा वापर कार्यालय व्यवस्थापनासाठी झाला आणि आज संगणक हा कार्यालयांचा अविभाज्य भाग बनला आहे. यातीलच एक भाग आहे तो टंकलेखनाचा. संगणकासाठी टंकलेखन प्रणाली कळफलकाच्या आधारावरच निश्चित करण्यात आली आहे. अर्थातच संगणकांचा विकास हा अमेरिका आणि पाश्चात्त्य राष्ट्रामध्ये झाल्याने या सर्व सुविधाही सुरुवातीला इंग्रजीमध्येच उपलब्ध झाल्या. त्यानंतर इतर भाषांमध्ये या सुविधा उपलब्ध करण्यासाठी तंत्रज्ञ कार्यरत राहिले. संगणकावर मराठीमध्ये टंकलेखन करण्यासाठी सुरुवातीला खूप अडचणी येत होत्या. अगदी प्राथमिक अवस्थेत कृतिदेव, किरण, शिवाजी इत्यादी विविध मुद्रा (फाँट) विकसित झाल्या. पूर्व टंकलेखन काळामध्ये इझम, श्रीलिपीसारखी अनेक सॉफ्टवेअरही विकसित झाली. मराठी छपाई क्षेत्रात वापरल्या जात असलेल्या विविध मुद्रांमध्ये एकसारखेपणा नव्हता. त्यामुळे सुसंगतीही (कॉपॅटिबिलिटी) नसते. त्यामुळे मराठी टंकलेखनासाठीचा कळफलक प्रमाणित करण्यात अडचणी येत. एकच व्यक्ती अनेक टंक वापरू शकत नसे. मराठीसाठीचे टंक व्यापारी तत्त्वावर निर्माण झालेले नव्हते. त्यामुळे ते खरेदी करणे सर्वांनाच परवडत नसे.

सी-डॅक संस्थेने निर्माण केलेले टंक मर्यादित आहेत. मात्र ते मोफत आहेत. व्यापारी तत्त्वावर मराठी टंक विकताना ग्राहकाच्या गरजेनुसार त्यामध्ये -NSI, UNICODE पर्याय पुरवत नाहीत. आपोआप डाउनलोड होणारे टंक हे शोधयंत्रामध्ये (सर्च इंजिन) वापरता येत नाहीत. युनिकोड धर्तीचे टंक विंडोज-२००० व नंतरच्या सर्व प्रणालीसोबत येतात. हे टंक हिंदी भाषा समोर ठेऊन तयार केलेले आहेत. त्यामुळे हिंदी टंकलेखन तर खूप सुंदर होते. मराठीसाठी मात्र समस्या निर्माण होतात. सर्व अक्षरे योग्य पद्धतीने टंकलेखन करता येतील, असे खूपच कमी टंक आहेत.

मात्र सध्या **युनिकोड**मुळे संगणकावर मराठी टंकलेखन करणे खूपच सोपे झाले आहे. टंकलेखनाचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. आधुनिक टंकलेखन पद्धतीच्या पहिल्या टप्प्यामध्ये युनिकोड टंक आणि विविध कळफलक पर्याय यांचा समावेश होता. 'युनिकोड' कळफलक हा भाषा शास्त्रानुसार विकसित करण्यात आला. हा लिनक्स या ऑपरेटिंग सिस्टमवर उपलब्ध ठेवण्यात आला होता. ज्यांना पारंपरिक टंकलेखन पद्धतीचा सराव आहे, अशांसाठी देवनागरी 'इनस्क्रिप्ट' कळफलक हा विंडोज आणि लिनक्सवर उपलब्ध आहे.

त्यानंतर कुठलेही प्रशिक्षण न घेता टंकलेखन करणारांमध्ये प्रसिद्ध पावलेली टंकलेखन पद्धती ही आधुनिक टंकलेखन पद्धती दोन म्हणून ओळखली जाते. मायक्रोसॉफ्टद्वारा इंडिक टूल विकसित करण्यात आले. हे विंडोज एक्सपी, व्हिस्टा, विंडोज - ७, ८, ८.१, १० या सर्व प्रणालींवर कार्यरत राहते. तसेच, गुगल इनपुट टूल ही गुगल कंपनीने विकसित केलेली लिप्यंतर प्रणाली आहे. ही प्रणालीही विंडोज एक्सपी, व्हिस्टा, विंडोज ७, ८, ८.२, १० बरोबर गुगल क्रोम ब्राउजरवरही वापरता येते. त्याहीपुढे ऑप्टिकल कॅरॅक्टर रीडर (ओसीआर) तंत्रज्ञान विकसित झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे जुने मराठी सुवाच्य अक्षरातील स्कॅन केलेले दस्त आणि छायाचित्ररूपातील दस्तांचे स्वयंचलित पद्धतीने टंकन करता येऊ लागले. यासाठी उपलब्ध असणारे ओसीआर ही प्रणाली लिनक्सवर उपलब्ध आहे. गुगलने आता अनेक सुवाच्य देवनागरी टंक वापरकर्त्यांसाठी मोफत उपलब्ध केले आहेत.

मराठी टंकलेखन प्रक्रिया आता अधिक सुकर झाली आहे. त्यातही मागील काही वर्षांत ध्वन्याधारित (फोनॅटिक्स) टंकन पद्धती आली आहे. त्यासाठी गुगल इनपुट टूलचा वापर करून आंतरजाल उपलब्ध असताना आपण संगणकावर थेट टंकलेखन करू शकतो. त्याची तपशीलवार माहिती यापूर्वी 'आंतरजालावरील मराठी लेखन' या पाठामध्ये देण्यात आली आहे. येथे आपण फक्त इनस्क्रिप्ट टंकलेखन कसे करावे, याचा विचार करणार आहोत.

यासाठी सर्वप्रथम मराठी इनस्क्रिप्ट कळपट कार्यान्वित करावा लागतो. त्यासाठी सर्वप्रथम विंडोजमध्ये कंट्रोल पॅनेलला जावे लागते. त्यातील "Region and Language" या पर्यायाला निवडावे लागते. जर हा पर्याय दिसत नसेल तर लार्ज आयकॉन या ठिकाणी जाऊन क्लिक केल्यानंतर आपणास Region and Language पर्याय दिसू लागतो. त्यास निवडल्यानंतर तेथे आपणास फॉरमॅट, लोकेशन, किबोर्ड अँड लँग्वेजेस आणि ॲडमिनिस्ट्रेटीव्ह असे पर्याय दिसतील. यातील 'कीबोर्ड अँड लँग्वेजेस' हा पर्याय निवडावा

लागतो. फॉरमॅटमध्ये इंग्लिश (इंडिया) हा फॉरमॅट निवडल्यानंतर कीबोर्ड अँड लँग्वेजेस निवडले जाते. ती कळ दाबल्यानंतर खाली 'चेंज कीबोर्ड' आणि 'इंस्टॉल अनइंस्टॉलड लँग्वेजेस' असे दोन पर्याय उपलब्ध होतात. यातील 'चेंज कीबोर्ड' कळ दाबली की आपल्यासमोर जनरल, लँग्वेज बार आणि ॲडव्हान्स्ड की सेटींग असे तीन पर्याय येतात. त्यातील जनरल या पर्यायामधून 'ॲड कीबोर्ड' हा पर्याय निवडावा. ॲड कळ दाबल्यानंतर जगातील अनेक भाषांचे पर्याय आपल्यासमोर येतात. त्यातील मराठी (इंडिया) भाषा निवडावी लागते. त्याखाली कीबोर्ड आणि अदर असे दोन पर्याय येतात. त्यातील कीबोर्ड हा पर्याय निवडावा लागतो. कीबोर्डखाली लगेच देवनागरी इनस्क्रिप्ट, गुगल इनपुट टुल्स, मराठी, युएस आणि शो मोअर असे पर्याय दिसतात. त्यातील देवनागरी इनस्क्रिप्ट हा पर्याय निवडावा. त्यानंतर त्याचा प्रिव्ह्यू पाहता येतो. त्यात कळपाट कसा कार्य करणार, ते दिसते. नाही तर थेट ओके हा पर्याय निवडता येतो. त्यानंतर पुन्हा ॲडव्हान्स्ड की सेटिंगमध्ये जावे लागते. तेथे आपणास इनस्क्रिप्ट कळपाट कार्यान्वित करण्यासाठी कळफलकाच्या डावीकडील अल्टर+ शिफ्ट ही कळ दाबावी लागते, हे लक्षात ठेवावे लागते. त्यानंतर खाली येऊन अप्लाय आणि ओके या कळा क्रमश: दाबाव्या लागतात. त्यानंतर वर्डमध्ये जाऊन सुरुवातीला इंग्रजीत टंकलेखन करता येते. आता मराठीमध्ये जाण्यासाठी डावीकडील अल्टर+ शिफ्ट कार्यान्वित करावे लागते. त्यानंतर आपोआप मराठी कळपटाप्रमाणे संगणकाचा कळपट काम करू लागतो. तसेच खालील बारवर उजव्या बाजूला 'एमए' अशी अक्षरे दिसतात. याचाच अर्थ 'मराठी इनस्क्रिप्ट' कळपाट कार्यान्वित झालेला आहे.

टंकलेखनासाठी ISM प्रणाली आपल्या संगणकावर स्थापित करता येते. मात्र ती सी-डॅककडून विकत घ्यावी लागते. या साधनाचा वापर करून थेट टंकलेखन करता येते. मराठी भाषेतील दोन प्रकारच्या कळपट्टिका यावर उपलब्ध होतात. टंकलेखनाचा अभ्यासक्रम झाला आहे, त्यांना लगेचच मराठी टंकलेखन करणे शक्य होते. मात्र तसा आपल्याला सराव नसेल, तर कळफलक समोर ठेवून काही दिवस सराव केल्यास टंकलेखन करणे शक्य होते. त्यामुळे मराठी टंकलेखन करणे अत्यंत सोपे आहे. युनिकोडचा वापर करणे आणि त्यातून आपले साहित्य प्रसिद्ध करण्यामुळे मराठी भाषेला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी मदत होणार आहे.

आज सर्वत्र गुगल सर्च इंजिन आणि गुगलनिर्मित विविध ॲप्लिकेशन्ससाठी इनस्क्रिप्ट कीबोर्ड वापरणे अत्यंत सोयीचे आहे. त्याचप्रमाणे तो जगातील कोणत्याही संगणकावर उपलब्ध असतो. तसेच, याद्वारे पाठवलेले इमेल संदेश आणि इतर फाईल्स् आहे तशा स्वरूपात दिसतात. जगभरामध्ये आज ही पद्धती अंमलात येत असल्याने इनस्क्रिप्ट कळपाट वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे इनस्क्रिप्ट कळपाट वापरणे प्रत्येकाने शिकून घेणे आवश्यक आहे. गुगल इनपुट टुल्स मराठीच्या माध्यमातून फोनेटिक पद्धतीने टंकलेखन करता येते. या पद्धतीने टंकलेखन करण्यासाठी इंग्रजीमध्ये मराठी शब्दांचे स्पेलिंग करता येणे आवश्यक आहे. याखेरीज तिसऱ्या विकल्पामध्ये आंतरजाल उपलब्ध नसताना मराठी भाषेतून लेखन करता यावे, याकरिता Google input Marathi download उपलब्ध आहे. विंडोजमध्ये हे साधन वापरता येते. आपल्याला इंग्रजी भाषेतील स्पेलिंग लिहिता येत असेल, तर मराठी भाषेतील लेखनाची आपणास सुरुवात

करता येते. हे लेखन करताना सुरुवातीला नमूद केल्यानुसार गुगल इनपुट टूल प्लस वापरून मराठीमध्ये टंकलेखन करू शकतो.

गुगल इनपुट टुलमध्ये एमएस-वर्डमध्ये सुरुवातीला एक फाईल ओपन करणे आवश्यक आहे. त्यानंतर टंकलेखनास सुरुवात करावी. "Chhatrapati Shivaji Maharajani Swarajya Sthapan kele" हे टंकलेखन करताच 'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले' हे शब्द पडद्यावर दिसू लागतात. यातील स्पेलिंग टाईप करताना इंग्रजी अक्षरांचे टंकलेखन करत असताना वेगवेगळे पर्याय असणारे शब्द दिसून येतात. त्यातील काही शब्द अशुद्ध रूपात येतात. उदाहरणार्थ, 'कळावीत' शब्दाचे स्पेलिंग Kalavit असे आपण लिहितो. मात्र त्यानंतर काळवीट, काळविट, कळवीत, कळावीत, कलावित आणि kalavit असे पर्याय दिसू लागतात. त्यातील योग्य पर्याय आपण निवडणे आवश्यक आहे. पुरेसा मजकूर टंकलिखित झाल्यानंतर तो कॉपी करून घ्यावयाचा आणि तो एमएस-वर्डमधील फाईलमध्ये चिकटवायचा. त्यानंतर ती कोणत्याही प्लॅटफॉर्मवर जशीच्या तशी दिसते.

टंकलिखित केलेला मजकूर आकर्षक दिसावा, यासाठी त्यामध्ये काही सुधारणा आणि बदल करण्याची सुविधा वापरता येते. शीर्षक हे देवनागरी अक्षरामध्ये लेखन केल्यानंतर इंग्रजी टंकलेखनाप्रमाणेच बोल्ड सुविधेचा वापर करून ठळक करता येते. परिच्छेद कोठे आणि कसा घ्यावयाचा, हे निश्चित करता येते. काही शब्दांकडे लक्ष वेधून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी तिरक्या अक्षरांचा (italic) किंवा ते शब्द अधोरेखित करण्याचा पर्याय वापरता येतो. अक्षरांचा आकार, त्यांचा नमुना हे आपल्या आवडीनुसार किंवा ज्यांच्यासाठी हा मजकूर लिहिला आहे, त्यांच्या सोयीच्या टंकामध्ये रूपांतरित करता येतो. त्यासाठी ऑनलाईन अनेक रूपांतरक (converter) उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करून आपले टंकलेखन अधिक आकर्षक करता येते.

### पीपीटी (Power Point Presentation)

पीपीटी किंवा पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन हा सादरीकरणाचा प्रकार संगणकाच्या सुलभीकरणासोबत विकसित झाला आहे. आपल्याला जे सांगावयाचे आहे, ते अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी या सुविधेचा वापर करण्यात येतो. पूर्वीच्या 'चॉक अँड टॉक' या अध्यापन पद्धतीऐवजी ही नवी पद्धती आता अध्यापनातही प्रभावीपणे वापरली जात आहे. विविध उद्योग समूहांची सादरीकरणे, प्रकल्पांचे सादरीकरण यासाठीही पीपीटीचा वापर केला जातो. पीपीटीमध्ये मजकूर आवाज आणि चलचित्रफित समाविष्ट करणे शक्य आहे. यासाठी आपणास पीपीटी फाईल उघडावी लागते.

नवीन फाईल बनवण्यासाठी सर्वप्रथम मायक्रोसॉफ्ट पॉवर पॉईंट सुरू करा. एक नवी कोरी स्लाईड समोर दिसेल. त्यामध्ये दोन भाग असतात. पहिल्या स्लाईडच्या वरील भागात सादरीकरणाचे शीर्षक आणि दुसऱ्या भागात सादरकर्ता आणि त्याची अतिसंक्षिप्त माहिती असावी. त्यानंतर डिजाईन पर्याय निवडावा लागतो. सादरीकरणासाठी आपण ज्या स्लाईडस् बनवणार आहोत, त्यासाठी आकर्षक मूळ रचना (डिजाईन) निवडणे आवश्यक आहे. आपल्या विषयास अनुसरून ही रचना आणि तिचा रंग असावा. उदाहरणार्थ, पाणी

या विषयावर सादरीकरणासाठी निळा रंग अधिक योग्य राहतो. आपल्याला ज्या विषयाचे सादरीकरण तयार करावयाचे त्याचे शीर्षक निवडा. सादरीकरणामध्ये पुरेशा स्लाईडस असाव्यात. आपल्या सादरीकरणासाठी योग्य टंक आणि आकार निवडणे आवश्यक आहे. तो आवश्यकतेनुसार बदलता येतो. शक्यतो प्रत्येक स्लाईडच्या वरती उजव्या कोपऱ्यात संस्थेचा, कंपनीचा अधिकृत लोगो असावा. दुसऱ्या स्लाईडमध्ये आपल्या शीर्षकास अनुसरून विषयाची ओळख असावी. त्यानंतर क्रमाने श्रोत्यापर्यंत आपला विषय अधिकाधिक चांगल्या पद्धतीने पोहोचेल, अशा प्रकारे माहिती असावी. ती ज्या क्रमाने सादर करावयाची आहे, त्या क्रमाने स्लाईडस बनवाव्यात. फाईलमधील स्लाईडचा क्रम आपणास बदलताही येतो. या प्रणालीत मूळ स्लाईडमध्ये दोन भाग येतात. वरील भाग शीर्षकासाठी आणि खालील भाग मजकुरासाठी वापरावा. शीर्षकाच्या टंकाचा आकार मोठा असावा आणि त्यानुसार मजकुरासाठी आकार निवडावा. मात्र काही आकृत्या, चित्रे आपणास समाविष्ट करावयाची असल्यास आणखी भाग पाडता येतात. तसेच अशा स्वरूपाची रचना असणारी स्लाईड आपणास निवडता येते. साधारण पंधरा ते वीस स्लाईडस्चे सादरीकरण चांगले मानले जाते. अशा सादरीकरणामध्ये आलेख, छायाचित्रे, रेखाचित्रे यांचा समावेश 'इनसर्ट' पर्याय वापरून करता येतो. आलेख, छायाचित्रे, रेखाचित्रे श्रोत्यांपर्यंत विषय पोहोचवण्यासाठी उपयुक्त ठरतात. स्लाईडमध्ये वापरल्या जाणाऱ्या छायाचित्रांना उपलब्ध जागेनुसार कमी जास्त आकाराचे करता येते. छायाचित्रांना विविध प्रकारात सादर करून आकर्षक बनवता येते. आपल्या सादरीकरणाच्या स्लाईडस् आकर्षक होतील, यासाठी वैविध्य जरूर वापरावे; मात्र, त्यामुळे त्या भडक होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. जी रचना आपण वापरणार आहोत, ती नेत्रसुखद असावी. आवश्यकता वाटेल तसा मजकूर आणि छायाचित्रांना ॲनिमेशन तंत्राचाही वापर करता येतो. मात्र, त्याचा जास्त वापर केल्यास श्रोत्यांचे लक्ष स्लाईडकडे राहते आणि आपल्या बोलण्याकडे दुर्लक्ष होण्याचा धोका असतो.

आज शिक्षण, उद्योग, व्यवसाय असो वा नोकरी सर्वत्र संगणकाचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येतो. संगणकामध्ये असणारी जास्तीत जास्त कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. आज पीपीटीच्या माध्यमातून बहुतांश सर्व सादरीकरणे होतात. त्यामुळे ही कौशल्ये आपण आत्मसात करणे काळाची गरज आहे. संगणक हा वापरकर्त्यांशी मैत्रीपूर्ण वागणारा (युजर फ्रेंडली) बनला आहे, आपण त्याच्याशी दोस्ती करणे आवश्यक आहे. तो निश्चितच आपले दैनंदिन आयुष्य सुखकर बनवण्यास साहाय्य करेल.

## २.४ समारोप

जागतिकीकरणानंतर उद्योग व सेवाक्षेत्रामध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झालेल्या आहेत. वस्तूंचे उत्पादन, विक्री, सेवा, जाहिरात अशा अनेक क्षेत्रांमध्ये भाषेचे प्रभावी उपयोजन होते. उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या व्यक्तीस अर्थार्जनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विपणन, ग्राहक सेवा केंद्रे वगैरेंमध्ये बहुभाषिकता, प्रभावी संवाद कौशल्य, शिष्टाचार यांचे खूप महत्त्व असते. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये दुभाषक, अनुवादक यांना मागणी असते. जगातील कोणत्याही भाषेतील ज्ञान, माहिती आदींची इतर भाषांमध्ये अनुवाद करणाऱ्या अनुवादकांना सध्या मागणी वाढत आहे. त्यामुळे अनुवाद हे अर्थार्जनाचे एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून पुढे येत आहे. चांगला अनुवादक होण्यासाठी बहुभाषा प्रावीण्याबरोबरच

साहित्याची आवड, सांस्कृतिक जाण, लेखनकार्याची आवड, भाषाप्रभुत्व, भाषांतरकौशल्य यांसारख्या गुणांची आवश्यकता असते. सरकारी व गैरसरकारी संस्थांकडून तसेच विद्यापीठे, प्रकाशन संस्था वगैरेंच्याकडूनही अनुवादाचे प्रकल्प हाती घेतले जातात. या प्रकल्पामध्ये सहभागी होऊन आपण अनुवादक म्हणून करिअर करू शकतो.

सध्याच्या काळात संगणकीय टंकलेखन करता येणे ही गरज बनली आहे. संगणकीय साक्षरता अत्यंत महत्त्वाची आहे. आपले लेखन जगभरात कोठेही विनाअडथळा वाचता येण्यासाठी युनिकोडचा वापर करणे आवश्यक आहे. संगणकावर युनिकोडमध्ये मराठीतून टंकलेखन करणे सोपे असून त्यासाठी सातत्यपूर्ण सरावाची गरज आहे. कोणत्याही क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी आपले व्यक्तिमत्त्व, संभाषणकौशल्य, सादरीकरण कौशल्य व तांत्रिक ज्ञानावरील प्रभुत्व इत्यादी गुणांची गरज असते. सध्याच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरण करण्यास सर्वाधिक प्राधान्य असते. म्हणून पीपीटी तयार करण्यापासून सादरीकरणापर्यंतच्या सर्व बाबी स्वतः शिकून घेतल्या पाहिजेत. पीपीटीद्वारे सादरीकरण केल्यामुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वाची व कामाची वेगळी छाप पडेल. उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये अनेक नवनव्या संधी, क्षेत्रे येत आहेत. तेथे रोजगाराच्या, अर्थार्जनाच्या संधी प्राप्त करण्यासाठी भाषिक कौशल्ये व प्रभावी व्यक्तिमत्त्व यांची नितांत आवश्यकता आहे.

## २.५ प्रश्नोत्तरे

### अ) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न

१. उत्पादक, विक्रेता व ग्राहक यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे माध्यम कोणते?

अ) जाहिरात    ब) भाषा    क) तंत्रज्ञान    ड)पैसा

२. वस्तू व सेवा यांच्या उत्पादनापासून ते त्यांच्या उपभोगापर्यंत त्यांना प्रवाहित ठेवण्यासाठी केल्या जाणाऱ्या व्यावसायिक प्रक्रियेस काय म्हणतात?

अ) वितरण    ब) विपणन    क) सेवा    ड) बाजारपेठ

३. ग्राहक सेवा केंद्रामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी कोणते कौशल्य आवश्यक असते?

अ) भाषिक कौशल्य    ब) विपणन    क) तांत्रिक    ड) अनुवाद

४. 'भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक, सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक, सांस्कृतिक आवरणात स्थानांतरण करण्याची द्वैभाषिक प्रक्रिया आहे' असे कोणी म्हटले आहे?

अ) सदा कऱ्हाडे    ब) चंद्रशेखर जहागीरदार

क) भालचंद्र नेमाडे    ड) वसंत बापट

५. भारतीय भाषांमध्ये साहित्याच्या अनुवादाचे कार्य कोणती संस्था करते?

अ) साहित्य अकादमी
ब) विद्यापीठ अनुदान आयोग
क) भारतीय प्रगत अध्ययन संस्था
ड) राज्य मराठी विकास संस्था

**उत्तरे**

१. भाषा

२. विपणन

३. भाषिक कौशल्ये

४. भालचंद्र नेमाडे

५. साहित्य अकादमी

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. ग्राहक सेवा केंद्रांतील अर्थार्जनाच्या संधी व त्यासाठी आवश्यक कौशल्ये सांगा.

२. अनुवादासाठी कोणत्या कौशल्यांची गरज आहे, ते सांगा.

३. विपणनासाठी (मार्केटिंग) संवाद कौशल्याचे महत्त्व स्पष्ट करा.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. अनुवादाची संकल्पना, स्वरूप व प्रकार सांगा.

२. कोणत्याही एका विषयावर पीपीटी तयार करा.

## २.६ सरावासाठी प्रश्न

## अ) लघुत्तरी प्रश्न

१. वस्तू व सेवा क्षेत्रांमध्ये भाषिक कौशल्यांमुळे कोणत्या बाबी साध्य करता येतात?

२. युनिकोड म्हणजे काय ते सांगून त्याचे फायदे स्पष्ट करा.

## ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१. उद्योग व सेवा क्षेत्रातील अर्थार्जनाच्या संधी व त्यासाठीची कौशल्ये विशद करा.

२. विपणनासाठी कोणते घटक विचारात घ्यावे लागतात, ते सांगा.

३. अनुवादाचे काम करणाऱ्या संस्था, क्षेत्रे यांचा परिचय करून द्या.

## २.७ उपक्रम

तुमच्या परिसरातील उद्योग/सेवाक्षेत्र/ग्राहक सेवा केंद्र यांना भेट द्या. तेथील कामकाजाचे स्वरूप समजून घ्या व या क्षेत्रभेटीचा अहवाल तयार करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. J. C. Catford - linguistic Theory of Translation : Oxford University Press, London,1965.

२. Eugence -.Nide Charles R. Taber : The Theory and Practice of Translation, London1974

३. Smith. H: spects Of Translation, Preface (vii) London, 1958.

४. तिवारी, भोलानाथः अनुवाद विज्ञान, शब्दकार प्रकाशन, दिल्ली, १९८४.

५. चव्हाण, अर्जुन : अनुवाद चिंतन, अमन प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, कानपुर, २०२०.

६. रणसुभे सूर्यनारायण : अनुवाद, वर्णव्यवस्था आणि मी, दयानंद शेटगार, कृषिनगर लातूर, २००६.

७. लोंढे, निलेश : अनुवाद विज्ञान, स्वरूप प्रकाशन, पोखर्णी, परभणी, २०१७.

८. गवस राजन, शिंदे अरुण, पाटील गोमटेश्वर : भाषिक सर्जन आणि उपयोजन, दर्या प्रकाशन, पुणे, २०१२


❑❑❑

# घटक – ३
# मुद्रितशोधन

## ३.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस

१. मुद्रितशोधनाची संकल्पना, स्वरूप, प्रक्रिया, पद्धती, महत्त्व, टप्पे सांगता येतील.

२. प्रमाणलेखनविषयक नियम, विरामचिन्हे, व्याकरण यांचे उपयोजन करण्याचे कौशल्य अवगत होईल

३. मुद्रितशोधक म्हणून अर्थार्जनाच्या संधी प्राप्त करता येतील.

## ३.२ प्रास्ताविक

आपल्या समोर वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तके, माहितीपत्रके, अर्ज वगैरे छापील मजकूर येत असतो. या मजकुरामध्ये काही वेळा चुका असतात. त्यामुळे संबंधित लेखनाचे मूल्य कमी होते. कोणताही मुद्रित मजकूर निर्दोष होण्यासाठी त्या क्षेत्रातील तज्ज्ञाकडून तपासून घेतला जातो व त्या नंतर मुद्रणप्रक्रिया केली जाते. यास मुद्रितशोधन असते म्हणतात. सध्या संगणकीय अक्षरजुळणीचे तंत्रज्ञान सर्वत्र वापरले जात आहे. छापील मजकूर मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत आहे. संगणकावर अक्षरजुळणी केलेला मजकूर तपासून निर्दोष करण्यासाठी मुद्रितशोधकाची गरज असते. सध्या मुद्रणाची गरज वाढत असून चांगल्या मुद्रितशोधकांना मागणी आहे. मुद्रितशोधन हे स्वतंत्रपणे तसेच व्यावसायिकपणे अर्थार्जनाचे एक चांगले क्षेत्र आहे. आपण या घटकामध्ये मुद्रितशोधनाचे स्वरूप व प्रक्रिया समजून घेणार आहोत.

## ३.३ विषय विवेचन

### मुद्रितशोधन संकल्पना

'मुद्रित मजकूर अधिकाधिक निर्दोष व्हावा यासाठी मुद्रितशोधन केले जाते. मुद्रिते वाचून त्यातील चुकांचे दिग्दर्शन करणे म्हणजे मुद्रितशोधन होय.' वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, पुस्तके, पुस्तिका, विज्ञापनपत्रिका, लहानमोठी हस्तपुस्तके इत्यादी लिखित प्रकारांतील कोणत्याही मजकुरांचे अंतिम मुद्रण होण्यापूर्वी त्याचे मुद्रितशोधन करण्याची आवश्यकता असते.

मुद्रितशोधनाचे हे काम मुद्रितशोधक (प्रुफ-रीडर वा करेक्टर) आणि मुद्रित सहायक किंवा मूळप्रत वाचक (कॉपी होल्डर) अशा दोन व्यक्तींद्वारा होत असते. अनेकदा मात्र दोन व्यक्तींचे कार्य एकत्र व्यक्ती करते.

हस्तलिखिताबरहुकूम जुळाऱ्याने मजकुराची जुळणी केल्यावर त्याची पहिली प्रत काढली जाते. मुद्रितशोधक मूळ प्रतीशी ताडून पाहतो आणि त्यात काही मुद्रणदोष आढळल्यास ते तो विशिष्ट चिन्हाद्वारे त्यात दर्शवितो. जुळारी पुन्हा त्याप्रमाणे दुरुस्ती करतो. परत दुसरे मुद्रितशोधन होते. त्यानंतर तिसरे व अंतिम

मुद्रितशोधन होऊन मजकूर छपाईसाठी योग्य मानला जातो आणि ग्रंथ छपाई होते. पूर्वी हे काम हाताने खिळे जुळवून केले जात असे. आता सर्वत्र यासाठी संगणकाचा वापर होतो. तसेच बरेचसे पत्रकार लेखक हस्तलिखितापेक्षा टंकित मजकूरच तयार करतात. त्यासाठी मोबाईल, लॅपटॉप, संगणकाचा वापर करतात. आता तर आपण बोलतो त्याप्रमाणे टंकन होण्याची सुविधा (डशिरज्ञ ीं ींशीीं) उपलब्ध झाली आहे. तसेच इंग्रजीप्रमाणे मराठीत देखील स्पेलचेकर आले आहेत; असे असले तरी निर्दोष छपाईसाठी मुद्रितशोधक हा असावाच लागतो. आजच्या मुद्रितशोधकाला जुन्या पद्धतीबरोबरच नवी पद्धत देखील शिकून घ्यावी लागते. आजच्या आधुनिक काळात संगणकावर टंकन करणारे जसे आहेत तसे हाताने लिहिणारेही आहेतच. वाचकापर्यंत हा मजकूर शुद्ध, निर्दोष स्वरूपात पोहोचणारा घटक म्हणजे मुद्रितशोधक होय.

**मुद्रितशोधनाचे प्रकार**

१) ग्रंथ (पुस्तक) मुद्रितशोधन २) वृत्तपत्रीय मुद्रितशोधन ३) वाणिज्यविषयक मुद्रितशोधन असे मुद्रितशोधनाचे तीन प्रकार आहेत.

**१) ग्रंथ– मुद्रितशोधन** : ग्रंथाचे मुद्रितशोधन करताना फारच दक्षता घ्यावी लागते. खूप संशोधनाने हे ग्रंथ तयार केले जातात. त्यांचा संदर्भग्रंथ म्हणून वापर केला जातो व ते वारंवार पुनर्मुद्रित होऊन त्यातील उणिवा दूर होण्याची शक्यता कमी असते म्हणून अशा ग्रंथाचे काटेकोर मुद्रितशोधन होणे आवश्यक ठरते.

**अ) कोश** : कोशासारख्या महत्त्वाच्या संदर्भग्रंथाचे मुद्रितशोधन करताना फारच दक्षता घ्यावी लागते. ऱ्हस्व-दीर्घाची, वर्णाक्षरांची, साधित शब्दांच्यावेळी होणाऱ्या वर्णांच्या बदलांची व उपसर्गप्रत्यय लागून होणारा अर्थ किंवा अर्थात होणारा फरक याबाबत खूप काळजी घ्यावी लागते. शब्दसिद्धी समजून घेऊन, शब्दांची जडण- घडण जाणून घेऊन, शब्दाची व्युत्पत्ती पाहून शब्द कसा बनविला गेला हे पाहून या शब्दकोशाचे मुद्रितशोधन करावे लागते.

**आ) संदर्भग्रंथ (Directories)** - या सदरांत ज्ञानकोश, विश्वकोश, चरित्रकोश इत्यादी अनेक संदर्भ -ग्रंथांचा समावेश होतो. संशोधकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हे ग्रंथ तयार केलेले असतात म्हणून मुद्रितशोधकानेदेखील खूप काळजीपूर्वक काम केले पाहिजे विशेषतः चरित्रकोशात जन्ममृत्यूचे सन, महत्त्वाच्या घटना, त्यांचा काल याबाबत दक्षता घ्यावी लागते.

**इ) इतर ग्रंथ** : यामध्ये जुन्या पोथ्या, ऐतिहासिक लेख, कागदपत्रे, बखरी यासारख्या ग्रंथाचे मुद्रितशोधन करताना त्यावेळचे शब्दप्रयोग, लेखनपद्धती इ. मुळाबरहुकूम आहेत की नाहीत हे काटेकोरपणे पाहावे लागते.

**ई) ललित वाङ्मय** : कथा, काव्य, कादंबरी, नाटक, लघुनिबंध इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव ललित वाङ्मयात होतो. यांचे मुद्रितशोधन करताना त्या त्या लेखकाची प्रांतिक बोली, त्याची लकब, कथेचे स्थल, पात्रे यांचा विचार करून लेखकाचे विवेचन असते. यात एकरूपता, सातत्य आहे की नाही हे मुद्रित शोधकाने पहावे.

**उ) महाविद्यालयीन ग्रंथ** : विज्ञान, रसायनशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र, गणित इ. विद्याशाखातील ग्रंथांचे मुद्रितशोधन करताना खूप काळजी घेऊन कष्टपूर्वक मुद्रितशोधन करावे लागते. विविध चिन्हे, आकृत्या, परिभाषा, सांकेतिक चिन्हे, सूत्रे मूळ प्रतीप्रमाणे असल्याबाबत खात्री करणे आवश्यक असते.

**ऊ) संकीर्ण** : संगीत, पंचांग या विषयावरील ग्रंथाचा समावेश संकीर्णमध्ये होतो. हा विषय सर्वसामान्य वाचकाप्रमाणे मुद्रितशोधकाच्या कक्षेत येत नाही. त्यासाठी ग्रंथकारांवरच अवलंबून रहावे लागते. तथापि मुळाबरहुकूम ताडून पाहून काटेकोर मुद्रितशोधन करावे लागते.

**ऋ) शालेय, महाविद्यालयीन पाठ्यपुस्तके :** भाषा विषयाच्या पुस्तकांमध्ये व्याकरण, प्रमाणलेखन नियम काटेकोरपणे तपासावे लागतात. गणित, विज्ञानमध्ये सूत्रे, आकृत्या काळजीपूर्वक बघाव्या लागतात. इतिहासाच्या पुस्तकात सनावळ्या लक्षपूर्वक पहाव्या लागतात. भूगोलांमध्ये नकाशे व आकृत्या व्यवस्थित आहेत की नाहीत याकडे अधिक लक्ष द्यावे लागते.

### २) वृत्तपत्रीय मुद्रितशोधन

ग्रंथ मुद्रितशोधन व वृत्तपत्रीय मुद्रितशोधन यात फारसा फरक नाही; परंतु दोन्ही ठिकाणच्या कार्यपद्धतीस फरक असल्यामुळे दोन पद्धती निरनिराळ्या आहेत. असा भास होतो. वृत्तपत्रीय मुद्रितशोधनात वेळेला फार महत्त्व असते. ग्रंथांच्या मुद्रितशोधनासाठी तुलनेने भरपूर वेळ उपलब्ध असतो. वृत्तपत्रांतील मुद्रितशोधकाला भाषेचे ज्ञान चांगले असावे लागते. बऱ्यावेळा त्याने संपादलेल्या ज्ञानावर अवलंबून तत्काळ निर्णय घेऊन दुरुस्ती करावी लागते. सामान्यज्ञान व चालू घडामोडींचे भरपूर ज्ञान असावे लागते. व त्याचा त्वरित वापर करण्याची सवय अंगी असणे जरूर असते.

वृत्तपत्रांतील जाहिरातींना फार महत्त्व असते. त्यात चूक झाल्यास नुकसान होण्याचा संभव असतो, म्हणून मुद्रितशोधकाने मूळप्रतीतील आखणीप्रमाणे व शुद्धलेखनदृष्ट्या आणि तपशीलदृष्ट्या अचूकतेकडे लक्ष देणे आवश्यक ठरते.

दैनिक वृत्तपत्राप्रमाणेच साप्ताहिके, पाक्षिके, मासिके वगैरेंचे मुद्रितशोधन असते. फक्त त्यात दैनिकांइतकी घाईगर्दी नसते. त्यामुळे संदर्भ पाहण्यास अवधी मिळतो. कामही सावकाश चालत असल्याने दुरुस्त्याही करून घेता येतात. त्यामुळे यांत दैनिकापेक्षा चुका बऱ्याच कमी आढळतात.

### ३) वाणिज्यविषयक मुद्रितशोधन

व्यापारी व प्रचारी वाङ्मय, जाहिराती, हस्तपत्रके, माहितीपत्रके, माहिती पुस्तिका, परिचयपत्रके, बँका, कंपन्या यांचे वार्षिक अहवाल, लग्नपत्रिका, निमंत्रणपत्रे इ. छोट्या मोठ्या मुद्रणांचा समावेश यांमध्ये होतो. या सर्व मुद्रण व्यवसायांत रचनातंत्राला फार महत्त्व असते. आता संगणकावर हे काम खूप सोपे झाले आहे. आकर्षक रंगसंगती, छायाचित्रांचा वापर इत्यादींमध्ये भरपूर वैविध्य उपलब्ध आहे. व्यापारी वाङ्मय अगर किरकोळ कामे याबाबत रचनातंत्र आणि गिऱ्हाईक यांच्या आदेशानुसार जुळणी आहे की नाही ते मुद्रितशोधकाने पाहणे जसे जरूर आहे त्याप्रमाणे ती जुळणी व्याकरणाच्या व शुद्धलेखनाच्या दृष्टीनेही पहाणे जरूर आहे.

### मुद्रितशोधनाचे महत्त्व

वाचकाला वाचनाची गोडी निर्माण व्हावी, ती रुजून संवर्धित व्हावी यामध्ये मुद्रण आणि प्रकाशन व्यवसाय यांची भूमिका मोलाची असते. यामध्ये मुद्रित शोधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लेखकाचा

आशय वाचकापर्यंत निर्दोषपणे पोहोचवण्याची जबाबदारी मुद्रितशोधकाला पार पाडावी लागते. जर हे काम नीट झाले नाही तर लेखनातील आशय कितीही उत्तम असला तरी वाचकाचा व लेखकाचा रसभंग होण्याची शक्यता असते.

भाषा आणि मुद्रणकला हे परस्पराश्रयी आहेत. उत्तम आशय, नेटकी मांडणी, सुबक मुद्रण यांचा सौदर्यपूर्ण आविष्कार या साऱ्यातून त्या त्या भाषक समाजाची उच्च अभिरुची व संस्कृती सूचित होते. समाजाची वाङ्मयीन अभिरुची जेवढी उच्च, तेवढे निर्माण होणारे साहित्य अभिजात! जागतिक दर्जाची गुणवत्ता असलेली प्रकाशन संस्था ही त्या भाषेचे भूषण असते. अशा प्रकाशन संस्थेतून प्रकाशित झालेल्या साहित्यावर वाचकांचा मोठा विश्वास असतो. छापून आलेला सर्व मजकूर हा लेखन नियमांनुसारच असणार हे वाचकाने गृहीत धरलेले असते. म्हणूनच तो त्याचे अनुकरणही करत असतो. त्यामुळे निर्दोष मुद्रितशोधन हे अत्यंत जबाबदारीचे काम आहे. मुद्राराक्षसाने केलेले विनोद किती भयंकर असू शकतात, हे आपण पाहतोच. ही परिस्थिती लक्षात घेता मुद्रितशोधनाचे महत्त्व स्पष्ट होईल.

या मुद्रणाच्या शुद्धतेकडे लेखकाइतकेच जागरूकतेने लक्ष देणारा मुद्रण प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणजे मुद्रणालयातील मुद्रितशोधक होय. मोठ्या व नामवंत मुद्रणालयांमध्ये चांगले व जाणते मुद्रितशोधक नेमले जातात. त्यामुळे त्या मुद्रणालयाच्या कीर्तीतही भर पडते. तसेच काही प्रकाशकही चांगल्या माहितगार मुद्रितशोधकांची नियुक्ती करून आपल्या प्रकाशनाचा दर्जा राखतात.

**मुद्रितशोधकाची गुणवैशिष्ट्ये**

मुद्रितशोधन ही कला आहे का तो एक सर्वसाधारण व्यवसाय आहे. असाही प्रश्न नेहमी उपस्थित होतो. याबाबत श्री. कृष्णप्रसाद दार यांनी आपल्या Copy proof या ग्रंथात स्पष्ट म्हंटले आहे की, “It is a general belief, that anybody can read proofs, whereas, it takes year of hard training to reach perfection, an achievment seldom attained” सर्वसाधारणतः ज्याला भाषेचे ज्ञान आहे, मुद्रितशोधनाच्या खुणा माहीत आहेत असा कोणीही मुद्रिते तपासू शकेल अशी समजूत असते; परंतु चांगला मुद्रितशोधक होण्यासाठी कित्येक दिवस परिश्रम करावे लागतात. शुद्ध व सुबक मुद्रणासाठी हुशार, व्याकरण व व्युत्पत्ती जाणणारा, सामान्यज्ञान भरपूर असणारा, सौदर्याभिरुची असणारा, सूक्ष्मदृष्टी, बहुश्रुत व कष्टाळू मुद्रितशोधक असणे जरूर आहे. मुद्रितशोधकाला नुसते शुद्धाशुद्ध आणि व्याकरण पाहावयाचे नसून इतरही अनेक गोष्टी म्हणजे विधाने, संदर्भ, पद्धती व वैशिष्ट्य (style) यांकडेही लक्ष द्यावे लागते. त्याचप्रमाणे मुद्रणविषयकही म्हणजे टंक, पानणी (Paging), मांडणी याबाबतही माहिती असणे आवश्यक आहे.

मुद्रितशोधनात केवळ शब्दाला शब्द आहे की नाही, तो शुद्ध व प्रमाणलेखनानुसार अचूक जुळविलेला आहे की नाही हे पाहणे, किंवा चुकीची जुळलेली अक्षरे दुरुस्त करणे, एवढेच मुद्रितशोधकाचे काम नसते. जाणता मुद्रितशोधक मुद्रितातील वाक्यरचना, वाक्यातील पदक्रम, उचित-अनुचित शब्दयोजना यांचाही शोध घेऊन आवश्यक ती दुरुस्ती करतो. त्यासाठी मुद्रितशोधकाला लेखनविषयक नियमांचे आणि भाषेचेही सखोल ज्ञान असावयास हवे. आजच्या काळात बहुकौशल्ये आत्मसात असणाऱ्या व्यक्तींना सर्वच क्षेत्रांत मागणी

आहे. आजच्या काळातील मुद्रितशोधकाला संगणकावर काम करता येत असेल तर अधिक मागणी आहे. बदलत्या काळाप्रमाणे नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आवश्यकता मुद्रितशोधनामध्ये देखील आहे.

**मुद्रितशोधनातून अर्थार्जनाच्या संधी**

मुद्रितशोधक म्हणून दोन प्रकारे अर्थार्जनाच्या संधी मिळू शकतात.

१) **नोकरी** : प्रकाशन संस्था, मुद्रणालय, वृत्तपत्रे, शासकीय प्रकाशने यांमध्ये निश्चित मासिक वेतनावर मुद्रितशोधक म्हणून नोकरी मिळू शकते.

२) **स्वतंत्र व्यवसाय** : नोकरीचे बंधन न स्वीकारता स्वतंत्रपणेदेखील हे काम व्यवसाय म्हणून करता येते. अशा प्रकारे मुद्रितशोधन करणाऱ्या मुद्रितशोधकांची माहिती यादी नाव, पत्त्यासह (संपर्क क्रमांक ई-पत्त्यांसह) 'प्रकाशन विश्व' डायरी मध्ये छापलेली असते. त्यांच्या कामाची गुणवत्ता अनुभवलेले प्रकाशक, मुद्रक, लेखक त्यांच्याकडून योग्य मानधन देऊन काम करून घेतात.

पूर्वी मोठ्या नामवंत मुद्रणालयात, प्रकाशनसंस्थेत, वर्तमानपत्रांमध्ये मुद्रितशोधनाचा स्वतंत्र विभाग असे. नामवंत, जाणत्या मुख्य मुद्रितशोधकाच्या हाताखाली अनेक साहाय्यक काम करीत असत. अलीकडे स्पेलचेकर (संगणकीय शब्दलेखन तपासनीस) सुविधेमुळे वर्तमानपत्रांमध्ये मुद्रितशोधकांची संख्या घटवली आहे. त्याचबरोबर हे काम उपसंपादकाकडून करून घेण्याचा कल वाढत चालला आहे. त्यामुळे उपसंपादक म्हणून काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला मुद्रितशोधनाचे काम चांगल्या प्रकारे येत असेल तर त्याची निवड होण्याचे प्रमाण अधिक आहे.

साप्ताहिके, मासिके, ग्रंथव्यवहार यांचे काम मात्र पूर्वीप्रमाणेच चालते.त्याठिकाणी मुद्रितशोधक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध आहे. स्वतंत्रपणे काम करणारे ज्येष्ठ मुद्रितशोधक विजय जोशी म्हणतात, ''एक मुद्रितशोधक दिवसाकाठी पन्नास पानाचे मुद्रितशोधन सहज करू शकतो. एका पानाच्या दोन वाचनासाठी पंधरा रुपये दर आहे. संगणकावर दुरुस्त करून देण्याचा दर पानाला बारा रुपये आहे. एका पानाच्या वाचनासाठी साधारण पाच ते सात मिनिटे लागतात. या व्यवसायात सेवानिवृत्ती नाही. चांगले काम केल्यास भारतातून व परदेशातून मागणी आहे. घरी बसून काम करू शकतो. आपल्यावर अधिकार गाजवायला कुणी बॉस नसतो. भरपूर व विविध प्रकारचे साहित्य वाचण्याची संधी मिळते. आपल्या ज्ञानात सातत्याने भर पडत राहते. इतकेच नाही तर मानधनासोबत क्रेडिट पेजवर नामोल्लेखही केला जातो.

अलीकडच्या काळात प्रकाशन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढीस लागला आहे. प्रकाशकांना चांगल्या मुद्रितशोधकांची उणीव भासत आहे. मुद्रितशोधन हा पूर्णवेळचा किंवा जोड व्यवसाय म्हणूनही करता येतो. शब्द, अर्थ, भाषा यांची जाण, व्याकरण व निर्दोष लेखननियमांचे उत्तम ज्ञान, चिकाटी, सूक्ष्म वाचनदृष्टी या गुणांचा संगम एखाद्याकडे असल्यास त्याच्यासाठी मुद्रितशोधन हे उदरनिर्वाहाचे साधन ठरू शकते.

**महाराष्ट्र शासनाचे प्रमाणलेखनविषयक १८ नियम, अपवाद, उदाहरणे, विरामचिन्हे**

मुद्रितशोधकाला प्रमाणलेखनविषयक १८ नियमांची सखोल माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी भाषा संचालनालयाने प्रकाशित केलली, 'प्रमाणलेखन नियमावली' अभ्यासावी या नियमांच्या अधिक

स्पष्टीकरणासाठी 'शुद्धलेखन विवेक (द. न. गोखले)', 'व्याकरणशुद्ध लेखनप्रणाली' (सत्त्वशीला सामंत), 'मराठी शुद्धलेखन प्रदीप' (मो. रा. वाळंबे), 'मराठी लेखन मार्गदर्शिका'- (यास्मिन शेख), 'शुद्धलेखन मार्गप्रदीप'(अरुण फडके) यांसारखी पुस्तके आपल्या संग्रही ठेवून अभ्यासावीत. एखाद्या शब्दाविषयी शंका वाटल्यास 'शुद्धलेखन शुद्धमुद्रण शब्दकोश' (ह.स.गोखले), 'मराठी लेखन-कोश'(अरुण फडके), 'मराठी शब्दलेखन कोश' (यास्मिन शेख) यांसारख्या कोशांचा वापर करावा. आवश्यकता भासल्यास शब्दकोश, व्युत्पत्तिकोश पहावेत.

विरामचिन्हांच्या योग्य वापराविषयी मार्गदर्शनासाठी 'मराठी लेखनातील विरामचिन्हांचा उपयोग' हा डॉ. अशोक केळकर यांचा लेख (मध्यमा); 'रीतिपुस्तक' (रामदास भटकळ, मृदुला प्रभुराम जोशी), 'मुद्रितशोधन' (य. ए. धायगुडे) ही पुस्तके अभ्यासावीत.

मुद्रितशोधकाजवळ विविध शब्दकोश, व्युत्पत्तिकोश यांचा संग्रह असावा. एखाद्या शब्दाबद्दल शंका वाटल्यास केवळ स्मरणावर विसंबून न राहता कोशामध्ये तो शब्द पाहून खातरजमा करून घेण्याची सवय मुद्रितशोधकाने अंगी बाळगावी.

**प्रमाणलेखनाचे नियम**

**(१) अनुस्वार**

**नियम १** : स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदाहरणार्थ-गुलकंद, चिंच, तंटा, निबंध, आंबा. तत्सम शब्दातील अनुनासिकाबद्दल विकल्पाने पर -सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

ङ्, ञ्, ण्, न्, म् यांना अनुनासिके म्हणतात. जेथे या अनुनासिकांचा उच्चार स्पष्ट होत असेल तेथे त्या अनुनासिकांबद्दल अनुस्वार (शीर्षबिंदू) देण्यात येतो. जसे-तंटा, चिंच, आंबा, अंतर्गत, अर्थसंकल्प इत्यादी. या शब्दांत अनुनासिकांचा उच्चार स्पष्ट होत असल्यामुळे येथे आधीच्या अक्षरावर अनुस्वार द्यावयाचा आहे. संस्कृतातून मराठीत जसेच्या तसे आलेले शब्द (म्हणचे तत्सम शब्द) अनुनासिक वापरूनही लिहिण्याची प्रथा आढळते. उदा. 'पंडित' हा शब्द 'पण्डित' किंवा 'अंतर्गत' हा शब्द 'अन्तर्गत' असा लिहिला तर ते चूक ठरणार नाही. परंतु अशा वेळी अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिकच (म्हणजेच पर-सवर्ण) वापरावे लागते. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावेत. उदा. दंगा, तांबे, खंत, संप इत्यादींसारखे शब्द दङ्गा, ताम्बे, खन्त, सम्प असे लिहू नयेत. पर-सवर्ण लिहिण्याची सवलत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे.

अर्थभेद स्पष्ट करण्यासाठी कधी कधी पर-सवर्ण जोडून शब्द लिहिणे योग्य ठरते. उदा. 'वेदांत' (वेदांमध्ये) आणि 'वेदान्त' (तत्त्वज्ञान), 'देहांत' (शरीरांत) आणि 'देहान्त' (मृत्यू).

काही शब्दांमधील अनुस्वारांचा उच्चार अस्पष्ट असतो. कधी कधी तो उच्चारलादेखील जात नाही. उदा.- हंसणे, धांवणे, जेव्हां, कोठें, कधीं, कांहीं. अशा शब्दांवर अनुस्वार देऊ नये. ते 'हसणे, धावणे, जेव्हा, कोठे, कधी, काही' असे लिहावे.

**नियम २** : य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्या पूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदा. सिंह, संयम, मांस.

उच्चारानुसारी लेखन करावयाचे म्हणून 'सिंह' ऐवजी 'सिंव्ह', 'संयम' ऐवजी 'संय्यम', 'मांस' ऐवजी 'मांव्स', 'संहार' ऐवजी 'संव्हार' असे लिहिण्याची गरज नाही. अनुस्वाराचा स्पष्ट व पूर्ण उच्चार केला असता वरील शब्दात 'य' किंवा 'व' या वर्णाचा उच्चार आपोआपच होतो. त्यामुळे येथे तो वर्ण लिहिण्याची गरज नसून त्याऐवजी अनुस्वार देणे पुरेसे आहे. म्हणून सिंह, संयम, मांस, सारांश, संशोधक, संस्था, स्वयंशासित यांसारख्या शब्दांमध्ये केवळ अनुस्वार द्यावा.

'ज्ञ' पूर्वीचा नासोच्चारही वरीलप्रमाणे शीर्षबिंदूने दाखवावा. उदा.- संज्ञा

**नियम ३** : नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदा.- लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे. नामाला किंवा सर्वनामाला विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी त्याचे जे रूप होते. त्याला 'सामान्यरूप' असे म्हणतात. उदा. 'पत्र' या शब्दाला तृतीया विभक्तीचा प्रत्यय लावल्यास 'पत्राने' असे रूप होते. यातील 'पत्रा' हे सामान्यरूप होय.

या नियमानुसार, नामाच्या व सर्वनामाच्या अनेकवचनातील सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय लावताना किंवा शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावयाचा आहे. उदा.- आदेशांत, विभागांकडून, सदस्यांच्या, पुस्तकांवर, सूचनांची, त्यांच्याकडून यांसारख्या शब्दांच्या बाबतीत अनुस्वार देणे आवश्यक आहे. शब्दाच्या एकवचनी सामान्यरूपावर अनुस्वार देऊ नये. अनेकवचनी सामान्यरूपावर अनुस्वार दिल्यानेच एकवचन व अनेकवचन यांतील भेद स्पष्ट होतो. घरातील (ए.व.)- घरांतील (अ.व.), पुस्तकाचा (ए.व.)- पुस्तकांचा (अ.व.), त्याच्याकडून (ए.व.) - त्यांच्याकडून (अ.व.) या उदाहरणांवरून हे दिसून येईल.

आदरार्थी बहुवचनाच्या वेळीही असा अनुस्वार दिला पाहिजे. उदा.- राज्यपालांचे अभिभाषण, मुख्यमंत्र्यांचा दौरा, तुम्हांला, आपणांस.

**नियम ४** : वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणांसाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

या नियमानुसार स्पष्ट किंवा अस्पष्ट उच्चार न होणारा कोणताही अनुस्वार शब्दांवर द्यावयाचा नाही. उदा. - घरें, रूपें, नामें, पांच, करणें, बोलणें, काळीं, नांवे, कां, कीं, कांच, वंचणे, जेव्हां, तेव्हां, जों, तों, कांही, घरीं, लिपिकानें यांसारख्या शब्दांत अनुच्चारित अनुस्वार देण्याची आता गरज नाही.

**(२) ऱ्हस्व-दीर्घ**

**नियम ५** : मराठीतील तत्सम इकारान्त आणि उकारान्त शब्द दीर्घान्त लिहावे. उदा.- कवी, मती, गती, गुरू, इतर शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा. उदा. - पाटी, जादू, पैलू, विनंती ही (शब्दयोगी अव्यय). अपवाद : आणि, नि.

स्पष्टीकरण – परंतु, यथामति, तथापि इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच, सामासिक शब्दांतही तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे. उदा. बुद्धिवैभव, कविमन, गतिशील.

मराठी भाषेत ऱ्हस्व दीर्घ लेखनासंबंधी काही नियम आहेत. परंतु लिहिणाऱ्यांकडून घाईगर्दीत बऱ्याच वेळा हे नियम काटेकोरपणे पाळले जात नाहीत. मराठी भाषेत संस्कृत भाषेतील बरेच शब्द जसेच्या तसे स्वीकारले गेले आहेत. उदा. कवि, मति, गति, गुरु, वस्तु, निवृत्ति, नियुक्ति इत्यादी. हे शब्द संस्कृत असून मराठीत वापरल्या जाणाऱ्या अशा मूळ संस्कृत शब्दांना 'तत्सम' शब्द म्हणतात.

असे इकारान्त व उकारान्त शब्द मराठीत वापरताना ते दीर्घान्त लिहावेत. म्हणजे 'कवि', 'वस्तु', 'नियुक्ति' हे शब्द 'कवी', 'वस्तु', 'नियुक्ती' असे लिहावेत.

व्यक्तिनामे, ग्रंथनामे, शीर्षक व सुटे ऱ्हस्वान्त तत्सम शब्द मराठीत दीर्घान्त लिहावे. उदा. हरी, भवभूती, मनुस्मृती, द्विबिंदू वर्गीकरण पद्धती, कृषी, कुलगुरू इत्यादी.

मराठी भाषेतील पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय) यांसारखे शब्द नियमाप्रमाणे दीर्घान्त लिहिण्यात यावेत. असे असले तरी, 'आणि' व 'नि' ही मराठीतील दोन अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच मूळ संस्कृतातून आलेली 'परंतु', 'यथास्थिति', 'तथापि', 'अद्यापि', 'इति', 'प्रभृति', 'कदापि', यासारंखी (तत्सम) अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावीत. या अपवादाप्रमाणेच सामासिक शब्द लिहिताना समासाचे पूर्वपद (पहिला शब्द) तत्सम ऱ्हस्वान्त शब्द असेल (म्हणजेच मुळात संस्कृतात ऱ्हस्वान्त असेल) तर ते पूर्वपद ऱ्हस्वान्तच लिहावयाचे आहे. दीर्घान्त असेल तर ते दीर्घान्त लिहावयाचे आहे. उदाहरणार्थ 'बुद्धी' हा शब्द दीर्घान्त लिहावयाचा आहे. मुळात संस्कृतमध्ये तो ऱ्हस्वान्त असल्याने 'बुद्धिचातुर्य', 'बुद्धिवैभव' असे सामासिक शब्द लिहिताना मात्र तो ऱ्हस्वान्त लिहावयाचा आहे हे लक्षात ठेवणे जरुरीचे आहे. 'अणू' हा शब्द मराठीमध्ये दीर्घान्त, परंतु 'अणुशक्ती' मध्ये तो ऱ्हस्वान्त होईल. याच धर्तीवर लिहिण्यात येणारे पुढील काही शब्द अभ्यासण्यासारखे आहेत. उदा.– निवृत्तिवेतन, विधिनिषेध, वस्तुस्थिती, कृतिसमिती, स्थितिशील, प्राप्तिकर, कृषिविषयक, नियुक्तिपत्र, समितिकक्ष इत्यादी. या शब्दांमध्ये पूर्वपद असलेले संस्कृत शब्द मराठी भाषेने आत्मसात केल्यामुळे ते मराठीच्या प्रकृतीनुसार एरव्ही दीर्घान्त लिहावयाचे असले तरी समासामध्ये ते मूळ स्वरूपात योजलेले असल्याने ते ऱ्हस्वान्तच लिहावे. 'षष्ट्यब्दी' हा शब्द मुळातच दीर्घान्त आहे. 'षष्ट्यब्दी' यातील घटक, षष्टि + अब्द म्हणजेच षष्ट्यब्द. त्याचे स्त्रीलिंगी रूप 'षष्ट्यब्दी'. षष्टयब्दीची पूर्ती ती षष्ट्यब्दीपूर्ती. म्हणून षष्ट्यब्दीपूर्ती या सामासिक शब्दामध्ये तो दीर्घान्तच लिहिला जाईल. त्याचप्रमाणे 'शताब्दी' हा शब्ददेखील मुळात दीर्घान्त असल्याने 'शताब्दीसमारोह' या सामासिक शब्दामध्ये तो दीर्घान्तच लिहावा लागेल. 'वधूवर' या सामासिक शब्दातील पूर्वपद (म्हणजे पहिला शब्द) दीर्घान्त राहील.

साधित शब्दांनाही हाच नियम लावावा. उदा. शक्तिमान, गतिमान, इंदुमती, मृदुत्तर इत्यादी.

विद्यार्थिन्, गुणिन्, प्राणिन्, पक्षिन् यांसारखे इन्-अन्त शब्द मराठीत येतात. त्यांच्या शेवटी असलेल्या 'न्' चा लोप होतो व उपान्त्य ऱ्हस्व अक्षर दीर्घ होते. उदा. विद्यार्थी, गुणी, प्राणी, पक्षी, मंत्री, स्वामी. परंतु

हे शब्द समासात पूर्वपदी आले असता (म्हणजेच समासातील पहिला शब्द असता) ते ऱ्हस्वान्तच ठेवावे. उदा.- विद्यार्थिमंडळ, गुणिजन, प्राणिसंग्रह, मंत्रिमंडळ, स्वामिनिष्ठा.

मराठी शब्दकोशात मात्र तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द ऱ्हस्वान्त लिहिणे इष्ट ठरेल. जसे- पद्धति, अनुमति, प्रतिकृति, दृष्टि, अणु, वायु, हेतु, वगैरे. परंतु असे शब्द कोशाबाहेर वापरताना दीर्घान्त लिहिले पाहिजेत.

**नियम ६** : (दीर्घ) ईकारान्त व ऊकारान्त शब्दांतील उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व लिहावे. उदा.- गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू. अपवाद-नीती, भीती, रीती कीर्ती इत्यादी दीर्घान्त झालेले तत्सम शब्द.

वरील नियमात अपवाद म्हणून दिलेल्या शब्दांप्रमाणेच प्रीती, दीप्ती, विभूती, ऊर्मी यांसारखे आणखी काही दीर्घान्त झालेले संस्कृत शब्द आहेत.

नवीन नियमाप्रमाणे हे शब्द दीर्घान्तच लिहावयाचे आहेत. परंतु त्यामुळे ते मुळात दीर्घ मानले जाण्याची शक्यता असल्यानेच त्यांचा अपवाद म्हणून स्वतंत्रपणे उल्लेख केला आहे. हे शब्द निती, भिती, रिती, किर्ती, प्रिती, दिप्ती, विभुती, उर्मी असे लिहू नयेत. या शब्दांतील उपान्त्य अक्षरे मुळात संस्कृतात जशी दीर्घ आहेत तशी दीर्घच ठेवावी.

ऊकारान्त शब्दांच्या बाबतीतही त्यांच्या अलिकडच्या स्वर ऱ्हस्व आढळतो. जसे : सुरू, हुतुतू, झुरू, मुरू, पुरू इत्यादी. यातील उपान्त्य स्वर ऱ्हस्व आहेत.

हाच नियम अकारान्त, एकारान्त व ओकारान्त शब्दांनाही लागू आहे. उदा.- खिळा, सुळा, पाहिले, मिळवतो इत्यादी. पण तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही. उदा.-ऊर्जा, ऊष्मा, पूजा, परीक्षा, प्रतीक्षा इत्यादी.

यावरून असे म्हणता येईल की, मराठीमध्ये शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्याचा उपान्त्य (म्हणजेच शेवटच्या अक्षराच्या अलिकडचा) इकार व उकार ऱ्हस्व असतो. मात्र तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही.

**नियम ७** : अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार व उकार दीर्घ लिहावे. उदा.- गरीब, वकील, वीट, सून, वसूल अपवाद : ऱ्हस्वोपान्त्य अकारान्त तत्सम शब्द. उदा. गुण, विष, मधुर, प्रचुर

या नियमानुसार अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार किंवा उकार दीर्घ लिहावयाचे आहेत. उदा. ठरीव, भरीव, फकीर, हुरूप, फूल, मूल, धूळ, कूळ, भूल, चूल, सूर, पूर इत्यादी.

अपवाद म्हणून दिलेल्या शब्दांप्रमाणे मनुष्य, बहुत, विपुल, अंकुर, अद्‌भुत, विधुर, जटिल, मलिन, कुटिल, साहित्य, उचित, मंदिर, विहित, जीवित, शारीरिक, मानसिक इत्यादी तत्सम (मुळात संस्कृत असलेले) शब्द मात्र ऱ्हस्वोपान्त्य लिहावयाचे आहेत.

मराठी शब्दांतील अनुस्वार, विसर्ग किंवा जोडाक्षर यांच्या पूर्वीचे इकार व उकार सामान्यतः ऱ्हस्व असतात. उदा.- भिंग, पिंप, नारिंग, गुंज, धुंद, सुंठ, खुंटी, कुंची, निःपक्षपातीपणे, छिः, थुः, भिस्त,

विस्तव, मुक्काम, इत्यादी. परंतु तत्सम शब्दांत ते मुळाप्रमाणे ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहावेत. उदा.- चित्र, पुण्य, पुत्र, वरिष्ठ, तीक्ष्ण, पूज्य इत्यादी.

मागील नियम ३ मध्ये आपण सामान्यरूप म्हणजे काय हे पाहिले आहे. असे सामान्यरूप होताना स्वरांमध्ये जे ऱ्हस्व-दीर्घ बदल घडतात त्यासंबधीचे विवेचन पुढील नियमात केले आहे.

**नियम ८** : उपान्त दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य ईकार-ऊकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा. उदा. गरिबास, वकिलांना, सुनेला, वसुलाची; नागपुरास. अपवाद : दीर्घोपान्त्य तत्सम शब्द, उदा.- शरीरात, गीतेत, सूत्रास, जीवास.

या नियमानुसार गरीब-गरिबास, वकील-वकिलांना, सून-सुनेला, वसुल-वसुलाची, नागपूर-नागपुरास या शब्दाप्रमाणेच समजूत-समजुतीने, निवडणूक-निवडणुकीत, तपशील-तपशिलात इत्यादी शब्दांतील उपान्त्य ईकार व ऊकार एकवचनी व बहुवचनी सामन्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा लागतो.

परंतु शब्द तीन अक्षरी असून त्याचे पहिले अक्षर दीर्घ असेल तर अशा शब्दाच्या सामान्यरूपात उपान्त्य ई-ऊ यांच्या जागी ''अ'' आल्याचे दिसते. उदा.- तालीम-तालमीचा, तालमीत, बेरीज-बेरजेला, बेरजेत, पाटील-पाटलाने, पाटलाचा, माणूस-माणसाला, माणसाचा, लाकूड-लाकडाने, लाकडाचा इत्यादी. या ठिकाणी वरील नियम लागत नाही. मात्र पहिले अक्षर ऱ्हस्व असल्यास हा 'अ' विकल्पाने होतो. म्हणून जेव्हा विकल्पामुळे 'अ' आदेश करण्यात येत नाही, तेव्हा वरील नियम लागू झाल्याने उपान्त्य ई-ऊ ऱ्हस्व होतात. उदा. - परीट- परटास, परिटास.

उपान्त्य 'ई-ऊ' असलेल्या तत्सम (म्हणजेच मुळात संस्कृत असलेल्या) शब्दांच्या बाबतीतही वरील नियम लागू करता येणार नाही. उदा.-परीक्षा, वीर, गीत, दूत, सूत्र, शरीर, रीती, पूर्व, विद्यापीठ, न्यायाधीश या शब्दांची सामान्यरूपे होताना परिक्षेत, विराने, गितात, दुतास, सुत्रातील, शरिरास, विद्यापिठाने, न्यायाधिशाचा अशी रूपे होत नाहीत. त्यांतील ई व ऊ हे स्वर दीर्घच राहतात. त्यांची परीक्षेत, वीराने, गीतात, दूतास, सूत्रातील, शरीरास, विद्यापीठाने, न्यायाधीशाचा ही योग्य रूपे होत.

**इतर काही विशेष**

शब्दाचे उपान्त्य अक्षर 'ई' किंवा 'ऊ' असेल तर सामान्यरूपात 'ई' च्या जागी 'य' येतो. किंवा 'ऊ' च्या जागी 'व' येतो. उदा. - फाईल-फायलीस, काईल-कायलीत, देऊळ-देवळात, पाऊस-पावसात.

पुल्लिंगी शब्दाच्या शेवटी 'सा' असल्यास सामान्यरूपाच्या वेळी 'शा' होतो. (श्या होत नाही). उदा. पैसा-पैशाचा, घसा-घशाचा, ससा-सशाचा

पुल्लिंगी शब्दांच्या शेवटी असलेला 'जा' सामान्यरूपात तसाच राहतो, (त्याचा 'ज्या' होत नाही). उदा.- मांजा-मांजाने, गांजा-गांजाने, सांजा-सांजाची.

मधल्या अक्षरातील 'क' किंवा 'प' चे द्वित्व सामान्यरूपाच्या वेळी निघून जाते. उदा. रक्कम-रकमेचा, तिप्पट-तिपटीने.

मधल्या 'म' पूर्वीचे अनुस्वारसहित अक्षर अनुस्वारविरहित होते. उदा.अंमल-अमलात, किंमत-किमतीचा, गंमत-गमतीने, हिंमत-हिमतीने.

ऊकारान्त विशेषनामाचे सामान्यरूप होत नाही. उदा.-गणू-गणूस, शकू-शकूस. धातूला 'ऊ' किवा 'ऊन' प्रत्यय लावताना धातूच्या शेवटी 'व' असेल तरच 'वू' किंवा 'वून' होईल. उदा.-चाव-चावू-चावून, लाव-लावू-लावून, जेव-जेवू-जेवून, खा-खाऊ-खाऊन, गा-गाऊ-गाऊन, पी-पिऊ-पिऊन, धू-धुऊ-धुऊन.

**(३) किरकोळ**

**नियम ९ :** पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा. उदा. - नागपूर, संबळपूर, तारापूर.

संस्कृतात 'शहर' याअर्थी 'पूर' हा शब्द प्रचलित आहे. तोच मराठीत 'पूर' असा दीर्घोपान्त्य लिहिला जातो. मराठीतील उच्चारपद्धतीला हे धरून आहे. त्यामुळे गावांची नावे वरीलप्रमाणे लिहिण्यात यावीत.

**नियम १० :** कोणता, एखादा ही रूपे लिहावी; कोणचा, एकादा ही रूपे लिहू नयेत.

**नियम ११ :** हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा स्वर व चौथा स्वर दीर्घ लिहावा. वरील शब्दांप्रमाणेच तसूतसू, झुंजूमुंजू, चिरीमिरी यांसारख्या पुनरूक्त शब्दांतील ऊकार व ईकार मूळ घटक शब्दांमध्ये ते दीर्घ असल्याने दीर्घ लिहावे. परंतु, पुनरुक्त शब्द नादानुकारी असतील तर ते उच्चाराप्रमाणे ऱ्हस्व लिहावे. उदा.-लुटुलुटु, दुडुदुडु, रुणुझुणु.

**नियम १२ :** एकारान्त नामाचे सामान्यरूप याकारान्त करावे. उदाहरणार्थ.करण्यासाठी, फडक्यांना (म्हणजे फडके यांना), पाहण्याला. अशा रूपांऐवजी करणेसाठी, फडकेंना, पाहणेला यांसारखी एकारान्त सामान्यरूपे करू नयेत.

एकारान्त सामान्यरूपे आज फारशी प्रचलित नाहीत. त्यांऐवजी याकारान्त सामान्यरूपे वापरली जातात. म्हणून यांचेकडे, कळवणेसाठी, करणेबाबत यांसारखी रूपे वापरू नयेत.

**नियम १३ :** लेखनात पात्राच्या किवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्या वेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे लिहू नये.

नाटकात किंवा कथा-कादंबरीत पात्रांच्या तोंडी, ''असं केलं'', ''असं झालं'', ''मी म्हटलं'' असे लिहिण्यास हरकत नाही. एरव्हीच्या लेखनात तसे लिहू नये. वरीलप्रमाणे बोली भाषेची रूपे वापरताना अकारान्त रूपे अनुस्वारयुक्त लिहिणे आवश्यक आहे.

**नियम १४ :** क्वचित्, कदाचित्, अर्थात्, अकस्मात्, विद्वान् इत्यादी रूढ झालेले तत्सम शब्द अकारान्त लिहावे.

मराठीत रूढ झालेले संस्कृत शब्द सामान्यत: जसेच्या तसे लिहिण्याची पद्धत आहे. त्यांतील काही शब्द मुळात व्यंजनान्त आहेत. त्यानुसार वरील शब्द क्वचित्, कदाचित्, अर्थात्, अकस्मात् असे लिहिण्याचा प्रघात होता. परंतु मराठीच्या प्रकृतीनुसार विद्वान, कीर्तिमान, शक्तिमान यांसारखे शब्द स्वरान्त लिहिण्याचीही

पद्धत रूढ होती व आहे. काही वेळा 'अर्थात्', 'क्वचित्' या अव्ययांपुढे 'च' हे अव्यय वापरण्यात येते. त्या वेळी 'अर्थातच', 'क्वचितच' असे लिहावे लागते. त्यामुळे वरील प्रकारात मोडणारे सर्व शब्द स्वरान्त लिहिण्यात यावेत. असे आणखी काही शब्द पुढीलप्रमाणे आहेत. जसे :- किंचित, तद्वत, दैववशात, श्रीमान, धनवान, भगवान, विद्युत, परिषद, संसद, सम्राट इत्यादी. कोणत्याही अन्य भाषेतील शब्द लिहिण्याची गरज पडेल तेव्हा त्या भाषेतल्या उच्चाराप्रमाणे लेखन करावे.

इंग्रजी शब्द, पदव्या किंवा त्यांचे संक्षेप यांच्या शेवटचे अकारान्त अक्षर आता व्यंजनान्त (म्हणजेच पायमोडके) लिहू नये. उदा.-वॉटसन, बायरन, कीट्स, एम. एल. सी., पीएच.डी., इत्यादी.

**नियम १५ :** केशवसुतपूर्वकालीन पद्य व विष्णुशास्त्री चिपळूणकर पूर्वकालीन गद्य यांतील उतारे छापताना ते मुळानुसार छापावे. तदनंतरचे (केशवसुत व चिपळूणकर यांच्या लेखनासह) लेखन मराठी साहित्य महामंडळाच्या प्रस्तुत लेखनविषयक नियमांस अनुसरून छापावे.

**नियम १६ :** राहणे, पाहणे, वाहणे अशी रूपे वापरावी. रहाणे-राहाणे, पहाणे-पाहाणे, वहाणे- वाहाणे अशी रूपे वापरू नयेत. आज्ञार्थी प्रयोग करताना 'राहा, पाहा, वाहा' यांजबरोबरच 'रहा, पहा, वहा' ही रूपे वापरण्यास हरकत नाही.

**नियम १७ :** 'इत्यादी' व 'ही' (अव्यय) हे शब्द दीर्घान्त लिहावे. 'अन्' हा शब्द व्यंजनान्त लिहावा. 'इत्यादी' हे अव्यय नसून विशेषण आहे. त्यामुळे ते दीर्घान्त लिहावे.

**नियम १८ :** पद्यात वृत्ताचे बंधन पाळताना ऱ्हस्व-दीर्घाच्या बाबतीत हे नियम काटेकोरपणे पाळता येणे शक्य नसल्यास कवीला तेवढ्यापुरते स्वातंत्र्य असावे.

| अ. क्र. | चिन्हाचे नाव | चिन्ह | कार्य | उदाहरणे |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्णविराम | ● | १) लेखनात कोणतेही विधान पूर्ण झाले आहे, हे दर्शविण्यासाठी या चिन्हांचा वापर करतात.<br>२) एखाद्या शब्दाचा संक्षेप नोंदविण्यासाठी या चिन्हांचा वापर क्वचित प्रसंगी . ऐवजी पोकळ ० चिन्ह वापरतात. दोन्ही पद्धती रूढ आहेत. पण वाक्य पूर्ण झाल्यावर भरीव चिन्ह वापरावे. | जगात सर्वत्र कोरोनाची साथ पसरली आहे.<br>ता. क. किंवा ता ० क ० ताजा कलम<br>उदा. उदाहरणार्थ पु ० ल ० देशपांडे/ पु. ल. देशपांडे |
| २ | प्रश्नचिन्ह | ? | १) प्रश्न विचारताना लेखनात हे चिन्ह | तुझे नाव काय आहे? |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | योजतात.<br>२) कधी कधी आश्चर्य व नाराजी व्यक्त करण्यासाठी देखील या चिन्हांचा वापर करतात.<br>३) साशंकता व्यक्त करण्यासाठी कंसात हे चिन्ह घालतात. | काय म्हणतोस?<br>बोलणार नाहीस माझ्याशी?<br>तो तिच्याशी स्नेहाने (?) वागला. |
| ३ | उद्‌गारचिन्ह | ! | १) आश्चर्य, दुःख, आनंद इत्यादी भावना व्यक्त करताना वाक्यात या चिन्हांचा उपयोग करतात.<br>२) अचानकपणे तोंडातून निघणाऱ्या उद्‌गारानंतर या चिन्हाचा उपयोग करतात.<br>३) एखाद्या व्यक्तीला संबोधतानाही केव्हा केव्हा याचा वापर करतात. (थोडी भीती किंवा आश्चर्य व्यक्त करताना) | किती प्रसन्न होती त्याची मुद्रा!<br>अरेरे! त्या बिचारीचा काय दोष!<br>अग आई ग! अरे देवा!<br>अहो बाबा! बाबा !<br>बघा, केवढा मोठा हा साप! |
| ४ | स्वल्पविराम | , | १) संबोधनानंतर प्रामुख्याने हे चिन्ह योजतात.<br>२) वाक्यात एकाच प्रकारचे शब्द किंवा शब्दांचे गट एकानंतर एक आल्यास या चिन्हाचा वापर करतात. मात्र त्याच गटातील शेवटच्या गटा आधी 'वा' किंवा 'आणि' आल्यास स्वल्पविराम देण्याची आवश्यकता नसते.<br>३) वाक्यात दोन किंवा अधिक उपवाक्ये (पोटवाक्ये) आल्यास या चिन्हाचा उपयोग करतात. | बाळा, जरा इकडे ये बरं!<br>निर्मलाने भाजी बाजारातून मेथी, पालक, कांदापात या पालेभाज्या आणि वांगी, पडवळ व दुधी या फळभाज्या आणल्या.<br>तो परत आपल्या गावाला येईल, आपल्या घरी राहील आणि येथेच रमेल असे आम्हाला वाटते. |
| ५ | अर्धविराम | ; | एकाच प्रकारची पोटवाक्ये जोडताना हे | तो आला; त्याने पाहिले; त्याने जिंकले. माझा मित्र घरी आला; |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | चिन्ह वापरतात. | जरा वेळ बसला; न बोलत निघूनही गेला. |
| ६ | अपूर्ण विराम किंवा द्विबिंदू चिन्ह | : | क्रम किंवा स्पष्टीकरण द्यायचे असल्यास हे चिन्ह वापरतात. | शाळेतील पुढील विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला : रमेश तुपे, माधुरी काळे, हेमंत पाटील....<br>ती दारातच थबकली. तिला शब्द ऐकू आले : ''रात्रीच्या वेळी असे रडत बसू नये.'' |
| ७ | संयोग चिन्ह (हायफन) | - | दोन किंवा अधिक शब्द जोडताना अनेकदा या चिन्हांचा वापर करतात. | पंचवीस -तीस वर्षांची एक स्त्री रस्ता ओलांडत होती.<br>पुणे-मुंबई रस्ता. |
| ८ | अपसारण चिन्ह (डॅश) | – | बोलत असताना पुढचे बोलण्यास अवघड वाटल्यास किंवा विचारमालिका खंडित झाल्यास हे चिन्ह योजतात. अधिक स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता वाटल्यासही हे चिन्ह वापरतात.<br>दुसऱ्याचे भाषण मध्येच तोडल्यावरही हे चिन्ह वापरतात.<br>(टीप : अपसारण चिन्हासाठी योजलेली आडवी रेघ (र) – ही संयोग चिन्हापेक्षा जवळजवळ दुपटीने लांब असते.) | त्याने आपल्या मित्राची – चंदूची – ओळख करून दिली.<br>मी तुला काही सांगणार आहे. पण – |
| ९ | दुहेरी अवतरण चिन्ह | ''---'' | १) लेखनात कोणाच्या तरी तोंडचे शब्द, संवाद लिहिताना सुरुवातीला ''असे व अखेरीस'' असे चिन्ह वापरतात.<br>२) एखाद्या वक्त्याच्या भाषणातील किंवा लेखकाच्या लिखाणातील | मी म्हटलं, ''मित्रा, तू आलास हे बरं झालं.'' ''ते कसं?'' ''म्हणजे एकाला दुसरं माणूस असलं वेळप्रसंगाला, म्हणजे बरं असतं.''<br>''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,'' असे लोकमान्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अवतरण जसेच्या तसे द्यायचे असेल, तर ते दुहेरी अवतरण चिन्हांचा वापर करून देतात. | टिळक म्हणतात. संत तुकाराम म्हणतात, ''जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण.'' |
| १० | एकेरी अवतरण चिन्ह | '----' | एखाद्या संस्थेचे, ग्रंथाचे नाव किंवा एखाद्या शब्दाचे स्पष्टीकरण द्यायचे झाल्यास ते नाव किंवा तो शब्द एकेरी अवतरण चिन्हात लिहितात. | म. फुल्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहिला. हिंदी भाषेत 'ळ' हा ध्वनी नाही. |
| ११ | अधोरेखा (अंडरलाईन) (शब्दाच्या किंवा वाक्याच्या खाली ओढलेली रेष) | शब्द | एखाद्या शब्दाकडे लक्ष वेधायचे असेल किंवा एखादे वाक्य महत्त्वाचे असेल तर ते दर्शविण्यासाठी या रेषेचा वापर करतात. (टीप-छापील मजकुरात अधोरेखित करण्यापेक्षा शब्द, वाक्य जाड ठशात मुद्रित करतात.) | मनुष्य, झाड, भाषण या शब्दांना नाम असे म्हणतात. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल अनुस्वार द्यावा. नेपोलियनच्या **कोशात** अशक्य हा शब्द नाही. |
| १२ | लोपचिन्ह | ... | वाक्य अर्धवट उच्चारले गेले, किंवा पुढचे नीट सांगता येत नाही, किंवा पुढचे सांगण्याची इच्छा नाही किंवा तसे सांगणे इष्ट नाही, अशा वेळी लेखनात या चिन्हाची योजना करतात. | मला तुझ्याशी काही बोलायचे आहे....पण जाऊ दे... पुन्हा केव्हा तरी.... |
| १३ | फुल्या | XXX | वाक्यात अपशब्द लिहिताना अवघड वाटल्यास त्या शब्दाऐवजी अशा फुल्यांचा वापर करतात. | भले तो देऊ XXX लंगोटी. XXX, पुन्हा तसंच वागलास ना! |
| १४ | विकल्पचिन्ह | / | हे किंवा ते असे वाक्यात दर्शविताना याचा वापर करतात. | लेखनात एखादे नाव/ शब्द महत्त्वाचा असेल तर त्याखाली रेघ द्यावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | काकपद | ∧ | लेखनात एखादा शब्द, वाक्यांश किंवा वाक्यच लिहायचे राहून गेल्यास हे चिन्ह वापरून तो मजकूर लिहितात. | चालूच<br>त्याचे बोलणे ∧ होते. |
| १६ | वरीलप्रमाणे | –"– | जेव्हा वरच्या ओळीतले शब्दच खालच्या ओळीत घ्यावयाचे असतात तेव्हा ते या चिन्हाने दाखवले जातात. | हे माझे पुस्तक आहे.<br>ते तुझे –"– –"–. |
| १७ | १) गोल कंस | () | आशयाचा ओघ खंडित करून त्यात भर घालावयाची असेल तर ती कंसात दाखवतात. | दशरथाच्या तीन राण्या होत्या, कौसल्या (पहिली), सुमित्रा (दुसरी) आणि कैकयी (तिसरी). |
| | २) चौकोनी | [ ] | अनेक कंसाचा वापर करावयाचा झाल्यास चौकोनी कंसाच्या पोटात गोल कंस घालतात. | [ लेखन तपासताना उपयोगी पडणाऱ्या खुणांचा एक तक्ता (स्पष्टीकरणासह) पुढे दिला आहे. ] |
| | ३) महिरपी कंस | { } | केव्हा केव्हा महिरपी कंसाच्या पोटात गोलकंस घालतात. हा महिरपी कंस लेखनात क्वचित वापरतात. | सुरेश भट हे कवी व विशेषतः गझलकार म्हणून प्रसिद्ध होते. {त्यांनी पत्रकार व संपादक म्हणूनही काम केले. (संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांचा सहभाग) त्यांची गीते म्हणजे रसिकांसाठी पर्वणी असते.} |

**मुद्रितशोधनाची पद्धत**

हस्तलिखित मुद्रणप्रत तयार झाल्यावर जुळारी (डी.टी.पी. ऑपरेटर) टंकन (टायपिंग) करून त्याची पहिली प्रत काढतो. ती मुद्रितशोधकाकडे आल्यावर पुढील प्रक्रिया होते.

- **पहिले वाचन** : मुद्रितशोधनाचे पहिले मुद्रित शक्यतो एकट्याने वाचू नये. साहाय्यकाच्या मदतीने मूळ मजकूर मोठ्याने वाचावा आणि पहिले मुद्रित मूळप्रतीप्रमाणे आलेले आहे की नाही हे मुद्रितशोधकाने तपासावे. या वाचनाच्या वेळी मूळ मजकुरातील एखादा शब्द, वाक्यांश, ओळी, परिच्छेद सुटला नाही ना, ते लक्षात घ्यावे. पहिल्या वाचनात खूप शंका, दुरुस्त्या येऊ शकतात. त्यांचे निराकरण व दुरुस्त्या होणे अपेक्षित असते.

- **दुसरे वाचन** : हे मुद्रितशोधकाने एकट्याने एकाग्रतेने व बारकाईने वाचावे. या वाचनात पहिल्या मुद्रितात लक्षात न आलेल्या चुका नजरेस येतात. दुसऱ्या मुद्रितशोधनाच्यावेळी प्रकरणांची शीर्षके, उपशीर्षके, पृष्ठक्रमांक, लेखनाची मांडणी यांकडे लक्ष पुरवावे.
- **तिसरे वाचन** : दुसऱ्या मुद्रितातील दुरुस्त्या तपासणे. मजकूर अंतिम छपाईला जाण्यापूर्वी लेखक व मुद्रितशोधक हे अतिशय काळजीपूर्वक वाचन व दुरुस्ती करतात. कारण छपाई झाल्यावर दुरुस्तीला वाव नसतो.

मुद्रितशोधकाने मजकूर तपासताना मुद्रितातील चुका मुद्रितशोधनाच्या खुणांचा वापर करून बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत मांडून प्रत्येक खुणेनंतर तिरकी रेषा काढावी. मुद्रितात जे दिसेल ते मूळ प्रतीत न शोधता, मूळ प्रतीत जे आहे ते मुद्रितात शोधण्याची सवय असावी. मुद्रितशोधकाने मजकूर तपासताना येणाऱ्या शंकांची नोंद ठेवणे गरजेचे असते. शब्दकोश वा अन्य कोश वाङ्मय यांचा गरजेनुसार वापर करण्याची सवय असावी. मुद्रितशोधकाने मूळ प्रतीप्रमाणेच मुद्रितशोधन करावे. शंका असेल तर लेखकाबरोबर चर्चा करावी. मगच बदल करावा. स्वतःच्या मताचा मजकूर परस्पर घालू नये.

**संगणकीय मुद्रितशोधन**

आजच्या संगणकीय युगात लेखक मुद्रकाकडे सॉफ्ट कॉपी पाठवतो. मुद्रकाकडून ती अपेक्षित संस्कारांसह मुद्रितशोधकाकडे येते. मुद्रितशोधक मुद्रितशोधन करून सॉफ्ट कॉपीतच दुरुस्त्या करून ती कॉपी पुन्हा लेखकाकडे पाठवतो. अंतिम मुद्रण परिपूर्णतेसाठी व निर्दोषतेसाठी मुद्रितशोधकाकडे येत असते. त्यातील मुद्रितशोधनाचे काम पूर्ण झाल्यानंतर ती निर्दोष होते आणि मुद्रणासाठी पाठवली जाते.

नवीन संगणकीय तंत्रज्ञानानुसार मुद्रितशोधनाचे काम सोपे व सहज झाले आहे यात शंका नाही; परंतु ते निर्दोष झाले आहे, असे मात्र खात्रीने सांगता येत नाही. स्पेलचेकर (संगणकीय शब्दलेखन तपासनीस) शब्द बरोबर आहे किंवा चूक आहे ते तपासतो. त्याला पर्यायी शब्दांची जोड देतो; परंतु तो शब्द तिथे योग्य आहे की नाही हे त्याला समजत नाही, ते मुद्रितशोधकाला ठरवावे लागते. उदा. सुप्रसिद्ध, माननीय, आदरणीय, विचारवंत, लोकप्रिय इत्यादी विशेषणांपैकी कोणते विशेषण योग्य ते मुद्रितशोधक निश्चित करत असतो. स्पेलचेकरच्या बेसावध वापरामुळे एका वृत्तपत्रात, 'सुप्रसिद्ध संगीतकाराचा गौरव' या शीर्षकाऐवजी 'कुप्रसिद्ध संगीतकाराचा गौरव' असे प्रसिद्ध झाले होते. परिच्छेद वगळला गेला, चुकीचा संदर्भ दिला गेला, वाक्यांची सरमिसळ झाली तर ते स्पेलचेकरला समजत नाही. तपासला जात असलेला मजकूर मूळ मजकुरानुसार आहे की नाही हे मुद्रितशोधक पाहू शकतो, स्पेलचेकर नाही. नाम-विशेषण-कर्ता-क्रियापद इत्यादी क्रम किंवा व्याकरणिक रचना मुद्रितशोधकालाच माहीत असते. स्पेलचेकर हा मुद्रितशोधकाला पर्याय नसून तो अल्पप्रमाणात त्याचा मदतनीस आहे, असेही आपण म्हणू शकतो. स्पलेचेकरवर पूर्णतः विसंबून राहता येणार नाही.

मुद्रितशोधनाच्या सांकेतिक खुणांचा तक्ता व मुद्रितशोधनांचा खुणांसह एक नमुना पुढे दिला आहे, त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करा व प्रात्यक्षिक कार्यात दिलेल्या उताऱ्याचे मुद्रितशोधन करा.

मुद्रितशोधनाच्या खुणांचा तक्ता पुढे दिला आहे. त्यानुसार मुद्रितशोधनाचा सराव करा.

मुद्रितशोधनाच्या खुणांचा तक्ता पुढे दिला आहे. त्यानुसार मुद्रितशोधनाचा सराव करा.

## मुद्रितशोधनाच्या काही खुणांचा तक्ता

| खूण | खुणेचा अर्थ | खूण कशी करावी याचे उदाहरण | खुणेचा वापर |
| --- | --- | --- | --- |
| ⌐ | ओळ सरळ करा. | मराठी मासिके आणि वाङ्मयविकास | |
| ⁀ | अक्षरे जोडून घ्या./एक शब्द करा. | साहि त्य आणि राष्ट्रीय एकाे त्मता | |
| # | शब्द तोडा. स्पेस/अंतर टाका. | कधीही त्याला डबकशाला | |
| | काढून टाका व शब्द जोडा. | पत्र अल्पाक्षरी असावे. | |
| | डिलिट/काढून टाका. | स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. | |
| ा | काना द्या. | मराठी साहित्य मराठी नाटक | |
| ां | काना व अनुस्वार द्या. | वेदांचे ज्ञान लोकांना मिळावे. | |
| ि | ऱ्हस्व वेलांटी टाका. | लौकिक आणि सामाजिक | |
| ी | दीर्घ वेलांटी टाका. | तुकोबांची अभंगवाणी | |
| ु | ऱ्हस्व उकार टाका. | सुरेख संगम | |
| ू | दीर्घ उकार टाका. | दूध हे सात्त्विक अन्न | |
| े | मात्रा टाका. | जीवनाचे गाणे | |
| ें | मात्रा व अनुस्वार टाका.. | आभाळ ठेंगणे वाटणे | |
| र्‍ | रफार टाका. | उगवत्या सूर्याचा देश | |
| , | स्वल्पविराम टाका. | मराठी माणूस स्पष्टवक्ता /रांगडा/ व प्रेमळ आहे. | |
| ; | अर्धविराम टाका . | वारा सुटला/आकाशात ढग जमले/ व ढगांचा गडगडाट झाला. | |
| ⊙ | पूर्णविराम टाका. | माणसाची उपेक्षा संतांना मंजूर नाही | |

(पुढील पानावर)

(मागील पानावरून)

| खूण | खुणेचा अर्थ | खूण कशी करावी याचे उदाहरण | खुणेचा वापर |
|---|---|---|---|
| ? | प्रश्नचिन्ह टाका. | अशा वेळी काय करावं L | ?L |
| ! | उद्गारचिन्ह टाका. | अबब L केवढे उंच झाड L | !L !L |
| ः | विसर्ग टाका. | शब्दश L भाषांतर | ःL |
| - | संयोगचिन्ह टाका. | पुणे L बेंगलोर हाय वे | -L |
| — | डॅश टाका. | गैरहजर विद्यार्थी पुढीलप्रमाणे L | —L |
| ०ड | अनुस्वार काढून टाका. | मराठी वाङ्मय | ड |
| ∽ | शब्दाची जागा बदला. | देव लंपट भावाचा | ∽ |
| (/) | कंस टाका. | तो / बायकोकडे पाहून / म्हणतो - | (/)/ |
| wf | चुकीचा टाईप (रॉंग फॉंट) | भारत भाग्यविधाता | wf/wf/ |
| Bold | ठळक टाईप टाका. | माहितीपत्रकाचा नमुना | Bold |
| ७ | अक्षर सुलट करा. | साहित्य संमेलन | ७/ |
| 'सेंटर' | मधोमध घ्या. | श्री गजाजन प्रसन्न | 'सेंटर' |
| Run on | पुढे चालू ठेवा. (वाक्य/ परिच्छेद जोडून घ्या.) | इतकेच नव्हे तर<br>लिहिलेला एखादा अशुद्ध शब्द | Run on |
| ⅃ | नवीन परिच्छेद करा. | त्यांनी जे निर्णय घेतले ते<br>पुढीलप्रमाणे/सर्व कार्यकर्त्यांनी एकाच वेळी | ⅃/ |
| L | नवीन /राहिलेले अक्षर घाला. | तो अकून आहे. | ढं L |

## मुद्रितशोधनाचा नमुना

हा/ सिं/ हे सींव्हासन तयर करण्यास सात त/

प/ वर्षे लागल्. रत्ने सोने चांद आणि जवाहीर यांचा ग/ न/ प/ णि/

रू/ उ/ ऊपयोग कऊन ते घडविण्या आले व्हते. त/ हो/

आसनाचे चार खूर सोप्या चे होते

त/ ऱ्/ ं/ मेघडंबरीव बार स्तंब पाचुचे होते. प्रतेक भ/ ू/ त्ये/

स्तंभावर दोन रत्नकचित मोर बशिवलेले ख/ स/

रं होते मोर च्या प्रत्येक जोडीच्या हीर मध्योमध्य फि/ ऱ्/

व/ च/ पाचु माणके भरलेले यांनी एक झाड

Run on होते.


या सिंहासर्णाची कीमत जवळ जेवळ ना/ णि/

पाच कोटी रुपये होती. सर्व हिंदुस्तानात ऽ/ स्था/

णि/ ऱ्/ असे सींहासन कोठे आढळेल काय असे हे ?

णि/ सिं/ सींहासन अप्रतीम होवून बसले. ऊ/

***



४) मुद्रितशोधनाचे प्रात्यक्षिक कार्य - वर्तमानपत्र

१) घंटागाडी योजनेच्या यशस्वीतिसाठी प्रयत्न

२) मूर्तीकारांचा श्रीगणेशा

३) असतील. पण त्यांना आकर्षित करायचे असेल तर मुळात ते चीनकडे आकर्षित कसे झाले, हे जाणून घ्यावे लागेल.

४) जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने ... केंद्रीय राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने काही प्रकल्प घाईघाईने मंजूर केले. अशा झटपट मंजुरीचे परिणाम दिर्घकाळ भोगावे लागतील.

५) ... औद्योगिक गाडी ...

६) दंगल आणि बॉम्बस्फोटांची श्रृखला
(सन १९९३)

७) दोन फूट उंचीच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा

८) आसाममध्ये अग्नीतांडव सुरुच : जैवसाखळीचे नुकसान

९) ...

१०) परिक्षण
पुस्तक परिक्षण-अभिप्राय

११) यंदा दोन हजार वेळा शस्त्रसंधीभंग

वर्तमानपत्रांत स्पेलचेकर व मुद्रितशोधकांच्या नजरेतून निसटलेले हे मुद्रणदोष का निर्माण झाले! याची आपण चर्चा करू –

१) यशस्वीतेसाठी – मूळ तत्सम शब्द – यशस्विन्– मराठीत येताना तो 'यशस्वी' असा (यशस्वितेसाठी) होतो. त्यास 'ता' प्रत्यक्ष लागताना 'स्वि' मुळातल्याप्रमाणे ऱ्हस्व होतो, त्यामुळे हा शब्द 'यशस्वितेसाठी' असा हवा.

२) मूर्तीकार – मूळ तत्सम शब्द 'मूर्ति' मराठीत 'मूर्ती' असा होतो. 'कार' प्रत्यय (मूर्तिकार) लागताना मुळातल्याप्रमाणे ऱ्हस्वान्त हवा. 'मूर्तिकार'

३) मुशात u मुळात* – डीटीपी करताना झालेली चूक मुद्रितशोधकाच्या लक्षात आली नाही. 'ळ' च्या ठिकाणी 'श' टंकित झाला.

४) कृत्तींचा u कृतींचा*; अलिकडेच u अलीकडेच*; दिर्घकाळ u दीर्घकाळ*

५) बागातील u भागातील* – 'भ' च्या ठिकाणी 'ब' टंकला गेला.

६) श्रृखंला u शृंखला – श् + ऋ = शृ – ऋ स्वर असताना 'र्' अर्धस्वराचे जोडाक्षर होत नाही.

७) प्रतिष्ठापणा u प्रतिष्ठापना* 'न' चा 'ण' झाला.

८) अग्नीतांडव u अग्नितांडव* मूळ तत्सम शब्द 'अग्नि' ऱ्हस्वान्त आहे. त्यामुळे सामासिक शब्दात पूर्वपदी आल्यावर तो ऱ्हस्वान्तच राहतो.

९) वतावरण u वातावरण*

१०) परिक्षण u परीक्षण* परि + ईक्षण – परीक्षण – दीर्घत्व स्वरसंधी (इ+ई=ई)

११) शस्त्रसंधीभंग u शस्त्रसंधिभंग* u'संधि' हा तत्सम शब्द ऱ्हस्वान्त आहे. सामासिक शब्दात तो पूर्वपदी ऱ्हस्वच राहतो.

यावरून आपल्या लक्षात आले असेल की प्रमाणलेखनाचे नियम, व्याकरणातील संधी, समास, शब्दसिद्धी विशेषतः तत्सम संस्कृत शब्द यांचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. वर्तमानपत्रासाठी वेळेची मर्यादा असते. इतर मुद्रित साहित्यात साप्ताहिके, मासिके, ग्रंथ, छापील मजकूर, लेख इत्यादींमध्ये तुलनेने अधिक वेळ मिळतो त्यामुळे मुद्रणदोषांचे प्रमाण कमी असते. मुद्रितशोधनाची पद्धत सर्वत्र एकसारखीच असते.

**मुद्रितशोधनाच्या सरावासाठी उतारे**

१) खाली दिलेल्या उताऱ्याचे मुद्रितशोधन करा.

आनंद आणी दुख सुंदर रीतीने एकमेकांत
गुंफलेले आहत, स्वर्गिय आत्म्यासाठी तेएक आहे वस्त्र; प्रत्येक दुःखाच्या, झरणीच्या तळाशी, आनंदचा बारिक रशमी धागा असतो ते तसे असते हे अगदी योग्यच आहे; मनुष्य ह

सुख आणि दुख यांच्यासाठी घडवलेला असतो; आणि हे जेव्हा आपल्याला योग्य तहने समजते, तेव्हा या जगातील आपला प्रवास सुखरूप पावर पडतो.

२) खाली दिलेल्या उताऱ्याचे मुद्रितशोधन करा.

भविष्यकाळात परिक्षांना बसणारे उमेदवार परीक्षेच्या हालमध्ये इलेक्ट्रॉनिक साधने चोरून नेतील अशी अपेक्षा केली जाऊशकते. कदाचीत मनगटी घड्याळांसारखे त्यांचे रेडिओ दिसतील. त्यांच्यकडे विद्यालयीन भुमिगत केंद्रांकडून एका वेळी एक शब्दावयव या पद्धतीने तयार उत्तरे प्रक्षेपीत केली जातील किंवा कदाचित ज्या आदश

राजकीय-सामाजिक अवस्थेची आपण गंभीरपण अपेक्षा करत आहोत, त्या अवस्थेत आपल्याला देण्यासाठी त्रास कोणत्याच परीक्षा नसन्याचा संभव आहे; अशी त्रासदयक, कंटाळवाणी कामे करण्यासाठी आपल्यापकी प्रत्येका जवळ आपला वैयक्तीक यंत्रमानव असण्याचा संभव आहे; किंवा पर्याय म्हवणून, केवळ वयाने मोठे झाल्यामुळे पदव्या मिळवल्या जाण्याचा सभव आहे.

## ३.४ समारोप

मुद्रणप्रत अधिकाधिक निर्दोष होण्यासाठी केली जाणारी प्रक्रिया म्हणजे मुद्रितशोधन. लिखित स्वरूपातील कोणत्याही मजकुरोच अंतिम मुद्रण करण्यापूर्वी त्याचे मुद्रितशोधन करण्याची आवश्यकता असते. मुद्रितशोधन करणाऱ्यास मुद्रितशोधक असे म्हणतात. लेखकाचा आशय वाचकांपर्यंत निर्दोषपणे पोहोचविण्याची जबाबदारी मुद्रितशोधकाला पार पाडावी लागते. ग्रंथाचे मुद्रितशोधन, वृत्तपत्रीय मुद्रितशोधन व वाणिज्यविषयक मुद्रितशोधन हे मुद्रितशोधनाचे प्रकार आहेत. भाषा व व्याकरणाचे सखोल ज्ञान, बहुश्रुतता, वाङ्मयीन अभिरुची, सौंदर्यदृष्टी, परिश्रमशीलता, संगणकीय अक्षरजुळणीचे कौशल्य व तांत्रिक ज्ञानातील परिपूर्णता यांसारखे गुण मुद्रितशोधकाच्या अंगी असावे लागतात. चांगल्या मुद्रितशोधकांना मोठी मागणी असून नोकरी तसेच स्वतंत्र व्यवसाय म्हणून अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध आहेत. सध्या संगणकावर थेट मुद्रितशोधन केले जाते. विद्यार्थ्यांनी शिक्षण धेत असतानाच प्रमाणलेखनविषयक नियम, व्याकरण, विरामचिन्हे यांचे सूक्ष्म ज्ञान व संगणकीय अक्षरजुळणीचे कौशल्य अवगत केल्यास ते यशस्वी मुद्रितशोधक म्हणून करिअर करू शकतात.

## ३.५ प्रश्नोत्तरे

### अ) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न

१. मुद्रित मजकूर अधिकाधिक निर्दोष होण्यासाठी काय केले जाते?

अ) संपादन ब) मुद्रितशोधन क) जुळणी ड) सजावट

२. मुद्रितशोधनाचे काम करणाऱ्यास काय म्हणतात?

अ) जुळारी ब) संपादक क) प्रकाशक ड) मुद्रितशोधक

३. मुद्रितशोधकाकडे कोणता गुण असावा?

अ) भाषा व लेखनविषयक नियमांचे ज्ञान ब) प्रामाणिकपणा

क) खिलाडू वृत्ती ड)प्रसिद्धीलोलुपता

४. वाणिज्यविषयक मुद्रितशोधनामध्ये कोणत्या बाबीस महत्त्व असते?

अ) रचनातंत्र ब) आशय क) टंक ड) शैली

५. मुद्रितशोधनामध्ये मुद्रिताचे किमान किती वेळा वाचन केले जाते?

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

**उत्तरे**

१. मुद्रितशोधन
२. मुद्रितशोधक
३. भाषा व लेखनविषयक नियमांचे ज्ञान
४. रचनातंत्र
५. तीन

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. मुद्रितशोधन म्हणजे काय हे सांगून मुद्रितशोधनाचे महत्त्व विशद करा.
२. मुद्रितशोधकाची गुणवैशिष्ट्ये सांगा.
३. मुद्रितशोधनाची पद्धती विशद करा.

**क) दीघोत्तरी प्रश्न**

१. अनुस्वाराचे प्रमाणलेखनविषयक नियम सांगा.
२. प्रमाणलेखनाचे ऱ्हस्वदीर्घविषयक नियम सांगा.
३. विरामचिन्हांच्या खुणा व कार्य यांची सविस्तर माहिती लिहा.

## ३.६ सरावासाठी अधिक प्रश्न

**अ) लघुत्तरी प्रश्न**

१. संगणकीय मुद्रितशोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. मुद्रितशोधनाचे प्रकार सांगा.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. वृत्तपत्रातील मजकुराचे मुद्रितशोधन करा.

२. मुद्रितशोधनाच्या खुणांचा तक्ता तयार करा.

### ३.७ उपक्रम

तुमच्या परिसरातील मुद्रणालयास, वृत्तपत्र कार्यालयास भेट देऊन तेथील मुद्रितशोधनाची कार्यपद्धती समजून घ्या.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


१) गवस राजन, शिंदे अरुण, पाटील गोमटेश्वर, भाषिक सर्जन आणि उपयोजन- दर्या प्रकाशन पुणे. २०१२.

२) धायगुडे य. ए., मुद्रितशोधन- दि. पूना प्रेस ओनर्स असो. लि. पुणे, १९६०.

३) भटकळ रामदास, जोशीमृदुला प्रभुराम, पॉप्युलर रीतिपुस्तक- पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१५.

४) मोडक केतश्री, शेणई संतोष, शेणई सुजाता, उपयोजित मराठी- (डॉ. गं. ना. जोगळेकर कृतज्ञता ग्रंथ) पद्मगंधा, पुणे, २०१२.

५) नसिराबादकर ल. रा., व्यावहारिक मराठी-फडके प्रकाशन, कोल्हापूर २०१०.

६) शेख यास्मिन, मराठी लेखन मार्गदर्शिका- राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, सुधारित तिसरी आवृत्ती, २०१७.

७) प्रमाणलेखन नियमावली- भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१२.

८) वाळंबे मो. रा., मराठी शुद्धलेखन प्रदीप- नितीन प्रकाशन, पुणे, २०१४.

९) फडके अरुण, शुद्धलेखन मार्गप्रदीप- अंकुर प्रकाशन, ठाणे, २०१३.

१०) गोखले ह. स., शुद्धलेखन शुद्धमुद्रण शब्दकोश- दि पूना प्रेस ओनर्स असो. पुणे, १९६१.

११) सामंत सत्त्वशीला, व्याकरणशुद्ध लेखनप्रणाली- डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२.

१२) शेख यास्मिन, मराठी शब्दलेखन कोश- हर्मिस प्रकाशन, पुणे,२०१५.

१३) फडके अरुण, मराठी लेखन- कोश- अंकुर प्रकाशन, ठाणे.

१४) मोहनी दिवाकर, शुद्धलेखनाचें तत्त्वज्ञान- पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१९


❑❑❑

# घटक – ४
# स्पर्धा परीक्षांसाठी मराठी

## ४.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस

१. शासकीय सेवेमध्ये स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून भरली जाणारी विविध पदे व त्यासाठीची पात्रता यांची माहिती होईल.

२. स्पर्धा परीक्षांमधील मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची माहिती होईल.

३. स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची निश्चित दिशा प्राप्त होईल.

४. स्पर्धा परीक्षांमधून अर्थार्जनाच्या विविध संधी प्राप्त करता येतील.

## ४.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, आता तुम्ही बी. ए. च्या तृतीय वर्षात पदार्पण केले आहे. महाविद्यालयीन जीवनातील शेवटच्या टप्प्यात तुम्ही आहात. दैनंदिन धावपळीतही तीन वर्षे केव्हा संपतात हे आपल्याला कळत देखील नाही. यातून बाहेर पडल्यावर मात्र रोजगाराचा प्रश्न आपल्यापुढे उभा राहतो. व्यावसायिक अभ्यासक्रमात असलेल्यांपेक्षा कला शाखेच्या विद्यार्थी मित्रांना थोडा अधिक काळ या प्रश्नाचा सामना करावा लागतो.

पदवीनंतर पदव्युत्तर पदवीचा पर्याय तुमच्यापुढे खुला होतो. तो नेट,सेट, एम. फिल, पीएच.डी. पर्यंत जाऊन अनेक संधी उपलब्ध करून देतो. याशिवाय अजूनही काही क्षेत्रे उपलब्ध होतात. त्यातच अलीकडे स्पर्धा परीक्षांचे नवेच अवकाश युवकांना उपलब्ध झाले आहे. त्यातून अर्थार्जन ही मूळ संकल्पना तर ओघाने होतेच पण त्यातून जीवनाला एक नवी दिशा मिळते. समाजासाठी काही चांगले करण्याची संधी प्राप्त होते. शिवाय स्वतःचे जीवनमान देखील आपण उंचावू शकतो. काय असतात या स्पर्धा परीक्षा, त्यातून कोणत्या नोकरीच्या संधी आपल्याला उपलब्ध होतात, त्या परीक्षांचे प्रकार व त्यांचे स्वरूप या सर्वांविषयी आपण या घटकातून थोडक्यात माहिती घेऊ.

## ४.३ विषय विवेचन

आजकाल कोणते क्षेत्र असे राहिले नाही ज्यात स्पर्धा नाही व अनुषंगाने स्पर्धा परीक्षा होत नाहीत. नर्सरीपासून तर अगदी आयआयटी, आयआयएम, सीईटी, विद्यापीठ या सर्व स्तरातून स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येते.

त्यातच राज्य लोकसेवा आयोग (MPSC) व संघ लोकसेवा आयोग (UPSC) कडून घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षा या जरा वरच्या स्वरूपाच्या मानल्या जातात. कारण आयोगांमार्फत ज्या जागा भरल्या जातात त्या एकूणच भारतीय व राज्य प्रशासनमधील उच्च स्तरावरच्या असतात. त्या पदांवरील जबाबदारी मोठी

असते व एकूणच देशाच्या विकासामध्ये व विकासाला दिशा देण्यामध्ये या पदावरील सर्व अधिकारी वर्गाची भूमिका निर्णायक ठरते. भारतीय संविधानाने अनुच्छेद ३१५ नुसार केंद्रीय प्रशासनातील पदे भरण्यासाठी संघ/केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) व राज्य प्रशासन सेवेतील पदे भरण्यासाठी राज्य लोकसेवा आयोगाची (महाराष्ट्रासाठी MPSC) स्थापना केलेली आहे. बँकेसारख्या संस्थांमधील पदांची भरती ही संबंधित रिक्रुटमेंट बोर्डांकडून केली जाते. प्रथम आपण संघ/ केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या स्वरूपाची माहिती घेऊ.

**अ) केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी)**

भारतीय संविधानाच्या कलम ३१५ अन्वये केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली. केंद्र पातळीवर यूपीएससी आणि राज्य पातळीवर संबंधित राज्यांच्या लोकसेवा आयोगातर्फे विविध पदांसाठी स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. यूपीएससीद्वारे दर वर्षी नागरी सेवा, सीडीएस, एनडीए, इंजिनिअरिंग अशा विविध स्पर्धात्मक परीक्षा घेतल्या जातात. या सर्व परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम पूर्णत: भिन्न असूनही त्या 'यूपीएससीची परीक्षा' याच नावाने ओळखल्या जातात.

**यू.पी.एस.सी. (केंद्रीय लोकसेवा आयोग) द्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा**

१) नागरी सेवा परीक्षा (सिव्हिल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन)

२) भारतीय वनसेवा परीक्षा (इंडियन फॉरेस्ट सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन)

३) अभियांत्रिकी सेवा परीक्षा (इंजिनिअरिंग सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन)

४) संयुक्त वैद्यकीय सेवा परीक्षा (कम्बाइन्ड मेडिकल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन)

५) विशेष वर्ग रेल्वे ॲप्रेंटिस (स्पेशल क्लास रेल्वे ॲप्रेंटिस)

६) भारतीय आर्थिक सेवा परीक्षा/ भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा
(इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन/ इंडियन स्टॅटिस्टिकल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन)

७) संयुक्त भौगोलिक शास्त्रज्ञ आणि भूवैज्ञानिक परीक्षा
(कम्बाइन्ड जिओ सायंटिस्ट ॲण्ड जिओलॉजिकल एक्झॅमिनेशन)

८) केंद्रीय सशस्त्र पोलीस दल
(असिस्टंट कमांडंट) (सेंट्रल आर्म्ड पोलीस फोर्सेस – असिस्टंट कमांडंट एक्झॅमिनेशन )

९) संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन)

१०) राष्ट्रीय संरक्षण अकादमी परीक्षा (नॅशनल डिफेन्स अकॅडमी एक्झॅमिनेशन)

११) नाविक अकादमी परीक्षा(नेव्हल अकॅडमी एक्झॅमिनेशन)

१२) विभागीय अधिकारी/ लघुलेखक (वर्ग-ब/ वर्ग-ख)

१३) विभागीय स्पर्धा परीक्षा.(सेक्शन ऑफिसर्स/ स्टेनोग्राफर)

१४) (ग्रेड बी/ग्रेड आय) डिपार्टमेंटल कॉम्पिटिटिव्ह एक्झॅमिनेशन

- **नागरी सेवा परीक्षा (सिव्हिल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन) IA-S**

वर दिलेल्या इतक्या सर्व परीक्षा जरी यूपीएससी घेत असली तरी यातील सर्वांची आवडती व प्रसिद्ध असलेली परीक्षा म्हणजे 'नागरी सेवा परीक्षा'(सिव्हिल सर्व्हिसेस एक्झॅमिनेशन). कारण या परीक्षेतून I-AS व IPS या सोबतच IRS, IFS, IRTS, IPOS अशा किमान १६ केंद्रीय पदांची भरती केली जाते.

अनेक तरुण- तरुणींचे आयएएस/ आयपीएस होण्याचे व देशाची सेवा करण्याचे, समाजासाठी काहीतरी चांगले करून दाखवण्याचे जे स्वप्न असते ते या परीक्षेमार्फत पूर्ण होऊ शकते. संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत महाराष्ट्रीय तरुण मागे पडतात. याबाबत बऱ्याच वेळा चर्चा होताना दिसते. मात्र वस्तुस्थिती अशी आहे, की गेल्या काही वर्षांपासून संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या मराठी विद्यार्थ्यांची संख्या आता वाढण्यास सुरुवात झाली आहे.

यूपीएससीची ही नागरी सेवा परीक्षा तीन टप्प्यात घेतली जाते. १) पूर्व २) मुख्य व ३) मुलाखत. विशेष म्हणजे या परीक्षेच्या तिन्ही टप्प्यावर आपण आपली मातृभाषा मराठीचा पूर्ण वापर करू शकतो. मराठीतून पेपर लिहू शकतो व मुलाखत देऊ शकतो.

**१) पूर्व परीक्षा –** २०११ मध्ये संघ लोकसेवा आयोगाने आपल्या परीक्षाप्रणालीत मोठा बदल केला. २०११ पूर्वी परीक्षार्थीला सामान्य अध्ययन पेपरबरोबर एक ऐच्छिक विषयाचा पेपर द्यावा लागत असे. २०११ मध्ये हा पूर्वपरीक्षांचा ऐच्छिक पेपर काढून टाकण्यात आला व त्यासाठी सी सॅटचा पेपर ठेवण्यात आला. म्हणजे आता पूर्वपरीक्षेत पेपर १ (२०० गुण) हा सामान्य अध्ययनाचा पेपर असतो आणि पेपर २ (२०० गुण) हा CSAT चा पेपर असतो. हे दोन वेगवेगळे पेपर असतात. जर उमेदवाराने चुकीचे उत्तर नमूद केले असेल तर, प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी त्या प्रश्नांसाठी असलेल्या गुणांच्या तुलनेत १/३ इतके गुण योग्य उत्तरांसाठी मिळालेल्या गुणांमधून वजा केले जातात. यालाच '1/3 Negative Marking'असेही संबोधले जाते.

**अभ्यासक्रमातील समाविष्ट घटक**

- **पूर्वपरीक्षा पेपर - I - GS (General Students)**

  १) इतिहास – प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक

  २) भूगोल – भारत, जग, पर्यावरण

  ३) भारतीय राज्यघटना (राज्यशास्त्र)

  ४) विज्ञान तंत्रज्ञान

  ५) भारतीय अर्थव्यवस्था

  ६) चालू घडामोडी

- **पूर्वपरीक्षा पेपर - II - CSAT (Civil Service Aptitude Test)**

  १) उतारा वाचून उत्तरे द्या (Comprehension)

  २) बौद्धिक चाचणी

  ३) Logical Reasoning

  ४) गणित

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरीक्षेचा व संघ लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरीक्षांचा अभ्यासक्रम तंतोतंत सारखा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना या दोन परीक्षांसाठी स्वतंत्र अभ्यास करावा लागत नाही. एम.पी.एस.सी व यू.पी.एस.सी या दोन्ही परीक्षांची तयारी बरोबरच सुरू केली तर या परीक्षांमध्ये यश मिळविणे सोपे होते.

**यूपीएससी मुख्य परीक्षा**

मुख्य परीक्षा ही लेखी स्वरूपाची असते. या परीक्षेत एकूण ९ पेपर्स २३५० गुणांसाठी असतात. त्यातील भाषा विषयांचे ६०० गुण हे पात्रता परीक्षेसाठी असतात. ते अंतिम गुणवत्ता यादीत धरले जात नाहीत. या ठिकाणी आपण मराठी भाषा घेऊ शकतो. दोन भाषांचे पेपर वगळता ७ पेपर्सचे गुण व मुलाखतीचे गुण अंतिम निकालासाठी एकत्रितपणे विचारात घेतले जातात. सर्व पेपर्स वर्णनात्मक पद्धतीने असतात व प्रत्येक पेपरसाठी तीन तासांचा कालावधी देण्यात येतो. उमेदवारांकडे असलेली माहिती आणि त्यांची स्मरणशक्ती जोखण्यापेक्षा उमेदवाराची आकलनशक्ती आणि बौद्धिक क्षमता तपासणे, हा मुख्य परीक्षेचा उद्देश असतो. एखादी सुशिक्षित व्यक्ती कोणत्याही विशेष (Specialised) अभ्यासाशिवायही उत्तरे देऊ शकेल असे सामान्य अध्ययनाच्या प्रश्नांचे स्वरूप असते.

**मुलाखत**

तुमचा बायोडाटा हाच तुमचा मुलाखतीचा अभ्यासक्रम आहे. मुख्य परीक्षेच्या अर्जामध्ये नमूद केलेली व्यक्तिगत माहिती आणि तुमचा बायोडाटा हीच मुलाखतीची सर्वसाधारण चौकट असते. बायोडाटामध्ये नोंदवलेल्या प्रत्येक शब्दाचा सूक्ष्म अभ्यास करा. तुमच्या छंदांवर विशेष लक्ष असू द्या. अनेकदा छंदाविषयी प्रश्न विचारले जातात. मुलाखत तुमच्या व्यक्तिमत्त्व विकासाची चाचणी आहे. पूर्व आणि मुख्य परीक्षेद्वारे तुमच्या ज्ञानाची परीक्षा झालेली असते. मुलाखतीतून प्रशासकीय पदांसाठी तुम्ही किती योग्य आहात हे तपासले जाते. व्यक्तिमत्त्वाचा विकास हा काही दिवसांचा अभ्यास नसतो, ती एक दीर्घकालीन प्रक्रिया असते. मुलाखतीची तयारी कशी करायची ते आपण शेवटच्या टप्प्यात पाहू.

**ब) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (MPSC)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ च्या अनेक पदांसाठी विविध परीक्षा घेतल्या जातात. त्या परीक्षांना राज्यसेवा, संयुक्त (कंबाईन), वर्ग-३, क्लेरिकल व सरळ सेवा परीक्षा असे म्हटले जाते. याशिवाय वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच शिक्षण क्षेत्रातील विशेष पदांसाठी एम.पी.एस.सी.

वेगवेगळ्या परीक्षांचे आयोजन करते. होतकरू व महत्त्वाकांक्षी तरुण विद्यार्थी राज्यसेवा व संयुक्त परीक्षा देण्यास उत्सुक असतात.

**१) राज्यसेवा –** राज्यसेवा परीक्षांद्वारे उपजिल्हाधिकारी (Dy. Collector) गट अ तसेच पोलीस उपअधीक्षक (Dy. Sp/- ACP) गट अ, याबरोबरच प्रशासनातील जवळजवळ १६ ते १७ पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात.

**एम.पी.एस.सी.द्वारा भरली जाणारी पदे–**

१) उपजिल्हाधिकारी, गट अ २) पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त– गट अ, ३) सहायक विक्रीकर आयुक्त– गट अ, ४) उपनिबंधक सहकारी संस्था– गट अ, ५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी)– गट अ , ६) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट अ (कनिष्ठ), ७) मुख्याधिकारी, नगरपालिका/ परिषद, ८) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क– गट अ, ९) तहसीलदार–गट अ, १०) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी– गट ब, ११) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा–गट ब, १२) कक्ष अधिकारी– गट ब, १३) गटविकास अधिकारी– गट ब १४) मुख्याधिकारी नगरपालिका, १५) सहायक निबंधक सहकारी संस्था– गट ब, १६) उपअधीक्षक, भूमिअभिलेख– गट ब, १७) उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क– गट ब, १८) सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क– गट ब १९) नायब तहसीलदार– गट ब.

एम.पी.एस.सी. परीक्षा ही पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या तीन टप्प्यांत होते. आधी सांगितल्याप्रमाणे यूपीएससीची व राज्यसेवेची पूर्वपरीक्षा यांचा अभ्यासक्रम सारखाच आहे. तसेच निगेटिव मार्किंगची पद्धत पण एकच आहे. **पूर्व परीक्षा :** पूर्व परीक्षेसाठी २०० गुणांच्या दोन प्रश्नपत्रिका असतात. यासाठी आपणास दोन तासांचा वेळ असेल. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असून प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेत असेल. पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेप्रमाणेच आहे.

**मुख्य परीक्षा :** यात ६ पेपर एकूण ८०० गुणांकरिता असतात.

**पेपर–१ :** मराठी (गुण–१००) वेळ–तीन तास

**पेपर–२ :** इंग्रजी (गुण–१००) वेळ –तीन तास

मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर हे दीर्घोत्तरी स्वरूपाचे असतील. भाषा अभ्यासक्रमात निबंध लेखन, भाषा व्यवहार, अहवाल लेखन, औपचारिक भाषण तयार करणे, संवादकौशल्य, उताऱ्यावरील प्रश्न, भाषांतर, सारांशलेखन व व्याकरण इ. चा समावेश असेल.

सामान्य अध्ययनाचे एकूण चार पेपर असतात.

१) पेपर १– इतिहास व भूगोल

२) पेपर– २– राज्यशास्त्र

३) पेपर ३– मानव साधन संपत्ती

४) पेपर ४– अर्थशास्त्र व विज्ञान

चारही पेपर हे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे असतात. या अभ्यासक्रमाची पातळी पदवी स्तरावरची असते. ३:१ या प्रमाणे निगेटिव्ह मार्किंग पद्धत असेल (चुकीच्या ३ उत्तरांसाठी १ गुण वजा केला जाईल) प्रत्येकी पेपर १५० गुणांचा असेल व वेळ दोन तास असेल. प्रत्येक पेपरमध्ये खुल्या गटातील उमेदवारांना ४५% गुण व राखीव वर्गातील उमेदवारांना ४०% गुण मिळवणे आवश्यक आहे. मुलाखतीसाठी १०० गुण असतील.

**२) संयुक्त अर्थात कंबाइनची परीक्षा (PSI/STI/-ASO)**

पूर्व परीक्षा– पूर्वी PSI/STI/-ASO या परीक्षांसाठी वेगवेगळ्या पूर्व– परीक्षा घेतल्या जात होत्या पण गेल्या काही वर्षांपासून या सर्व PSI, STI व ASO (Assistant Section Officer) या तिन्ही पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या पूर्वपरीक्षेचे स्वरूप आणि अभ्यासक्रम समान असतो. या पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येते. १०० प्रश्न व १०० गुणांची ही एकच परीक्षा होते.

**मुख्य परीक्षा –** तिन्ही पदांसाठी वेगवेगळ्या तीन मुख्य परीक्षा घेतल्या जातात. प्रत्येक परीक्षेत दोन पेपर असतात. एक पेपर मराठी व इंग्रजीसाठी तर दुसरा पेपर सामान्य अध्ययन व त्या त्या पदासाठी आवश्यक ज्ञान असणारे प्रश्न असतात. STI आणि -ASO या दोन्ही पदांसाठी मुख्य परीक्षेचे दोन्ही पेपरचे गुण ग्राह्य धरले जातात. मुख्य परीक्षा २०० गुणांची असते. या २०० गुणांपैकी STI आणि -ASO ची अंतिम यादी जाहीर होते. मात्र PSI पदासाठी आणखी दोन टप्पे म्हणजे शारीरिक चाचणी १०० गुणांसाठी आणि मुलाखत ४० गुणांसाठी घेतली जाते.

**स्पर्धा परीक्षांसाठी मराठीचे स्वरूप : अभ्यासक्रम परिचय**

स्पर्धा परीक्षांबद्दल जे काही गैरसमज आहेत त्यापैकी सर्वात मोठा म्हणजे, आम्ही ग्रामीण भागातील व मराठी माध्यमातील मुले आहोत. आमचे शिक्षण कला शाखेतून झाले आहे. इंग्रजी माध्यमातील व सायन्स शाखेतील मुलांपेक्षा आम्ही खूप मागे आहोत, हा आहे. खरं म्हणजे हा खूप मोठा गैरसमज आहे. गेल्या काही वर्षातील UPSC/ MPSC मधील यशस्वी विद्यार्थ्यांची यादी पाहिली तर असे दिसते की बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भाग, मराठी माध्यमातील आहेत. त्यामुळे मनात कोणताही न्यूनगंड न ठेवता आत्मविश्वासाने या परीक्षांना सामोरे जाणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांच्या प्रत्येक टप्प्यावर इंग्रजीला समांतर मराठी आहे. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. एमपीएससीचीच नाही तर अगदी IAS/ IPS साठी UPSC जी मुलाखत घेते ती सुद्धा आपल्याला मराठी माध्यमातून देता येते.

आता अगदी प्रत्येक परीक्षेमध्ये मराठी विषय व त्याचा अभ्यासक्रम कसा अंतर्भूत आहे ते आपण पाहू –

**अ) कंबाइन/संयुक्त परीक्षा (PSI/STI/A-SO) मधील मराठी**– यातील पूर्व परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते. तरीदेखील प्रत्येक इंग्रजी प्रश्नाच्या खाली त्याचे भाषांतर मराठीमध्ये दिलेले असते.

**PSI/STI/-ASO च्या मुख्य परीक्षेतील मराठीचा अभ्यासक्रम–** मुख्य परीक्षा देखील बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते. यातील पहिल्या पेपरमध्ये मराठीचा समावेश आहे. पहिल्या पेपरमध्ये मराठी ५०, इंग्रजी

३० व सामान्य ज्ञान २० असे एकूण १०० प्रश्न, १०० गुणांसाठी असतात. या परीक्षेत मराठीसाठी ५० प्रश्न, ५० गुणांसाठी असतात व त्याचा दर्जा बारावीच्या मराठी पेपर इतका असतो. यात खालील घटक असतात.-

**सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि वाक्यात उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.**

**उदाहरणार्थ –**

विक्रीकर निरीक्षक (एसटीआय) च्या २०१७ च्या मुख्य परीक्षेत विचारलेले दोन प्रश्न आपण बघू -

**१) 'पाऊस पडत असेल तर आपण काही नाटकाला येणार नाही' या वाक्यातील आपण हे ------------ सर्वनाम आहे?**

**पर्याय–**

१) प्रथम पुरुषवाचक २) आत्मवाचक

३) १ व २ हे पर्याय बरोबर आहेत. ४) द्वितीय पुरुषवाचक

**२) 'गारा' या शब्दाचे पुढीलपैकी कोणते अर्थ मराठी भाषेत होतात?**

**पर्याय–**

१) पावसाळ्यात पडणाऱ्या गारा २) 'गार' चे पुल्लिंग रूप

३) चिखल ४) पर्याय क्रमांक १ व ३ बरोबर

**ब) राज्यसेवा परीक्षा मधील मराठी –**

राज्यसेवा पूर्वपरीक्षेत दोन पेपर असतात. यातील पहिला पेपर सामान्य अध्ययनचा आहे. संयुक्त परीक्षेसारखाच हा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असतो. यातही इंग्रजी प्रश्नांचा मराठी अनुवाद दिलेला असतो. दुसरा पेपर ज्याला CS-T म्हटले जाते हा पेपर देखील इंग्रजी-मराठी असा असतो. या पेपर मध्ये ४५ ते ५० टक्यांहून अधिक प्रश्न हे उताऱ्यावरील प्रश्न असतात. आता या ठिकाणी मराठी विद्यार्थ्यांचा फायदा हा होतो की हे उतारे इंग्रजी सोबतच मराठीमध्ये देखील दिलेले असतात. ज्यांचे आकलन मराठीत पटकन होऊन आपण त्या उताऱ्यावरील प्रश्न कमी वेळात सोडवून वेळ वाचवू शकतो. CS-T चा पेपर एकूण राज्यसेवेच्या पूर्व परीक्षेत महत्त्वाचा मानला जातो. या पेपरमधील तांत्रिक स्वरूप पाहता, पेपर एक, या सामान्य अध्ययनच्या पेपरपेक्षा हा दुसरा CS-T चा पेपर अधिक गुण देतो. अर्थात मराठी माध्यमातील व कला शाखेतील विद्यार्थ्यांना हा पेपर नक्कीच फायदेशीर ठरतो यात शंका नाही.

**राज्यसेवा मुख्य परीक्षा–** आपण यापूर्वी राज्यसेवा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम पाहिला त्यानुसार मुख्य परीक्षेत पेपर एक व पेपर दोन यांमध्ये प्रत्येकी ५० प्रश्न असे १०० प्रश्नांचे व १०० गुणांचे पेपर मराठीचे आहेत. त्यातील अभ्यासक्रमात खालील मुद्दे समाविष्ट आहेत.

**पेपर १ (इंग्रजी व मराठी)–** यातील मराठीसाठी एकूण १०० पैकी ५० गुण आहेत. हा पेपर पारंपरिक अर्थात वर्णनात्मक आहे. यात

१) **निबंध लेखन –** दोनपैकी एका विषयावर सुमारे ४०० शब्द

२) **भाषांतर –** इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर, सुमारे अर्धे पान/दोन परिच्छेद

३) **सारांश लेखन –**

**उदाहरणार्थ–**

**राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१८ मध्ये आलेला प्रश्न**

१. एका विषयावर ४०० शब्दाचा निबंध लिहा

a) मी तुमचा महाराष्ट्र बोलतोय

किंवा

b) मराठी भाषेची कथा आणि व्यथा

**पेपर २ (इंग्रजी व मराठी)–** यामध्ये मराठीसाठी एकूण १०० पैकी ५० गुण आहेत. हा पेपर वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी आहे. यामध्ये

१) **व्याकरण–**

म्हणी, वाक्प्रचार, समानार्थी/ विरुद्धार्थी शब्द, शुद्धलेखन/विरामचिन्हे इत्यादी.

२) **आकलन–** उताऱ्याखालील प्रश्नांची उत्तरे

**क) लिपिक/ टंकलेखक परीक्षा–** यातील पूर्वपरीक्षेच्या पेपर एक च्या प्रश्नपत्रिकेतील १०० प्रश्नांमध्ये मराठीच्या प्रश्नांचा समावेश आहे. यासाठी आयोगाच्या अभ्यासक्रमातील मुद्दे आहेत– व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर.

**मुख्य परीक्षा–** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि वाक्यात उपयोग.

**ड) विक्रीकर विभागातील कर सहायक (गट– क) परीक्षा –**

पूर्वपरीक्षा १०० प्रश्न व १०० गुणांची असून यात मराठी, इंग्रजी, अंकगणित, सामान्यज्ञान व बुद्धिमापन चाचणी यांचा समावेश आहे. यात मराठीसाठी खालील अभ्यासक्रमाचा समावेश आहे – व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर.

**मुख्य परीक्षा–** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना,व्याकरण,म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि वाक्यात उपयोग यांचा समावेश आहे.

**इ) संघ/ केंद्रीय लोकसेवा आयोग–**

यात मुख्य परीक्षेत पात्रता पेपर म्हणून आपण आपली मातृभाषा मराठी निवडू शकतो. हा पेपर पारंपरिक स्वरूपाचा अर्थात लेखी स्वरूपाचा असून तीन तास व ३०० गुणांचा आहे. या पेपरमध्ये विद्यार्थ्याला २५

टक्के म्हणजे ७५ गुण मिळवून उत्तीर्ण व्हायचे असते. तरच मुख्य परीक्षेतील इतर पेपर तपासले जातात. यातील अभ्यासक्रम खालीलप्रमाणे -

१) **निबंध –** १०० गुणासाठी ४०० शब्दांत निबंध लिहायचा असतो. यात चार ते पाच निबंधाचे विषय दिलेले असतात.

२) **उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा–** हा घटक ६० गुणांसाठी विचारला जातो. यात बाराच्या आसपास प्रश्न असतात.

३) **सारांशलेखन–** हा घटक ६० गुणांसाठी विचारला जातो.

४) **भाषांतर–** दिलेल्या उताऱ्याचे मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत भाषांतर करावयाचे असते. यासाठी ४० गुण असतात. मराठीतील उताऱ्याचे इंग्रजीत व इंग्रजीतील उताऱ्याचे मराठीत असे भाषांतर करायचे असते. प्रत्येकी २० गुण यासाठी असतात.

५) **कल्पना विस्तार–** यात कल्पनेला अनुसरून त्यावर भाष्य करायचे असते.

६) **संवादलेखन–** २० वाक्यांत संवाद लिहिणे. यासाठी २०१७ मध्ये 'मेक इन इंडिया मोहीम' हा विषय दिला होता. जसा आपण इतरांशी संवाद साधतो त्याप्रमाणे संवाद लिहावा. यासाठी १० गुण असतात.

७) **व्याकरण–** १) समानार्थी शब्द २) विरुद्धार्थी शब्द ३) म्हणी/ वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे. ४) दिलेल्या शब्दसमूहासाठी एक शब्द लिहिणे.

**वैकल्पिक विषय–** UPSC च्या मुख्य परीक्षेत जे वैकल्पिक विषय असतात, त्यापैकी आपण एक वैकल्पिक विषय म्हणून मराठी साहित्य हा विषय तो घेऊ शकतो. २५० गुणांचा असतो. इतर तांत्रिक विषय घेण्यापेक्षा कला शाखेतील विद्यार्थी मराठी साहित्य हा विषय निवडतात.

हा विषय निवडण्याचा दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे, संपूर्ण भारताचा विचार करता फार कमी परीक्षार्थी हा विषय निवडतात ज्यांची मातृभाषा मराठी आहे असेच विद्यार्थी मराठी साहित्य हा विषय घेतात. त्यामुळे साहजिकच अधिक गुण घेण्याची शक्यता असते.

**स्पर्धा परीक्षेसाठीची कौशल्ये**

कुठल्याही स्पर्धेत उतरण्यासाठी त्या त्या स्पर्धेस आवश्यक असणारी कौशल्ये अंगी बाणवणे आवश्यक आहे. तर आणि तरच आपण त्या क्षेत्रातील सर्वोच्च शिखर गाठू शकतो. ऑलिम्पिकसाठी तयारी करणारे खेळाडू चार-पाच वर्षे तयारी करत असतात तेव्हा कुठे ते पदक आणू शकतात. उद्योग व्यवसायात यश मिळवायचे असेल तरी देखील त्या त्या क्षेत्रातील बारकावे व सखोल ज्ञान अर्थात कौशल्य प्राप्त होत नाही तोपर्यंत उद्योगात देखील यश मिळत नाही. त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी देखील परीक्षा देणाऱ्या उमेदवारांमध्ये काही विशेष कौशल्य अंगी बाणवणे गरजेचे असते, जे त्यांना प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी कामी येते. वाचन, टिपणे, हस्ताक्षर, संदर्भपुस्तके किंवा गटचर्चा या अशा बाबी आहेत. ज्यांचा उपयोग स्पर्धा परीक्षांसाठी तर होतोच पण अधिकारी म्हणून निवड झाल्यावर देखील होतो. इतकेच नाही दुर्दैवाने कुठे

निवड झाली नाही तरी एक जबाबदार नागरिक म्हणून देखील या कौशल्यांचा आपल्याला उपयोग होतो. आपण क्रमश: या कौशल्यांची माहिती घेऊ.

**वाचन –** माणसाला वाचनाची सवय असली की त्याचे नक्कीच फायदे होतात मग तो कुठल्याही क्षेत्रात काम करत असो, नोकरी करत असो वा उद्योग व्यवसाय करत असो. वाचन माणसाला समृद्ध बनवते. सखोल विचार करायला शिकवते. विश्लेषण व चिंतन करायला शिकवते आणि दुसऱ्याचे जगणे समजून घ्यायला मदत करते. वाचनाने माणूस अधिक समाजशील प्राणी बनतो.

त्यातही स्पर्धा परीक्षांचे क्षेत्र म्हटले की, वाचनाचे प्रचंड फायदे होतात. स्पर्धा परीक्षांसाठी वाचन कसले करायचे असा प्रश्न विद्यार्थ्यांना असतो. पहिली बाब ही की एमपीएससी व यूपीएससीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे काही विशिष्ट पुस्तकांचे वाचन तर आपल्याला करावे लागते. त्यांचे रिव्हिझन पण करावे लागते.

काही जण सतत शॉर्टकट शोधत असतात. चार पुस्तकांची नावे सांगितली तर दोनच वाचले तर चालतील का असे विचारतात. असा दृष्टिकोण या क्षेत्रात फार उपयोगी पडत नाही. जितके अधिक वाचाल तितकी तुम्हाला एखाद्या विषयात मिळालेली माहिती सखोल असेल. अलीकडील आयोगाच्या प्रश्नपत्रिका पाहिल्या तर लक्षात येते की ते आता पारंपरिक प्रश्न, प्रश्नांची पुनरावृत्ती करत नाहीत. सतत नवीन व वेगळे प्रश्न असतात. अशा वेळी ज्यांचे विविध विषयांचे वाचन अधिक ते विद्यार्थी असे प्रश्न पटकन सोडवून यशाच्या जवळ पोहचतात.

आपल्या नेहमीच्या क्रमिक पुस्तकांसोबत अवांतर वाचन देखील केले पाहिजे. यात आत्मचरित्र, चरित्र यासोबतच विज्ञानविषयक, सामाजिक विषयांवरील तसेच अगदी कथा कादंबऱ्या देखील वाचल्या पाहिजेत. यातून एकतर आकलन, विश्लेषण व समज वाढते. आता निरीक्षण शक्ती वाढते. कल्पना शक्ती सुधारते, प्रेरणा मिळते आणि असे अनेक फायदे होतात. वाचनाने तुमची फक्त भाषाच नाही तर तुमचे व्यक्तिमत्त्वही प्रगल्भ होते. सुरुवातीला ५०- १०० पानी छोटी पुस्तके वाचा. प्रेरणादायी पुस्तके वाचल्यास वाचनाचा उत्साह वाढतो. छोटे पुस्तक आहे म्हणून दोन दिवसात पूर्ण करू नका. सवय लागेपर्यंत रोज १०- १२ पानेच वाचा. सातत्य टिकवायचे असेल तर सुरुवातीच्या काळात लहान उद्दिष्ट ठेवणे फायद्याचे ठरते. (स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासालाही हे तत्त्व लागू पडते.) तुमचा वाचनाचा किंवा अभ्यासाचा आलेख आहे हळुवार पण तो नेहमी वाढता राहील यासाठी प्रयत्न करा. घाई नको.

- पुस्तक कसे निवडू हा प्रश्न अनेकदा विद्यार्थ्यांना पडतो. वर सांगितल्याप्रमाणे प्रेरणादायी/ आत्मचरित्रपर पुस्तके सुरवातीला निवडू शकता.(उदा.- 'मन में है विश्वास' हे विश्वास नांगरे पाटील यांचे पुस्तक), तुम्हाला ज्या गोष्टींची आवड आहे त्या विषयावरील पुस्तकांपासून सुरुवात करा.
- वृत्तपत्र रोज वाचण्याची सवय लावून घ्या. त्यातील संपादकीय पान, विज्ञान व अर्थविषयक घडामोडी आवर्जून वाचा. रविवार व इतर दिवशी येणाऱ्या पुरवण्यांचे वाचन करा.चालू घटनांवरील काही लेख आवर्जून वाचा. परीक्षेला फायदा होईलच पण अनेक विषय जाणून घेता येतील.
- The Hindu सारख्या काही वृत्तपत्रांमध्ये अनेक चांगल्या पुस्तकांवर चांगल्या वाचकांची प्रतिक्रिया/ परीक्षणपर सदर येत असते. तसेच मराठीतील 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता' या वृत्तपत्रातून देखील अशी

सदरे येतात. अशी पुस्तक परिचयपर सदर वाचून कोणते पुस्तक वाचावे हे ठरवू शकता. (सवय लागल्यानंतरच हा प्रयोग करा.)

- स्वतः ला चॅलेंज करून एका महिन्यात किमान दोन नवीन पुस्तके वाचा.पुस्तक वाचताना त्यातील महत्त्वाचे मुद्दे, वाक्य अथवा घटना वहीत नोंदवत जा.
- जी भाषा आपल्याला समृद्ध करायची आहे त्या भाषेतील छोटी पुस्तके वाचा. ज्यांना इंग्रजी समृद्ध करायची आहे त्यांनी विवेकानंद, गांधीजी, ऐतिहासिक पुस्तके वाचा. इतर भाषांमधील पुस्तके वाचल्यास शब्दसंग्रह वाढतो आणि ती भाषा सुधारण्यास मदत होते.

  लेखनशैली सुधारण्यासाठी वाचन अतिशय महत्त्वाचे आहे.
- समाजमाध्यमांवर जितका वेळ घालवता त्यातील निम्मा वेळ पुस्तक वाचनास देऊन पाहा. व्यक्तिमत्त्वात नक्की सुधारणा होईल.
- अगदी लहान मुलांची पुस्तके वाचण्यापासून सुरुवात केली तरी चालेल. आजकाल ऑनलाईन अनेक पुस्तके pdf फॉरमॅटमध्ये उपलब्ध आहेत, कॉपीराईटचे उल्लंघन न करता तुम्ही ती पुस्तके वाचू शकता.

**नोट्स (टिपणे)**

एकूणच परीक्षा कोणतीही असो, त्यासाठी नोट्स काढणे हा एक महत्त्वाचा घटक आहे. नोट्स काढण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. इतके नक्की की नोट्स काढणे म्हणजे आहे ते पुस्तक जसेच्या तसे उतरवणे नव्हे. परीक्षा जवळ आली की या काढलेल्या नोट्स आपल्याला मार्गदर्शक ठरतात व आपला वेळ वाचवितात.

**स्वतः च्या नोट्स काढणे उत्तम**

प्रत्येकाच्या नोट्स ह्या त्या व्यक्तीने संदर्भ पुस्तके वापरून काढलेल्या असतात. पुस्तकातील कोणता भाग नोट्समध्ये असला पाहिजे आणि काय वगळले पाहिजे, याचा विचार नोट्स काढणाऱ्याने केलेला असतो. म्हणजे त्याने जर तीनशे शब्द वाचले असतील, तर साधारण तो पन्नास शब्दामध्ये तो सारांशरूपाने नोट्समध्ये लिहितो. ज्यावेळी ती व्यक्ती या नोट्स वाचत असते, त्यावेळी ती केवळ नोट्समधील पन्नास शब्द वाचत नसते तर तिला नोट्स काढताना वाचलेल्या तीनशे शब्दांची उजळणी होत असते. कारण त्या व्यक्तीने त्या नोट्स स्वतः काढलेल्या आहेत म्हणून नेमकी ही प्रक्रिया आयत्या नोट्स वापरणाऱ्या विद्यार्थ्यामध्ये घडू शकत नाही. याचा परिणाम मग उत्तर लिहिताना होतो. आयत्या नोट्स वापरणाऱ्यासाठी असतात फक्त पन्नास शब्द. त्याच्या आधारेच त्याला उत्तर लिहावे लागते. आणि मग उत्तराची गुणवत्ता घसरते..मार्क येत नाहीत. तर स्वतः नोट्स काढणाऱ्यासाठी असतात तीनशे शब्द. साहजिकच त्याच्या उत्तराची गुणवत्ता सरस राहते. जो स्वतः नोट्स काढतो त्या काढताना त्याची विचार करण्याची पद्धत त्यात प्रतिबिंबित होत असते. ही विचारप्रक्रिया आयत्या नोट्स काढणाऱ्यामध्ये येणे शक्य नाही. म्हणून कुणाच्या आयत्या नोट्स जशाच्या तशा वापरण्याच्या फंदात पडू नका. त्याने कशा पद्धतीने नोट्स काढल्या हे तुम्ही पाहू शकता. त्यानुसार तुम्ही तुमच्या नोट्स काढा. म्हणून नोट्स या नेहमी आपल्याच असल्या पाहिजेत.

**नोट्सच्या आधी अभ्यासक्रमाचा अभ्यास करा**

नोट्स काढण्याआधी अभ्यासक्रम काळजीपूर्वक नजरेखालून घाला. त्यातील शब्द न् शब्द वाचा. कारण परीक्षा अभ्यासक्रमावर आधारित आहे. या अभ्यासक्रमावर याआधी कसे प्रश्न आलेले आहेत हे पहा. त्याचे विश्लेषण करा. सुरुवातीला ही प्रक्रिया कंटाळवाणी वाटेल. पण तुमच्या एकंदरीत अभ्यास आणि नोट्स काढण्याच्या प्रक्रियेत नेमकेपणा येण्यासाठी फार महत्त्वाची आहे. नोट्स भरकटू नये म्हणून हे करणे गरजेचे आहे.

**परीक्षेसाठी फायदेशीर**

बऱ्याचदा अनेक विद्यार्थी पुस्तक वाचण्यावर जास्त भर देतात. नोट्स काढणे त्यांना कंटाळवाणे वाटते. पुस्तक वाचून थेट परीक्षेत उत्तर लिहिणे त्यांना सोपे वाटते. कदाचित त्यांची स्मरणशक्ती अफलातून असू शकते. आपण जर स्पर्धा परीक्षेचे स्वरूप, वेळापत्रक या साऱ्या गोष्टी पाहिल्या तर केवळ पुस्तके वाचून उत्तर लिहिणे मला जरा कठीण असते. परीक्षेआधी सर्व घटकांची उजळणी होणे खूप महत्त्वाचे असते. अशावेळी कुणीही व्यक्ती सारे संदर्भ, पुस्तके वाचू शकत नाही. नोट्समुळे हे सहज शक्य होते. कारण नोट्समुळे विशाल असणारा अभ्यासक्रम आपल्या आवाक्यात येतो. परीक्षा पथावरील प्रवास सुखकर करण्यासाठी नोट्स Road Signs ची भूमिका निभावतात. आणि उत्तर लिहिताना आपला रस्ता भरकटत नाही.

नोट्स काढताना लिहिण्याचा सराव होतो. म्हणजे परीक्षेत वेळ न पुरण्याची जी ओरड होते, ती तुमच्याबाबतीत होत नाही. एकप्रकारे ही परीक्षेआधीची रंगीत तालीमच. सारांश पद्धतीने विचार करण्याची सवय वाढते. महत्त्वाचे म्हणजे अभ्यासात नेमकेपणा येतो. आणि उत्तर भरकटत नाही.

**परीक्षेच्या स्वरूपानुसार नोट्स**

आपण कोणत्या परीक्षेची तयारी करतो त्यावर नोट्स कशा असाव्यात हे अवलंबून असते. स्पर्धा परीक्षा बहुपर्यायी तसेच दीर्घोत्तरी अशा स्वरूपाची असते. मग नोट्स काढताना हा विचार केला पाहिजे. बहुपर्यायी परीक्षेसाठी खूप जास्त न लिहिता नेमके मुद्दे लिहायला हवेत. त्याला अनुसरून काही key points असायला हवेत, की जे परीक्षेदरम्यान आपल्याला उत्तराजवळ घेऊन जायला मदत करतात. अशा परीक्षेसाठी नोट्सचा विस्तार खूप करायची गरज नसते. मुद्दे असे हवेत की जे परीक्षेआधी सहज डोळ्यांखालून घालता येतील.

दीर्घोत्तरी स्वरूपाच्या परीक्षेसाठी नोट्स काढताना विशेष काळजी घ्यावी लागते. एकतर या परीक्षेसाठी शब्दमर्यादा आणि वेळेचे भान, या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. म्हणून नोट्स काढण्याआधी संदर्भ पुस्तके किमान एकदा व्यवस्थित वाचली पाहिजेत. मात्र नोट्स काढताना त्या अभ्यासक्रम डोळ्यांपुढे ठेवून काढल्या पाहिजेत. म्हणजे पुस्तकातील नको असलेला भाग नोट्समध्ये येत नाही. अजून एक काळजी घेतली तर नोट्समध्ये नेमकेपणा येण्यास मदत होते, ती म्हणजे याआधीच्या परीक्षेतील, त्याच भागावर कोणते प्रश्न आले होते, त्यात काय विचारले होते, हे पाहिले पाहिजे. शिवाय त्यामुळे नोट्स दर्जेदार होण्यास मदत होते.

**नोट्सच्या पद्धती**

नोट्स काढताना तंत्र महत्त्वाचे असते. तुम्ही नुसतेच लिहिता की त्या लिहिण्यात तंत्र अवलंबता हे पाहिले पाहिजे. आवश्यक तिथे आलेख, नकाशा, तक्ता, टेबल, आकृत्या यांचा सढळ वापर नोट्स मध्ये

असेल, तर नोट्समध्ये अनावश्यक वाक्य भरती टळते. तसेच हीच सवय परीक्षेमध्ये उत्तर लिहिताना वापरली तर दिलेल्या शब्दमर्यादेमध्ये तुम्ही अधिक देऊ शकता. कारण आकृत्या किंवा इतर तत्सम माहिती ही शब्दमर्यादेमध्ये धरली जात नाही. आणि मग इतर विद्यार्थ्यांपेक्षा तुम्हाला अधिक गुण मिळून जातात.मुख्य नोट्स काढताना पानाच्या दोन्ही बाजूंनी समास सोडला पाहिजे. जेणेकरून तुम्हाला एखाद्या मुद्द्यासंदर्भात अधिक काही लिहायचे असेल तर तिथे तुम्ही लिहू शकता. हे म्हणजे जेव्हा तुम्ही नवीन पुस्तक वाचता आणि त्यात त्या मुद्द्यांसंदर्भात काही नवीन माहिती कळते, आणि ती तुम्हाला परीक्षेसाठी महत्त्वाची वाटते..

**नोट्सचे वेगळेपण**

महत्त्वाचे मुद्दे वेगळ्या शाईचे पेन वापरून लिहावेत. म्हणजे नोट्स वाचताना ते लक्षात राहतात. काही महत्त्वाचे शब्द अधोरेखित करावेत. प्रत्येकवेळी नोट्स वाचताना त्यात काही ना काही भर पडत असते. नवीन कल्पना, नवीन सादरीकरणाच्या पद्धती सुचतात. त्यांचा समावेश नोट्समध्ये करायला हवा. तुम्ही काही वेगळे, नेमके आणि गुणवत्तापूर्ण दिले, त्यात शब्दमर्यादा पाळली, तर उत्तराला इतरांपेक्षा अधिक गुण निश्चित येतात.

नोट्स काढणे म्हणजे नुसते लिहिणे किंवा सुंदर अक्षर काढणे नव्हे. तो दह्यातून लोणी काढण्यासारखा प्रकार असतो. ते नवनीत असते. सार असते.एकूण काय तर परीक्षेच्या आखाड्यात जी कुस्ती खेळावी लागणार आहे, ती रोज खेळण्याचा सराव करणे म्हणजे नोट्स काढणे होय.

**लेखन व हस्ताक्षर**

चांगले अक्षर हे आयुष्याचा दागिना असतो असे म्हणतात. त्यामुळे चांगले अक्षर असलेले विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात उठून दिसतात. ज्या स्पर्धा परीक्षांमध्ये दीर्घोत्तरी प्रश्न असतात तिथे आपले हस्ताक्षर चांगले असणे गरजेचे आहे. ते विकसित करता येऊ शकते. लेखन, मनन, वाचन, चिंतन आणि मेहनत या पंचसूत्रीतून प्रभावी लेखनकौशल्य सुधारता येते.स्पर्धा परीक्षेत अलीकडे वस्तुनिष्ठ परीक्षांची संख्या वाढली आहे. सरळसेवा, संयुक्त सेवा, गट ब व गट क च्या परीक्षा, यातील पूर्व व मुख्य परीक्षा या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी आहेत. पण राज्यसेवा मुख्य परीक्षेमध्ये मराठी व इंग्रजी या विषयांचे पेपर दीर्घोत्तरी असतात तसेच यूपीएससीचे मुख्य परीक्षेचे सर्व पेपर देखील लिखित स्वरूपाचे असतात.

यातील उत्तरांची रचना करतांना सुरुवात, मध्य व शेवट महत्त्वाचा असतो. विचारलेल्या प्रश्नाचा अर्थ आपल्याला समजला का हे आपल्या उत्तरात समजत असते. त्याबरहुकूम आपण उत्तराची रचना करतो. उदा-

संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) २०१९ च्या मुख्य परीक्षेतील एक प्रश्न आपण पाहू की त्यात काय लिहिणे अपेक्षित आहे. (याठिकाणी एक बाब लक्षात घ्या की, यूपीएससीच्या प्रश्नपत्रिका या फक्त इंग्रजी व हिंदी या दोनच भाषेत असतात. पण उत्तर मात्र मराठीतून लिहिता येते.)

**प्रश्न- There are no literery sources for the Harppan culture and no archaeological evidence for the Vedic period. Explain the phenomenon. (हडप्पा**

**संस्कृती के लिये कोई सांस्कृतिक स्रोत नही है एवं वैदिक काल के लिये कोई पुरातात्त्विक साक्ष्य नही है. इस तथ्य की व्याख्या किजिये।)**

या प्रश्नाचे उत्तर लिहिण्यापूर्वी काही क्षणात आपल्या अभ्यासाची उजळणी होते. एकदम मूलभूत बाब लक्षात येते की पहिले हडप्पा संस्कृती आली व त्यानंतर वैदिक संस्कृती आली. या दोन्ही संस्कृतींचा अभ्यास करतांना अभ्यासकांनी जी इतिहासाची साधने वापरली आहेत त्यावर खरे तर हा प्रश्न आहे. दोन वेगवेगळ्या काळासाठी हे आपल्याला मांडायचे आहे.

आता बघू या उत्तराचा क्रम कसा असावा. याचे फक्त मुद्दे याठिकाणी देत आहे. याच मुद्द्यांचे विस्तारित स्वरूप उत्तरात येणे अपेक्षित आहे. -

१) सुरुवातीला दोन्ही संस्कृतींचा कालावधी सांगून नंतर हडप्पा कशी स्थायी व नगरीय संस्कृती होती हे सांगावे. त्यानंतर वैदिक संस्कृती स्थलांतरित व पशुचारकांची होती, त्यामुळे त्यांचे स्थायी अवशेष सापडत नाहीत हे सांगावे. नंतर

२) हडप्पा संस्कृतीच्या अभ्यासासाठी उपलब्ध असलेले स्रोत म्हणजे तेथील विविध उत्खनन केलेली स्थळे, तेथील कोठार व स्नानगृह, मुद्रा, मातीची भांडी इत्यादी थोडक्यात सांगावे.

३) पुस्तकाच्या लिखित स्वरूपात अथवा अभिलेख किंवा शिलालेखाच्या माध्यमात काहीही आढळले नाही. महत्त्वाचे म्हणजे विविध ठिकाणी सापडलेली अक्षरे वाचता आलेली नाहीत याचा उल्लेख करावा.

४) दुसरीकडे वैदिक संस्कृतीमध्ये निर्माण झालेले चार वेद, उपनिषद यांचा नावासहित उल्लेख करावा. कारण वैदिक संस्कृतीचा अभ्यास याच साधनांनी केला जातो

५) वैदिक काळातील शहरे, घरे अशी कोणतीच पुरातात्त्विक साक्ष आढळली नाही. जसे ते हडप्पात सापडले व हडप्पात असे कोणतेच सांस्कृतिक/ लिखित/ मौखिक वेद (जसे वेदकाळामध्ये आढळतात) पुरावे आढळत नाहीत-

अशी मांडणी करावी व शेवटी प्रश्नातील वाक्य वापरून समारोप करावा.

**वेळेचे व्यवस्थापन**

कोणीही आजचा वेळ उद्यासाठी वाचवून ठेवू शकत नाही. आजचा वेळ आजच उपयोगात आणता येऊ शकतो. उद्याचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी (लक्षात घ्या, आपल्या वेळेचा आपल्यापेक्षा कोणीही योग्यप्रकारे उपयोग करू शकत नाही.) काहीजण वेळेचे बंधन पाळून आपले जीवनमान उंचावतात तर काहीजण वेळेचे गुलाम होऊन बसतात.

वेळ ही फार महत्त्वाची बाब आहे. काही वेळा तर वेळ हीच सर्वस्व बनून बसलेली असते. वेळ फक्त त्यांचाच मान राखते, जे वेळेचा मान राखतात. वेळ ही प्रत्येकासाठी महत्त्वाची बाब असून आपल्या प्रगतीत ती फार महत्त्वाची भूमिका बजावते. फक्त तिचा वापर कसा करावा याचे ज्ञान व्हायला हवे, तरच आपण आपले ध्येय/ उद्दिष्ट जलद गाठू शकतो. वेळेचा योग्य वापर ही बाब बऱ्याच जणांसाठी एक समस्या बनलेली

असते. यासाठी वेळेचे व्यवस्थापन हाच एक योग्य उपाय आहे. वेळेचे व्यवस्थापन ही एक साधी गोष्ट असून त्यासाठी वेगळे प्रयत्न कशाला करायला हवेत. वेळेच्या व्यवस्थापनामुळे आपल्या कार्यक्षेत्रात व जीवनात बऱ्याच गोष्टींचा वापर करण्याचे ज्ञान प्राप्त होते.

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्यांसाठी अभ्यासाचे नियोजन हे पूर्णपणे वेळेच्या व्यवस्थापनावर अवलंबून आहे. परीक्षेचे दोन तास हे पूर्णपणे चांगले जाण्यासाठी परीक्षेपूर्वी घालविलेला वेळ (वर्षभर- सहा महिने- दोन अथवा तीन महिने किती अभ्यास केला?) फार महत्त्वाचा आहे.

स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांनी ज्या दिवसापासून ठरविले असेल की आपल्याजवळ अभ्यासासाठी किती वेळ उपलब्ध आहे? (मग ती परीक्षा यूपीएससी, एमपीएससी, अथवा स्टाफ सिलेक्शनची असो) त्यातील वाचनासाठी किती वेळ द्यावा, गणित व बुद्धिमत्ता या विषयांवरची उदाहरणे सोडविण्यासाठी किती वेळ द्यावा, उजळणीसाठी किती वेळ द्यावा, प्रत्येक विषयाला किती वेळ द्यावा तसेच उजळणी केव्हा सुरू करावी या सर्व प्रश्नांच्या उत्तरात वेळेचे नियोजन हा सामाईक घटक आहेच आणि मग का एकदा या प्रकारचे नियोजन आपण योग्यरीतीने करू शकलो तर प्रत्यक्ष परीक्षेला वेळ कसा योग्य पद्धतीने वापरता येईल या सरावाचीच अंमलबजावणी करायची शिल्लक राहील.

आपला दिनक्रम कसा आहे? (समजा नोकरी करीत असाल अथवा विद्यार्थिदशेत असाल तर किंवा पूर्णपणे स्पर्धापरीक्षांची तयारी करीत असाल तर) वर्तमानपत्र वाचण्यासाठी किती वेळ द्यावा व कोणता वेळ द्यावा हे ठरविता आले पाहिजे आणि ही व्यक्तिपरत्वे बदलणारी मापदंडे आहेत. (चालू घडामोडींच्या अभ्यासासाठी बातम्या पाहणे.)

स्वतःपासून सुरुवात करून विचार करायला हवा की, आपण आपला अमूल्य वेळ कसा वाया घालवतो. तसेच प्रत्येकाने वर्षाचे, महिन्याचे, आठवड्याचे तसेच दिवसाचे ध्येय ठरवून त्या ध्येयापर्यंत कसे पोहोचायचे याचे नियोजन करायला हवे. कामाचा क्रम ठरवा. महत्त्वाच्या कामासाठी वेळ, त्यानंतरची कमी महत्त्वाची असा अग्रक्रम ठरवायला हवा.

वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे हे सर्वांनाच माहीत आहे. जो वेळेचा पुरेपूर सदुपयोग करतो तो निश्चितच यशस्वी होतो. या जगात सर्वांनाच सारखा वेळ विधात्याने दिलेला आहे. कोणालाही दिवसाचे २५ तास दिलेले नाहीत. असे असूनही काहीजण यशस्वी तर काहीजण अयशस्वी का होतात? तर याचे मूळ कारण वेळेचे व्यवस्थापन या घटकाशी निगडित आहे. त्यामुळे यश आणि अपयश या दोन्ही गोष्टींचा वेळेच्या व्यवस्थापनाशी फार घनिष्ठ संबंध आहे.

### गटचर्चा (GD-Group Discussion)

MPSC/ UPSC या परीक्षांचा विचार केला तर यांच्या परीक्षापद्धतीमध्ये थेट गटचर्चा हा घटक नसतो व त्याला काही वेगळा टप्पा किंवा गुण असे काही नसतात. पण अनेक केंद्रीय व राज्य सरकारची पदे, खाजगी कंपनीतील काही पदे, डिफेन्समधील काही पदे या ठिकाणी ग्रुप डिस्कशन अर्थात गटचर्चेला महत्त्व आहे.

एमपीएससी व यूपीएससी मध्ये जरी थेट गटचर्चा समाविष्ट नसली तरी या परीक्षांचा शेवटचा टप्पा मुलाखत आहे, ती गटचर्चापेक्षा कमी नाही. या आयोगाचे पॅनल तीन ते पाच लोकांचे असते. सुरुवातीचे

वैयक्तिक ओळखीचे प्रश्न सोडले तर नंतर जे प्रश्न विचारले जातात व त्यातून जे उपप्रश्न निघतात ते चर्चेच्या स्वरूपातीलच असतात.

इतर परीक्षांमध्ये एक गट तयार केला जातो व त्यांना एखादी विशिष्ट विषय दिला जातो. एखाद्या विषयात विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा व वाचनाचा कस लागतो. उदा. भारतीय अर्थव्यवस्थेची पुढची पाच वर्षे कशी असतील? या विषयावर बोलतांना मुळात तुम्हाला भारतीय अर्थव्यवस्थेची माहिती असायला हवी. त्यासाठी वाचन, तुमचं मत हे तुम्ही कसे मांडता हे महत्त्वाच ठरतं.

याउलट काही विषय असे असतात ज्यात तुम्हाला विशेष माहितीची गरज नसते. फक्त तुम्ही चर्चेला कशी सुरुवात करतात, आपले म्हणणे कसे मांडता हे महत्त्वाचे असते.

गटचर्चा कोणतीही असो त्यात तुमची विचार करण्याची क्षमता, विचारांची खोली, तुमची मतं तुम्ही कशी मांडता, लॉजिक, योग्य शब्दांचा प्रयोग, विषयातील वैविध्य, दुसऱ्यांच्या मताचा आदर हे सार बारकाईने पाहिले जाते. फक्त तुम्हीच बोलत आहात व दुसऱ्याला संधीच देत नाही हे बरोबर नाही. तसेच तुम्ही तुमचे काहीच मत मांडत नाही हेही चुकीचे आहे.

अर्थात हे सर्व गुण जन्मतः मिळत नाहीत. त्यावर मेहनत घेतली की ती कौशल्ये विकसित करता येतात. आजकाल काही शाळा कॉलेजमध्ये यावर काम केले जात आहे. त्याद्वारे मुलांची गटात काम करण्याची क्षमता विकसित केली जात आहे. वैयक्तिक विद्यार्थी सुद्धा स्वतः यावर मेहनत घेऊन स्वतःला विकसित करू शकतात. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतांना देखील अशा प्रकारची गटचर्चा उपयोगी पडते.

**संदर्भसाहित्य**

स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासासाठी कोणते संदर्भ साहित्य वाचायचे हा नेहमीच विचारला जाणारा प्रश्न आहे. अनेक अवांतर पुस्तके, आत्मचरित्र, अधिकारी लोकांनी लिहिलेली पुस्तके वाचून आपला एक प्लॅटफॉर्म तयार झालेला आहे. आता थेट आयोगाच्या परीक्षांसाठी लागणारी पुस्तके कोणती त्याकडे आपण वळू.

- क्रमिक पाठ्यपुस्तके- जर तुम्ही यशस्वी विद्यार्थ्यांची पुस्तकांची यादी पहाल तर एक बाब त्यात समान असते की, या परीक्षांची सुरुवात ५ वी ते १२ वी पर्यंतची पुस्तके वाचून करायची असते. कोणत्याही स्पर्धा परीक्षेसाठी अगदी यूपीएससीसाठी देखील येथूनच सुरुवात होते. यात इतिहास, भूगोल, विज्ञान, अर्थशास्र, राज्यशास्त्र, पर्यावरण, गणित (१० वी पर्यंतचे त्यातही निवडक पुरेसे होते), या विषयांचा समावेश होतो. बऱ्याच जणांचा गैरसमज असतो की, आम्ही त्या टप्प्यामधून बाहेर आलोय, आता का वाचायची ती पुस्तके. तर मित्रांनो जेव्हा आपण शाळेत असतो तेव्हा लहान असतो व आपली आकलनक्षमता जास्त विकसित झालेली नसते. परीक्षांच्या अभ्यासातील सामान्य अध्ययनाच्या अभ्यासासाठी हीच पुस्तके उपयोगी असतात.
- एनसीईआरटी (NCERT) ची पुस्तके - ही पुस्तके देखील ६ वी ते १२ वी पर्यंत-वाचणे अपेक्षित आहे.

- वृत्तपत्र –रोज किमान दोन ते तीन वृत्तपत्र वाचणे अपेक्षित आहे. मराठीतील 'लोकसत्ता' व 'महाराष्ट टाइम्स' तर इंग्रजीतील द हिंदू/ टाइम्स ऑफ इंडिया/इंडियन एक्स्प्रेस यांसारखी वृत्तपत्रे नियमित वाचावीत
- मासिके – महाराष्ट्र शासनाकडून प्रकाशित होणारे 'लोकराज्य', तसेच केंद्र सरकारकडून प्रकाशित होणारे 'योजना' व 'कुरुक्षेत्र' या मासिकांचा वापर विद्यार्थी करतात. या शिवाय अनेक खाजगी क्लासेसने काढलेली मासिकेदेखील विद्यार्थी वाचतात. 'इंडिया इयर बुक' हे भारत सरकार तर्फे प्रकाशित होणारे महत्त्वाचे प्रकाशन आहे. भारत सरकार व महाराष्ट्र सरकारमार्फत वार्षिक आर्थिक पाहणी अहवाल प्रसिद्ध केले जातात ते वाचावेत.

**आंतरजाल (इंटरनेट) विविध ऑनलाइन चॅनेल्स व यू ट्यूब चा वापर**

अलीकडे इंटरनेटचा वापर अभ्यास करताना वाढला आहे. पण आंतरजालाचा वापर करतांना एक बाब लक्षात घेतली पाहिजे की अनावश्यक साइट्स वा फेसबुक/ व्हॉट्सअप सारख्या सोशल माध्यमांचा वापर टाळावा. नाहीतर वेळ कधी संपेल व तुम्ही कधी स्पर्धेबाहेर फेकले जाल सांगता येत नाही.

अलीकडे अनेक यू ट्यूब चॅनेल्स स्पर्धा परीक्षांसाठी सुरू झाले आहेत. तसेच काही खाजगी क्लासेसने त्यांचे बरेच अभ्यासाचे व्हिडिओ यू ट्यूबसारख्या साइट्स वर अपलोड केलेले आहे. ज्यांचा फायदा मोफत व अगदी घरबसल्या आपण घेऊ शकतो व अभ्यास करू शकतो. या शिवाय अनेक टेलिग्राम चॅनेल्स आहेत. ज्याद्वारे विद्यार्थी रोजचा अभ्यास रोजच करू शकत आहेत. शिवाय ऑनलाइन चॅनेल्स सब्स्क्राईब करून त्याद्वारे घरबसल्या लेक्चर ऐकता येते. सराव प्रश्नपत्रिका घेऊन ते सोडवून देणारे क्लासेस ऑनलाइन सेवाही पुरवतात.

**मुलाखतीची पूर्वतयारी व तंत्रे (मुलाखत कशी द्यावी)**

लेखी परीक्षांचे अडथळे पार केल्यानंतर मुलाखतीला सामोरे जाताना व्यक्तिगत माहिती संदर्भातील प्रश्न जसे महत्त्वाचे असतात, तसेच भोवताली घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांविषयीचे उमेदवाराचे मत व भूमिकाही महत्त्वाची ठरते. स्पर्धापरीक्षेतील मुलाखतीची तयारी कशी करावी, याविषयी आता आपण जाणून घेऊ.

मुलाखत हा केंद्र लोकसेवा आयोग (यूपीएससी) आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेतील शेवटचा आणि महत्त्वपूर्ण टप्पा असतो. उमेदवाराचे अंतिम यादीतील स्थान निश्चित करण्यात हा टप्पा निर्णायक ठरू शकतो. म्हणूनच यात जास्तीत जास्त गुण मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवणे अत्यावश्यक आहे. यूपीएससीने २७५ गुणांसाठी तर एमपीएससीने १०० गुणांसाठी मुलाखतीचा अंतिम टप्पा निर्धारित केलेला आहे. **लोकसेवा आयोगाने मुलाखतीस 'व्यक्तिमत्त्व चाचणी' असे संबोधले आहे.** मुलाखतीचा हेतू उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व सनदी सेवा पदासाठी सक्षम आहे किंवा नाही याची तपासणी करणे होय. व्यक्तिमत्त्वाची सर्व अंगे मुलाखतीमध्ये विचारात घेतली जातात. व्यापक अर्थाने मुलाखतीत उमेदवाराच्या ज्ञानाची कसोटी घेतली जाते, असे नाही तर आपल्या भोवताली घडणाऱ्या महत्त्वपूर्ण घटना–घडामोडी याविषयी उमेदवाराची भूमिका व मत काय आहे, याची तपासणी केली जाते.

मुलाखत मंडळातील अनोळखी सभासदांसमोर तुम्ही किती सहजपणे वागू शकता आणि स्वतःला किती आत्मविश्वासपूर्वक सादर करू शकता, याची चाचणी मुलाखती दरम्यान होत असते. तुमच्या सभोवती घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांबाबत तुम्हाला माहिती आहे का? जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांमधील विविधांगी वास्तवाशी तुम्ही किती परिचित आहात? या घडणाऱ्या घटनांसंबंधी तुम्हाला मत आहे का? त्याचे स्वरूप काय? या माहितीच्या आधारावर तुमची सर्वसाधारण जाणीव कशी आहे, हे मुलाखती दरम्यान बघितले जाते. एकंदर उमेदवाराची स्पष्ट व तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता, मत व्यक्त करण्यातील समतोल, आवडीच्या गोष्टीमधील सखोलता आणि महत्त्वपूर्ण विषयांसंदर्भातील ज्ञान याबरोबरच त्याचा आत्मविश्वास, निर्णयक्षमता, आपत्कालीन परिस्थितीस सामोरे जाण्याची क्षमता इ. गुणवैशिष्ट्ये तपासली जातात.

**मुलाखत मंडळ**

मुलाखतीसाठी मुलाखत मंडळामध्ये आयोगाचे अध्यक्ष/ ज्येष्ठ सदस्य, वरिष्ठ अधिकारी (पोलीस/ इतर खाती)/ सनदी अधिकारी आणि ज्येष्ठ प्राध्यापक असतात. मुलाखतीविषयी विद्यार्थ्यांमध्ये पुष्कळ पूर्वग्रह दिसून येतात. ते असे की, उत्तम शैक्षणिक आलेख असला तरच चांगले गुण मिळतात. मुलाखत मंडळ हे जणू सापळाच रचून बसलेले असते. मुलाखत मंडळाने विचारलेल्या सर्वच प्रश्नांची उत्तरे यायला हवीत. अस्खलित इंग्रजीत संवाद साधल्यासच चांगले गुण मिळतात. मुलाखतीसाठी वशिला लावावा लागतो. अशा एक ना अनेक शंकाकुशंका स्पर्धकांच्या मनात घर करून असतात. म्हणूनच कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय मुलाखतीला सामोरे जाणे हा गुण मिळविण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. मुलाखत मंडळे ही कोणाशीही पूर्वग्रहाने वागत नसतात. कारण त्यांच्यासाठी तुम्ही फक्त एक स्पर्धक असता.

'मुलाखत' याचा शब्दशः अर्थ म्हणजे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व समोरासमोर खुले करणे. मुलाखतीमध्ये विषयातील ज्ञानाऐवजी उमेदवाराच्या व्यक्तिमत्त्वाची चाचणी घेतली जाते. व्यक्तिमत्त्वाची सर्व अंगे मुलाखतीमध्ये विचारात घेतली जातात. मुलाखतीद्वारे उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे मुलाखतीचा नेमकी तयारी करताना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक पैलू सादर करणे आवश्यक ठरते.

**मुलाखतीतील घटक**

उमेदवाराला मुलाखतीची तयारी करताना पुढील घटकांचा सविस्तर अभ्यास करावा लागतो. यातील विशेषतः वैयक्तिक माहिती, पदांचा पसंतीक्रम, पदवीचा विषय, त्याचा दैनंदिन जीवनातील वापर, छंद, नोकरीचा अनुभव आणि भोवताली घडणाऱ्या घडामोडी या घटकांची पुढीलप्रमाणे तयारी करावी लागते–

**(१) व्यक्तिगत माहिती –** मुख्य परीक्षेचा अर्ज भरताना उमेदवाराला आपली संपूर्ण व्यक्तिगत माहिती नमूद करावी लागते. 'आपला बायोडाटा'च पायाभूत मानून त्यातील प्रत्येक घटकाची तयारी करावी. यात उमेदवाराचे स्वतःचे नाव, आई-वडिलांचे नाव आणि आडनावासंबंधी माहिती संकलित करावी. आपल्या नावाचा विशिष्ट अर्थ असल्यास तो लक्षात घ्यावा. तसेच आपल्या नावाची एखादी व्यक्ती इतर क्षेत्रात सुप्रसिद्ध असल्यास तिच्याविषयी थोडक्यात माहिती संकलित करावी.

**(२) वास्तव्य–** विद्यार्थ्यांनी मूळ ठिकाण, सध्याचे ठिकाण, तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्य असे वर्गीकरण करावे. यातील प्रत्येक घटकाचा थोडक्यात इतिहास, भूगोल, समाजव्यवस्था, राजकारण, अर्थकारण, इतर काही महत्त्वाची वैशिष्ट्ये यासंबंधी तयारी करणे अत्यावश्यक ठरते.

**(३) शैक्षणिक पार्श्वभूमी–** उमेदवाराची शैक्षणिक पार्श्वभूमी हा आणखी एक महत्त्वपूर्ण घटक आहे. यात अगदी शालेय शिक्षणापासून, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन आणि पदवी- पदव्युत्तर शिक्षणापर्यंतची माहिती निर्णायक ठरते. विशेषत: पदवी शिक्षण आणि त्यातील विशेषत्व ही बाब महत्त्वाची मानावी. ज्या शाखेत आणि विषयात पदवी संपादन केली आहे त्यातील पायाभूत संकल्पना, विचार आणि उपयोजनात्मक भाग यावर लक्ष केंद्रित करावे. शिक्षण संस्थांची नावे आणि ठिकाणे यासंबंधीदेखील प्रश्न विचारले जाऊ शकतात. हे लक्षात घेऊन त्यासंबंधीही माहिती प्राप्त करावी.

**(४) अभ्यासबाह्य गोष्टींमधील रस–** उमेदवाराच्या व्यक्तिगत माहितीतील 'अभ्यासबाह्य बाबींतील रस' हा घटकही महत्त्वपूर्ण ठरतो. यात विद्यार्थ्यांचा छंद, क्रीडा प्रकारातील रस, विविध स्पर्धांत प्राप्त केलेली पारितोषिके, बक्षिसे अशा अभ्यासबाह्य घटकांचा समावेश होतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने या घटकाची प्रभावी तयारी करणे आवश्यक ठरते. अशा रीतीने उपरोक्त विविध घटकांची सविस्तर माहिती संकलित करून त्यावर आधारित अधिकाधिक 'मॉक इंटरव्ह्यू'चा सराव केल्यास अधिक गुण मिळवता येतील.

**(५) वैकल्पिक विषय–** यूपीएससी मुख्य परीक्षेसाठी उमेदवाराने निवडलेल्या वैकल्पिक विषयासंदर्भात देखील प्रश्न विचारले जाऊ शकतात. त्या विषयातील संकल्पना, विचार, सिद्धांत, विचारवंत, समकालीन आयाम इत्यादी घटकांचा अभ्यास करावा.

**(६) चालू घडामोडींविषयी माहिती–** आपल्या भोवताली घडणाऱ्या चालू घडामोडींविषयीही अनेक प्रश्न विचारले जातात. राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळी आणि सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, विज्ञान- तंत्रज्ञान, क्रीडा अशी विभागणी करून त्यासंबंधी महत्त्वाच्या घडामोडींची सविस्तर तयारी करावी. चर्चेतील मुद्द्यांचे स्वरूप, कारणे, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, संभाव्य उपाय इ. आयामांसंबंधी तयारी करावी. संबंधित मुद्द्यांविषयी जी प्रचलित मतमतांतरे आहेत, त्याची माहिती उमेदवाराकडे असणे गरजेचे आहे. या महत्त्वाच्या, कळीच्या मुद्द्यांविषयी स्वत:चे मत असणे महत्त्वाचे ठरते.

**(७) पदांचा पसंतीक्रम–** पदांच्या पसंतीक्रमाबाबत योग्य स्पष्टीकरण देता यावे. आपले व्यक्तिमत्त्व व आजूबाजूची परिस्थिती यांची आपल्या पसंतीक्रमाशी सांगड घालता आली पाहिजे. अर्थात यावेळीसुद्धा यशस्वी उमेदवारांनी दिलेल्या उत्तरांची पुनरावृत्ती करण्याचा मोह टाळावा. 'आपले पूर्वायुष्य व आलेले अनुभव यातून प्रशासकीय अधिकारी बनण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली,' असे आपण सांगू शकतो नेमक्या कारणांचा समावेश आपल्या उत्तरात असावा. दिलेल्या पसंतीक्रमांतील पदांची नेमकी माहिती, त्यांचे अधिकार, कर्तव्य, प्रशासनातील त्या पदाची नेमकी भूमिका याबाबत आपणास प्रश्नांना सामोरे जावे लागते. या पदांशी संबंधित सामाजिक व प्रचलित घडामोडींचे ज्ञान अपेक्षित असते.

**(८) नोकरीविषयक माहिती–** एखादा उमेदवार नोकरी करत असल्यास त्याविषयक सविस्तर तयारी करणे अत्यावश्यक ठरते. नोकरीचे कार्यक्षेत्र, पदाची कार्ये व जबाबदारी, त्यासंबंधी तांत्रिक माहिती, त्यातील

समस्या, आव्हाने आणि उपाययोजना या बाजूंबरोबरच नोकरीचा एकंदर अनुभव याविषयी नेमका अभ्यास करणे गरजेचे ठरते.

**प्रत्यक्ष मुलाखतीस जाताना**

मुलाखतीची संकल्पना आणि मुलाखतीची तयारी करताना विचारात घ्याव्या लागणाऱ्या बाबी पाहिल्यानंतर प्रत्यक्ष मुलाखतीस कशाप्रकारे सामोरे जावे, याबाबत चर्चा करता येईल. **मुलाखतीस प्रत्यक्षपणे सामोरे जाताना पुढील गोष्टींकडे आवर्जून लक्ष पुरवावे.**

१) प्रथम गोष्ट म्हणजे तुमचा **पेहराव**. कारण त्यावरून तुमची आवडनिवड, आचारविचार समजत असतात. आपला पोषाख औपचारिक, साधा नीटनेटका असावा. स्वच्छ, इस्त्री केलेला व स्वत:स शोभून दिसणारा असावा. मुलांनी शक्यतो शर्ट- पँट व टाय तर मुलींनी सलवार-कमीज अथवा साडी परिधान करावी. आपण कोणत्याही समारंभाला चाललेलो नाही, याचे भान ठेवून सौंदर्यप्रसाधनांचा कमीत कमी वापर करावा.

२) आपली **केशभूषा** ही एकदम फिल्मी न होता एका जबाबदार पदाच्या मुलाखतीसाठी चाललो आहोत याचे भान असणारी असावी.

३) दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कोणतीही धावपळ होऊ नये, म्हणून मुलाखतीच्या **नियोजित वेळेआधी नियोजित जागेवर पोहोचावे**. मुलाखतपत्रात **वेळ** दिलेली असते, तेव्हा तत्पूर्वी तुम्ही तेथे हजर राहा.

४) घरून निघण्याआधी **कागदपत्रांची फाइल** सोबत घ्या. त्यातील आवश्यक कागदपत्रे काही दिवसांपूर्वीच तपासून ते बरोबर असल्याची खात्री करा. जातांना ती फाइल सोबत न्यावी. बऱ्याच ठिकाणी मुलाखतीपूर्वी कागदपत्रांची तपासणी बाहेरच केली जाते. त्यामुळे मुलाखत कक्षात फाइल न्यावी की नाही हे तेथील स्थितीवर व व्यक्तिसापेक्ष ठरते. जर आपण आत फाइल घेऊन गेलो तर ती व्यवस्थित ठेवावी. आपल्या मांडीवर अथवा समोरच्या टेबलावर ती आपण ठेऊ शकतो.

५) जेव्हा तुम्ही मुलाखत कक्षात पोहोचाल तेव्हा कितीही ताणतणाव असला तरी आपल्या भावनांवर ताबा ठेवा, शांत राहण्याचा प्रयत्न करा. आपला नंबर आल्यावर आपल्याला आत जाण्यास सांगितले की आत्मविश्वास पूर्वक जा. दरवाजात उभे राहून 'मी आत येऊ का, सर/ मॅडम?' म्हणून विचारा. त्यांनी संमती दिल्यावर आत जा.

६) कक्षात गेल्यावर सर्वांना **अभिवादन** करा. मुलाखत मंडळात एखादी महिला सदस्य असतील तर त्यांना देखील अभिवादन करा. (उदाहरणार्थ, आत गेल्यावर जर आपण सर्वांना नमस्कार सर किंवा गुड मॉर्निंग सर असे म्हणत असू तर महिला सदस्यांना देखील नमस्कार मॅडम किंवा गुड मॉर्निंग मॅडम म्हणावे) जेव्हा तुम्हाला बसण्यास सूचित करण्यात येईल, तेव्हाच बसा. कारण तुमची मुलाखत काही उभी राहून घेतली जाणार नाही, तेव्हा शांत राहा. बसण्यास सांगितल्यावर Thanks (धन्यवाद) म्हणून बसा. बसताना खुर्चीचा आवाज येणार नाही याची काळजी घ्या.

७) तुम्ही शांत राहण्यासोबतच **आत्मविश्वासानेही** बोला. मुलाखत मंडळ तुम्हाला बाहेर काढण्यासाठी नव्हे तर तुमची निवड करण्यासाठी तेथे बसलेले असते. जर तुम्ही आत्मविश्वासाने उत्तरे देत असाल तर त्याचा नक्कीच अनुकूल प्रभाव पडत असतो.

८) उत्तरे देताना मुलाखत मंडळातील **सर्वांकडे पाहून उत्तरे देण्याचा** प्रयत्न करा. आवश्यक तिथे सर वा मॅडम संबोधनांचा वापर करा. बसताना आपली पाठ खुर्चीला पूर्ण टेकली असल्यास ताठ बसता येते. दोन्ही हात खुर्चीच्या दोन्ही हातांवर ठेवावे.

९) तुमच्या आत्मविश्वासाबरोबर **नम्रपणाही** दिसून येणे महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही नजरेत नजर घालून उत्तरे द्याल तेव्हा तुमचा आत्मविश्वास दिसून येईल. त्याचप्रमाणे तुमच्या उत्तर देण्याच्या पद्धतीवरूनदेखील तुमचा नम्रपणा जोखता येतो.

१०) मुलाखत मंडळाच्या **सदस्यांचा आदर राखा.** त्यांच्या अनुभवाचा मान राखा व उलट उत्तरे देऊ नका. अथवा उलट प्रश्न विचारू नका असंबंद्ध अथवा अतिशयोक्त उत्तरे देऊ नका. जर माहिती नसेल तर तसे स्पष्ट सांगा. मात्र चुकीची माहिती देऊ नका. अन्यथा त्याचा नकारात्मक परिणाम संपूर्ण मुलाखती दरम्यान दिसून येऊ शकतो.

११) तुमच्या उत्तरासोबत तुमचा **आवाजही** तितकाच महत्त्वाचा असतो. सहजपणे व स्पष्टपणे ऐकू जाईल अशा पद्धतीने बोलण्याचा प्रयत्न करा. अर्थात तुमच्या बोलण्यात ठामपणा व निर्धार असावा. मुलाखतीत स्वत:च्या व्यक्तिगत माहितीतून निर्माण होणारे प्रश्न जसे महत्त्वाचे असतात, तसेच भोवताली घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांविषयीचे उमेदवाराचे मत व भूमिकाही महत्त्वाची ठरते. भारतीय राज्यघटना, प्रशासनाची चौकट आणि आपल्या समाजातील सामाजिक, आर्थिक वास्तव यांचे भान ठेवूनच उमेदवाराने मुलाखत मंडळासमोर आपले व्यक्तिमत्त्व सादर करणे अपेक्षित असते. प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, जिज्ञासा, प्रतिसाद, आत्मविश्वास, निर्णय क्षमता, हजरजबाबीपणा अशा महत्त्वाच्या गुणवैशिष्ट्यांची तपासणी म्हणजे व्यक्तिमत्त्व चाचणी होय हे लक्षात घेऊनच उमेदवाराने मुलाखतीच्या तयारीची रणनीती आखावी.

मुलाखत संपत आल्यावर तशी जाणीव पॅनलचे सदस्य करून देतात. अशा वेळी सावकाश व आत्मविश्वासपूर्वक खुर्चीतून उठून सर्वांचे आभार मानून मग मुलाखत कक्षातून बाहेर पडावे. बाहेर निघतांना देखील काळजीपूर्वक बाहेर पडावे. तुम्ही पूर्ण मुलाखत कक्ष सोडेपर्यंत तुमची मुलाखत सुरू असते.

प्रत्यक्ष आयोगाने घेतलेल्या मुलाखतीचे आपण एक उदाहरण पाहू-

**भूषण अहिरे (उपजिल्हाधिकारी म्हणून राज्यात प्रथम- २०१८) यांची मुलाखत जशी झाली तशी. -**

मी – मे आय कम इन सर?

पॅनल अध्यक्ष- यस कम इन

मी – गुड आफ्टरनून सर

गुड आफ्टरनून मॅडम

अध्यक्ष – गुड आफ्टरनून, सीट डाउन

अध्यक्षसरांनी आत गेल्यावर बसायला सांगितले. मी टोकन देऊन बसलो.

अध्यक्ष – सध्या काय करता?

मी – सर, मी पूर्ण वेळ सध्या स्पर्धापरीक्षांची तयारी करत आहे.

अध्यक्ष – वडील काय करतात?

मी – सर, माझे वडील प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत. आई देखील प्राथमिक शाळेत शिक्षिका आहे.

अध्यक्ष – ओह... शिक्षकाचा मुलगा आहेस...

मी – हो सर

अध्यक्ष – १० वी पर्यंत शिक्षण?

मी – सर, माझं १० वी पर्यंत शिक्षण भगूर या गावी झाले.

अध्यक्ष – १२ वी शिक्षण?

मी – केटीएमएच कॉलेज, नाशिक, बीई एमईटी कॉलेज...(मध्येच थांबवत)

अध्यक्ष – भगूरचे वैशिष्ट्य?

मी – सर, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे जन्मगाव.

अध्यक्ष – काही आहे का हो त्यांचं घर वगैरे तिथं?

मी – हो सर, त्यांचं घर म्हणजे सावरकरवाडा अजून अस्तित्वात आहे.

अध्यक्ष – कशा अवस्थेत आहे?

मी – सर, पूर्वी त्याची दुरवस्था झाली होती. मात्र सध्या शासनाने सुधारणा केली आहे.

अध्यक्ष – तुम्ही गेला आहात का तिथे?

मी – हो सर, मी २-३ वेळा गेलो आहे.

अध्यक्ष – ट्रेकिंग चे फायदे? (माझा छंद ट्रेकिंग टाकला होता)

मी – सर, फिजिकल फिटनेस वाढतो. मनोबल वाढते. ट्रेकिंग करतांना एक गोल असतो. आपल्या मनात आधी भीती वाटते. मात्र सुरुवात केली की ध्येय जवळ आल्यासारखं वाटतं.

तसेच सर, दुर्गम भागात काम करताना म्हणजे (गडचिरोली, नंदुरबार इ.) जिथे अजून रस्ते नाहीत अशा गावात, पाड्यात कामानिमित्त ट्रेकिंगचा फायदा नक्की होईल.

अध्यक्ष – अजून काय?

मी – सर, निसर्ग दिसतो, भौगोलिक भूरूपे दिसतात.

अध्यक्ष – तिथं लोक दिसतात का हो?

मी – हो सर, दुर्गम भागातील लाईफ स्टाइल आणि आपली लाईफ स्टाइल यात फरक जाणवतो.

अध्यक्ष – कुठे केलं ट्रेकिंग?

मी – हो सर, महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसूबाई दोनदा मी सर केले आहे. तसेच नाशिक हा जिल्हा जोड-किल्ल्यासाठी प्रसिद्ध आहे. ऑल्मोस्ट सर्व जोड किल्ले सर केले आहेत. आता सध्या लेटेस्टमध्ये साल्हेर महाराष्ट्रातील सर्वांत उंच किल्ला सर केला आहे.

अध्यक्ष – जोड किल्ले? काय प्रकार आहे हा?

मी – सर, जवळजवळ असलेले एकाच डोंगरातील दोन किल्ले उदा.साल्हेर – मुल्हेर, अलंग-मलंग, मांगी-तुंगी.

अध्यक्ष – DC, Dy. Sp, तहसीलदार, CO-१ असा सर्वजण पसंती क्रम का देतात?

मी – सर, उपजिल्हाधिकारी (DC) हे एमपीएससीतील सर्वोच्च पद आहे.

अध्यक्ष – कसं काय? वरील सर्वच पदाचं महत्त्व आहेच ना ?

मी – हो सर, मात्र DC हे जनरल इज पद आहे. विविध पदांवर काम करता येते.

अध्यक्ष – प्रशासन केवळ आकर्षण की अजून काही?

मी – सर, तिसऱ्या वर्षाला असताना मला प्रशासकीय सेवेबाबत महिती झाली. एक महिला व सरांच्या संपर्कात मी आलो. म्हणून या क्षेत्राकडे वळण्याचा विचार मी केला.

सर्वप्रथम (१) मला नोकरी मिळणार आहे. (२) नोकरीबद्दल मला पगार मिळेल म्हणजे कुटुंबाला आर्थिक सुबत्ता. (३) काही छोटे-मोठे अधिकार व powers मिळतील. सर समाजात वावरतांना लोकांचे अगदी छोटे-छोटे प्रश्न असतात, आपण ते इझिली सोडवू शकतो. मात्र आपल्याला अधिकार नसल्याने अनेक अडचणी जाणवतात. सर मी छोटे प्रॉब्लेम्स तरी सॉल्व करण्याचा प्रयत्न करेन.

अध्यक्ष – सर्वसामान्य नागरिक म्हणून प्रशासकीय अधिकाऱ्याकडे बघण्याचा तुमचा दृष्टिकोन कसा आहे? गोड/छान बोलू नका. टीकात्मक बोला.

मी – सर, अधिकाऱ्यांना कामाचा व्याप जास्त असल्याने वेळेवर काम होत नाहीत. अनेक जबाबदाऱ्या असल्याने लोकांची कामे होत नाही.

अध्यक्ष – ते एकच कामात दिरंगाई .... अजून सांगा.

मी – सर, प्रशासकीय अधिकारी सर्वसामान्यांना उपलब्ध नसतात. लोकांची भेट होणे अवघड असते.

अध्यक्ष – अजून सांगा ....?

मी – (मी भ्रष्टाचाराबद्दल बोलणार होतो पण टाळले) माफ करा सर, मला आता आठवत नाही.

अध्यक्ष – तुम्ही अधिकारी आहात तुमच्या ऑफिसमध्ये

(१) १० ते ५ काम करणारे कर्मचारी

(२) १० ते ५ काम करणारे मेहनती कर्मचारी, शिवाय ते सर्वसामान्यांसाठी रात्रीपर्यंत काम करतात आणि लोक स्वतःत्यांना पैसे देतात.

तुम्ही कोणाला सपोर्ट कराल? आणि का?

मी – सर, मी सर्वसामान्यांसाठी काम करणाऱ्या मेहनती कर्मचाऱ्यांना त्यांच्या मेहनतीसाठी सपोर्ट करेन. मात्र त्यांच्या पैसे घेण्याच्या वृत्तीला सपोर्ट करणार नाही.

अध्यक्ष – थांबा...मी म्हटलं की लोक स्वतः त्यांना पैसे देतात, कर्मचारी पैसे मागत नाही.

मी – हो सर, मी मेहनती कर्मचाऱ्यांना सपोर्ट करेन. त्यांना विनंती करेन की लोकांनी स्वखुशीने पैसे देऊ केले तर ते स्वतः न घेता आपण ऑफिसमध्ये एक डोनेशन बॉक्स ठेऊ. त्यात ते पैसे टाका असे त्यांना सांगेल आणि त्या पैशातून सर्वसामान्यांसाठी काही सुधारणा करता...(सरांनी मला मध्येच थांबवत.)

अध्यक्ष – तुम्ही पैशाचं काय कराल ते नका सांगू... कोणाला सपोर्ट कराल ते सांगा?

मी – सर, मी मेहनती कर्मचाऱ्यांना कामासाठी सपोर्ट करेन, पैशांबाबत नाही.

अध्यक्ष – पोस्ट नाही भेटली तर डेस्क ऑफिसर जॉइन करणार का?

मी – माफ करा सर, मला असं वाटतंय की यावेळी माझा स्कोअर चांगला आहे आणि मला क्लास वनची पोस्ट भेटू शकते आणि दुर्दैवाने नाहीच भेटली तर मी पुन्हा स्टडी करेन.

अध्यक्ष – Spirit of inquiry काय आहे?

मी – सॉरी सर मला समजलं नाही?

अध्यक्ष – पुन्हा तोच प्रश्न विचारला (मोठ्या आवाजात)

मी – सॉरी सर, मला याबाबत आठवत नाही. (फंडामेंटल ड्युटीज मधील क्लॉज १ होता.)

आयपीएस सर

सदस्य १ – आपने बोला की मेहनती कर्मचारियो को आप सपोर्ट करोगे।

मी – यस सर

सदस्य १ – देअर आर फोर टाइप ऑफ करप्शन

(१) गिफ्ट (२) मेहनताना (३) पर्सेंटेज (४) एक्सटोर्शन

तुम्ही सांगितल्या प्रमाणे वरीलपैकी कोणतं करप्शन होईल.

मी – सर ते मेहनताना या प्रकारात येईल.

सदस्य १ – तुम्हाला एक कॉंट्रॅक्ट एका कंपनीला द्यायचं आहे. त्यात तुमचा ५% वाटा तुम्हाला मिळणार आहे. तुमच्यावर राजकीय दबाव आहे, तुम्ही कॉंट्रॅक्ट संबंधित कंपनीला नाही दिलं, तर तुमची बदली होईल. काय कराल?

मी       – सर, मी कायद्यानुसार योग्य ते काम करेन.

सदस्य १– तुम्हाला साईड पोस्टिंग भेटेल.

मी       – सर. मी कुठे पण जायला तयार आहे. गडचिरोली, मराठवाडा कुठेही.

सदस्य १– (पुन्हा एकदा फंडामेंटल ड्युटीजबाबत अध्यक्ष सरांनी विचारले, विचारलेल्या प्रश्नाला एक्सप्लेन करून)

वैज्ञानिक दृष्टिकोन, रिफोर्म्स बाबत सांगा?

कुछ तो बताओ? बोलो आप

मी       – सर, फंडामेंटल ड्युटीजच्या ७ किंवा ८ पॉइंट मध्ये याबाबत दिलं आहे.

सदस्य १– नक्की ७ किंवा ८ पॉइंट का?

मी       – सॉरी सर, नॉट कन्फर्म.

सदस्य १– मंदिर के उपर से एक महिने के बालक को फेका जाता है और उसे निचे झोली मे झेला जाता है? क्या है ये ?

मी       – सर, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक करता आला पाहिजे.

सदस्य २– महाराष्ट्र आणि पाणी याबाबत ७–८ वाक्यात बोला.

मी       – २०१३, २०१४, २०१५ या तीनही वर्षी महाराष्ट्रात दुष्काळ जाणवला आहे. महाराष्ट्र नैसर्गिकरीत्या दुष्काळयुक्त प्रदेश नाही..(मध्येच थांबवलं.)

सदस्य २– तुमच्याकडे ७–८ वाक्यं आहेत. स्पेसिफिक बोला.

मी       – गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र दुष्काळाचा सामना करत आहे. हवामान बदलामुळे महाराष्ट्राला या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्र हे सर्वाधिक मोठे धरण असलेले राज्य आहे. सध्या महाराष्ट्राची सिंचन क्षमता १७–१८% आहे. महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेमुळे ते क्षेत्र जास्तीत जास्त २१% पर्यंतच वाढवता येऊ शकते.

अध्यक्ष  – २१% कन्फर्म

मी       – हो सर. (विविध सिंचन संबंधित आयोगाच्या अहवालावरून)

माननीय मुख्यमत्री महोदयांनी दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी जलुयुक्त–शिवार अभियान योजनांची अंमलबजावणी केली आहे. त्याअंतर्गत २०१९ पर्यंत दरवर्षी ५००० गावे दुष्काळमुक्त करून महाराष्ट्रदेखील दुष्काळमुक्त होणार आहे.

मॅडम सदस्य २– women empowerment ...............(१)

Men mentality about women.....(२)

तुम्ही कशाला priority द्याल. ?

मी – मॅडम, मी women empowerment ला priority देईल. अनेक वर्षांपासून महिलांना डावललं गेलं आहे. त्यांच्यावर अन्याय झाला आहे. त्यांना शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक आरक्षण खूप गरजेचे आहे. २००१ साली भारत सरकारने महिला सबलीकरणाचं धोरण जाहीर केलं. आजही स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५०% महिलांना आरक्षण असलं तरीही त्यांचा सर्वच कारभार त्यांचे पती, भाऊ, मुलगा हेच बघतात. महिलांमध्ये capacity building झाली पाहिजे. त्यांच्यात नेतृत्वगुण develop झाला पाहिजे. संस्थात्मक बदल झाले तरच त्यांच्याकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन बदलेल.

(यानंतर सरांनी मला मुलाखत संपल्याची सूचना केली. सर्वांचे आभार मानून मी मुलाखत कक्षाच्या बाहेर आलो.)

ही माझ्या स्पर्धापरीक्षांच्या प्रवासातील शेवटची मुलाखत ठरली. अंतिम निकाल लागल्यानंतर माझ्या आयुष्यात लक्ख प्रकाश पडला. सगळे काही स्वप्नवत वाटत होतं, कारण मी उपजिल्हाधिकारी म्हणून महाराष्ट्रात प्रथम आलो होतो.

## ४.४ समारोप

पदवी पातळीवरील शिक्षण हा विद्यार्थी जीवनातील एक महत्त्वाचा व निर्णायक टप्पा आहे. पदवीचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी आपणांस पुढे काय करायचे आहे, याचे ध्येय निश्चित केले पाहिजे. शासकीय सेवेमध्ये स्पर्धा परीक्षांमधून विविध पदांवरील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. स्पर्धा परीक्षांची तयारी महाविद्यालयीन जीवनापासून केली पाहिजे. त्यासाठी अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ यांचा सखोल अभ्यास करावा. महाविद्यालयीन अभ्यासक्रमाबरोबरच स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम पाहून त्यानुसार घटकनिहाय टिपणे काढावीत. चौफेर वाचन, वेळेचे व्यवस्थापन, गटचर्चा, संदर्भ साहित्य, सामान्य ज्ञान, जिज्ञासूपणा, इंटरनेटवरील सामग्रीचा वापर यांसारख्या बाबी स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ठरतात. मुलाखतीचे तंत्रही प्रयत्नाने अवगत करता येते. ध्येय, आत्मविश्वास, परिश्रम, सकारात्मक विचार, जिद्द, ऊर्जा यांसारख्या गुणांच्या जोरावर स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होता येते. मराठी विषयाचे विद्यार्थीही ध्येय, नेमका अभ्यास, आत्मविश्वास यांच्या जोरावर स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होत आहेत.

## ४.५ प्रश्नोत्तरे

### अ) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न

१. भारत सरकारच्या सेवेतील विविध पदांसाठी परीक्षांचे आयोजन कोण करते?

अ) संघ लोकसेवा आयोग ब) महाराष्ट्र लोकसेवा आयोग

क) केंद्रीय कर्मचारी चयन मंडळ ड) कार्मिक मंत्रालय

२. महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील विविध पदांसाठी परीक्षा कोण घेते?

अ) केंद्रीय लोकसेवा आयोग ब) महाराष्ट्र लोकसेवा आयोग

क) सामान्य प्रशासन विभाग ड) कर्मचारी भरती मंडळ

३. स्पर्धा परीक्षांच्या तयारीमध्ये कोणती बाब महत्त्वाची असते?

अ) वेळेचे व्यवस्थापन ब) आर्थिक परिस्थिती क) कोचिंग क्लास ड) इंटरनेट

४. एखाद्या विषयाच्या विविध पैलूंचा परिचय होण्यासाठी कोणती पद्धत उपयुक्त ठरते?

अ) वेळेचे व्यवस्थापन ब) गटचर्चा क) टिपणे ड) व्याख्यान

५. मुलाखतीसाठी कोणती बाब सर्वाधिक महत्त्वाची असते?

अ) आत्मविश्वास ब) केशभूषा क) वेषभूषा ड) नम्रपणा

**उत्तरे**

१. संघ लोकसेवा आयोग
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग
३. वेळेचे व्यवस्थापन
४. गटचर्चा
५. आत्मविश्वास

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. स्पर्धा परीक्षांसाठी टिपणे कशी काढावी?
२. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी संदर्भ साहित्यांचे वाचन कसे करावे?

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी कोणकोणत्या कौशल्यांची आवश्यकता असते?

## ४.६ सरावासाठी प्रश्न

**अ) लघुत्तरी प्रश्न**

१. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वेळेचे व्यवस्थापन कसे करावे ते सांगा.
२. गटचर्चेची उपयुक्तता सांगा.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी, ते सांगून मुलाखतीची काही तंत्रे विशद करा.

## ४.७ उपक्रम

जिल्हाधिकारी/जिल्हा पोलीस प्रमुख यांची भेट घेऊन त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी केली, याबाबत माहिती जाणून घ्या.

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. पाटील राजेश, ताई मी कलेक्टर व्हयनू, (मनोविकास प्रकाशन)

२. नांगरे पाटील विश्वास, मन में हैं विश्वास, (राजहंस प्रकाशन)

३. खर्डे अजय, अजय, (युनिक प्रकाशन)

४. औटी विष्णू, नाना मी साहेब झालो, (युनिक प्रकाशन)

५. कुलंगे विजय, आजचा दिवस माझा, (दीपस्तंभ प्रकाशन)

६. नाईकवाडे फारूक, स्टीलफ्रेम, (राष्ट्रचेतना प्रकाशन)

७. भोळे मनोहर, राजमुद्रा, (युनिक प्रकाशन)

८. साळुंखे संदीप, धडपडणाऱ्या तरुणाईसाठी, (राजहंस प्रकाशन)

९. जाधव नरेंद्र, आमचा बाप आणि आम्ही, (ग्रंथाली प्रकाशन)

१०. कांबळे उत्तम, वाट तुडवितांना, (मनोविकास प्रकाशन)

११. मुळे ज्ञानेश्वर, माती, पंख आणि आकाश, (मनोविकास प्रकाशन)

१२. भारुड राजेंद्र, मी एक स्वप्न पाहिले, (दीपस्तंभ प्रकाशन) इ.

१३. घोलप रमेश, इथे थांबणे नाही, उमेद प्रकाशन

१४. तिवारी कृष्णा, फिटे अंधाराचे जाळे, दीपस्तंभ प्रकाशन

१५. बेदी किरण, आय डेअर

१६. गुप्ता रामचंद्र, गांधीनंतरचा भारत, मॅजेस्टिक प्रकाशन


❑❑❑